सत्यमेव जयते

# सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2013-2014

सह संचालक, मनपा लेप,उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई

रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी 2013-2014 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ............ 1

**कलम ९ अ खालील आक्षेप ............ 3**

2 कर्मचा-यांना दिलेल्या अग्रीम रक्कमांचे समायोजन केले नसलेबाबत. ............ 4

7 सांगली विभागाकडील मालमत्ता विभागाची थकबाकी रक्कम वसुल केली नसलेबाबत. ............ 7

10 मालमत्ता विभागाने मनपा अस्थापनेवर नसलेल्या व्यक्तींना निवास्थान वाटप केले असुन त्यांचे कडून घरभाडेची रक्कम वसूल केली नसल्याबाबत. ............ 12

13 नोंदणीकृत व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कर रक्कमेचा कमी भरणा केलेबाबत. ............ 16

14 मिरज घरपट्टी विभागातील जमा पावती पुस्तक क्र 456 उपलब्ध करुन दिले नसल्याबाबत. ............ 18

17 नविन पाणीपुरवठा कनेक्शनधारकांना मागणी देयके विलंबाने दिलेने महानगरपालिकेस पाणीपुरवठा देयकापोटी मिळणारी रक्कम वेळेत मिळत नसलेबाबत. ............ 20

18 पाणी मिटर बंद असल्यामुळे पाण्याच्या प्रत्यक्ष वापरा प्रमाणे महसुली उत्पन्न मिळत नसल्याबाबत. ............ 23

20 पाणीपट्टी थकबाकी वसूल करण्यासाठी नियमाप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेबाबत. ............ 25

26 उद्‌यान विभागामधील अनियमिततेबाबत ............ 26

28 पेट्रोल-डिझेल वाहनांच्या दुरुस्तीवर वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च केलेबाबत. ............ 29

29 कार्यशाळा विभागाला स्टॉकसाठी लागणारे लुब्रिकेटिंग ऑईल खरेदी मधील अनियमिततेबाबत ............ 30

33 विवाह नोंदणी शुल्क व शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरणा न केलेबाबत. ............ 32

34 विधी विभागाच्या कामकाजामधील अनियमिततेबाबत. ............ 34

49 बांधकाम परवानगी देताना वसुल केलेल्या उपकर रक्कमेचा भरणा कामगार कल्याण मंडळाकडे केला नसलेबाबत. ............ 37

51 जनरल फंड निधीच्या रोकडवही व बँकपासबुक रक्कमेमधील तफावतीचा ताळमेळ घेतला नसलेबाबत. ............ 39

52 भविष्य निर्वाह निधी खाते मधील अनियमितताबाबत. ............ 41

54 घन कचरा व्यवस्थापनांतर्गत साहित्य खरेदी मधील अनियमिततेबाबत. ............ 43

55 घन कचरा व्यवस्थापनांतर्गत कॉम्पॅक्टर खरेदी मधील अनियमिततेबाबत. ............ 46

67 इंदिरा घरकुल झोपडपट्टी स.न.138/ब येथे 155 + 651= 806 घरकुले बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. ............ 50

69 संजय गांधीनगर मिरज स.नं.964/अ येथे 438 घरकूलांचे पायाभुत सुविधासह बांधकाम करणे या कामामधील अनियमिततेबाबत ............ 61

70 माळबंगला येथे 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे आधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. ............ 69

77 घरपट्टीची मागणी देयके मालमत्ताधारकास विलंबाने दिलेने घरपट्टीचा भरणा उशिरा झाल्याने मनपास सदरची रक्कम वेळेत प्राप्त झाली नसलेबाबत. ............ 84

80 वाढीव व सुधारित सांगली व कुपवाड नळ पाणीपुरवठा योजना पॅकेज 3.1, 3.3 व 3.4 या कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत. ....................89
86 मुख्य लेखापरीक्षकांनी महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक चाचणी करुन 2013-14 या आर्थिक वर्षात केलेल्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाची प्रत लेखापरीक्षणास सादर केली नसलेबाबत. ....................96
87 वॉर्ड क्र.13 कॉंग्रेस भवन समोर स्वागत कमान बांधणे हे काम नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन करता येत नसताना केलेने झालेल्या अनियमिततेबाबत. ....................99
88 ठेकेदाराकडून नेमण्यात आलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांना किमान वेतनानुसार वेतन दिल्याबाबतची तसेच त्यांचे भविष्य निर्वाह निधीची रक्कम कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे भरणा केले बाबतची कागदपत्रे दाखविली नसलेबाबत. ....................102
89 महानगरपालिकेने कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांचे वेतनामधुन कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे भरणा केली नसल्याबाबत. ....................108
90 अर्थसंकल्पावरील भाष्य :- अंदाजपत्रकीय तरतुद व प्रत्यक्ष जमा व खर्च यामध्ये आढळून आलेल्या तफावतीबाबत. ....................110
91 आर्थिक वर्ष संपण्याचे अखेरीस बांधकाम विभागाने विकास कामाची टेंडर मागवुन त्याबाबतची कार्यवाही पुढील वर्षामध्ये केल्याने झालेल्या गंभीर वित्तिय अनियमिततेबाबत. ....................120
92 सुधारीत अंदाजपत्रपकाप्रमाणे खर्चामध्ये कपात करुन कामे न करता, मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीनूसार निविदा मागवुन कामे केल्याने प्रलंबित देयकाचे दायित्व महानगरपालिकेवर वाढून झालेल्या वित्तिय अनियमिततेबाबत. ....................122
93 प्रभाग समिती क्रं.1 व 2 च्या कार्यक्षेत्रातील गणेशोत्सव निमित्त रस्त्यातील खड्डे मुरुमाने भरणे या कामामधील अनियमिततेबाबत. ....................125
95 वॉर्ड क्र.25 मधील हरीओम नगर मंदीर जवळ आर.सी.सी.कमान बांधणे हे काम नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन केलेने झालेल्या अनियमितते बाबत. ....................128
99 महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची नोटीस भरपुर खप असलेल्या स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिली नसलेबाबत तसेच महासभा क्र.01 ते क्र. 05 चे इतिवृत्त नोंदवहीमध्ये लिहिले नसलेबाबत. ....................131
103 वार्षिक प्रशासन अहवाल व वार्षिक लेखे लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत. ....................135
104 स्थायी समीतीने लेखे ठेवणेसाठीचे निर्देशित केलेले विहित नमुने लेखा विभागाने लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत तसेच उपर्जित द्विनोंद पध्द्तीने लेखे व ताळेबंद ठेवला नसलेबाबत. ....................137
106 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3)(क) खाली करण्यात आलेल्या 17 कामांचे दप्तर लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने रक्कम रु.7916484/- आक्षेपाधिन ठेवण्यात आलेबाबत. ....................138

**कलम ९ ब खालील आक्षेप ....................140**

1 अनामत नोंदवही व बॅंक पासबुकमधील ताळमेळ जुळत नसलेने पडलेल्या रु. 2836744/- च्या फरकाबाबत. ....................141
8 मिरज विभागाकडील मालमत्ता भाडेची थकीत रक्कम वसुल केली नसलेबाबत. ....................142

9 महानगरपालिका निवासस्थानामध्ये राहणा-या कर्मचा-यांचे कपात केलेले मासिक घरभाडे स्वनिधीमध्ये जमा केले जात नसल्याबाबत. ....147
11 महानगरपालिका क्षेत्रातील मनपा मालकीची जागा, गाळे, खोके, इमारती यांची भाडेवाढ विहित मुदतीत न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. ....149
15 सांगली विभागाने घरपट्टीची आकारणी विलंबाने केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. ....150
16 महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पिण्याच्या पाण्याचा कोटा वाढवून न घेतल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. ....151
22 मासिक विद्युत देयकाच्या रकमा अदा करताना सवलत कालावधीचा फायदा न घेतल्याने झालेल्या नुकसानीबाबत. ....152
23 सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेतील घरपट्टी विभागाकडे जमा झालेला महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी उपकर विलंबाने शासनाकडे जमा केलेबाबत ....153
25 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील अनियमिततेबाबत. ....155
27 कॉम्पेक्टर नंबर MH-10-P1007 च्या दुरुस्तीमधील अनियमिततेबाबत. ....160
30 वाहन विभागातील अनियमिततेबाबत ....162
31 डंपर प्लेसर MH-10-P-22 च्या दुरुस्ती खर्चामधील अनियमिततेबाबत. ....163
35 सुधारित वेतन बँड मध्ये कमाल टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांना एक वेतनवाढ जादा दिल्याने व जादा ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कमेच्या झालेल्या अतिप्रदानाबाबत. ....165
36 अर्हताकारी सेवा 20 वर्ष पेक्षा कमी असताना स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजुर करुन निवृत्ती वेतन अंशराशीकरण रक्कम आदा केलेबाबत. ....167
37 पदोन्नती साखळीतील पदोन्नतीचे पद नसताना एकाकी पदानुसार ग्रेडवेतन मंजूर करणे ऐवजी चुकीचे ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत. ....169
38 चुकीच्या वेतननिश्चीतीमुळे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान व अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत. ....171
39 वाढीव कुटुंब निवृत्ती वेतन विहीत मुदतीनंतर कमी केले नसल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत. ....173
40 मनपा हद्दीतील रिकाम्या भुखंडावर (मोकळ्या जमीनीवर) कर निर्धारण केले नसल्याबाबत ....175
41 कुपवाड विभागाकडील मालमत्ता कर आकारणी मधील अनियमितताबाबत. ....177
42 मिरज विभागाने मालमत्ता कर आकारणी विलंबाने केल्याबाबत. ....179
43 मिरज विभागाकडील मालमत्ता कर आकारणी मधील अनियमितताबाबत ....181
44 सुजल निर्मल अभियान योजने अंतर्गत पॅकेज क्र. 1.1 व 1.3 मधील हिराबाग केंद्र येथे टाकी बांधणे, वितरण व्यवस्था बळकट करणे, बल्क मीटर बसविणे या कामातील अनियमिततेबाबत. ....183

45 सुजल निर्मल अभियानांतर्गत अस्तित्वातील वितरण व्यवस्था बळकटीकरण करणे, बल्क मीटर बसविणे व योजना 24/7 प्रणाली अंतर्गत चालविणे (पॅकेज क्र. 2.1 व 2.3) या कामातील अनियमिततेबाबत. ........................190
46 सुजल निर्मल अभियान योजने अंतर्गत मिरज जलशुध्दीकरण येथे 10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपारिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. ....................................................................197
47 सुजल निर्मल अभियान योजनेअंतर्गत पॅकेज क्र. 1.1 व 1.3 मधील शामराव नगर येथे ऑक्सीडेशनल पॉन्ड टाकी बांधणे, इंटेकवेल नुतनीकरण, फिडर मेन टाकणे, वितरण व्यवस्था नुतनीकरण करणे या कामातील अनियमितताबाबत.....................................................................................................................202
48 सुजल निर्मल अभियान योजनेअंतर्गत मिरज पाणीपुरवठा विभागातील अस्तीत्वातील 19.20 द.ल.लि. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता 28.80 द.ल.लि. पर्यंत वाढवणे व अस्तीत्वातील जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे. या कामातील अनियमितता...........................................................................................209
50 क्षेत्रफळ कमी धरुन आकारणी केल्याने उपकर, स्थानिक संस्था कर व दंडात्मक शुल्काची रक्कम कमी वसुल झालेबाबत.......................................................................................................................................213
53 शालेय क्रिडा स्पर्धा 2013-14 च्या खर्च रक्कमेची उपप्रमाणके, विनियोग दाखले व खर्चा बाबतची अनुषंगिक अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नसलेबाबत. ......................................................................214
56 वॉर्ड क्र. 21 मधील भिमनगर येथील रस्ते सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामामधील अनियमिततेबाबत..216
57 चिंतामणी नगर येथील सांस्कृतीक हॉल बांधणे या कामामधील अनियमिततेबाबत. .................................219
58 वॉर्ड क्र. 30 नवीन वसाहत अंतर्गत रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे करणे या कामामधील अनियमिततेबाबत. .........222
59 वॉर्ड क्र. 59 गणेश नगर, डी.ए. पाटील घर, बेडकर किराणा दुकान, शास्त्रीनगर समाज मंदिर रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामामधील अनियमिततेबाबत. ..........................................................................224
60 वॉर्ड क्र.14 केशव कॉलनी अंतर्गत रस्ते करणे या कामामधील अनियमिततेबाबत. ...................................227
62 चुकीच्या वेतननिश्चीतीमुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत..........................................................................229
65 सुधारित वेतन बँड मध्ये कमाल टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांना एक वेतनवाढ जादा दिल्याने व जादा ग्रेडवेतन मंजूर केल्याने झालेल्या वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत.............................................................................................................233
68 बांधकाम परवाना दिलेल्या व्यक्तिकडुन एल.बी.टी.ची उर्वरित 50 टक्के रक्कम वसुल केली नसलेने झालेल्या नुकसानीबाबत..........................................................................................................................235
71 सांगली, मिरज आणि कुपवाड हद्दीतील अस्तित्वातील 22 उंच टाक्या व 3 संप पंप हाऊस दुरुस्त करणे या कामातील अनियमिततेबाबत......................................................................................................236
72 सांगलीवाडी येथे 15 लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे तसेच शामरावनगर येथे वितरण नलिका टाकणे व विविध ठिकाणी कंपाऊंड वॉल बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. ...................................................241
73 कोल्हापूर रोड येथे 15 लाख लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे, वितरण व्यवस्था व कंपाऊंड वॉल बांधणे या कामातील अनियमिततेबाबत......................................................................................................248

74 माळबंगला येथे 25 लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ,वसंत कॉलनी,काळी खण ESR झोन येथे वितरण व्यवस्था व कंपौंड वॉल बांधणे या कामामधील अनियमिततेबाबत. ....259
75 महानगरपालिका हद्दीत 15 लाख लिटर क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणे, संजय नगर,माळबंगला परिसरात वितरण व्यवस्था करणे या कामामधील अनियमिततेबाबत. ....268
76 माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथुन कुपवाड झोनकरीता नविन 200 HP क्षमतेचे पंप पुरविणे या कामामधील अनियमिततेबाबत....279
78 मिरज शहर भुयारी गटर योजनेमध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत....282
79 सांगली शहर भुयारी गटार योजनेच्या कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत....309
83 वॉर्ड क्र.69 मधील स्वामी समर्थ मंदिर परिसर येथील रस्ते डांबरी करणे या कामामधील अनियमिततेबाबत. 340
84 वॉर्ड क्र.21 भिमनगर अंतर्गत कॉंक्रीटचे रस्ते करणे या कामामधील अनियमितते बाबत. ....344
85 दलित वस्ती सुधार योजनेमधुन करण्यात आलेल्या विकास कामामधील अनियमिततेबाबत. ....347
96 प्रभाग समिती क्र. 4 मध्ये करण्यात आलेल्या विविध विकास कामामधील अनियमिततेबाबत. ....358
97 कुपवाड प्रभाग समिती क्र.03 मध्ये करण्यात आलेल्या विविध विकास कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत. ....367
98 प्रभाग समिती क्रमांक 2 मध्ये करण्यात आलेल्या विकास कामामधील अनियमिततेबाबत. ....376
100 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67(3)(क) खाली करण्यात आलेल्या वॉनलेसवाडी नाल्यामध्ये आर.सी.सी.पाईप टाकणे या कामामधील अनियमिततेबाबत. ....388
101 नगरसेवकांना देण्यात आलेल्या मोबाईल सेवेचे अर्थिक लाभ वसुल करण्याबाबत. ....391

**कलम ९ क खालील आक्षेप....394**

**------------------- निरंक ------------------- ....395**

**कलम ९ ड खालील आक्षेप....397**

3 नविन कर्मचा-यांचे सेवापुस्तकामधील नोंदी अपुर्ण ठेवलेबाबत....398
4 कर्मचा-यांना जादा वेतनवाढ दिल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत. ....402
5 नविन नियुक्त केलेले कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील नोंदी महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 नुसार घेतल्या नसलेबाबत....405
6 रजा कालावधीचे वेतन वेतनवाढीच्या दिनांकापासून दिल्याने वेतन व भत्त्याचे अतिप्रदान झालेबाबत. ....407
12 अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तकामध्ये वारस नामनिर्देशनाच्या नोंदी घेतल्या नसलेबाबत. ....410
19 प्लंबर लायसन्स परवाना,नुतनीकरण व लायसन्सधारक यांचे कामकाजामधील त्रुटीबाबत. ....411
21 सांगली पाणीपुरवठा विभागाने ग्राहकांना नविन मिटर कनेक्शन देणेसाठी नळ कारागीर यांना लायसन्स दिले नसलेबाबत....412
24 ग्रंथालय विभागाने सभासद थकबाकीची रक्कम वसुल केली नसलेबाबत ....414

32 प्रलंबित दाव्याची माहिती विधी विभाग व वकीलांना दिली नसल्याने प्रलंबित राहिलेल्या दाव्याबाबत .......415

61 सफाई कर्मचा-यांची चुकीची वेतननिश्चिती केलेबाबत. ........418

63 सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्तीवेतन व सेवा उपदानाच्या रक्कमेचे कमी प्रदान झालेबाबत. ........419

64 वैद्यकिय प्रमाणपत्रा शिवाय मंजूर करण्यात आलेला असाधारण रजा अर्हताकारी सेवेतुन कमी न केल्याने निवृत्ती वेतन व उपदान यांचे अतिप्रदान झाले बाबत. ........421

66 कुपवाड विभागामधील मालमत्तांना मालमत्ता कर आकारणी विलंबाने केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत ........422

81 UIDSSMT योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या उपांगाचे काम अपुर्ण असल्याने, पुर्ण झालेल्या उंच टाक्या व वितरण व्यवस्था या उपांगावर झालेला खर्च रु.4866.89 लक्ष गुंतुन पडल्याबाबत. ........424

82 UIDSSMT योजने अंतर्गत चालु असलेल्या कामावर मनपा हिश्श्याच्या रक्कमेची अंदाजपत्रकामध्ये तरतुद करुन खर्च केला नसल्याने निधी अभावी कामे प्रलंबित राहिल्याबाबत. ........431

94 भांडार विभागातील साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत. ........436

102 मिरज व कुपवाड गुंठेवारी विभागाकडे धनाकर्षाने जमा केलेल्या प्रशमन शुल्क व विकास आकार रक्कमेच्या जमा पावत्या गुंठेवारीधारकास दिल्या नसलेबाबत. ........440

105 HCL कंपनीस कामाची देयके कराराप्रमाणे मिळाली नसल्याने त्यांनी महानगर पालिकेस कायदेशीर नोटीस देवून कामकाज बंद केल्याने ई गव्हर्नन्स अंतर्गत मिळणा-या नागरी सेवांचे कामकाज विस्कळीत झाल्याबाबत. .....443

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ........448

परिच्छेदनिहाय अनुक्रमणिका ........449

## विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| सामान्य प्रशासन | 33, 88, 89 | 35, 36, 37, 38, 39, 42, 43, 46, 62, 65 | | 3, 4, 5, 6, 24, 61, 63, 64 |
| नगर सचिव | 99 | | | 12 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 67, 69, 87, 91, 92, 93, 95, 106 | 56, 57, 58, 59, 60, 83, 84, 85, 96, 97, 98, 100 | | |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 17, 18, 20, 70, 80 | 16, 44, 45, 47, 48, 71, 72, 73, 74, 75, 76, 78, 79 | | 19, 21, 81, 82 |
| लेखा विभाग | 2, 51, 52, 90, 103, 104 | 1 | | |
| लेखापरीक्षण | 86 | | | |
| नगर रचना | 49 | 50, 68 | | 102 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | 13 | 22 | | |
| कर निर्धारण व संकलन | 14, 77 | 15, 23, 40, 41 | | 66 |
| आरोग्य | 54, 55 | | | |
| भूमी व मालमत्ता विभाग | 7, 10 | 8, 9, 11 | | |
| वाहन विभाग | 28, 29 | 27, 30, 31 | | |
| विधी विभाग | 34 | | | 32 |
| भांडार | | 101 | | 94 |
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | | | | 105 |
| नागरी समुदाय विकास प्रकल्प विभाग | | 25 | | |
| क्रिडा विभाग | | 53 | | |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उद्यान विभाग | 26 | | | |

DRAFT

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

## कलम ९ अ खालील आक्षेप

DRAFT

## *2 कर्मचा-यांना दिलेल्या अग्रीम रक्कमांचे समायोजन केले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 13320207.00/-

***महानगरपालिका कर्मचा- यांना वेगवेगळ्या कामासाठी तसलमात रक्कम देण्यात आली आहे. दि. 31/03/2014 अखेर थकित असमायोजित तसलमात रक्कम रु. 13320207/- इतकी आहे.***

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडील तसलमात अग्रीम नोंदवहीची वित्तीय वर्ष 2013-2014 च्या लेखा परीक्षणामंध्ये तपासणी केली असता अग्रीम नोंदवही नमुना (महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नमुना क्र.147, नियम-189-90) नुसार ठेवण्यात आली आहे. सदर तसलमात नोंदवहीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1 ) दि. 29/03/2014 अखेर रक्कम रु. 1,33,20,207/- मात्र तसलमात असमायोजीत असल्याचे आढळून आले.

2 ) मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम क्र. 142 नुसार प्रथम घेतलेल्या अग्रीमाचे समायोजन झाल्याशिवाय दुसरे अग्रीम मंजूर करु नये अशी तरतुद असतांना महानगरपालिकेने खालील कर्मचा-यांपैकी श्री. रमेश सु वाघमारे, श्री.बी.बी. पाटील प्रशासन अधिकारी व श्री. ए.पी. जाधव या अधिकारी/कर्मचा-यांना पूर्वी दिलेली तसलमात रक्कम समायोजीत नसतांन पुन्हा आग्रिम दिलेली आहे. सन 2003-204 पासूनच्या अग्रीम रक्कमा अद्याप असमायोजीत आहेत.

| अ.क्र | वर्ष | नांव | तपशिल | तसलमात रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | 23/09/2003 | रमेश वाघमारे, जकात अधिक्षक | इंडियन ऑईल मापे कोर्ट खर्च | 40000/- |
| 2 | 02/04/2005 | रमेश वाघमारे, जकात अधिक्षक | इंडियन ऑईल मापे कोर्ट खर्च | 20000/- |
| 3 | 20/01/2005 | प्रकाशकेटरर्स, अेम.पी.पाटल, पी.आर.केसरे | महापूर पंचनामे करताना | 200/- |
| 4 | 20/03/2006 | अकौंट आफीसर, रमेश वाघमारे | फोन नं डिपॉझिट | 2000/- |
| 5 | 31/03/2006 | कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा अभियंता | पाणी उपसा बिल पांटबंधारे विभाग | 4541305/- |
| 6 | 23/08/2006 | कार्यकारी अभियंता एम आय डी सी सांगली | पाणी पुरवठा एम आय डी सी पाणी डिपॉझिट कनेक्शन | 1201678/- |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | 05/10/2006 | रमेश वाघमारे | मसुरी येथे प्रशिक्षणासाठी प्रवास खर्च | 190599/- |
| 8 | 20/03/2007 | बी पी पाटील लिपिक, जकात विभाग | जकात लवाद हायकोर्ट अपील प्रवास खर्च | 25000/- |
| 9 | 26/03/2007 | बी पी पाटील लिपिक, जकात विभाग | नागपूर जाणे प्रवास खर्च | 50000/- |
| 10 | 03/05/2007 | अे.डी.पाटणकर | महापौर चषक फुटबॉल स्पर्धा | 600000/- |
| 11 | 25/07/2008 | के.सी. हळींगळे | पुणे येथे प्रशिक्षणासाठी प्रवास खर्च | 7000/- |
| 12 | 04/03/2009 | मे. कमिशनर फॉर वर्कमेन कॉम्पेनसेशन ॲन्ड जज लेबर कोर्ट प्रशासन अधिकारी रेमेश वाघमारे | सफाई कामगार कमल आप्पा कांबळे यांचे अपघाताचे दाव्याचे निकालात अपील दाखल करणेसाठी कोर्टात डिपॉ. भरणे | 332995/- |
| 13 | 16/12/2009 | प्रशासन अधिकारी | सफाई कामगार कमल आप्पा कांबळे यांचे अपघाताचे दाव्याचे निकालात अपील दाखल करणेसाठी कोर्टात डिपॉ. भरणे | 173487/- |
| 14 | 11/03/2010 | अमर वसंतराव चव्हाण कनिष्ठ अभियंता विद्युत | स्ट्रीट लाईट साहित्य खरेदी | 25000/- |
| 15 | 22/03/2010 | के.सी.हळींगळे | महापौर चषक खो-खो स्पर्धा | 300000/- |
| 16 | 27/12/2010 | ए.पी.जाधव | जी.एस.केळुसकर यांचे दावाकामी फी भरणेसाठी कोर्ट कामी खर्च | 19000/- |
| 17 | 09/09/2011 | मुख्याध्यापक मिरज हायस्कुल, मिरज | शेवंता रामचंद्र धुळबुळु शिपाई यांचे थकीत वेतन औ.न्यायालय येथे भरणेसाठी | 351313/- |
| 18 | 02/12/2011 | प्रशासन अधिकारी | प्राथ. शिक्षण | 5000000/- |



DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मंडळाकडील शिक्षकांची फंडाची रक्कम अदा करणे कामी | |
| 19 | 24/02/2012 | ए.पी.जाधव | उच्च न्यायालय मुंबई दावाकामी हजर राहणेसाठी वाहन व इतर खर्च | 600/- |
| 20 | 27/03/2012 | डॉ. रोहिणी कुलकर्णी | आरोग्य विषयक शिबीर घेण्यासाठी | 50000/- |
| 21 | 27/02/2012 | डॉ. संजय रामचंद्र कवठकर | आरोग्य विषयक शिबीर घेण्यासाठी | 50000/- |
| 22 | 02/05/2013 | यशय्या जॉन तालुरी | निवडणूक 2013 खर्च | 10000/- |
| 23 | 19/06/2013 | आर. व्ही. काकडे, प्रसक 3 | आनुशांघिक खर्च | 10000/- |
| 24 | 20/06/2013 | एस.आर.काटकर, प्रसक 3 | निवडणूक कामासाठी अनुशांघिक खर्च | 10000/- |
| 25 | 20/06/2013 | एन.डी.दळवी, सहा. निर्णय अधिकारी क्र. 3 | निवडणूक कामी आनुशांघिक खर्च | 10000/- |
| 26 | 20/06/2013 | प्रभाग अधिकारी 2 पी.एस.हलकुडे | निवडणूक कामी आनुशांगिक खर्च | 10000/- |
| 27 | 05/07/2013 | वैभव भगवान वाघमारे | निवडणूक कामी 2013 | 10000/- |
| 28 | 18/07/2013 | एन.डी.दळवी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी क्र. 3 | निवडणूक कामी 2013 | 10000/- |
| 29 | 18/07/2013 | एच.ए. दिक्षीत उपअभियंता | निवडणूक कामी 2013 | 10000/- |
| 30 | 23/07/2013 | अमरसिंग वसंतराव चव्हाण, विद्युत अभियंता | निवडणूक कामी 2013 अनुशंगिक खर्च | 30000/- |
| 31 | 23/07/2013 | प्रभाग अधिकारी 2 | निवडणूक कामी अनुशांगिक खर्च | 10000/- |
| 32 | 26/09/2013 | एस.जी. कांबळे | गणेशोत्सव सजावट | 16130/- |
| 33 | 08/11/2013 | आर.जी. रजपूत, यंत्रशाळा | टायर्स खरेदी | 3900/- |
| 34 | 06/02/2014 | रमेश सुरेश वाघमारे | वर्धापन दिनासाठी | 200000/- |
| | | | | 13320207/- |

3) 2012-2013 लेखापरीक्षण अहवालामध्ये तसलमात असमायोजित असलेबाबतचा परिच्छेद क्र. 3

घेण्यात आलेला आहे. पूर्वीची तसलमात रक्कम असमायोजित असतांना त्याच व्यक्तींना दुबार तसलमात दिल्याचे दिसून येते. तरी आता तसलमात नोंदवहीनुसार थकीत असमायोजित तसलमात रक्कम रु. 13320207/- चे समायोजन त्वरीत करुन घेणे आवश्यक आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र. 22 दि. 29/09/2015 चे उत्तर दि. 07/10/2015 रोजी दिले आहे. त्यामध्ये तसलमात रकमांचे वसुलीसाठी संबंधीतांना नोटीसा देण्यात आल्या आहेत व वसुलीची कार्यवाही चालू असल्याचे नमुद केले आहे. परंतु तसलमात रक्कमांची वसुली करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर केले नसल्याने असमायोजित तसलमात रक्कम रु. 13320207/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 13320207/-

DATRYJM7501 (Ref No : 22)

## *7 सांगली विभागाकडील मालमत्ता विभागाची थकबाकी रक्कम वसुल केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : भूमी व मालमत्ता मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 45636969.00/-

***सांगली विभागाकडील मालमत्ता विभागाने महानगरपालिकेच्या मालकीचे भाडे तत्वावरील गाळे, इमारती, खुली जागा, धोबी कट्टा इत्यादींची 2012-2013 अखेरची थकबाकी व 2013-2014 चालू वर्षाची थकित रक्कम रु. 45636969/- वसुलीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 8अ कलम 81 (ब) प्रमाणे (1) अ (एक) नुसार मालमत्तेचे भाडे अथवा कर हे दोन महिनेपेक्षा जास्त कालावधीत थकित असल्यास थकबाकीदारास नोटीस देवून गाळा ताब्यात घेणेची कार्यवाही करणे आवश्यक असता ती केली नसुन त्यामुळे थकबाकीची रक्कम वाढत असल्याचे दिसून येते.***

सांगली विभागातील मालमत्ता विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 110 नुसार मालमत्तांच्या भाडयाचे मागणी पुस्तक नमुना क्रमांक 81 प्रमाणे ठेवलेले असून सदर मागणी पुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता, खाली नमुद केल्याप्रमाणे मनपाचे भाड्याने दिलेल्या मालमत्तांचे 2012-2013 अखेरची थकबाकी व 2013-2014 या वर्षाची चालु मागणी धरुन रक्कम रु. 45636969/- थकीत आहे. याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)थकबाकी वसुलीसाठी मालमत्ता विभागाने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण 8 अ, कलम 81 (ब), प्रमाणे (1) अ (एक) नुसार मालमत्तेचे भाडे अथवा कर हे दोन महिनेपेक्षा जास्त कालावधी पर्यंत थकीत असल्यास अशा सर्व थकबाकीदारांना भाडे जमा करणेबाबत नोटीस देणे आवश्यक होते. तसेच उपरोक्त अधिनियमातील पोट कलम 3 अन्वये जी व्यक्ती, उपरोक्त पोटकलम 1 अन्वये दिलेल्या आदेशाचे पालन करणार नाही अथवा पालन करण्यास नकार देईल त्यांचेकडून सदरची मालमत्ता काढून मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक असताना मालमत्ता

DRAFT

विभागाने वरील नियमाप्रमाणे थकीत भाडे गाळेधारकावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे लेखापरीक्षणामध्ये दिसून आले आहे. सदरची मालमत्ता विभागाने ताब्यात न घेतल्याने व भाडे वसुल वेळीच न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. थकबाकीधारकांची सांगली विभागातील गाळेधारक, मोकळी जागा, कट्टे व मनपा लाकडी खोके, खाजगी खोके यांची भाडे तत्वावरील रक्कम वसुल केलेली नाही. ती पुढीलप्रमाणे

**1)सांगली विभागाकडील मालमत्ता भाडे तत्वावरील गाळे, इमारती, खुली जागा, धोबी कट्टे, यांची थकित भाडे वसूली**

| अ.क्र. | मार्केटचे नांव | मार्केट मधील एकुण गाळे | मार्केट मधील थकित रक्कम असलेले गाळे क्रमांक | थकबाकी रुपये | सेवाकर रुपये | एकूण थकबाकी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सिंधी मार्केट | 51 | 1, 2, 29, 48, 49 | 16678 | 2061 | 18739 |
| 2 | पेठभाग भाजी मंडई | 64 | 10, 15, 16, 21, 30, 31, 32, 41, 42, 43, 44, 48, 49, 50, 53, 56, 60, 61, 62, 64 | 181454 | 12026 | 123480 |
| 3 | छ.शिवाजी भाजी मार्केट | 86 | 2, 6, 7, 8, 10, 11, 12, 13, 14, 17, 18, 19, 22, 23, 26, 28, 29, 32, 40, 42, 44, 46, 47, 48, 51, 52, 74, 75, 85, 86 | 329537 | 48856 | 378393 |
| 4 | महात्मा फुले सुपर मार्केट | 11 | 1, 2, 3, 4, 5, 7, 8, 9, 10, 11 | 125985 | 0 | 125985 |
| 5 | केळकर महाराज शॉपिंग सेंटर | 16 | तळमजला 1, 8, 12, 14, पहिला मजला 1, 2, 3, 6, 8 | 1151537 | 105482 | 1257011 |
| 6 | बापट बालमंदीर दुकान गाळे | 10 | 1, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10 | 74500 | 15388 | 89888 |
| 7 | बालक्रिडा उद्यान दुकान गाळे | 5 | 1, 2, 3, 4, 5 | 690191 | 61795 | 751986 |
| 8 | मंडई दुकान गाळे | 3 | 3 | 6240 | 0 | 6240 |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | प्राथमिक शाळा इमारत भाडे | 14 | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 12, 13, 14 | 3351936 | 374856 | 3726792 |
| 10 | मटण मार्केट बाहेरील दुकान गाळे | 10 | 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10 | 88658 | 7792 | 96450 |
| 11 | मटण मार्केट आतील दुकान गाळे | 20 | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20 | 102802 | 4575 | 107377 |
| 12 | मटण मार्केट पत्राशेड दुकान गाळे | 17 | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17 | 158180 | 13374 | 171554 |
| 13 | बीफ मार्केट दुकान गाळे | 15 | 1, 7, 10, 13 | 22035 | 669 | 22704 |
| 14 | जयश्री चित्र मंदिर दुकान गाळे | 17 | 1, 3, 5, 6, 7, 9, 10, 11, 12, 17 | 195690 | 9396 | 205086 |
| 15 | प्राथमिक शाळा क्र.1 दुकान गाळे | 6 | 1, 2, 3, 4, 5, 6 | 1231470 | 55893 | 1287363 |
| 16 | अतिथीगृह दुकान गाळे | 6 | 2, 4, 5, 6 | 75182 | 17543 | 92725 |
| 17 | रेवणी रोड पत्राशेड दुकान गाळे | 15 | 1, 2, 3, 5, 7, 8, 10, 11, 12, 13, 14, 15 | 249685 | 16043 | 265728 |
| 18 | टिव्ही सेंटर इमारत भाडे | 1 | 1 | 0 | 13148 | 13148 |
| 19 | धान्य बाजार पत्राशेड /गाळे | 32 | 1, 2, 3, 6, 7, 8, 9, 11, 12, 14, 16, 17, 18, 20, 21, 22, 23, 24, 27, 28, 29, 31, 32 | 165958 | 37114 | 203072 |
| 20 | डॉ. शिराळकर दुकान गाळे | 11 | 4, 5, 6, 7, 8, 9, 11 | 726662 | 28002 | 754664 |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 21 | मंगलधाम शॉपिंग सेंटर दुकान गाळे | 21 | 1, 2, 3, 6, 7, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 20, 21 | 891819 | 194458 | 1086277 |
| 22 | रॉकेल डेपो/ रिकामी जागा | 9 डेपो | डेपो नं. 5 | 17078 | 2815 | 19893 |
| 23 | इतर मिळकत खुली जागा | 27 जागा | खुली जागा नं.1, 12, 16, 17, 18, 19, 20, 21, 23, 24, 26, 27 | 160958 | 16127 | 177085 |
| 24 | धोबी घाट/कट्टे | 6 कट्टे | 1, 2, 3, 4, 5, 6 | 2337 | 0 | 2337 |
| 25 | जिमखाना पूर्वेकडील भाडेकरु/खुली जागा | 7 जागा | 2, 3, 4, 6, 7 | 3685 | 0 | 3685 |
| 26 | मरळीकर ओत/खुली जागा | 3 जागा | 1 | 200 | 25 | 225 |
| 27 | दाव मलिक टेक/खुली जागा | 6 | 1, 4, 5, 6 | 37491 | 6834 | 44325 |
| 28 | मारुती पुलाजवळील खुली जागा | 6 | 1, 3, 4, 5, 6 | 10208 | 846 | 11054 |
| 29 | रेवणी रोड प्लॉट खुली जागा | 5 | 1, 2, 4 | 53007 | 4052 | 57059 |
| 30 | संजय नगर पत्रा चाळ घरे | 140 | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 14, 15, 16, 17, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 52, 53, 54, 55, | 80091 | 5522 | 85613 |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70, 72, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 84, 85, 86, 87, 88, 89, 90, 91, 92, 94, 95, 96, 97, 98, 99, 100, 101, 103, 105, 106, 107, 108, 109, 110, 111, 112, 113, 114, 115, 116, 117, 118, 119, 120, 121, 122, 123, 124, 125, 126, 128, 129, 130, 131, 132, 133, 134, 135, 137, 138, 139, 140 | | | |
| 31 | हरिपूर रोड मोकळया जागा भाडे | 55 | 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 13, 14, 15, 16, 17, 18, 21, 22, 24, 26, 29, 30, 31, 32, 33, 34, 35, 36, 38, 40, 41, 42, 43, 44, 46, 47, 48, 51, 52, 53 | 167625 | 13505 | 181130 |
| 32 | इमारती भाडे | 12 | 1, 2, 3, 4, 5, 6, 8, 9, 11 | 347775 | 83127 | 430902 |
| एकुण रक्कम | | | | 10646654 | 1151713 | 11798367 |

**मनपाची गाळे, खाजगी जागा, कट्टे यांची एकूण वसूलपात्र रक्कम**

DRAFT

**थकित भाडे रु. 10646654/-**
**सेवा कर थकबाकी रु. 1151713/-**
**एकत्रीत थकित एकूण रु. 11798367/-**

**2) सांगली विभागाकडील मालमत्ता भाडे तत्वावरील मनपाची लाकडी खोकी व खाजगी खोकी यांचे थकित भाडे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | मनपा खोकी व खाजगी खोकी | 31345405 | 2493197 | 33819622 |
| एकूण रक्कम | | 31345405 | 2493197 | 33838602 |

मनपाची लाकडी खोकी व खाजगी खोकी यांची एकूण वसूलपात्र रक्कम थकित भाडे रु. 31345405/-
सेवा कर थकबाकी रु. 2493197/-
एकत्रीत थकित रक्कम रु. 33838602/-
उपरोक्त मालमत्तेच्या थकीत रकमेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 38 दि. 28/12/2015 चे उत्तर मालमत्ता विभागाने दि. 25/02/2016 रोजी दिले आहे. सदरील आक्षेप खुलाशामध्ये संबंधित थकबाकीधारकांना थकीत रक्कम वसुलीच्या नोटीसा दिलेबाबतचे कळविले आहे. परंतु थकीत रक्कम वसुल केली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.
**वसुलपात्र रक्कम रु. 45636969/-**

DATRYJM7501 (Ref No : 38)

## *10 मालमत्ता विभागाने मनपा अस्थापनेवर नसलेल्या व्यक्तींना निवास्थान वाटप केले असुन त्यांचे कडून घरभाडेची रक्कम वसूल केली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष : भूमी व मालमत्ता मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 3521968.00/-

***महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित झालेल्या नागरीकांना मनापाच्या निवास्थानामध्ये तात्पुरते स्थलांतर केले असुन त्यांचेकडून दि. 23/11/1983 ते मार्च 2014 अखेर दरवर्षी रु.114336/ प्रमाणे एकूण 30 वर्षाचे वार्षिक भाडे रु. 3430080/- व उर्वरित 4 महिन्याचे दरमहा रु. 9528/- प्रमाणे रु.38112/- असे एकूण रु.3468192 /- संबंधिताकडून वसूल केलेले नाही. तसेच महानगरपालिकेने स्थलांतरित नागरीकांना दिलेल्या भुखंडाचे भाडे रक्कम रु.53776/- वसुल केलेले नाही.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या निवास्थान भाडयाने देणेबाबतच्या नस्तीची तपासणी केली असता, नस्तीमध्ये महानगरपालिकेकडे एकूण 121 निवासस्थाने असल्याचे नमूद आहे. निवासस्थानामध्ये राहणारे कर्मचा-यांचा घरभाडे भत्ता त्यांचे वेतनामधून आस्थापना विभागामार्फत वेतन देयकामधून दरमहा कपात केला जातो. मालमत्ता विभागाच्या निवास्थानामध्ये राहणारे कर्मचा-यांच्या यादीप्रमाणे त्यांचा घरभाडे भत्ता कपात केलेबाबतची पडताळणी आस्थापना विभागामधील वेतन देयकाशी केली असता खालील व्यक्ती महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नसतानाही त्यांना मनपा निवासस्थान दिल्याचे निदर्शनास आले आहे.

| अ.क्र. | व्यक्तीचे नाव |
|---|---|
| 1 | श्री. सतिश गडकरी |
| 2 | श्री. जोशी |
| 3 | श्री. बाळू भोरे |
| 4 | श्री. वझे |
| 5 | श्री. कुलकर्णी |

DRAFT

या बाबत मालमत्ता विभागाकडील नस्तीचे लेखापरीक्षण केले असता, नस्तीमधील कार्यालयीन टिपणी जाक्र.मनपा./मालवि/----/2005-06 दि.26/04/2005 मध्ये सांगली शहराची हरभट रस्ता रुंदीकरणाची नगररचना योजना क्र.2 व 3 ची प्रत्यक्षात अंमलबजावणी दि.21/11/83 रोजी झाली असल्याचे नमूद आहे. सदर रस्ता रुंदीमध्ये बाधीत झालेल्या निवासी भाडेकरु लोकांची पुनर्वसनाची कायमची सोय करण्यासाठी रि.स.नं.117/2 ब मधील 10000/- चौ.फु. जागा देणेस प्रशासक ठराव क्र.641/83-84 दि.01/2/84 चे ठरावाने मंजूरी दिलेली आहे. मा.आयुक्त व प्रादेशिक संचालक न.पा. प्रशासन यांनी त्यांचेकडील आदेश क्र.न.पा. 4/आर.आर./381/दि.07/5/91 ने दिलेल्या मंजूरी प्रमाणे तीस वर्ष मुदतीने व नगररचना व आणि मुल्य निर्धारण सांगली हे वार्षिक भाडे ठरवतील त्या दराने श्री.गणेश हरभट रस्ता गृहनिर्माण सोसायटीस भाड्याने देण्यास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार सदर संस्थेकडून दि.27/11/2003 पासून तीस वर्ष मुदतीने भाडे करार करुन रि.स.नं117/2ब मधील 10000 चौ.फुट जागा भाड्याने श्री.गणेश हरभट रस्ता गृहनिर्माण सोसायटीच्या ताब्यात दिलेली आहे. रस्ता रुंदीकरणाची अंमलबजावणी दि.21/11/1983 रोजी झाली असुन त्यावेळी विस्थापित एकूण 11 भाडेकरुंची तात्पुरती पर्यायी व्यवस्था म्हणून आंबेडकर रोडवरील स्विपर्स क्वार्टर्समध्ये राहण्याची व्यवस्था केलेली होती. सदरचे 11 विस्थापित भाडेकरु आजतागायत स्वीपर्स क्वॉर्टर्स मध्ये राहत आहेत. त्यांचे कडून त्या जागेचे भाडेमूल्य घेतलेले नाही अथवा जागा मोफत वापरण्यास देणेबाबत तात्कालिन नगरपालिकेचा ठराव झालेला नाही. त्यामुळे त्यांचेकडून घरभाडे ते राहत असलेल्या दिनांकापासून आजअखेर वसूल करणे आवश्यक असलेचे मालमत्ता विभागाचे

टिपणीमध्ये नमूद आहे. सदर कामी शहर अभियंता यांचे कडून भाडे निश्चित करुन घ्यावे असा शेरा उपायुक्त यांनी दि.28/4/2005 रोजी दिला आहे. त्यानंतर मालमत्ता विभागाने वशीनं/मालमत्ता/145/2005-06 दि.02/05/2005 या पत्रान्वये क्वॉर्टर्सचे भाडे ठरविणेबाबत शहर अभियंता यांचेशी पत्रव्यवहार केला आहे. करनिर्धारक व संकलक यांनी क्र.मनपा/करवि /10/ 729/2006-07 दि. 02 सप्टे. 2006 रोजी स्विपर क्वॉर्टर्सचे क्षेत्र 284.68 चौ.मी.(बांधीव) इतके असून त्याचे **मासिक भाडे रक्कम रु.9528/-**(रु.33.50 प्रती चौ.मी.दरमहा) इतके ठरविण्यात आले असून त्याप्रमाणे भाडे वसूल करण्याबाबतचे पत्र मालमत्ता व्यवस्थापक यांना पाठविले आहे.

सदर नस्तीची तपासणी करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) मालमत्ता विभागाने एकूण 11 विस्थापित व्यक्ती 1) श्री. अनंत दत्तात्रय टाकळीकर, 2)श्री.राजाराम शंकर जोशी 3) श्री.लक्ष्मण श्री. इनामदार 4)श्री.भूपाल नेमाण्णा भोरे 5)श्री.बाबू फंदू गडकर 6) श्री.हिरालाल ल.डागा 7) श्री.शशिकांत ब कुलकर्णी 8) श्री.श्री राम ग.वझे 9)श्री.रामचंद्र ग आपटे 10)श्री.अनंत ग.केणी 11) अप्पासाहेब क बरगाले यांना तात्पूरत्या स्वरुपात स्विपर्स क्वॉटर्समध्ये भाडेकरु म्हणून हस्तांतरण केलेचे नमुद आहे. परंतू मालमत्ता विभागाने स्टाफ क्वॉटर्समध्ये राहणा-या व्यक्तींच्या दिलेल्या यादीमध्ये श्री. सतिश गडकरी, श्री. जोशी, श्री. बाळू भोरे, श्री. वझे, श्री. कुलकर्णी या पाच व्यक्तींचाच समावेश आहे. क्वार्टर्समध्ये राहणा-या अन्य व्यक्तींचा समावेश यादीमध्ये करण्यात आलेला नाही.

2) विस्थापित झालेल्या 10 लोकांनी स्थापन केलेल्या श्री.गणेश हरभट रस्ता गृहनिर्माण सोसायटीसाठी महासभा क्रमांक 02/2004-05 दि.20/07/2004,ठराव क्र.74 ने रि.स.नं 117/3 मधील 10000 चौ.फू. जागा 30 वर्ष मुदतीने भाडेपट्टयाने दिली आहे व सदर जागेचा भाडेपट्टा रु.100 चे मुद्रांक शुल्कावर पार्टीनं 1 उपायुक्त महानगरपालिका व पार्टी नं. 2 चेअरमन श्री.गणेश हरभट रस्ता सहकारी संस्था यांचेमध्ये दि.31/12/2004 रोजी झाला आहे. सदर भाडेपट्टा करारामधील मुद्दा क्र. 2 वर सदर जागा पार्टी नं. 2 यांना दरसाल नगररचना मुल्य निर्धारण शाखा ठरविल त्या भाड्याने दि.27/11/2003 पासून 30 वर्ष मुदतीने भाड्याने देवून आज रोजी कब्जात दिली असल्याचे नमूद आहे. या करारामधील मुद्दा क्र.05 नुसार पार्टी नं. 2 यांनी सध्या निवास करीत असलेल्या स्विपर्स क्वॉर्टर्समधील सर्व खोल्या करारपत्र,कब्जेपट्टा झालेपासून पुढील दोन वर्षात विना तक्रार रिकाम्या करुन त्या मनपाच्या ताब्यात देणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. सदर जमीन भाडेकरुंच्या कब्जात दिल्याने त्यांना दिलेल्या स्टाफ क्वॉर्टर्स मालमत्ता विभागाने ताब्यात घेणे आवश्यक असता त्या ताब्यातही घेतलेल्या नाहीत व त्याचे भाडे **एकूण रक्कम रु.3468192 /-** वसुल केलेले नाही.

3) करनिर्धारक व संकलक यांनी क्र.मनपा/करवि/10/729/2006-07 दि. 02 सप्टे. 2006 रोजी स्विपर क्वॉर्टर्सचे क्षेत्र 284.68 चौ.मी.(बांधीव) इतके असून त्याचे मासिक भाडे रक्कम रु.9528/-

(रु.33.50 प्रती चौ.मी.दरमहा) इतके ठरविण्यात आले असून सदर भाडेकरु दि.21/11/1983 पासून या निवास्थानामध्ये राहत असल्याने 23/11/1983 ते मार्च 2014 अखेर एकूण 30 वर्षाचे वार्षिक रु.114336/- प्रमाणे रु. 3430080/- व उर्वरित 4 महिन्याचे दरमहा रु. 9528/- प्रमाणे रु.38112/- असे **एकूण रु.3468192 /-** संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक असता मालमत्ता विभागाने भाडे वसूलीची मागील 10 वर्षापासून कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सदर व्यक्तिंना महाराष्ट्र नगरपालिका 1971 चे नियम क्र.77 अन्वये नमुना क्र.48 प्रमाणे येणे असणा-या भाड्याची मागणी देयके तयार करून ती भाडेकरुंना देणे आवश्यक असता त्यांनी मागणी देयके दिलेली नसल्याने भाडेकरुंकडून भाड्याची वसूली झालेली नसल्याचे स्पष्ट होते. भाडेकरुंना मागणी देयके का देण्यात आली नाहीत या बाबतचा खुलासा केलेला नाही.

4) सदर विस्थापित स्टाफ क्वॉर्टर्स मध्ये दि.23/11/1983 पासून राहत असून ते रहात असलेल्या स्टाफ क्वॉर्टर्सचे भाडे दि. 02 सप्टे.2006 रोजी निश्चित केले आहे. मालमत्ता विभागाने भाडेकरुंचे भाडे तात्काळ निश्चित करुन भाडे वसूली करणे आवश्यक असता जवळपास 24 वर्ष विलंबाने भाडे निश्चित केले आहे. भाडे निश्चित करणेस विलंब झाल्याने महानगरपालिकेस भाड्यापोटी मिळणा-या महसूलास मुकावे लागले आहे.

5) करारपत्रामधील मुद्दा क्र.13 नुसार मुल्य निर्धारण विभाग सांगली शाखा यांनी त्यांच्या शाखेकडील दि.25/06/1990 ने कळविलेल्या अभिप्रायानुसार पत्र क्रमांक 82/350/दि.25/06/90 ने खुल्या जागेचे मुल्य निर्धारण प्रती चौ.मी. रु. 70/- केले आहे व त्याच्या 8 टक्केदराने भाडे आकारणी भाडे करार झालेपासून प्रती वर्षी आकारावयाची आहे. त्याप्रमाणे 10 हजार चौ.फु. क्षेत्राचे मुल्य निर्धारण रु.65,015.76 /- होत असुन त्यावर 8 टक्के प्रमाणे रु.5204.46/- इतके भाडे प्रती वर्षी घ्यावयाचे आहे. भविष्यात भाडे रक्कमेचा ठरणारा दर व त्याच्या फरकाची रक्कम पार्टी क्र. 2 या संस्थेने महानगरपालिकेस द्यावयाची आहे. करारपत्रामधील मुद्दा क्र.2 नुसार दि.27/11/2003 पासून जागा 30 वर्ष मुदतीने भाड्याने पार्टी क्र .2 च्या ताब्यात दिली असल्याने त्यांचेकडून मार्च 2014 अखेर 10 वर्षाचे वार्षिक रु. रु.5204.46/- प्रमाणे भाडे रु.52040/- व उर्वरित 4 महिन्याचे 434 दरमहाप्रमाणे भाडे रु.1736/- असे एकूण भाडे रु.53776/- वसुल करणे आवश्यक असता ते वसूल केले नसल्याने महानगरपालिकेचे रु.53776/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.45, दि.06/01/2016 रोजी निर्गमित केला असुन मालमत्ता विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

**वसुलपात्र रक्कम :- घरभाडे रक्कम रु.3468192/- + जागेचे भाडे रक्कम रु. 53776/- = रु.3521968/-**

## *13 नोंदणीकृत व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कर रक्कमेचा कमी भरणा केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 64993092.00/-

***स्थानिक संस्था कर विभागातील नोंदणीकृत व्यापा-यांच्या निवडक प्रकरणांचे लेखापरीक्षण केले असता स्थानिक संस्था कराची रक्कम कमी भरणा केलेने महानगरपलिकेची रक्कम रु. 42483092/- तसेच व्यापा-यांनी विहीत वेळेत एलबीटीची रक्कम भरणा केली नसताना 4502 व्यापा-यांचेकडून रु.5000/- प्रमाणे दंडाची रक्कम वसुल केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेस दंडापोटी मिळणा-या रक्कम रु.2,25,10,000/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने 22 मे 2013 पासुन व्यापा-याकडुन जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर वसुली चालु केली आहे. स्थानिक संस्था कर विभागाने कामाच्या सोयीस्तव स्थानिक संस्था कर वसुलीसाठी सांगली,मिरज आणि कुपवाड शहराचे अ. क्र. 1 ते 17 भागामध्ये विभाजन केले आहे. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये एकुण रक्कम रु. 46,97,93,239/- एलबीटी जमा झालेली आहे. शासनाकडून मुद्रांक शुल्कापोटी रु.36899338/- प्राप्त झाले आहेत. तसेच 01/04/2013 ते 21/05/2013 अखेर जकात चालु असल्याने जकातीपोटी रु.14,45,91,353/- प्राप्त झाले आहेत. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये मार्गस्थ जमापोटी रु.15384150/- प्राप्त झाले आहेत. एलबीटी विभागास 2013-14 या आर्थिक वर्षात एकुण रक्कम रु.663868080/- चे उत्पन्न प्राप्त झाले आहे. एलबीटी विभागाने स्थानिक संस्था कर नोंदवही ठेवली असुन नोंदवहीची तपासणी केली असता, शहरामध्ये एकुण **10052 नोंदणीकृत व्यापारी** असल्याचे नमुद आहे. त्यापैकी निवडक 113 प्रकरणे तपासली असता, सदर व्यापा-यांना दि. 21/11/2013 रोजी एलबीटी विभागाने स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील कलम 40 व 42 नुसार स्थानिक संस्था कर विहीत मुदतीत भरणा न केल्याने नोटीसा काढण्यात आलेल्या आहेत. सदर नोटीसा कोणत्या नमुन्यामध्ये काढण्यात आलेल्या आहेत तो नमुना क्रमांक नोटीशीमध्ये नमुद नाही. तसेच नोटीशीमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 152 तसेच स्थानिक संस्था कर नियम 2010 कलम 40 व 42 नुसार एलबीटी, व्याज व शास्ती भरणा करणेस व्यापा-यांने कसुर केल्याने पुढील तीन दिवसाच्या आत सदर रक्कम व्याजासह भरणा करुन त्याचा पुरावा तीन दिवसाच्या आत माझ्याकडे सादर करावा व सदर नोटीशीचे अनुपालन विहित कालमर्यादेत झाले नाही तर नोटीशीमध्ये नमुद केल्या प्रमाणे दंडात्मक आकारणी व अतिरिक्त शास्तीची रक्कम आकारणी करुन वसुलीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल असे नमुद आहे.

**या बाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.**

1)महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - अ - मध्ये उप-विभाग असाधारण क्र. 52 मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 क्रमांक स्थासंक. 0209 /प्र.क्र.65 / 09/न.वि.-34 दिनांक 25 मार्च 2010 मधील नियम 40 (1) (क) व्यापा-यांनी ज्या महिन्याशी संबंधीत देय आणि प्रदेय रक्कम प्रदान

करावयाची असेल त्या पुढील महिन्याच्या 20 तारखेस किंवा त्यापूर्वी स्थानिक संस्था कराच्या रक्कमेचा भरणा महानगरपालिकेकडे करणे आवश्यक आहे. व्यापा-यांनी नियम (3) नुसार स्थानिक संस्था कर भरणा केलेला नसल्याने एलबीटी विभागाने नियम 40(3) नुसार नमुना (ठ) मध्ये त्या व्यापा-यांना नोटीसा देणे आवश्यक होते. सदर नोटीशीचे नमुन्यामध्ये जर एलबीटीची रक्कम भरणा केली नाही तर मालमत्ता कराची थकबाकी असलेप्रमाणे सदर रक्कम वसुलपात्र असेल असे नमुद आहे. परंतु एलबीटी विभागाने या विहित नमुन्यामध्ये व्यापा-यांना नोटीस दिलेली नसल्याने व्यापा-यांनी एलबीटी रक्कमेचा भरणा महानगरपालिकेकडे केलेला नसल्याचे दिसुन येते.

2)स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 30 (1) अन्वये नोंदणी प्रमाणपत्र अंमलात असताना जर एखादा नोंदणीकृत व्यापारी या नियमांच्या तरतुदीद्वारे किंवा त्या अन्वये त्याने भरणा करणे आवश्यक असलेला स्थानिक संस्था कर भरण्यास तीन किंवा अधिक वेळा कसूर करील अशा व्यापा-याकडुन येणे असलेला स्थानिक संस्था कर ,व्याज किंवा शास्ती यांची योग्य वसुली होणेसाठी तसे करणे आवश्यक आहे असे आयुक्तास योग्य वाटल्यास, व्यापा-यास नियम 30(1) नुसार आपली बाजु मांडण्याची योग्य संधी देवून आयुक्तास लेखी आदेश काढून त्यास प्रतिभुती भरण्यास फर्माविण्याचे अधिकार आहे. परंतु आयुक्तांनी याबाबत व्यापा-यांना नोटीशी देवुन प्रतिभुती भरण्यास फर्मावण्यात आलेले नसल्याने व्यापा-याकडुन एलबीटी भरणेस प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेस व्यापा-याकडुन कराची व प्रतिभुतीची रक्कम मिळालेली नाही.

3) महानगरपालिकेने दि. 21/11/2013 रोजी व्यापा-यांना 5130 नोटीसा दिल्या आहेत.दिलेल्या नोटीशीनंतर 2013 - 14 या आर्थिक वर्षामध्ये कर वसुलीसाठी व्यापा-यांच्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. **उदाहरणादाखल मे. अमेय स्टील सेंटर LBT NO.SMKC 0101R00001** या व्यापा-यास खालील प्रमाणे नोटीसा दिलेल्या आहेत.

1) दि.03/07/2014 रोजी स्थानिक संस्था कर नियम 152 एल नुसार विवरणपत्र भरणेस व स्थानिक संस्था कर भरणेस असमर्थ ठरलेबाबत कारणे दाखवा नोटीस बजावुन दि.18/07/2014 रोजी कार्यालयामध्ये उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले आहे. 2) दि.16/09/2014 कलम 152 र सह कलम 152(ब) ते कलम 152(ट) मध्ये कर भरणा व विवरणपत्र दाखल केले नसल्याबाबत नोटीस दिली आहे. 3) 15/11/2014 ने स्थानिक संस्था कर नियम 33(7) नमुना ज प्रमाणे विवरणपत्र व लेखे समक्षात हजर करणे बाबत नोटीस दिली आहे. 4) दि.06/12/2014 रोजी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 48(6) नुसार कारणे दाखवा नोटीस देवुन दि.31/12/2014 रोजी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत व्यापा-यास कळविले आहे. 5) दि.06/12/2014 रोजी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 48(6) नुसार कारणे दाखवा नोटीस देवुन दि.24/12/2014 रोजी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत व्यापा-यास कळविले आहे 6) दि.16/12/2014 रोजी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 48(6) नुसार कारणे दाखवा नोटीस देवुन दि.31/12/2014 रोजी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत व्यापा-यास कळविले आहे 7) दि.16/09/2015 रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 152 र सह ब,ड ते ग सह आय ते ल सह 152 स अन्वये दि.22/05/2013 ते दि.31/03/2015 या वर्षामध्ये विवरणपत्र सादर केली नाही म्हणुन दि.01/10/2015 रोजी कार्यालयास उपस्थित रहाणे बाबत नोटीस काढली आहे. स्थानिक संस्था कर नियम 2010 च्या नियम 48(3)(क) नुसार एखाद्या व्यापा-याने किंवा व्यक्तिने या नियमांच्या तरतुदी अन्वये किंवा त्याखाली आवश्यक असलेल्या मुदतीत स्थानिक संस्था कर भरला नाही तर, त्यांचेकडून येणे असलेल्या स्थानिक संस्था कराच्या वसुलीसाठी या अधिनियमाच्या किंवा नियमाच्या तरतुदीसाठी केलेल्या किंवा करावयाच्या योजिलेल्या कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता तो सरळव्याज रुपाने, अशा स्थानिक संस्था कराच्या रकमेशिवाय आणखी पुढील रकमेइतकी रक्कम भरणा करणेस प्राप्त असेल :- (एक) त्याने ज्या दिनांकास असा स्थानिक संस्था कर द्यावयास पाहिजे होता त्या शेवटच्या दिनांकानंतर स्थानिक संस्था कराच्या दोन टक्के रक्कम आकारणे आवश्यक आहे. परंतु

DRAFT

एलबीटी विभागाकडे सदर व्यापारी दरमहा किती रक्कम एलबीटी म्हणुन भरणा करील याबाबतची प्राथमिक माहिती उपलब्ध नाही. एलबीटी सुरु होण्यापुर्वी महानगरपालिकेकडे जकात चालु असल्याने मार्च 2013 पर्यंत व्यापा-यांनी भरणा केलेल्या जकातीची माहिती खात्याकडे उपलब्ध असताना या माहितीच्या आधारे सदर व्यापारी पुढील वर्षामध्ये किती कर भरण्यास पात्र ठरु शकतो याचे निर्धारण करुन याबाबतची प्राथमिक आकडेवारी तयार करुन त्याप्रमाणे व्यापा-यांना दंडाच्या शास्तीसह नोटीशी काढणे क्रमप्राप्त होते. परंतु महानगरपालिकेने प्राथमिक आकडेवारी काढण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत.

4)स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 47 मध्ये नमुद केल्याप्रमाणे नोंदणीकृत व्यापारी कोणतीही कागदपत्रे सादर करण्यास कसूर करतील तर त्यास कलम 152 "म" खाली माहीती पुरविण्यास आयुक्त कोणत्याही व्यापा-यास किंवा कोणत्याही व्यक्तीस भाग पाडील तेंव्हा तो नमुना "ढ" मध्ये नोटीस काढतील. परंतु एलबीटी विभागाने विहीत नमुन्यामध्ये व्यापा-यांना नोटीसा काढलेल्या नाहीत

5)स्थानिक संस्था कर नियम 2010 चे नियम 48(6) अन्वये व्यापारी किंवा व्यक्ती यांनी पुरेशा कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहीत कालावधीत भरण्यास कसूर केली असेल तर आयुक्तास असा व्यापारी किंवा व्यक्ती यांचेवर त्यांना त्यांचे म्हणने ऐकूण घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर रु. 5000/- मात्र पेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम शास्ती म्हणून लादता येते. 2013-14 मध्ये एकुण 4502 नोंदणीकृत व्यापा-यांनी स्थानिक संस्था कराची रक्कम भरली नसल्याने त्यांना नोटीस काढुन त्यांचे कडून शास्तीची रक्कम वसुल करणे आवश्यक असता एलबीटी विभागाने नोटीस काढून शास्तीची रक्कम वसुल केली नसल्याने महानगरपालिकेचे **4502 व्यापारी X रु.5000/- प्रमाणे रु.2,25,10,000/-** चे आर्थिक नुकसान झाले आहे.

6) महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नोंदणीकृत व्यापा-यांनी 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये भरणा केलेल्या एलबीटी रक्कमेचे निर्धारण करणेसाठी नियम 29 नुसार एलबीटी विभागाकडे विवरण पत्र सादर केले आहे. सदर विवरण पत्रासोबत त्यांनी कोणतेही पुरावे सादर केलेले नाहीत व महानगरपालिकेने या विवरणपत्रानुसार व्यापा-यांचे करनिर्धारणही केलेले नाही. या परिच्छेदासोबत **(परिशिष्ठ क्र.02)** जोडण्यात आलेले आहे. व्यापा-यांनी सादर केलेल्या विवरणपत्रामध्ये त्यांनी खरेदी केलेल्या मालाची किंमत व भरणा केलेल्या एलबीटी रक्कमेची नोंद केली आहे. सदर विवरण पत्राची तपासणी केली असता त्यांनी एलबीटीपोटी कमी रक्कमेचा भरणा महानगरपालिकेकडे केला आहे. तसेच सदर व्यापा-यांनी एलबीटीची रक्कम विलंबाने भरणा करुनही त्या रक्कमेवर व्याजाची आकारणी केली नाही. त्यामुळे या निवडक व्यापा-यांकडुन एलबीटी कमी भरणा रक्कम रु.33852901 व विलंबाने भरणा केल्याने विलंबापोटी रु.8630191/- अशी एकुण रक्कम **रु.42483092/-** वसुल पात्र आहे.
अर्धसमास ज्ञापन क्र. 87 दि. 15/03/2016 अन्वये एलबीटी विभागाने सदरील लेखापरीक्षणाचे अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन सादर केले नाही
वसुलपात्र रक्कम :- स्थानिक संस्था कर रु. 42483092/- + शास्ती रक्कम रु.22510000/- = रु.64993092/-

DATRYJM7501 (Ref No : 87)

## *14 मिरज घरपट्टी विभागातील जमा पावती पुस्तक क्र 456 उपलब्ध करुन दिले नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी निधी*

DRAFT

*अनियमितता कलम : 9अ*

***मिरज घरपट्टी विभागातील जमा पावती पुस्तक क्र. 456 लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नसल्याने या पुस्तकामधील जमा रक्कमेचे लेखापरीक्षण करता आलेले नाही. तसेच माहे मार्च 2014 मध्ये घरपट्टी विभागात धनादेश वटल्यानंतर प्राप्त झालेली रक्कम रु.97187/- चे चलन लेखा विभागाने मुख्य किर्दीमध्ये दि. 28/12/2015 रोजी 1 वर्ष 8 महिने विलंबाने खतविले आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, मिरज घरपट्टी विभागाने 2013-14 या आर्थिक वर्षात घरपट्टीच्या जमेसाठी एकूण 110 पावती पुस्तके वापरल्याचे साठा नोंद वहीची तपासणी केली असता दिसुन आले. सदर वापरलेल्या पुस्तकांची व साठा नोंदवहीत नोंदविण्यात आलेल्या पुस्तकांचा मेळ घेतला असता पावती पुस्तक क्र. 456 हे साठयामध्ये दिसुन आलेले नाही तसेच सदर पावती पुस्तकाची मागणी करुनही ते लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.
या बाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र. 78 (1) नुसार कर संकलकाकडे मालमत्ता धारकाने घरपट्टीची कोणतीही रक्कम जमा करण्यात आलेनंतर करसंकलकाने नमुना क्र. 49 प्रमाणे ठेवण्यात आलेल्या मुद्रीत जमा पावती पुस्तकातून दुहेरी कार्बन घालून केलेली प्रतिलिपी पावती योग्य स्वाक्षरी व दिनांक घालून घरपट्टीधारकास दिली पाहीजे, तसेच कार्बन प्रतिलिपी पावती संबंधित व्यक्तिस देऊन मूळ पावती प्रत कार्यालयात दप्तरी ठेवणे आवश्यक असतानाही संबंधित लिपिकाने पावती पुस्तक क्र.456 कार्यालयात ठेवलेले नाही.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र. 78 (3) नुसार नमुना क्र. 50 प्रमाणे कर संकलकाकडे संकलन पुस्तके ठेवली पाहीजेत. कर संकलकाकडील संकलन पुस्तकात जमा पावती वरील तपशिल नोंदविणे आवश्यक आहे. तसेच संकलन पुस्तकातील नोंदी मालमत्ताधारकास दिलेल्या पावत्यांच्या क्रमांकानुसार ठेवल्या पाहीजेत व दिवसअखेर बेरजा घेऊन कर संकलकाने स्वाक्षरी केली पाहीजे. या प्रमाणे घरपट्टी विभागाने नमुना क्र.50 मध्ये करसंकलन पुस्तक ठेवलेले आहे. मिरज विभागाचे माहे मार्च 2014 या निवड महिन्याचे करसंकलन पुस्तक व चलने तपासली असता दिनांक 21/03/2014 रोजी एकूण 4 मालमत्ताधारकांनी धनादेशाने भरणा केलेली रक्कम रु.43050/- तसेच दि.29/03/2014 रोजी एकुण 05 मालमत्ता धारकांनी भरणा केलेल्या धनादेशाची रक्कम रु.54137/- बँकेमध्ये जमा झाल्याने घरपट्टी विभागाने त्याची पक्की पावती करुन सदर रक्कमेची नोंद करसंकलन पुस्तकामध्ये घेतली आहे व त्याचे चलन तयार करुन लेखा विभागास सादर केले आहे. परंतु लेखा विभागाच्या मुख्य किर्दीची तपासणी केली असता दि. 21/03/2014 रोजी धनादेशाची वटलेली रक्कम रु.43050/- व दि.29/03/2014 रोजी धनादेशाची वटलेली रक्कम रु.54137/- या मुख्य किर्दीमध्ये खतविल्या नसल्याचे दिसुन येते. त्यानंतर लेखाविभागाने सदर रक्कमांचे चलन दि.28/12/2015 रोजी मिळाल्याबाबतची स्वाक्षरी घरपट्टीच्या रोजकीर्दीमध्ये केलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,1971 चे नियम क्रं. 32 (1) अन्वये नगरपरिषदेच्या वतीने जमा झालेले अथवा संवितरीत केलेले शासकिय अनुदानासहित सर्व पैसे हातचे काहीही राखून न ठेवता नमुना क्रं.11 मधील रोकड वहीत नोंदले पाहिजे तसेच नियम क्र. 2 अन्वये सर्व रोकड व धनादेश रोकड वहीत नोंदणे आवश्यक

DRAFT

असताना या रक्कमा लेखा विभागाच्या रोकडवहीमध्ये 1 वर्ष 8 महिने उशिराने नोंदविण्यात आल्या आहेत.

3) घरपट्टीची दैनंदिन वसुलीची रक्कम घरपट्टी विभागाकडून चलनाने परस्पर युनियन बँकेमध्ये भरणा करणेत येते व रक्कम बँकेमध्ये भरणा केलेचा पुरावा म्हणुन युनियन बँकेच्या सही शिक्क्या ची स्लीप संकलन पुस्तकामध्ये चिकटविण्यात येते. सदर संकलन पुस्तक व चलनाची एक प्रत लेखाशाखेकडे रोजकीर्दीमध्ये नोंद घेण्यासाठी पाठविली जाते व लेखाशाखेमधील रोखपाल संकलन पुस्तकामध्ये घेण्यात आलेल्या रक्कमेची, बँक स्लीपमधील रक्कमेची व चलनावर लिहिण्यात आलेली रक्कमेची नोंद तपासुन त्याचा मेळ घेवुन सदर रक्कम बरोबर नोंदविण्यात आल्याबाबत संकलन पुस्तकामध्ये स्वाक्षरी करतो व चलनाची प्रत लेखाशाखेकडे ठेवुन संकलन पुस्तक घरपट्टी विभागास परत करतो. परंतु महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51 मधील (3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोकडवहीतील नोंदलेल्या जमा व खर्चाच्या नोंदीची बँक पासबुक मधील नोंदीबरोबर बाबवार तुलना करून जर काही फरक असेल तर तो रोकडवहीमध्ये दाखविणे आवश्यक असता त्याप्रमाणे तो दाखविला जात नसून रोकडवहीमधील रक्कम व बँक जमा यांचा ताळमेळ घेतला जात नसल्याचे दिसुन येते.

अर्धसमास ज्ञापन क्र. 88 दि. 15/03/2016 अन्वये घरपट्टी विभाग मिरज यांना अर्धसमास ज्ञापनाव्दारे कळविले होते. परंतु सदरील अनुपालन प्राप्त झाले नसल्याने पावती पुस्तक क्र. 456 ची रक्कम कर विभागात किती जमा झाली याबाबत खातर जमा करता आलेली नाही.

DATRYJM7501 (Ref No : 88)

## *17 नविन पाणीपुरवठा कनेक्शनधारकांना मागणी देयके विलंबाने दिलेने महानगरपालिकेस पाणीपुरवठा देयकापोटी मिळणारी रक्कम वेळेत मिळत नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व मलनिस्स मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये सांगली पाणीपुरवठा विभागाने एकुण 2665 नविन कनेक्शनधारकांना पाणी नळ कनेक्शन दिली आहेत. परंतु एकूण 1132 नविन कनेक्शनधारकांना कनेक्शन दिल्यानंतर 6 महिन्यांनी ,1465 कनेक्शन धारकांना सुमारे 12 ते 18 महिन्यांनी 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये व 68 कनेक्शनधारकांना सुमारे 24 महिन्यांनी, 2015- 16 या आर्थिक वर्षामध्ये प्रथम देयक पाठविले आहे. सदर नविन कनेक्शनची मागणी रक्कम रु.5282327/- असून विलंबाने देयके पाठविल्याने महानगरपालिकेस त्यांचे हक्काचे उत्पन्नापासून वंचित रहावे लागले आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली पाणीपुरवठा विभागाकडील नविन नळकनेक्शनसाठी नागरीकांना त्यांचे मागणीवरुन रु.200 भरुन घेवून छापील अर्ज दिला जातो. सदर छापील अर्जामध्ये नाव,पत्ता व सर्व्हे नंबर इत्यादी दिलेली माहिती भरुन नागरीक अर्ज पुन्हा



DRAFT

पाणीपुरवठा विभागाकडे दाखल करतात. त्यानंतर सदर अर्जावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी होऊन तो परत नोंदणीसाठी कनेक्शन क्लार्ककडे येतो. त्यावेळी नोंदणी क्लार्क कडून नागरीकांना नविन मिटर घेणेसाठी सांगितले जाते. अर्जदाराने नविन मिटर घेतलेनंतर ते मिटर सेक्शनकडे दिले जाते. मिटर सेक्शनमधील कर्मचारी नविन मिटर टेस्ट करून मिटर चालु स्थितीत असलेचा दाखला देतात. त्यानंतर सदर अर्ज भाग मिटर रिडरकडे या कनेक्शनधारकाची मागील थकबाकी नसलेबातचा दाखला घेणेसाठी दिला जातो. मिटर रिडर त्याचे कडे असणारी रिडिंग नोंदवही व बील बुकावरुन संबंधिताकडे यापूर्वीच्या कनेक्शनची थकबाकी नसलेचा ना हरकत दाखला घेतलेनंतर त्यावर मिटर सुपरवाईजर यांची स्वाक्षरी घेतली जाते व जर त्या ठिकाणी थकबाकी असलेस सदर नविन कनेक्शनचे अर्जावर त्याची नोंद होवून थकबाकी भरणेबाबत संबंधित अर्जदारास कळविले जाते. ज्या अर्जदाराची थकबाकी नसेल ते अर्ज पाईप इन्सपेक्टर यांचे कडे पाठविले जातात. पाईप इन्सपेक्टर जागेवर पाहणी करुन अर्जदारास मिटर डिपॉ.(अनामत) रक्कम, फिटर मजुरी व रस्ता खुदाई अनामत रक्कम या बाबतचे एस्टिमेट, अर्जामध्ये नोंद असलेल्या छापिल नमुन्यात तयार करुन देतो. सदर एस्टिमेट बरोबर असल्याबाबत सिनिअर पाईप इन्स्पेक्टर, कनिष्ठ अभियंता यांची स्वाक्षरी झालेनंतर, अर्ज कार्यकारी अभियंता यांचेकडे मंजूरीसाठी जातो. त्यांची मंजुरी झालेनंतर अर्जदार एस्टिमेटमध्ये नमूद केलेली नविन कनेक्शनची रक्कम पाणीपुरवठा विभागाच्या जमा शाखेकडे भरणा करतो. त्यानंतर भरणा केलेल्या रक्कमा डिपॉझिट रजिस्टरला नोंदवून सदर अर्ज पाईप इन्सपेक्टरकडे पुन्हा पाठविला जातो. त्यानंतर या विभागाचा पाईप फिटर अर्जदाराच्या जागेवर जावून त्यास अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे विहित आकाराचे नळकनेक्शन मिटरसहित जोडणी करुन देतात व संबंधित अर्जावर मंजूर नळ कनेक्शन जोडलेचा दिनांक, मिटर नंबर व रिडींग याचा तपशिल नोंदवुन तसेच सदर अर्जाची नोंद त्याच्याकडील पाणी कनेक्शन रजिस्टरमध्ये घेवून, रजिस्टरचा पृष्ठ क्रमांक अर्जावर नोंदवून सदर अर्ज सिनिअर पाईप इन्सपेक्टर व कनिष्ठ अभियंता यांचे स्वाक्षरीने पाणी हशिल शाखेकडे वर्ग केला जातो. पाणी हशिल शाखेकडील नविन **पाणी कनेक्शन मंजूरीबाबतचे नोंद रजिस्टरला** सदर अर्जाची नोंद होवून भाग मिटर रिडरकडे अर्ज दिला जातो. सदर रजिस्टरमध्ये नळ जोडणी दिनांक, व बिलासाठी पाठविलेचा दिनांक व पोहोच हे स्तंभ नमुद आहेत. त्यापैकी नळ जोडणी दिनांक या स्तंभामध्ये नळ जोडल्याचा दिनांक नोंदविण्यात आला आहे.

याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पाणी हशिल शाखेकडील नविन पाणी कनेक्शन मंजूरीबाबतचे नोंद रजिस्टरप्रमाणे तसेच पाणीपुरवठा विभागाने लेखापरीक्षणास दिलेल्या विवरणपत्राप्रमाणे (**परिशिष्ठ क्र.04** ) 2013-14 या आर्थिक वर्षात सांगली पाणीपुरवठा विभागाने एकूण 2665 नविन पाणी नळ कनेक्शन दिल्याची नोंद आहे. पाणी पुरवठा विभाग नळ कनेक्शन धारकास दर दोन महिन्यांनी एक मागणी देयक या प्रमाणे वर्षामध्ये 6 मागणी देयके पाठवतो. नळ कनेक्शनधारकास नविन पाणीपुरवठा कनेक्शन दिल्यानंतर त्याचे प्रथम मागणी देयक पुढील महिन्यात मिळणे आवश्यक आहे. परंतु पाणीपुरवठा विभागाने एकूण 1132 नविन कनेक्शनधारकांना कनेक्शन दिल्यानंतर 6 महिन्यांनी प्रथम देयक काढले आहे. तसेच 1465 कनेक्शन धारकांना सुमारे 12 ते 18 महिन्यांनी 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये प्रथम देयक पाठविले आहे व 68 कनेक्शनधारकांना सुमारे 24 महिन्यांनी, 2015- 16 या आर्थिक वर्षामध्ये प्रथम देयक पाठविले आहे विलंबाने देयक पाठविली आहेत. सदर नविन कनेक्शनची मागणी रक्कम रु.5282327/- असून त्यामुळे महानगरपालिकेस त्यांचे हक्काचे उत्पन्नापासून वंचित रहावे लागले

आहे.

पाणीपुरवठा विभागाने मिटर रिडर यांना मिटर रिडींग घेणे व मागणी देयकांचे वाटप करणे सोयीचे होण्यासाठी सांगली विभागाची विभागणी एकूण 21 भागामध्ये केली आहे. परंतु नविन कनेक्शनचे प्रथम देयक विलंबाने दिलेल्या कांही मिटर रिडरची उदाहरणे खालील प्रमाणे आहेत. वखारभाग औद्योगिक वसाहत मधील मिटर रिडरने 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये एकूण 347 नविन कनेक्शनचे रिडींग घेतले असून त्यापैकी 168 (49 टक्के) ग्राहकांचे प्रथम देयक 6 महिन्यानंतर व 179 (51 टक्के) ग्राहंकाचे प्रथम देयक 12 ते 18 महिन्यानंतर काढले आहे. वखार भाग अभयनगरमधील मिटर रिडरने 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये एकूण 285 नविन कनेक्शनचे रिडींग घेतले असून त्यापैकी 137(48 टक्के) ग्राहकांचे प्रथम देयक 6 महिन्यानंतर व 179 (52 टक्के) ग्राहंकाचे प्रथम देयक 12 ते 18 महिन्यानंतर काढले आहे. शिवाजी नगर 1 या भागाचे काम दिलेल्या मिटर रिडरने 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये एकूण 176 नविन कनेक्शनचे रिडींग घेतले असून त्यापैकी फक्त 13 (7.38 टक्के) ग्राहकांचे प्रथम देयक 6 महिन्यानंतर, 144 (81 टक्के) ग्राहंकाचे प्रथम देयक 12 ते 18 महिन्यानंतर व 19 (10.74 टक्के) ग्राहकांचे प्रथम देयक काढले आहे.

2) पाणीपुरवठा विभागाकडे पाईप जोडणी विभाग असून या विभागामध्ये 6 पाईप इन्सपेक्टर कार्यरत आहेत. पाईप इन्सपेक्टर त्यांचे कडे नविन कनेक्शनचा अर्ज आल्यानंतर ते जागेवर जावून नविन कनेक्शन मिटरसहीत जोडतात. त्यांनी नविन कनेक्शन दिल्यानंतरची नोंद त्यांचेकडील घरगुती व बिगर घरगुती (नळ जोडण्याची नोंदवही), महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971चे नियम 88 मध्ये नमुद केल्यानुसार नमुना क्र. 62 (ब) प्रमाणे ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये घेण्यात आली आहे. त्यामध्ये कनेक्शनधारकाचे नाव ,पत्ता, नविन नळजोडणीचा दिनांक, मिटर क्रमांक या बाबींचा तपशिल नोंदविला आहे. त्यांचेकडील नोंदवहीप्रमाणे 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये एकूण 2861 नविन कनेक्शन दिल्याची नोंद आहे. परंतु 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये पाणीपुरवठा विभागाचे मागणी देयक विभागाने एकूण 2665 नविन कनेक्शन धारकास देयके पाठविली आहेत. या वरुन अद्यापही एकूण 196 नविन कनेक्शनधारकास देयके पाठविली नसल्याचे स्पष्ट होते.

3) प्रथम देयक ग्राहकास दिल्याबाबत, विभागाने दिलेल्या संगणक प्रतीची तपासणी केली असता, त्यामध्ये नविन कनेक्शन धारकास दोन महिन्यास सरासरी रु.320/- प्रमाणे मागणी देयक दिल्याचे दिसून येते. मिटर रिडरने ग्राहकाचे जागेवर जावून मागणी देयकामध्ये नमूद केल्याप्रमाणे मिटरचे चालू वाचन,मागील वाचन घेवून त्याप्रमाणे वापरलेले पाणी लिटर मध्ये नमुद करून पाणी आकारणीचा दर नमूद करणे आवश्यक असता, ग्राहकास सरासरी आकाराने मागणी देयके दिली आहेत. यावरुन मिटर रिडर ग्राहकाच्या जागेवर जावून मिटर रिडींग घेत नसल्याचे स्पष्ट होते. सदर अनियमिततेमुळे महानगरपालिकेस नविन कनेक्शनधारकाकडुन त्याचे पाणी मिटर चालू असतानाही प्रत्यक्ष पाणी वापराप्रमाणे येणारे मागणी देयक दिले जात नसल्याने महसूली उत्पन्न कमी मिळत असल्याचे स्पष्ट होते.

4) पाणी हशिल शाखेकडील नविन पाणी कनेक्शन मंजूरीबाबतचे नोंद रजिस्टरला सदर अर्जाची नोंद होवून भाग मिटर रिडरकडे अर्ज दिला जातो. सदर रजिस्टरमध्ये नळ जोडणी दिनांक, व बिलासाठी पाठविलेचा दिनांक व पोहोच हे स्तंभ या रजिस्टरमध्ये नमुद आहेत. त्यापैकी नळ जोडणी दिनांक या स्तंभामध्ये नळ जोडल्याचा दिनांक नोंदविण्यात आला. परंतु सदर अर्ज बिलासाठी भाग मिटर रिडरकडे पाठविल्याचा दिनांक व पोहोच घेतली नसल्याने सदर कनेक्शनधारकाचे बील काढण्यास

DRAFT

कोणाकडून विलंब झाला ते समजून येत नाही.
याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 61, दि.30/01/2016 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.
आक्षेपाधिन रक्कम रु.5282327/-

DATPPTM5902 (Ref No : 61)

## *18 पाणी मिटर बंद असल्यामुळे पाण्याच्या प्रत्यक्ष वापरा प्रमाणे महसुली उत्पन्न मिळत नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व जलनिस्  मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***2013-14 या आर्थिक वर्षामध्ये सांगली पाणीपुरवठा विभागाकडे एकूण 44223 कनेक्शन असून त्यापैकी 25476 कनेक्शन बंद आहेत व 19635 कनेक्शन चालू आहेत. एकूण कनेक्शनपैकी 57 टक्के कनेक्शन बंद आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 नियम 12(क) नुसार जागेच्या मालकाने मिटर दुरुस्त केले नसल्यास अशा ठिकाणचे नळ कनेक्शन आयुक्त यांनी अधिनियम 1949 चे प्रकरण 12 (1) नुसार तोडून टाकणे आवश्यक असता पाणीपुरवठा विभागाने सदर कनेक्शन तोडून टाकली नसल्याने बंद मिटरची संख्या वाढत आहे. तसेच कनेक्शनधारकास मागील तीन महिन्याचे पाणी वापराप्रमाणे सरासरी मागणी देयक दिल्याने महानगरपालिकेस प्रत्यक्ष पाणी वापराप्रमाणे रक्कम प्राप्त होत नसल्याचे दिसून येते.***

पाणीपुरवठा विभागाची मागणी देयके महानगरपालिकेच्या संगणकीय प्रणालीमध्ये तयार करुन ती ग्राहकांना पाणीपुरवठा विभागाच्या मिटर रिडरकडून त्यांचे पत्त्यावर प्रत्यक्ष जागेवर जावुन दिली जातात. पाणी पुरवठा विभागाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये ग्राहकास दर दोन महिन्याचे एक या प्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये एकूण सहा मागणी देयके देण्यात येतात. मागणी देयकाचे नमुन्यामध्ये बील नंबर, ग्राहकाचे नाव, भाग रि.स.नंबर, ग्राहक क्रमांक, कालावधी या बाबी नमूद केल्या आहेत. तसेच बीलाच्या तपशीलामध्ये नळाचा आकार, ग्राहक प्रकार, पाणी आकारणी आधार चालू वाचन(रिडींग), मागील वाचन (रिडींग), वापरलेले पाणी लिटर /सरासरी पाणी आकारणीचा दर , एकूण भरावयाची रक्कम, विलंब आकार याबाबींचा समावेश देयकामध्ये केला आहे. परंतु मार्च 2013 मधील मागणी देयके व जमा रक्कम यांची तपासणी केली असता ब-याच देयकावर पाणी मिटर बंदचा तयार शिक्का मारण्यात येवून त्यांचेकडून पाणी वापरापोटी दोन महिन्यास सरासरी रु.320/- प्रमाणे रक्कमेची मागणी करण्यात आली आहे. उदा.1) श्रीम.गीता सुधिर चिवटे ग्राहक क्र. 2307 यांचे मागणी देयकावर meter not working असा शेरा मारला असुन त्यांना सरासरी 40 युनिट पाणी

वापरापोटी रु.8 प्रती युनिटप्रमाणे रु.320/- चे देयक पाठविले आहे. 2) श्रीम.अनिल द्वारकानाथ वाघ ग्राहक क्र. 386 यांचे मागणी देयकावर meter not working असा शेरा मारला असुन त्यांना सरासरी 40 युनिट पाणी वापरापोटी रु.8 प्रती युनिटप्रमाणे रु.320/- चे देयक पाठविले आहे.

पाणीपुरवठा विभागाने संगणकीय प्रणालीमधील माहितीच्या आधारे दिलेल्या विवरण पत्रानुसार (**परिशिष्ठ क्र.05**)2013-14 या आर्थिक वर्षामध्ये सांगली पाणीपुरवठा विभागाकडे एकूण 44223 कनेक्शन असून त्यापैकी 25476 कनेक्शन बंद आहेत व 19635 कनेक्शन चालू आहेत. एकूण कनेक्शनपैकी 57 टक्के कनेक्शन बंद आहेत. सांगली पाणीपुरवठा विभागाने मिटर रिडिंग घेणे, मागणी देयक वाटप व वसूली करणे या कामाचे सोयीस्तव विभागाची 22 भागामध्ये विभागनी केली आहे.

खालील भागांची मिटर चालू व बंदची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | भागाचे नाव | एकूण कनेक्शन | मिटर बंद कनेक्शन | मिटर चालू कनेक्शन | बंद मिटर टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मिरज रोड 1 | 2409 | 1763 | 642 | 73 |
| 2 | मिरज रोड 2 | 2615 | 1791 | 824 | 68 |
| 3 | मिरज रोड 3 | 2953 | 1887 | 1066 | 63 |
| 4 | शिवाजीनगर 2 | 1021 | 709 | 312 | 69 |
| 5 | खाणभाग 1 | 1300 | 965 | 335 | 74 |
| 6 | खाणभाग 2 | 1778 | 1405 | 373 | 79 |
| 8 | सांगलीवाडी | 2025 | 1586 | 439 | 77 |
| 9 | पेठभाग -1 | 2204 | 1696 | 508 | 76 |
| 10 | पेठभाग - 2 | 350 | 292 | 58 | 83 |
| 11 | उल्हासनगर | 258 | 199 | 59 | 77 |

DRAFT

याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की महानगरपालिकेच्या ब-याच भागातील 50 टक्के पेक्षा जास्त मिटर बंद आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8 (1) नुसार पाणी मोजण्याचे प्रत्येक मिटर दुरूस्त ठेवणे आवश्यक आहे. तसेच नियम 11 चे पोटनियम (2) अन्वये आयुक्ताने लेखी नोटीसद्वारे जागेच्या मालकास, भोगवटादारास मिटरमध्ये कोणताही दोष आढळून आल्यास तो काढून टाकण्यास किंवा साफ करण्याचे फर्मािवणे आवश्यक आहे. पाण्याच्या वापराबाबतचे जे मागणी देयक ग्राहकास देण्यात येते. त्यामध्ये मिटर बंदचा शिक्का मारण्यात येतो व मागील तीन महिन्याचे पाणी वापराचे सरासरी काढून त्याप्रमाणे पुढील देयक ग्राहकास पाठविले जाते. परंतु प्रकरण 8 नियम 12(क) नुसार जागेच्या मालकाने मिटर दुरुस्त केले नसल्यास अशा ठिकाणचे नळ कनेक्शन आयुक्त यांनी अधिनियम 1949 चे प्रकरण 12 (1) नुसार तोडून टाकणे आवश्यक असता पाणीपुरवठा विभागाने सदर कनेक्शन तोडून टाकली नसल्याने बंद मिटरची संख्या वाढत असल्याचे दिसून येते. तसेच ग्राहकाने एकूण किती पाणी वापरले व त्याची एकूण किती

रक्कम महानगरपालिकेस मिळणे आवश्यक आहे याबाबतची नेमकी माहिती समजून येत नसल्याने मिटरप्रमाणे पाणीवापराची योग्य रक्कम महानगरपालिकेस मिळत नसल्याचे स्पष्ट होते.

या बाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.62 दि.30/01/2016 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

DATPPTM5902 (Ref No : 62)

## *20 पाणीपट्टी थकबाकी वसूल करण्यासाठी नियमाप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनिस्स मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 199437766.00/-

***पाणीपुरवठा विभागाने 2013-14 या आर्थिक वर्षाची मागील थकबाकी व चालू मागणीच्या दिलेल्या विवरण पत्रानुसार सांगली व कुपवाड शहराची मागील थकबाकी रु.154050994/- व चालू मागणी रु.116501207/- धरुन एकूण डिमांड रु.270552201/- असून त्यापैकी मागील थकबाकी रु.207410 13/- व चालू बाकी रु. 50373422/- अशी एकूण रक्कम रु.71114435/- वसूल झालेली आहे. वसुलीची टक्केवारी फक्त 26 टक्के आहे. थकबाकीची वसुली करण्यासाठी नियमानुसार नळ कनेक्श न तोडण्याची कार्यवाही केली जात नसल्याने थकबाकी व चालू मागणी वसुलीचे प्रमाण अत्यल्प आहे.***

पाणीपुरवठा विभागाने संगणकीय प्रणालीमधील माहितीच्या आधारे दिलेल्या विवरणपत्रा नुसार 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये सांगली पाणीपुरवठा विभागाकडे एकूण 44223 कनेक्शन असून त्यापैकी 25476 कनेक्शन बंद आहेत व 19635 कनेक्शन चालू आहेत. एकूण कनेक्शनपैकी 57 टक्के कनेक्शन बंद आहेत. सांगली विभागाने मिटर रिडिंग घेणे, मागणी देयक वाटप व वसूली करणे या कामाचे सोयीस्तव विभागाची 22 भागामध्ये विभागणी केली आहे. सांगली पाणीपुरवठा विभागाने 2013-14 या आर्थिक वर्षाची मागील थकबाकी व चालू मागणीच्या दिलेल्या विवरण पत्रानुसार(**परिशिष्ठ क्र.06**) सांगली व कुपवाड शहराची मागील थकबाकी रु.154050994/- व चालू मागणी रु.116501207/- धरुन एकूण डिमांड रु.270552201/- असून त्यापैकी मागील थकबाकी रु.20741013/- व चालू बाकी रु.50373422/- अशी एकूण रक्कम रु.71114435/- वसूल झालेली आहे. वसुलीची टक्केवारी फक्त 26 टक्के आहे.

पाणीपुरवठा विभागाकडून 2014-15 या आर्थिक वर्षापर्यंत रु.10 हजारपेक्षा जास्त रक्कमेची थकबाकी असलेल्या ग्राहकांच्या थकबाकी विवरणपत्राची तपासणी केली असता एकूण 2156 ग्राहकाकडे रु.59012618/- ची थकबाकी असल्याचे दिसून येते. एकूण थकबाकी रक्कम रु.140405271/- शी तुलना करता या 2156 ग्राहकाकडे असलेल्या थकबाकीचे प्रमाण 42 टक्के आहे.

DRAFT

याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. नापाक-2008/ प्र.क्र. 1/पापु-22 दि. 22/10/2008 मधील 9 नुसार पाणी पट्टीची आकारणी व वसूली 100% करणे आवश्यक असता थकबाकी व चालू मागणीची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड मधील प्रकरण 10 नियम 12 (1) (अ) नुसार पाणी पट्टीचा कोणताही हप्ता किंवा पाण्याबद्दल किंवा मिटरच्या भाड्या बद्दल किंवा नियम 3,9 किंवा 17 च्या तरतुदी अन्वये किंवा तरतुदीच्या आधारे केलेल्या कोणत्याही कामाच्या खर्चा बद्दल देय असलेल्या कोणत्याही रक्कमेचा कोणताही हप्ता, अशा पट्टी बद्दल किंवा रक्कमे बद्दल मागणीची नोटीस योग्य रितीने बजावण्यात आल्या नंतर एक महिन्याच्या आत देण्यात कसुर करणेत आली तर खाजगी पाणी पुरवठा आयुक्तांनी तोडून टाकण्यात यावा असे नमुद आहे. पाणीपुरवठा विभाग दर दोन महिन्यांनी पाणीपट्टीचे देयक थकबाकीसह ग्राहकांना पाठविते. परंतु नियमानुसार मागणीची नोटीस देवूनही थकबाकी असणा-या ग्राहकाचे पाणी कनेक्शन तोडत नसल्याचे दिसून येते. थकबाकी रक्कम वसूल करण्यासाठी पाणी कनेक्शन तोडण्यात येत नसल्याने चालूबाकी व थकबाकीची रक्कम रु.199437766/- वसूल झाली नसल्याचे दिसून आले आहे.

3)पाणीपुरवठा विभाग ग्राहकांना दर दोन महिन्यास एक या प्रमाणे वर्षामध्ये सहा मागणी देयके ग्राहकास पाठविते. परंतु मागणी देयकांची तपासणी केली असता पाणीपुरवठा विभागाने 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये दि. 01/10/2013 ते दि.31/03/2014 या सहा महिने कालावधीची मागणी देयके दि.06/04/2014 रोजी पाठविली आहेत. तसेच या सहा महिन्यामध्ये मिटर रिडर यांनी दर दोन महिन्यांनी ग्राहकाचे पाणी मिटरचे रिडींग घेणे आवश्यक असता मिटर रिडर यांनी मिटर रिडींग घेतले नसल्याचे त्यांचे रिडींग पुस्तकाची तपासणी केली असता दिसून येते. या सहा महिन्याचे कालावधीत मिटर रिडर यांनी कोणते काम केले याचा खुलासा पाणीपुरवठा विभागास अर्धसमास ज्ञापन क्र.64, दि.01/02/2016 अन्वये विचारण्यात आला होता. परंतु पाणीपुरवठा विभागाने अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही . सदर कालावधीची मागणी देयके पाणीपुरवठा विभागाने 2014 -15 या पुढील आर्थिक वर्षामध्ये पाठविली असल्याने महानगरपालिकेस 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये मिळणा-या उत्पन्नास मुकावे लागले आहे.

या बाबत अर्धसमास ज्ञापन क्र.64 दि.01/02/2016 रोजी निर्गमित केला असुन पाणी पुरवठा विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

आक्षेपाधिन रक्कम :- चालूबाकी व थकबाकीची रक्कम रु.199437766/-

DATPPTM5902 (Ref No : 64)

## *26 उद्यान विभागामधील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 08**

*लेखा शीर्ष :उद्यान मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*



DRAFT

***महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 च्या प्रकरण- 2 नियम 4 (1) अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक 2013-2014 या वित्तीय वर्षात घेण्यात आली नाही. महापालिका क्षेत्रामधील झाडांची पाच वर्षातून एकदा वृक्षगणना करणेत आलेली नाही. मालमत्ताधारक झाडे जगविण्यापोटीची रक्कम महानगरपालिकेकडे भरणा करतो. परंतु त्यानंतर डिपॉझिट मागणीसाठी परत येतच नसल्यामुळे महानगरपालिकेकडे भरणा केलेली रक्कम डिपॉझिट खाती पडुन राहते व या रक्कमेचा विनियोग उद्यान विभागास करता येत नाही.***

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 च्या नियम 3(1) अन्वये कमीत कमी 5 आणि जास्तीत जास्त 15 व्यक्तीची एक वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेने वृक्ष प्राधिकरण समिती गठीत केली असुन सदर समितीचे अध्यक्ष आयुक्त असुन नऊ नगरसेवक सदस्य आहेत. तसेच वृक्ष व उद्यानाबद्दल माहिती असलेले पाच अशासकिय सदस्य समितीमध्ये आहेत.

सदर नियमाच्या अनुषंगाने अभिलेख्यांची तपासणी करून याबाबत अर्धसमास पत्र क्र.80 दि.11/03/2016 रोजी निर्गमित केले असता उद्यान विभागाचे अनुपालन दि.18/03/2016 रोजी प्राप्त झाले असून लेखापरीक्षणामध्ये घेतलेले आक्षेप मान्य करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 ची अंमलबजावणी करण्याची उचित कार्यवाही करणेत येत असलेबाबत कळविले आहे. उद्यान विभागाच्या अभिलेख्यांची तपासणी व विभागाने दिलेले अनुपालन तपासुन खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 च्या प्रकरण- 2 नियम 4(1) अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक प्रत्येक महिन्यातून एकदा घेणे आवश्यक आहे. उद्यान विभागाने वृक्ष प्राधिकरण समितीच्या झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत अहवालाची एकत्रित फाईल तयार केली आहे. सदर फाईलची तपासणी केली असता वृक्ष प्राधिकरण समितीची शेवटची बैठक दि.10/07/2012 रोजी झालेली आहे. त्यानंतर 2013-2014 या वर्षात एकदाही वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक झालेली नसल्याचे दिसून येते.

2) महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 चे कलम 7 ब नुसार महापालिका क्षेत्रामधील झाडांची पाच वर्षातून एकदा वृक्षगणना करणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने अद्याप वृक्ष गणना केली नसल्याने महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये एकुण किती वृक्षसंपदा आहे ते समजुन येत नाही.

3) अधिनियम 7 क नुसार प्रत्येक भुखंडात असणारी व लावण्यात येणा-या झाडांची संख्या व प्रकार विर्निदीष्ट करणारी मानके अद्याप विहीत केली नाहीत.

4) नियम 7 फ नुसार फुले, फळे, भाज्या किंवा रोपे यांची प्रदर्शने वर्षातून किमान एकदा आयोजित करणे आवश्यक आहे. परंतु एकही प्रदर्शन महानगरपालिकेने आयोजित केलेले नाही.

5) उद्यान विभागाकडील वृक्षतोड परवाना नोंदवहीची तपासणी केली असता आयुक्त यांच्या मंजुरीने 2013-14 या आर्थिक वर्षात एकुण 11 अर्जदारांना 27 झाडे तोडण्यास परवानगी दिली असुन

अर्जदाराने झाड तोडल्याच्या जागी अथवा अन्य योग्य जागी त्याच जातीचे अथवा स्थानिक जातीचे झाड लावणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे एकुण 135 नविन झाडे उद्यान विभागाने संबंधिताकडुन लावुन घेतली असुन झाडे जगविण्याचे हमी येणा-या खर्चापोटी महानगरपालिकेकडे रक्कम रु. 67500/- मात्र जमा करुन घेतले आहेत. परंतु सदर झाडे सुस्थितीत असल्याची खात्री उद्यान विभागाने करणे आवश्यक असता ती केलेली नाही.

6) नियम क्र. 8(3) (ख) अन्वये झाडे तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा अहवाल वृक्ष प्राधिकरणाने महानगरपालिकेस 6 महिन्यातुन एकदा सादर करणे आवश्यक आहे. परंतु उद्यान विभागाने आयुक्तांच्या मान्यतेने झाडे तोडण्यास परवानगी दिली आहे.

7) महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडुन नागरीकांना घर बांधण्यास बांधकाम परवानगी दिली जाते. महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिल्यानंतर बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे (नियम क्र. 6.7.1) परिशिष्ठ डी मध्ये देण्यात आलेल्या विहित नमुन्या प्रमाणे नागरीकास दिले जाते. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राच्या मागील बाजुस बांधकामाबाबतच्या अ.क्र.1 ते 27 अटी नमुद केल्या आहेत. त्या मधील अट क्र. 10 नुसार बांधकामाचे जागेत पाच झाडे लावणेचे व जोपासणेची आहेत असे नमुद केले आहे. 2013-14 या आर्थिक वर्षात मनपाच्या नगर रचना विकास विभागाने 1068 बांधकामास परवानगी दिली आहे. परंतु अटी प्रमाणे 1068 X 5 झाडे = 5340 झाडे लावणे आवश्यक आहे. परंतु सदर ठिकाणी झाडे लावण्यात आली आहेत किंवा नाही तसेच त्याची जोपासणी करण्यात आली आहे किंवा नाही याची तपासणी उद्यान विभागाने केल्याचे दिसून येत नाही. यावरुन वृक्ष लागवड व झाडांची जोपासणा बांधकाम धारकाने केल्याची तपासणी करण्याची कोणतीही यंत्रणा महानगरपालिकेकडे नसल्याने वृक्षारोपण केलेबाबतची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

8)वृक्ष प्राधिकरण समितीच्या दि. 29/03/2007 च्या इतिवृत्ताचे अवलोकन केले असता विषय क्र.7 वर इमारत बांधकाम परिपुर्ती दाखला दिलेबाबतची माहिती दिली आहे. या बैठकीमध्ये इमारत परिपुर्ती दाखला देताना मालमत्ताधारकाकडुन प्रत्येक झाडासाठी रु. 500/- डिपॉझिट भरुन घेणेत यावे व झाडे लावल्याची व जोपासणा केल्याची पाहणी करुन दोन वर्षांनी डिपॉझिट परत देण्यात यावे असे निर्देश आयुक्त यांनी सर्वसहमतीने दिले आहेत. त्यानुसार बांधकाम पूर्ण झाल्यानंतर परिपुर्ती दाखल्यासाठी ना हरकत दाखला देताना उद्यान विभागातून 2013-14 या वर्षात 418 बांधकामांना वृक्ष लागवडीचा दाखला देण्यात आलेला आहे व झाडे जगविण्यापोटी त्यांचेकडुन 13,55,000/- पावतीने (डिपॉझिट) भरुन घेतल्याची नोंद उद्यान विभागाच्या रोजकिर्दीमध्ये घेतली आहे. तसेच 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये एकुण 27 मालमत्ताधारकांना रु.89500/- झाडे जगविल्या नंतर रिफंड म्हणुन दिले आहेत. यावरुन असे दिसुन येते की मालमत्ताधारक झाडे जगविण्यापोटीची रक्कम महानगरपालिकेकडे भरणा करतो. परंतु त्यानंतर डिपॉझिट मागणीसाठी परत येतच नसल्यामुळे महानगरपालिकेकडे भरणा केलेली रक्कम डिपॉझिट खाती पडुन राहते व या रक्कमेचा विनियोग उद्यान विभागास करता येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता,1971 चे नियम क्र.190 (3) नुसार तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या ठेवी प्रत्येक वर्षाअखेर नगरपरिषदेकडे व्यपगत करणे आवश्यक असता ती केलेली नाही. तसेच मालमत्ताधारकाकडुन झाडे जगविण्यापोटी डिपॉझिट म्हणुन भरणा केलेली रक्कम जमा करुन घेताना दोन वर्षामध्ये या झाडांची जोपासना करुन झाड जगविलेचे निदर्शनास आले नाही तर ही रक्कम उद्यान विभागाकडे वृक्ष लागवड व जोपासणेच्या कार्यक्रमासाठी वर्ग करण्याचा ठराव करुन

DRAFT

त्याप्रमाणे कार्यवाही केल्यास या रक्कमेचा विनियोग होणार असलेने याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

DATPKCM7101 (Ref No : 80)

## *28 पेट्रोल-डिझेल वाहनांच्या दुरुस्तीवर वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 458072.00/-

***वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-1008/प्र.क्र. 13/200 विनिएम दिनांक. 05/01/2009 अन्वये डिझेल वाहनावर प्रतिवर्ष रु. 50/- हजार व पेट्रोल वाहनावर प्रतिवर्ष रु. 40/- हजार खर्च करणेची वित्तीय मर्यादा असतांना डिझेल वाहनावर रु.458072/- जास्त खर्च केला आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या कार्यशाळा विभागाकडे एकुण 111 विविध प्रकारची वाहने असुन सांगली प्रभाग 1 व 2 कडे 70 वाहने तसेच मिरज विभागातील प्रभाग 3 व 4 कडे 41 वाहने कार्यरत आहेत. 2013-14 मधील वाहन दुरुस्ती कामाच्या नस्ती, वाहन दुरुस्तीसाठी उपयोगात आणलेल्या स्पेअर पार्ट्स नोंदी रजिस्टरची तपासणी केली असता खालील अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1) वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-1008/प्र.क्र. 13/200 विनिएम दिनांक. 05/01/2009 अन्वये डिझेल वाहनावर प्रतिवर्ष रु. 50/- हजार व पेट्रोल वाहनावर प्रतिवर्ष रु. 40/- हजार खर्च करणे आवश्यक असतांना खाली नमुद केलेल्या वाहनावर वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च केला आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वर्ष | इंधन प्रकार | केलेला खर्च रुपये | जास्तीचा खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MH-10-P-1007 कॉम्पॅक्टर | 2006 | डिझेल | 139860/- | 89860/- |
| 2 | MH-10-P-22 डंपर प्लेसर | 2003 | डिझेल | 160218/- | 110218/- |
| 3 | MH-10-P-1009 कॉम्पॅक्टर | 2007 | डिझेल | 85675/- | 35695/- |
| 4 | MH-10-P-1019 सक्शन व्हॅन | 2008 | डिझेल | 69789/- | 19789/- |
| 5 | MH-10-A-2517 रुग्णवाहिका | 1994 | डिझेल | 70343/- | 20343/- |

DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | MH-10-P-25 डंपर प्लेसर | 2003 | डिझेल | 198676/- | 148676/- |
| 7 | MH-10-A-5692 कचरा ट्रक | 1996 | डिझेल | 83491/- | 33491/- |
| | | | | एकूण रु. | 458072 |

याबाबत अर्धसमास पत्र क. 73 दि.26/02/2016 रोजी निर्गमित केले असता वाहन विभागाचे उत्तर दि.23/03/2016 रोजी प्राप्त झाले असता वाहनाचे दुरुस्तीवर वित्तिय मर्यादेपेक्षा जास्त खर्च केल्याचे मान्य केले आहे.

DATPKCM7101 (Ref No : 73)

## *29 कार्यशाळा विभागाला स्टॉकसाठी लागणारे लुब्रिकेटिंग ऑईल खरेदी मधील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.42 (3) नुसार प्रत्येक महिना अखेर प्राधिकृत अधिका-याने अस्थापना खर्चाच्या देयकाव्यतिरिक्त महिन्यातील सर्व देयकांची तपासणी करुन , देय आकार योग्य त-हेने प्रमाणित केलेले असुन उपप्रमाणके, पुन्हा दुस-या कोणत्याही मागणीच्या पृष्ट्यर्थ वापरता येणे अशक्य होतील अशा त-हेने विरुपित (डिफेस) केली गेली आहेत अशी स्वत: ची खात्री करुन घेणे आवश्यक असता देयका सोबत जोडण्यात आलेली उपप्रमाणके विरुपित केली नसल्याने सदरच्या उपप्रमाणकांचा दुबार वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.***

DRAFT

कार्यशाळा विभाग टिपणी दि.07/02/2013 नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयाकडील प्रशासकीय विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग इत्यादी विभागाकडे 111 वाहने दैनंदिन वापरात असुन सदरच्या वाहनांना नियमित ऑईल लेव्हल करणे, इंजिन गिअर बॉक्स, पी.व्ही.ओ गिअर बॉक्स तसेच डंपर प्लेसर, ट्रॅक्टर सक्शन व्हॅन, हायड्रोलिक सिस्टिमवरची वाहने, ऑफीस जनरेटर, प्रसुतिगृह जनरेटर इत्यादीसाठी लुब्रिकेटिंग ऑईल साप्ताहिक मेन्टेनन्ससाठी खरेदी करणेसाठी 2013-14 च्या अर्थसंकल्पात रक्कम रुपये 600000/- ची तरतुद करण्यात आली आहे. कॅस्ट्रॉल इंजिन कंपनीचे सांगली जिल्हा अधिकृत डिस्ट्रीब्युटर सांगली यांचे दरपत्रकानुसार स्टोअर विभागाकडे ऑईल खरेदी करणेसाठी खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

| अ.क्र. | तपशिल | प्रमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | कॅस्ट्रॉल इंजिन ऑईल SA5 15 W 40 | 210 लिटर बॅरल 2 नग | 63615/- | 127230/- |
| 2 | कॅस्ट्रॉल CRB प्लस 20 W 40 | 210 लिटर बॅरल 3 नग | 68120/- | 204360/- |
| 3 | कॅस्ट्रॉल इंजिन ऑईल DOT 3 | 120 टन | 190/- | 22800/- |
| 4 | हायड्रोलिक ऑईल कॅस्ट्रॉल | 210 लिटर बॅरल 1 नग | 50400/- | 50400/- |
| 5 | कॅस्ट्रॉल हायड्रोलिक ऑईल LST | 20 लिटर बॅरल 3 नग | 4800/- | 14400/- |
| 6 | कॅस्ट्रॉल हायड्रोलिक ऑईल EP 68 | 210 लिटर बॅरल 1 नग | 46930/- | 46930/- |
| 7 | कॅस्ट्रॉल GT X 20W 50 इंजिन ऑईल | 50 लिटर ड्रम 1 नग | 15250/- | 15250/- |
| एकुण रक्कम रुपये | | | | 481370/- |

DRAFT

महानगरपालिकेच्या कार्यशाळा विभागाकडे ऑईल (मटेरियल) खरेदीसाठी येणा-या खर्चास व रितसर जाहिर निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस होणा-या प्रसिध्दीच्या खर्चासह मा. आयुक्त यांचेकडे शिफारस करण्यात आली होती. आयुक्तांनी दि. 08/03/2013 रोजी खर्चास मान्यता दिली आहे. त्यानुसार कार्यशाळा विभागाने दै. तरुण भारत सांगली या वर्तमानपत्रामध्ये दिनांक 11/04/2013 रोजी जाहीर निविदा सुचना क्र.1/2013-14 अन्वये ई-टेंडर पध्दतीने अधिकृत डिलर्स कडून लुब्रिकेंट ऑईल पुरवणेकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा दि.30/04/2013 रोजी उघडल्या असता प्रतिसाद न लाभल्याने सदर जाहिर निविदा क्र.1/2013-2014 या निविदेस प्रथम मुदतवाढ दै. तरुण भारत मध्ये दि. 07/05/2013 रोजी प्रसिध्द केली. सदरची निविदा दि.17/05/2013 रोजी ई-टेंडर कमिटी समोर उघडली असता प्रतिसाद लाभला नाही.सदर निविदेस

दुसरी मुदतवाढ दि. 28/06/2013 पर्यंत दिली असता खालील प्रमाणे 3 निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदा धारक | रुपये |
|---|---|---|
| 1 | भारत मोटर्स, सांगली. | 422870/- |
| 2 | महाराष्ट्र सेल्स एजन्सी, सांगली | 451040/- |
| 3 | स्वस्तिक ऑईल एजन्सी, सांगली | 462600/- |

मे. भारत मोटर्स, सांगली. यांची कमी दराची निविदा रक्कम रु. 462600/- स्विकारण्यात आली. मा. आयुक्त निर्णय क्रमांक-99/13-14 दि. 30/07/2013 ला मंजुरी देण्यात आली आहे. मंजुर पुरवठादारास पुरवठा आदेश दि.15/10/2013 रोजी देण्यात आला असुन मालाचा पुरवठा दि. 14/11/2013 ला करण्यात आला असुन कामाचे देयक प्रमाणक क्र.4534 दि.14/11/2013 ने रक्कम रु.422870/- आदा केले आहेत.

या कामाची नस्ती,निविदा प्रक्रीया व देयकाची तपासणी करुन अर्धसमास पत्र क्र.72, दि.26/02/2016 रोजी निर्गमित केले असता वाहन विभागाचे उत्तर दि. 23/02/2016 रोजी प्राप्त झाले असून महानगरपालिकेच्या लेखा विभागाने उपप्रमाणके विरुपित करणे आवश्यक असता ती विरुपित केली नसल्याचे नमुद केले आहे. याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) मे. भारत मोटर्स यांनी पावती क्र. 3451 दि. 11/11/2013 ने रक्कम रु. 4,22,870/- चा माल पुरवठा केलेचे उपप्रमाणक देयकाबरोबर जोडले आहे. सदरचे देयक वाहन विभागाने तयार करुन लेखा शाखेकडे ठेकेदारास देयकाचे प्रदान करण्यासाठी पाठविले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.42 (3) नुसार प्रत्येक महिना अखेर प्राधिकृत अधिका-याने अस्थापना खर्चाच्या देयकाव्यतिरिक्त महिन्यातील सर्व देयकांची तपासणी करुन ,देय आकार योग्य त-हेने प्रमाणित केलेले असुन उपप्रमाणके, पुन्हा दुस-या कोणत्याही मागणीच्या पृष्ट्यर्थ वापरता येणे अशक्य होतील अशा त-हेने विरुपित (डिफेस) केली गेली आहेत अशी स्वत:ची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. परंतु या देयका सोबत जोडण्यात आलेली उपप्रमाणके देयक आदा केल्यानंतर लेखा शाखेने विरुपित केली नसल्याने सदरच्या उपप्रमाणकांचा दुबार वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATPKCM7101 (Ref No : 72)

## *33 विवाह नोंदणी शुल्क व शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरणा न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 153178.00/-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 145(1) नमुना क्रमांक 116 प्रमाणे संग्रह पुस्तक ठेवले नाही. विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील नियम क्रमांक 12 नुसार 2013-2014 ची नोंदणी शुल्क व शास्तीची रक्कम रु.153178/- शासकीय कोषागारामध्ये जमा केली नाही.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विवाह नोंदणी विभागाचे 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण केले असता विवाह नोंदणी विभागाने नोंदणी विभागाकडून एकुण 24 पावती पुस्तके घेतली आहे. 2013-2014 या वित्तीय वर्षात 751 विवाहाची नोंद केली असुन रक्कम रुपये 153178/- शुल्क शास्तीसह वसुल केले आहेत.

याबाबत लेखापरिक्षणास खालील अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1) मिरज व कुपवाड विभागातील विवाह नोंदणी कार्यालयाने 2013-2014 या वित्तीय वर्षात 5 पावती पुस्तके नोंदणी विभागाकडून घेतली आहे. परंतु संग्रह पुस्तक ठेवलेले नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 145(1) नमुना क्रमांक 116 प्रमाणे नोंदणी विभागाकडून घेतलेल्या पावती पुस्तकाची नोंद संग्रह पुस्तकात घेतली पाहिजे. नियम145(2) नुसार संग्रह पुस्तक महिन्याच्या महिन्याला बंद करुन उर्वरीत पुस्तके संबंधित सक्षम अधिका-याने पडताळुन पाहिले पाहिजे. परंतु अशी कारवाई झालेली नाही.

2) सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विवाह नोंदणी विभागाची 2013-2014 मधील विवाह नोंदणी शुल्क व शास्तीची रक्कम विवाह नोंदणी विभागाने चलनाव्दारे महापालिकेच्या लेखा शाखेत जमा केली आहे ती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | सांगली विभाग | 108180/- |
| 2 | मिरज विभाग | 35732/- |
| 3 | कुपवाड विभाग | 9266/- |
| | एकूण | 153178/- |

महापालिकेच्या लेखा विभागाकडे उपरोक्त जमा झालेली रक्कम रुपये 153178/- विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील नियम क्रमांक 12 नुसार नोंदणी शुल्क व शास्तीची रक्कम शासकीय कोषागारामध्ये जमा करणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेतील लेखा विभागाने विवाह नोंदणी शुल्क व शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरणा केली नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.79 दि.11/03/2016 रोजी निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही.

DATPKCM7101 (Ref No : 79)

## *34 विधी विभागाच्या कामकाजामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : विधी मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 59050.00/-

***न्यायालयीन दाव्याची दावा नोंदवही नमुना क्र.90 अपूर्ण आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 481(1) (ज) प्रमाणे कायदाविषयक सल्ला व सहाय्य मिळविण्यासाठी वकीलांची नेमणुक आयुक्तांनी महापालिकेची मान्यता घेवुन करणे आवश्यक आहे. परंतु आयुक्तांनी महासभेची मान्यता न घेताच वकीलांची नेमणुक केली आहे व त्यांना रु.59050/- फीची रक्कम अदा केली आहे. तसेच अन्य एका कोर्ट केसमध्ये अॅड प्रशांत नरवाडकर (महापालिका पॅनलवरील वकील) यांना आदा केलेली कोर्ट फीची रक्कम मिळाल्याची पोहोच पावती तसेच कोर्टामध्ये भरणा करणेसाठी आदा केलेली विलंब माफीचा अर्ज व प्रोसेस भत्तापोटीची रक्कम रु.1000/- कोर्टामध्ये भरणा केलेबाबतची चलने लेखापरीक्षणास सादर केलेली नाहीत.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेतील विधी विभागाकडे सांगली मिरज येथील कनिष्ठ न्यायालय व जिल्हा न्यायालय तसेच मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथील न्यायालयीन प्रकरणाबाबतचे दैनंदिन कामकाजाच्या नोंदी व दप्तर ठेवले जाते. मा. न्यायालयातून दाव्याची प्रत महानगरपालिकेतील बारनिशी विभागात प्राप्त होते, त्यानंतर मा. आयुक्त यांचे आदेशानुसार दाव्याची प्रत विधी विभागाकडे पाठविली जाते. विधी विभागाकडून दाव्यासंबंधी वकिलपत्र व पत्तामेमो मंजुरीकरीता मा. आयुक्त यांचेकडे टिपणीने सादर केला जातो. टिपणी मंजूरीनंतर महानगरपालिकेतील संबंधित विभागाला दाव्यासंबंधीची माहिती व कागदपत्रे वकिलांना व विधी विभागाला देण्याकरिता सांगितले जाते. त्याप्रमाणे दाव्यांचा अंतिम निकाल लागल्यानंतर महानगरपालिकेतील वकील पॅनलवरील वकीलांना महानगरपालिका महासभा ठराव क्र. 34 दि. 10/10/2008 नुसार ठरविण्यात आलेली वकिल फी, ज्या विभागाचा दावा आहे त्या विभागाकडून अदा केली जाते.

दावा नोंदवही व न्यायलयीन प्रकरणांच्या नस्ती यांचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्र.41, दि.30/12/2015 रोजी निर्गमित केला असुन विधी विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. या बाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

**1)** महानगरपालिकेचे 2013-2014 या वर्षापर्यंत दिवाणी, फौजदारी, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयात एकुण किती दावे सुरु होते त्यापैकी किती दाव्यांचा निकाल लागला

आहे व किती दावे प्रलंबित आहेत याबाबतची माहिती दावा रजिस्टर वरुन लेखापरिक्षणास तपशिलवार सादर करण्यात बाबत अर्धसमास ज्ञापन क्र.41, दि.30/12/2015 अन्वये मागणी करण्यात आली असता सदर माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

**2)** दावा नोंदवही अपूर्णतेबाबत :- महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 121 नमुना 90 नुसार दावा नोंदवही मध्ये 24 रकाने आहेत ते खालीलप्रमाणे

1) दावा क्रमांक 2) वादीचे नांव 3) प्रतिवादीचे नांव 4) दाव्याचे स्वरुप, दाव्याची रक्कम, दाव्यात लावलेले वकील या संबंधीच्या तपशिलासह असलेली दाव्याची माहिती 5) प्रयुक्त अधिनियमांचे कलम 6) जबाबदार अधिका-याच्या प्रतिवृत्ताचा दिनांक 7) महानगरपालिकेवर समन्स बजावल्याचा दिनांक 8) दिनांकासह परिषदेचा ठराव 9) लावलेल्या वकीलाची माहिती व नियम फी 10) वकीलास माहिती दिल्याचा दिनांक 11) दावा दाखल केल्याचा किंवा वकालतनामा न्यायालयात सादर केल्याचा दिनांक 12) जेथे दावा केला असेल त्या न्यायालयाचे नांव 13) महानगरपाकिलेच्या वतीने खटल्यास हजर राहणा-या जबाबदार अधिका-याचे नांव 14) न्यायनिर्णयाच्या किंवा हुकुमनाम्याचा दिनांक 15) दंडाच्या रकमेसंबंधीचा तपशिल अंर्तभुत असलेला न्यायनिर्णयाचा किंवा हुकुमनाम्याचा दिनांक 16) खटल्याच्या निकालावरील वकिलांचे किंवा अन्य अधिका-याचे मत 17) वसुली संबंधीच्या पुढील कामांचा तपशिल दरखास्तीचा नियम, दिनांक 18) वसुली केलेल्या प्रत्यक्ष रकमांचा तपशिल 19) महानगरपालिकेच्या लेख्यातील जमेचा दिनांक 20) दाव्यांचा तपशिल 21) महानगरपालिकेच्या लेख्यात खर्च खाती घातल्यांचा दिनांक (प्रमाणके क्रमांक, दैनिक पुस्तकाचे पान) 22) न्यायालयाची कागदपत्रे आगावु रकमांचे समायोजन यांच्या संदर्भासह पडताळणी संबंधी शेरा 23) प्राधिकृत अधिका-याची सही 24) शेरा.

यापैकी दावा नोंदवहीतील खालील रकाने अपुर्ण आहे.

1) रकाना नं. 5 प्रयुक्त अधिनियमांचे कलम 2) रकाना नं. 7 महानगरपालिकेवर समन्स बजावल्याचा दिनांक 3) रकाना नं. 11 दावा दाखल केल्याचा किंवा वकालतनामा न्यायालयात सादर केल्याचा दिनांक 4) रकाना नं 13 महानगरपालिकेच्या वतीने खटल्यास हजर राहणा-या जबाबदार अधिका-याचे नांव 5) रकाना नं. 16 खटल्याचा निकालावरील वकीलांचे किंवा अन्य अधिका-याचे मत 6) रकाना नं. 21 महानगरपालिकेच्या लेख्यात खर्च खाती घातल्याचा दिनांक (प्रमाणक क्र. दैनिक पुस्तकाचे पान) सदर अपूर्ण कॉलममधील माहिती पूर्ण करुन लेखापरीक्षणास सादर केली नसल्याने दावा रजिस्टर अपूर्ण असल्याचे स्पष्ट होते.

**3) 2013-14** मध्ये निकाल लागलेल्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका अस्तित्वात येण्यापुर्वी तत्कालीन मिरज नगरपरिषदेकडील 1997-98 या आर्थिक वर्षातील जकात वसुलीचा ठेका घेण्यासाठी मे. तिरुपती एंटरप्रायझेस, सांगली यांनी निविदा भरलेली होती. त्यावेळी त्यांनी मुदतीत बँक गॅरंटी न दिलेने त्यांनी भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येऊन त्यांना ठेका नाकारण्यात आला होता व दुस-या क्रमांकाचे निविदाधारक मे. श्री. गणेश एंटरप्रायझेस, मिरज यांना ठेका दिलेला होता. त्यामुळे मे. तिरुपती एंटरप्रायझेस सांगली यांनी जप्त केलेली बयाणा रक्कम व्याजासह परत मिळणेबाबत सांगली येथील मे. सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात महानगरपालिकेविरुध्द स्पे.दि.मु.नं 44/2001 हा दावा दाखल केला होता. सदर दाव्याचे काम महानगरपालिकेच्या वतीने ॲड पी.ए. सावंत यांनी काम पाहिले होते. प्रस्तुत दाव्याचा निकाल दि. 29/01/2014 रोजी महानगरपालिकेविरुध्द लागला आहे.

DRAFT

सांगली येथील न्यायालयातील स्पे.दि.मु.नं 44/2001 या दाव्याच्या झालेल्या निकाला विरुध्द मे. हायकोर्ट मुंबई येथे अपिल दाखल करणेकामी ॲड जी.एच. केळुस्कर उच्च न्यायालय मुंबई यांची नेमणुक केली आहे. यासाठी 59050/- इतका खर्च झालेला आहे. सदर खर्चास मा. उपआयुक्त यांनी दि. 01/03/2014 रोजी मंजुरी दिली आहे.

ॲड श्री. जी.एच. केळुस्कर यांना खालीलप्रमाणे प्रदान केले आहे.

| अ.क्र. | मुळ रक्कम रुपये | आयकर कपात रुपये | प्र.निव्वळ प्रदान रु. | प्रमाणक क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 59050/- | 2634/- | 56416/- | 6864/- दि. 25/03/2014 |

DRAFT

याबाबत खालील प्रमाणे अनियमितता आहे.

महासभा ठराव क्र. 34 दि. 10/10/2008 नुसार महानगरपालिकेने न्यायालयीन कामकाजासाठी वकीलांचे पॅनल नियुक्त केले आहे. या पॅनलमध्ये ॲड जी.एच. केळुस्कर यांचा समावेश नसतांनाही त्यांना दाव्यासंबंधी अपिल करण्यास सांगितले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 481 (1) (ज) प्रमाणे कायदा विषयक सल्ला व सहाय्य मिळविण्यासाठी वकीलांची नेमणुक आयुक्तांनी महापालिकेची मान्यता घेवुन करणे आवश्यक आहे. तसेच महासभा क्र.6 ठराव क्र.59 दि.19/11/2008 नुसार वकील फी बाबत कमाल मर्यादा जास्तीत जास्त रु.25000/- निश्चित करणेसाठी आयुक्त यांना प्राधिकृत केले असुन सदरची फी आदा करणेकामी सक्षम अखत्यारीची मान्यता घेणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. त्या प्रमाणे वकीलास द्यावयाचे फी बाबत महासभेची मान्यता घेणे आवश्यक असताना आयुक्तांनी महासभेची मान्यता न घेताच वकीलांची नेमणुक केली आहे व त्यांना रु.59050/- फी ची रक्कम अदा केली आहे. सदर आक्षेपाचे अनुपालन विधी विभागाने दि.05/01/2016 रोजी दिले असुन अनुपालनामध्ये स्थायी समिती सभा क्र.15,ठराव क्र.182 दि.24/12/2014 नुसार श्री.केळुस्कर यांचा समावेश मुंबई हायकोर्ट पॅनेलवर महानगरपालिकेच्या वतीने कोर्ट केसिस चालविण्यासाठी केला असलेने त्यांना रु.59050/- फी ची रक्कम अदा केली असल्याचे नमुद आहे. परंतु सदर ठरावानुसार आयुक्त यांना विशेष व अतिमहत्वाच्या दाव्यातील वकीलांची फी रक्कम रु.25000/- आदा करण्यास प्राधिकृत केल्याचे नमुद असल्याने सदर फीची रक्कम आयुक्त यांना आदा करताना महासभेची मान्यता घेणे आवश्यक होते.

**4)** दावा नोंदवही क्र. 19 पान नं. 57 च्या अनुषंगाने नस्तीची तपासणी केली असता, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिके विरुध्द मे. कोमर्ला फिडस व फुडस प्रा.लि. यांनी वाढीव घरपट्टी संदर्भात सांगली येथील दिवाणी न्यायालयात म्यु. अपिल क्र. 13/2009 चा दावा दाखल केला होता. वेळोवेळी सुनावणी होऊन मा. न्यायालयाने अपिलकर्ता यांचे अपिल मंजुर केले व तसा निकाल दिनांक 23/11/2012 रोजी दिला आहे. सदर निकालावर मनपा पॅनलवरील वकीलांनी दि.

02/02/2013 पर्यंत अपिल करणे आवश्यक असून त्यासाठी रु. 2400/- रु खर्च येणार असल्याचे नस्तीमध्ये नमूद आहे. परंतु या नंतर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. महानगरपालिकेने वेळेत अपिल सादर केले नसल्याने विलंब माफीचा अर्ज न्यायालयामध्ये सादर करणेसाठी ॲड प्रशांत नरवाडकर (महापालिका पॅनलवरील वकील) यांनी अपिल कामातील कोर्ट फी रु.2400/-, विलंबमाफीचा अर्ज व प्रोसेस भत्ता रु.1000/-,टायपिंग झेरॉक्स व इतर खर्च रु.1000/- असे एकूण रु. 4400/- ची मागणी सादर केली असुन त्यांना प्रमाणक क्र. 7135 दि. 29/03/2014 रोजी रु. 4400/- अदा केले आहे. वकीलांना कोर्टामध्ये भरणा करणेसाठी आदा केलेली विलंब माफीचा अर्ज व प्रोसेस भत्तापोटीची रक्कम रु.1000/- कोर्टामध्ये भरणा केलेबाबतची चलने लेखापरीक्षणास सादर केलेली नाहीत. महापालिकेने दि. 02/02/2013 रोजी विहित मुदतीत अपिल न्यायालयात सादर केले नसल्याने रु.2400/- ऐवजी रु.4400/- खर्च करावा लागला आहे. या बाबतचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.41, दि.30/12/2015 अन्वये मागणी करुनही विधी विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

**आक्षेपाधिन रक्कम रु. 59050/-**

DATPKCM7101 (Ref No : 41)

## *49 बांधकाम परवानगी देताना वसुल केलेल्या उपकर रक्कमेचा भरणा कामगार कल्याण मंडळाकडे केला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष :नगररचना मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 92700000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 927000.00/-

***शासन निर्णय बी.सी.ए 009/ प्र.क्र.108 /काम-7अ दि.17/06/2010 सोबतच्या मार्गदर्शक तत्वे मधील क्र. 5 नुसार बांधकाम मंजुरीसाठी प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जासोबत कामगार कल्याण मंडळाच्या नावे उपकरासंबंधीच्या रेखांकित धनादेश सादर करणे आवश्यक आहे. परंतु नगररचना विभाग व प्रभाग समितीने बांधकामधारक व्यक्तीकडून उपकराची रक्कम धनादेशाने जमा करुन न घेता रोखीने घेतली आहे. तसेच ती कामगार कल्याण मंडळाच्या खातेवर भरणा न करता महानगरपालिकेच्या जनरल फंडामध्ये जमा केली आहे. अशा प्रकारे रोखीने जमा करण्यात आलेल्या 2011-12 पासुनच्या उपकराच्या रक्कमा रु. 9 कोटी 27 लक्ष मनपाच्या बँक खात्यामध्ये पडुन आहेत.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाकडुन सांगली व मिरज महानगरपालिकेच्या हद्दीतील बांधकामांना परवानगी देताना शासन निर्णय बी.सी.ए/ 009/ प्र.क्र.108



DRAFT

/काम-7अ दि.17/06/2010 अन्वये बांधकामाच्या अंदाजीत मुल्याच्या 1% कामगार कल्याण उपकरा पोटीची रक्कम रोखीने व धनादेशाव्दारे वसुल केली जात असल्याचे उपकराच्या नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता आढळुन आले आहे.

2013-14 मध्ये नगररचनेच्या सांगली, मिरज व प्रभाग समिती क्र. 1 ते 4 कडून खालील प्रमाणे उपकर वसुल केला असल्याची माहिती लेखापरीक्षणास सादर केली आहे.

| अ.क्र. | विभाग | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | सांगली | 1,25,63,283/- |
| 2 | मिरज | 1,22,37,863/- |
| 3 | प्रभाग समिती क्र. 1 | 3,47,112/- |
| 4 | प्रभाग समिती क्र. 2 | 5,77,470/- |
| 5 | प्रभाग समिती क्र. 3 | 7,39,952/- |
| | एकुण | 26465680/- |

वरील वसुल झालेल्या उपकराच्या रक्कमेपैकी 2 ऑगस्ट 2013 पर्यंतची रक्कम नगररचना विभागाने मनपाच्या लेखा शाखेतील जनरल फंडामध्ये जमा केली आहे. त्यानंतर लेखा विभागाने सदर उपकर भरणा करणेसाठी युनियन बँक ऑफ इंडियाच्या सांगली मेन या शाखेमध्ये एक नवीन बँक खाते उघडुन सदर बँक खाते क्रमांक 424202010507460 मध्ये रक्कम परस्पर जमा करण्यास नगर रचना सांगली व मिरज विभाग व प्रभाग समिती क्र. 1 ते 3 यांना सुचना दिल्या आहेत. सदर सुचनेप्रमाणे दिनांक 02/08/2013 पासुन उपकराची रक्कम सदर बँक खाते मध्ये जमा करण्यात आली आहे. दि. 02/08/2013 ते 31/03/2014 पर्यंत या खात्यामध्ये जमा झालेल्या रकमेमधुन बँकेने कॅश क्रेडिट चार्जेस रु.16917.05 कपात करुन घेतल्याने दि. 31/03/2014 अखेर उपकराच्या खात्यामध्ये रक्कम रु.1,04,27,647.28 शिल्लक असल्याचे आढळुन आले आहे. सदर लेखापरीक्षणा मध्ये अढळुन आलेल्या उणिवाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.94 दि.12/04/2016 रोजी निर्गमित केला असुन नगररचना विभागाने त्याचे अनुपालन दि.13/05/2016 रोजी दिले आहे. **सदर अनुपालनाचे अवलोकन केले असता लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.**

1) शासन निर्णय बी.सी.ए/009/प्र.क्र.108/काम-7अ दि.17/06/2010 मधील 3(4) नुसार इमारत व इतर बांधकामास मंजुरी देणारे व त्या संस्थेतील उपकर जमा करणा-या स्थानिक स्वराज्य संस्था यांनी त्यांचे संदर्भातील विवरणपत्रे व वार्षिक अहवाल परिशिष्ठ 4 प्रमाणे कामगार कल्याण मंडळास प्रत्येक पुढील आर्थिक वर्षाच्या 15 मे पुर्वी सादर करणे आवश्यक आहे. हे विवरणपत्र प्राप्त झाल्यापासुन 30 दिवसांच्या आत मंडळ उपकराचा रकमेच्या 1% रक्कम महानगरपालिकेस परतावा करणार आहे. परंतु महानगरपालिकेने उपकराची रक्कम रु. 9 कोटी 27 लक्ष मंडळाकडे भरणा केली नसल्याने 1 टक्के प्रमाणे रु.9,27,000/- चा परतावा महानगरपालिकेस मिळालेला नाही.

2) शासन निर्णय दि. 17/06/2010 सोबतच्या मार्गदर्शक तत्वे मधील क्र. 5 नुसार बांधकाम मंजुरीसाठी प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जासोबत कामगार कल्याण मंडळाच्या नावे उपकरासंबंधीचा रेखांकित धनादेश सादर करणे आवश्यक आहे. परंतु नगररचना विभाग व प्रभाग समितीने बांधकामधारक व्यक्तीकडून उपकराची रक्कम धनादेशाने जमा करुन न घेता रोखीने घेतली आहे.

DRAFT

तसेच ती कामगार कल्याण मंडळाच्या खात्यावर भरणा न करता महानगरपालिकेच्या जनरल फंडामध्ये जमा केली आहे. अशा प्रकारे रोखीने जमा करण्यात आलेल्या 2011-12 पासुनच्या उपकराच्या रक्कमे पैकी नगर रचना विभाग सांगली यांचेकडील जुलै 2011 ते फेब्रु. 2013 पर्यंतची रक्कम रु. 29713223/- एवढी रक्कम माहे मार्च 2013 मध्ये मंडळाकडे जमा करण्यात आली आहे. परंतु वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये जमा झालेली रक्कम रु.1,25,63,283/- लेखापरीक्षण कालावधी अखेर (मार्च 2016) मंडळास भरणा केलेली नाही.

3)मिरज विभागाने मार्च 2014 मध्ये कामगार कल्याण मंडळाकडे भरणा करणेसाठी रक्कम रु. 3,05,62,015/- चे देयक तयार करुन लेखा शाखेकडे सादर केली होती. परंतु सदरची देयके पारीत न झाल्याने रक्कम मंडळाकडे भरणा केलेली नाही. मिरज विभागाने कामगार कल्याण उपकरापोटी जमा झालेल्या रक्कमेची नोंद त्यांचेकडील रोज किर्दीमध्ये करणे आवश्यक असता त्यांनी रोजकीर्द ठेवली नसल्याने सदर भरणा रक्कम कोणत्या कालावधीमध्ये जमा करण्यात आली होती याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही. तसेच मार्च 2016 अखेर या रक्कमेचा भरणा कामगार कल्याण मंडळाकडे केलेला नाही.

4) उपकर जमेची स्वतंत्र रोजकीर्द नगर रचना विभाग सांगली, मिरज व प्रभाग समिती यांचेकडे ठेवली नसल्याने आतापर्यंत जमा झालेली रक्कम त्यातुन मंडळाकडे भरणा केलेली रक्कम शिल्लक रक्कम याचा ताळमेळ लेखा परीक्षणास घेता आलेला नाही.

5) दि. 02/08/2013 पासुन नव्याने उघडण्यात आलेल्या उपकराच्या बँक खाते क्र. 7460 मध्ये लेखा परीक्षण कालावधी( मार्च 2016 ) पर्यंत 9 कोटी 27 लक्ष एवढी रक्कम शिल्लक असल्याचे आढळुन आले. परंतु सदर उपकराची रक्कम मंडळाकडे भरणा न करता बँक खात्यामध्येच पडुन असल्याचे आढळुन आले आहे. सदरची रक्कम 30 दिवसाचे आत मंडळाकडे भरणा करणे आवश्यक असता ती भरण्यात आली नाही.

आक्षेपाधिन रक्कम :- रु.9270000/-

वसुलपात्र रक्कम :- कामगार कल्याण उपकराची 1 टक्के परताव्याची रक्कम रु. 927000/-

DATRNDM7201 (Ref No : 94)

DRAFT

## *51 जनरल फंड निधीच्या रोकडवही व बँकपासबुक रक्कमेमधील तफावतीचा ताळमेळ घेतला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 77916494.00/-

***राष्ट्रीय लेखासंहिता नियमावली 2005 मधील परिच्छेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपध्दतीनुसार रोखवही, बँक पासबुक व बँक विवरणपत्रानुसार दरमहा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तथापि लेखा विभागाने ताळमेळ***

***घेतलेला नसल्याने जनरल फंड रोकडवही व बँक पासबुक रक्कमेमध्ये रु. 7,79,16,494.30/- इतकी तफावत आढळुन येत आहे. अंत्यविधी निधी रु. 800000/- व बँक गॅरंटी रु. 12,51000/- बाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2013-2014 च्या लेखा परीक्षण मध्ये मनपाच्या लेखा विभागाकडील जनरल फंड (मनपा निधी) च्या रोकड नोंदवही (नमुना क्र. 11) मधील मार्च 2014 अखेर बँक ताळमेळ नोंदविलेला आहे.
दि. 31/03/2014 रोजी रोकडवही नुसार रु. 21,65,05,752.45/- शिल्लक होती त्यामध्ये युनियन बँक खाते क्र. 20457192 शेतकरी बँक, महाराष्ट्र बँक विकास निधी, सिकींग फंड युकोबँक व युनियन बँक यांच्या या बँकातील शिल्लकचा समावेश आहे. रोकडवही नुसार शिल्लक व बँक खाते पासबुकनुसारची शिल्लक यांचा ताळमेळ रोकड नोंदवहीमध्ये नोंदविला आहे. त्याची तपासणी करुन या बाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.100, दि.21/04/2016 रोजी निर्गमित केला असुन लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि.13/05/2016 रोजी सादर केले आहे. सदर अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन विचारात घेवुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) रोकडवहीमध्ये शेतकरी बँकेतील शिल्लक रु. 93,42,218.91 दाखविली आहे. शेतकरी बँकेच्या विवरण पत्रानुसार बँक अवसायनात गेली आहे. बँकेच्या पत्रानुसार शिल्लक रु. 24369999.23 आहे. त्यामुळे फरक रकमेचा ताळमेळ घेणे आवश्यक असताना तो घेण्यात आला नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये बँक अवसायनात निघाल्याने सदर रक्कम मिळाली नसल्याने ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे नमुद आहे. परंतु रक्कम परत मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेले नाहीत.

2) रोकडवही नुसार युनियन बँक खाते क्र. 7192 मधील शिल्लक व बँक पासबुक नुसार शिल्लक यांच्या मधील तफावत रक्कम रु. 7,79,16,494.30/- चे ताळमेळ मध्ये खालील प्रमाणे रक्कमेचा मेळ घेतल्याचे नमुद आहे.

i) खाते क्र. 2045 चे धनादेश खाते क्रमांक 7192 मधील धनादेशाने खर्ची पडलेली रक्कम रु. 757445/- व बँक चार्जेस व धनादेश रिटर्न रक्कम रु. 17,61,768.21 अशा एकुण रक्कम रु. 25,19,113.21/- बाबत योग्य ती कार्यवाही करुन रकमेचे समायोजन केलेले नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये बँक चार्जेस व चेक रिटर्न रक्कम रु.1761768.21/- या रक्कमेचे समायोजन चालु असल्याचे नमुद आहे.

ii)तफावत रक्कम पैकी रक्कम रु. 4,49,583.09 चा ताळमेळ घेतला नाही. ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

iii) अंत्यविधी निधी रु. 800000/- व बँक गॅरंटी रु. 12,51000/- बाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखवून खात्री पटविणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

4. सिंकिंग फंड विकास निधी व युको बँक गुंतवणुक यांच्या मुदत ठेवीची मुदत खालील प्रमाणे संपलेली असतानाही ठेवीची मुद्दल व व्याजाची रक्कम रोकडवहीमध्ये जमेस घेवून सदर रक्कमांची पुनर्गुंतवणुक केलेली नाही.

DRAFT

| अ.क्र | निधीचे नांव | बँकेचे नांव | पावती क्रमांक | रक्कम रु. | मुदत पूर्ण दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सिंकीग फंड | युनियन बँक ऑफ इंडिया, मिरज | 547494/- | 1,00,00,000/- | 06/01/13 |
| 2 | युको बँक | युको बँक, सांगली | 320558/- व 320552/- | 1,60,00,000/- | 30/10/13 |

या बाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.100, दि.21/04/2016 रोजी निर्गमित केला असुन लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि.13/05/2016 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरामध्ये ताळमेळ घेण्याची कार्यवाही चालु असल्याचे नमुद आहे. परंतु ताळमेळ जुळवुन लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेला नाही.

DATRNDM7201 (Ref No : 100)

## *52 भविष्य निर्वाह निधी खाते मधील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 64098506.00/-

***भविष्य निर्वाह निधी खातेचे दैनिक किर्दीनुसार गुंतवणुकीसह शिल्लक रु. 14,29,02,770.80/- असुन संगणकीय बृहतपत्रानुसारची शिल्लक रु.17,32,00,314/- आहे. म्हणजे दैनिक किर्दी नुसारची गुंतवणुकीसह प्रत्यक्ष शिल्लक रु. 3,02,97,543/- ने कमी असल्याने भविष्य निर्वाह निधी खाते स्वयंपुर्ण नसल्याचे स्पष्ट होते. सदर तफावत वसंतदादा सहकारी बँकेमध्ये भविष्य निर्वाह निधीची गुंतविलेली रक्कम रु.64098506/- बँक अवसायनात निघाल्याने मुद्दल व त्यावरील व्याजाची रक्कम मिळाली नसल्याने पडली आहे. सदर रक्कम मिळविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड मनपा कडील कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खातेची आर्थिक वर्ष 2013-14 करीता तपासणी केली असता, भविष्य निर्वाह निधी रोकडवही महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.134 (6) नुसार नमुना क्र.100 मध्ये ठेवण्यात आली असुन सदर



DRAFT

रोकडवही ,बृहतपत्रक यांची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1)भविष्य निर्वाह निधी खातेचे दैनिक किर्दी नुसार गुंतवणुकीसह शिल्लक रु. 14,29,02,770.80/- असुन संगणकीय बृहतपत्रानुसारची शिल्लक रु.17,32,00,314/- आहे. म्हणजे दैनिक किर्दी नुसारची गुंतवणुकीसह प्रत्यक्ष शिल्लक रु. 3,02,97,543/- ने कमी असल्याने भविष्य निर्वाह निधी खाते स्वयंपुर्ण नसल्याचे स्पष्ट होते. या बाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.101, दि. 30/04/2016 रोजी दिला असुन लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि.13/05/2016 रोजी सादर केले आहे. अनुपालनामध्ये वसंतदादा बँकेमध्ये भविष्य निर्वाह निधीची गुंतवणुक केलेली रक्कम रु.6409850625/- वर बँक अवसायनात निघाल्याने व्याज न मिळाल्याने सदर फरक पडल्याचे नमुद आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 92 (2) नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्त यांना महानगरपालिकेच्या वतीने सर्व ठेवी व गुंतवणुका करणेचा अधिकार आहे. तसेच कलम 92(3) नुसार अशा कोणत्याही ठेवीमुळे किंवा गुंतवणुकीमुळे काही नुकसान झाल्यास ते नगरपालिका निधीच्या खाती खर्च टाकणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने बँक अवसायनात निघालेली रक्कम मनपा निधीमधुन भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये वर्ग केली नसल्याने फरकाची रक्कम वाढत जाणार असल्याचे स्पष्ट होते.

2)रोकडवहीमध्ये दाखविलेल्या शिल्लक तपशिल मध्ये शेतकरी बँक गुंतवणुक रु. 6,40,98,506/- चा समावेश असुन सदरची बँक अवसायनात गेल्याने सदरची रक्कम गुंतुन पडलेली आहे. सदर रक्कम मिळवण्यासाठी काय प्रयत्न करण्यात आले तसेच सद्यस्थिती काय आहे याची माहिती लेखा परीक्षणास लेखाविभागाने अनुपालनाव्दारे दिली आहे. त्या नुसार गुंतवणुक रक्कम वसुल करण्यासाठी सांगली येथील मे.सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजनसो यांच्या कोर्टात स्पे.दि.मु.नं. 275/2011 दि.20/05/2011 ने दाखल केला असल्याचे नमुद आहे. सदर केसचा निकाल लागला नसल्याने भनिनिची रक्कम वसुल झाली नसल्याचे स्पष्ट होते.

3)2013-14 चे बृहतपत्रक संगणकीय प्रणालीत महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.134 (3) नुसार नमुना क्र.99 मध्ये ठेवण्यात आले असुन त्याच्या प्रिंटची तपासणी केली असता रोकडवही व बृहतपत्रक यांचेमध्ये खालील प्रमाणे तफावत आढळुन आल्या आहेत.

| अ.क्र. | भविष्य निर्वाह निधी तपशिल | रोकडवही नुसार रक्कम रुपये | बृहतपत्रानुसार रक्कम रुपये | तफावत रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | मार्च 2014 ची जमा | 2388871/- | 2397196/- | 8225/- |
| 2 | मार्च 2014 खर्च | 2400000/- | 2400000/- | निरंक |
| 3 | 13-14 वार्षिक जमा | 28164907/- | 28244073/- | 79166/- |
| 4 | 13-14 वार्षिक खर्च | 16576000/- | 16233000/- | 343000/- |
| 5 | 31/03/2014 शिल्लक अखेर | 142902770.80 | 173200314/- | 30297543/- |

सदर तफावतीचा ताळमेळ घेवुन बृहतपत्रातील नोंदी अद्यावत केल्या नाहीत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये फरक तपासुन तफावत दुर करण्याची दक्षता घेत असलेबाबत कळविले आहे.

आक्षेपाधिन रक्कम :- बँक अवसायनात निघाल्याने वसंतदादा सहकारी बँकेमध्ये गुंतुन पडलेली



DRAFT

रक्कम रु. 64098506/-

DATRNDM7201 (Ref No : 101)

## *54 घन कचरा व्यवस्थापनांतर्गत साहित्य खरेदी मधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 10**

*लेखा शीर्ष :आरोग्य केंद्रशासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5605000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 295000.00/-

***उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस-1088/ 2512 / उद्योग-6, दि. 02/01/ 1992 मधील परिच्छेद 5 नुसार महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळा मार्फत थेट खरेदी करावयाच्या 15 वस्तूंची यादी परिशिष्ठ "3" मध्ये दिलेली आहे. महानगरपालिकेने खरेदी केलेल्या घंटागाड्या व कंटेनर या साहित्यांचा समावेश या यादीमध्ये नसल्याने महानगरपालिकेने सदरचे साहित्य रितसर निविदा मागवुन खरेदी करणे आवश्यक असता महामंडळाकडून विनानिविदा साहित्य खरेदी केल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही. करारपत्र लघुउद्योजकाशी करणे आवश्यक असताना ते MSSIDC, सांगली यांचेशी केले आहे. निविदाधारकाकडुन कामाची अनामत रक्कम भरुन घेतलेली नाही.***

DRAFT

सांगली, मिरज कुपवाड महानगरपालिका आरोग्य विभागाकडे 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये घनकचरा व्यवस्थापनांतर्गत 13 वा वित्त आयोगाच्या मंजूर निधीमधुन महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळाकडुन 50 नग कंटेनर व 85 नग घंटागाड्या विना निविदा थेट पध्दतीने खरेदी केल्या आहेत. सदर खरेदी खलील प्रमाणकाने सदर साहित्य खरेदी करण्यात आली आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 2 | 04/05/2013 | 59,00,000/- | 50 नग कंटेनर, 85 नग घंटा गाड्या |

वरील कामाची नस्ती, देयक, प्रमाणके यांची तपासणी केली असुन त्याबाबत लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आरोग्य विभागाने 50 नग कंटेनर व 85 नग घंटागाड्या साहित्य पुरवठ्याचा करारनामा महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाशी रु. 1000/- च्या मुद्रांकावर दि.28/03/2013 रोजी केला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या अनुच्छेद 63 प्रमाणे कार्य कंत्राट करताना करारनामा रु. 10 लक्ष पर्यंतच्या रकमेसाठी रु. 100/- च्या मुद्रांकावर व त्यापुढील प्रत्येक 1 लाख रकमेसाठी रु. 100/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर करणे आवश्यक आहे. या कामा वरील साहित्याचा खर्च रु. 59 लक्ष

असल्याने यासाठीचा करारनामा रु. 5000/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर करणे आवश्यक होते. परंतु रु. 1000/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर केल्याने शासनाचे रु. 4000/- मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले असल्याने सदर रक्कम वसुल करुन शासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

2) या कामाचा करारनामा महानगरपालिकेने MSSIDC, सांगली यांचेबरोबर केला आहे. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक एसपीओ 1085/ 39024 (2318)/ (2)/उद्योग - 6, दि.26 नोव्हे.1985 नुसार महामंडळाने ज्या लघुउद्योगाच्या वतीने निविदा भरल्या असतील त्या लघु उद्योजकाबरोबर पुरेशा रोख रक्कमेची सिक्युरीटी अथवा बँक गॅरेंटी घेवुन त्यांचेबरोबर करारपत्र करुन घेण्याचे आहे. परंतु महानगरपालिकेने लघुउद्योजका बरोबर करारपत्र करुन न घेता MSSIDC बरोबर करारपत्र करुन घेतले आहे. त्यामुळे कोणत्या लघु उद्योजकाकडुन साहीत्य खरेदी केले आहे ते समजुन येत नाही. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-1088/2512/उद्योग-6 दि. 02 जानेवारी 1992 मधील परिशिष्ठ 12 नुसार रु.50000/- पेक्षा जास्त किमतीच्या साहित्याची खरेदी करावयाची असेल तर खरेदी किमतीच्या 3 टक्के अनामत रक्कम पुरवठाधारकाकडुन वसुल करणे आवश्यक आहे. पुरवठादाराकडून रु.590000/-किमतीचे साहित्य खरेदी करणेत आले आहे. परंतु 3 टक्केप्रमाणे रक्कम रु.177000/- अनामत म्हणुन ठेकेदाराकडून वसुल करण्यात आलेली नाही.

3)वरील साहित्य पुरवठ्या बाबतची रक्कम महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांना प्रदान करताना कुठल्याही रकमेची कपात न करता संपूर्ण रक्कम प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रदानातून 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम रु.118000/- कपात करणे आवश्यक असता तो कपात केला नाही.

4)सदर साहित्य खरेदी नस्तीमध्ये महासभा ठराव क्र. 335 दि. 19/01/2013 व आयुक्त यांचे कडील आदेश क्र. मनपा/आरोवि /6/1/855/2012-13 दि. 28/03/2013 अन्वये शासनाचे आंगिकृत संस्था महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (MSSIDC) यांचे कडून आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये त्यांनी केलेल्या दर करार प्रमाणे खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे व त्याप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला आहे. आरोग्य विभागाने खरेदी केलेल्या साहित्याची किंमत रक्कम रु. 50000/- पेक्षा जास्त असल्याने शासन निर्णय क्र. भाखस-1093/2635/उद्योग- 6 दि. 16 जुलै 1993 नुसार रु. 50000/- च्या वरील रकमेची खरेदी करताना निविदा मागवून साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु सदर साहित्याची खरेदी किंमत रु. 59 लक्ष असताना सुध्दा निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (MSSIDC) यांचे कडून थेट खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच खरेदी करताना महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (MSSIDC) यांचेडील दर बाजारभावाशी सुसंगत असलेची खात्री केलेली नाही.

5)प्रशासनाने स्थायी समितीला सादर करण्यात आलेल्या विषयपत्रामध्ये महाराष्ट्र शासन मान्य दरकरार अन्वये साहित्य खरेदी करणेबाबत मंजुरी प्रस्तावित करण्यात आली आहे. परंतु सदर

DRAFT

साहित्याची महाराष्ट्र शासनाबरोबर केलेल्या दर कराराची प्रत नस्तीमध्ये आढळुन आलेली नाही. शासन व इतर संस्थाकडून उत्पादित वस्तुंचे दर ठरविण्यासंबंधीची कार्यपध्दती उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-1088/2512/उद्योग-6 दि. 02 जानेवारी 1992 मध्ये दिलेली आहे. त्यामधील परिच्छेद 7 नुसार दर ठरविताना बाजारभाव तसेच उत्पादन खर्च याचा सारासार विचार करण्यात यावा असे नमुद आहे. महानगरपालिकेने नस्तीमध्ये कंटेनरचे ड्रॉईंग दिले आहे. त्यानुसार 4.5 घमी क्षमतेचे व 3 मि.मि.जाडीचा पत्रा वापरणे आवश्यक असलेचे नमुद आहे. त्यानुसार महानगरपालिकेने बाजारभाव व उत्पादन खर्च यांचा सारासार विचार करुन वापरण्यात येणारे साहित्य, साहित्याची बाजारभावाप्रमाणे येणारी किंमत, कामास लागणारी मजुरी, ठेकेदाराचा नफा या सर्वांचे दरपृथ्थकरण करुन कंटेनरचा दर ठरविणे आवश्यक होते. परंतु प्रती कंटेनरसाठी येणारा खर्च न ठरविताच महाराष्ट्र लघुउद्योजक महामंडळाकडुन साहित्य खरेदी केली आहे. घंटागाडीचे विनिर्देश (Specification) न ठरविताच घंटागाडीची खरेदी केली आहे.

06) शासन निर्णय दि. 02/01/1992 मधील परिच्छेद 5 नुसार महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळा मार्फत खरेदी करावयाच्या 15 वस्तूंची यादी परिशिष्ठ “3” मध्ये दिलेली आहे. परंतु महानगरपालिकेने खरेदी केलेल्या उपरोक्त घंटागाड्या व कंटेनर या साहित्यांचा समावेश सदर यादीमध्ये नसताना महामंडळाकडून विनानिविदा थेट साहित्य खरेदी केल्याचे आढळुन आले आहे.

07) उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस-1088/ 2512 / उद्योग-6 दि. 02 जानेवारी 1992 मधील परिशिष्ठ क्र.10 मध्ये शासकीय विभाग, महामंडळे, शासकीय, निमशासकीय संस्था यांनी वस्तु खरेदी करताना लघु उद्योगांना द्यावयाच्या खरेदी व किमतीमध्ये प्राधान्याबाबत अंगीकारावयाची तत्वे दिली आहेत. त्यामधील तत्व क्र.4 नुसार वस्तु खरेदी ही भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या मालासाठी आहे किंवा नाही हे निविदेत स्पष्ट करावयाचे आहे. भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तुसंबंधीची निविदा असेल तर इतर निविदांचा विचार करण्यात येवु नये असे नमुद केले आहे. सदर घेतलेले साहित्य भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या मालाचे असलेबाबतचा कोणताही पुरावा नस्तीमध्ये जोडलेला नाही. या परिशिष्ठामधील तत्व क्र.4 नुसार प्रत्यक्ष निविदा प्राप्त झाल्यानंतर ज्या ज्या वेळी मध्यम किंवा मोठे उद्योग अथवा व्यापारी यांचे बरोबर लघुउद्योजकाने ही एखाद्या निविदेमध्ये भाग घेतला असेल तर काय कार्यवाही करावी या बाबत 4 (ब) मध्ये सांगितले आहे, त्यानुसार ज्या वेळी प्रमाणित वस्तुंची खरेदी अपेक्षित नसेल आणि प्रमाणित वस्तु निर्माण करणा-या उद्योगाकडुन निविदा प्राप्त झाल्या नसतील तर लघु उद्योगासाठी मध्यम व मोठे उद्योग आणि व्यापारी यांचे तुलनेने 10 टक्के किंमत प्राधान्य देणेचे आहे. या नियमानुसार महानगरपालिकेने प्रथम निविदा मागवुन साहित्याची किंमत निश्चित करणे आवश्यक असता तसे न करता महामंडळाकडून साहित्याची विना निविदा खरेदी केली आहे. निविदा मागवुन साहित्याची किंमत निश्चित केली नसल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

08)सदर साहित्याचे पुरवठा आदेशामध्ये किंवा पुरवठादाराचे दरपत्रक, चलन, बिजक यामध्ये

DRAFT

साहित्याच्या बाबतचा सविस्तर तपशिल स्पेसिफिकेशन यांचा उल्लेख नसल्याने पुरवठा करण्यात आलेले साहित्य आवश्यकतेनुसार योग्य प्रकारचे असल्याचे व त्याची किंमत वाजवी असल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

09)उपरोक्त शासन निर्णय दि. 02/01/1992 मधील परिशिष्ठ 8 परिच्छेद 8.4 मध्ये शासन परिपत्रक दि. 14 ऑक्टोंबर 1986 अन्वये भारतीय मानक संस्थेने चिन्हांकित केलेल्या वस्तुची खरेदी करण्याचे आदेश दिलेले आहेत. चिन्हांकित नसलेल्या वस्तुंची खरेदी लघु उद्योजकांकडून करण्यापूर्वी संबंधीत विभागाने मालाच्या दर्जा विषयी तपासणी संचालक स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हिस इन्स्टीट्युट साकीनाका, मुंबई यांचेकडून करुन घेवून साहित्य योग्य स्पेसिफीकेशन प्रमाणे असल्याबाबतचा तांत्रीक गुणवत्तेचा प्रयोगशाळा अहवाल घेवून रक्कम अदा करणे आवश्यक होते. परंतु साहित्य योग्य विनिर्देशाचे असलेबाबतचा तांत्रिक अहवाल न घेताच पुरवठा केलेल्या साहित्याची रक्कम ठेकेदारास आदा केली आहे.

10) वित्तिय वर्ष 2012-13 मध्ये अशा प्रकारे कंटेनर, ढकलगाडी इत्यादीत् रु. 50,00,000/- चे साहित्य विनानिविदा खरेदी केल्या बाबतचा प्रारुप आक्षेप लेखापरीक्षण अहवालामध्ये नोंदविला आहे. परंतु महानगरपालिकेने 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये पुन्हा विनानिविदा साहित्य खरेदी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडुन केली आहे.

**वसुलपात्र रक्कम :-** सुरक्षा अनामत रक्कम रु.177000/- **+** आयकर रक्कम रु.118000/- **+** मुद्रांक शुल्क कमी भरणा रक्कम रु.4000/- = रु.295000/-

आक्षेपाधिन रक्कम रु.5605000/-

DATRNDM7201 (Ref No : 109)

## *55 घन कचरा व्यवस्थापनांतर्गत कॉम्पॅक्टर खरेदी मधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 10**

*लेखा शीर्ष :आरोग्य केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2356000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 444900.00/-

***महानगरपालिकेस 12 व्या वित्त आयोगाचे रक्कम रु.3,84,86,160/- चे अनुदान ऑगष्ट 2009 ते मे 2010 या कालावधीमध्ये प्राप्त झाले आहे. परंतु महानगरपालिकेने योग्य नियोजन करुन कंटेनर, घंटागाडी व कॉम्पॅक्टर हे घनकचरा व्यवस्थापनाचे साहित्य एकाच वेळी खरेदी न करता टप्प्याटप्प्याने साहित्य खरेदी केल्याने सन 2009 ते मार्च 2014 अखेर निधी अखर्चित राहीला आहे. साहित्याची खरेदी निविदा न काढता थेट पध्दतीने MSSIDC कडून करण्यात आलेने स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही. निविदाधारकाकडून अनामत रु.***

***84000/- व आयकर रु.56000/- भरुन घेण्यात आलेली नाही. साहित्याचा पुरवठा विलंबाने केल्याने विलंब दंड रु.304000/- ची वसुली देयकामधुन करण्यात आलेली नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका आरोग्य विभागाकडे 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये घनकचरा व्यवस्थापनांतर्गत 12 वा वित्त आयोगाचे निधीमधुन महाराष्ट्र लघुउद्योजक महामंडळाकडुन विनानिविदा थेट पध्दतीने कचरा उठावासाठी कॉम्पॅक्टर खरेदी केला आहे. सदर खरेदीचे देयक प्रमाणक क्र. 1 दि.04/07/2013 रक्कम रु.2800000/- ने **MSSIDC**,सांगली यांना आदा केले आहे. साहित्य खरेदीची नस्ती व प्रमाणके यांचे लेखा परीक्षण करुन लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1)कॉम्पॅक्टर पुरवठ्याचा करारनामा रु. 1000/- च्या मुद्रांकावर करण्यात आला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या अनुच्छेद 63 प्रमाणे कार्य कंत्राट करताना करारनामा रु. 10 लक्ष पर्यंतच्या रकमेसाठी रु. 100/- च्या मुद्रांकावर व त्यापुढील प्रत्येक 1 लाख रकमेसाठी रु. 100/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर करणे आवश्यक आहे. या साहित्य पुरवठ्याचा खर्च रक्कम रु. 28 लक्ष असल्याने कामाचा करारनामा रु. 1900/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर करणे आवश्यक असता रु. 1000/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर केल्याने शासनाचे रु. 900/- मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले आहे.

2)या कामाचा करारनामा महानगरपालिकेने MSSIDC, सांगली यांचेबरोबर केला आहे. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासननिर्णय क्रमांक एसपीओ 1085/ 39024 (2318)/ (2)/उद्योग - 6, दि.26 नोव्हे.1985 नुसार महामंडळाने ज्या लघुउद्योगाच्या वतीने निविदा भरल्या असतील त्या लघु उद्योजकाकडुन पुरेशा रोख रक्कमेची सिक्युरीटी अथवा बँक गॅरेंटी घेवुन त्यांचेबरोबर करारपत्र करुन घेण्याचे आहे. परंतु महानगरपालिकेने लघुउद्योजकाकडुन करारपत्र करुन न घेता MSSIDC कडून करारपत्र करुन घेतले आहे. त्यामुळे सदर काम कोणत्या लघु उद्योजकाकडुन करुन घेतले आहे ते समजुन येत नाही. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-1088/2512/उद्योग-6 दि. 02 जानेवारी 1992 मधील परिशिष्ठ 12 नुसार रु.50000/- पेक्षा जास्त खरेदी असेल तर खरेदी किमतीच्या 3 टक्के अनामत रक्कम पुरवठाधारकाकडुन घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, सांगली यांचेकडून 2800000/- चा कॉम्पॅक्टर खरेदी करताना पुरवठाधारकाकडून 3 टक्केप्रमाणे अनामत रक्कम रु. 84000/- करारपत्र करताना घेण्यात आलेली नाही.

3)कॉम्पॅक्टर साहित्य पुरवठ्याबाबतची रक्कम रु.2800000/- , प्रमाणक क्र. 1 ने दि.04/07/2013 रोजी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांना प्रदान केली असुन देयकामधुन 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम रु.56000/- कपात करुन घेणे आावश्यक असता ती कपात न करताच देयक आदा करण्यात आले आहे .

4) कॉम्पॅक्टर खरेदीची रक्कम रु. 28 लाख असुन शासन निर्णय क्र. भाखस-1093 /2635 / उद्योग-6 दि. 16 जुलै 1993 नुसार रु. 50000/- च्या वरील रकमेची खरेदी निविदा मागवून करणे आवश्यक आहे. परंतु सदर साहित्याच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (MSSIDC) यांचे कडून थेट साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. तसेच साहित्य खरेदी करताना महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (MSSIDC) यांनी दिलेले दर बाजारभावाशी सुसंगत असलेची खात्री केलेली नाही.

5)प्रशासनाने स्थायी समितीला सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्र शासन मान्य दरकरार अन्वये खरेदी करणेबाबत मंजुरी प्रस्तावित करण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्र शासन मान्य दर कराराची प्रत लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करण्यात आलेली नाही. शासन व इतर संस्थाकडून उत्पादित वस्तूंचे दर ठरविण्यासंबंधीची कार्यवाही उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-1088/2512/उद्योग-6 दि. 02 जानेवारी 1992 मध्ये दिलेली आहे. त्यामधील परिच्छेद 7 नुसार दर ठरविताना बाजारभाव तसेच उत्पादन खर्च याचा सारासार विचार करण्यात यावा असे नमुद आहे. महानगरपालिकेने बाजारभाव व उत्पादन खर्च यांचा सारासार विचार करुन वापरण्यात येणारे साहित्य, साहित्याची बाजारभावाप्रमाणे येणारी किंमत, कामास लागणारी मजुरी, ठेकेदाराचा नफा या सर्वांचे दरपृथ्थ्करण करुन साहित्याचा दर ठरविणे आवश्यक होते. परंतु यासाठी येणारा खर्च न ठरविताच महाराष्ट्र लघुउद्योजक महामंडळाने ठरविलेल्या किंमतीनुसार साहित्य खरेदी केली आहे.

06)उपरोक्त शासन निर्णय दि. 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 5 नुसार महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळा मार्फत खरेदी करावयाच्या 15 वस्तूंची यादी परिशिष्ठ “3” मध्ये दिलेली आहे. परंतु महानगरपालिकेने खरेदी केलेल्या उपरोक्त कॉम्पॅक्टरचा समावेश सदर यादीमध्ये नसतानाही सदरचे साहित्य महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांचेकडून नियमबाह्यपणे विनानिविदा खरेदी केल्याचे आढळुन आले.

07)सदर साहित्याचे पुरवठा आदेशामध्ये किंवा पुरवठादाराचे दरपत्रक, चलन, बिजक यामध्ये साहित्याच्या बाबतचा सविस्तर तपशिल स्पेसिफिकेशन यांचा उल्लेख नसल्याने पुरवठा करण्यात आलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य प्रकारचे असल्याचे व त्याची किंमत वाजवी असल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

08)उपरोक्त शासन निर्णय दि. 02/01/1992 मधील परिशिष्ठ 8 परिच्छेद 8.4 मध्ये शासन परिपत्रक दि. 14 ऑक्टोंबर 1986 अन्वये भारतीय मानक संस्थेने चिन्हांकित केलेल्या वस्तुची खरेदी करण्याचे आदेश दिलेले आहेत. चिन्हांकित नसलेल्या वस्तुंची खरेदी लघु उद्योजकांकडून करण्यापूर्वी संबंधीत विभागाने मालाच्या दर्जा विषयी तपासणी संचालक स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हिस इन्स्टीट्युट साकिनाका, मुंबई यांचेकडून करुन घेवून साहित्य योग्य स्पेसिफीकेशन प्रमाणे असल्याबाबतचा तांत्रीक गुणवत्तेचा प्रयोगशाळा अहवाल घेवून रक्कम अदा करणे आवश्यक होते. परंतु या मालाच्या दर्जाविषयी तांत्रिक तपासणी न करताच ठेकेदारस देयक आदा केलेने पुरवठा केलेले साहित्य योग्य

DRAFT

गुणवत्तेचे असलेचे समजुन येत नाही.

09)MSSIDC ने महानगरपालिकस जाक्र.2/SBO/MRK/2012-13/434/ दि.07/01/2013 ने पत्र पाठवुन कॉम्पॅक्टरचे काम 50 टक्के झाले असुन सदर कामाची तपासणी आपले प्रतिनिधीमार्फत करण्याचे सुचित केले आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मेकॅनिकल विभागाने कॉम्पॅक्टरच्या कामाची 50 टक्के तपासणी दि.28/01/2013 रोजी व 100 टक्के तपासणी दि. 18/03/2013 रोजी केली आहे. या कामाचे करारनाम्यामधील अट क्र. 9 नुसार पुरवठादाराने 60 दिवस मुदतीत काम पुर्ण करणेचे आहे. मुदतीमध्ये काम पुर्ण न केल्यास पुढील प्रत्येक दिवसासाठी रु.2000/- दंड आकारावयाचा आहे. टाटा चेसिस फॉर कॉम्पॅक्टर खरेदीची वर्क ऑर्डर आरोग्य विभागाने टाटाचे अधिकृत डिलर पंडित ऑटोमोटिव्ह प्रायव्हेट लिमिटेड यांना जा.क्र.मनपा/ आरोवि/06/ 1/202/ 2012-13, दि.09/07/2012 ने दिली असुन त्यामध्ये चेसीसचा पुरवठा 45 दिवसामध्ये करण्याची अट नमुद केली आहे. चॅसिस पुरवठादाराने 45 दिवसामध्ये म्हणजे दि.23/08/2012 रोजी चॅसिस ताब्यात देणे आवश्यक आहे व या कॉम्पॅक्टरचा पुरवठा MSSIDC ने 60 दिवसाचे मुदतीमध्ये दि.23/10/2012 पर्यंत महानगरपालिकेकडे करणे आवश्यक होते.परंतु महानगरपालिकेच्या ताब्यात चॅसिस कधी मिळाली व महानगरपालिकेने चॅसिस कॉम्पॅक्टरची बांधणी करणेसाठी MSSIDC च्या ताब्यात कधी दिली याची माहिती नस्तीमध्ये नमुद नसल्याने चॅसिस मनपास कधी मिळाली याची खात्री होत नाही. नस्तीमधील MSSIDC ने दिलेल्या Tax Invoice No.PI-336 दि.19/03/2013 ची तपासणी केली असता, Tax Invoice चे मागील पृष्ठावर सदर साहित्य ताब्यात मिळाले असुन साहित्याची नोंद स्टॉक बुक पृष्ठ क्रं.110 वर तो दि.19/03/2013 रोजी घेण्यात आल्याचे नमुद आहे. पुरवठादारास चॅसिसचा पूरवठा महानगरपालिकेने कधी केला याची माहिती लेखापरीक्षणास देणेची मागणी अर्धसमास ज्ञापन क्र.105, दि.17/05/2016 अन्वये करण्यात आली होती परंतु अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन आरोग्य विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. त्यामुळे ठेकेदाराने कॉम्पॅक्टरचा पुरवठा दि. 23/10/2012 पर्यंत करणे ऐवजी दि.19/03/2013 रोजी म्हणजेच सुमारे 152 दिवस उशिराने केल्याने रु.2000/ दिन प्रमाणे रु.304000/- दंडाची रक्कम वसुल केली नाही.

10)महानगरपलिकेच्या लेखा विभागाकडे 12 व्या वित्त आयोगाची स्वतंत्र रोकड वही ठेवली असुन घनकचरा व्यवस्थापनाचे कामासाठी शासनाकडुन दि.20/08/ 2009- रु.15715251/-, दि.05/03/2010- रु.7590303/-, दि.05/05/2010 - रु.7590303/-,दि.17/05/2010- रु. 7590303/- असे एकुण रक्कम रु.3,84,86,160/- अनुदान प्राप्त आहे. परंतु महानगरपालिकेने खर्चाचे व्यवस्थित नियोजन करुन कंटेनर, घंटागाडी, कॉम्पॅक्टर हे घनकचरा व्यवस्थापनाचे साहित्य एकाच वेळी खरेदी न करता दरवर्षी टप्प्याटप्प्याने एकाच प्रकारचे साहित्य MSSIDC कडून विनानिविदा खरेदी केल्याने निधी असुनही महानगरपालिकेच्या सर्व भागांना या मालाचा पुरवठा वेळेत झाला नसल्याने घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत नागरीकांना स्वच्छता विषयक साहित्याचा लाभ वेळेत झाला नसल्याचे दिसुन येते. तसेच साहित्य एकाच वेळी खरेदी न केल्याने या कामाचा निधी आर्थिक वर्ष 2009 पासून 2013-14 अखेर

DRAFT

अखर्चित राहिल्याचे स्पष्ट होते.

**वसुलपात्र रक्कम :-** अनामत रु.84000 **+** आयकर रु.56000/- **+** विलंब दंड रु. 304000/- **+** मुद्रांक शुल्क कमी भरणा रक्कम रु.900/- = रु.444900/-

आक्षेपाधिन रक्कम रु. 2356000/-

DATRNDM7201 (Ref No : 110)

## *67 इंदिरा घरकुल झोपडपट्टी स.न.138/ब येथे 155 + 651= 806 घरकुले बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**IHSDP**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 15**

*लेखा शीर्ष : बांधकाम केंद्र,राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 150649214.00/-

| |
|---|
| ***बांधकाम विभागाने या योजनेमधील मंजुर घरकुलाची योजना 3798 घरकुलाऐवजी 1395 घरकुलापर्यंत सिमित केल्याने शासनास रक्कम रु.77372000/ तसेच प्राप्त अनुदानावरील व्याजाची रक्कम रु.70068843/- अशी एकुण रक्कम रु.147440843/- शासनास परत देणे आवश्यक असता ती परत दिलेली नाही. या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के विम्याच्या रक्कमेचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन विम्याची रक्कम रु.2146505/- कपात करुन शासकीय विमा निधीकडे भरणा केलेली नाही. म्हाडाचे जा.क्र.मु.अ. / उमुअ- जेएनयु आरएम / 778 / 10 / दि.10/11/10 अन्वये केंद्र शासनाने प्रती घरकुल किंमत रु.100000/- निश्चित केली आहे. याकरीता केंद्रशासनाचे अनुदान 80 टक्के म्हणजे रु.80000/- असुन राज्य शासनाचे आरक्षित गटासाठी 10 टक्के व सर्वसाधारण गटासाठी 8 टक्के अनुदान देय आहे. 806 घरकुलांची महानगरपालिका हिश्श्याची एकुण रक्कम रु.134003801/- महानगरपालिकेने स्वनिधी म्हणुन अंदाजपत्रकामध्ये तरतुद करुन खर्च करणे आवश्यक असता रु.8.30 कोटी खर्च करण्यात आला असल्याने रक्कम रु.51003801/- इतका कमी खर्च स्वनिधीमधुन केला आहे. इंदिरानगर घरकुल योजनेची किंमत रु.309880216/- इतकी असुन 2013-14 या आर्थिक वर्षाअखेर एकुण रक्कम रु.98176927/- खर्च करण्यात आला आहे. या कामावर 2013-14 अखेर 31.63 टक्के इतकाच खर्च झालेला आहे. ठेकेदारास काम पुर्ण करण्याची मुदत दि.22/05/2014 अखेर दिली असुन कामावर झालेला खर्च पाहता काम संथगतीने चालु असलेचे व काम दिलेल्या मुदतीत पुर्ण होणार नसल्याचे स्पष्ट होते*** |

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत टप्पा क्र. 2 मध्ये 3798 घरकुल बांधणे कामी दि.26 फेब्रु. 2009 रोजी कैंद्रिय मान्यता समितीने रु.93.88 कोटी रक्कमेच्या प्रस्तावास

DRAFT

मान्यता दिली आहे. या प्रकल्पामध्ये मनपा मालकीच्या 5 व शासन मालकीच्या दोन अशा 7 झोपडपट्टीच्या जागेवरील 3798 झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पाच्या प्रस्तावामध्ये एकुण 3798 लाभार्थींची यादी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केली आहे. या एकुण 3798 घरकुलापैकी 2105 झोपडीधारकांना आहे त्याच जागेवर घरकुले दिली जाणार असुन 1693 झोपडीधारकांना त्यांचे लगतच्या प्रस्तावित घरकुलांच्या जागेमध्ये स्थलांतरीत केले जाणार आहे. या कामासाठी यापुर्वी दि.7/4/2010 रोजी 9.63% जादा दराची निविदा मे.स्ट्रेसक्रीट इंडिया लि. यांचे नावे मंजुर करण्यात आली होती. तथापी लाभार्थ्यांनी बैठ्या घरांची मागणी केल्याने तसेच त्यांनी कोर्टाकडुन स्थगिती आदेश आणल्याने दिड वर्षाचा कालावधी संपल्यानंतरही काम चालु करण्यात आले नव्हते. याच जागे शेजारील रिकाम्या जागेवर बांधकाम करण्याबाबत ठेकेदारास कळविले असता त्यांनी जादा दराची मागणी केली. त्यामुळे दि.09/11/2011 रोजी आयुक्त यांच्या मान्यतेने निविदा रद्द करण्यात आली.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे पत्र जा.क्र./मु.अ.र./ उपमुअ.2/जेएनयुआरएम सेल/ /09 दि.2/3/2009 चे पत्रान्वये आयुक्त यांना अंदाजपत्रकीय दरानुसार थेट पध्दतीने काम देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार यापुर्वी संजयनगर येथील झोपडपट्टीचे बांधकाम करण्याचे काम थेट पध्दतीने मे.ए.इ.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. ठाणे यांना 2010-11 चे जिल्हा दरसुचीनुसार आलेल्या दराप्रमाणे घरकुलांचे दर रु.172500/- व मुलभुत सोयीसाठी रु.81000/-प्रती घरकुल देण्यात आलेले आहे. त्या कामाची वर्क ऑर्डर दि.14/09/11 रोजी देण्यात आली आहे. सदर एजन्सी बरोबर विषयांकीत काम त्याच दराने करणे बाबत प्रशासनाने चर्चा करुन तसे पत्र देणेस सांगितले नुसार कंपनीने रु.210000/- प्रती घरकुल व मुलभुत सोयी सुविधेसाठी रु.95000/- प्रती घरकुल इतका दर दिला आहे. परंतु बांधकाम विभागाने ठेकेदारास प्रती घरकुल रु.172500/- व मुलभुत सोयीसाठी रु.81000/-प्रती घरकुल या दराने थेट पध्दतीने काम देण्याचे विषयपत्र दि.15/11/2011 रोजी स्थायी समितीकडे सादर केले होते. परंतु दि.02/12/2011 अखेर सदरचे विषयपत्र स्थायी समितीमध्ये चर्चेसाठी घेण्यात आले नव्हते. ठेकेदाराने स्थायी समितीकडे पाठविलेल्या दराप्रमाणे काम करणे शक्य नसल्याचे व नविन जिल्हा दरसूची 2011-12 दि.1 सप्टे.2011 रोजी लागु झाली असल्याने त्यानुसार प्रती घरकूल रु.202500/- व मुलभुत सोयीसुविधा दर रु.85000/- या येणा-या दराने काम करण्यास तयार असल्याचे पत्र ठेकेदाराने दि.19/11/2011 रोजी दिले आहे. (नस्ती मधील कार्यालयीन टिपणी पृष्ठ क्र.टि-3) नगर अभियंता,बांधकाम विभाग यांनी 2011-12 चे दरसुचीनुसार या कामाचे प्राकलन तयार केले असुन त्यामध्ये फ्लोअर राइझ 3.5% व सिमेंट व्हॅट मधील फरक 8.5% धरुन प्रती घरकुल रु.202586/- इतकी किंमत निश्चित केली आहे. (नस्तीमधील पृष्ठ क्र.23). त्यानुसार उपायुक्त यांनी दि.07/12/2011 रोजी इंदिरा नगर येथील 622 घरकुलाचे पायाभुत सुविधासह बांधकाम करण्याचे काम ए.ई.इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस थेट पध्दतीने देणे व पुर्वीचे निविदाधारक मे.स्ट्रेसक्रिट इंडिया यांची

DRAFT

निविदा रद्द करणेचा प्रस्ताव स्थायी समितीकडे विचारार्थ ठेवण्याचे विषयपत्र नगरसचिव विभागाकडे सादर केले आहे. सदर प्रस्तावास स्थायी समिती सभा क्र. 22, ठराव क्र. 458 विषय क्र.22 दि.13/12/2011 ने मान्यता दिली आहे. (नस्ती मधील पृष्ठ क्र.37). निविदा मंजुरी समज बांधकाम विभागाने ठेकेदारास दि.22/12/2011 रोजी दिली आहे.

या कामामधील अनियमिततेबाबतचा आक्षेप परिच्छेद क्र.46, 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण अहवालामध्ये घेण्यात आलेला आहे.

या कामाची वर्क ऑर्डर बांधकाम विभागाने ठेकेदारास दि.29/12/2011 रोजी दिली असुन कामाची मुदत 12 महिने देण्यात आली आहे.

या कामाच्या नस्तीमधील शहरी नागरी दारिद्र्य निर्मुलन कक्ष यांचे दि.01/03/2013 रोजीच्या कार्यालयीन टिपणीचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत. मक्तेदार यांना कार्यादेश दिल्यानंतर मंजुर ठिकाणी झोपडपट्टीधारकांचे वास्तव्य असल्याने व त्यांनी बैठ्या घरांची मागणी करुन झोपड्या काढण्यास विरोध केला असल्याने व कोर्टामध्ये दावा दाखल करुन स्थगिती आदेश घेतल्यामुळे मक्तेदार यांना जागेवर बांधकामे सुरु करता आलेली नाहीत. त्यामुळे झोपडपट्टीच्या लगत महानगरपालिका पाण्याच्या टाकीलगतची जागा उपलब्ध झाल्याने सदर ठिकाणी सुधारित बांधकाम परवाना क्र.म.98 दि.14/02/2012 ने बांधकाम परवानगी घेवून मक्तेदार यांना दि.29/11/2012 रोजी 186 घरकूलांची बांधकामे सुरु करण्याबाबत कळविले आहे. परंतु प्रत्यक्ष जागेवर काम करताना त्या ठिकाणी फक्त 155 घरकुलांचे काम सुरू होवू शकले आहे. या ठिकाणा बाबत चालु असलेल्या दाव्याचा निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागल्यानंतर झोपडीधारकांचे प्रबोधन करुन सदर ठिकाणच्या झोपडयांचे निष्कासन दि.17/01/2013 रोजी करण्यात आले आहे.

या कामाच्या ठेकेदाराला बांधकाम विभागाने क्र.मनपा / सां /नादानिक -1/474/2012-13 दि.17/01/2013 रोजीच्या पत्राने जागा ताब्यात घेण्याबाबत कळविले आहे. (नस्तीमधील पृष्ठ टी-33 व पृष्ठ क्र. 235 वर पत्र जोडण्यात आले आहे.). महानगरपालिकेने कार्यादेश दि.29/12/2011 रोजी देवुन एक वर्ष होवून देखील जागा ताब्यात दिलेली नसल्याने व कामाची मुदत 28/12/2012 रोजी संपुष्टात आल्याने तसेच सध्या बाजारामध्ये बांधकाम साहित्याचे दर वाढलेमुळे जुन्या दराने काम करणे शक्य नसल्याचे ठेकेदाराने दि.17/01/2013 रोजीच्या पत्राने महानगरपालिकेस कळविले आहे.(सदर पत्र नस्तीमधील पृष्ठ क्र.238 वर जोडण्यात आले आहे). तसेच ठेकेदाराने दिलेल्या पत्रामध्ये महानगरपालिकेने इंदिरानगर झोपडपट्टीचे अंदाजपत्रक सन 2012-13 च्या दरसूचीनुसार करावे. या कामासाठी 10 टक्के मोबिलायझेशन ॲडव्हान्स Intrest Free देण्यात यावा. तसेच स्टील सिमेंटवर सेक्युअर्ड ॲडव्हान्स देण्यात यावा. सदरची योजना टर्न की बेसिसवर असल्याने त्यांची डिझाईन व ड्रॉइंग तयार करणेस अम्हास मुभा द्यावी. कामाची मुदत 18 महिने करावी या अटी मान्य असल्यास काम करण्यास तयार असल्याचे नमुद केले आहे. बांधकाम विभागाने सन 2012-13 च्या दरसूचीनुसार या कामाचे नविन अंदाजपत्रक केले असून त्यानुसार प्रती घरकुलाची किंमत रु.281510/- होत आहे. प्रती घरकूलाचा

DRAFT

मंजूर दर रु. 202500/- यामध्ये रु.79010/- मात्र वाढ होत आहे. तसेच मुलभुत सोयी सुविधा रक्कम प्रती घरकुल रु.118151/- होत असून मंजूर दर प्रती घरकुल रु.85000/- होत असल्याने यामध्ये रक्कम रु.33158/- वाढ होत आहे. त्यामुळे सन 2012-13 चे दरसूचीनुसार दरवाढ देणे अथवा ठेकेदाराच्या मागणीनुसार दरवाढ देणे याबाबत निर्णय घेणेची टिपणी बांधकाम विभागाने प्रशासनास दि.01/03/2013 रोजी सादर केली आहे. (टी- 35). सदर टिपणीमध्ये उपायुक्त यांनी निविदा पुन्हा मागविल्यास दर किती येतील याची शक्यता तपासता चालू दरसूचीचा पर्याय योग्य असल्याने त्यावर स्थायी समितीमध्ये चर्चा करुन निर्णय घेण्याची शिफारस केली आहे व याप्रमाणे स्थायी समितीकडे पाठविण्याचे विषयपत्र तयार करावे असे आदेश देवून दि.13/03/2013 रोजी आयुक्त यांनी टिपणीस मान्यता दिली आहे. त्यानुसार उपायुक्त यांनी दि.15/03/2013 रोजी नगरसचिव विभागाकडे विषयपत्र सादर केले आहे. (पृष्ठ क्र.357). विषयपत्रामध्ये सध्यस्थितीमध्ये मंजूर 622 घरकुलाचे ठिकाणी याच जागेमधील वाढीव क्षेत्रामध्ये यापुर्वी मंजूर करुन प्रगतीतील 155 घरकुले व जागेवरील झोपडपट्टीचे तात्पुरते स्थलांतराने मोकळी करण्यात आलेली जागेवरील G + 3 स्वरुपातील प्रस्तावित 682 घरकुले असे एकत्रित 837 घरकुलाची कामे प्रस्तावित केली आहेत. यापैकी 682 घरकुलांचे कामासाठी नविन दरवाढ प्रस्तावित केली आहे. या कामाचे मक्तेदार यांनी नमुद केलेले त्यांचे पत्रातील दरवाढीच्या मागणीस अनुसरुन घरकुल बांधकाम व सोयीसुविधाची कामे यांना 2012-13 चे जिल्हादरसूचीनुसार वाढ देणे, तसेच 10 टक्के मोबिलायझेशन ॲडव्हान्स इंटरेस्ट फ्री देणे, स्टीलवर सेक्युअर्ड ॲडव्हान्स देणे, बांधकामासाठी RMC ची कोणतीही जादा दरवाढ न देता परवानगी देणे या बाबी मान्य करुन अन्य बाबी जसे की प्राईस एक्सलेशन, भाववाढ अथवा स्टार रेटचा समावेश ,सिमेंटवर सेक्युअर्ड ॲडव्हान्स देणे ,बिलातुन रिटेन्शन अमाऊंट वजा करणे, बांधकामाची मुदत 18 महिने करणे या बाबीस मान्यता न देता मक्तेदारास काम देणेचे विषयपत्र नगरसचिव विभागाकडुन महासभेकडे प्रस्तावित करणेसाठी दि.15/03/2013 रोजी उपायुक्त कार्यालयाकडे पाठविले आहे. (पृष्ठ क्र.355). सदरचे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 35 (अ) व प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन महासभा क्रमांक 12, ठराव क्र.459, विषय क्र.ऐन, दि.20/03/2013 ने प्रशासनाने सादर केलेल्या विषयपत्रानुसार मक्तेदारास झोपडपट्टीचे तात्पुरते स्थलांतर झाल्यामुळे मोकळया झालेल्या जागेवर G+3 स्वरुपातील प्रस्तावित 682 घरकुले सन 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार बांधण्यास मान्यता दिली आहे. तसेच या पुर्वी प्रगतीत असलेली 155 घरकुलाचे कामासाठी देखील वर्क ऑर्डर दिलेनंतर साधारणत: 4 महिने विलंबाने काम सुरु झाले आहे. जागा ताब्यात देणेची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याने व झालेला विलंब विचारात घेता सदरचे 155 घरकुलांचे बांधकामाचे परिमाणामधील स्टिल व सिमेंट या बाबीवर देखील संबंधित मक्तेदार यांना सन 2012-13 चे दरसूचीनुसार फरक देणे व सदरचे काम 15 एप्रिल 2013 ला सुरू करणे व ते एक वर्षामध्ये पुर्ण करण्यासही महासभेने मान्यता दिली आहे (ठराव नस्तीमधील पृष्ठ क्र.372 वर आहे).

DRAFT

इंदिरा घरकुल मिरज स.न.138/ ब येथे 155 + 651= 806 घरकुलांचे पायाभुत सुविधासह बांधकाम करणे या कामाची 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये 12 धावत्या देयकाने रक्कम रु.98176927/- चे प्रदान करण्यात आले आहे. उदाहरणादाखल कांही देयकांचा तपशिल खालील प्रमाणे देणेत येत आहे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | मो.पुस्तक व पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 02 | 21/05/2013 | 2448225 | 09/25 |
| 03 | 28/06/2013 | 1820475 | 09/26 |
| 09 | 06/08/2013 | 4073804 | स्टिल ॲडव्हान्स |

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक, प्रमाणके यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.107, दि.11/05/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.23/05/2016 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालनाची तपासणी करुन या कामामधील अनियमिततेबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

01) महासभा क्रमांक 12 ,ठराव क्र.459 ऐनवेळचा विषय, दि.20/03/2013 अन्वये यापुर्वी मंजुर करण्यात आलेली 155 घरकुले व जागेवरील G+ 3 स्वरुपातील प्रस्तावित 682 घरकुले असे एकत्रित 837 घरकुलांची कामे प्रस्तावित केली आहेत. सदरचे 682 घरकुलांचे कामासाठी 2012-13 चे दरसूचीप्रमाणे काम करणेस मान्यता दिली आहे. उपायुक्त यांनी मे.एई इन्फ्रा प्रोजेक्ट यांना जा.क्र.मनपा/सा/नादानिक/1/82/13-14 , शहरी नागरी दारिद्र्य निर्मूलन कक्ष दि.03/06/2013 या पत्रान्वये कामाचा कार्यादेश दिलेला असुन त्यामधील सुचना क्रमांक दोन मध्ये यापुर्वी आपणाला या संकुलासाठी 622 घरकुलांची बांधकामे मुलभुत सोयीसुविधा सह करणेकामी कार्यादेश आरंभ दिले होते त्यामध्ये बदल झालेला असुन ती संख्या आता 806 झालेली आहे असे नमुद आहे (पुर्वीची घरकुले 155 + 651). महासभेने 837 घरकुलांचे कामांना मंजुरी दिली आहे. परंतु बांधकाम विभागाने कार्यादेशामध्ये 806 घरकुलांना मंजुरी दिली आहे. या दोन्ही आदेशामध्ये 31 घरकुलांची तफावत दिसुन येते या तफावतीबाबतचा खुलासा बांधकाम विभागाने केला असुन खुलाशामध्ये या बांधकामाच्या जागेमधुन वसंतदादा शेतकरी सह.साखर कारखान्याची इरिगेशन पाईपलाईन गेली असुन सदरची पाईपलाईनची दुरूस्ती करावयाची झाल्यास इमारतीचा अडथळा होणार असल्याने 31 घरकुलांचे काम थांबविण्यात आल्याचे नमुद आहे. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 165 नुसार कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक आहे. परंतु या कामाच्या बाबतीत स्थानिक निरिक्षण केले नसल्याने अडचणी आल्याचे दिसुन येते. तसेच कमी करण्यात आलेली घरकुले अन्य कोणत्या ठिकाणी बांधण्यात येणार आहेत या बाबत खुलाशामध्ये कांहीही नमुद नाही.

02)सदर कार्यादेशामधील अट क्र. 05 नुसार कामाची मुदत 12 महिने (दि.23/05/2013 ते दि.22/05/2014) असलेचे नमुद आहे. परंतु कार्यादेश ठेकेदारास देण्यासाठी तयार केल्याचा दिनांक

DRAFT

30/06/2013 आहे. कार्यादेश ठेकेदारास कामाची सुरवात होणे अगोदर देणे आवश्यक असता तो एक महिना विलंबाने देण्यात आला आहे. प्रशासकीय विलंबामुळे कार्यादेश देण्यास विलंब लागला असल्याचे दिलेल्या अनुपालनामध्ये नमुद आहे. परंतु कार्यादेश काम करण्यापुर्वी देणे आवश्यक असल्याने दिलेला खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

03) ए.ई.इन्फ्रा प्रोजेक्ट यांचेशी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत इंदिरानगर मिरज स.न. 138/ब येथे 622 घरकुलांचे बांधकाम करणे या जुन्या कामाचे करारपत्र महानगरपालिकेने दि. 29/12/2011 रोजी केले असुन त्यामध्ये या कामाची एस्टिमेट रक्कम रु.168825000/ (एकूण घरकुले 622, प्रती घरकुल रु. 202500/- व पायाभुत सुविधेसाठी रु.85000/-) इतकी असल्याचे नमुद आहे व या रक्कमेवर मुद्रांक शुल्कापोटी रक्कम रु.180000/- ई स्टँपने Certificate No. IN-MH05944272568982J ने ठेकेदाराने शासनाकडे भरणा केले आहेत. परंतु झोपडपट्टीधारकांनी जागा ताब्यात देण्यास नकार दिल्याने तसेच याबाबत ते न्यायालयामध्ये गेल्याने जागा महानगरपालिकेच्या ताब्यात येण्यास विलंब लागल्याने ठेकेदाराने जुन्या दराने काम करण्यास नकार दिला आहे व सन 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार काम करणेस तयार असल्याचे पत्र महानगरपालिकेस दि.17/01/2013 रोजी दिले आहे. बांधकाम विभागाने सन 2012-13 चे दरसूचीनुसार 651 घरकुलांचे कामाची किंमत रु.183263010/- व 806 मुलभुत सोयी सुविधाचे कामाची किंमत रु.95229706/- व पुर्वी सुरू असलेल्या 155 घरकुलांचे कामाची किंमत रु.31387500/- होत असुन या सर्व कामांची एकुण किंमत रु.309880216/- चे एस्टिमेट बांधकाम विभागाने तयार केले आहे. त्यामुळे ठेकेदाराने (2012-13 नुसारची घरकुल किंमत रक्कम रु.309880216 - या पुर्वीची घरकुल किंमत रु.168825000 = रु.141055216/-) या रक्कमेवर, महसूल व वनविभाग अधिसुचना दि.23/4/2006 अन्वये मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34,तसेच नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचेकडील जा.क्र.12 /कलम/ मुं.मुं.शु./113/09 दि.20/7/2009 नुसार कार्यकंत्राटासंबधीत करारनामा रु.10 लाख पर्यंत रु.100 व पुढील प्रत्येक लाखास रु.100 व जास्तीत जास्त 5 लाख पर्यंत मुद्रांकावर मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक असताना ठेकेदाराने मुद्रांक शुल्काचा रक्कम रु.140200/- कमी भरणा केला आहे. बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये मुद्रांक शुल्काची वसुली करण्याचे मान्य केले आहे. परंतु मुद्रांक शुल्काची वसुली करुन अनुपालन सादर केलेले नाही.

04) नगरअभियंता यांनी क्र.मनपा/सा/नादानिक/1/469/13-14 शहरी नागरी दारिद्र्य निर्मुलन कक्ष दि.12/03/ 2014 चे पत्राने 651 घरकुलाचे बांधकाम संथगतीने चालु असल्याबाबत ठेकेदारास नोटीस पाठविण्यात आली आहे. त्यानुसार जागेवर 124 क्लस्टरची एक इमारत, 93 क्लस्टरची एक इमारत व 62 क्लस्टरच्या सात इमारती याप्रमाणे जागेवर घरकुलाची बांधकामे सुरु करण्यात आलेली आहेत. त्यापैकी 124 क्लस्टर इमारतीचे ग्राउंड, फर्स्ट ,सेकंड फ्लोअरचे स्लॅब काम पुर्ण झाले आहे. अद्यापी थर्ड फ्लोअर होणेचा आहे. तसेच 93 क्लस्टर इमारतीचे ग्राउंड, फर्स्ट, सेकंड फ्लोअरचे स्लॅबचे काम पुर्ण झाले आहे. अद्याप थर्ड फ्लोअरचे काम झालेले नाही. त्याचप्रमाणे 62 क्लस्टर पुर्व बाजुच्या

DRAFT

इमारतीचे ग्राउंड, फर्स्ट, सेकंड फ्लोअरचे स्लॅबचे काम पुर्ण झाले आहे. अद्याप थर्ड फ्लोअरचे काम झालेले नाही. पश्चिम बाजुच्या 62 क्लस्टर A,B,C,D,E,F या इमारतीचे आर.सी.सी.काम 50 टक्केपेक्षा कमी आहे. त्याचप्रमाणे बांधकाम, गिलावा, आय.पी.एस.फ्लोरींग, जलनि:सारण कामे, पाणीपुरवठ्याची कामे, रस्ते, गटारी, कॉमन सर्क्युलेशन स्पेस, स्ट्रीट लाईट, कम्युनिटी सेंटर इत्यादी कामे सुरु होणेची आहेत. निविदा अटी शर्तीप्रमाणे सदर कामाची मुदत दि.22/05/2014 अखेर आहे. बांधकाम विभागाने घरकुलाचे बांधकाम चालु असताना कामाची प्रगती पाहुन ठेकेदारास काम पुर्ण करणेसाठी वेळोवेळी नोटीस काढणे आवश्यक होते. परंतु बांधकाम विभागाने काम पुर्ण होण्याची मुदत संपण्याचे 1 महिना अगोदर ठेकेदारास काम संथगतीने सुरु असलेबाबतची समज दिली आहे. तसेच या पत्राने दिलेल्या समजेमध्ये या कामाची मुदत दि. 22/05/2014 अखेर असल्याने कामाची मुदत वाढवावी अन्यथा वेळेत काम न झाल्यास निविदा अटी शर्तीनुसार दंडात्मक कारवाई करणेत येईल असे नमुद आहे. त्यानंतर ठेकेदारास दि.31/10/2014 ,दि.03/12/2014 च्या पत्राने काम अपुर्ण असलेबाबत पुन्हा समज दिली आहे. कामाच्या नस्तीची तपासणी केली असता मार्च 2016 अखेर सदर काम पुर्ण झालेले नसल्याचे दिसुन येते. काम अपुर्ण असलेबाबत ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतच्या निविदा अटी शर्ती लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेल्या नाहीत .तसेच याबाबतचा खुलासा बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये केलेला नाही.

05) उपायुक्त यांनी दि.03/06/2013 रोजीचे पत्रान्वये ठेकेदारास कार्यादेश देण्यात आला आहे. कार्यादेशा मधील अट क्र.13 नुसार प्रस्तावित काम एक वर्षाचे आत पुर्ण करणेचा बार चार्ट ठेकेदाराने सदर पत्र मिळताच 10 दिवसाचे आत सादर करणेचा आहे. या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता नस्तीमध्ये बार चार्ट आढळुन आलेला नाही. काम दि.23/05/2013 ते दि.22/05/2014 या कालावधीमध्ये पुर्ण करणे आवश्यक असता आर्थिक वर्ष 2016 अखेर एकाही घरकुलाचा पुर्णत्वाचा दाखला कार्यकारी अभियंता यांनी दिला नसल्याने काम अपुर्ण असल्याचे स्पष्ट होते. ठेकेदाराकडुन कामाचा बार चार्ट घेवुन त्याप्रमाणे घरकुलांचे बांधकाम का करण्यात आले नाही याचा खुलासा अनुपालनामध्ये करण्यात आलेला नाही.

06)IHSDP प्रकल्पांतर्गत इंदिरा घरकुल मिरज स.न.138/ब येथे 622 घरकुलाचे पायाभुत सुविधेसह बांधकाम एक वर्ष कालावधीमध्ये पुर्ण करण्याचे असल्याने व मक्तेदार यांनी थेट पध्दतीने काम करण्यास तयार असुन कामासाठी मोबिलायझेशन ॲडव्हान्स, सिक्युअर्ड ॲडव्हान्स, भाववाढ, कामाच्या मुदतीत वाढ इत्यादी जादाची मागणी दि.26/08/2011 चे पत्राने केली आहे. प्रशासनाने ठेकेदाराशी समक्ष चर्चा केली असता मोबिलायझेशन ॲडव्हान्स देणे वगळता अन्य अटी अमान्य करुन ठेकेदारास थेट पध्दतीने काम दिले आहे. करारपत्रात नमुद केल्याप्रमाणे मोबिलायझेशन ॲडव्हान्स रु.178825000/- च्या 5 टक्के रक्कम रु.8941250/- मक्तेदारांनी सुरक्षा हमी रक्कम म्हणुन बँक गॅरेंटी स्वरुपात देणेची आहे. त्याप्रमाणे पंजाब नॅशनल बँकेची रक्कम रु.8941250/- इतक्या रक्कमेची 12 महिने मुदतीची बँक गॅरंटी BG No.11441LG3427 (दि.04/06/2012 ते दि. 04/06/2013

DRAFT

पर्यंत) दिली आहे. घरकुलाच्या कामासाठी मक्तेदारास दि.04/02/2012 रोजी रु.8941250/- मोबिलायझेशन ॲडव्हान्स दिला आहे. सदर मोबिलायझेशन ॲडव्हान्सपोटी घेण्यात आलेल्या बँक गॅरेंटीची मुदत 04/06/2013 रोजी संपली असुन दिलेल्या मोबिलायझेशन ॲडव्हान्सची रक्कम वसुल होणे बाकी असल्याने सदर बँक गॅरेंटीस मुदतवाढ घेणे आवश्यक असता ती घेण्यात आली नसल्याने त्याची विधीग्राह्यता तपासता आलेली नाही.

महानगरपालिकेने ठेकेदारास दिलेल्या देयकांची तपासणी केली असता धावते देयक क्र.1 ते 7 मधुन देयकाच्या 10 टक्केप्रमाणे (दि.29/07/2012 ते दि.04/07/2013) रक्कम रु. 2948070/- कपात केली आहे. या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता मोबिलायझेशन ॲडव्हान्स किती हप्त्यामध्ये ठेकेदाराकडून वसुल करावा याबाबत काहीही नमुद केलेले नाही. Govt Of India, Central Vigilance Commission , No.4CC- 1CTE-2,Office Memorandom , Circular No.10/04/2007 मधील अट क्र. 2 नुसार मोबिलायझेशन ॲडव्हान्सची recovery should be done Time base & not linked with progress of work. तसेच Time based पध्दतीने ॲडव्हान्सची रक्कम वसुल केलेस, ठेकेदाराने काम बंद केले अथवा कामाची प्रगती मंद ठेवली तरी सुध्दा दिलेल्या मोबिलायझेशन ॲडव्हान्सच्या वसुलीचे हप्ते वेळच्या वेळी प्राप्त होणार असल्याने या रक्कमेचा गैरवापर होणेची शक्यता कमी होते असे या परिपत्रकाद्वारे निदर्शनास आणले आहे. परंतु ठेकेदारास दिलेला मोबिलायझेशन ॲडव्हान्स त्याने काम पुर्ण केलेल्या देयकानुसार कपात केल्याने व या परिपत्रकानुसार Time based कालावधीमध्ये वसुल केला नसल्याने उर्वरित रक्कम रु.5993180/- ठेकेदाराकडून तात्काळ वसुल करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर केलेले नाही. याबाबतच्या अनुपालनाध्ये मोबिलायझेशन ॲडव्हान्सची वसुली चालु असल्याचे नमुद आहे. त्यामुळे अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

07) या घरकुलांचे बांधकामांना दि.04/02/2012 ने रक्कम रु.8941250/- व दि.15/07/2013 ने रक्कम रु.22046771/- असा एकुण रु.30988021/- मोबीलायझेशन ॲडव्हान्स दिला आहे. तसेच प्रमाणक क्र.9 दि.06/08/2013 ने रक्कम रु.4073804/- सळी खरेदीपोटी सेक्युअर्ड ॲडव्हान्स दिला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. आयकर-१०९१/प्र.क्र.१३२/का/अर्थ मंत्रालय मुंबई दि. १३/१०/१९९३ अन्वये २% आयकर या रक्कमेवर कपात करणे आवश्यक असता तो कपात केला नसल्याने रु.35061825/- वर 2 टक्के प्रमाणे रक्कम रु.701236 /- ठेकेदाराच्या देयकामधुन वसुल करणे आवश्यक असताना सदर रक्कम वसुल केलेली नाही. याबाबत दिलेल्या अनुपालनामध्ये सदरची रक्कम ॲडव्हान्स म्हणुन दिल्याने व तो वसुलात आणणेचा असल्याने आयकराची रक्कम कपात करण्यात आली नसल्याचे नमुद केले आहे. परंतु नियमाप्रमाणे आयकर रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

08) या कामाच्या प्रमाणकांची तपासणी केली असता Retention Amt पोटी खालील रक्कमा देयकामधुन कपात केलेल्या नाहीत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदरची रक्कम

DRAFT

वसुल करण्याचे मान्य केले आहे. परंतु रक्कम वसुल करुन अनुपालन सादर केले नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | Retention Amt | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 02 | 21/05/2013 | 2448225 | 3% | 73447 |
| 03 | 28/06/2013 | 1820475 | 3% | 54614 |
| 13 | 12/09/2013 | 3075975 | 3% | 92279 |
| | | | एकुण | 220340 |

09) प्रमाणक क्र.9 दि.06/08/2013 ने रक्कम रु.4073804/- सळी खरेदीपोटी ठेकेदारास सेक्युअर्ड ॲडव्हान्स दिला आहे. परंतु 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये धावते देयक क्र.11 मधुन रु.10 लाख व धावते देयक क्र. 12 मधुन 663238 व धावते देयक क्र.14 मधुन रु.12 लाख असे एकुण रु.2863238/- कपात केले आहेत. परंतु आर्थिक वर्ष 2015-16 अखेर अद्यापही उर्वरित रक्कम रु.1210566/- अद्यापही वसुल केलेली नाही.उपायुक्त यांनी या कामाचा कार्यादेश दि.30/06/2013 रोजी दिला असुन अट क्र.09 नुसार सेक्युअर्ड ॲडव्हान्सची वसुली पुढील देयकामधुन टप्प्याटप्प्याने केली जाईल असे नमुद असतानाही ॲडव्हान्सची वसुली केलेली नाही याबाबत दिलेल्या अनुपालना मध्ये वसुली करण्याची कार्यवाही चालु असल्याचे नमुद आहे. परंतु रक्कम वसुल केलेची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

10) बांधकाम विभागाने 651 घरकुलाचे प्राकलन 2012-13 या आर्थिक वर्षाच्या जिल्हा दरसूचीनुसार तयार केले असुन या कामाच्या गोषवा-यानुसार (Recapulation Sheet) ,Floor Rise@3.50%, Work Insurance 1% धरुन प्रती घरकुलाची किंमत रु.281510/- आलेली आहे. त्यामुळे कामाच्या देयकामधुन 1 टक्के प्रमाणे कार्यकंत्राटी विमा कपात करणे आवश्यक असता तो कपात केलेला नाही. 651 घरकुलांची रु.281510/प्रती घरकुलाप्रमाणे एकुण किंमत रु.113263010/- व 155 घरकुलांची रु.202500/प्रती घरकुलाप्रमाणे एकुण किंमत रु.131387500/- इतकी झाले आहे. या ठिकाणी एकुण बांधावयाच्या 806 घरकुलांची एकुण किंमत रु.214650510/- होत असल्याने 1 टक्के प्रमाणे एकुण विमा रक्कम रु.2146505/- कपात करणे आवश्यक आहे. परंतु देयकामधुन विम्याची 1 टक्का रक्कम कपात करण्यात आलेली नाही. कामाचा विमा काम सुरू होण्यापुर्वी उतरणे आवश्यक असुन विमा न उतरल्यास ठेकेदाराच्या देयकामधुन विम्याची रक्कम कपात करुन ती शासकीय विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक असताना रक्कम रु.2146505/- वसुल केली नाही.

11) म्हाडाचे जा.क्र.मु.अ. / उमुअ- जेएनयु आरएम / 778 / 10 / दि.10/11/10 अन्वये केंद्र शासनाने प्रती घरकुल किंमत रु.100000/- निश्चित केली आहे. याकरीता केंद्रशासनाचे अनुदान 80 टक्के म्हणजे रु.80000/- असुन राज्य शासनाचे आरक्षित गटासाठी 10 टक्के व सर्वसाधारण गटासाठी 8 टक्के अनुदान देय आहे. महानगरपालिकेने 651 घरकुलांची किंमत 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार प्रती घरकुल किंमत रु.281510/- ठरविली असुन त्यानुसार ठेकेदारास काम करण्याचा



DRAFT

कार्यादेश देण्यात आलेला आहे. केंद्रशासन व राज्य शासना कडुन या कामासाठी प्रती घरकुल रु.1 लाख मंजुर केले असल्याने प्रत्येक घरकुलाची उर्वरित रक्कम रु.181510/- प्रती X 651 घरकुले प्रमाणे रु.118116301/- तसेच 155 घरकुलांचे काम रु.202500/- दराने मंजुर केल्याने उर्वरित प्रत्येक घरकुलाची रक्कम रु.102500 X 155 घरकुले प्रमाणे रु.15887500/- असे 806 घरकुलांची महानगरपालिका हिश्श्याची एकुण रक्कम रु.134003801/- महानगरपालिकेने स्वनिधी म्हणुन अंदाजपत्रकामध्ये तरतुद करुन खर्च करणे आवश्यक होते. महानगरपालिकेच्या 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता पृष्ठ क्र.61 वर व्दिनोंद क्र.41137 एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम (मनपा हिस्सा) ट्रान्सफर या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या प्रत्यक्ष खर्चाचे आकडे देण्यात आले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने या योजनेवर 2011-12 या आर्थिक वर्षात रु.10262779/- व 2012-13 या आर्थिक वर्षात रु.21284546/- व 2013-14 मध्ये 0 खर्च करण्यात आल्याचे नमुद आहे. या योजनेच्या रोजकिर्दीची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या जनरल फंडामधुन घरकूल योजनेच्या रोजकिर्दीकडे आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये रु.90 लाख, 2012-13 मध्ये रु.1 कोटी 90 लाख व 2013-14 मध्ये रु.5 कोटी 50 लाख वर्ग केले आहेत. परंतु याच्या नोंदी 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये प्रत्यक्ष खर्चाच्या नक्की आकडयाच्या बाजूस चुकीच्या घेण्यात आल्या असल्याने अंदाजपत्रक तयार करताना खर्च करण्यात आलेल्या रक्कमांचे आकडे बरोबर घेण्यात आल्या आहेत किंवा नाही याची काळजीपुर्वक तपासणी लेखा शाखेकडून करण्यात येत नसल्याचे दिसून येते.

12) 2013 -14 या आर्थिक वर्षात 155 घरकुलांचे बांधकामावर रु.14689350/- खर्च झाला आहे. म्हाडाचे जा.क्र.मु.अ. / उमुअ- जेएनयु आरएम / 778 / 10 / दि.10/11/10 अन्वये केंद्र शासनाने प्रती घरकुल किंमत रु.100000/- निश्चित केली आहे. याकरीता केंद्रशासनाचे अनुदान 80 टक्के म्हणजे रु.80000/- असुन राज्य शासनाचे आरक्षित गटासाठी 10 टक्के व सर्वसाधारण गटासाठी 8 टक्के अनुदान देय आहे. 155 घरकुलांचे बांधकामासाठी प्रती घरकुल रु.202500/- खर्च येणार असल्याने महानगरपालिकेने स्वनिधीमधुन रक्कम रु.102500/- प्रती घरकुल इतका खर्च करणे आवश्यक आहे. या कामावर रु.14689350/- खर्च झाला असल्याने अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 49.38 टक्के प्रमाणे रु.7253601/- व स्वनिधीमधून 50.62 टक्क्याप्रमाणे रु.7435749/- खर्च करणे आवश्यक आहे. तसेच 651 घरकुलांचे बांधकामासाठी प्रती घरकुल रु.281510/- खर्च येणार असल्याने महानगरपालिकेने स्वनिधीमधुन रक्कम रु.181510/- प्रती घरकुल इतका खर्च करणे आवश्यक आहे. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये या कामावर एकुण रु.90832252/- खर्च झाला असल्याने अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 35.52 टक्के प्रमाणे रु.32263616/- व स्वनिधीमधून 64.48 टक्क्याप्रमाणे रु.58568636/- खर्च करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे बांधकाम विभागाने देयक तयार करताना मनपा व शासन हिश्श्यामधून टक्केवारी प्रमाणे द्यावयाची रक्कम देयकामध्ये स्वतंत्रपणे दाखवुन लेखा विभागास देयक सादर केलेले नाही. लेखा

DRAFT

विभागाने IHSDP योजनेची रोजकीर्द व बँक खाते स्वतंत्र ठेवले असुन रोजकीर्दीची तपासणी केली असता 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रु.5,50,00,000/- स्वनिधीमधुन IHSDP च्या खात्याकडे वर्ग केले आहेत. या योजनेमधील कामावर 2013-14 मध्ये एकुण 168548600/- खर्च केला आहे. परंतु बांधकाम विभागाने देयक तयार करताना देयकामध्ये शासन हिस्सा व महानगरपालिका हिश्श्याची रक्कम स्वतंत्र दाखविली नसल्याने कोणत्या हिश्श्यामधुन ठेकेदाराची देयके आदा केली आहेत ते समजून येत नाही. या योजनेवर 2013-14 मध्ये एकुण खर्च रक्कम रु. 168548600/- पैकी स्वनिधीमधुन 64.48 टक्केप्रमाणे रक्कम रु.108680137.28 /- खर्च करणे आवश्यक असता रक्कम रु. 5,50,00,000/- खर्च केला असल्याने रक्कम रु.53680137.28/- शासननिधीमधुन जादा खर्च करण्यात आली आहे.

13) या योजनेच्या रोजकीर्दीची तसेच मुख्यलेखाधिकारी यांनी क्र.मनपा/लेखावि/470/2013-14, दि.12/03/2014 रोजी शहर अभियंता यांना अनुदानावरील व्याज रक्कमेबाबत पाठविलेल्या पत्राची तपासणी केली असता, सन 2008 पासून दि.02/03/2014 अखेर या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडुन प्राप्त अनुदानाची रक्कम लेखा विभागाने वेळोवेळी मुदतबंद ठेवीमध्ये गुंतविली असुन त्यापोटी एकुण रक्कम रु.7,00,68,834/- इतके व्याज मिळालेचे निदर्शनास आले आहे. म्हाडाचे पत्र जा.क्र.एमएच/मुअ-1/उमुअ/परीपत्रके/न.क्र.148/1165/13 दि.18/06/2013 नुसार जेएनयुआरएम अंतर्गत केंद्र व राज्य शासनाने वितरीत केलेल्या अखर्चित निधीवरील व्याजाचा परतावा करणेबाबत परिपत्रक काढले आहे. त्यामध्ये 1) केंद्र शासनाच्या संदर्भादिन पत्र क्र.1 ) श्री.राजेशकुमार अवरसचिव नर्म-1 नगरविकास विभाग नवी दिल्ली यांचे पत्र दि.07 मार्च 2013 पत्र अन्वये केंद्राने वितरीत केलेल्या परंतु अखर्चित राहिलेल्या निधीवर राज्य व्याज मिळवित असल्याची बाब कॅग ने निदर्शनास आणलेली आहे. केंद्र शासनाने तपासणी अंती जमा झालेल्या व्याजाचा भरणा विविध लेखाशिर्षाखाली जमा करण्याचे आदेश दिले आहेत. ही जमा झालेली रक्कम मनपा / नपाच्या बँक खात्यात जमा झाली आहे. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यासाठी या कार्यालयाने वित्त नियंत्रक/प्रा.यांना पत्र क्र.एमएच/मुअ-1 /उमुअ/जे/प्रा/न.क्र.30/509/13 दि.06/03/2013 ने कळविले आहे. तथापि ही बाब संबंधित मनपा/नपा च्या निदर्शनास आणुन केंद्र व राज्य शासनाच्या वितरीत निधीवरील जमलेल्या व्याजाचा परतावा केंद्राच्या त्या त्या लेखाशिर्षाखाली करण्याबाबत सुचना करण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर निर्णयानुसार महानगरपालिकेस प्राप्त झालेली व्याजाची रक्कम रु. 7,00,68,834/- शासनाकडे तात्काळ भरणा करणे आवश्यक असता मार्च 2016 अखेर भरणा केलेली नाही.

14) म्हाडाने सांगली महानगरपालिकेस जा.क्र.एमएच/मुअ-2/ उमुअ/काअ-1/जे/प्रा/न.क्र.8अ- III/ 1148/15 दि.04/11/2015 रोजी केंद्र व राज्य शासनाचा अतिरिक्त निधी सव्याज परत करणे बाबत स्मरणपत्र पाठविले आहे. सदर पत्रामध्ये सांगली टप्पा क्र. 2 अंतर्गत सांगली महानगरपालिकेस 3798 घरकुले बांधणेसाठी केंद्र शासनाकडून रक्कम रु.2491.60 लक्ष व राज्य शासनाकडून रक्कम रु.423.64 लक्ष अनुदान वितरीत केले असुन महानगरपालिकेने अंतिम कार्यक्रमाप्रमाणे एकुण 1395

DRAFT

घरकुला पर्यंतच योजना सिमीत केली आहे. त्याप्रमाणे या योजनेची प्रकल्प किंमत अंतिम कार्यक्रमाप्रमाणे केंद्र शासन रु.1830.32 लक्ष व राज्य शासन रु. 311.20 लक्ष झाली असल्याचे पत्रामध्ये नमुद आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेने केंद्र शासनाची रक्कम रु.661.28 लक्ष व राज्य शासनाची रक्कम रु.112.44 तात्काळ सव्याज परत करणेबाबत कळविले आहे. सदर अतिरिक्त निधी म्हाडास वित्त नियंत्रक/ प्रा. बँक ऑफ महाराष्ट्र, कलानगर वांद्रे पूर्व शाखा,मुंबई -51 खाते क्र. 60045295530 या खात्यावर भरणा करणे बाबत कळविले आहे. परंतु महानगरपालिकेने मार्च 2016 अखेर एकुण रक्कम रु.773.72 त्यावरील व्याजासह म्हाडाचे खाती भरणा केलेली नाही.

15) इंदिरानगर घरकुल योजनेची किंमत रु.309880216/- इतकी असुन या कामावर 2013-14 या आर्थिक वर्षाअखेर एकुण रक्कम रु.98176927/- खर्च करण्यात आला आहे. या कामावर 2013-14 अखेर 31.63 टक्के इतकाच खर्च झालेला आहे. ठेकेदारास काम पुर्ण करण्याची मुदत दि.22/05/2014 अखेर दिली असुन कामावर झालेला खर्च पाहता काम संथगतीने चालु असलेचे व काम दिलेल्या मुदतीत पुर्ण होणार नसल्याचे स्पष्ट होते.

वसुलपात्र रक्कम :- मुद्रांक शुल्क रु.140200/- + सेक्युअर्ड व मोबिलायझेशन ॲडव्हान्सवरील कपात न केलेली आयकर रक्कम रु.701326/- + रिटेंशन अमाऊंट रक्कम रु.220340/- + देयकामधुन कपात न केलेली विमा रक्कम रु.2146505/- + प्राप्त अनुदानावरील व्याजाची रक्कम रु.70068843/- + योजना 3798 घरकुलाऐवजी 1395 घरकुलापर्यंत सिमित केल्याने शासनास परत करावयाची रक्कम रु.77372000/- = रु.150649214/-

DATSBKM7201 (Ref No : 107)

## *69 संजय गांधीनगर मिरज स.नं.964/अ येथे 438 घरकूलांचे पायाभुत सुविधासह बांधकाम करणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 10**

*लेखा शीर्ष : बांधकाम केंद्र,राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 818356.00/-

***म्हाडाचे जा.क्र.मु.अ. / उमुअ- जेएनयु आरएम / 778 / 10 / दि.10/11/10 अन्वये केंद्र शासनाने प्रती घरकुल किंमत रु.100000/- निश्चित केली आहे. याकरीता केंद्रशासनाचे अनुदान 80 टक्के, राज्य शासनाचे आरक्षित गटासाठी 10 टक्के व सर्वसाधारण गटासाठी 8 टक्के अनुदान देय आहे. या घरकुलांचे बांधकामासाठी प्रती घरकुल रु.172500/- व मुलभुत सुविधासाठी प्रती घरकूल रु.132180/- असा एकूण रु.304680/- खर्च येणार असल्याने महानगरपालिकेने स्वनिधीमधुन प्रती घरकुल रक्कम रु.204680 /- इतका खर्च करणे आवश्यक***



DRAFT

***आहे. या कामावर 2013- 14 या आर्थिक वर्षामध्ये रु. 22056608/- खर्च झाला असल्याने अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 32.82 टक्के प्रमाणे रु.7238979 /- व स्वनिधीमधून 67.18 टक्क्याप्रमाणे रु. 14817629/- खर्च करणे आवश्यक असता स्वनिधीच्या हिश्श्याची रक्कम खच न करता शासननिधीमधुन रक्कम रु.7578650/- जादा खर्च करण्यात आली असल्याने उर्वरित कामांना निधी अपुर्ण पडणार आहे. 434 घरकुलांचे कामाची किंमत रु.132231120/- इतकी असुन या कामावर 2011-12 ते 2013-14 या आर्थिक वर्षाअखेर एकुण रक्कम रु.73690437 /- खर्च करण्यात आला आहे. या कामावर 2013-14 अखेर 55.72 टक्के इतकाच खर्च झालेला आहे. ठेकेदारास काम पुर्ण करण्याची मुदत मार्च 2014 अखेर दिली असुन कामावर झालेला खर्च पाहता काम मुदतीमध्ये पुर्ण झाले नसल्याचे स्पष्ट होते. कामाचा बार चार्ट घेण्यात आलेला नाही. देयकामधुन उपकर रु.149447,, रिटेंशन अमाऊंट रु.448345/- व विम्याची रक्कम रु. 220564/- अशी एकुण रक्कम रु.818356/- कपात केलेली नाही.***

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत टप्पा क्र. 2 मध्ये 3798 घरकुल बांधणे कामी दि.26 फेब्रु. 2009 रोजी केंद्रिय मान्यता समितीने रु.93.88 कोटी रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. या योजनेसाठी दि.23 मार्च 2008 रोजी केंद्रशासनाकडून 368.33 लक्ष व राज्य शासनाचे 201.54 लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच टप्पा क्र.1 मधील 175 घरकुलासाठी रु.87.68 लक्ष केंद्र शासनाचे व रु.29.60 लक्ष राज्य शासनाचे अनुदान प्राप्त झाले आहे. टप्पा क्र.2 मधील 3798 घरकुलासाठी व्दितीय हप्ता केंद्र शासन रु.2123.267 लक्ष व राज्य शासन 222.10 लक्ष दि.10/10/2011 रोजी प्राप्त झाले आहेत. टप्पा क्र.2 साठी केंद्र व राज्य शासनाकडून एकुण रक्कम रु.29,15,24,000/- प्राप्त झाले आहेत. या प्रकल्पामध्ये मनपा मालकीच्या 5 व शासन मालकीच्या दोन अशा 7 झोपडपट्टीच्या जागेवरील 3798 झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पाच्या प्रस्तावामध्ये एकुण 3798 लाभार्थीची यादी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केली आहे. या एकुण 3798 घरकुलापैकी 2105 झोपडीधारकांना आहे त्याच जागेवर घरकुले दिली जाणार असुन 1693 झोपडीधारकांना त्यांचे लगतच्या प्रस्तावित घरकुलांच्या जागेमध्ये स्थलांतरीत केले जाणार आहे. या योजने अंतर्गत संजयनगर मिरज येथे 438 घरकुलांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. सदरचा मंजुर कार्यक्रम हा 2012 पर्यंत पुर्ण करावयाचा आहे अशा सुचना म्हाडाने दिल्याने व काम तात्काळ सुरु करणे आवश्यक असल्याने या कामाच्या टर्न की बेसीसवर जाहीर निविदा मागविण्यास स्थायी समिती ठराव क्र.535/10-11 दि.04/03/2011 अन्वये मान्यता दिली आहे. या कामाची निविदा सन 2008-09 च्या जिल्हादरसूची नुसार तयार केली असुन प्रती घरकुल दर रु.1.25 लक्ष व पायाभूत सुविधा दर रु.0.75 लक्ष ठरविण्यात आला आहे. त्यानुसार सदर कामाची निविदा नोटीस दि.23/03/2011 चे दै.पुढारी(स्थानिक वर्तमानपत्र ) व दि.24/03/2011 चे दै.लोकमत (राज्यस्तरीय) वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर कामी निविदा फॉर्म विक्री कालावधी दि.28/03/2011 ते दि.25/04/2011 कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे. तसेच

DRAFT

प्री बीड मिटींग दि.18/04/2011 रोजी व निविदा उघडण्याची तारीख दि.29/04/2011 रोजी ठेवण्यात आली आहे. या कामासाठी दोन मक्तेदारांनी अनुक्रमे मे.एस.एफ.चौगुले सांगली व मे.आर.के.मदानी आणि कंपनी,मुंबई यांनी निविदा संच विकत घेतले आहेत. या कामाची निविदा पुर्व बैठक दि.18/4/2011 रोजी घेण्यात आली असुन सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन कॉमन सेट ऑफ डेव्हीएशन तयार करणे आले असुन सदर डेव्हीएशन निविदा प्रक्रीयेचा एक भाग म्हणुन समजणेचा आहे. या कामाच्या निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख दि.29/04/2011 पर्यंत एकच निविदा आली असुन सदर निविदा उघडावी वा निविदा प्रक्रीयेस मुदतवाढ देण्यात यावी याबाबतची टिपणी नगर अभियंता यांनी दि.30/4/2011 रोजी तयार करुन प्रशासनास सादर केली आहे. आयुक्त यांनी या कामाचा कालावधी एक वर्षाचा असल्याने व निविदेमधील प्राप्त दर विचारात घेवून पुढील कार्यवाही करणेसाठी निविदा उघडणेचा आदेश दि.30/04/2011 रोजी दिला आहे. सदर निविदा दि. 02/05/2011 रोजी उघडण्यात आली असुन मे. आर.के मधानी यांचा निविदेमधील आलेला दर प्रती सदनिका रु.3.60 लक्ष (188 टक्के) व पायाभुत सुविधा रु.0.80 (6.67 टक्के) लक्ष आलेला आहे. या दराबाबत वाटाघाटी करणेस ठेकेदारास बोलविण्यात आले असुन ठेकेदाराने दि. 26/05/2011 चे पत्राने प्रती घरकुल रु.210000/- या दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. ठेकेदाराने प्रती घरकुल दिलेला दर हा निविदा दर रु.125000/- पेक्षा 85000/- ने म्हणजे 68 टक्के जादाचा आहे. चालु दरसूची 2010-11 नुसार या कामाची सुधारीत किंमत प्रती घरकुल रु.158836/- होत असून ठेकेदाराने दिलेला दर हा 27 टक्के जादाने आहे. सदर दर हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा नसल्याने निविदा रद्द करुन चालू दरसूची नुसार निविदा मागविण्याची टिपणी (नस्ती मधील टि-15) नगरआभियंता यांनी दि.21/06/2011 रोजी सादर केली आहे. यावर आयुक्त यांनी सदर काम हे विहित कालवधीमध्ये पुर्ण करण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रकीय दराने करणेबाबत नियमांचा अभ्यास करुन सुसंगत प्रस्ताव शहर अभियंता यांनी कराव असा आदेश नस्तीमधील टिपणीवर दि.30/06/2011 रोजी दिला आहे. त्यास अनुसरुन नगरअभियंता यांनी दि.02/07/2011 रोजी प्रस्ताव सादर केला आहे. प्रस्तावामध्ये पर्याय क्र.1 या कामाची चालू जिल्हा दरसूची सन 2010-11 नुसार सुधारीत अंदाजपत्रके तयार करुन पुनश्च अल्पमुदतीच्या निविदा मागविणे, पर्याय क्र. 2 - प्रत्येक कामनिहाय कामाचे भाग पाडून सुधारीत दरसूचीनुसार अंदाजपत्रके तयार करुन निविदा अटीशर्तीनुसार भाग निहाय काम करुन घेणे व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. जा.क्र./मु.अ.र./ उपमुअ.2/जेएनयुआरएम सेल/ /09 दि.2/3/2009 च्या पत्रानुसार आयुक्त यांना प्रदान केलेल्या थेट काम वाटपाचे अधिकारानुसार व कामाचे तुकडे करण्याच्या अधिकारानुसार अंदाजपत्रकीय दराप्रमाणे कामाचे किंमतीनुसार मनपाचे नोंदणीकृत मक्तेदारांना कामाचे थेट वाटप करणे. पर्याय क्र.3 - महानगरपालिकेतर्फे स्वतंत्र यंत्रणा नेमुन विविध बांधकाम साहित्य खरेदी करुन मजुरांची नेमणुक करुन खात्यामार्फत काम करणे असे तीन प्रस्ताव दिले आहेत. पर्याय क्र.1 व 3 मध्ये भविष्यामध्ये अडचण येणार असल्याने पर्याय क्र. 2 प्रमाणे काम करणे सोयीचे होणार असल्याचे नगर अभियंता

DRAFT

यांनी शिफारस केली आहे. त्यानुसार पर्याय क्र. 2 प्रमाणे काम करण्याची शिफारस मुख्य लेखापरीक्षक व उपायुक्त यांनी टिपणीमध्ये केलेने त्यानुसार काम करण्यास आयुक्त यांनी दि.08/7/2011 रोजी मान्यता झाली आहे. त्यानुसार विभागाने दि.08/07/2011 रोजी विषयपत्र तयार करुन स्थायी समितीकडे सादर केले आहे. परंतु स्थायी समिती सभा क्र.8, ठराव क्र.187 दि.29/07/2011 ने या बाबतचा ठराव केला आहे. ठरावामध्ये या योजनेसाठी केंद्र शासनाने अंतिम केलेला कालावधी तसेच राज्य स्तरावर निविदा देवूनही मिळालेला अपुरा प्रतिसाद, पुनश्च निविदा प्रक्रीया राबविल्यामुळे होणारी दिरंगाई किंवा कामाचे विभाजन करुन काम पुर्ण करुन घेतल्यास कामाची गुणवत्ता व जबाबदारी याबद्दलची अनिश्चितता दिसून आल्यामुळे स्थायी समितीने या ठरावाद्वारे या कामासाठी प्राप्त निविदाधारक मे.आर के मधानी आणि कंपनी यांना प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलवून दर सन 2010-11 चे जिल्हा दरसूचीनुसार सुधारीत करुन (रु.157000/-) त्याचेवर 9.50 टक्के जादा दरास मान्यता दिली आहे. सदर ठराव विषयपत्राशी विसंगत असतानाही प्रशासनाने मे.आर.के.मधानी आणि कंपनी यांना दि.26/08/2011 रोजी प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलविले होते. मक्तेदाराने प्रती घरकुल रु.171000/- अधिक 9.50 टक्के जादा दराने तसेच मुलभुत पायाभुत सोयीसुविधासाठी प्रती घरकुल रु.75000 अधिक 6.60 टक्के जादा दराने काम करण्यास तयार असल्याचे दि.29/08/2011 रोजीच्या पत्राने सुचित केले आहे. ठेकेदाराने दिलेला जादाचा दर पाहता महानगरपालिकेस भविष्यात जादा आर्थिक भार सोसावा लागणार असल्याने या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन पुन्हा अल्पमुदतीच्या निविदा काढणे अथवा सुधारीत अंदाजपत्रकीय दराप्रमाणे थेट पध्दतीने इच्छुक मक्तेदारास काम देणे योग्य असल्याची शिफारस नगरअभियंता यांनी दि.29/08/2011 च्या टिपणीने केली आहे. (नस्तीमधील पृष्ठ क्र.टी - 39).आयुक्त यांनी थेट पध्दतीने इच्छुक मक्तेदारास काम देणेचा निर्णय दि.29/08/2011 रोजी घेतला आहे. त्यानुसार मे.अेई इन्फ्रा.प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड ठाणे यांनी घरकुलांचे बांधकाम करणे बाबत तयार असल्याचे पत्र पाठविले आहे. सदर पत्राबरोबर त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, रजिस्ट्रेशन वर्ग (मर्यादा), अनुभवाचा दाखला इत्यादी कागदपत्रे सादर करुन घरकुलाचे काम प्रती घरकुल रु.172000/- व मुलभुत सोयीसुविधा प्रती घरकुल रु.81000/- या दराने टर्न की बेसिसवर करणेस तयार असलेबाबत कळविले आहे. सन 2010-11 च्या दरसूचीनुसार या कामाची किंमत रु.172715/- येत असल्याने ठेकेदारास दर कमी करणेसाठी वाटाघाटीस बोलवून थेट पध्दतीने काम देण्यास हरकत नसल्याची शिफारस शहरअभियंता यांनी दि.29/08/2011 चे टिपणीने केली आहे व त्यानुसार काम करणेस स्थायी समितीची मंजुरी घेणेत यावी असे आदेश आयुक्त यांनी दि.29/08/2011 रोजी दिले आहेत. त्यानुसार दि.29/08/2011 रोजी विषयपत्र तयार करुन स्थायी समितीकडे सादर केले आहे व स्थायी समिती सभा क्र.14, ठराव क्र.285, विषय क्र.ऐन दि. 30/08/2011 ने प्रशासनाने पाठविलेल्या विषयपत्रानुसार मे. अेई इन्फ्रा. प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड ठाणे यांचेकडून प्रती घरकुल रु.172500/- व मुलभुत सोयी सुविधाचे काम प्रती घरकुल रु.81000/- प्रमाणे काम करुन घेणेस मान्यता दिली आहे. (नस्तीमधील पृष्ठ क्र.139)

DRAFT

निविदा मंजुरी समज:- क्र.म.न.पा./सा/बांधावि/189/2011 सार्व. बांधकाम विभाग मुख्यालय, दि.09/9/2011 ने ठेकेदारास दिली असुन या कामाची निविदा रु.111033000/- असुन काम अंदाज पत्रकीय दराने मंजुर केलेने या कामाची सुरक्षा अनामत रु.2220660/- व कामाचे करारपत्र रु. 115000/- रक्कमेच्या मुद्रांकपेपरवर करण्याची समज देण्यात आली आहे.

या कामाचे करारपत्र रु.115000/- मुद्रांकावर दि.13/09/2011 रोजी (Franking ने ) केले असुन कामाची सुरक्षा अनामत रु. 2220660/- पैकी रु.11,11,000/- मात्र पंजाब नॅशनल बँक कडील बँक गॅरेंटी क्रं. 11441LG003 411 दि.12/09/2011 ने महानगरपालिकेकडे सुपुर्द केली आहे. उर्वरित सुरक्षा अनामत होणा-या रनिंग बिलातुन कपात करणेस मान्यता दिली आहे. (पृष्ठ क्र.439)

कामाची वर्क ऑर्डर :- बांधकाम विभागाचे आदेश क्रमनपा/सा/बांधावि/194/2011 विभाग दि.14/09/2011 ने ठेकेदारास वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. (पृष्ठ क्र.423)

कामाची मुदत :- 12 महिने

या कामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबतचे आक्षेप परिच्छेद 2011-12 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण अहवालामध्ये परिच्छेद क्र.93 मध्ये, 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण अहवालामध्ये परिच्छेद क्र.47 मध्ये समाविष्ठ करण्यात आले आहेत.

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणीस करुन अर्धसमास ज्ञापन क्र.108 दि.11/05/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.23/05/2016 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालनाची तपासणी करुन या कामामधील अनियमिततेबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) या नस्तीमधील पृष्ठ क्र.455 वर ठेकेदाराने कामास मुदतवाढ देण्याबाबतचे दि.05/09/2012 रोजी दिलेले पत्र जोडले आहे. सदर पत्रामध्ये मुदतवाढ मागणेची खालील कारणे नमुद केली आहेत.

अ) या कामाची वर्क ऑर्डर दि.14/09/2011 रोजी दिली आहे. परंतु झोपडपट्टया हटवून तसेच इलेक्ट्रीक पोल व विद्युत वाहिन्या हटवून प्रत्यक्षात चार ते पाच महिन्यानंतर जागा ताब्यात दि.03/03/2012 रोजी दिली आहे.

ब) या ठिकाणी 124 क्लस्टरच्या दोन इमारती व 93 क्लस्टरच्या दोन इमारती मिळून एकुण 434 घरकुले बांधवयाची आहेत. परंतु आपण जागेची मोजणी करुन जागा ताब्यात तीन महिन्यांनी दिली आहे. तसेच तीनच इमारतींची जागा ताब्यात दिली आहे. तसेच चौथी इमारत 124 क्लस्टरची असुन सदर इमारत ले आऊट प्लॅनमध्ये बसत नसल्याने या ठिकाणच्या रस्त्यांची रुंदी कमी करुन पुन्हा नविन प्लॅन करुन या इमारतीच्या प्लॅनला महानगरपालिकेने दि. 14/02/2012 रोजी फेर मान्यता दिली आहे. तसेच या घरकुलांचे स्लोपिंग स्लॅब ऐवजी फ्लॅट स्लॅबची मागणी या कामाचे सल्लागार प्रतिनिधी मे. शेल्टर असोशिएशन यांनी केलेने व त्याप्रमाणे काम करण्याचे महानगरपालिकेने ठेकेदारास दि.03/08/2012 रोजी कळविलेचे पत्रामध्ये नमुद आहे. महानगरपालिकेने जागा देण्यास विलंब केल्याने तसेच कामाचे डिझाईनमध्ये बदल केल्याने काम सुरु करण्यास विलंब लागत असल्याचे

DRAFT

पत्रामध्ये नमुद करुन या कामास दि.13/03/2013 अखेर सहा महिन्याची मुदतवाढ मागितली आहे. पुन्हा ठेकेदाराने या कामासाठी वाळू मिळत नसल्याने या कामास दि. 30/06/2012 पर्यंत मुदत वाढ देण्याचे पत्र दि.19/11/2012 रोजी पाठविले आहे. ठेकेदाराने दिलेल्या पत्रामध्ये नमुद केलेली कारणे योग्य असल्याने त्यास मुदतवाढ देण्याबाबतचे विषयपत्र प्रशासनाने तयार करुन महासभेस दि.17/01/2013 रोजी सादर केले आहे व महासभा क्रमांक 10, ठराव क्रं.343 विषय क्र. ऐन दि.19/01/2013 ने दि. 30 जून 2013 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद क्र. 154 नुसार कामाचे एस्टिमेट व डिझाईन तयार करण्यापुर्वी कामाची जागा निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद 251 नुसार कामाची जागा ताब्यात मिळाल्यानंतरच कामाची वर्क ऑर्डर देणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने कामाची जागा ताब्यात मिळण्याचे अगोदरच कामाची वर्क ऑर्डर दिली आहे. ठेकेदारास कामाची जागा उशीराने ताब्यात दिल्याने काम पुर्ण होण्यास विलंब लागत असल्याचे स्पष्ट होते. जागा ताब्यात मिळण्या अगोदर कामाची वर्क आर्डर का देण्यात आली याचा खुलासा बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये केला असुन या कामाची जागा ठेकेदाराच्या ताब्यात देण्यास उशिर झाल्याने मुदतवाढ देण्यात आल्याचे मान्य केले आहे .

2)उपायुक्त यांनी नगरसचिव यांचेकडे दि. 17/01/2013 रोजी संजयनगर घरकुल योजनेच्या कामास जागा ताब्यात घेण्यास विलंब लागल्याने तसेच ठेकेदाराकडून घरकुलांचे बांधकाम समाधानकारक रितीने चालू असल्याने योजनेच्या कामास 30 जुन 2013 अखेर मुदतवाढ देण्याची मागणी विषयपत्राने केली आहे व महासभा ठराव क्र. 343 दि.19/01/2013 मध्ये सध्या सदर जागेवर 434 घरकुलांचे काम प्रगतीपथावर सुरू असुन 124 क्लस्टरच्या दोन इमारतींचे आर.सी.सी.काँक्रीटचे काम पुर्णत्वास आले आहे. 93 घरकुलांच्या एका इमारतीचे तीन स्लॅब पुर्ण झाले असुन दुस-या इमारतीचे पहिल्या मजल्याचे स्लॅब पुर्ण झाले असुन इतर बांधकामे प्रगतीत असल्याचे नमुद करून ठेकेदारास दि.30/06/2013 अखेर मुदतवाढ देण्याची प्रशासनाने विषयपत्राने केलेली मागणी मान्य करण्यात आली आहे. या वरुन या योजनेचे काम संथगतीने चालू असल्याचे दिसून येते. या बाबत दिलेल्या अनुपालनामध्ये सांगली शहरामध्ये 2 वर्ष वाळूचा पुरवठा होत नसल्याने कामाच्या प्रगतीवर परिणाम झाल्याचे नमुद आहे. परंतु त्याबाबतची अनुषंगिक कागदपत्रे सोबत जोडली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

3) कामाच्या नस्तीचे अवलोकन केले असता, ठेकेदाराने दि.24/03/2012 चे पत्राने महानगरपालिकेने जागा ताब्यात देण्यास विलंब केल्याने सिमेंट व स्टीलच्या भाववाढीची मागणी केली आहे व त्यानुसार ठेकेदारास भाववाढ देण्याबाबतची टिपणी शहर अभियंता यांनी दि.17/04/2012 रोजी प्रशासनाकडे सादर केली आहे. आयुक्त यांनी त्यांचे निर्णयामध्ये कामास विलंब झालेने ठेकेदारास जर भाववाढ दिली नाही तर तो काम सोडून जाण्याची शक्यता असल्याने इंदिरानगर मिरजच्या धर्तीवर भाववाढ देण्याचे प्रकरण महासभेकडे विचारार्थ ठेवण्याचे आदेश दि. 13/03/2013 रोजी दिले आहेत. त्यानुसार

संजयनगर झोपडपट्टी येथे 434 घरकुलांचे बांधकामासाठी सिमेंट व स्टील याबाबीवर जिल्हादरसूची 2012-13 नुसार दरवाढ देणे तसेच मुलभुत सोयीसुविधाचे प्रती घरकुल रु.81000/- मात्र हे दर जिल्हा दरसूची 2010-11 वर अधारित होते ते दर नविन जिल्हादरसूची 2012-13 प्रमाणे सुधारित करून देणे बाबतचे विषयपत्र उपायुक्त यांनी नगरसचिव यांचेकडे महासभेस सादर करणेसाठी दि.16/03/2013 रोजी पाठविले आहे. तसेच सदर बाबीमुळे प्रती घरकुल मुलभुत सोयीसुविधांचे किमतीत रु.51180/- वाढ होणार असल्याचे विषयपत्रामध्ये नमुद केले आहे. महासभा ठराव क्र. 12 , ठराव क्र.462, विषय क्र.ऐन, दि.20/03/2013 ने प्रशासनाने पाठविलेल्या विषयपत्रानुसार भाववाढ देणेस तसेच मुलभुत सोयीसुविधाचे काम पुर्ण करण्यास मार्च 2014 पर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेशित केले आहे. मुलभुत सोयीसुविधा कामाच्या दरामध्ये वाढ केल्यास महानगरपालिकेवर किती रक्कमेचा आर्थिक भार पडणार आहे व तो खर्च महानगरपालिका कोणत्या लेखाशिर्षामधुन करणार आहे या बाबतच्या खर्चाची तरतुद अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक असता ती न करताच ठेकेदारास भाववाढ देण्याचा ठराव करण्यात आला आहे.

4) महासभा ठराव क्र.462 दि.20/03/2013 नुसार काम करण्याबाबतचे पत्र क्र.मनपा/सा/ नादानिका / 1/79/13-14 शहर अभियंता, शहरी दारीद्र्य निर्मुलन कक्ष दि. 01/06/2013 यांनी ठेकेदारास दिले आहे. पत्रामधील अट क्र. 6 मध्ये आपले मागणीप्रमाणे जिल्हादरसूचीनुसार भाववाढ देण्यात आली असल्याने यापुढे देय होणारी नव्याने कोणतीही भाववाढ दिली जाणार नाही. तशी लेखी हमी आपण महानगरपालिकेस देण्याची असल्याचे नमुद आहे. त्याप्रमाणे भाववाढ न मागण्याची लेखी हमी ठेकेदाराकडून घेतल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये दिसून येत नाहीत.

5) शहर अभियंता, दारिद्र्य निर्मुलन कक्षाने ठेकेदारास दिलेल्या दि.01/06/2013 रोजीचे पत्रामधील अट क्र. 8 नुसार प्रस्तावित कामापैकी उर्वरित कामे मार्च 2014 पर्यंत पुर्ण करणेचा बार चार्ट हे पत्र मिळताच 10 दिवसात सादर करणेचा आदेश ठेकेदारास दिला आहे. परंतु नस्तीची तपासणी केली असता ठेकेदाराकडून बारचार्ट घेतला असलेचे दिसून येत नाही. तसेच नस्तीची तपासणी केली असता नगरअभियंता यांनी क्र.मनपा/सा/नादनिका/1/353/14-15 दि. 02/01/2014, क्र.मनपा/सा/ नादनिका / 1/386/14-15 दि. 28/01/2014, क्र.मनपा/सा/नादनिका/1/468/14-15 दि. 12/03/2014 या पत्राने ठेकेदारास कामाचे संथगतीबाबत पत्रे पाठविण्यात आली आहेत. सदर पत्रामध्ये 248 घरकुलांचे काम पुर्णत्वाच्या मार्गावर असुन 93 क्लस्टरच्या 2 इमारतींचे काम प्रगतीपथावर असल्याचे तसेच पुर्व बाजुच्या 93 क्लस्टरच्या दुस-या मजल्याचा स्लॅब अद्याप टाकण्यात आलेला नसल्याचे नमुद आहे. सदर घरकुलांचे काम मार्च 2014 पर्यंत परीपुर्ण रित्या पुर्ण करण्याचे असून अद्यापही मुलभुत सोयी सुविधाची काही कामे सुरु होणेची आहेत ती सत्वर सुरू करण्याच्या सुचना नगरअभियंता यांनी पत्राद्वारे ठेकेदारास केल्या आहेत. यावरुन सदर योजनेचे काम मार्च 2014 अखेर पुर्ण होणार नसल्याचे स्पष्ट होते. तसेच या कामाची मुदत मार्च 2014 अखेर असल्याने या बाबतचा बार चार्ट तात्काळ सादर करणेत यावा व कामे विहित मुदतीत पुर्ण न झाल्यास निविदा अटी शर्तीनुसार

DRAFT

दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल असे पत्रामध्ये नमुद आहे. बांधकाम विभागाने ठेकेदाराकडून बारचार्ट घेवून त्या प्रमाणे काम करुन घेणे आवश्यक असता बार चार्ट घेवून त्याप्रमाणे कामाची प्रगती राहिल असे पाहिले नसल्याने काम पुर्ण होण्यास विलंब लागत असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच ठेकेदाराने काम विहित वेळेत पुर्ण केले नसल्याने निविदा शर्तीप्रमाणे त्याचेवर कोणती दंडात्मक कार्यवाही केली याचा खुलासा बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये केला असुन सांगलीमध्ये नैसर्गिक वाळुचा पुरवठा होत नसल्याने काम करण्यास विलंब लागत असल्याचे तसेच कामास मार्च 2017 पर्यंत मुदतवाढ दिल्याने दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नसल्याचे नमुद आहे. परंतु ठेकेदाराकडून बारचार्ट घेवून त्याप्रमाणे काम का करण्यात आलेले नाही तसेच कोणत्या कारणासाठी मार्च 2017 अखेर ठेकेदारास मुदतवाढ दिली आहे, मुदतवाढीबाबत महासभेचा झालेला ठराव इ. अनुषंगिक कागदपत्रे अनुपालनासोबत जोडण्यात आलेली नाहीत. या कामाची वर्क ऑर्डर दि.14/09/2011 रोजी देण्यात आली असुन ठेकेदाराकडून काम विहित वेळेत पुर्ण करुन न घेता वारंवार मार्च 2017 अखेर मुदतवाढ दिल्याने बांधकाम 5 वर्ष अपुर्ण राहणार असल्याने शहरामधील झोपडपट्टीधारकांना घरकुल बांधुन देण्याचा हेतु साध्य झाला नसल्याचे स्पष्ट होते.

6) ठेकेदारास मुलभुत सोयीसुविधाचे काम सन 2012-13 च्या दरसूचीनुसार दिलेने या कामाच्या किंमतीमध्ये रु.51180/- प्रती घरकुल इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे 434 घरकुले x रु.51110/- = रु.22212120/- या जादा रक्कमेवर मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. महसूल व वनविभाग अधिसुचना दि.23/4/2006अन्वये मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34, तसेच नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचेकडील जा.क्र.12 /कलम/ मुं.मुं.शु./113/09 दि.20/7/2009 नुसार कार्यकंत्राटासंबधीत करारनामा रु.10 लाख पर्यंत रु.100 व पुढील प्रत्येक लाखास रु.100 व जास्तीत जास्त 5 लाख पर्यंत मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. याप्रमाणे ठेकेदाराने मुद्रांक शुल्क रक्कम रु.20300/- चा भरणा केलेला नाही. ठेकेदाराच्या देयकामधुन रक्कम रु.20,300/- कपात करण्यात बाबत दिलेल्या अनुपालनामध्ये मुद्रांक शुल्काची रक्कम कपात करण्याचे मान्य करण्यात आले आहे.

7) ठेकेदाराने या कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु. 2220660/- पैकी रक्कम रु.1111000/- पंजाब नॅशनल बँककडील बँक गॅरेंटी नं.11441LG003441 दि.12/09/2011 रोजी महानगरपालिकेकडे सुपुर्द केली आहे. उर्वरित सुरक्षा अनामत रक्कम धावत्या देयकामधुन कपात करावयाची आहे. सदर बँक गॅरेंटीची तपासणी केली असता बँक गॅरेंटीची मुदत दि. 12/09/2013 अखेर आहे. कामाची मुदत मार्च 2014 अखेर असल्याने बँक गॅरेंटीची मुदत वाढवुन घेणे आवश्यक आहे. नुतनीकरण केलेली बँक गॅरेंटी लेखापरीक्षणास दाखविली नसल्याने त्याची विधीग्राह्यता तपासता आली नाही.

8) आर्थिक वर्ष 2013 -14 मध्ये घरकुलांचे कामावर रक्कम रु. 22056608/- इतका खर्च झाला आहे. म्हाडाचे जा.क्र.मु.अ. / उमुअ- जेएनयु आरएम / 778 / 10 / दि.10/11/10 अन्वये केंद्र शासनाने प्रती घरकुल किंमत रु.100000/- निश्चित केली आहे. याकरीता केंद्रशासनाचे अनुदान 80 टक्के म्हणजे रु.80000/- असुन राज्य शासनाचे आरक्षित गटासाठी 10 टक्के व सर्वसाधारण गटासाठी 8 टक्के

अनुदान देय आहे. या घरकुलांचे बांधकामासाठी प्रती घरकुल रु.172500/- व मुलभुत सुविधासाठी प्रती घरकूल रु.132180/- असा एकूण रु.304680/- खर्च येणार असल्याने महानगर पालिकेने स्वनिधीमधुन प्रती घरकुल रक्कम रु.204680 /- इतका खर्च करणे आवश्यक आहे. या कामावर 2013- 14 या आर्थिक वर्षामध्ये रु. 22056608/- खर्च झाला असल्याने अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 32.82 टक्के प्रमाणे रु.7238979 /- व स्वनिधीमधून 67.18 टक्क्याप्रमाणे रु. 14817629/- खर्च करणे आवश्यक आहे. बांधकाम विभागाने देयक तयार करताना मनपा व शासन हिश्श्यामधून टक्केवारी प्रमाणे द्यावयाची रक्कम देयकामध्ये स्वतंत्रपणे दाखवुन लेखा विभागास देयक सादर केलेली नाही. तसेच ठेकेदारास आदा केलेली देयके शासननिधीमधुनच खर्ची टाकण्यात आल्याने शासन निधीतुन रक्कम रु.14817629/- जादा खर्च करण्यात आल्याचे स्पष्ट होते. या वित्तिय अनियमिततेमुळे योजना पुर्ण होण्यासाठी निधीची कमतरता पडणार असल्याचे दिसून येते. स्वनिधीमधुन रक्कम खर्च करण्यात आली नसलेबाबतचा खुलासा बांधकाम विभागाने केला असुन वाढीव खर्च महानगरपालिकेस करावा लागणार असल्याने विगतवारी करण्यात आली नसल्याचे अनुपालनामध्ये नमुद आहे. परंतु बांधकाम व लेखाविभागाने ठेकेदाराची देयके आदा करताना शासन व स्वनिधीच्या हिश्श्याप्रमाणे आदा करणे आवश्यक असल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

09) संजयगांधी घरकुल योजनेमध्ये 434 घरकुलांचे कामाची किंमत रु.132231120/- इतकी असुन या कामावर 2011-12 ते 2013-14 या आर्थिक वर्षाअखेर एकुण रक्कम रु.73690437 /- खर्च करण्यात आला आहे. या कामावर 2013-14 अखेर 55.72 टक्के इतकाच खर्च झालेला आहे. ठेकेदारास काम पुर्ण करण्याची मुदत मार्च 2014 अखेर दिली असुन कामावर झालेला खर्च पाहता काम मुदतीमध्ये पुर्ण झाले नसल्याचे स्पष्ट होते. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये कामास विलंब लागत असल्याची बाब मान्य करण्यात आली आहे.

10) 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये ठेकेदारास आदा केलेल्या धावत्या देयकांची तपासणी केली असता (**परिशिष्ठ क्र.16** )मध्ये नमुद केल्या प्रमाणे उपकराची 1 टक्के प्रमाणे रक्कम रु.149447/- रिटेंशन अमाऊंट रक्कम 3 टक्के प्रमाणे रु.448345 व 1 टक्केप्रमाणे विम्याची रक्कम रु.220564/- अशी एकुण रक्कम रु.818356 /- देयकामधुन कपात करणे आवश्यक असता सदर रक्कम देयकाच्या प्रदानातुन कपात केलेली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदरची पुढील देयकामधुन वसुल करण्याचे मान्य केले आहे.

**वसुलपात्र रक्कम :-** मुद्रांक शुल्क रु.20300/- + उपकर रक्कम रु.149447/- + विमा रक्कम रु.220564/- + रिटेंशन अमाऊंट रक्कम रु.448345 = रु.818356/-

DATSBKM7201 (Ref No : 108)

## *70 माळबंगला येथे 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे आधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**UIDSSMT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 21**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र,राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 79893200.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 655986.00/-

***जागा महानगरपालिकेच्या मालकीची नसतानाही त्या ठिकाणी काम चालु केल्याने जागेच्या मालकी बाबत वाद निर्माण होवून जागा खरेदीपोटी जागा मालकास रक्कम रु.6 कोटी 93 लाख द्यावे लागले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण 8 नगरपालिकेची मालमत्ता, मालमत्तेचे संपादन मधील कलम 76, (1) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, महानगरपालिकेस, स्थावर व जंगम मालमत्ता किंवा तीच्यातील कोणताही हितसंबंध संपादन करण्याचा अधिकार असल्याने सदर जागा खरेदीची रक्कम जमीन मालकास देताना सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक असता ती घेण्यात आलेली नाही. ठेकेदारास कामाची देयके आदा करताना स्वनिधीमधुन 40.42 टक्के हिश्श्याप्रमाणे रक्कम आदा न करता रक्कम रु.39807516/- शासन निधीमधुन आदा केली आहे. जागेची खरेदी केल्यानंतरही जमीनीचे 7/12 उता-यावर महानगरपालिकेचे नाव मार्च 2016 अखेर लागलेले नाही. देयकामधुन स्थानिक संस्था कर, कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.655986/- कपात केलेली नाही. कामाची मुदत दि.12/03/2014 अखेर असुन मार्च 2014 अखेर 32 टक्केच रक्कम खर्च झालेली असल्याने काम पुर्ण होण्यास विलंब लागणार आहे.***

केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजने अंतर्गत सादर करण्यात आलेल्या सुधारित अंदाजपत्रकात 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधण्याचे काम प्रस्तावित आहे. उपरोक्त काम करणेसाठी आयुक्त यांचे दि.25/03/2010 च्या मंजूरीने दि.27/03/2010 रोजीच्या दै.इंडियन एक्सप्रेस व दै.पुढारी या वर्तमानपत्रात जाहिरात देवून ठेकेदाराकडून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मागविण्यात आला होता. सदर निविदा ही बी- 2 प्रकारची असुन त्यामध्ये भाग 1 साठी ज्या ठेकेदारांनी त्यांच्या नोंदणीसाठी अर्ज केले होते त्यांचे अर्जाची छाननी करुन पात्र ठेकेदारांची यादी स्थायी समितीकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आली व त्यास स्थायी समितीने ठराव क्र.127 दि.12/07/2010 ने मान्यता दिली आहे. या कामाचा समावेश पॅकेज क्र.4.1 मध्ये करण्यात आला असून त्यासाठी पात्र ठेकेदार पुढील प्रमाणे आहेत. 1)मे.व्हीयोलिया वॉटर इंडिया लिमिटेड, दिल्ली 2) मे.व्हॅटेक व्हॅबॅग लिमिटेड, चेन्नई 3) मे.नागार्जून कन्सट्रक्शन कंपनी, हैद्राबाद,4) मे.प्रतिभा सॅलकॉन लि.मुंबई 5)मे.घारापुरे इंजि.सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे 6) मे.लक्ष्मी इंजि.सर्व्हिसेस लिमिटेड, कोल्हापूर 7) मे.एस.एम.सी इन्फ्रा. लिमिटेड, ठाणे. वरील सर्व ठेकेदारांना कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांचे पत्र क्र.707 दि.08/11/2011 अन्वये बीड डॉक्यूमेंट विकत घेणे बाबत कळविणेत आले होते. त्यास अनुसरुन पुढील ठेकेदारांनी बिडींग डॉक्यूमेंट्स विकत घेतले आहे. 1)मे.व्हीयोलिया वॉटर इंडिया

लिमिटेड, दिल्ली,2) मे.व्हॅटेक व्हॅबॅग लिमिटेड, चेन्नई,3) मे.प्रतिभा सॅलकॉन लि.मुंबई 4)मे.घारपुरे इंजि.सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे 5)मे.लक्ष्मी इंजि.सर्व्हिसेस लिमिटेड, कोल्हापूर 6) मे.एस.एम.सी इन्फ्रा. लिमिटेड ठाणे. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांचे पत्र क्र.763 दि.28/11/2011 अन्वये दि.02/12/2011 रोजी निविदा पूर्व बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये कांही ठेकेदारांनी निविदा पत्रांचा आणखी अभ्यास करणेसाठी दुसरी प्रिबिड बैठक आयोजित करण्याची विनंती करण्यात आली त्याप्रमाणे दुसरी प्री बिड बैठक दि.15/12/2011 रोजी आयुक्त यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये ठेकेदारांनी उपस्थितीत केलेल्या मुद्दयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच ज्या ठेकेदारांनी लेखी मुद्दे उपस्थितीत केले आहेत त्यांना लेखी उत्तरे देण्यात आली आहेत. या कामाची निविदा सादर करण्याची अंतिम दि.10/01/2012 होती. त्यानुसार तीन निविदाधारक 1) मे.घारपुरे इंजि.सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे 2)मे.लक्ष्मी इंजि.सर्व्हिसेस लिमिटेड, कोल्हापूर 3)मे.एस.एम.सी इन्फ्रा. लिमिटेड, ठाणे. यांनी निविदा भरुन सादर केल्या आहेत. सदर निविदेचे तांत्रिक लखोटे दि.12/01/2012 रोजी उघडण्यात आले असून यामध्ये तिन्हीही उमेदवार पात्र झाल्याने त्यांचे दराबाबतचा लखोटा 20/01/2012 रोजी उघडण्यात आला. सदर निविदा ही दोन भागामध्ये विभागलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | ठेकेदाराचा देकार (रुपये) | | एकूण (रुपये) |
|---|---|---|---|---|
| | | जलशुध्दीकरण केंद्र बांधणे | 10 वर्ष देखभाल दुरूस्ती | |
| 1 | मे.लक्ष्मी इंजि.सर्व्हि.लि.कोल्हापूर | रु.3075 लक्ष | रु.2177 लक्ष | रु.5252 लक्ष |
| 2 | मे.घारपुरे इंजि.सर्व्हि. लि. पुणे | रु.3215 लक्ष | रु.2232 लक्ष | रु.5447 लक्ष |
| 2 | मे.एस.एम.सी.इन्फ्रा लि.ठाणे | रु.3114 लक्ष | रु.2325 लक्ष | रु.5739 लक्ष |

भाग 1 :- 70 दशलक्षलिटर क्षमतेचे आधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे:- या कामाच्या नस्तीमधील (पृष्ठ क्र. टी 13 ) वर केंद्रशासनाने UIDSSMT प्रकल्पांतर्गत मंजुर केलेला मुळ प्रस्ताव सुधारीत करुन त्यामध्ये 70 दललि क्षमतेचा अत्याधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाचा समावेश करण्यात आला आहे. कामाचे दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मंजूर दरसूचीमध्ये नसल्याने अत्याधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणा-या ठेकेदाराकडून दर मागवून अंदाजपत्रकामध्ये तशी तरतुद करण्यात आली होती. 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणेसाठी मागविण्यात आलेल्या कोटेशनप्रमाणे सन 2009 -10 साठी दोन प्रकारचे दर प्राप्त झाले आहेत. त्यानुसार अधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाची किंमत रु.2500 लक्ष होती. तसेच अधुनिक जलशुध्दिकरण केंद्र बांधणे, रिसर्क्यूलेशन व स्लज ट्रिटमेंटसह कामाची किंमत रु.3150 लक्ष होती. मूळ योजना ही सन 2005-06 च्या दरसूचीवर आधारलेली होती. सबब राज्य समन्वय समितीने तांत्रिक बदलास मान्यता



DRAFT

देताना नव्याने समावेश केलेल्या कामांना देखील सन 2005-06 च्या दरसूचीनुसार मान्यता दिली आहे. सदर योजनेच्या बदलास Govt. of India ,Ministry of Urban Development , Encloser to Note No. Q12045 / 15/ 2/ UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे. त्यामध्ये सन 2009-10 च्या मजिप्रा चे दरसूचीनुसार या कामाची किंमत रु.2500 लक्ष दर्शविण्यात आली आहे .तसेच संपूर्ण योजनेमध्ये करण्यात येणा-या कामांची एकूण सुधारित appraised cost रु.14597.05 लाख या रक्कमेला मान्यता दिली आहे. 2005-06 या वर्षीच्या दरसूचीनुसार योजनेची मुळ किंमत रु.7902/- लाख व सुधारित किंमत रु.14597.05 लाख या मधील फरक रक्कम रु.6695/- लाख रक्कमेची तरतुद राज्यशासन व महानगरपालिका यांनी स्वनिधीमधुन करण्याबाबत या पत्रामध्ये नमुद आहे.

सदर नस्तीमधील पृष्ठ क्र. टि 13 वरील टिपणीमध्ये खालील प्रमाणे नमुद आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसूचीमध्ये पारंपारीक पध्दतीचा जलशुध्दीकरण केंद्र बांधणे एवढयाच बाबीचा समावेश आहे. परंतु महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये अत्याधुनिक असे तंत्रज्ञानाचा वापर करुन संपुर्ण जलशुध्दीकरण केंद्र Automisation (SCADA), Recirculation of filter back wash water,sludge treatment,Compound wall बांधणे, land scaping करणे अशा कामांचा समावेश आहे. तसेच निविदेची चालू दराशी तुलना केली असून त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

1) सन 2005-06 नुसार जलशुध्दीकरण केंद्राची अंदाजपत्रकीय किंमत रु.2036.27 लक्ष

2) सन 2009-10 च्या कोटेशननुसारची किंमत रु.3150 लक्ष

3)सन 2011 च्य सरासरी प्राइस इंडेक्सवर अधारीत एस्कलेटेड किंमत :- रु.3309.93 लक्ष

4) मे.लक्ष्मी सिव्हील इंजि.सर्व्हीस लि.यांचा भाग -1 साठीचा निविदा देकार :- रु.3075 लक्ष

5) सन 2005-06 च्या अंदाजपत्रकीय किमतीशी तुलना करता ठेकेदाराचा दर :- 51.1 टक्के जादा

6) सन 2009-10 च्या कोटेशन दराशी तुलना करता ठेकेदाराचा दर :- 2.44 टक्के कमी

7) सन 2011 च्या सरासरी प्राइस इंडेक्स अधारित किमतीशी तुलना करता ठेकेदाराचा दर :- 7.64 टक्के कमी

या जलशुध्दीकरण केंद्राच्या बांधकामासाठी 2005-06 च्या दरसूचीनुसार रु.2032.27 लक्ष एवढा निधी प्राप्त होणार असून वाढीव किमतीच्या 50 टक्के निधी शासनाकडून व 50 टक्के निधी महानगरपालिकेस स्वनिधीमधून उभारावा लागणार आहे. ठेकेदाराचा दर चालू बाजारभावाशी तुलना करीता 7.64 टक्के कमीने असल्याने निविदा मंजूरीची शिफारस पाणीपुरवठा विभागाच्या टिपणीमध्ये केली आहे. टिपणीमधील पृष्ठ क्र. टी-15 व टी 17 वर कार्यकारी अभियंता यांनी आपले अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार योजना तयार करताना मे.DRA कन्सल्टंट नागपूर यांनी दोन कंपन्यांचे कोटेशन मागवून सन 2009-10 मध्ये दर निर्धारित केले आहेत. त्यानुसार ऑप्शन क्र. 2 नुसार 70 MLD अत्याधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाचे कोटेशन 31.50 कोटी एवढे होते. निविदा ऑप्शन क्र.2 ने मागविण्यात आल्या आहेत .तसेच दि.31/01/2012 रोजी झालेल्या SLSC च्या 13 व्या

DRAFT

मिटींगमध्ये तांत्रिक बदलास मान्यता दिली आहे. UIDSSMT अंतर्गत प्रथम निविदा स्विकृत केली त्यावेळी म्हणजेच सन 2008-09 च्या दरसूचीवर फरक देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार (2008-09) 70 MLD WTP ची किंमत रु.2594.10 लक्ष येते.

1) 2005-06 नुसार 70 MLD WTP ची मंजूर किंमत :- रु.2036.27 लक्ष

2) 2008-09 नुसार 70 MLD WTP ची मंजूर किंमत :- रु.2594.10 लक्ष

3)सन 2005-06 व सन 2008-09 मधील फरक (1-2) :- 557.83 लक्ष

4) शासन निर्णय क्र.NVR-2009/let.No.127/09/नवि-33 मुंबई दि.31/08/2009 नुसार शासनाकडून देय रक्कम रु.278.91 लक्ष (50 टक्के)

5) महानगरपालिकेचा हिस्सा 50 टक्के रु. 278.91 लक्ष (50टक्के)

6)सन 2008-09 च्या दराशी ठेकेदाराच्या दराशी तुलना करता जास्तीचा पडणारा भार :-

रु.(3075 - 2036) - रु.278.91 = रु.759.82 लक्ष

वरील 1 ते 6 बाबींचा विचार करता याकामासाठी महानगरपालिकेला रु.2315.18 लक्ष एवढे अनुदान प्राप्त होईल व रु.759.82 लक्ष महानगरपालिकेला स्वनिधीमधून टाकावे लागतील असे टिपणीमध्ये नमूद आहे. आयुक्त यांनी दि.22/03/2012 रोजी ठेकेदारास वाटाघाटीस बोलविण्याचे आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे ठेकेदाराबरोबर वाटाघाटी करण्यासाठी दि.26/03/2012 रोजी बैठक झाली त्यामधील चर्चेनुसार ठेकेदाराने त्यांचे पत्र क्र.629 दि.31/03/2012 अन्वये दिलेले दर योग्य असून कमी करणे शक्य नसल्याचे कळविले आहे. याबाबत पुन्हा दि.11/06/2012 व दि.18/06/2012 रोजी आयुक्त यांचे दालनात झालेल्या चर्चेअंती देखील ठेकेदाराने दर कमी करण्यास नकार दिला आहे. उपायुक्त, पाणी पुरवठा विभाग यांचे दि.17/07/2012 चे विषयपत्रानुसार, स्थायी समिती सभा क्र.10, ठराव क्रमांक.154, विषय क्र.07, दि.24/07/2012 (पृष्ठ क्र.319) ने ठेकेदार मे.लक्ष्मी सिव्हील इंजि . सर्व्हीस लि.यांची सर्वात कमीचा देकार (भाग 1) जलशुध्दीकरण बांधणेसाठी रु.3075 लक्ष या दराने करुन घेण्यास तसेच वाढीव खर्चासाठी मान्यता दिली आहे. वाढीव खर्चाच्या मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करावा व महापालिका हिश्श्याची तरतुद अर्थसंकल्पात करावी असा सभेने ठराव केला आहे. तसेच (भाग 2) केंद्राचे वर्षासाठी देखभाल दुरुस्तीसाठी रु.2177 लक्ष दराने आलेली निविदेचा निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे देखभाल दुरुस्तीचा ठेका प्लँटचे काम पूर्ण झाल्यानंतर ठेकेदाराने निविदा शर्तीनुसार प्लँट चालवून योग्य त्या चाचण्या घेवून तो सुरळीत चालू झाल्यानंतर महापालिकेस हस्तांतरण करावा असा ठराव स्थायी समितीने केला आहे.

या कामाची समज, कार्यकारी अभियंता यांनी पत्र क्र/मनपा/पापुवि/सांगली/411/2012-13 दि.10/08/2012 ने ठेकेदारास दिली असून परफॉर्मन्स सिक्युरिटी स्विकृत निविदेच्या 5 टक्के प्रमाणे (बँक गॅरेंटी स्वरुपात 2.5 टक्के व होणा-या देयकामधून 2.5 टक्के) प्रमाणे भरणा करुन करारपत्र करणे बाबत ठेकेदारास कळविले आहे. त्याप्रमाणे ठेकेदाराने कर्नाटका बँकेची बँक गॅरेंटी क्र.BG/54/12 दि.13/08/2012 ,रु.7688000/- w.e.f. 13/08/2012 to 12/08/2014 कार्यालयास

दि.13/08/2012 रोजी सादर केली आहे.

या कामाची मंजूर निविदा रु.3075 लक्षची असून करारनामा रु.3,07,000/- किंमतीच्या स्टँप पेपरवर दि.27 ऑगष्ट 2012 रोजी केलेला असून करारनाम्यावर महानगरपालिकेचे सिल दि.30/08/2012 रोजी लावले असून उपायुक्त यांची स्वाक्षरी दि.10/09/2012 रोजी झाली आहे.(पृष्ठ क्र.353)

अंदाजपत्रकीय खाते :- 003) इतर योजना 41221- लहान व मध्यम शहरांच्या पायाभुत विकास योजनेसाठी केंद्रशासनाकडून आलेल्या अनुदानातुन होणारा खर्च

आर्थिक तरतुद रु.41 कोटी

कामाची वर्कऑर्डर :- कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/पापुवि/सां / 524 /12-13 दि.13/09/2012

कामाची मुदत :- पावसाळ्यासह 18 महिने. (दि.12/03/2014)

प्रथम मुदतवाढ :- दि.12/10/2014

दुसरी प्रस्तावित मुदतवाढ :- दि.28/02/2016 (पाणीपुरवठा विभागाने मुदतवाढ प्रस्तावित केली आहे. जानेवारी 2016 अखेर सदर मुदतवाढ नस्ती आयुक्त यांचेपर्यंत गेलेली नाही)

2013-14 या आर्थिक वर्षामध्ये या कामाची देयके खालील प्रमाणे देण्यात आली आहेत.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रु. | मोज.पुस्तक व पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| 1 | 7 | 12/09/2013 | 5775000 | 31, पृष्ठ क्र.13 ते 24 |
| 2 | 13 | 12/09/2013 | 50857500 | 31, पृष्ठ क्र.25 ते 31 |
| 3 | 32 | 17/2/2014 | 41852201 | 31, पृष्ठ क्र.32 ते 86 |
| | | एकूण | 98484701 | |

या कामाची नस्ती, टेंडर फाईल, करारपत्रे, प्रमाणके, मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) या कामाची निविदा जाहिरात दि. 27/03/2010 रोजी काढण्यात आली आहे. UIDSSMT या योजने अंतर्गत करण्यात येणार असलेल्या कामांना केंद्रशासनाकडून सप्टेबर 2006 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या नंतर योजनेमध्ये बदल करुन या योजनेस केंद्रशासनाची सुधारीत प्रशासकीय मान्यता दि.08/12/2011 रोजी घेण्यात आली आहे. 70 MLD अत्याधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाचा समावेश 2006 रोजी केंद्राने मंजूरी दिलेल्या योजनेमधील कामामध्ये करण्यात आलेला नव्हता. या कामाचा समावेश महानगरपालिकेने सुधारीत योजनेमध्ये करुन त्यास केंद्रशासनाची मान्यता दि.08/12/2011 रोजी घेतलेली आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील कलम 255 मध्ये कामाची संकल्पचित्रे, एस्टिमेट व अर्थसंकल्पीय तरतुद शासनाकडून मंजूर असलेशिवाय कोणतेही काम करु नये असे नमूद आहे. सदर कामाचा समावेश केंद्रशासनाच्या UIDSSMT योजनेमध्ये होण्यापूर्वीच या कामाची निविदा दि.27/03/2010 रोजी काढण्यात आली आहे.

2) कामाची निविदा जाहिरात प्रसिध्द दि.27/03/2010, पात्र ठेकेदारांची यादी मंजूर दि.12/07/2010, पात्र ठेकेदार बीड डॉक्यूमेंट विकत घेणे दि.08/11/2011,निविदा पूर्व बैठक दि.02/12/2011, निविदा भरणे अंतिम तारीख दि.10/01/2012, निविदा उघडली दि.20/01/2012, निविदा वाटाघाटी

DRAFT

दि.22/03/2012, निविदा मंजूरी तारीख 24/07/2012, कामाची वर्क ऑर्डर दि.13/09/2012. या कामाची निविदा मागविणे दि.27/03/2010 ते कामाचा कार्यादेश देणे दि.13/09/2012 यामध्ये अडीच वर्षाचा कालावधी गेला आहे. काम सुरू होण्यास उशिर लागल्याने काम पुर्ण होण्यास विलंब लागत आहे.

3) कार्यादेश दिल्यानंतर 70 Mld जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाचे Hydraulic Design & drawings या कामाचे ठेकेदार लक्ष्मी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांनी पाणीपुरवठा विभागाकडे दि.03/10/2012 चे पत्राने सादर केले आहे. सदर पत्र पाणीपुरवठा विभागास आवक रजि.क्र.4589 ने दि. 09/10/2012 रोजी मिळाल्याबाबतची नोंद पत्रावर दिलेली आहे. तसेच या कामाची Hydraulic flow Diagrams, G.A. Drawing For Inlet Works & for Clarisettlers ची ड्रॉइंग्ज ठेकेदाराने पाणीपुरवठा विभागास दि.21/11/2012 रोजी पाठविली आहेत व सदर पत्र दि.22/11/2012 रोजी आवक क्र.5420 ने मिळालेची नोंद पत्रावर घेण्यात आली आहे. सदर सर्व Drawing कार्यकारी अभियंता यांनी पत्र क्र./UID/1027/12-13 Dt.22/02/2013 ने विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टीट्यूट,नागपूर यांचेकडे बीड डॉक्यूमेंट मधील पृष्ठ क्र.87 वर देण्यात आलेल्या क्लॉज 6.1.5 नुसार तपासणीसाठी पाठविली आहे. व VNIT ने सदर ड्रॉइंग्ज आवश्यक त्या दुरुस्त्या केलेनंतर मंजुर करुन पत्र क्र.VNIT AM -Dept/LMG-GNR/847/1662 दि.21/3/2013 ने पाणीपुरवठा विभागाकडे पाठविले आहे. पाणीपुरवठा विभागाने पत्र क्र.No./wwd /UID/118/12-13 दि.28/03/2013 ने या मंजूर ड्रॉइंगप्रमाणे काम करणेबाबत ठेकेदारास कळविले आहे. ठेकेदाराने या कामाचे ड्रॉइंग्ज पाणीपुरवठा विभागास 09/10/2012 व दि.21/11/2012 रोजी पाठविले आहेत. परंतु सदर ड्रॉइंग्ज पाणीपुरवठा विभागाने दोन महिने विलंबाने VNIT कडे पाठविले आहेत. या कामाचा कार्यादेश दि.13/09/2012 रोजी दिला असून कामाचा कालावधी 18 महिने आहे. परंतु योजनेचे Hydraulic Design & Drawing Approval साठी पाच महिन्याचा कालावधी गेल्याने काम सुरू होण्यास उशिर झालेचे स्पष्ट होते. नस्तीमध्ये उपायुक्त यांनी ठेकेदारास कामाच्या संथगती बाबत पत्र क्र.WWD/UID/359/13-14 दि.22/08/2013 ने कारणे दाखवा नोटीस पाठविली आहे. त्यानुसार Design Engineering चे काम दि.12/12/2012 पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतु काम 28/03/2013 रोजी पुर्ण केले आहे. तसेच Inlet Works & Klarisettlers काम सुरु दि.12/12/2012 व काम पुर्ण करणे दि.12/07/2013 अशी असुन दि.28/03/2013 अखेर फक्त 20 टक्के काम झालेचे नमूद आहे. ड्रॉइंग मंजुर करण्यास पाणीपुरवठा विभागाने केलेल्या विलंबामुळेच सदर परिस्थिती ओढावली असलेचे स्पष्ट होते. या कामाचा बार चार्ट ठेकेदाराकडून घेवून सदर बार चार्ट प्रमाणे काम करणेची जबाबदारी ठेकेदार व पाणीपुरवठा विभागाची आहे. या कामाचा ठेकेदाराकडून घेतलेला बार चार्ट या कामाच्या नस्तीमध्ये लावला आहे. परंतु तो पाणीपुरवठा विभागाने प्रमाणित केलेला नाही.

4) या कामाच्या नस्तीमध्ये महासभा क्रमांक 11,ठराव क्र.376 विषय क्र.ऐन दि.20/02/2013 जोडणेत आला आहे. सदर ठरावामध्ये मा.श्री.हणमंत बंडूजी पवार यांनी दिलेली सूचना मुंबई प्रांतिक

DRAFT

महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड 1 (के)अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करून घेवून सभेने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. सांगली येथील सर्व्हे नंबर 180/1,180/2,202/1,202/2 ची मिळकत श्री.विजयसिंहराजे पटवर्धन यांची असुन या जागेवर 70MLD जलशुध्दीकरण केंद्र बांधण्याची निविदा प्रक्रीया महानगरपालिकेने राबवुन सदर कामाची सुरवात केली आहे. परंतु त्यास जमीन मालकांनी दि.15/2/2013 चे पत्राने हरकत घेतली आहे व नुकसान भरपाई न दिल्यास मा.उच्च न्यायालयात दाद मागणार असलेचे स्पष्ट केलेले आहे. या जमिनीचे भुसंपादन करणेबाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सांगली नंभूसंपादन -आर आर टी-52/87 जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांनी दि.13/02/1987 रोजीचे आदेशाने रद्द केलेला आहे. तसेच विषयांकीत जमीन नागरी कमाल जमीन धारणा अधिनियम 1976 नुसार संपादन करणेत आलेली नाही. महाराष्ट्र सरकारने हा कायदा सन 2007 पासून निरसित केलेला आहे व त्यापुर्वी जमीनीचे संपादन करणेत आलेले नाही. सदर रिपिल ॲक्ट नुसार सद्या विषयांकीत जागा या कायद्यांतर्गत संपादन करता येत नाही. येणे प्रमाणेचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाने दि.23/01/2013 रोजी दिलेचे नमूद आहे. महानगरपालिकेतर्फे भूसांपादन अधिनियमानुसार नविन भूसांपदन प्रस्ताव दाखल करणे त्यास शासनाची मंजूरी घेणे,जाहिर प्रकटन,हरकती,ॲवॉर्ड,कब्जेपट्टी,वगैरे पुर्तता करणे यासाठी बराचसा आवधी लागणार आहे व तोपर्यंत जमीन मालकांनी प्रकरण न्यायालयात प्रविष्ठ केल्यास ही महत्वकांक्षी योजना रखडणेची व पर्यायाने केंद्र व राज्य सरकारचा निधी परत जाण्याची शंका आहे. जमीन मालकाने दिलेल्या नोटीसीमध्ये त्यांचा पाणी योजनेस विरोध नसलेचे व ते जमीनीची चालू बाजारभावाने (रेडीरेकनरनुसार) भरपाई रक्कम घेवून जमीनीचा कब्जा देणेस तयार असलेचे दिसून येते. सबब नविन भूसांपदन प्रस्ताव दाखल करावयचा झालेस वर नमूद वस्तुस्थिती विचारात घेता निवाडा जाहीर होणेस व कायदेशीर कब्जा मिळणेस अंदाजे एक वर्षाचा कालावधी लागू शकतो .या कारणाने योजना प्रलंबित राहील व वाढीव दराने काम करावे लागेल या वाढीव दराचा बोजा मनपाला न पेलणारा असेल म्हणून जमीन मालकाशी चर्चा करून खाजगी वाटाघाटी करुन जमीन कब्जात घेणेत यावी. प्रस्तुत प्रकरणी नवीन भुसंपादन प्रस्ताव दाखल करणे ऐवजी चालू बाजार भावाने शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार खाजगी वाटाघाटीने ठरणारी रक्कम जमीन मालकास आदा करून फक्त पाणी योजनेसाठी आरक्षित असलेले क्षेत्र कब्जात घेवून योजनापूर्ती करणेस महासभेने मंजूरी दिला आहे. सदर ठरावा नुसार जमिन ताब्यात घेणे, मोबदला देणे व त्यावर मनपाचे नाव लावणेची पुढील कार्यवाही करणेसाठी नगररचना विभागास ,कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी जाक्र.मनपा/पापुवि/सां/1080/12-13 दि.80/03/2013 चे पत्राने सूचित केले आहे.

नगररचना विभागाने जागा ताब्यात घेण्यासाठी केलेल्या कार्यवाहीच्या फाईल मधील पृष्ठ क्र.टी-7 वरील कार्यालयीन टिपणीचे अवलोकन केले असता, सांगली शहराच्या सुधारीत विकास योजना शासनाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-2076/80,नवि-5, दि.28/03/1977 अन्वये मंजूर असून ती दि.01/06/1977 रोजी अंमलात आली आहे. सदर मंजूर विकास योजनेमध्ये सांगली येथील स.नं.202

DRAFT

व 205 या मिळकती न्यू वॉटर वर्क्स या वापरासाठी आ.क्र.163 अन्वये आरक्षित करण्यात आल्या होत्या. तथापि प्रत्यक्ष जागेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे पाणी पुरवठा योजनेचे काम स.नं.202 व स.नं.180 पै. या जागेत सुरु असल्याने प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थिती प्रमाणे स.नं.202 व स.नं.180 पै. या जागा पाणीपुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदल करुन ,सदर फेरबदलास शासनाने दि.27/05/ 1983 रोजी मंजूरी दिलेली आहे. महानगरपालिकेच्या दि.04/03/2005 रोजी प्रसिध्द प्रारुप विकास योजनेत, दि.21/02/2008 रोजी कलम 30(1) अन्वये अंतिम मंजुरीसाठी सादर प्रारुप विकास योजनेमध्ये व शासनाने दि.04/04/2012 रोजीचे अधिसूचनेद्वारे मंजूर केलेल्या भागांश: मंजूर विकास योजनेत आणि भागांश: पुनर्रप्रसिध्द विकास योजनेत उपरोक्त जागा विद्यमान वापरानुषंगाने सार्वजनिक उपयोग (पाणीपुरवठा) म्हणून दर्शविली आहे. सदर प्रस्तावाबाबत कोणतीही हरकत/सूचना महानगरपालिकेस प्राप्त झाली नसलेचे टिपणीमध्ये नमूद आहे.

नस्तीमधील पृष्ठ क्र. टी-11 वर सांगली शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार स.नं.202/1 या जागेचे 7/12 नुसारचे क्षेत्र 50 आर, सर्व्हे नं.202/2 या जागेचे 7/12 नुसारचे क्षेत्र 1 हेक्टर 29 आर,आणि सर्व्हे.नं.180/1 व 2/ब या जागेचे क्षेत्र 1 हेक्टर 12.20 आर इतके आहे. महाराष्ट्र शासन ,महसूल व वन विभाग,शासन निर्णय क्रमांक: एलक्यूएन1686/प्र.क्र. 3628/अ-2 दि.31 ऑक्टो.1994 नुसार भूमि संपादन अधिनियम,1894 च्या कलम 11(2) प्रमाणे संमतीदर्शक निवाडे जाहीर करण्याबाबत शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे. अ) संमतीदर्शक निवाडे कलम 6 खालील अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर करण्यात यावेत. तसेच निवाडे तयार करताना त्यामध्ये मोबदल्याची रक्कम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात यावी.

1) प्राथमिक अधिसूचनेच्या वेळचे शीघ्रसिध्दगणकानुसार (रेडिरेकनर) येणारे जमिनीचे मूल्यांकन,
2)भूमी या संज्ञेत येणा-या इतर सर्व घटकांचे प्रचलित पध्दतीनुसार येणारे मुल्यांकन
3) वरील 1 व 2 नुसार बाजारमूल्य या संज्ञेत येणा-या सर्व घटकावर 30 टक्के दिलासा रक्कम अधिक 36 टक्के अतिरिक्त घटकाची रक्कम मिळविण्यात यावी.

ड) संमतीदर्शक निवाडे जाहीर करताना जिल्हाधिका-याकडे कामाचा व्याप वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यादृष्टीने विभागीय आयुक्त यांच्या अधिपत्या खालील कोणत्याही अतिरिक्त जिल्हाधिका-याकडे संमतीदर्शक निवाडे जाहीर करण्याचे काम देवू शकतील. या शासन निर्णया नुसार सन 2013 च्या बाजारमूल्य दरतक्त्याप्रमाणे स.नं.180,202 या मिळकती मूल्यदर विभाग 12/74 माधवनगर रस्ता यामध्ये समाविष्ठ असून या मूल्यदर विभागातील खुल्या जमीनीचा दर प्रती चौ.मी. रु.2500/- इतका आहे. उक्त जागा विकास योजनेतील आरक्षणाखालील असल्याने बाजारमूल्य तक्त्यातील मार्गदर्शनानुसार उक्त जागेच्या मुल्यांकनासाठी वरील दराचा 80 टक्के दर म्हणजेच प्रती चौ.मी. दर रु.2000/- होत असल्याने स.नं.180/1 व 180/2 ब,क्षेत्र 1 हे.12.20 आर :- 11020.25 चौ.मी. साठी रु.15320000/-, स.नं.202/1,क्षेत्र 50 आर साठी रु.81000/-, स.नं.202/2,क्षेत्र 1 हेक्टर 29 आर साठी

DRAFT

रु.1,70,00,000/- अशी एकूण

| | |
|---|---|
| 1)जमीनीचे मूल्य | रु.4,04,20,000/- |
| 2)30 टक्के दिलासा रक्कम | रु.1,21,22,000/- |
| 3)36 टक्के अतिरिक्त घटकाची रक्कम | रु.15451200/- |
| | --------------------------------------- |
| एकूण रक्कम रुपये | रु.6,70,93,200/- येत आहे. |

सदर जागा महानगरपालिकेकडे सुमारे 30 वर्षापासून वापरात असलेचे कार्यालयीन टिपणीमध्ये नमूद आहे. तसेच पाणीपुरवठा विभागाने क्र.मनपा/पापुवि/सां/977/12-13, दि.05/02/2013 रोजी नगररचना विभागास दिलेल्या पत्रामध्ये सदर जागा ताब्यात घेतलेची तारीख दि.04/09/1979 असून (Ref letter- Exicutive engineer,EE works Division Sanglis Letter No. 3401 Date 20/08/1982), ताब्यात घेतलेले क्षेत्र सर्व्हे नं.180/1 व 2 - 18400 चौमी, सर्व्हे नं.202/ 1 व 2 - 17100 चौ.मी.असे एकूण क्षेत्र 35500 चौ.मी. ताब्यात असल्याचे नमूद आहे. या नस्तीमधील पृष्ठ क्र.T19 वरील उपायुक्त यांचे अभिप्रायामध्ये सदर क्षेत्राच्या 7/12 वर महानगरपालिकेचे नाव लावता येणार नसल्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे व पुन्हा भूसंपादन प्रक्रीया सुरु करावयाची झाल्यास तातडीचे कलम लावले तरी देखील संपूर्ण प्रक्रीया पार पाडण्यास व महानगरपालिकेचे नाव उता-यावर नमूद करण्यास सुमारे 8 ते 10 महिन्याचा कालावधी जावून 70 MLD जलशुध्दीकरण केंद्र बांधण्यास अनिश्चित कालावधीचा विलंब होवू शकतो असे नमूद करुन महासभेने दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही ठेवणेस, तसेच संबंधितांना रक्कम आदा करण्यापूर्वी महानगरपालिका नगररचनेचे काम पाहणा-या विधीज्ञ यांचे कडून हमीपत्र तसेच खरेदीपत्र इत्यादीबाबतच्या अटी शर्ती निश्चित करून घेणे बाबत अभिप्राय दिला आहे व त्यानुसार काम करणेबाबत आयुक्त यांनी दि.20/04/2013 रोजी मान्यता दिला आहे. तसेच महानगरपालिकेने याबाबत विधिज्ञ यांचेकडून अभिप्राय मागविले आहेत. मा.उच्च न्यायालयातील महानगरपालिकेचे विधीज्ञ श्री.माणकापूरे यांनी दि.09/03/2015 रोजी दिलेल्या पत्राप्रमाणे तडजोड करण्यापूर्वी संबंधितांकडुन भविष्यातील कायदेशीर अडीअडचणी संदर्भात हमीपत्र घेणेबाबत नमूद केले आहे. त्यानुसार जागामालकाकडून रु.100 च्या स्टँप पेपरवर हमीपत्र घेण्यात आले आहे.

लेखा विभागाने प्रमाणक क्र.1 दि.07/05/2013 ने रु.22364400/-, प्रमाणक क्र. 10 दि.05/08/2013 ने रु.22364400/- व प्रमाणक क्रमांक 13, दि.20/11/2013 ने रु.22364400/- आदा केले आहेत. जागा ताब्यात नसताना योजना राबविली असल्याने कामाच्या प्रारंभासच अडथळे निर्माण झाले आहेत. जागेची मालकी महानगरपालिकेकडे नसताना काम सुरु करण्यात आलेचे वरील प्रकरणावरुन स्पष्ट होते. नस्तीमध्ये पाणीपुरवठा विभागाने दिलेल्या पत्राप्रमाणे सदर जागा महानगर पालिकेच्या ताब्यात सुमारे 30 वर्षापासून असल्याचे नमूद आहे. तसेच नगररचना विभागाच्या नस्ती मधील पृष्ठ क्र.43 वर Ex " P", No.TB-1/1519/of 79,Sangli Sanitary Sub-Div, Sangli. Dt.

DRAFT

8/08/1979 या पत्राने सर्व्हे नं.202/2 वर RCC ESR चे काम चालू करणेची परवानगी श्री.राजेसाहेब पटवर्धन यांचेकडे उपविभागीय अभियंता यांनी मागितली आहे व त्याप्रमाणे त्या जागेमध्ये Land Strata ची तपासणी करणेसाठी Test Bore मारणेची परवानगी संस्थानने दिली आहे. तसेच सदर जागेमध्ये महानगरपालिकेचे 36 MLD चे जलशुध्दीकरण केंद्र व व पाण्याच्या उंच टाक्या अस्तित्वात असलेचे नस्तीमध्ये नमूद आहे. यावरुन ही जमीन महानगरपालिकेच्या ताब्यामध्ये 1979 पासून असल्याचे व त्या जागेवर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाची जलशुध्दीकरण यंत्रणा कार्यरत असल्याचे स्पष्ट होते. सदर बाबी महानगरपालिकेने जागामालकाने दिलेल्या लिगल नोटीशीस उत्तर देवून निदर्शनास आणणे आवश्यक होते. परंतु महानगरपालिकेने संस्थानने दिलेली कायदेशिर नोटीस व महासभेने ऐनवेळच्या ठरावामध्ये प्रस्तुत प्रकरणी नवीन भुसंपादन प्रस्ताव दाखल करणेऐवजी चालू बाजारभावाने शासनाचे मार्गदर्शक तत्वाप्रमाणे खाजगी वाटाघाटीने ठरणारी रक्कम जमीन मालकास आदा करुन फक्त पाणी योजनेसाठी आरक्षित असलेले क्षेत्र ताब्यात घ्यावयाच्या नमुद केलेल्या सुचनेप्रमाणे नगररचना विभागाने बाजार भावानुसार रेडीरेकनर प्रमाणे निश्चित केलेली रक्कम रु. 6 कोटी 70 लाख भरपाई देवून जागा ताब्यात घेतल्याने महानगरपालिकेचे रु. 6 कोटी 70 लाखाचे नुकसान झाले आहे. जमीनीचे खरेदीपत्र व जागा महानगरपालिकेचे नावावर झाले बाबतचा 7/12 चा उतारा लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेला नाही.

05) नगररचना विभागाकडील जागा ताब्यात घेणेबाबतच्या नस्तीचे अवलोकन केले असता, पृष्ठ क्र.टी -13 वर जागा मालकास द्यावयाची भरपाईची रक्कम महानगरपालिकेच्या विकास निधीमधील जमा रक्कमेतून खर्च करता येवू शकेल. तसेच सन 2012-13 च्या अंदाजपत्रकामध्ये आरक्षणाखालील जागा संपादनासाठी रु. 3 कोटीची तरतुद आहे. तसेच 5 कोटीची खाजगी संपादनाबाबत तरतुद असलेचे प्र.नगररचनाकार यांनी नमुद केले आहे. सदर रक्कम देणे बाबत आयुक्त निर्णय क्र.13 /2013-14 दि.28/04/2013 नुसार झाला असुन त्यानुसार रक्कम रु. 67093200/-,006- इतर योजना क्र.41304, विकास निधी या लेखाशिर्षामधून समान तीन हप्त्यात देणेबाबतचे आदेश झालेला आहे. सदर निर्णय धोरणात्मक बाब असल्याने नुकसान भरपाईची एकूण रक्कम किती झाली आहे व ती कोणत्या लेखाशिर्षामधून देणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती महासभेस कळवून महासभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार जमीन मालकास रक्कम आदा करणे आवश्यक असता नुकसान भरपाईची रक्कम आयुक्त निर्णयानुसार देण्यात आली आहे. नुकसान भरपाईची रक्कम देण्यास महासभेची मान्यता का घेण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा पाणीपुरवठा विभागाने अर्धसमास ज्ञापन क्र. 86 दि.15/03/2016 ने मागणी करुन ही दिलेला नाही.

6) सदर योजनेमधील कामांच्या Revised DPR (Detailed Project Report) ला केंद्रशासनाचे नगरविकास मंत्रालयाने Encloser to note no. Q-12045/15/2/UIDSSMT/08-CPHEEO dated 8/12/2011 ने मंजूरी दिली आहे. या पत्रामध्ये या कामाचा समावेश अ.क्र. 9 वर केलेला आहे. सदर पत्रामध्ये योजनेसाठी लागणारी जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबतचे undertaking

DRAFT

महाराष्ट्र शासन व सांगली महानगरपालिकेकडून केंद्रशासनाचे नगरविकास मंत्रालयाने घेण्याबाबत सूचित केले आहे. त्याप्रमाणे जागा मनपाच्या ताब्यात असलेबाबतचे प्रमाणपत्र डी.पी.आर.मंजूरीसाठी पाठविताना महानगरपालिकेने दिलेले आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद क्र. 154 नुसार कामाचे एस्टिमेट व डिझाईन तयार करण्यापुर्वी कामाची जागा निश्चित करणे आवश्यक आहे तसेच जागा मनपाच्या ताब्यात असलेबाबतचा पुरावा म्हणून 7/12 उतारा, प्रॉपर्टी कार्डची प्रमाणित प्रत असलेची खात्री महानगरपालिकेने करणे आवश्यक होते. परंतु तशी खात्री न करताच डी.पी.आर. शासनाकडून मंजूर करून घेताना जागा महानगरपालिकेच्या मालकीची असलेबाबतचे प्रमाणपत्र दिलेने जागेच्या मालकी संदर्भात वाद निर्माण होवून कामास विलंब लागत असल्याचे स्पष्ट होते.

7) नस्तीमधील सांगली स.नं.180,202 मधील सांगली शहराच्या सुधारीत विकास योजनेनुसारचे अ.क्र.163 न्यु वॉटर वर्क्स या जमिनीच्या भुसंपादनाबाबत झालेल्या आयुक्त निर्णय क्रमांक:- 13/2013-14 दि.22/4/2013 चे अवलोकन केले असता त्यामध्ये सांगली महानगरपालिकेमार्फत सुजल निर्मल योजना व UIDSSMT योजनेची चालू असलेली कामे उक्त आरक्षित जागेवर चालू असल्याने या जागेची नुकसान भरपाई चालू बाजारभावाने देवून तद्नंतरच योजना राबवावी अन्यथा मा.उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याबाबत जमीन मालकाने दि.15/02/2013 रोजी नोटीस दिली असल्याचे नमूद आहे. त्यामुळे या योजनेची कामे ठप्प होणार असल्याने महासभा ठराव क्र.376 दि.20/2/2013 ने या प्रकरणी नविन भूसंपादन प्रस्ताव दाखल करण्याऐवजी चालू बाजारभावाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार खाजगी वाटाघाटीने ठरणारी रक्कम जमीन मालकास आदा करून उक्त पाणीपुरवठा योजनेसाठी आरक्षित क्षेत्र घेण्यास झालेल्या मान्यतेप्रमाणे तडजोडी अंती ठरलेली रक्कम रु.6,70,93,200/- तीन हप्त्यामध्ये जमीन मालकास आदा करून या जागेचे खरेदीपत्र करणेकामी उपअभियंता पाणीपुरवठा यांना प्राधिकृत करणेचा आयुक्त ठराव झाला आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद 238 अन्वये ज्या वेळी सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीची आवश्यकता असते त्यावेळी सदर जमीन भुमीसंपादनाद्वारे ताब्यात घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्या जमीनीच्या भरपाईपोटी द्याव्या लागणा-या रक्कमेचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणामध्ये 7/12 व प्रॉपर्टी कार्ड नुसार जागेची मालकी महानगरपालिकेची आहे किंवा नाही याची खातरजमा न करताच कामाचे अंदाजपत्रक तयार करून त्यास राज्य व केंद्रशासनाची मान्यता घेतली आहे. ठेकेदारास कामाचा कार्यादेश दि.13/09/2012 रोजी देण्यात आला असून जागेचे मालक श्री.विजयसिंह पटवर्धन यांनी दि.15/02/2013 रोजी याबाबत वकीलाकडून लिगल नोटीस दिले नंतर जागेच्या मालकीबाबत महानगरपालिकेने कागदपत्रांची शोधाशोध चालू केलेचे दिसून येते. कामाच्या नस्तीमध्ये जोडलेल्या नकाशाप्रमाणे 70 MLD च्या जलशुध्दीकरण केंद्रासाठी सर्वसाधारणपणे 1 हेक्टर 28 गुंठे जागेची आवश्यकता असल्याचे दिसून येते. परंतु महानगरपालिकेने खाजगी वाटाघाटीद्वारे 2.91 हेक्टर जमीन जागा मालकाकडून खरेदी केली आहे. जागा विकत घेताना एवढ्या जमिनीची आवश्यकता आहे काय याबाबतची खातरजमा कोणत्याही अधिका-यांनी केली

DRAFT

नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आवश्यकते पेक्षा 1.63 हेक्टर जास्त जमीन खाजगी वाटाघाटीने खरेदी केली आहे. तसेच जागामालकाने लिगल नोटीस दिलेनंतर सदर प्रकल्प महानगरपालिकेच्या अन्य ठिकाणच्या स्वमालकीच्या पर्यायी जमीनीवर हस्तांतरण करता येतो का या शक्यतेचा विचार करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कोणतीही चाचपणी न करता नुकसान भरपाई देणेचा पर्याय निवडला असल्याने महानगरपालिकेस जागा नुकसान भरपाईपोटी रु.3.75 कोटी द्यावे लागले आहेत.

8)सदर जागेची खरेदी खाजगी वाटाघाटीने केली असून त्यापोटी जमीन मालकाला रु. 6 कोटी 70 लाखाचा मोबदला दिलेला आहे. 70 MLD जलशुध्दीकरण प्रकल्पाचे काम ज्या जमीनीवर होणार आहे त्या जमीनीचे नकाशे कामाच्या नस्तीमध्ये जोडण्यात आले आहेत. परंतु आखणी मान्यता आराखड्यानुसार सदर काम महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर होत असलेबाबत पाणीपुरवठा विभागाच्या सक्षम अधिका-यांनी जागेच्या नकाशावर स्वाक्षरी करून प्रमाणित करणे आवश्यक असता नकाशे प्रमाणित केलेले नाहीत. सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद 252 नुसार संपादित करण्यात आलेल्या जमीनीवर बांधकाम करताना प्रस्तुत जमीनाचा नकाशा त्या खात्याच्या योग्य त्या प्रतिनिधीने तयार करुन त्यावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तसेच बांधकामाचा प्रभारी असलेल्या अधिका-याने, नकाशामध्ये ती जमीन दाखविलेल्या मोजमापाप्रमाणे प्रत्यक्षात आहे ही वास्तुस्थिती पाहिल्याचे चिन्ह म्हणून प्रती स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु खरेदी करून ताब्यात घेतलेल्या जमीनीवर केले जाणा-या बांधकामाच्या नकाशावर कोणत्याही सक्षम अधिका-याने स्वाक्षरी केलेली नसल्याने महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर काम चालू असलेबाबतची खात्री संबंधित अधिकारी यांनी केली नसल्याचे दिसून येते.

9)सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद 245 नुसार भुमिसंपादनाच्या प्रत्येक प्रकरणा संदर्भात जमीनीचा ताबा घेणा-या प्राधिका-याने 1)निवाडा पत्र, 2) महसूल विभागाने या विभागाकडे जमीन सुपूर्द केल्याबाबतचे हस्तांतरणाचे दस्तऐवज व सुपूर्द केलेल्या जमिनीचा नकाशा 3) कमी जास्ती पत्रक आपल्या अभिलेखामध्ये ठेवणे आवश्यक आहे. तसेच परिच्छेद 252 नुसार ताब्यात घेतलेल्या जमीनीच्या बाबतीत कार्यकारी अभियंता यांनी संबंधित जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडून त्या जमीनीच्या हद्दी आखुन घेवून त्यांच्या स्वाक्षरीचा अधिकृत नकाशा मिळविणे आवश्यक आहे. या जागांचे 7/12 चे उता-यावर नमुद केलेल्या क्षेत्राप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर क्षेत्र असल्याची खात्री करून घेणेसाठी सदर जागेची मोजणी भुमी अभिलेख कार्यालया कडून करुन घेवून मोजणी प्रमाणे त्यांचेकडून अधिकृत नकाशा तयार केल्यानंतरच जमिनीची कब्जेपट्टी करणे आवश्यक होते. परंतु सदर जमिनीची मोजणी करून न घेताच जमीनीचे खरेदी पत्र करून जमिनमालकांना रक्कम देण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात ताब्यात घेतलेल्या जागेचे क्षेत्र हे 7/12 उता-यावर नमूद केलेल्या क्षेत्राएवढेच असल्याची खातरजमा होत नाही. सदर क्षेत्राची मोजणी करून लेखापरीक्षणास अधिकृत नकाशाची प्रत लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

10) जमिन खरेदीचे तिसरे व अंतिम बिल प्रमाणक क्रमांक 13, दि.20/11/2013 ने रु.22364400/-

आदा केले आहेत. सदर देयकामध्ये 10 टक्के आयकर रु. 22,36,440/- व 6 टक्के मुद्रांक शुल्क रक्कम(मुळ रक्कमेवर) रु.4025592 कपात करून रु.16102368/- चा धनादेश श्रीमंत विजयसिंह माधवराव पटवर्धन यांना दिला आहे. तसेच सदर धनादेश देणेपूर्वी खरेदी खत सादर करणे बंधनकारक असलेचे देयकामध्ये नमुद केले आहे. त्याप्रमाणे सदर जागेचे केलेले खरेदीपत्र लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही.

11) तलाठी सांगली यांचे कार्यालयाकडून दि.03/2/2016 रोजी काढलेल्या 7/12 उता-याची तपासणी केली असता, 180/1 व 2, 201/1 या उता-यावर अद्यापही श्रीमंत विजयसिंह माधवराव पटवर्धन व 202/2 या 7/12 उता-यावर सौ.सुनिताराजे अरविंदराव आपटे यांची नावे असल्याने अद्यापही सदर जागेवर महानगरपालिकेचे नाव लागले नसल्याचे दिसून येते. सदर जागेची सर्व रक्कम दि.20/11/2013 रोजी देण्यात आली आहे. रक्कम आदा करून दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असूनही अद्याप या खरेदी केलेल्या जागेवर महानगरपालिकेचे नाव लावण्यात आलेले नाही .

12) 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये या कामाची रक्कम रु.9,84,84701/- ठेकेदारास आदा केले आहेत. आदा केलेली सर्व रक्कम शासननिधीमधून खर्च करण्यात आली आहे. या कामाचा 2005 -06 च्या दरसूचीनुसारची मंजूर किंमत रु.20.36 कोटी असून ठेकेदाराची रु.30.75 कोटी दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. केंद्र व राज्य शासनाकडून रु.20.36 कोटीच्या 90 टक्केप्रमाणे रु.18.32 कोटी अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे. या योजनेवर झालेल्या खर्चाची देयके तयार करताना प्रत्येक देयक शासन निधीमधून 59.57 टक्के व मनपा निधीमधून 40.42 टक्के या प्रमाणे खर्च करणे आावश्यक आहे. त्यामुळे ठेकेदारास आदा रक्कम रु. 9,84,84701/- च्या 40.42 टक्के रक्कम रु.39807516/- महानगरपालिकेच्या स्वनिधीमध्ये तरतुद करून खर्च करणे आवश्यक असता महानगरपालिकेच्या हिश्श्याची रक्कम रु. 39807516/- शासन निधीमधून खर्च करण्यात आली असल्याने योजनेचा पुढील खर्च कोणत्या निधीमधून करण्यात येणार आहे याचा खुलासा अर्धसमास ज्ञापनाद्वारे मागणी करुनही पाणीपुरवठा विभागाने केलेला नाही. महानगरपालिकेच्या हिश्श्याची रक्कम स्वनिधीमधून खर्च करण्यात आली नसल्याने या योजनेमधून चालू असणा-या कामांना निधी अपूरा पडून कामे रेंगाळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

13) महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता पृष्ठ क्र.82, द्विनोंद कोड 41221A, UIDSSMT कर्ज (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षांतर्गत रु. 22 कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. 2013-14 या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी महानगरपालिकेच्या 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये नमुद केली आहे. त्यानुसार पृष्ठ क्र.75 वर UIDSSMT कर्ज (मनपा हिस्सा) या लेखाशिर्षामधून कोणताही खर्च करण्यात आलेला नसल्याचे दिसून येते. यावरुन महानगरपालिकने अंदाजपत्रकामध्ये फक्त या कामासाठी स्वनिधीची तरतुद केली आहे. परंतु महानगरपालिकेने या कामासाठीचा निधी जनरल फंडामधून वर्ग करुन अथवा कर्जाद्वारे रक्कम उभी करून खर्च करणे आवश्यक असता सर्व रक्कम

नियमबाह्यरित्या शासनहिश्श्यामधून खर्च केली आहे.

14) या कामापोटी ठेकेदारास 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रु. 98484701/- आदा केले आहेत. परंतु सदर रक्कमेवर 0.25 टक्केप्रमाणे स्थानिक संस्था कर रु.246211/- वसुल केला नाही.

15) या कामाच्या मोजमाप पुस्तक क्र.32 पृष्ठ क्र.01,2,15 व 16 ची तपासणी केली असता जलशुध्दीकरण केंद्रासाठी एकूण 3248 घ.मी. इतकी खुदाई केली आहे. या कामामध्ये निघालेल्या मुरुमावर महानगरपालिकेचा अधिकार असल्याने सदर खुदाई केलेला माल **स्टँडर्ड स्पेसिफिकेशन पुस्तकामधील Rd 2.10** नुसार महानगरपालिकेकडे ठेकेदाराने जमा करणे आवश्यक असता मुरुम महानगरपालिकेकडे जमा केलेचेबाबत नस्ती व मोजमाप पुस्तकाची तपासणी केली असता दिसून येत नाही. त्यामुळे ठेकेदारास खुदाई कामासाठी देण्यात आलेली रक्कम रु.5800000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

16) या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनिस्सारण यांनी जाक्र/मनपा/पापुवि/सां/101/14-15 दि.17/05/2014 ने शहर अभियंता,बांधकाम विभाग यांना त्यांनी क्रमनपा/सा/बांधावि/63/2014-15/ दि.15/05/2014 रोजी केलेल्या मुरुम मागणीच्या पत्राप्रमाणे मुरुम नेण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे. तसेच आपल्याकडील जबाबदार व्यक्तिने माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथे ठेवण्यात आलेल्या रजिस्टरवर वाहन क्रमांक,ड्रायव्हरचे नाव, मुरुम नेणा-या व्यक्तीने वेळोवेळी सही करुन मुरुम नेण्यात यावा. या कार्यालयाचे श्री.ऐवळे, प्र.केमिस्ट माळबंगला यांचेकडे सदर रजिस्टर ठेवल्याचे पत्रामध्ये नमुद आहे. सदर रजिस्टर लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नसल्याने बांधकाम विभागाने किती मुरूम वापरला याची माहिती समजुन येत नाही.

17) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण 2008/1338/प्रक्र171/08/नवि-20 दि.2 मार्च 2009 नुसार ड वर्ग महानगरपालिकांनी रु.50 लाखापेक्षा अधिक किमतीच्या सर्व विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण त्यांच्या जिल्हयातील शासकीय अभियांत्रिकी /तंत्रज्ञान / वास्तुशास्त्र महाविद्यालय /शासकीय तंत्रनिकेतन यांचेमार्फत करुन घेण्याबाबत सूचित केले आहे. परंतु या कामाचे तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतल्याचे दिसून येत नाही. तांत्रिक लेखापरीक्षण करुन न घेताच देयके आदा करण्यात आली आहेत.

18) कामाचे धावते देयक क्र. 4, प्रमाणक क्र. 32 दि.17/02/2014 ने ठेकेदारास रु.41852501/- आदा केले आहेत. उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर कपात करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे रु.41852501/- च्या 1 टक्के प्रमाणे रु.418525/- ठेकेदाराच्या देयकामधून कपात करणे आवश्यक असता रु.8750/- कपात केली असुन उर्वरित रक्कम रु.409775/- वसुल केली नाही.

19)सार्वजनिक बांधकाम विभाग ,शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 1097 /सीआर 622/इमारती 2 दि.22/08/2005 नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट 42

DRAFT

अ.क्र.70 मध्ये उल्लेखिलेल्या मोजमापे तपासणीच्या अधिकारात सुधारणा करण्यात आली आहे. क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांचेकडून विहित टक्केवारी नुसार मापांची तपासणी केली जात नाही वा केवळ औपचारिकता म्हणून कामातील महत्वाच्या बाबी जसे खोदकाम,भरावाचे काम, झाकली जाणारी मापे इत्यादी बाबी सोयीस्करपणे वगळून अन्य बाबींच्या मापाची तपासणी दर्शविण्याची प्रवृत्ती क्षेत्रिय कार्यकारी अभियंता वर्गात वाढत आहे. त्यामुळे शासनाने या शासन परिपत्रकाप्रमाणे खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.i) प्रच्छन्न मापे (Hidden Measurements) विशेषत: मातीकाम, खोदकाम, पुलांचे पायव्याचे काम, बी.बी.एम. इत्यादी बाबींची किमान 5 टक्के तपासणी क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी करणे बंधनकारक आहे. परंतु सदर प्रच्छन्न कामांची 5 टक्के तपासणी तसेच मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेल्या अन्य बाबींच्या कामांची तपासणी कार्यकारी अभियंता यांनी केलेली नाही.

20) या कामाच्या नस्तीमध्ये ठेकेदाराने केलेल्या कामाची देयके महानगरपालिकेने आदा केली नसल्याने कामाच्या प्रगतीमध्ये अडथळा येत असल्याने कामाची देयके तात्काळ देणेची मागणी केली आहे. पाणीपुरवठा विभागाकडील देयक रजिस्टरची तपासणी केली असता या कामाचे बील क्र.4 दि.03/01/2014 ते बील क्र. 08 दि.30/06/2015 अखेर ठेकेदाराची रु.559.53 लक्ष रक्कमेची देयके पैशाअभावी प्रलंबित असल्याचे दिसून येते. महानगरपालिकेने आपल्या हिश्श्याच्या रक्कमेची तरतुद स्वनिधीमध्ये करुन ठेकेदारास आदा करणे आवश्यक असता या रक्कमेची तरतुद केली नसल्याने ठेकेदाराची देणी प्रलंबित राहून काम अपूर्ण राहिल्याचे स्पष्ट होते.

21) या कामाचा कार्यादेश दि.13/09/2012 रोजी देण्यात आला असून कामाची मुदत पावसाळ्यासह 18 महिने (दि.12/03/2014) पर्यंत देण्यात आली आहे. सदर काम UIDSSMT योजनेमधून करण्यात येत असल्याने व नस्तीमध्ये नमुद केल्याप्रमाणे या योजनेची मुदत 2014 पर्यंत असल्याने योजनेचा निधी वेळेत खर्च करणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. या जलशुध्दीकरण प्रकल्पाचा एकूण खर्च रु.30 कोटी 75 लाख असून मार्च 2014 पर्यंत रु. 9 कोटी 84 लाख (32 टक्के) इतकाच खर्च झाला आहे.

आक्षेपाधिन रक्कम :- जमिन खरेदीची आदा रक्कम रु. 6,70,93,200/- + खुदाई रक्कम रु.5800000/- = रु.79893200/-

वसुलपात्र रक्कम :- स्थानिक संस्था कर रक्कम रु. 246211/- + कामगार कल्याण उपकर रु.409775/- = रु.655986/-

DATSBKM7201 (Ref No : 86)

## *77 घरपट्टीची मागणी देयके मालमत्ताधारकास विलंबाने दिलेने घरपट्टीचा भरणा उशिरा झाल्याने मनपास सदरची रक्कम वेळेत प्राप्त झाली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 05**

DRAFT

*लेखा शीर्ष : कर संकलन व करनिर्धार स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***घरपट्टीची मागणी देयके एप्रिल 2013 मध्ये देणे आवश्यक असता ती ऑक्टोबर 2013 मध्ये देण्यात आली आहेत. 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये थकबाकी व चालू मागणी धरुन एकूण रक्कम रु.412310089/- घरपट्टीपोटी जमा होणे अपेक्षित आहे. परंतु देयके विलंबाने दिल्याने थकबाकी रु.1 कोटी 46 लाख व चालू मागणी रु. 8 लाख 91 हजार जमा झाली आहे. देयके न दिल्याच्या कालावधीमध्ये एकूण थकबाकी वसूलीचे प्रमाण 9.75 टक्के व चालू मागणी वसूलीचे प्रमाण 0.33 टक्के इतकेच आहे. तसेच या वर्षामध्ये एकुण जमा रु.245389189/- इतकीच झाली आहे. एकुण अंदाजित जमेपेक्षा या प्रत्यक्ष जमा रक्कमेचे प्रमाण 59 टक्के एवढेच आहे. तसेच थकबाकी व चालु मागणी रक्कम पुर्णपणे वसुल करणे आवश्यक असता आयक्तांनी जमेचा अंदाज कमी केला आहे.***

DRAFT

उपरोक्त विषयानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या घरपट्टी विभागाचे कामकाज सांगली, मिरज आणि कुपवाड या तीन विभागीय कार्यालयामार्फत चालते. 2013-14 या आर्थिक वर्षाचे घरपट्टी विभागाच्या जमा बाजूचे लेखापरीक्षण, मागणी देयक व जमा पावती पुस्तकाप्रमाणे आलेली जमा यावरुन करण्यात आले आहे. घरपट्टी विभागाकडून घरपट्टीधारकांना दिलेल्या मागणी देयकाची तपासणी केली असता सदर देयके मुंबई महानगरपालिका अधिनियम, कलम 128 (1) अन्वये देण्यात आलेचे नमुद आहे. देयकामध्ये मागणी वर्ष, मागणी नोंदणी क्रमांक, बिल क्रमांक, वार्षिक भाडे मूल्य, मिळकत करदात्याचे नाव व पत्ता, करांचे नाव अ.क्र.1 ते 11, थकबाकीचा तपशिल ,मागिल थकबाकीचा तपशिल , शास्ती दरमहा 2 टक्के, अनधिकृत बांधकामास दुप्पट शास्ती, देयकाचा छपाई दिनांक व ग्राहकास वाटप दिनांक तसेच देयक एक महिन्याचे आत भरलेस सामान्य करामध्ये 4 टक्के सूट, 2 महिन्याचे आत बील भरल्यास 2 टक्के सूट या बाबींचा समावेश आहे. सदर मागणी देयकामधील त्रुटीबाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.49 दि.12/01/2016 रोजी देण्यात आला असुन त्याचे अनुपालन घरपट्टी विभागाने दि.17/02/2016 रोजी दिले आहे. सदर अनुपालानाचे अवलोकन करुन खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची ड प्रकरण 8, कराधान नियम या प्रकरणामधील नियम 39, विविक्षित करांबद्दल बिल सादर करणे (1) नुसार कोणताही मालमत्ता कर किंवा ज्या कराच्या बाबतील तो मालमत्ता कर वसूल करण्यासाठी तरतुद केलेल्या रीतीने वसुल करण्यात येईल, असे या अधिनियमान्वये किंवा तदनुसार जाहिर करण्यात आले असेल असा कोणताही कर किंवा अशा कोणत्याही कराचा कोणताही हप्ता देय होईल तेव्हा, आयुक्ताने फारसा विलंब न लावता, उक्त कर भरण्यास जबाबदार असणा-या व्यक्तीस, तिने देय असलेल्या रक्कमेचे बील देण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. परंतु घरपट्टी विभागाने आर्थिक वर्ष 2013-14 ची घरपट्टीची देयके एप्रिल 2013 ऐवजी

दि.28/10/2013 नंतर दिली आहेत.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची ड प्रकरण 8 ,कराधान नियम या प्रकरणामधील नियम, 30 नुसार मालमत्ताकरापैकी प्रत्येक कर हा प्रत्येक वर्षी 1 एप्रिल व 1 ऑक्टोबर रोजी याप्रमाणे सहामाही हप्त्यांनी अगावू देय आहे. तसेच अनुसूची ड प्रकरण 8, कराधान नियम या प्रकरणा मधील नियम 41 (1) नुसार बीलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरावयाची आहे आणि बीलामध्ये विनिर्दिष्ट केलेली दुस-या सहामाही कराची रक्कम प्रत्येक वर्षाच्या 31 डिसेंबरपूर्वी भरावयाची आहे. आणि जर कराची रक्कम भरण्यास पात्र असणा-या व्यक्तिने उपरोक्तप्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशी अदत्त रक्कम किंवा त्या रकमेचा भाग या व्यतिरिक्त,त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता,त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबादार असल्याचे चालू राहिल असे नमूद आहे. अधिनियमातील नियमाप्रमाणे मालमत्ता करापैकी प्रत्येक कर हा प्रत्येक वर्षी 1 एप्रिल व 1 ऑक्टोबर रोजी अगावू देय असल्याने घरपट्टी विभागाने मालमत्ता कराचे मागणी देयक आर्थिक वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर देणे आवश्यक आहे. जमा बाजूचे लेखापरीक्षण करताना मागणी देयकांची तपासणी केली असता सर्व मागणी देयकावर दि.07/10/2013 रोजी छपाई करुन देयक मालमत्ताधारकास दि.28/10/2013 रोजी दिल्याचे नमुद आहे. उदा. खतीब महमंदअली हनीफ ,भाग 205, मागणी नोंदणी क्र.832, बिल क्र.157576 पत्ता :- गव्हर्मेंट कॉलनी, 83 ग 13 यांना देण्यात आलेले देयक.

3) जमा बाजूची तपासणी केली असता मागणी देयके दि.28/10/2013 नंतर देण्यात आल्याने 01/04/2013 ते 30/09/2013 या कालावधीमध्ये खालील प्रमाणे घरपट्टीची रक्कम घरपट्टी विभागाकडे दि.30/09/2013 अखेर जमा झाली आहे.

DRAFT

| अ.क्र | विभागाचे नाव | थकबाकी जमा रु. | चालू मागणी जमा रु. |
|---|---|---|---|
| 1 | सांगली | 5119158 | 705859.45 |
| 2 | मिरज | 8181496.62 | 80036.38 |
| 3 | कुपवाड | 1322132 | 105814.5 |
| | एकूण | 14622786.62 | 891710.33 |

महानगरपालिकेच्या 2013 -14 च्या अर्थसंकल्पाची तपासणी केली असता पृष्ठ क्र.14 नंतर करनिर्धारण व संकलन विभागाचे एक परिशिष्ठ जोडण्यात आले आहे. त्यामध्ये 2012-13 या आर्थिक वर्षाची घरपट्टी विभागाची एकूण थकबाकी 14,98,68,486/- दाखविण्यात आली आहे. तसेच चालू मागणीचा अंदाज 262441603/- दर्शविण्यात आला आहे. म्हणजेच थकबाकी व चालू मागणी धरुन

एकूण रक्कम रु.412310089/- सांगली,मिरज आणि कुपवाड विभागामधून जमा होणे अपेक्षित आहे. परंतु देयके विलंबाने दिल्याने थकबाकी रु.1 कोटी 46 लाख व चालू मागणी रु. 8 लाख 91 हजार जमा झाली आहे. देयके न दिल्याच्या कालावधीमध्ये एकूण थकबाकी वसूलीचे प्रमाण 9.75 टक्के व चालू मागणी वसूलीचे प्रमाण 0.33 टक्के इतकेच आहे. महानगरपालिकेचे 2013-14 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक दि.28/03/2013 रोजी मांडण्यात आले आहे. घरपट्टी पासून मिळणारा महसूल हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख आर्थिक स्त्रोत असून अंदाजपत्रकामध्ये घरपट्टीपासून मिळणारे उत्पन्न एकुण उत्पन्नाच्या 11.73 टक्के अंदाजित केले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची ड प्रकरण 8,कराधान नियम या प्रकरणामधील नियम, 30 नुसार मालमत्ताकरापैकी प्रत्येक कर हा प्रत्येक वर्षी 1 एप्रिल व 1 ऑक्टोबर रोजी याप्रमाणे सहामाही हप्त्यांनी देय असल्याने व घरपट्टीपासून मिळणा-या उत्पन्नामधून महानगरपालिकेचा महसूली व भांडवली खर्च भागविण्यात येत असल्याने घरपट्टी वसूलीची कार्यवाही वेळेत होण्यासाठी मालमत्ताधारकास मागणी देयके एप्रिल महिन्यात मिळणे आवश्यक आहे. परंतु 2013-14 या आर्थिक वर्षाची मागणी देयके ऑक्टोबर 2013 मध्ये देण्यात आल्याने एप्रिल 2013 ते ऑक्टोबर 2013 अखेर घरपट्टीची वसूली कमी प्रमाणात झालेचे दिसून येते.

4) घरपट्टीची देयके वाटप केल्यानंतर दि.01/10/2013 ते 31/03/2014 अखेर या विभागाची वसूली खालील प्रमाणे झाली आहे.

| अ.क्र | विभागाचे नाव | थकबाकी जमा रु. | चालू मागणी जमा रु. |
|---|---|---|---|
| 1 | सांगली | 26424585 | 105008042.21 |
| 2 | मिरज | 13938205.82 | 40928992.38 |
| 3 | कुपवाड | 1672214 | 15473547 |
| | एकूण | 42035004.82 | 161410581.59 |

घरपट्टीची मागणी देयके दिल्यानंतर ऑक्टोबर 2013 ते 31 मार्च 2014 अखेर एकूण रक्कम रु.20,34,45,586.41/- रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये वसूल झालेली रक्कम रु. रु.245389189 /- शी तुलना केली असता 82.90 टक्के वसूली देयक दिल्यानंतरच्या सहा महिन्यामध्ये झाली आहे. यावरुन मागणी देयके विलंबाने दिल्याने घरपट्टीची वसूली उशिराने झालेचे स्पष्ट होते.

4) महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता घरपट्टीपासून मिळणारे उत्पन्नाचा अंदाज पृष्ठ क्र.2 वर दिलेला आहे. त्यानुसार व्दिनोंद कोड 001 वर P001 ते P009 या गौण शिर्षा पासून मिळणारे उत्पन्न रु.224379000/-, पृष्ठ क्र.4 वरील ब-3 फी पासून मिळणारे उत्पन्न या लेखाशिर्षांतर्गत (P050 ते P052) मिळणारे उत्पन्न रु.21 लाख, पृष्ठ क्र.6 वरील 003 क विभाग, 010 जलनिस्सारण या लेखाशिर्षा अंतर्गत E205 जलनिस्सारण करापोटी मिळणारी रक्कम रु. 17783000/-, पृष्ठ क्र.11 वरील 3 दुबेरजी या लेखाशिर्षा अंतर्गत शिक्षण

DRAFT

कर(म.शा.),रोजगार हमी कर व मोठ्या निवासी जागेवरील कर पासून मिळणारे उत्पन्न रक्कम रु.6,11,67,000/- असा एकूण जमेचा आयुक्त यांचा अंदाज रु.305429000/- असून महासभेने त्यामध्ये वाढ करुन रु.31,5429,000/- चा अंदाज वर्तविला आहे.

महानगरपालिकेच्या 2013 -14 च्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता, पृष्ठ क्र.14 नंतर करनिर्धारण व संकलन विभागाच्या अर्थसंकल्पाचे एक परिशिष्ठ जोडण्यात आले आहे. त्यामध्ये 2012-13 या आर्थिक वर्षाची घरपट्टी विभागाची एकूण थकबाकी 19,76,44,655/- दाखविण्यात आली आहे. तसेच चालू मागणीचा अंदाज 26,24,41,603/- दर्शविण्यात आला आहे. एकूण थकबाकी पैकी 50 टक्के थकबाकी रु.9,88,22,328/- व चालू मागणीच्या 80 टक्के रक्कम रु.20,99,53,282/- असे एकूण रु.30,87,75,610/- ची वसूली सांगली,मिरज आणि कुपवाड विभागामधून होणे अपेक्षित असल्याचा अंदाज करनिर्धारण विभागाने केला आहे. करसंकलन विभागाकडून अपेक्षित जमेचा अंदाज परिशिष्ठाचे सुरवातीस रु. 412310089/- वर्तविण्यात आला असताना करनिर्धारण विभागाने तो रु. 30,87,75,610/- केला असून आयुक्तांनी त्यामध्ये पुन्हा कपात करुन तो रु. 305429000/- इतका कमी केला आहे. आयुक्त यांनी अंदाजपत्रकामध्ये घरपट्टीच्या जमेचा अंदाज कमी का केला आहे या बाबतच्या खुलाशाची मागणी अर्धसमास ज्ञापन क्र.49, दि.12/01/2016 ने करण्यात आली असता याबाबतचा खुलासा करण्यात आलेला नाही.

05) सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आर्थिक वर्ष 2015 -16 च्या अंदाजपत्रकामध्ये 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये घरपट्टी विभागाकडून प्रत्यक्ष जमा झालेल्या कराची आकडेवारी पृष्ठ क्र.1 वर दिली आहे. त्यानुसार सामान्य कर, मोकळ्या भुखंडावरील कर, पाणीपुरवठा लाभ कर, साफसफाई लाभ कर, शिक्षण कर मनपा, पथकर, अग्निशमन उपकर, वृक्षकर ,अनाधिकृत मालमत्ता धारकांना दुप्पट दरात घरपट्टी या गौण शिर्षांतर्गत एकूण जमा रु.177465538/- तसेच पृष्ठ क्र.3 वरील ब- 3 शुल्क पासून येणारे उत्पन्न या लेखाशिर्षांतर्गत करविभाग नोटीस शुल्क, वॉरंट शुल्क,हस्तांतरण नोंदणी व फॉर्म शुल्कापोटी जमा रक्कम रु.1355600/- ,पृष्ठ क्र.6 वर दिलेली जलनि:सारण कराची वसूली रु.21146330/- व पृष्ठ क्रं.11 वर दुबेरजी जमा या लेखाशिर्षांतर्गत महाराष्ट्र शासनास भरणा करावयाच्या शिक्षण कर ,रोजगार हमी कर ,मोठ्या निवासी जागेवरील करापोटीची जमा रु.45421721/- अशी एकूण वसूली रु.245389189 /- झालेली आहे. आयुक्त यांनी केलेला अंदाज रु. 305429000/- शी प्रत्यक्ष वसूल केलेल्या जमेशी तुलना केली असता वसूलीची टक्केवारी 80.34 टक्के आहे. घरपट्टी विभागाची 2013-14 या आर्थिक वर्षाचे सुरवातीस असलेली थकबाकी रु. 19,76,44,655/- व चालू मागणीचा अंदाज रु. 262441603/- असे एकूण रु.412310089/- जमा होणे अपेक्षित असताना रक्कम रु. 245389189/- जमा झाली आहे. प्रत्यक्ष वसूल केलेल्या जमेशी अपेक्षित जमा होणा-या रक्कमेशी तुलना केली असता वसूलीची टक्केवारी 59 टक्के एवढीच आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1949 चे नियम 26(8) नुसार जर जमा व खर्च यांचे आकारामध्ये असामान्य चढ-उतार होत असतील तर येथे अशा चढ-उतारांच्या कारणांसह

DRAFT

संक्षिप्त स्पष्टीकरण देणे आवश्यक असता घरपट्टी विभागाने प्रत्यक्ष जमा होणारे अंदाज अंदाजपत्रकामध्ये दिले नसल्याने त्याचा वसूलीवर परिणाम झाल्याचे दिसून येते. अंदाजपत्रकास वास्तववादी आकडे देवून त्याप्रमाणे वसूली करण्यात आली नसल्याने महानगरपालिकेचे घरपट्टीपासून मिळणारे महसूली उत्पन्न घटलेचे दिसून येते.

DATSBKM7201 (Ref No : 49)

## *80 वाढीव व सुधारित सांगली व कुपवाड नळ पाणीपुरवठा योजना पॅकेज 3.1, 3.3 व 3.4 या कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत.*

**UIDSSMT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 22**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनि:सा केंद्र,राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1402249.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2935994.00/-

***या योजनेमधील माळबंगला ते हिराबाग शुध्द पाणी गुरूत्व नलिका टाकणे हे 180 मिटरचे काम खाजगी जागेमधुन जात असल्याने भोगवटादाराने बंद पाडले आहे. सार्व.बांधकाम पुस्तिका नियमावलीमधील परिच्छेद 251 नुसार कामाची जागा ताब्यात मिळाल्यानंतरच काम करणे आवश्यक असता जागा ताब्यात नसताना काम केल्याने काम अपुर्ण राहिले आहे. ठेकेदाराची निविदा चालु दरसूची 2010-11 च्या दरापेक्षा 9.97 टक्के जादाने निविदा मंजुर केली असुन त्यास भाववाढ निर्देशांकानुसार प्राईस एस्कलेशन देखील दिली असल्याने ठेकेदारास रक्कम रु.1402249/- दुहेरी लाभ झाला आहे. ठेकेदारास दि.31/03/2014 अखेर मुदतवाढ पाणीपुरवठा विभागाने मुदतवाढीची कारणे नमुद न करता प्रस्तावित केला आहे. देयकामधुन कपात केलेली विम्याची रक्कम रु.2531197/- शासकीय विमा निधीकडे भरणा न करता अनामत सदरी ठेवण्यात आली आहे व ठेकेदाराने काम सुरू झाल्यानंतर तीन वर्षाने अन्य विमा कंपनीकडे पुर्वलक्षी प्रभावाने विमा उतरुन त्याची पॉलिसी सादर केल्यानंतर ठेकेदारास देयकामधुन कपात केलेली विम्याची रक्कम रु.2531197/- परत केली आहे. सदरची रक्कम ठेकेदाराकडून वसुलपात्र आहेत. तसेच टाकीची ऊंची कमी झाल्याने ठेकेदारास आदा केलेली रक्कम रु.404797/- ठेकेदाराकडुन वसुलपात्र आहे. ठेकेदारास देयकाची रक्कम आदा करताना शासन निधी व स्वनिधी मधुन ठरलेल्या हिश्श्याप्रमाणे आदा न करता सर्व रक्कम रु.11387780/- शासननिधीमधुन आदा करण्यात आली आहे. निविदा निविदा दरापेक्षा 111.85 टक्के जादाने आल्याने जादाची रक्कम रु.5269927.95/- व भाववाढ निर्देशांकानुसार ठेकेदारास आदा केलेली रक्कम रु.1402249/- अशी एकुण रक्कम रु.6672176.95/- स्वनिधीमधुन आदा न करता शासननिधीमधुन आदा केली आहे.***

वाढीव व सुधारित सांगली व कुपवाड नळ पाणी पुरवठा योजना पॅकेज 3.1, 3.3 व 3.4 मधील कामे केंद्र व



DRAFT

राज्यशासनाच्या UIDSSMT योजनेमधुन करण्यात आलेली आहेत. सदर निविदेमध्ये माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र ते हिराबाग पाणी पुरवठा केंद्रापर्यंत 800 मी.मी. डी.आय. के-9 दाबनलिका टाकणे, शालीनीनगर व वानलेसवाडी येथे उंच टाक्यांसाठी शुध्द पाण्याची गरुत्व नलिका टाकणे व कुपवाड वानलेसवाडी व अन्य 5 ठिकाणी विविध लिटर क्षमतेच्या पिण्याच्या पाण्याच्या उंच टाक्या उभारणे या कामाचा अंतर्भाव आहे. 2011-12 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये या कामाची निविदा प्रक्रिया व या वर्षात आदा केलेली रु.27,70,86,318/- ची धावती देयके तपासली आहेत. व त्याबाबतचे आक्षेप अहवालामध्ये परिच्छेद क्र.24 वर नोंदविले आहेत. 2012-13 या आर्थिक वर्षात या कामाची रु.55634650/-एकुण 03 धावती देयके तपासण्यात आलेली आहेत व कामाबाबतचे आक्षेप परिच्छेद क्र.142 वर नोंदविण्यात आले आहेत.

प्रशासकीय मान्यता :- No. DMA/UIDSSMT - Letters 2006/C R- 264/4, Director of Municipal Administratinon Dt. 28/09/2006 ( 2nd meeting of the state level sanctioning committee)

तांत्रिक मान्यता :- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभाग पत्र CE PUNE/TB-3/Sangli WSS/Technical Deviation/3577 Dt.12/10/10.

स्थायी समिती सभा क्र.09 ठराव क्र.127 दि.22/07/2010 अन्वये निविदा मागविणेस मान्यता दिली आहे.

स्थायी समिती सभा क्र.20 ठराव क्र.359 दि.23/11/2010 अन्वये मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि. यांची निविदा प्राकलन रक्कम रु.149051271/- च्या 111.85 टक्के जादा दराने व चालु दरसूची (2010-11) चे 9.97 टक्के जादा दराने मंजुर केली असून कामाची किंमत रु.315767118/- होत आहे.

कामाचा कार्यादेश :- पाणीपुरवठा विभाग आदेश क्र.मनपा/पापुवि/सांगली/611/10-11 दि.23/12/2010.

कामाची मुदत :- 18 महिने (दि.22/06/2012)

कामास प्रथम मुदतवाढ : दि.31/03/2013 अखेर आयुक्त यांनी मुदतवाढ दिलेली आहे.

दुसरी मुदतवाढ :- दि.30/10/2013 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

2013 - 14 या आर्थिक वर्षात या कामावर खालील प्रमाणे खर्च झाला आहे.

| अ.क्र. | धावते देयक क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रु. | एम.बी.क्र./पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 09 | 04 | 06/08/2013 | 11383780 | 29/ 60 ते 100<br>33/ 01 ते 02 |

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तक, धावते देयक व प्रमाणक तपासुन अर्धसमास ज्ञापन क्र.102 दि.30/04/2016 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले

नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) या कामाच्या बी-1 टेंडरमधील भाववाढ निर्देशांक अटी/शर्ती 62 प्रमाणे, भाववाढ निर्देशांक (प्राईस एस्कलेशन) डी.आय.पाईप्स, सिमेंट व लोखंड यावर देणे आवश्यक असलेचे नमुद आहे. निविदा 2005-06 च्या निविदादरापेक्षा 111.85 टक्के जादाने व 2009-10 चे चालु दरसूचीशी तुलना करुन ठेकेदारास 9.97% जादा दराने दिली आहे. ठेकेदाराने जादा निविदा दराचे समर्थनार्थ दरपृथ्थकरण तक्ता नस्तीमधील पृष्ठ क्र.233 वर जोडला आहे. त्यामधील अ.क्र. 3 वर DI Pipe cost Difference As per General Note Of CSR 2009/10, Pg No.10, It.No.33 नुसार आलेला दर रु.18190301/- व अ.क्र. 4 Price Indices Diff. From Nov.o9 to July 10 For Labour, Material, POL, Cement And Steel रक्कम रु.5007303/- या धरण्यात आल्याने निविदा जादा दराने आल्याचे दरपृथ्थकरण तक्त्यामध्ये नमुद आहे. ठेकेदाराची निविदा चालू दराशी तुलना करुन 9.97 टक्के जादा दराने मंजुर केल्यानंतर ठेकेदारास पुन्हा सिमेंट,स्टील, पाईप व मजुरीच्या दरावर भाववाढ निर्देशांकाप्रमाणे Price Escalation दिले आहे. धावते देयक क्र.09 मधुन भाववाढ निर्देशांकानुसार (price escalation) रु.1402249/- ठेकेदारास आदा केले आहेत. त्यामुळे ठेकेदारास भाव वाढ निर्देशांकानुसार वाढीव किंमत व जादा दराने दिलेली निविदा असा दुहेरी दराचा लाभ मिळाल्याचे स्पष्ट होत असल्याने रु.1402249/- खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) या कामाच्या मुळ नस्तीची तपासणी केली असता पृष्ठ क्र.1159 वरील आयुक्त निर्णयामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73(क) नुसार कार्यकारी अभियंता यांचे दि.25/09/12 चे कार्यालयीन टिपणी अवलोकनी घेता सदर ठेकेदारास दरवाढ न देण्याच्या अटीस अधिन राहुन दि.31/3/13 पर्यंत दि.22/06/12 रोजी अथवा आज रोजी असलेले निर्देशांक यापैकी जे कमी असतील ते निर्देशांक गोठवुन भाववाढ फायद्यासह मुदतवाढ मंजुर करण्यात येत आहे असा निर्णय झाला आहे. तसेच या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता आयुक्त यांनी आदेश क्र.192, दि.30/09/ 2013 अन्वये या कामास दि.31/10/2013 अखेर मुदतवाढ दिली आहे. परंतु सदर आदेश व मुदतवाढ कोणत्या कारणासाठी दिली आहे या बाबतची माहिती लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नसल्याने मुदतवाढीची कारणे योग्य असलेबाबतची तपासणी करता आलेले नाही. नस्तीमध्ये कार्यकारी अभियंता यांनी या कामाचे ठेकेदार मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग प्रा.लि. यांना जाक्र / मनपा /पापुवि/सां/697/13-14 दि.02/01/2014 रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत जोडली आहे. सदर पत्रामध्ये आपण दि.31/03/2014 पर्यंत मुदतवाढ मागितली आहे. परंतु आपली बँक गॅरंटीची मुदत दि.31/03/2014 पर्यंत वाढवुन सादर करावी म्हणजे मुदतवाढीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येईल असे नमुद आहे. त्याप्रमाणे ठेकेदाराने बँक गॅरंटी क्र. BG/123/10-11 Dated 03/12/2012 For Rs.39,48,000/- व बँक गॅरंटी क्र.BG/124/10-11 Dated 03/12/2012 For Rs.39,48,000/- या कर्नाटक बँक लि. कोल्हापूर या बँकेच्या गॅरंटीची मुदत दि.03/04/2014 अखेर वाढवुन दि.05/05/ 2014 रोजी कार्यालयास सादर केली आहे. परंतु पाणीपुरवठा विभागाने मुदतवाढीबाबत पुढे काय

DRAFT

कार्यवाही केली याची माहिती नस्तीमध्ये दिसुन येत नाही. त्यामुळे ठेकेदारास मुदतवाढ दिली किंवा नाही या बाबतची माहिती लेखापरीक्षणास समजलेली नाही.

4) या कामाच्या नस्तीची व देयकाची तपासणी केली असता ठेकेदार मे. लक्ष्मी इंजिनिअर यांनी माळबंगला ते हिराबाग शुध्द पाणी गुरुत्वनलिका टाकणे (800 मि.मि. व्यास डी आय के 9 लांबी 3600 मी.) या कामामधील मेन पाईप लाईन लांबीचे काम करणेसाठी (180 मिटर लांबीचे अशोका टोल ब्रिज ते गॅरेजपर्यंत ) आपलेकडुन अद्यापही लाईन आऊट नसलेने तसेच सदरहु लाईनची खुदाई व जुडाई ज्या भागामधुन जात आहे त्या संबंधित भोगवटादाराने अडविल्यामुळे त्या ठिकाणी पाईपलाईन टाकणे शक्य नसल्याचे कार्यकारी अभियंता यांना ठेकेदाराने दि.23/12/2013 च्या पत्राने कळविले आहे व सदर पत्र पाणीपुरवठा विभागास आवक क्र.6873 दि.26/12/2013 ने मिळाल्याची त्या पत्रावर नोंद आहे. तसेच श्री.एम.वाय.गुंडे या नागरीकाने जुना बुधगाव रस्त्यावरील स.नं 132/2 मध्ये माझे मालकीची 0.33 आरची जमीन असुन त्यामधुन महानगरपालिका अनधिकृतपणे पाईप लाइनचे काम करण्यासाठी मार्कींग केले आहे व सदर काम माझे जमिनीमध्ये नुकसान भरपाईची रक्कम दिल्याशिवाय करण्यात येवू नये असे पत्र आयुक्त यांना दि.15/04/2013 रोजी दिले आहे. सदर जागा ताब्यात घेण्याबाबतची कार्यालयीन टिपणी कार्यकारी अभियंता यांनी उपायुक्त यांचेकडे दि.18/07/2013 रोजी पाठविली आहे व टिपणीमध्ये नगररचना विभागास जागा ताब्यात घेण्याबाबतची पुढील कार्यवाही करणेसाठी योग्य आदेश देण्यात यावेत असे नमुद आहे. उपायुक्त यांनी त्या टिपणीस दि.30/07/2013 रोजी मान्यता दिला आहे. नुकसानभरपाई रक्कम देणेबाबतची चर्चा करणेसाठी कार्यकारी अभियंता यांनी जागा मालक श्री.गुंडे यांना दि.13/12/2013 रोजी पाणी पुरवठा कार्यालयामध्ये हजर राहणे बाबत पत्र क्र.मनपा /पापुवि /सां/ 637 /13-14 दि.05/12/2013 ने कळविले आहे. तसेच सर्व्हे नं. 132/2 मधील जागेचे भुसंपादन करणे बाबत कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी सहाय्यक संचालक , नगररचना यांना पत्र क्र./मनपा/ पापुवि/सां/851/13-14 दि.04/03/2014 चे पत्राने कळविले आहे. पाणीपुरवठा विभागाने जागा ताब्यात घेण्याबाबत जलद गतीने कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे जागा ताब्यात घेण्यासाठी एक वर्षाचा दिनावधी वाया गेल्यामुळे काम पुर्ण होण्यास विलंब होत असल्याचे स्पष्ट होते. सदर जागा पाणीपुरवठा विभागाने कधी ताब्यात घेतली व त्या ठिकाणी काम करण्याचे ठेकेदारास कधी आदेश दिले याबाबतची माहिती नस्तीमध्ये दिसुन येत नाही. सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद 251 नुसार कामाची जागा ताब्यात मिळाल्यानंतरच कामाची वर्क ऑर्डर देणे आवश्यक आहे तसेच ज्या कामाचे टेंडर मंजूर केले आहे परंतु जागा ताब्यात मिळालेली नाही अशा प्रकरणी ती जागा ताब्यात कधी मिळू शकेल याची खात्री संबंधित महसूल यंत्रणेकडून करुन घेवून मगच कामाचा कार्यादेश देणे आवश्यक आहे. परंतु पाणीपुरवठा विभागाने पाईपलाईन टाकण्यासाठी लागणारी पुर्ण जागा ताब्यात नसताना कामाचा कार्यादेश दिल्याने कामात अडथळे येवून काम पुर्ण होण्यास विलंब लागत आहे. निविदेप्रमाणे माळबंगला ते हिराबाग शुध्द पाणी गुरुत्वनलिका टाकणे हे काम 3600

DRAFT

मिटर करण्याचे असुन ठेकेदाराने एकुण 3600 मिटरचा पाईप पुरवठा केला आहे. परंतु प्रत्यक्षात 3293.58 मिटरच पाईप लाईन अंथरल्याने सदर काम अपुर्ण असल्याने योजना कार्यान्वित होण्यामध्ये अडचण निर्माण झाल्याचे दिसुन येते.

5) या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता पाणीपुरवठा विभागाने दि.26/12/2013 रोजी या कामाची विमा पॉलिसी ठेकेदाराने काढलेली नसल्याने या कामाच्या नऊ रनिंग देयकातून बिलाच्या 1 टक्के प्रमाणे कपात केलेली व विशेष अनामत म्हणुन राखुन ठेवलेली रक्कम रु.3135272/- ठेकेदारास परत करणेबाबतची टिपणी आयुक्त यांचेकडे सादर केली आहे. ठेकेदाराने या कामाचा दि. 23/12/2010 ते दि. 22/12/2013 या तीन वर्ष कालावधीचा विमा पुर्वलक्षी प्रभावाने न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनीकडे दि.08/08/2013 रोजी उतरला आहे व ठेकेदाराने त्यांची विमा कपातीची रक्कम परत मिळणेची मागणी केली असल्याने त्यास परत करणे आवश्यक असल्याची टिपणी पाणीपुरवठा विभागाने आयुक्त यांचेकडे प्रस्तावित केली आहे. सदर प्रस्ताव पाणीपुरवठा विभागाकडून मुख्य लेखाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आल्यानंतर मुख्य लेखाधिकारी यांनी विमा पॉलिसी क्र.16020044130300000020 ( पॉलिसी रक्कम रु.188346/- ) ची मुदत दि.22/12/2013 रोजी संपल्याने पॉलिसी ची मुदतवाढ करुन टिपणी फेर सादर करण्याची शिफारस केली आहे. ठेकेदाराने दि. 22/06/2014 अखेर मुदतवाढ करुन दिलेली न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी ची पॉलिसी क्र.16020044130300000032, दि.09/01/2014 ( पॉलिसी रक्कम रु.57477/- ) (Co Insurance 100 टक्के) जोडून टिपणी पुन्हा लेखा विभागाकडे दि.18/01/2014 रोजी सादर केली आहे. ठेकेदाराने सदर पॉलिसी, नागपूर D0II, प्लॉट क्र.42, प्रगती कॉलनी,ऑपोझिट साई मंदीर, वर्धा रोड, नागपूर या ठिकाणी काढली आहे. सदर काम सांगली येथे करणेत येत असून सांगली येथे न्यु इंडिया इन्श्युरन्सचे कार्यालय असताना नागपूर येथे या कामाची पॉलिसी काढण्याचे प्रायोजन समजुन येत नाही. नस्तीमध्ये सदर पॉलिसीची झेरॉक्स कॉपी जोडली असल्याने या पॉलिसिची विधीग्राह्यता तपासता आलेली नाही. पाणीपुरवठा विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे ठेकेदाराची विमा कपातीची अनामत रक्कम परत देण्याची शिफारस उपायुक्त यांनी केली आहे व त्यास आयुक्त यांनी दि. 22 जाने 2014 रोजी मान्यता दिली आहे. या कामाची निविदा मजिप्राचे सन 2005-06 च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन मागविलेली आहे व 135.10 टक्के जादाने आलेली निविदा चालु दससूचीशी (सन 2009-10) दरपृथ्थकरण करुन 111.85 टक्के जादा दराने मान्य केली आहे. सदर निविदा सन 2009-10 च्या मजिप्रा दरसूचीवर 9.97 टक्के जादा दराने मंजुर केली आहे. (कामाची निविदा किंमत रु.149051271/- इतकी असुन कामाची मंजुर किंमत रु.315767118/- इतकी आहे). महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2009-10 च्या विभागीय दरसूचीमधील जनरल नोट्स मध्ये दरसूचीमध्ये 1 टक्के विम्याची तरतुद केली असल्याने ठेकेदाराच्या देयकामधून 1 टक्का विम्याची रक्कम कपात करुन शासकीय विमा निधी मध्ये भरणे आवश्यक आहे असे नमुद आहे. त्यामुळे या कामाच्या विम्याची कपात केलेली रक्कम महानगरपालिकेने शासकीय विमा निधीकडे भरणा न करता नियमबाह्यरित्या

DRAFT

अनामत सदरी ठेवलेली आहे. या नियमबाह्यतेबाबतचा खुलासा पाणीपुरवठा विभागाने अर्धसमास ज्ञापन क्र.102 अन्वये मागणी करुन ही लेखापरीक्षणास सादर केलेला नाही. कामाचा विमा कामाचे सुरवातीस काढणे आवश्यक असता तो काम चालू झाल्यानंतर तीन वर्षांनी काढण्यात आला आहे. तसेच देयकामधुन कपात केलेली विमा रक्कम शासकीय विमा निधीकडे त्वरीत भरणा न करता सदर रक्कम ठेकेदारास परत करण्याचा प्रस्ताव कोणत्या नियमाने तयार करुन त्यास आयुक्त यांची मंजुरी घेतली आहे याचा खुलासा पाणीपुरवठा विभागाने केलेला नाही. विम्याची अनामत रक्कम ठेकेदारास परत करण्याचे देयक तयार करुन (अनामत रिफंड रजिस्टर पृष्ठ क्र.42) पाणीपुरवठा विभागाने लेखा विभागास दि.07/08/2013 रोजी पाठविले आहे. सदर कपात केलेली व अनामत खाती ठेवण्यात आलेली विम्याची रक्कम रु.3135272/- पैकी लेखा विभागाने ठेकेदारास प्रमाणक क्र.415 ने दि.21/10/2014 रोजी रक्कम रु.2531197/- आदा केली आहे. सदर रक्कम ठेकेदाराकडून वसूल करुन शासकीय विमा संचालनालयाकडे भरणा करावी व त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

6) या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केले असुन, अधिक्षक अभियंता (गु.प.प.) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, गुणवत्ता नियंत्रण पथक नरीमन पॉईंट मुंबई यांनी यांनी जाक्र गुपप/तांशा/UIDSSMT/ सांकुमनपा ग्रुप -3/53/2014 दि.26/03/2014 चे पत्राने UIDSSMT योजनेमधील 3.1 पॅकेजमधील कामांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी केलेचा अहवाल पाणीपुरवठा विभागास पाठविला आहे. या रिपोर्टच्या अ.क्र. 5 पृष्ठ क्र.11 वर कुपवाड गावठाण येथे उंच जलकुंभ बांधणे (क्षमता 6.47 लक्ष लिटर, कामाची किंमत रक्कम रु.4386473) या जलकुंभाचे काम पूर्ण झाले असून त्याची उंची 12 मिटर ऐवजी 8 मिटर केलेने सदर उपांगांतर्गत कमी झालेल्या कामामुळे योग्य ती रक्कम ठेकेदाराच्या देय होणा-या देयकामधुन वजावट करण्याचे सूचित केले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2011-12 च्या दरसुचीमधील पृष्ठ क्र.247 व 248 वर RCC ESR चे दर दिले आहेत. पृष्ठ क्र.247 वर अ.क्र.16 मध्ये 12 मिटर उंचीच्या टाकीचे दर दिले आहेत. तसेच टाकीच्या उंची मध्ये फरक पडल्यास काय कार्यवाही करावी ते नमुद आहे. त्यानुसार टाकीची उंची वाढल्यास प्रत्येक मिटरला 2 टक्केप्रमाणे जादा दर देणे व कमी झाल्यास 2 टक्के प्रमाणे दर कमी करणे आवश्यक आहे. या टाकीची उंची 4 मिटरने कमी झाल्याने टाकीचा दर 8 टक्केप्रमाणे कमी करणे आवश्यक असल्याने रक्कम रु.4386473 X 8 टक्केप्रमाणे रु.350918/- व निविदा 9.97 टक्के जादाने आल्याने रु.350918 X 9.97 टक्केने रु.34986/- असे एकूण रु.385904/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावेत. तसेच प्राधिकरणाच्या त्रयस्थ चाचणी अहवालामधील अ.क्र. 8 पृष्ठ क्र.15 वर शरदनगर येथे उंच जलकुंभ बांधणे (क्षमता 0.50 लक्ष लिटर, कामाची किंमत रक्कम रु.859045 ) या या जलकुंभाचे काम पूर्ण झाले असून टाकीची उंची 12 मी.ऐवजी 10 मी. केलेने 2 टक्केप्रमाणे टाकीचा दर कमी करणे आवश्यक असल्याने रु.859045 X 2 टक्केप्रमाणे रु.17180/- + 9.97 टक्केने जादाची रक्कम रु.1713/- असे एकूण रु.18893/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावेत.

7) ठेकेदारास 2013-14 या वर्षामध्ये प्रमाणक क्र. 04 दि. 06/08/2013 ने रु.11383780/- आदा

DRAFT

केले आहेत. तसेच धावते देयक क्र. 01 ते 09 अखेर एकूण रक्कम रु.313113605/- ठेकेदारास आदा केली आहे. सर्व रक्कम केंद्र शासनाकडून आलेल्या अनुदानामधूनच आदा केली आहे. Govt of India,Ministry of Urban Development यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे व त्यामध्ये या कामाचा समावेश केलेला आहे. सदर सुधारीत मान्यता देताना या कामासाठी केंद्र शासनाकडून कोणतेही अनुदान मिळणार नसून या कामाचा खर्च राज्य शासन व महानगरपालिका यांनी त्यांचे निधीतून करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहे. शासनाने सन 2005-06 चे दरसूचीनुसार तयार केलेल्या निविदा किंमतीस डी.पी.आर.मध्ये मान्यता दिली आहे. मंजुर डी.पी.आर नुसार या कामाची किंमत रक्कम रु.149051271/- असुन ठेकेदाराची निविदा, निविदा दराच्या (2005-06 च्या दरसुचीवर) 111.85 टक्के जादा दराने व चालु दरसूची (2010-11) नुसार येणा-या किंमतीच्या 9.97 टक्के जादा दराने मंजुर केली असून कामाची किंमत रु.315767118/- होत आहे. या योजनेमधील कामासाठी केंद्र व राज्य शासनाकडून 90 टक्के प्रमाणे रु.134146144 /- अनुदान प्राप्त झाले आहे. या कामाची मंजूर निविदा किंमत रु. 315767118 /- इतकी असल्याने व शासनाकडून रक्कम रु. 134146144 /- अनुदान या कामासाठी प्राप्त झाल्याने उर्वरित रक्कम रु.181620974 /- महानगरपालिकेच्या स्वनिधी मधून खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदारास कामाची देयके प्रदान करताना 42.48 टक्के रक्कम शासननिधी मधून व 57.51 टक्के रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च करणे आवश्यक होते. परंतु सर्व रक्कम शासन निधीमधुन खर्च करण्यात आली आहे. महानगरपालिकेने ठेकेदारास आर्थिक वर्ष 2013 -14 मध्ये रु.11383780 /- आदा केले आहेत. अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 44.13 टक्के प्रमाणे रु.5023662 /- व स्वनिधीमधून 55.87 टक्क्याप्रमाणे रु.6360118 /- देणे आवश्यक असता सर्व रक्कम शासननिधीमधून खर्च करण्यात आली आहे. या वित्तिय अनियमिततेमुळे या योजनेअंतर्गत करण्यात येणा-या अन्य कामांना निधी कमी पडून योजनेची प्रगती रखडणार असून निधी अभावी कामे अपूर्ण राहणार असल्याचे स्पष्ट होते. महानगरपालिकेच्या हिश्श्याची रक्कम स्वनिधीमधुन खर्च का करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.102 अन्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास देण्यात आलेला नाही.

7) या कामाची एकुण किंमत रु.315767118/- असुन या कामावर 9 व्या धावत्या देयका अखेर रक्कम रु.313113605/- खर्च झाला आहे. सदर योजनेवर 99 टक्के खर्च झाला आहे. या कामामध्ये एकुण 10 उपांगाचा समावेश असुन त्यापैकी 8 उपांगाचे काम पुर्ण झाले आहे. परंतु माळबंगला ते हिराबाग 800 मि.मि.व्यासाची DIK-9 पाईप अंथरणे या उपांगाचे काम 3600 मिटर असुन त्यापैकी 3293.58 मिटरचे काम पुर्ण झाले आहे. तसेच कुपवाड व वानलेसवाडी येथे वितरणव्यवस्था अंथरणे या कामामधील खालील कामे अपुर्ण आहेत.

| अ.क्र. | पाईपचा व्यास व प्रकार | निविदेमधील तरतुद | पुरवठा झालेली पाईप | अंथरलेली पाईप |
|---|---|---|---|---|
| 1 | 450 मिमि व्यास DIK-9 | 350 | 349 | 295 |



DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | 350 मिमि व्यास DIK-7 | 1590 | 1587 | 1327.25 |
| 3 | 300 मिमि व्यास DIK-7 | 3185 | 3186 | 3101.53 |
| 4 | 250 मिमि व्यास DIK-7 | 3905 | 3903 | 3820.76 |
| 5 | 200 मिमि व्यास DIK-7 | 4845 | 4845 | 4246.90 |
| 6 | 150मिमि व्यास DIK-7 | 23880 | 23880 | 23715.80 |
| 7 | 100मिमि व्यास DIK-7 | 64145 | 64146 | 63929.25 |

सदर पाईप लाईन अंथरण्याचे काम प्रलंबित असल्याने योजना कार्यान्वित झाली नसल्याचे स्पष्ट होते.

**वसुलपात्र रक्कम :-** विम्याची देयकामधुन कपात करुन शसकीय विमा निधीकडे भरणा न करता अनामत सदरी ठेवण्यात आलेली व नंतर ठेकेदारास परत केलेली रक्कम रु.2531197/- + ऊंच पाण्याच्या टाकीची ऊंची कमी केल्याने कपात करावयाची रक्कम रु.404797/- = रु.2935994/-

**आक्षेपाधिन रक्कम :-** निविदा जादा दराने दिली असुन ठेकेदारास भाववाढ निर्देशांकानुसार प्राईस एस्कलेशन दिली असल्याने ठेकेदारास दुहेरी लाभ झालेची रक्कम रु.1402249/-

DATSBKM7201 (Ref No : 102)

## *86 मुख्य लेखापरीक्षकांनी महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक चाचणी करुन 2013-14 या आर्थिक वर्षात केलेल्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाची प्रत लेखापरीक्षणास सादर केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 10**

*लेखा शीर्ष : लेखापरीक्षण मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 105 (1) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने महानगर पालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी व लेखापरीक्षा करुन त्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच अधिनियमाचे कलम 106 (1) (अ) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेने केलेल्या खर्चाच्या बाबतीत किंवा तिला येणे असलेल्या रकमांच्या वसुली बाबतीत किंवा तिच्या लेख्यांच्या बाबतीत जे कोणतेही महत्वाचे अयोग्य किंवा नियमबाह्य प्रकार त्यास कोणत्याही वेळी आढळुन येतील त्यासंबंधी स्थायी समितीस अहवाल सादर करणे आवश्यक आहे. परंतु मुख्य लेखापरीक्षण कार्यालयाने या बाबत स्थायी समितीस पाठविलेले साप्ताहिक अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.***

DRAFT

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 105 (1) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने महानगर पालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी व लेखापरीक्षा करुन त्यावरील आपला अहवाल स्थायी समिती कडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच अधिनियमाचे कलम 106 (1) (अ) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेने केलेल्या बाबतीत किंवा तिला येणे असलेल्या रकमांच्या वसुली बाबतीत किंवा तिच्या लेख्यांच्या बाबतीत जे कोणतेही महत्वाचे अयोग्य किंवा नियमबाहृय प्रकार त्यास कोणत्याही वेळी आढळुन येतील त्यासंबंधी स्थायी समितीस अहवाल सादर करणे आवश्यक आहे. अधिनियमानुसार मुख्य लेखापरीक्षण कार्यालयामार्फत कशाप्रकारे कामकाज चालते याबाबतची माहिती मुख्य लेखापरीक्षण कार्यालयाकडे अर्धसमास ज्ञापन क्र.122 , दि.28/06/2016 ने मागविण्यात आली होती. परंतु सदरच्या अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन मुख्य लेखापरीक्षण कार्यालयाने सादर केलेले नाही. सदर कार्यालयाकडील हजेरी पत्रक, मंजुर अकृतीबंध तसेच विविध विकास कामांच्या नस्तीचे लेखापरीक्षण करताना मुख्य लेखापरीक्षकांनी नस्तीमध्ये दिलेल्या शिफारशी यांची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षण विभागाच्या कामकाजाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) आस्थापना विभागाकडे असलेल्या मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाच्या मंजुर आकृतीबंधानुसार खालीलप्रमाणे कर्मचारी मंजुर आहेत. मुख्य लेखापरीक्षक 1, अंतर्गत लेखापरीक्षक-2, उपलेखापरीक्षक - 1, सहा.लेखापरीक्षक - 1, वरिष्ठ लिपिक - 5 ,कनिष्ठ लिपिक - 4, शिपाई -3 असा एकुण 17 स्टाफ मंजुर आहे. मुख्य लेखापरीक्षक कार्यालयामधील जानेवारी 2014 ते मार्च 2014 च्या कर्मचारी हजेरी पुस्तकाची तपासणी केली असता एक वरीष्ठ लिपिक, 04 कनिष्ठ लिपिक व दोन शिपाई इतके कर्मचारी कार्यरत असल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 51(1) अन्वये स्थायी समितीने मुख्य लेखापरीक्षक यांचे अधिनस्त काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांची संख्या, पदनाम, श्रेणी, वेतन, फी व भत्ते कलम 51 चे पोटकलम (4) च्या तरतुदीच्या अधिन ठरविणे आवश्यक आहे. याबाबत स्थायी समितीने ठराव केलेला नाही.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (2) नुसार मुख्य लेखापरीक्षक यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याच्या आधिन मुख्य लेखापरीक्षक यांच्याकडे निहित असलेचे नमुद आहे. त्याप्रमाणे मुख्य लेखापरीक्षक कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची नेमणुक कोणी केली व सदर नेमणुकीस स्थायी समितीची मान्यता घेतली अगर कसे याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत. त्यामुळे मुख्य लेखापरीक्षण कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या नेमणुका व बदल्या कोणाच्या आदेशाने होतात ते समजुन आलेले नाही.

3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 105 (1) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने महानगर पालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी व लेखापरीक्षा करुन त्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच अधिनियमाचे कलम 106 (1) (अ) नुसार मुख्य

DRAFT

लेखापरीक्षकाने महानगरपालिकेने केलेल्या बाबतीत किंवा तिला येणे असलेल्या रकमांच्या वसुली बाबतीत किंवा तिच्या लेख्यांच्या बाबतीत जे कोणतेही महत्वाचे अयोग्य किंवा नियमबाह्य प्रकार त्यास कोणत्याही वेळी आढळुन येतील त्यासंबंधी स्थायी समितीस अहवाल सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मुख्य लेखापरीक्षक यांनी महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षामधील साप्ताहिक लेख्यांची तपासणी करुन स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेल्या अहवालाच्या प्रती लेखापरीक्षणास सादर करणे बाबत तसेच लेख्यांची साप्ताहिक चाचणी केली नसल्यास त्याची कारणे नमुद करण्याबाबतची माहिती देणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.122 , दि.28/06/2016 रोजी निर्गमित केला होता. परंतु याबाबतचे अनुपालन मुख्य लेखापरीक्षण कार्यालयाने लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

4)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमयमामधील कलम 106 (3) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेच्या लेखा विभागाने 2013-14 या आर्थिक वर्षाचा वार्षिक लेखा तयार करुन तपासणीसाठी मुख्य लेखापरीक्षकांना सादर केलेला नसल्याने मुख्य लेखापरीक्षकांनी या लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर केलेला नाही.

5) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ‘’ ड ’’ प्रकरणे 3 मधील दोन नुसार मुख्य लेखापरीक्षकाने 5 (1) प्रमाणे महानगरपालिकेच्या महसुलातुन झालेला खर्च आणि विशेष निधीमधुन झालेला खर्च यांची लेखापरीक्षा केली पाहिजे. तसेच महानगरपालिकेचे कर्ज, ठेवी, कर्जनिवारण निधी, आगाऊ रक्कमा, निलंबन लेखा आणि वित्तप्रेषण व्यवहार यांची लेखापरीक्षा केली पाहिजे आणि ते लेखे व त्यासंबंधी शिल्लक रक्कमांच्या पडताळणीचा निकाल याविषयीचा अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. या नियमाप्रमाणे मुख्य लेखापरीक्षकांनी स्थायी समितीस अहवाल सादर केलेला नाही. तसेच सदरचा लेखापरीक्षण अहवाल तयार न करण्याची कारणे लेखापरीक्षणास देण्याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.122, दि.28/06/2016 अन्वये मागणी करण्यात आली होती. परंतु मुख्य लेखापरीक्षकांनी याबाबत दिलेल्या अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन सादर केलेले नाही.

6) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ‘’ ड ’’ प्रकरण 3 (दोन) मुख्य लेखापरीक्षक कलम 5(4) नुसार महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरीक्षकाने स्थायी समितीशी विचारविनिमय करुन आणि महानगरपालिकेने कोणत्याही निदेशाच्या अधीन राहुन महानगरपालिकेच्या लेख्यासंबंधी आपले अहवाल ज्या नमुन्यात व ज्या रितीने तयार करावयाचे तो नमुना व रित ठरविणे आवश्यक आहे. त्यानुसार रित व विहित नमुना महानगरपालिकेने ठरविला असल्याबाबतची माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

7) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 105 (1) नुसार नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी व लेखापरीक्षा करुन अहवाल स्थायी

DRAFT

समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु मुख्य लेखापरीक्षकास त्याऐवजी महानगरपालिकेच्या विविध विभाग प्रमुखांकडून विकास कामांच्या खर्चाचे प्रस्ताव प्राकलनासमवेत पुर्व लेखापरीक्षणासाठी पाठविले जातात व मुख्य लेखापरीक्षकांची मान्यता झालेनंतर प्रस्ताव उपायुक्त यांचेकडून अंतिम मान्यतेसाठी आयुक्ताकडे पाठविले जातात. त्यामुळे मुख्य लेखापरीक्षक हे महानगरपालिकेच्या प्रशासकीय यंत्रणेच्या निर्णय प्रक्रियेचा भाग होत असलेचे स्पष्ट होते. मुख्य लेखापरीक्षकांनी पुर्व मान्यता दिलेल्या प्रकरणांचे काम पुर्ण झाल्या नंतर पुन्हा लेखापरीक्षण करणे ही बाब त्यास अधिनियमाने नेमुन दिलेल्या कर्तव्यांचे विरुध्द आहे.

8) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 106 (3) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाले नंतर शक्य तितक्या लवकर, मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु प्रशासनाकडून मुख्य लेखापरीक्षका कडे वित्तिय सल्ल्यासाठी खर्चाची प्रकरणे, कर्मचारी सेवापुस्तके व वेतनवाढ प्रकरणे, रोजंदारी कर्मचारी वेतन पत्रके, कर्मचारी वेतन देयके, कंत्राटदाराची देयके यांचे पूर्वलेखापरीक्षण करणेसाठी पाठविली जातात. तसेच महानगरपालिकेने मुख्य लेखापरीक्षकांचा समावेश निविदा समितीमध्ये ही केलेने विकास कामांची निविदा उघडणे त्यांची छाननी करणे ही अधिनियमाशी विसंगत कामे मुख्य लेखापरीक्षकाकडून करून घेतली जातात. त्यामुळे महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये जमा झालेल्या जमेचे व खर्चाचे साप्ताहिक लेखापरीक्षण करुन त्याचा अहवाल स्थायी समितीकडे पाठविण्याचे अधिनियमाने नेमुण दिलेले कर्तव्य मुख्य लेखापरीक्षकाकडून पार पाडले जात नसल्याचे स्पष्ट होते.

9) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण चार-अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे यामधील कलम 60 अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे (1) (3) (पाच) नुसार महानगरपालिकेने प्रत्येक तिमाही नंतर दोन महिन्यांच्या आत त्या तिमाहीचा लेखा परिक्षीत ताळेबंद ,जमा व खर्च आणि पैशाचा ओघ (CASH FLOW) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र इंटरनेटवर प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्यानुसार महानगरपालिकेने प्रत्येक तिमाहीचा मुख्य लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षत केलेला अहवाल व वित्तीय विवरणपत्र इंटरनेटवर प्रसिध्द केले बाबतची माहिती महानगरपालिकेच्या वेबसाईटवर दिसून येत नसल्याने महानगरपालिकेच्या वित्तिय स्थितीची माहिती नागरिकांना समजुन येत नाही.

10)मुख्य लेखापरीक्षण कार्यालयाचे कामकाजाविषयीची कर्यालयीन परीपत्रके तसेच अन्य आदेशाच्या प्रती लेखापरीक्षणास सादर केलेल्या नाहीत.

DATSBKM7201 (Ref No : 122)

### *87 वॉर्ड क्र.13 कॉंग्रेस भवन समोर स्वागत कमान बांधणे हे काम नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन करता येत नसताना केलेने झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
आक्षेपाधीन रक्कम रु. 265408.00/-

***नगर विकास विभाग परिपत्रक क्र.एएमसी 14200/2264/ प्रक्र.144/नवि-24 दि.26 फेब्रुवारी 2001 ने महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन घ्यावयाच्या कामाबाबतची मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत. त्यामधील प्रपत्र अ मध्ये स्वेच्छा निधीमधुन करावयाच्या 34 कामांच्या यादीमध्ये कमानीच्या कामाचा समावेश नसतानही चुकीच्या पध्दतीने कमानीचे काम स्वनिधीमधुन केल्याने या कामावर करण्यात आलेला खर्च रक्कम रु. 265408/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.***

DRAFT

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.1 च्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.30 कॉंग्रेस भवन समोर स्वागत कमान बांधणे बाबत सन्मा.श्री. मुन्ना बंडु कुरणे, विरोधी पक्षनेता यांनी दि.08/06/2012 च्या पत्रान्वये स्वागत कमानीचे काम माझ्या स्थानिक विकास निधीमधुन करण्याबाबत प्रशासनास सुचित केले आहे. सदर पत्रावर प्रभाग समिती क्र.1 च्या आवक रजिस्टर मध्ये आवक क्र.451 दि.08/06/2012 ने नोंद केल्याचे नमुद आहे. नगरसेवकांनी केलेले मागणी नुसार या कामाच्या ठिकाणची पाहणी करण्यात येवुन सदर कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागा कडील दरसूची 2011-12 नुसार रक्कम रु.280700/- चे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शहर अभियंता यांची जा क्र.646 दि.01/08/2012 ने तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन काम करण्याची टिपणी प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.1 ने आयुक्तास दि.15/07/2012 ने सादर केली असुन आयुक्त यांची या टिपणीस दि.17/08/2012 रोजी मान्यता झाली आहे.

प्रभाग समिती क्र.1 ने जाहिर निविदा सुचना क्र.2 /2012-13 अन्वये या कामासाठी दि.07/09/2012 रोजीच्या दै.नवसंदेश या वर्तमानपत्रामध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली असुन सदर कामास अल्प प्रतिसाद मिळाल्याने दि.04/10/2012 अखेर पहिली मुदतवाढ व दि. 18/10/ 2012 अखेर दुसरी मुदतवाढ देणेत आली होती. सदर निविदा दि.19/10/2012 रोजी उघडण्यात आली असुन या वेळीही दोनच निविदा प्राप्त झाल्याने निविदा पुन्हा मागविलेस प्रतिसाद मिळण्याची शक्यता नसल्याने प्राप्त दोन ई निविदा उघडण्यास आयुक्त यांनी प्रभाग अधिकारी क्र.2 ने केलेल्या शिफारशीनुसार दि.31/10/2012 रोजी मान्यता दिली आहे.

सदर ई निविदा दि.31/10/2012 रोजी उघडण्यात आल्या असुन अंकुर बहुद्देशिय स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित सांगली यांची निविदादरापेक्षा 5 टक्के सर्वात कमीची निविदा असुन अन्य

निविदादार श्री.महालिंग ब चिखली यांची निविदादरापेक्षा 0.07 टक्के कमीची निविदा आहे.

प्रभाग समिती क्रमांक एक सभा क्र.3/2012-13 विषय क्र.ऐन ,ठराव क्र.11 दि.31/10/2012 ने अंकुर बहुद्देशिय स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित सांगली यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5 टक्के कमी दराने सदरची कामगिरी करुन घेण्यास मान्यता झाली आहे.

या कामाच्या निविदा मंजुरीची समज प्रभाग अधिकारी प्रभाग कार्यालय क्र.1 ने ठेकेदारास दि.26/12/012 ने दिली असुन ठेकेदाराने या कामाचे करारपत्र रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि. 16/02/2013 रोजी केले आहे.

या कामाची वर्क ऑर्डर प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती कार्यालय क्र.1 ने ठेकेदारास दि. 18/02/2013 रोजी दिली असुन काम पुर्ण करण्याची मुदत 30 दिवस देण्यात आली आहे.

लेखाशीर्ष :- B - 2430 स्थानिक विकास निधी

काम सुरु :- दि.18/02/2013 काम पुर्ण :- दि.15/03/2013

मोजमाप पुस्तक क्र. 30, पृष्ठ क्र.09

या कामाचे रक्कम रु.265408 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि.28/03/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम रु. 265408/- पैकी रु.30000 /- चे प्रदान दि.26/10/2013 रोजी, रक्कम रु.160000 /- चे प्रदान दि.10/01/ 2014 रोजी, रक्कम रु.18853/- चे प्रदान दि. 10/01/2014 रोजी व उर्वरित रक्कम रु.56555/- चे प्रदान प्रमाणक क्र.7013 ने दि.26/03/2014 रोजी केले आहे.

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक, देयक व प्रमाणकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.119 दि.22/06/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) या कामाचे रक्कम रु.265408 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि.28/03/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम रु. 265408/- पैकी रक्कम रु.30000 /- चे प्रदान दि.26/10/2013 रोजी, रक्कम रु.160000 /- चे प्रदान दि.10/01/2014 रोजी, रक्कम रु.18853/- चे प्रदान दि. 10/01/2014 रोजी व उर्वरित रक्कम रु.56555/- चे प्रदान प्रमाणक क्र.7013 ने दि.26/03/2014 रोजी केले आहे. या एकाच देयकाचे प्रदान विभागनी करुन झेरॉक्स प्रतीवर करण्यात आले आहे. तसेच सदरचे काम 2012-13 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन करण्यात आले आहे. परंतु या कामाचे देयक आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये आदा केले आहे. देयक आदा करताना 2013-14 च्या अर्थसंकल्पामध्ये या कामासाठी तरतुद करुन ते आदा करणे आवश्यक आहे. परंतु या देयकावर लेखाशिर्ष नमुद नसल्याने ते कोणत्या लेखाशिर्षामधुन आदा केले आहे ते समजुन येत नाही.

2) या कामामध्ये करण्यात यावयाच्या बाब क्र. 1 Providing & laying in situ Cement Concret M 20 एकुण परिमाण 3.46 घ.मी. X दर रु.4396.75/घ.मी., बाब क्र.2 Providing & casting in

DRAFT

situ Cement Concret M 20 for RCC concrete Column एकुण परिमाण 4.320 घ.मी. X दर रु.5752.45/घ.मी., बाब क्र.3 Providing & casting in situ Cement Concret M 20 for RCC concrete Beams & Lintels एकुण परिमाण 5.7600 घ.मी. X दर रु.6007.05/घ.मी. या बाबींचे दर सन 2011-12 ची दरसूची वापरुन दरपृथ्थकरणाने ठरविल्याचे कामाच्या प्राकलनामध्ये नमुद आहे. परंतु सोबत या बाबींची दरपृथ्थकरणे जोडली नसल्याने दर बरोबर असल्याची खात्री करता आलेली नाही. या बाबींची दरपृथ्थकरणे लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नसल्याने रक्कम रु.74663/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

3) महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन घ्यावयाच्या कामाबाबतची मार्गदर्शक तत्वे नगर विकास विभाग परिपत्रक क्र.एएमसी 14200/2264/ प्रक्र.144/नवि-24 दि.26 फेब्रुवारी 2001 ने विहित केली आहेत. राज्यातील महानगरपालिकामध्ये प्रत्येक नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणुन महानगरपालिका अंदाजपत्रकामध्ये करण्यात येत असलेल्या तरतुदीचा विनियोग योग्य अशा नागरी सुविधावर व्हावा यास्तव या निधीमधुन कोणती कामे घेण्यात यावीत व कोणती कामे घेण्यात येवु नयेत याचा उल्लेख परिपत्रकाच्या सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र अ व ब मध्ये करण्यात आला आहे. परिपत्रकामधील प्रपत्र अ मध्ये नमुद केलेली कामेच स्वेच्छा निधीमधुन घेणे आवश्यक असुन या कामामधुन कोणती कामे आपल्या स्वेच्छानिधीमधुन घेण्यात यावीत हे ठरविण्याचा स्वेच्छानिर्णय संबंधित नगरसेवकाचा असेल तसेच अशा कामाची अंदाजित किंमत दोन लाखापेक्षा अधिक नसणे आवश्यक आहे. प्रपत्र अ मध्ये एकुण 34 कामांचा समावेश असुन या कामांच्या यादीचे अवलोकन केले असता त्यामध्ये सदर केलेल्या कमानीच्या कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन करण्यात आलेले कमानीचे काम नियमबाहय पध्दतीने करण्यात आलेचे स्पष्ट होते.

4) या परिपत्रकामध्ये दोन लाखापेक्षा जास्त किमतीचे काम नगरसेवक स्वेच्छानिधीमधुन करता येत नसल्याचे नमुद आहे. परंतु या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.280700/- चे करण्यात येवुन त्यास प्रशासनाने मान्यता दिली आहे व त्याप्रमाणे काम करण्यात आलेले आहे. शासन परिपत्रकानुसार रु. 2 लाखापेक्षा अधिक किमतीचे काम स्वेच्छा निधीमधुन करता येत नसतानाही सदरचे जादा किमतीचे कामास मान्यता देण्यात आली आहे. या बाबतचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.119 ने मागणी करुनही बांधकाम विभागाने केलेला नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु. 265408/-

DATSBKM7201 (Ref No : 119)

***88 ठेकेदाराकडून नेमण्यात आलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांना किमान वेतनानुसार वेतन दिल्याबाबतची तसेच त्यांचे भविष्य निर्वाह निधीची रक्कम कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे भरणा केले बाबतची कागदपत्रे दाखविली नसलेबाबत.***



DRAFT

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 08**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2022650.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 716299.00/-

***सहाय्यक कामगार आयुक्त ,सांगली यांनी दिलेल्या पत्रानुसार सुरक्षा रक्षकाचे किमान वेतन कायद्‍यानुसार दरमहाचे वेतन रु.6715/- आहे. ठेकेदार जय महाराष्ट्र सेक्युरिटी सर्व्हिसेस यांची दरमहा रु.6500/- प्रती सुरक्षा रक्षकाची निविदा मंजुर करण्यात आली आहे. ठेकेदाराने एकुण 31 सुरक्षारक्षक पुरविले असुन त्यांना किमान वेतन कायद्‍यानुसार दरमहा वेतन आदा केल्या बाबतची वेतन देयके, बँक पासबुक ई. कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत. सुरक्षारक्षकांना द्‍यावयाच्या वेतनासाठी महाराष्ट्र सेक्युरीटी सर्व्हिसेस यांना रक्कम रु.2796948/- आदा केली आहे. त्यामधुन कर्मचा-यांना दिलेल्या वेतनामधून त्यांचे हिश्श्याची 12 टक्के प्रमाणे रक्कम रु. 335634/- व मक्तेदाराच्या हिश्श्याची 13.61 टक्के प्रमाणे रक्कम रु.380665/- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये भरणा करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर केलेले नसल्याने रक्कम रु.716299/- ठेकेदाराकडून वसुलपात्र करण्यात येत आहेत.***

DRAFT

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडील खाजगी सुरक्षा रक्षक नेमणुकीच्या नस्तीची तपासणी केली असता प्रशासकीय अधिकारी यांनी दि.15 जानेवारी 2013 च्या टिपणीमध्ये आयुक्त यांनी दि. 24 ऑगष्ट 2012 रोजी दिलेल्या मान्यतेप्रमाणे महानगरपालि केच्या विविध इमारतींच्या सुरक्षिततेसाठी 31 सुरक्षा रक्षक नेमणेसाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्याचे नमुद आहे. या कामाची निविदा तयार करताना किमान वेतन कायद्‍यानुसार सुरक्षा रक्षक यांचे किमान वेतनाच्या दराबाबत सहाय्यक कामगार आयुक्त सांगली यांचेकडे पत्राने विचारणा केली होती. सदर कार्यालयाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 1 क्रमांक 192 दि.28/09/2010 अन्वये कुशल कामगारासाठीचे मुळ किमान वेतन दर हे परिमंडळ क्रमांक दोन प्रमाणे रु.5500/ असल्याचे तसेच विशेष भत्त्याचे दर हा कामगार आयुक्त कार्यालय मुंबई यांनी दि.2 ऑगष्ट 2012 रोजी जाहीर केलेल्या अनुक्रमांक 48 (दुकाने व व्यापारी अस्थापना) या अनुसूचित उद्‍योगासाठी निश्चित केलेनुसार रु.1215/- असल्याचे नमुद आहे. सदर शासन परिपत्रकाच्या अधारे प्रती सुरक्षारक्षक रक्कम रु.5500/- व विशेष भत्ता रु.1215/- प्रमाणे रु.6715/- आदा करावे लागणार असल्याने 34 सुरक्षारक्षकावर दर महा रक्कम **रु.228310/- व वार्षिक रक्कम रु. 2739720/- खर्च होणार** असल्याने त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सुरक्षा रक्षक नेमण्याचे कामाची जाहीर निविदा सुचना क्र.3/ 2012-13 दि.20/03/2013

रोजीच्या दै.अग्रदुत व दै.केसरी या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. निविदा जाहीर प्रकटनमध्ये कामाची अंदाजित रक्कम रु.27,39,720/- दिली असुन कामाची बयाणा रक्कम रु.27,400/- ठेवण्यात आली आहे. या कामाच्या निविदा ई टेंडरने मागविल्या असुन निविदा दि.20/03/2013 ते दि.28/03/2013 अखेर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर ऑन लाईन उपलब्ध केल्या आहेत. निविदा दाखल करण्याची मुदत दि.20/03/2013 ते दि.28/03/2013 पर्यंत असुन निविदा दि.30/03/2013 रोजी उघडण्यात येणार आहेत. या कामासाठी एकच निविदा प्राप्त झाल्याने जाहिर निविदेस दि. 06/04/2013 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. दि.22/04/2013 रोजी टेंडर सेल विभागाकडून एकच निविदा प्राप्त झालेचे पत्र प्राप्त झाल्याने निविदेस पुन्हा दुसरी मुदतवाढ देण्यात आली व मुदतवाढ सूचना दि.04/05/2013 रोजी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. दि.09/05/2013 रोजी निविदा गठण समितीसमोर ई निविदा उघडण्यात आल्यानंतर दोनच निविदा प्राप्त झाल्याचे दिसुन येते. सदर निविदा दि.14/05/2013 रोजी उघडण्यात आल्या असुन सर्वात कमीचे ठेकेदार जय महाराष्ट्र सेक्युरिटी सर्व्हिसेस मिरज यांचा सर्वात कमीचा दर रु.6444/- प्रती सुरक्षारक्षक दर महा असुन अन्य निविदादार रुतु सेक्युरिटी सिस्टिम, कोल्हापूर यांचा दर रु.6500/- प्रती सुरक्षारक्षक दरमहा असा आहे. सर्वात कमीचे निविदादार जय महाराष्ट्र सेक्युरिटी सर्व्हिसेस, मिरज यांचा दर कामगार आयुक्त सांगली यांनी शासन परिपत्रकाप्रमाणे दिलेल्या किमान वेतन रु.6715/- प्रती सुरक्षारक्षक यांचे पेक्षा रु.271/- ने कमी आहे. सदर खर्चाची तरतुद आर्थिक वर्ष 2013-14 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये 4 महसुली खर्च 001)सामान्य प्रशासन 016) अ-1 सामान्य प्रशासन द्विनोंद क्र.B -156) महानगरपालिका मुख्य इमारतीमध्ये तसेच अमरधाम स्मशानभूमी येथे सुरक्षा रक्षक नेमणे या लेखाशिर्षामध्ये केली आहे.

**या कामाचे करारपत्र** रु.1500 किमतीचे मुद्रांकशुल्क पेपरवर दि.04/06/2013 रोजी केले आहे. या कामी सुरक्षा अनामत रक्कम रु.115992/- पैकी रक्कम रु.58000/- सामान्य पावती क्र.36743 ने दि.04/06/2013 रोजी महानगरपालिकेकडे भरणा केली आहे व उर्वरित रक्कम देयकामधुन कपात करण्याची आहे. करारपत्रामध्ये ठेकेदाराने 30 सुरक्षारक्षक दि.04/06/2013 पासुन एक वर्ष मुदतीकरीता पुरविण्याचे नमुद केले आहे.

ठेकेदाराने 30 सुरक्षारक्षक पुरविण्याचा आयुक्त आदेश आयुक्त निर्णय क्र.55/2013-14 दि.04/06/2013 रोजी झाला आहे. आयुक्त आदेशामध्ये ठेकेदाराने दिलेला दर हा शासनाचे किमान वेतनदरापेक्षा कमी असुन त्यामुळे किमान वेतन दराच्या नियमाचे उल्लंघन होणार आहे. यास्तव कामगार आयुक्त सांगली यांचा अभिप्राय घेणे उचित होणार आहे. त्यानुसार प्रशासकीय अधिकारी यांनी याबाबत पाठपुरावा करण्याचा आहे. असे आदेशित केले आहे. या बाबत उपायुक्त यांनी मनपा/प्रशावि/सां/4/109/13-14 दि.24/05/2013 रोजीच्या पत्राने सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली यांना किमान वेतन दरापेक्षा कमीने निविदा प्राप्त झालेने काय कार्यवाही करण्यात यावी याबाबतचे

DRAFT

मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. परंतु या बाबत सहाय्यक कामगार आयुक्त यांनी कोणतीही माहिती महानगरपालिकेस दिलेली नाही.

या कामाचा कार्यादेश ठेकेदारास मनपा/प्रशावि/सां/4/121/1/13-14 दि.04/06/2013 रोजी उपायुक्त यांचे स्वाक्षरीने देण्यात आला आहे.

या कामाची नस्ती,निविदा प्रक्रीया, देयके यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.106, दि.09/05/2016 रोजी निर्गमित केला असुन सामान्य प्रशासन विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. ठेकेदाराकडून नेमण्यात आलेल्या खाजगी सुरक्षा रक्षक नेमणुकीमध्ये आढळलेल्या अनियमिततेबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) या कामाच्या करारपत्रामधील अट क्र. 5 नुसार प्रस्तुत कामाची वर्क ऑर्डर दिल्यापासून तात्काळ नेमलेल्या सुरक्षारक्षकांची संपुर्ण माहिती, नाव, वय,वैद्यकीय दाखला,राहणेचे ठिकाण व त्यांचे दोन फोटो यांची एकत्रित फाईल करुन ठेकेदाराने महानगरपालिकेस देणेची आहे. तसेच अट क्र.8 नुसार सुरक्षारक्षकाचे वय 25 ते 40 वर्ष या वयोगटातील असणे आवश्यक आहे. तसेच अट क्र.23 नुसार पुरविण्यात येणा-या सुरक्षा रक्षकाचे पोलिस खात्याकडील चारित्र्य प्रमाणपत्र वर्क ऑर्डर मिळाल्या पासुन 1 महिन्याचे आत महानगरपालिकेस देण्याचे आहे. त्याप्रमाणे सुरक्षारक्षकांची संपुर्ण माहिती या नस्तीमध्ये आढळुन आलेली नाही. त्यामुळे सुरक्षा रक्षकाचे वय व चारित्र्य प्रमाणपत्राची पडताळणी करता आलेली नाही.

2) करारपत्रामधील अट क्र.19 नुसार सुरक्षारक्षकांना किमान वेतन कायद्याप्रमाणे पगार आदा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे व त्याप्रमाणे वेतन आदा करण्याचे ठेकेदाराने करारपत्रामध्ये मान्य केले आहे. किमान वेतन कायद्यानुसार रक्कम रु.6715/- प्रती महिना ठेकेदाराने सुरक्षा रक्षकांना वेतन आदा करणे आवश्यक असल्याने, त्याप्रमाणे सुरक्षा रक्षकांचे वेतन त्यांचे बँक खात्यावर जमा केलेबाबत त्यांचे बँक पासबुक लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाही.

3)महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसजीए-1510/ प्र.क्र. 2394/ कामगार - दि.25 ऑगष्ट 2010 महाराष्ट्रात कारखाने,कंपन्या ,व्यापारी अस्थापना इत्यादी ठिकाणी खाजगी ठेकेदारामार्फत खाजगी सुरक्षा रक्षकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच सुरक्षा रक्षकांना त्यांच्या नोकरीचे नियमन करणे व त्यांच्या नोकरीच्या अटी शर्ती व त्यांचे कल्याण यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबी यासाठी चांगल्या तरतुदी करणे, अशा सुरक्षारक्षकांचा पुरवठा योग्यप्रकारे व्हावा या उद्देशाने शासनामार्फत महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण ) अधिनियम 1981 च्या कलम 3 मध्ये व त्या खालील योजना, 2002 (सुधारीत ) या अंतर्गत तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार महानगरपालिकेकडे असलेल्या सुरक्षा रक्षकांची नोंदणी सुरक्षा रक्षक मंडळाकडे करणे आवश्यक आहे. त्यानुसार या सुरक्षारक्षकांची नोंदणी केलेची प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास

DRAFT

दाखविण्यात आलेली नाहीत.

4) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-ल ,उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाने दि.21 फेब्रु. 2012 रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) 1981 च्या तरतुदी सांगली जिल्हयास दि. 27 फेब्रुवारी 2009 पासुन लागु करण्यात आल्या आहेत. या आधिसूचनेमधील नियम क्र.17(2) नुसार सुरक्षा रक्षक नियोक्त्याने तसेच नियोक्ता अभिकरणाने सुरक्षा रक्षक मंडळाकडे रु.1000 शुल्क भरुन नोंदणी करणे आवश्यक आहे. सदर नोंदणी केलेले प्रमाणपत्र लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही.

5)महाराष्ट्र शासन उद्योग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र.एसजीए-1506/प्र.क्र.91/काम-5,मंत्रालय,मुंबई दि.8 नोव्हे.2006 नुसार सरकारी,निमसरकारीक्षेत्रे/शासकीय उपक्रम/महानगरपालिका यांनी या पुढे खाजगी अभिकरणामधुन सुरक्षा अधिकारी/सुरक्षा रक्षक यांची मागणी न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक यांची मागणी करुन त्यामधुनच आपापल्या आस्थापनामध्ये सुरक्षारक्षकांची नेमणुक करावयाची आहे. त्यानुसार महानगरपालिकेने सांगली येथील सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक नेमणे आवश्यक असता खाजगी अभिकरणाकडून सुरक्षारक्षक नेमले आहेत.

6) मा.आयुक्त केंद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन, नवी दिल्ली यांचे दि.11/02/11 चे नोटीफिकेशननुसार व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 मधील तरतुदी व कर्मचारी निवृत्ती वेतन योजना 1995 चा परिच्छेद 38 नुसार तसेच कर्मचारी डिपॉझिट लिंक्ड इन्श्युरन्स स्किम 1976 मधील परिच्छेद 9 (1) नुसार महानगरपालिका क्षेत्र कार्यालयामध्ये मानधनावर, ठेकापध्दतीने, रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना दि.08/01/11 पासुन लागु करण्यात आलेली आहे. या योजनेमधील उपरोक्त कलमानुसार कर्मचाऱ्यांचे मासिक वेतनामधुन 12% व एजन्सीच्या मालकाच्या स्वनिधीमधुन 13.61% प्रमाणे रक्कम कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये महिन्याच्या 15 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे. या कामावर आर्थिक वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये एकुण रक्कम रु. 2796948/- खर्च करण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्र सेक्युरिटी सर्व्हिसेस यांना 2013-14 मध्ये माहे जुन ते ऑक्टोबर 13 मध्ये पुरवठा केलेल्या सुरक्षा रक्षकांचे वेतनापोटी रक्कम रु.695916/- तसेच प्रमाणक क्र.256 दि.30/04/2014 ने रु.686346/-, प्रमाणक क्र.2167 दि.20/09/2014 ने रु.637956/-, प्रमाणक क्र.5971 दि.23/04/2015 ने रु.579960 व प्रमाणक क्र.5972 दि.23/04/2015 ने रु.196770/- असे एकुण रु. 2796948/- आदा केले आहेत. कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम भविष्य निर्वाह निधीचे खात्यामध्ये भरणा करणेसाठी उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.एसजीए-2013/प्र.क्र.341/कामगार/ दि.21/10/2013 मधील परिशिष्ठ एक मध्ये काय कार्यवाही करावयाची आहे. त्याबाबत मार्गदर्शन केले आहे. त्यामधील अ.क्र.8 नुसार सुरक्षारक्षकांचे भविष्य निर्वाह निधी

नोंदणीचे प्रमाणपत्र ठेकेदाराने सादर करावयाचे आहे. तसेच अ.क्र.9 नुसार सुरक्षा रक्षकांच्या नावाने भविष्य निर्वाह निधी भरल्याबाबतची पावती (सुरक्षा रक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी नोंदणी क्रमांकासह) (PF Challan)(पृष्ठ क्र. ---) सह कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे मक्तेदाराने सुरक्षा रक्षकांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा केलेची कोणतीही कागदपत्रे या कामाच्या नस्ती मध्ये तसेच देयकासोबत दिसुन आलेली नाहीत. सुरक्षारक्षकांना द्यावयाच्या वेतनासाठी महाराष्ट्र सेक्युरीटी सर्व्हिसेस यांना रक्कम रु.2796948/- आदा केली आहे. त्यामधुन कर्मचा-यांना दिलेल्या वेतनामधून त्यांचे हिश्श्याची 12 टक्के प्रमाणे रक्कम रु. 335634/- व मक्तेदाराच्या हिश्श्याची 13.61 टक्के प्रमाणे रक्कम रु.380665/- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये भरणा करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर केलेले नसल्याने रक्कम रु.716299/- ठेकेदाराकडून वसुलपात्र करण्यात येत आहेत.

7) उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.एसजीए-2013 /प्र.क्र.341 /कामगार/ दि.21/10/2013, परिशिष्ठ एक मधील अट क्र.10 नुसार मक्तेदाराने राज्य कामगार विमा योजने मध्ये नोंदणी केलेचे प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. तसेच सुरक्षारक्षकांच्या नावाने कामगार राज्य विम्याची रक्कम भरल्याबाबतची पावती (सुरक्षा रक्षकाच्या ESI Challan ) सह कार्यालयास सादर करावयाची आहे. Employee State Insurance Act 1948 मधील कलम 34 नुसार एकुण वेतनाच्या 4.75 टक्के विमा रक्कम दरमहाच्या वेतनामधुन कपात करुन राज्य कामगार विमा योजनेमध्ये भरणा करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने महानगरपालिकेस एकुण 30 सुरक्षा पुरविले असुन सुरक्षा रक्षकाचे किमान वेतन कायद्यानुसार दरमहाचे वेतन रु.6715/- असल्याने रु.6715/- X 4.75% विमा X 30 सुरक्षारक्षक = दरमहा रु.9570/- राज्य कामगार विमा योजनेकडे ठेकेदाराने भरणा केलेचे ESI Challan लेखापरीक्षणास दाखविले नसल्याने ठेकेदाराने कामगार विमा योजनेची रक्कम भरणा केली किंवा कसे ते समजुन आले नाही.

8) या कामाचे करारपत्र रु.1500 किमतीचे मुद्रांक शुल्क पेपरवर दि. 04/06/2013 रोजी केले आहे. करारपत्रामधील अट क्र.2 नुसार कामी सुरक्षा अनामत रक्कम रु.115992/- पैकी रक्कम रु.58000/- सामान्य पावती क्र.36743 ने दि.04/06/2013 रोजी महानगरपालिकेकडे भरणा केली आहे व उर्वरित रक्कम देयकामधुन कपात करण्यास ठेकेदाराने मान्यता दिली आहे. या कामाच्या देयकाची तपासणी केली असता देयकामधुन उर्वरित अनामत रक्कम रु.57999/- देयकामधुन कपात करणे आवश्यक असता सदर रक्कम कपात केलेली नसल्याने रक्कम रु. 57999/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

**वसुलपात्र रक्कम :-** कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम रु.716299/- + सुरक्षा अनामत रक्कम रु.57999/- = रु.774298/-

**आक्षेपाधिन रक्कम :-** किमान वेतनानुसार आदा केलेल्या वेतनाबाबत सुरक्षा रक्षकांची बँक पासबुक लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नसल्याने ठेकेदारास आदा केलेली सुरक्षा रक्षकांच्या वेतनाची रक्कम

DRAFT

रु.2022650/-

DRAFT

DATSBKM7201 (Ref No : 106)

## *89 महानगरपालिकेने कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांचे वेतनामधुन कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे भरणा केली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 8874070.00/-

| |
|---|
| ***कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 मधील तरतुदी व कर्मचारी निवृत्ती वेतन योजना 1995 चा परिच्छेद 38 नुसार कर्मचाऱ्यांचे मासिक वेतनामधुन 12% व महानगरपालिकेच्या स्वनिधी मधुन 13.61% प्रमाणे रक्कम कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये महिन्याच्या 15 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे. कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनावर आर्थिक वर्ष 2013-14 या वर्षामध्ये एकुण रक्कम रु.34637280/- इतका खर्च करण्यात आला आहे. परंतु महानगरपालिकेने मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची वैयक्तिक भविष्य निर्वाह निधीची खाती उघडलेली नाहीत तसेच कर्मचा-यांचे वेतनामधुन 12 टक्के प्रमाणे रक्कम रु.4156473/- व महानगरपालिकेच्या स्वनिधीमधुन 13.62 टक्के प्रमाणे रु.4717597/- असे एकुण 8874070/- कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये भरणा करणे आवश्यक असता सदरची रक्कम भरणा केलेली नाही.*** |

महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून रोजंदारी व कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा -यांची माहिती घेतली असता महानगरपालिकेच्या वेगवेगळया विभागाचे अस्थापनेवर खालील प्रमाणे कर्मचारी 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये कार्यरत होते.

| अ.क्र. | कर्मचारी संवर्ग | विभागाचे नाव | कार्यरत कर्मचारी |
|---|---|---|---|
| 01 | संगणक चालक | लेखा,नगररचना,कर, | 13 |
| 02 | क.लिपिक | ग्रंथालय,आरोग्य | 03 |
| 03 | वाहनचालक | आरोग्य,पा.पु.,कार्य शाळा,फायर | 80 |
| 04 | मजूर | अतिक्रमण | 21 |
| 05 | क.अभियंता | नगररचना | 06 |
| 06 | यांत्रि. अभियंता | पाणीपुरवठा | 02 |
| 07 | हेल्पर विद्युत | विद्युत | 31 |
| 08 | रक्षक | स्मशान भुमी | 01 |
| 09 | औषध निर्माता | आरोग्य | 01 |
| 10 | लॅब अॅटेंडंट | आरोग्य | 01 |
| 11 | वायरमन | विद्युत | 31 |
| 12 | बागमाळी | उद्यान | 02 |
| 13 | मेस्त्री | बांधकाम | 06 |
| 14 | वॉचमन | बांधकाम | 04 |
| 15 | मजुर | पाणीपुरवठा | 49 |
| 16 | खेळाडू | करविभाग | 29 |
| 17 | फायरमन | अग्निशमन | 17 |
| 18 | एक्रे असिस्टंट | आरोग्य | 01 |
| 19 | पंप ऑपरेट | पाणीपुरवठा | 03 |
| 20 | समन्वय अधिकारी | नगररचना | 01 |
| 21 | सफाई कर्मचारी | आरोग्य | 400 |
| | | एकुण | 702 |

महानगरपालिच्या विविध विभागाकडील अस्थापनेवर एकुण 702 कर्मचारी कार्यरत असुन त्यांचे वेतनावर 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये एकुण रक्कम रु.34637280/- इतका खर्च झाला आहे. परंतु त्यांचे वेतनामधुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे भरणा केलेली नाही.

या बाबत आस्थापना विभागाने पुरविलेली कागदपत्रे व वेतन देयके यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.105, दि.09/05/2016 रोजी निर्गमित केला असुन विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) मा.आयुक्त केंद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन, नवी दिल्ली यांचे दि.11/02/2011 चे नोटीफिकेशननुसार व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 मधील तरतुदी व कर्मचारी

DRAFT

निवृत्ती वेतन योजना 1995 चा परिच्छेद 38 नुसार तसेच कर्मचारी डिपॉझिट लिंक्ड इन्श्युरन्स स्किम 1976 मधील परिच्छेद 9 (1) नुसार महानगरपालिका क्षेत्र कार्यालयामध्ये मानधनावर, ठेकापध्दतीने, रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना दि.08/01/11 पासुन लागु करण्यात आलेली आहे. त्यानुसार कर्मचा-यांच्या नावाने वैयक्तिक कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खाती महानगरपालिकेने काढुन त्या खात्यामध्ये त्यांचे वेतनामधुन तसेच महानगरपालिकेच्या स्वहिश्श्याची रककम कपात करुन भरणा करणे आवश्यक आहे. या योजनेमधील उपरोक्त कलमा नुसार कर्मचाऱ्यांचे मासिक वेतनामधुन 12% व महानगरपालिकेच्या स्वनिधीमधुन 13.61% प्रमाणे रक्कम कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये महिन्याच्या 15 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे. कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनावर आर्थिक वर्ष 2013-14 या वर्षामध्ये एकुण रक्कम रु. 34637280/- इतका खर्च करण्यात आला आहे. परंतु महानगरपालिकेने मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची वैयक्तिक भविष्य निर्वाह निधीची खाती उघडलेली नाहीत तसेच कर्मचा-यांचे वेतनामधुन 12 टक्के प्रमाणे रक्कम रु.4156473/- व महानगरपालिकेच्या स्वनिधीमधुन 13.62 टक्के प्रमाणे रु.4717597/- असे एकुण रु. 8874070/- कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये भरणा करणे आवश्यक असता महानगरपालिकेने कर्मचारी हिश्श्याची व स्वनिधी हिश्श्याची रक्कम भरणा केलेली नाही.

**वसुलपात्र रक्कम रु. 8874070/-**

DATSBKM7201 (Ref No : 105)

## *90 अर्थसंकल्पावरील भाष्य :- अंदाजपत्रकीय तरतुद व प्रत्यक्ष जमा व खर्च यामध्ये आढळून आलेल्या तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 20**

*लेखा शीर्ष : लेखा केंद्र,राज्य व मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 च्या नियम 26 (3)नुसार उत्पन्नाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या जमेच्या तुलनेवर अधारलेले असले पाहिजेत. तसेच करापासुन मिळणा-या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठराविक मागणी असते अशा मार्गाने येणा-या उत्पन्नाचे अंदाज मात्र मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरीपर्यंत मर्यादित असावेत अथवा त्या वर्षाची मागणी,अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी या पैकी जी कमी असेल तेवढे असावेत तसेच नियम 26 (4) नुसार अर्थसंकल्प तयार करताना एकुण खर्चाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाची सरासरी अथवा अर्थसंकल्पीय वर्षाची अंदाजित जमा या दोहोपैकी जी कमी असेल त्यापेक्षा अधिक असु नयेत असे नमुद आहे. महानगरपालिकेच्या 2010-11 ते 2012-13 या तीन आर्थिक***



DRAFT

***वर्षातील प्रत्यक्ष महसुली जमेची सरासरी रु.140 कोटी 47 लाख व महसुली खर्चाची सरासरी रु.105 कोटी 58 लाख आहे. महानगर पालिकेच्या 2013 -14 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता महानगर पालिकेच्या महसुली जमेचा अंदाज प्रशासनाने रु.191 कोटी 15 लाखाचा तयार केला असुन महासभेने तो रु.205 कोटी 11 लाख इतका वाढवला आहे. प्रशासनाने मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष महसुली जमेची सरासरी रु.140 कोटी 47 लाख या रक्कमे इतके अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असता ते रु.191 कोटी 15 लाखाचे तयार केलेने अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु.50.68 कोटीची वाढ केली आहे व महासभेने त्यामध्ये रु.64.64 कोटीची वाढ केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1949 नियम 26(8) नुसार जर जमा व खर्च यांचे आकारामध्ये असामान्य चढ-उतार होत असतील तर येथे अशा चढ-उतारांच्या कारणांसह संक्षिप्त स्पष्टीकरण देणे आवश्यक असताना ते देणेत आलेले नाही. महानगरपालिकेचे 2013-14 या आर्थिक वर्षाची प्रत्यक्ष महसुली जमा रु.133.39 कोटी झाली असुन प्रत्यक्ष महसुली खर्च रु.130 कोटी 71 लाख इतका झाला आहे.***

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे 2013 -14 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 नुसार सर्वसाधारण सभेकडे सादर केले आहे. महासभा क्रमांक - विशेष सभा 04, ठराव क्र.517, दि.28/03/2013 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 अन्वये आवश्यक त्या बाबींच्या अधिन राहून कलम 100 नुसार अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे. आयुक्त यांनी 2013-14 या आर्थिक वर्षासाठी रु.441 कोटी 38 लाख जमेचे (महसुली जमा 191 कोटी 15 लाख व भांडवली जमा रु.250 कोटी 23 लाख ) व रु.441 कोटी 19 लाख खर्चाचे (महसुली खर्च रु. 159.11 कोटी 31 लाख व भांडवली खर्च रु.282 कोटी 08 लाख ) अंदाजपत्रक तयार करुन महासभेस सादर केले असुन महासभेने त्यामध्ये सुधारणा करुन खालील प्रमाणे अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे.

DRAFT

| आयुक्त जमा अंदाज (आकडे कोटीमध्ये) | | जमा अंदाज (आकडे कोटी) | | जमा |
|---|---|---|---|---|
| लेखा शिर्ष | रक्कम रुपये | महा सभा | महासभा सुधा. | प्रत्यक्ष |
| भाग 1 महसुली जमा अ | | | | |
| अ) दर व कर घरपट्टी | 22.43 | 23.43 | 23.43 | 17.74 |
| ब)जकात | 115.05 | 119.55 | 68.00 | 67.50 |
| क)मालमत्ता | 11.66 | 17.29 | 12.43 | 7.91 |
| ड)अनुदान | 8.77 | 8.77 | 9.27 | 0.26 |
| इ)संकीर्ण | 8.12 | 11.12 | 11.32 | 24.55 |
| महसूली जमा अ | 168.0 | 180.16 | 113.13 | 117.96 |
| भाग 1 महसूली जमा क | | | | |
| अ- जलनिस्सारण | 2.22 | 0.45 | 2.07 | 0.23 |
| ब – पाणीपुरवठा जमा | 22.70 | 22.70 | 20.69 | 13.06 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भाग 1 महसुली जमा क | 24.93 | 23.15 | 22.77 | 15.41 |
| **महसूली जमा अ व क** | **191.15** | **205.11** | **147.25** | **133.39** |
| | | | | |
| भाग 2 भांडवली जमा अ | 2.47 | 2.47 | 10.89 | 10.65 |
| भाग 2 भांडवली जमा क | ---- | | -------- | ------- |
| भांडवली जमा अ व क | 2.47 | 2.47 | 10.89 | 10.65 |
| भाग 3 दुबेरजी जमा | 53.87 | 53.87 | 54.87 | 39.98 |
| भांडवली जमा ब | 143.80 | 143.90 | 220.97 | 106.14 |
| संभाव्य शिल्लकेसह एकुण जमा | 441.38 | 405.35 | 465.42 | 419.99 |

DRAFT

अर्थसंकल्पात महसुली व भांडवली जमेचा रु. 405 कोटी 35 लाखाचा अंदाज वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात रु. 419.99 कोटीचा महसुल जमा झाला आहे. तसेच खर्च बाजुस रु.462 कोटी 69 लाख महसुली व भांडवली खर्चाचा अंदाज वर्तविण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात महसुली व भांडवली खर्च रु.275 कोटी 25 लाख करण्यात आला आहे. अंदाजपत्रकाच्या तपासणी अंती असे दिसते की, अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानुसार जमेच्या रक्कमा अवास्तव वाढविण्यात आल्या आहेत. वरील विवरणपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की सुधारीत अंदाजपत्रकीय जमेचा अंदाज 465.42 कोटी वर्तविण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात रु.419.99 कोटीचा महसुल प्रत्यक्ष जमा झाला आहे. एकुण जमेची टक्केवारी 90.23 टक्के इतकी आहे. तसेच 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये एकुण खर्च 275 कोटी 25 लाख इतका करण्यात आल्याने जमेशी खर्चाची टक्केवारी 65.53 टक्के इतकी आहे.

अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता खालील अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 च्या नियम 26 (3) नुसार उत्पन्नाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या जमेच्या तुलनेवर अधारलेले असले पाहिजेत. तसेच करापासुन मिळणा-या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठराविक मागणी असते अशा मार्गाने येणा-या उत्पन्नाचे अंदाज मात्र मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरीपर्यंत मर्यादित असावेत अथवा त्या वर्षाची मागणी,अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी या पैकी जी कमी असेल तेवढे असावेत तसेच नियम 26 (4) नुसार अर्थसंकल्प तयार करताना एकुण खर्चाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाची सरासरी अथवा अर्थसंकल्पीय वर्षाची अंदाजित जमा या दोहोपैकी जी कमी असेल त्यापेक्षा अधिक असु नयेत.

महानगरपालिकेचा मागील तीन वर्षाचा महसुली प्रत्यक्ष जमा व खर्च पुढीलप्रमाणे आहे. (आकडे कोटीमध्ये)

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | प्रत्यक्ष जमा रु. | प्रत्यक्ष खर्च रु. |
|---|---|---|---|
| 1 | 2010-11 | 115.92 | 102.36 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 2011-12 | 148.14 | 103.34 |
| 3 | 2012-13 | 157.34 | 111.03 |
| | एकुण | 421.416 | 316.74 |
| | सरासरी | 140.47 | 105.58 |

महानगरपालिकेच्या 2010-11 ते 2012-13 या तीन आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष महसुली जमेची सरासरी रु.140 कोटी 47 लाख व महसुली खर्चाची सरासरी रु. 105 कोटी 58 लाख आहे. महानगरपालिकेच्या 2013 -14 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता महानगर पालिकेच्या महसुली जमेचा अंदाज प्रशासनाने रु.191 कोटी 15 लाखाचा तयार केला असुन महासभेने तो रु.205 कोटी 11 लाख इतका वाढवला आहे. प्रशासनाने मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष महसुली जमेची सरासरी रु.140 कोटी 47 लाख या रक्कमे इतके अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असता ते रु.191 कोटी 15 लाखाचे तयार केलेने अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु..50.68 कोटीची वाढ केली आहे व महासभेने त्यामध्ये रु.64.64 कोटीची वाढ केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 26 (3) नुसार करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठराविक मागणी असते अशा मार्गाने येणाऱ्या उत्पन्नाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरीपर्यंत मर्यादित असावेत अथवा त्या वर्षाची मागणी अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी यापैकी जी कमी असेल तेवढे असणे आवश्यक असता प्रशासनाने त्याप्रमाणे कार्यवाही न करता त्यामध्ये नियमबाह्यरित्या वाढ केल्याचे दिसुन येते.

2) मागील तीन वर्षाचे करापासून मिळणारे उत्पन्न 2010-11 या वर्षामध्ये रु.115 कोटी 92 लाख 2011-12 या वर्षामध्ये रू.148 कोटी 14 लाख व 2012-13 या वर्षामध्ये रू.157 कोटी 34 लाख प्राप्त झाले असुन त्याची एकूण सरासरी रु.140 कोटी 47 लाख येते. परंतु आयुक्त यांनी 2013-14 या आर्थिक वर्षासाठी रु.191 कोटी 15 लाखाचा अंदाज सुचविला आहे. तो वरील नियमाशी पूर्णपणे विसंगत आहे. तसेच 2012-13 या आर्थिक वर्षात एकुण महसुली व भांडवली जमा रु.295 कोटी 10 लाख व खर्च रु.200 कोटी 43 लाख झाला आहे. आयुक्त यांनी 2013-14 या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली जमा व खर्चाचे अंदाजपत्रक रू.405 कोटी 35 लाखाचे केले आहे. म्हणजेच मागील वर्षाच्या प्रत्यक्ष जमेपेक्षा रु.110.25 कोटी वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1949 नियम 26(8) नुसार जर जमा व खर्च यांचे आकारामध्ये असामान्य चढ-उतार होत असतील तर येथे अशा चढ-उतारांच्या कारणांसह संक्षिप्त स्पष्टीकरण देणे आवश्यक असताना ते देणेत आलेले नाही.

3) महानगरपालिकेच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या महसुली जमेचा अंदाज प्रशासनाने रु.191 कोटी 17 लाखाचा केला असुन महासभेने त्यामध्ये वाढ करुन तो रु.205 कोटी 11 लाख इतका केला आहे. आयुक्त यांनी तयार केलेल्या महसुली अंदाजपत्रकामध्ये महासभेने रु.13.94 कोटीची वाढ केली आहे. महानगरपालिकेच्या 2015 -16 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.21 वर 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये जमा झालेल्या महसुलाचे नक्की आकडे दिले आहेत त्यानुसार या वर्षामध्ये एकुण रक्कम रु.133 कोटी 39 लाखाचा महसुल प्राप्त झाला आहे. त्यामुळे महानगरपालिकेस अंदाजित केलेल्या रक्कमेपेक्षा रु.71.32 कोटी कमी उत्पन्न प्राप्त झाले आहे. महानगरपालिकेस अंदाजित रक्कमेच्या 65 टक्केच महसुली उत्पन्न प्राप्त झाल्याचे दिसुन येते.

4) मनपा दर व कर या लेखाशिर्षांतर्गत घरपट्टी विभागाच्या जमा रक्कमांचा समावेश आहे. 2013 - 14 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामधील पृष्ठ क्र.2 वर घरपट्टी विभागाची जमा महानगरपालिकेने रु. 23.43 कोटी इतकी अंदाजित केली आहे. परंतु प्रत्यक्षात रु.17 कोटी 74 लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. म्हणजेच महानगरपालिकेस जमेच्या अंदाजापेक्षा सरासरी 63.62 टक्के इतकेच उत्पन्न घरपट्टीच्या महसुलाद्वारे प्राप्त झाले आहे. 2013-14 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.13 वर करनिर्धारण विभागाचे जमा अंदाजाचे परिशिष्ठ जोडण्यात आले आहे. त्यामध्ये घरपट्टीची मागील थकबाकी रु.14.98 कोटी दाखविली असुन 2013 - 14 या आर्थिक वर्षाची चालु मागणी रु. 26.24 कोटी दाखविली आहे. परिशिष्ठामध्ये चालु मागणीच्या 80 टक्के रक्कम रु.20.99 कोटी व मागील थकबाकीच्या 50 टक्के रक्कम रु.9.88 कोटी असे एकुण 30.87 कोटी वसुलीचा अंदाज 2013-14 या आर्थिक वर्षासाठी दर्शविण्यात आला आहे. घरपट्टी विभागाकडून घरपट्टीची थकबाकीसह 100 टक्के वसुली होणे अपेक्षित असताना त्यांना वसुलीचा इष्टांक कमी करुन दिला जात असल्याने त्याचा घरपट्टी वसुलीवर परिणाम होत असल्याचे दिसुन येते. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रु.17.74 कोटी घरपट्टी विभागाकडुन जमा झाले आहेत. घरपट्टीची मागणी रक्कम रु.30.87 कोटी रक्कमेशी तुलना करता फक्त 57.46 टक्केच घरपट्टी विभागाकडून उत्पन्न प्राप्त झाले आहे. त्यामुळे घरपट्टी विभागाकडून अपेक्षित उत्पन्न प्राप्त होणेसाठी विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहे.

5) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 8 नियम क्र.41 नुसार अधिनियम 2009 च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी या अधिनियमान्वये ज्यासाठी बिल देण्यात आले आहे. असा कोणताही मालमत्ता कर पूर्णपणे किंवा अंशतः अदत्त राहीला असेल, ज्या व्यक्तीने असा कर भरलेला नाही ती व्यक्ती उक्त 2009 च्या सूधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व दिनांकापासून, या कलमान्वये तरतूद केल्या प्रमाणे, अशा करावरील शास्ती भरण्यास जबाबदार असेल. त्याप्रमाणे उपरोक्त थकबाकीवर 2% प्रमाणे प्रतीमहा व्याज घेणे आवश्यक आहे. 2012-13 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये कर निर्धारण व संकलन विभागाचे 2012-13 चा दुरुस्त व 2013-14 च्या अर्थसंकल्पास परिशिष्ठ पृष्ठ क्र.15 वर जोडले आहे. त्यामध्ये 2012-13 या वर्षाची थकबाकी रु.14 कोटी 98 लाख दाखविली आहे. त्यामुळे नियमाप्रमाणे या रक्कमेवर 24 टक्के प्रमाणे व्याज आकारुन रु. 3 कोटी 58 लाख या रकमेचा समावेश अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक असता तो करण्यात आलेला नाही. 2013-14 या आर्थिक वर्षाची घरपट्टी विभागाची चालु मागणी रु. 26 कोटी 24 लाख दर्शविली आहे. चालु मागणीशी थकबाकीशी तुलना केली असता थकबाकीचे प्रमाण 57 टक्के इतके आहे.

6) 2013-14 या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये द्विनोंद कोड क्र.P009 ने अनाधिकृत मालमत्ताधारकां ना दुप्पट दराने घरपट्टी लावणे या लेखाशिर्षांतर्गत आयुक्त यांनी कोणतीही तरतुद केलेली नाही. परंतु महासभेने या लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु.1 कोटीची तरतुद केली आहे. या लेखाशिर्षांतर्गत जमेची आकडेवारी तपासली असता कोणतीही रक्कम प्राप्त झालेली नाही. या वरुन खर्चाची तरतुद वाढविणेकरीता जमेचा अंदाज वाढविला असलेचे स्पष्ट होते.

6) ब - कराव्यतिरिक्त खास कायद्यान्वये उत्पन्न या लेखाशिर्षांतर्गत जकात व स्थानिक संस्था करापासुन मिळणारे उत्पन्न आयुक्त यांचे अंदाजपत्रकामध्ये रु.115.05 कोटी अंदाजित केले आहे. महासभेने त्यामध्ये

वाढ करुन ते 119.55 कोटी केले आहे. परंतु प्रत्यक्षात रु. 67.50 कोटी स्थानिक संस्था कराची वसुली करण्यात आली आहे. अंदाजपत्रकामधील एकुण जमेच्या तरतुदीमध्ये जकाती पासुन मिळणा-या उत्पन्नाची टक्केवारी 60.19 टक्के इतकी गृहीत धरण्यात आली आहे. परंतु स्थानिक संस्था कर विभागाने करांच्या वसुलीसाठी प्रयत्न न केल्याने महानगरपालिकेस या करापोटी एकुण जमा अंदाज रक्कम रु.191 कोटी 15 लाख या रक्कमेच्या 35.31 टक्के इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे. स्थानिक संस्था कर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असल्याने या कराची वसुली करणेसाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असता महानगरपालिकेने प्रयत्न न केल्याने या कराची वसुली अत्यल्प झालेने महानगरपालिकेचे आर्थिक नियोजन पुर्णपणे कोलमडल्याचे दिसुन येते.

7) मालमत्ता विभागाकडुन 2013-14 या आर्थिक वर्षासाठी रु. 6 कोटी 10 लाखाचे उत्पन्न प्राप्त होणार असल्याचे अंदाजित केले होते परंतु प्रत्यक्षात रु. 2 कोटी 36 लाख इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे. जमेच्या अंदाजाशी तुलना केली असता महानगरपालिकेस या विभागाकडुन 38.68 टक्के इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे. मालमत्ता विभागाने अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.3 वर द्विनोंद कोड A015 रॉकेल डेपोपासुन मिळणारे उत्पन्न रु.50 लाख अंदाजित केले आहे. महासभेने त्यामध्ये वाढ करुन रु.1.20 कोटी प्राप्त होणार असल्याचे अंदाजित केले आहे. तसेच 2010 ते 2012 पर्यंतच्या अंदाजपत्रकामध्ये 50 लाखाचे उत्पन्न अपेक्षित केले आहे. परंतु प्रत्यक्षात या लेखाशिर्षांतर्गत मागील तीन वर्षापासुन कोणतीही रक्कम प्राप्त झालेली नाही. सदर रक्कम वसुल करणेबाबत कोणतीही कार्यवाही मालमत्ता विभागाकडुन झालेली नसल्याने अंदाजपत्रकामधील जमेचे अंदाज फुगविण्यात आलेचे स्पष्ट होते.

8) 2013-14 च्या अंदाजपत्रकामधील पृष्ठ क्र. 7 वर जलनि:सारण करापोटी 2.22 कोटी व पाणीपुरवठा विभागाकडून द्विनोंद कोड E314C मिटरने पाणी पुरविलेबाबतच्या आकारापोटी रु. 22 कोटी मिळणार असल्याचे अंदाजित केले आहे. परंतु प्रत्यक्ष जमा बाजूची तपासणी केली असता महानगरपालिकेस रु.13 कोटी 06 लाख प्राप्त झाले आहेत. सदरची वसुलीची टक्केवारी 59 टक्के इतकी आहे. पाणीपट्टीची वसुली कमी का झाली याची माहिती घेतली असता, महानगरपालिकेच्या जमा व खर्चाचे संपुर्ण संगणकीकरण HCL या कंपनीकडून केले असुन या कंपनीच्या सॉफ्टवेअर मधुनच पाणीपट्टीची देयके तयार करुन पाणीपुरवठा विभागाकडे वाटपासाठी दिली जातात व त्याची वसुली पाणीपुरवठा विभागाच्या वसुली केंद्रामार्फत तसेच शहरात विविध ठिकाणी स्थापन केलेल्या नागरी सुविधा केंद्रामार्फत केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. HCL कंपनीस या कामापोटी कराराप्रमाणे रक्कम आदा केली जाते. HCL कंपनीने केलेल्या कामाची देयके महानगरपालिकेने दिली नसल्याने कंपनीने महानगरपालिकेस कायदेशिर नोटीस देवून काम बंद केल्याने डिसंबर 2013 ते मार्च 2014 अखेरची पाणीपट्टीची देयके तयार करुन त्याचे वाटप झालेले नसल्याने त्याचा वसुलीवर परिणाम होवून पाणीपट्टीची कमी वसुली झाली असल्याचे दिसुन आले आहे. खाजगी कंपनीस काम दिल्यानंतर त्यांनी केलेल्या कामाचा डाटा महानगरपालिकेने सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपीद्वारे संकलित करणे आवश्यक असता तो केला नसल्यने पुढील अर्थिक वर्षामधील वसुलीवर ही त्याचा परीणाम होणार असल्याचे स्पष्ट होते.

DRAFT

9) आर्थिक वर्ष 2013-14 च्या सुधारीत अंदाजपत्रकामधील पृष्ठ क्रं. 12, द्विनोंद कोड C609C वर रु. 34 कोटी 70 लाख नगरोत्थान योजनेमधुन ड्रेनेजच्या कामासाठी शासनाकडुन प्राप्त होणार असल्याचे अंदाजित केले आहे. प्रत्यक्षात या योजनेसाठी रु.52.59 कोटी प्राप्त झाले आहेत. सदर योजनेसाठी शासनाकडून 50 टक्के रक्कम मिळणार असुन 50 टक्के रक्कम महानगरपालिकेने स्वनिधीमधून अथवा कर्जरुपाने उभी करावयाची आहे. त्यासाठी महानगरपालिकेने अंदाजपत्रकामध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत जलनि:सारण मनपा हिस्सा (कर्ज) या लेखाशिर्षांतर्गत द्विनोंद कोड C609D ने रु. 20 कोटीची तरतुद केली आहे. परंतु प्रत्यक्ष जमेचे आकडे तपासले असता या लेखाशिर्षांतर्गत रक्कम निरंक दाखविली आहे. यावरुन महानगरपालिकेने या योजनेच्या खर्चासाठी स्वनिधी हिस्सा म्हणुन कर्ज उभारणीसाठी कोणतेही प्रयत्न केलेले नसलेचे दिसुन येते.

10) महानगरपालिकेने या योजनेवर 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये द्विनोंद कोड 41310 ने रक्कम रु.48.86 लाख खर्च केला असुन सर्व खर्च शासन निधीमधुन केला आहे. (अंदाजपत्रक 2015-16 पृष्ठ क्र.75, 2013-14 आर्थिक वर्षामधील खर्चाचा नक्की आकडा). महानगरपालिकेने या योजनेवर स्वनिधीमधुन खर्च केला नसल्याने निधी अभावी या योजनेची कामे रखडणार असल्याचे स्पष्ट होते.. यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत 2013-14 या आर्थिक वर्षात शासननिधी मधुन द्विनोंद कोड 41221 ने रक्कम रु. 26 कोटी 13 लाख व सुजल निर्मल योजनेसाठी द्विनोंद कोड ने रु.04 कोटी 25 लाख खर्च करण्यात आला असुन महानगरपालिकेच्या हिश्श्यामधुन कोणताही खर्च करण्यात आलेला नाही (अंदाजपत्रक 2015 - 16 पृष्ठ क्र.75, 2013-14 आर्थिक वर्षामधील खर्चाचा नक्की आकडा). पाणीपुरवठा विभागाच्या 2013-14 या आर्थिक वर्षाच्या जमा बाजुस अंदाजपत्रकामध्ये मिटरने पाणीपुरवठा करणे या लेखाशिर्षांतर्गत रु. 22.70 कोटी जमेची तरतुद केली आहे. परंतु प्रत्यक्षात रु.13 कोटी 08 लाख इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे. जमेची एकुण टक्केवारी 57.62 टक्के इतकीच आहे.

11) यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजनेच्या मनपा हिश्श्यापोटी कर्ज रु. 24 कोटी काढणेचे 2013 -14 चे सुधारीत अंदाजपत्रामधील पृष्ठ क्र.12 द्विनोंद कोड C609B ने प्रस्तावित केले आहे. परंतु महानगरपालिकेने कर्ज काढले नसल्यामुळे महानगरपालिकेने स्वनिधीमधुन या योजनेच्या कामावर खर्च करणे आवश्यक होते. परंतु महानगरपालिकेचे जमेचे मुख्य स्त्रोत असलेल्या मिटरने पाणीपुरवठा करणे या लेखाशिर्षांतर्गत अपेक्षित जमा झालेली नसलेने महानगरपालिकेने शासन निधीमधुनच खर्च केला आहे. वरील योजनेसाठी महानगरपालिकेने स्वनिधीची रक्कम उभी केली नसल्याने निधी अभावी या योजनांची प्रगती रेंगाळणार असल्याचे स्पष्ट होते.

12) 2015-16 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष झालेल्या जमा व खर्चाचे नक्की आकडे दिले आहेत. सदर अंदाजपत्रकामधील दुबेरजी जमा बाजू पृष्ठ क्र.10 वर द्विनोंद कोड 35084 ने कामगार कल्याण निधी नगररचना विभाग या लेखाशिर्षा खाली रु. 1 कोटी 04 लाख जमा झाले आहेत व दुबेरजी खर्च बाजू पृष्ठ क्र.74 वर द्विनोंद कोड E35084 ने कामगार कल्याण निधी नगररचना या लेखाशिर्षाखाली रक्कम रु. 1.12 कोटी खर्च टाकण्यात आले आहेत. नगररचना विभागाचे 2013-14 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता सांगली विभागाने वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये जमा झालेली रक्कम

रु.1,25,63,283/- लेखापरीक्षण कालावधी अखेर ( मार्च 2016) मंडळास भरणा केलेली नाही. तसेच मिरज विभागाने मार्च 2014 मध्ये कामगार कल्याण मंडळाकडे भरणा करणेसाठी रक्कम रु. 3,05,62,015/- चे देयक तयार करुन लेखा शाखेकडे सादर केली होती. परंतु सदरची देयके पारीत न झाल्याने रक्कम मंडळाकडे भरणा केलेली नाही. मिरज विभागाने कामगार कल्याण उपकरापोटी जमा झालेल्या रक्कमेची नोंद त्यांचेकडील रोज किर्दीमध्ये करणे आवश्यक असता त्यांनी रोजकीर्द ठेवली नसल्याने सदर भरणा रक्कम कोणत्या कालावधीमध्ये जमा करण्यात आली होती याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही. लेखा विभागाने सदर उपकर भरणा करणेसाठी युनियन बँक ऑफ इंडियाच्या सांगली मेन या शाखेमध्ये एक नवीन बँक खाते उघडुन सदर बँक खाते क्रमांक 424202010507460 मध्ये रक्कम परस्पर जमा करण्यास नगर रचना सांगली व मिरज विभाग व प्रभाग समिती क्र. 1 ते 3 यांच्या सुचना दिल्या आहेत. सदर सुचनेप्रमाणे दिनांक 02/08/2013 पासुन उपकराची रक्कम सदर बँक खाते मध्ये जमा करण्यात आली आहे. दि. 02/08/2013 पासुन नव्याने उघडण्यात आलेल्या उपकराच्या बँक खाते क्र. 7460 मध्ये लेखा परीक्षण कालावधी ( मार्च 2016 ) पर्यंत 9 कोटी 27 लक्ष एवढी रक्कम शिल्लक असल्याचे आढळुन आले. सदर रक्कम लेखाविभागाकडील उपकराच्या स्वतंत्र रोजकीर्दीमध्ये नोंदविणे आवश्यक असता ती नोंदविण्यात आलेली नाही. तसेच उपकराची रोजकीर्द व बँकेमधील जमा रक्कम याचा ताळमेळ घेवुन कामगार कल्याण मंडळाकडे या रक्कमेचा भरणा न केल्याने मनपाकडे रक्कम रु. 9 कोटी 27 लाख पडुन असल्याचे आढळुन आले आहे.

13) नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 26 (2) प्रमाणे अंदाजपत्रकीय वर्षारंभापूर्वी जी विद्यमान देणी फेडता येणे अशक्य असतील अशांची खात्री करुन घेवुन त्यांची तरतुद त्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये आवश्यक आहे. त्याप्रमाणे 2013-14 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.64 वर 2012-13 मध्ये तरतुद असलेल्या परंतु 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष नसलेली तसेच लेखाशिर्षावर तरतुद शुन्य असलेली आदा करावयाची देयके या लेखाशिर्षांतर्गत रु.10 कोटीची तरतुद केली आहे. आर्थिक वर्ष 2015-16 च्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.65 वर 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खर्चाचे नक्की आकड्यामध्ये या लेखाशीर्षाखाली रक्कम रु.05 कोटी 70 लाख खर्च झालेचे नमुद आहे. तसेच 2014-15 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.64 वर द्विनोंद कोड 41254 ने 2013-14 मध्ये तरतुद असलेल्या परंतु 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष नसलेली तसेच लेखाशिर्षावर तरतुद शुन्य असलेली आदा करावयाची देयके या लेखाशिर्षांतर्गत रु.10.30 कोटीची तरतुद केली आहे. परंतु 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये 7 कोटी 98 लाख रक्कमेची देयके आदा केली आहेत. त्यामुळे महानगरपालिकेकडे दरवर्षी प्रलंबित देयकाची संख्या व आदा करावयाची रक्कम सतत वाढत असल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम क्र. 25 (2) नुसार महानगरपालिकेने पुढील वर्षाचे अंदाजपत्रक सादर करताना चालु वर्षाचे 1 एप्रिल ते 30 नोव्हेंबर या कालावधीचे प्रत्यक्ष उत्पन्न व खर्च आणि चालु वर्षाच्या उर्वरित भागातील उत्पन्न व खर्चाचे अंदाज वर्तविणे आवश्यक आहे. त्यानुसार अंदाजपत्रकीय

तरतुदीमध्ये कपात करुन सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. या नियमानुसार महानगरपालिकेने अंदाजपत्रक तयार केले आहे. परंतु महानगरपालिकेस प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या

DRAFT

उत्पन्नानुसार सदरचे कामास निधी देणे शक्य हो णार आहे किंवा नाही या बाबतचा अभिप्राय लेखा विभागाकडून प्रत्येक कामाच्या नस्तीवर घेवुन त्याप्रमाणे प्रत्येक विभागाने विकास कामे करणे आवश्यक असता, अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे विकास कामे आयुक्तांच्या मंजुरीने केल्याने व अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे निधी प्राप्त झाला नसल्याने इतक्या मोठ्या प्रमाणात देयके प्रलंबित राहिलेचे स्पष्ट होते. महानगरपालिकेने अंदाजपत्रकामध्ये तरतुद केल्याप्रमाणे करांची वसुली करुन जमा महसूल वाढविणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद केल्याप्रमाणे करांच्या रक्कमा जमा होतात किंवा नाही या बाबतचा आढावा घेणारी कोणतीही यंत्रणा कार्यरत नसल्याने करांच्या वसुलीबाबत अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे दिसुन येते.

14) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 102 नुसार संपूर्ण अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याचा कोणताही भाग, ज्या वर्षासाठी ते अनुदान अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करणेत आले असेल त्या वर्षाचे अखेरीस खर्च न होता तसेच राहिले असेल व ते पुढील दोन वर्षापैकी कोणत्याही वर्षाचे अर्थसंकल्पात नमुद केलेल्या यथास्थिती नगरपालिका निधीच्या प्रारंभिक शिल्लकेत हिशेबात घेतले नसेल तर स्थायी समिती किंवा परिवहन समितीस यथास्थिती असे अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याची खर्च न झालेली रक्कम पुढील दोन वर्षाचे मुदतीत कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी किंवा उदिष्टासाठी नव्हे तर ज्यासाठी ते अर्थसंकल्पीय अनुदान मंजुर करणेत आले होते ते प्रयोजन किंवा उद्दिष्ट हे, मुळ उद्देशा प्रमाणे किंवा मंजुरीप्रमाणे साध्य करणेसाठी खर्च करणेस मंजुरी देता येईल. या अधिनियमातील तरतुदी प्रमाणे महानगरपालिकेने मागील दोन वर्षातील न केलेल्या कामांची यादी तयार करुन त्या यादीतील प्रलंबित कामे प्राधान्याने करणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने त्याप्रमाणे कामांची यादी तयार केली नसल्याने मागील प्रलंबित असलेली कामे कशा प्रकारे करणार आहे ते समजुन येत नाही.

15) आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये एकुण महसुली जमा रु.133 कोटी 39 लाख झाली असुन महसुली खर्च रक्कम रु. 130 कोटी 71 लाख इतका करण्यात आला आहे. पैकी रु.62.64 कोटी इतकी रक्कम कर्मचा-यांच्या वेतन व भत्त्यापोटी खर्च करण्यात आली आहे. तसेच निवृत्तीवेतन व कुटूंब निवृत्ती वेतनावर रु.10 कोटी 69 लाख, प्राथ.शिक्षण मंडळास वेतनासाठी वर्ग रक्कम रु.10.18 कोटी , प्रशासकीय खर्च रु. 9.35 कोटी असा एकुण खर्च रु.92.86 कोटी करण्यात आला आहे. एकुण महसुली जमेच्या **70 % इतकी** रक्कम अस्थापनेवर खर्ची पडली आहे.

16) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 (अ) अन्वये ज्या विभागांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे त्याचे विवरण पत्र, महानगरपालिकेच्या 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकासोबत खालील प्रमाणे सादर करण्यात आले आहे.

| अ.क्र. | अर्थसहाय्य दिलेल्या विभागाचे नाव | विभागाची जमा रु. 2013-14 | विभागाचा खर्च रु. 2013-14 (कोटी) | विभागाची तुट रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | पाणी पुरवठा व जलनि:सारण | 17,03,07,445 | 26,24,75,105 | 9,21,67,660 |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | आरोग्य विभाग | 2,60,69,479 | 22,25,92,408 | 22,25,92,408 |
| 3 | दिवाबत्तीची सोय करणे | 0 | 87362946 | 87362946 |
| | एकुण | 196376924 | 598499938 | 402123014 |

सदर सेवेचा जादा झालेला खर्च हा महसुली उत्पन्नातुन करण्यात आला असुन या विभागामार्फत ज्या सोयी पुरविण्यात आल्या आहेत. त्याचा फायदा महानगरपालिका क्षेत्रातील 90 टक्के नागरीकांना होत असल्याचे अर्थसहाय्याबाबत केलेल्या टिपणीमध्ये नमुद आहे. महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व जलनि:सारण या विभागाकडून महानगरपालिकेस महसुली उत्पन्न मिळत असल्याने ही सेवा सक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी पाणीपट्टीच्या दरामध्ये सुधारणा करणे, पाणीपट्टीची देयके नागरीकांना वेळेत आदा करणे, पाणीपट्टीची थकबाकी वसुलीसाठी विशेष प्रयत्न करणे, वितरण व्यवस्थेमधील गळती काढणे या आवश्यक बाबींची अंमलबजावणी तात्काळ करणे आवश्यक आहे.

17) शासनाकडुन 2013 -14 या वित्तिय वर्षामध्ये खालील प्रमाणे अनुदान शिल्लक व खर्च झाले आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | एकुण निधी | खर्च निधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | UIDSSMT | 30 कोटी 19 लाख | 26 कोटी 13 लाख | 86 |
| 2 | नगरोत्थान जलनि:सारण | 52 कोटी 37 लाख | 48 कोटी 86 लाख | 93 |
| 3 | सुजल निर्मल | 04 कोटी 91 लाख | 04 कोटी 25 लाख | 86.55 |
| 4 | 13 वित्त आयोग | 30 कोटी | 11 कोटी 54 लाख | 38.46 |
| 5 | प्रशमन शुल्क | 03 कोटी 09 लाख | 07 लाख 44 हजार | 2.4 |
| 6 | विकास आकार | 12 कोटी 86 लाख | 18 लाख 85 हजार | 1.5 |

उपरोक्त माहितीचे अवलोकन केले असता शासनाकडुन मिळालेल्या निधीपैकी सर्वात जास्त खर्च (93 टक्के) नगरोत्थान योजनेमधुन जलनि:सारणाच्या कामावर झाला आहे. परंतु सदर योजना 50 टक्के शासन अनुदान व 50 टक्के महानगरपालिका स्वनिधी अथवा कर्ज रक्कम या मधुन करणे आवश्यक असता मनपाने सर्व खर्च शासन निधीमधुन केला असल्याने निधी खर्चाची टक्केवारी जास्त दिसुन येते. सर्वात कमी खर्च विकास आकार (01.5 टक्के) या योजने अंतर्गत करणेत आला आहे. यावरुन शासनाकडुन मिळालेल्या निधीचा विनियोग महानगरपालिकेकडुन विहित वेळेत योग्य प्रमाणात होत नसल्याने योजना पुर्ण होण्यास विलंब लागत असल्याचे दिसुन येते. योजनास होणाऱ्या विलंबामुळे योजनांचा खर्च वाढुन योजनेची प्रगती रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

18) 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेस, केंद्र व राज्य शासनाकडून विविध योजनासाठी रक्कम रु. 184.52 कोटीचे अनुदान मिळाले असुन महानगरपालिकेने रक्कम रु.118.61 कोटी अनुदान खर्च केले आहे. महानगरपालिकेन 64.28 टक्के अनुदान खर्च केले असुन 28.56 टक्के अनुदान अखर्चित आहे.

DRAFT

19) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106 (3) अन्वये प्रत्येक आर्थिक वर्ष सुरु झालेनंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिका लेखा परीक्षकाने महानगरपालिकेच्या मागील आर्थिक वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीसमोर सादर करुन वार्षिक लेखे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. तथापि महानगरपालिकेकडे वार्षिक लेखे ठेवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष आर्थिक स्थितीवर भाष्य करता येत नाही.

20) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण चार-अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे यामधील कलम 60 अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे (1) (3) (पाच) नुसार प्रत्येक तिमाही नंतर दोन महिन्यांच्या आत त्या तिमाहीचा लेखा परिक्षीत ताळेबंद , जमा व खर्च आणि पैशाचा ओघ (CASH FLOW) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र इंटरनेटवर प्रसिध्द करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेने महानगरपालिकेच्या वित्तिय स्थितीची माहिती नागरिकांना समजून येत नाही.

DATSBKM7201 (Ref No : 103)

## *91 आर्थिक वर्ष संपण्याचे अखेरीस बांधकाम विभागाने विकास कामाची टेंडर मागवुन त्याबाबतची कार्यवाही पुढील वर्षामध्ये केल्याने झालेल्या गंभीर वित्तिय अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
आक्षेपाधीन रक्कम रु. 31241175.00/-

***नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे प्रकरण 13 परिशिष्ठ एक भाग अ सर्वसाधारण वित्तिय तत्वे (1) नुसार अर्थसंकल्पात वेगवेगळी उपशीर्षे आणि बाबी यामध्ये अनुदानाचे केलेले वाटप हे संबंधित अनुदान कोणत्या उद्दिष्टाकरीता दिले आहे ह्याचे निदर्शक आहे. मागील दायित्वासह सर्व खर्चाचा अनुदानामध्ये अंतर्भाव असल्याने ते 31 मार्चपर्यंत परिणामकरित्या अंमलात राहतील व त्यानंतर खर्च न केलेली अनुदानातील शिल्लक व्यपगत होईल असे नमुद नमुद असतानाही वर्षाच्या शेवटी दि.20/03/2012 रोजी निविदा मागविल्या आहेत व दि.12/04/2012 म्हणजेच पुढील अर्थिक वर्षामध्ये व्यपगत झालेल्या अनुदानामधील निविदा स्विकृत करुन कामे करण्यात आल्याने महानगरपालिकेवर रक्कम रु.31241175/- चे दायित्व निर्माण झाले आहे.***

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.30 अजिंक्य मंडळ परिसरातील रस्ते करणे या कामाच्या निविदा नस्ती व देयकाची तपासणी केली असता या कामाचे देयकापोटी रक्कम रु.320855, निविदाधारक शिवपार्वती कन्सट्रक्शन यांना प्रमाणक क्र.69884 दि.26/03/2014 ने आदा

केली आहे. बांधकाम विभागाच्या या निविदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता, बांधकाम विभागाने जाहिर प्रकटन क्र.11/2011-12 दि.20/03/2012 च्या दै.पुढारी या वर्तमानपत्रामध्ये रु.31241175/- किमतीच्या एकुण 45 विकास कामाची ई निविदा नोटीस प्रसिध्द केली असुन महानगरपालिकेच्या नोंदणीकृत मक्तेदाराकडुन दि. 12/04/2012 पर्यंत ई निविदा मागविण्यात आल्या आहेत.

या निविदा प्रक्रीया नस्तीचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्र.118 दि.20/06/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. या निविदा नस्ती प्रक्रीयेबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे प्रकरण 13 परिशिष्ठ एक भाग अ सर्वसाधारण वित्तिय तत्वे (1) नुसार अर्थसंकल्पात वेगवेगळी उपशीर्षे आणि बाबी यामध्ये अनुदानाचे केलेले वाटप हे संबंधित अनुदान कोणत्या उद्दिष्टाकरीता दिले आहे ह्याचे निदर्शक आहे. मागील दायित्वासह सर्व खर्चाचा अनुदानामध्ये अंतर्भाव असल्याने ते 31 मार्चपर्यंत परिणामकरित्या अंमलात राहतील व त्यानंतर खर्च न केलेली अनुदानातील शिल्लक व्यपगत होईल असे नमुद केले आहे. प्रत्येक विभागप्रमुखाची, आपल्या विभागासाठी मंजुर केलेले अनुदान अथवा अनुदाने यांच्या मर्यादेपर्यंतच खर्च केला जाईल हे पहाण्याची मुख्यत: जबाबदारी राहील. परंतु बांधकाम विभागाने विविध विकास कामाची निविदा दि.20/03/2012 रोजी आर्थिक वर्ष संपण्यास वीस दिवसाचा कालावधी राहिला असताना काढली असुन निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख दि.12/04/2012 म्हणजेच पुढील आर्थिक वर्ष 2012-13 मधील देण्यात आली आहे. उपरोक्त नियमानुसार दि. 31 मार्च 2012 रोजी अनुदानामधील खर्च न केलेली शिल्लक व्यपगत होत असताना टेंडर काढण्यात आले आहे. तसेच

सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 296 (दोन) (ब) नुसार सर्वसाधारणपणे उशिरा म्हणजे जानेवारी महिन्यात (किंवा फेब्रुवारीत व मार्चमध्ये) कोणतेही काम मंजुर करण्यात येवू नये किंवा फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये काम सुरू करण्यात येवु नये असे स्पष्ट आदेश असताना सदर कामांची निविदा मार्च महिन्याच्या शेवटी मागविण्यात आल्या आहेत.

3) सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 255 नुसार सक्षम प्राधिका-याकडुन योग्य ते तपशीलवार अभिकल्पना व अंदाजपत्रक यांना मंजुरी मिळाल्याशिवाय, **निधीचे नियत वाटप झाल्याशिवाय** कोणतेही बांधकाम करुन नये तसेच कोणत्याही प्राधिकरणाने अभिकल्पना व अंदाजपत्रक यांना मंजुरी दिल्याचा अर्थ प्रत्यक्ष खर्च करण्याची मंजुरी दिला असा होत नाही. मात्र अशा खर्चासाठी त्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद केली असेल किंवा अधिकृत वर्षात पुनर्विनि योजनाद्वारे किंवा ते काम ज्या वर्गवारी लेखा शीर्षाखाली येत असेल त्या शीर्षाखाली दिलेल्या **ठोक रक्कमेची अनुदाना मधुन** तरतुद केलेली असेल तरच ते काम करणे आवश्यक असताना उपरोक्त स्वनिधीमधील कामांची निविदा केवळ या कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद केली आहे म्हणुन वर्षाच्या शेवटी काढल्याने महानगरपालिकेवर रक्कम रु.31241175/- चे दायित्व निर्माण झाले आहे. याबाबतचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.118, दि.20/06/2016 अन्वये मागणी करुनही बांधकाम व लेखा विभागाने

DRAFT

केलेला नाही.

DATSBKM7201 (Ref No : 118)

## *92 सुधारीत अंदाजपत्रपकाप्रमाणे खर्चामध्ये कपात करुन कामे न करता, मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीनूसार निविदा मागवुन कामे केल्याने प्रलंबित देयकाचे दायित्व महानगरपालिकेवर वाढून झालेल्या वित्तिय अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 149463704.00/-

***सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिके मधील परिच्छेद 296 (दोन) (ड) नुसार विनिर्दिष्ठ बांधकामा साठी निधीचे वाटप केल्या बाबतची सुचना देण्यात आल्यानंतर ताबडतोब बांधकाम सुरळीत पार पाडता यावे यासाठी आणि आवश्यक असेल तेथे आराखडे व अंदाज पुर्ण करण्यासाठी व वेळेवर निविदा मागविण्यासाठी कार्यक्रम आखणे आवश्यक आहे. परंतु बांधकाम विभागाने निधीचे वाटप होण्यापुर्वीच निविदा मागवुन त्यानुसार कामे करुन घेतली आहेत. बांधकाम विभागाने लेखा विभागाकडे या कामांना अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार निधीचे वाटप केले आहे किंवा नाही याबाबतची खातरजमा करुन व प्रत्यक्ष प्राप्त होणा-या निधीप्रमाणे कामे करणे आवश्यक होते. परंतु निधी उपलब्धतेबाबत लेखा विभागाशी कोणतीही खातरजमा न करताच बांधकाम विभागाने निविदा मागवुन कामे केल्याने रक्कम रु.149463704/- च्या कामाची देयके प्रलंबित राहून महानगरपालिकेवरील दायित्वामध्ये वाढ झाली आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने जाहिर प्रकटन क्र.- 09/12-13 ने रु.198060408/- किमतीच्या एकुण 318 कामांची एकत्रित जाहिर निविदा दि.11/08/2012 रोजी दै.पुढारी या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली असुन निविदा 05/09/2012 अखेर मागविण्यात आल्या आहेत. जाहिर निविदा मागविण्यापुर्वी या निविदेमधील प्रत्येक कामाची स्वतंत्र नस्ती बांधकाम विभागाने तयार केली आहे. या प्रत्येक कामाच्या नस्तीमध्ये कामाची गरज, अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली कामाची लेखाशिर्षनिहाय अंदाजित तरतुद नमुद करुन कामाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर कामाच्या प्राकलनास शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेवुन या कामाच्या नस्ती प्रशासकीय मान्यतेसाठी प्रशासनाकडे पाठविण्यात आल्या आहेत . या प्रत्येक स्वतंत्र कामाच्या टिपणीस मुख्य लेखापरीक्षक व उपायुक्त यांची काम करणेबाबतची शिफारस घेवुन नस्ती आयुक्त यांचेकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. या टिपणीवर आयुक्त यांनी

कामास प्रशासकीय मान्यता दिली असुन काम जाहिर निविदा मागवुन करणेस मंजुरी दिली आहे. तसेच प्रत्येक कामास आयुक्त यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेचे स्वतंत्र आदेश काढण्यात आले आहेत व त्यानंतर सर्व कामांचा समावेश करुन 317 कामांची निविदा जाहिरात वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करुन महानगरपालिकेच्या मान्य ठेकेदाराकडून ई निविदा मागविण्यात आल्या आहेत. आलेल्या ई निविदांची नियमानुसार छाननी करुन मान्य ठेकेदारांना कामाचे कार्यादेश देवुन त्यांचेकडुन मार्च 2013 पुर्वी कामे करुन घेण्यात आली आहेत.

या कामाची निविदा नस्ती, जाहिर निविदा प्रकटनाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.121 दि.27/06/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या निविदा प्रक्रीयेमध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) या जाहिर निविदा प्रकटनातील कामांच्या प्रशासकीय मान्यतेसाठीच्या टिपणीची तपासणी केली असता, बांधकाम विभागाने विकास काम करण्याबाबत कामाची अंदाजपत्रके तयार करुन त्यास कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेतल्यानंतर दि.13/07/2012 रोजी या कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची प्रत्येक कामाची स्वतंत्र टिपणी अंदाजपत्रकासह तयार करुन आयुक्तांकडे सादर केली आहे व आयुक्तांनी या प्रत्येक स्वतंत्र कामांना माहे जुलै 2012 मध्ये प्रशासकीय मान्यता व निविदा मागविण्यास मंजुरी दिली आहे . परंतु या कामांसाठी अर्थसंकल्पात केलेल्या बजेट तरतुदीनुसार महानगरपालिकेकडे प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध आहे व आर्थिक वर्षाअखेर जमेच्या वसुलीमधुन किती निधी उपलब्ध होणार आहे. उपलब्ध निधीतुन या कामापैकी किती कामे करता येणे शक्य आहे. याबाबतचा वित्तिय अभिप्राय घेण्यासाठी संबंधित कामाच्या टिपणी लेखा शाखेकडे पाठवुन महानगरपालिकेच्या अर्थिक स्थिती बाबत त्यांचा अभिप्राय घेण्यात आलेला नाही. प्रशासकीय मंजुरी व कामाच्या निविदा मागविण्यापुर्वी लेखाशाखेचा निधीची तरतुद व उपलब्धता या बाबतचा अभिप्राय न घेताच प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. लेखा शाखेचा वित्तिय अभिप्राय का घेण्यात आला नाही याचा खुलासा बांधकाम विभागाने अर्धसमास ज्ञापन क्र.121 अन्वये मागणी करुनही केलेला नाही.

2) सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 255 नुसार सक्षम प्राधिका-याकडुन योग्य ते तपशीलवार अभिकल्पना व अंदाजपत्रक यांना मंजुरी मिळाल्याशिवाय, **निधीचे नियत वाटप** झाल्या शिवाय आणि बांधकामास प्रारंभ करण्याचे आदेश देण्यात आल्याशिवाय, कोणतेही बांधकाम सुरु करु नये. तसेच अर्थसंकल्पावरील आदेशामध्ये चालु बांधकामावरील प्रस्तावित खर्चाची नोंद अर्थसंकल्पात राहु देण्यास परवानगी दिलेली असली तरी त्याचा **अर्थ प्रत्यक्ष खर्च करण्याचे प्राधिकार** दिले आहेत असा होत नाही. त्यामुळे कोणताही खर्च करण्यापुर्वी बजेटमधील तरतुदीनुसार प्रत्यक्ष निधी प्राप्त होणार आहे किंवा नाही ,बजेटमध्ये रक्कमेची कपात केली आहे किंवा नाही याची खातरजमा बांधकाम विभागाने लेखा शाखेकडे न करता निविदा मागवुन कामे केल्याने ठेकेदारांची रु.149463704/- ची देयके प्रलंबित राहिल्याचे दिसुन येते.

3)2012-13 या आर्थिक वर्षामध्ये निधी अभावी प्रलंबित राहिलेल्या देयकांची माहिती महानगरपालि

DRAFT

केच्या लेखा व मुख्य लेखापरीक्षण कार्यालयामध्ये ठेवण्यात येते. मुख्य लेखापरीक्षण कार्यालयामध्ये बजेटमधील लेखाशिर्षानुसार खर्च तपासण्यासाठी खर्चाची नोंदवही त्यांचेकडील नमुन्यामध्ये ठेवण्यात आली असुन त्यामध्ये लेखाशिर्षानुसार अर्थसंकल्पिय तरतुद, त्यामधुन देयकानुसार खर्ची पडलेली रक्कम यांची नोंद घेण्यात आली आहे. तसेच अर्थसंकल्पिय वर्षामध्ये लेखा शाखेकडुन खर्ची न टाकलेल्या देयकाची नोंद पुढील वर्षाच्या बजेट नोंदवहीमध्ये रिऑडीट या सदरी घेण्यात येते. आर्थिक वर्ष 2013-14 च्या बजेटनुसार ठेवण्यात आलेल्या खर्चाच्या नोंदवहीची तपासणी केली असता 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये बजेट तरतुदीनुसार करण्यात आलेली परंतु प्रत्यक्षात निधी नसल्याने प्रलंबित राहिलेल्या कामांची रक्कम रु.149463704/- ची देयके प्रलंबित असल्याचे दिसुन येते. बांधकाम विभागाने निधीचे नियत वाटप झाल्याशिवाय कामे केल्याने देयके प्रलंबित राहिल्याचे दिसुन येते.

4) सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 255 नुसार कोणत्याही प्राधिकरणाने अभिकल्पना व अंदाजपत्रक यांना मंजुरी दिल्याचा अर्थ **प्रत्यक्ष खर्च करण्याची मंजुरी** दिला असा होत नाही. मात्र अशा खर्चासाठी त्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद केली असेल किंवा अधिकृत वर्षात पुनर्विनियोजनाद्वारे किंवा ते काम ज्या वर्गवारी लेखा शीर्षाखाली येत असेल त्या शीर्षाखाली दिलेल्या **ठोक रक्कमेचे अनुदानामधुन** तरतुद केलेली असेल तर ते काम करणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही कामासंबंधात, निधी पुरविणा-या सक्षम प्राधिकरणाकडे असा निधी दायित्व देय होण्यापुर्वी दिला जाईल अशी हमी मिळेपर्यंत कोणतेही दायित्व स्विकारु नये असे नमुद आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिके मधील **परिच्छेद 296 (दोन) (ड)नुसार** विनिर्दिष्ठ बांधकामासाठी **निधीचे वाटप** केल्या बाबतची सुचना देण्यात आल्यानंतर ताबडतोब बांधकाम सुरळीत पार पाडता यावे यासाठी आणि आवश्यक असेल तेथे आराखडे व अंदाज पुर्ण करण्यासाठी व वेळेवर निविदा मागवि- ण्यासाठी कार्यक्रम आखणे आवश्यक आहे. परंतु बांधकाम विभागाने निधीचे वाटप होण्यापुर्वीच या कामांची निविदा मागवुन त्यानुसार कामे करुन घेतली आहेत. बांधकाम विभागाने लेखा विभागाकडे या कामांना अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार निधीचे वाटप केले आहे किंवा नाही याबाबतची खातरजमा करुन व प्रत्यक्ष प्राप्त होणा-या निधीप्रमाणे कामे करणे आवश्यक होते. परंतु निधी उपलब्धतेबाबत लेखा विभागाशी कोणतीही खातरजमा न करताच बांधकाम विभागाने निविदा मागवुन कामे केल्याने रक्कम रु.149463704/- च्या कामाची देयके प्रलंबित राहून महानगरपालिकेवरील दायित्वामध्ये वाढ झाली आहे.

5) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 च्या नियम क्र.25 (1) (क) नुसार नगरपरिषदेचे पुढील वर्षाचे अंदाजपत्रक नमुना क्र.4 प्रमाणे करुन त्यामध्ये नगरपरिषदेचे त्या वेळच्या चालु वर्षाच्या 1 एप्रिल ते 30 नोव्हेंबर या कालावधीचे प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न व खर्च आणि चालु वर्षाच्या उर्वरित भागातील प्राप्त होणा-या उत्पन्न व खर्चाचे अंदाज वर्तविणे आवश्यक आहे. या नियमानुसार महानगरपालिकेने 2013-14 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करताना त्यामध्ये चालु वर्ष 2012-

DRAFT

13 मधील अंदाज, नोव्हेंबर 2012 अखेरची प्रत्यक्ष जमा व खर्च व पुढील चार महिन्याची अंदाजे जमा व खर्च यांचा सुधारीत अंदाज अंदाजपत्रकामध्ये नोंदविला आहे. तसेच प्रत्यक्ष आठमाही जमेच्या अधारे पुढील चार महिन्यासाठी जमेच्या व खर्चाच्या अंदाजामध्ये कपात दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष 2013-14 च्या अंदाजपत्रका मध्ये पृष्ठ क्र.14 वर 2012-13 चा महसुली जमेचा अंदाज रु. 220 कोटी ऐवजी 184 कोटी सुधारीत करण्यात आला आहे. तसेच पृष्ठ क्र. 80 वर पाणीपुरवठा, जलनि:सारण,नगररचना, इमारत योजना व इतर योजनावरील महसुली खर्चाचा अंदाज रु.124 कोटी ऐवजी रु. 70 कोटी 86 लाख सुधारीत करण्यात आला असल्याचे नमुद आहे व या सुधारीत अंदाजपत्रकास महासभेची मान्यता घेण्यात आली आहे. सदर जमा व खर्चाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केल्यानंतर त्या वर्षामध्ये करण्यात येणा-या खर्चामध्येही कपात करणे आवश्यक आहे. परंतु बांधकाम विभागाने त्यांना वर्षाच्या सुरवातीस दिलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे विकास कामांची एस्टिमेट तयार करुन त्यानुसार निविदा मागवुन जानेवारी महिन्यामध्ये काम सुरु करण्याबाबत मान्य ठेकेदारांना वर्क ऑर्डर देवुन ठेकेदाराकडुन कामे करुन घेण्यात आली आहेत व या कामांची देयके आर्थिक वर्षाच्या शेवटी तयार करुन लेखा शाखेकडे पाठविण्यात आली आहेत . सुधारीत अंदाजपत्राप्रमाणे खर्चामध्ये कपात न करता बांधकाम विभागाने विकास कामे केल्याने निधी अभावी या कामांची देयके प्रलंबित राहिली असल्याचे स्पष्ट होते.

6) सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 296 (दोन)(जी) नुसार डिसेंबर किंवा जानेवारी या महिन्यामध्ये प्रदानासाठी देय होणा-या देयकांचे प्रदान 1 मार्चपुर्वी केले पाहिजे. मार्चमध्ये करण्यात आलेल्या कामांच्या बाबतीत विशेष कारणे आसल्याखेरीज मार्चमध्ये प्रदान करण्यासाठी त्याची मापे घेणे आावश्यक आहे. परंतु या निविदेमधील मंजुर कामे जानेवारी ते मार्च अखेर पुर्ण करण्यात आली आहेत व या कामाची देयके तयार करुन लेखा विभागाकडे पाठविण्यात आलेली आहेत. परंतु या कामाची देयके ठेकेदारांना मार्च 2013 अखेर आदा केलेली नाहीत. सदर रक्कम का आदा करण्यात आलेली नाही तसेच महानगरपालिकेकडुन सुधारीत अंदाजपत्रकांना मंजुरी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे जमा व खर्चाचे सुधारीत अंदाज महानगरपालिकेच्या अन्य विभागांना कशा पध्दतीने लेखा शाखेकडुन दिले जातात, या बाबत कोणती कार्यवाही करणेत येते. तसेच लेखा विभाग व अन्य विभाग यामध्ये कशा पध्दतीने आर्थिक समन्वय राखण्यात येतो. याचा खुलासा लेखाविभागाने केलेला नाही.

DATSBKM7201 (Ref No : 121)

## *93 प्रभाग समिती क्रं.1 व 2 च्या कार्यक्षेत्रातील गणेशोत्सव निमित्त रस्त्यातील खड्डे मुरुमाने भरणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*



DRAFT

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 490654.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 93143.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड, प्रकरण 5, संविदा खंड 2(2) अन्वये स्थायी समितीला तिच्या कार्यवृत्तात कारणे नमुद करुन एखादे काम निविदा न मागविता करण्या बाबत तसेच त्या कामाची संविदा करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करण्याचे अधिकार आहेत. परंतु या ठिकाणी काम तातडीने करणे आवश्यक असल्याने विना निविदा करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने महासभेकडे पाठविला आहे. परंतु काम चार महिने विलंबाने केलेने काम तातडीचे नसल्याचे स्पष्ट होते. तसेच सदरचे काम विना निविदा केल्याने जास्तीत जास्त ठेकेदारांना निविदा स्पर्धेत भाग घेता आला नसल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसल्याचे स्पष्ट होते.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहरमहानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.1 व 2 च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील खड्डे गणेशोत्सवानिमित्त मुरुमाने भरणे कामाच्या नस्तीमधील बांधकाम विभागाच्या दि.14/09/2012 च्या कार्यालयीन टिपणीचे अवलोकन केले असता सदर ठिकाणचे रस्ते पाणी पाईपलाईनच्या कामामुळे खराब झाल्याने ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. सदर खड्डे व रस्त्यावरील चरी मुरुमाने भरुन घेवुन गणेशोत्सवापुर्वी रोलिंग करणे आवश्यक आहे. या जागेची पाहणी करुन रक्कम रु.585128/- चे अदाजपत्रक सन 2011-12 चे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विभागिय दरसुचीप्रमाणे तयार करुन त्यास शहर अभियंता यांची मान्यता घेतली आहे. सदरचे काम गणेशोत्सवापुर्वी करणे आवश्यक असल्याने निविदा प्रक्रीयेस वेळ लागणार असल्याने मजुर सहकारी सोसायटीकडुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(2) अन्वये विना निविदा करण्याबाबतची टिपणी बांधकाम विभागाने प्रशासनास सादर केली आहे व आयुक्त यांनी या प्रस्तावास दि.1/10/2012 रोजी मान्यता दिली आहे. जिल्हा उपनिबंधक सहकारी सोसायटी यांना काम वाटप करण्याबाबतचे पत्र महानगरपालिकेने दि.08/10/ 2012 रोजी दिले आहे व उपनिबंधक सहकारी सोसायटी यांनी त्यांचे जाक्र. 640/12-13 दि.30/10/2012 पत्रान्वये सदरचे काम पै.ज्यातीराम खोत मजुर सह. सोसा. लि.तानंग यांना वाटप केलेचे महानगरपालिकेस कळविले आहे. महासभा क्रमांक 09, ठराव क्र.235 ,विषय क्र.19 दि.20/12/2012 ने उपायुक्त (बांधकाम) यांचे दि.08/11/2012 चे विषयपत्रानुसार सदरचे काम पै.जोतीराम खोत मजुर सहकारी सोसायटीकडून करुन घेणेस मान्यता दिली आहे.

या कामाचा खर्च 2012-13 च्या अर्थसंकल्पामधील क - 6, बांधकाम B 1820 डिपार्टमेंटल रस्त्याच्या दुरुस्त्या (पॅचवर्क) या लेखाशिर्षामधुन करण्यात आला आहे.

वर्क ऑर्डर :- मक्तेदारास दि.21/01/2013 रोजी दिली असुन कामाची मुदत 30 दिवसाची देण्यात आली आहे.

काम सुरु :- दि.21/01/2013 काम पुर्ण :- दि.08/02/2013.
मोजमाप पुस्तक क्र.11, पृष्ठ क्र. 19 ते 20.
या कामाचे रक्कम रु.583797/- चे देयक प्रभाग समिती क्र.1 ने दि.10/02/2013 रोजी तयार करुन लेखा विभागाकडे विभागाकडे सादर केले असुन लेखा विभागास देयक मिळाल्याबाबतची नोंद आवक क्र.8377 दि.12/02/2013 ने करण्यात आलेचे देयकावर नमुद केले आहे. परंतु देयक 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आदा केले नसल्याने 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये देयकाची नोंद आवक क्र.1170 दि.13/05/2013 ने केलेबाबत देयकावर लेखा विभागाने नमुद केले आहे. या देयकाची रक्कम रु.583797 पैकी रक्कम रु.219999/- चे प्रदान दि.15/06/2013 रोजी, रक्कम रु.90000/- चे प्रदान दि.27/10/2013 रोजी, रक्कम रु.68450 चे प्रदान दि.10/01/2014 रोजी व उर्वरित रक्कम रु.205348 चे प्रदान ठेकेदारास प्रमाणक क्र.6949 ने दि.26/03/2014 रोजी केले आहे.
या कामाची नस्ती, देयक मोजमाप पुस्तकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.120 दि. 27/06/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.
1) सन 2012 चा गणेशोत्सव दि.19/09/2012 रोजी असल्याने रस्त्यातील खड्डे भरण्याचे काम गणेशोत्सवापुर्वी करणे आवश्यक असुन निविदा मागवुन काम केल्यास विलंब लागणार असल्याने सदरचे काम मजुर सहकारी सोसायटीकडुन विनानिविदा करुन घेण्याची शिफारस बांधकाम विभागाने दि.14/09/2012 चे टिपणीने केली आहे. मजुर सहकारी सोसायटीस काम वाटप करुन महासभेने मंजुरी दि.08/11/2012 रोजी दिली आहे व ठेकेदारास कामाचा कार्यादेश दि.21/01/2013 रोजी म्हणजे 1 महिने 13 दिवस विलंबाने दिला आहे. काम तातडीने करण्याची आवश्यकता असल्याने काम विनानिविदा मजुर सोसायटी कडुन करुन घेण्याचा प्रस्ताव बांधकाम विभागाने ठेवुन त्यास महासभेची मंजुरी घेणे, कामाची वर्क ऑर्डर देणे या सर्व प्रक्रीयेमध्ये 4 महिन्याचा दिनावधी लागल्याने काम विनानिविदा करण्याची निकड दिसुन येत नाही.
2) सदरचे काम गणेशोत्सव मिरवणुकीपुर्वी तात्काळ करणे आवश्यक असल्याने विनानिविदा करण्याबाबतचा प्रस्ताव बांधकाम विभागाने दि.14/09/2012 रोजी केला असुन सर्व प्रक्रीया पार पाडुन कामाची वर्क ऑर्डर दि.21/01/2013 रोजी दिली आहे. या सर्व प्रक्रीयेमध्ये 4 महिन्याचा विलंब होवुन काम गणेशोत्सव झाल्यानंतर करण्यात आले आहे. गणेशोत्सवाचा कालावधी दि.19/09/2012 ते दिनांक 29/09/2012 अखेर असून गणेशोत्सव झाल्यानंतर 04 महिने विलंबाने म्हणजेच दि.08/02/2013 रोजी पुर्ण करण्यात आले आहे. या या सर्व विलंबावरुन ज्या हेतुने काम विनानिविदा तातडीने करण्याचे योजन्यात आले होते तो हेतु साध्य झाला नसलेचे स्पष्ट होते. सदरचे काम विना निविदा केल्याने जास्तीतजास्त ठेकेदारांना निविदा स्पर्धेत भाग घेता आला नसल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसल्याचे दिसुन येते.
3) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड, प्रकरण 5, संविदा खंड 2(2)

अन्वये स्थायी समितीला तिच्या कार्यवृत्तात कारणे नमुद करुन एखादे काम निविदा न मागविता करण्याबाबत तसेच त्या कामाची संविदा करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करण्याचे अधिकार आहेत. परंतु या ठिकाणी काम तातडीने करणे आवश्यक असल्याने विना निविदा करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने महासभेकडे पाठविला आहे. तसेच सदरचे काम चार महिने विलंबाने केलेने अधिनियम 1949 चे अनुसूची ड, प्रकरण 5, संविदा खंड 2(2) मधील तरतुदीचा गैरवापर झाल असल्याचे स्पष्ट होते.

4) या कामाच्या देयकाची तपासणी केली असता बाब क्र.02 ने एकुण 1318 घ.मी. हार्ड मुरुम पुरविण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/ 1009/पी.के.-309/ख (3) दि.11/02/2010 नुसार DSR तयार करताना बांधकामाच्या ज्या बाबीमध्ये गौण खनिजाचा समावेश आहे त्याबाबींचे दर ठरविताना त्यामध्ये रॉयल्टी रक्कमेचा समावेश केला असल्याने कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रॉयल्टी रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे. रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला गौण खनिजाच्या रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 1318 घ.मी. X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.93143 /- रॉयल्टी रक्कम ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावी.

वसुलपात्र रक्कम :- रॉयल्टी रक्कम रु. 93143/-

आक्षेपाधिन रक्कम :- उर्वरित रक्कम रु.490654/-

DATSBKM7201 (Ref No : 120)

## *95 वॉर्ड क्र.25 मधील हरीओम नगर मंदीर जवळ आर.सी.सी.कमान बांधणे हे काम नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन केलेने झालेल्या अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 239860.00/-

***महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन घ्यावयाच्या कामाबाबतची मार्गदर्शक तत्वे नगर विकास विभाग परिपत्रक क्र.एएमसी 14200/2264/ प्रक्र.144/नवि-24 दि. 26 फेब्रुवारी 2001 ने विहित केली आहेत. राज्यातील महानगरपालिकामध्ये प्रत्येक नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणुन महानगरपालिका***



DRAFT

***अंदाजपत्रकामध्ये करण्यात येत असलेल्या तरतुदीचा विनियोग योग्य अशा नागरी सुविधावर व्हावा यास्तव या निधीमधुन कोणती कामे घेण्यात यावीत व कोणती कामे घेण्यात येवु नयेत याचा उल्लेख परिपत्रकाच्या सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र अ व ब मध्ये करण्यात आला आहे. परिपत्रकामधील प्रपत्र अ मध्ये नमुद केलेली कामेच स्वेच्छा निधीमधुन घेणे आवश्यक असुन या कामामधुन कोणती कामे आपल्या स्वेच्छानिधीमधुन घेण्यात यावीत हे ठरविण्याचा स्वेच्छानिर्णय संबंधित नगरसेवकाचा असेल तसेच अशा कामाची अंदाजित किंमत दोन लाखापेक्षा नसणे आवश्यक आहे. प्रपत्र अ मध्ये एकुण 34 कामांचा समावेश असुन या कामांच्या यादीचे अवलोकन केले असता त्यामध्ये सदर केलेल्या कमानीच्या कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन नियमबाह्यपणे कमानीचे काम करण्यात आलेने कमानीच्या कामावर खर्च करण्यात आलेली रक्कम रु.239860/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.***

DRAFT

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.1 च्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.25 मधील हरीओम मंदीर जवळ आर.सी.सी.कमान बांधणेचे काम करणेबाबत 2012-13 च्या अंदाज पत्रकामध्ये नावानिशी तरतुद केली असुन सदरचे काम करण्याबाबत उपमहापौर श्री.युवराज सतीश बावडेकर यांनी मागणी केल्याने या कामाच्या ठिकाणची पाहणी करण्यात येवुन सार्वजनिक बांधकाम विभागा कडील दरसूची 2012-13 नुसार रक्कम रु.2405200/- चे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शहर अभियंता यांची जा क्र.207 दि.11/07/2012 ने तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन काम करण्याची टिपणी शहर अभियंता यांनी आयुक्ताकडे दि.04/07/2012 ने सादर केली असुन आयुक्त यांची या टिपणीस दि.25/07/2012 रोजी मान्यता झाली आहे.

या कामाची जाहिर निविदा सुचना क्र.7 /2012-13 अन्वये या कामाची निविदा दि.07/08/2012 रोजीच्या दै. अग्रदुत या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली असुन सदर कामास अल्प प्रतिसाद मिळाल्याने दि.31/08/2012 अखेर पहिली मुदतवाढ देणेत आली होती. सदर निविदा दि.10/10/2012 रोजी उघडण्यात आली असुन त्यामध्ये 1)श्री.एम.जी.मुश्रीफ (12 टक्के जादा), 2)श्री.एस.एस. मुश्रीफ (20 टक्के जादा), श्री.जे.एस.शेख (20.2 टक्के जादा) या दराने एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. श्री.एम.जी.मुश्रीफ यांची सर्वात कमीची निविदा 12 टक्के जादा दराची असुन दर कमी करण्यासाठी ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्याने दि.21/10/2012 च्या पत्राने अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

मा.आयुक्त निर्णय क्रमांक 820/2012-13 दि.16/01/2013 अन्वये अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस मंजुरी देण्यात आली आहे.

या कामाच्या निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी ठेकेदारास दि.26/01/2013 रोजी दिली असुन ठेकेदाराने या कामाचे करारपत्र रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि. 29/01/2013 रोजी केले आहे.

या कामाची वर्क ऑर्डर शहर अभियंता यांनी ठेकेदारास क्रमनपा/सा/बांधावि/1142/ सार्व.बांधकाम विभाग दि. 06/02/ 2013 रोजीच्या पत्राने दिली असुन काम पुर्ण करण्याची मुदत 60 दिवस देण्यात आली आहे.

लेखाशीर्ष :- B 1836 , उपमहापौर निधी.

काम सुरु :- दि.06/02/2013 काम पुर्ण :- दि.25/02/2013

मोजमाप पुस्तक क्र. 17, पृष्ठ क्र. 14 ते 15.

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक, देयक व प्रमाणकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र. 124 दि.14/07/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.

या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) या कामाचे रक्कम रु.239860 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे आवक क्र. 8840 ने दि.26/02/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम रु. 239860/- पैकी रु.44967 /- चे प्रदान दि. 26/10/2013 रोजी, रक्कम रु.60000 /- चे प्रदान दि.10/01/2014 रोजी व उर्वरित रक्कम रु.134893/- चे प्रदान प्रमाणक क्र.6953 ने दि.26/03/ 2014 रोजी केले आहे. या एकाच देयकाचे प्रदान तीन टप्प्यामध्ये विभागनी करुन झेरॉक्स प्रतीवर करण्यात आले आहे. देयकाची रक्कम एकाच प्रमाणकाने का आदा करण्यात आली नाही याचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.124 दि.14/07/2016 ने मागणी करुनही केलेला नाही.

2)नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे प्रकरण 13 परिशिष्ठ एक भाग अ सर्वसाधारण वित्तिय तत्वे (1) नुसार अर्थसंकल्पात वेगवेगळी उपशीर्षे आणि बाबी यामध्ये अनुदानाचे केलेले वाटप हे संबंधित अनुदान कोणत्या उद्दिष्टाकरीता दिले आहे ह्याचे निदर्शक आहे. मागील दायित्वासह सर्व खर्चाचा अनुदानामध्ये अंतर्भाव असल्याने ते 31 मार्चपर्यंत परिणामकरित्या अंमलात राहतील व त्यानंतर खर्च न केलेली अनुदानातील शिल्लक व्यपगत होईल असे या परिशिष्ठामधे नमुद केले आहे. सदरचे काम 2012-13 च्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार करण्यात आले आहे. परंतु या कामाचे देयक आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये आदा केले आहे. देयक आदा करताना 2013-14 च्या अर्थसंकल्पामध्ये या कामासाठी तरतुद करुन ते आदा करणे आवश्यक आहे. परंतु या देयकावर मागील वर्षाचे लेखाशिर्ष नमुद असल्याने व्यपगत झालेल्या मागील वर्षाच्या अनुदानामधुन या कामाचा खर्च कोणत्या नियमाने करण्यात आला आहे.

2) या कामामध्ये करण्यात यावयाच्या बाब क्र. 2 Providing & laying in situ Cement Concret M 20 एकुण परिमाण 7.65 घ.मी. X दर रु.4386.35/घ.मी., बाब क्र.3 Providing & casting in situ Cement Concret M 20 for RCC concrete Column एकुण परिमाण 9.11 घ.मी. X दर रु.5842.98/घ.मी., बाब क्र.3 Providing & casting in situ Cement Concret M 20 for RCC concrete Beams & Lintels एकुण परिमाण 2.34 घ.मी. X दर रु.6007.05/ घ.मी. या बाबींचे दर सन 2012-13 ची दरसूची वापरुन दरपृथ:करणाने ठरविल्याचे कामाच्या प्राकलनामध्ये नमुद आहे.

DRAFT

परंतु सोबत या बाबींची दरपृथ:करणे जोडली नसल्याने घेतलेले दर बरोबर असल्याची खात्री करता आलेली नाही.

3) महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन घ्यावयाच्या कामाबाबतची मार्गदर्शक तत्वे नगर विकास विभाग परिपत्रक क्र.एएमसी 14200/2264/ प्रक्र.144/नवि-24 दि.26 फेब्रुवारी 2001 ने विहित केली आहेत. राज्यातील महानगरपालिकामध्ये प्रत्येक नगरसेवकांस नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणुन महानगरपालिका अंदाजपत्रकामध्ये करण्यात येत असलेल्या तरतुदीचा विनियोग योग्य अशा नागरी सुविधावर व्हावा यास्तव या निधीमधुन कोणती कामे घेण्यात यावीत व कोणती कामे घेण्यात येवु नयेत याचा उल्लेख परिपत्रकाच्या सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र अ व ब मध्ये करण्यात आला आहे. परिपत्रकामधील प्रपत्र अ मध्ये नमुद केलेली कामेच स्वेच्छा निधीमधुन घेणे आवश्यक असुन या कामामधुन कोणती कामे आपल्या स्वेच्छानिधीमधुन घेण्यात यावीत हे ठरविण्याचा स्वेच्छानिर्णय संबंधित नगरसेवकाचा असेल तसेच अशा कामाची अंदाजित किंमत दोन लाखापेक्षा जास्त नसणे आवश्यक आहे. प्रपत्र अ मध्ये एकुण 34 कामांचा समावेश असुन या कामांच्या यादीचे अवलोकन केले असता त्यामध्ये सदर केलेल्या कमानीच्या कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन नियमबाह्यपणे कमानीचे काम करण्यात आलेचे स्पष्ट होते.

4) या परिपत्रकामध्ये दोन लाखापेक्षा जास्त किमतीचे काम नगरसेवक स्वेच्छानिधीमधुन करता येत नसल्याचे नमुद आहे. परंतु या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.239860/- चे करण्यात येवुन त्यास प्रशासनाने मान्यता दिली आहे व त्याप्रमाणे काम करण्यात आलेले आहे. शासन परिपत्रकानुसार रु. 2 लाखापेक्षा अधिक किमतीचे काम स्वेच्छा निधीमधुन करता येत नसताही सदरचे जादा किमतीचे कामावर खर्च करण्यात आला आहे.

आक्षेपाधिन रक्कम :- रु.239860 /-

DATSBKM7201 (Ref No : 124)

## *99 महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची नोटीस भरपुर खप असलेल्या स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिली नसलेबाबत तसेच महासभा क्र.01 ते क्र. 05 चे इतिवृत्त नोंदवहीमध्ये लिहिले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : नगरसचिव मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| ***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड प्रकरण 2 महानगरपालिकेचे कामकाज मधील नियम 1.*** |
|---|



DRAFT

***महानगरपालिकेच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदीमधील (आय) नुसार सभेच्या प्रत्येक नाटिशीत, अशी सभा ज्या वेळी व ज्या ठिकाणी भरवायची असेल ती वेळ व ते ठिकाण आणि कलम 44 खालील प्रश्नाखेरीज अशा सभेत चालवावयाचे कामकाज निर्दिष्ट केले पाहिजे व आणि अशी नोटीस महानगरपालिका सचिवाने भरपूर खप असलेल्या स्थानिक वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे देणे आवश्यक असता ती वेगवेगळया खप नसलेल्या वर्तमानपत्रामध्ये दिली आहे. त्यामुळे महासभेच्या विषयपत्राच्या नोटीशींना व्यापक प्रसिध्दी मिळाली नसल्याचे स्पष्ट होते. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड, प्रकरण 2, महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड(1)(के) मधील तरतुदीनुसार नगरसेवकांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार ऐनवेळचे ठराव महासभेने सर्वानुमते निर्णय घेवून ठराव करुन मंजुर केलेले आहेत. परंतु याबाबतचे इतिवृत्त, इतिवृत्त नोंदवहीमध्ये लिहिलेले नाही. तसेच सदरचे ठराव मनपाच्या धोरणात्मक व आर्थिक बाबीशी निगडीत असुन या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती लेखापरीक्षणास दिलेली नाही.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 48 अन्वये नगरपालिका सचिव हा महानगरपा लिका व स्थायी समितीचा सचीव आहे. या अधिनियमान्वये किंवा तदनुसार पार पाडण्याविषयी त्यास निदेश देण्यात येईल अशी कर्तव्य आणि महानगरपालिका व स्थायी समितीमधील व त्यांच्या संबंधीची जी कर्तव्य पार पाडण्याविषयी अनुक्रमे महानगरपालिकेकडून व स्थायी समितीकडून त्यास फ र्माविण्यात येईल अशी अन्य कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे . तसेच अधिनियमाचे कलम 48 (ब)(एक) )( दोन) अन्वये महानगरपालिकेच्या व स्थायी समितीच्या कामाकाजा संबंधी सर्व कागदपत्रे व दस्तऐवज नगरसचिव विभागाने अभिरक्षेत ठेवणे आवश्यक आहे . सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानग रपालिकेच्या नगरसचिव विभागा मार्फत महापौरांच्या मान्यतेने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा अजेंडा तयार करणे , सर्वसाधारण सभेचा दिनांक, सभेची वेळ, ठिकाण, सभेमध्ये घेतले जाणारे विषय याबाबतची नोटीस वर्तमानपत्रामध्ये देणे , महानगरपालिका व स्थायी समितीच्या सभांचे नियमन करणे, सभांचे इतिवृत्त व कार्यवृत्त पुस्तक लिहिणे इत्यादी कामे केली जातात . आर्थिक वर्ष 2013-14 च्या कार्यवृत्तांत नोंदवहीची तपासणी केली असता महासभेच्या एकुण 08 सर्वसाधारण सभा झाल्या असुन एकुण 299 ठराव पारित करण्यात आले आहेत. तसेच स्थायी समितीच्या एकुण 15 सभा झाल्या असुन या सभामध्ये एकुण 104 ठराव पारीत करण्यात आले आहेत.

नगरसचिव विभागाने 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये वर्तमानपत्रामध्ये सर्वसाधारण सभेच्या दिलेल्या जाहिर नोटीसा,सर्वसाधारण सभा व स्थायी समितीच्या ठरावाची कार्यवृत्तांत व इतिवृत्त नोंदवही यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.126 दि.15/07/2016 रोजी निर्गमित केला असुन नगरसचिव विभागाने त्याचे अनुपालन दि.29/07/2016 रोजी सादर केले आहे. सदरचे अनुपालन तपासुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड प्रकरण 2 महानगरपालिकेचे कामकाज मधील नियम 1. महानगरपालिकेच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदीमधील (आय) नुसार सभेच्या प्रत्येक नाटिशीत, अशी सभा ज्या वेळी व ज्या ठिकाणी भरवायची असेल ती वेळ व ते ठिकाण आणि कलम 44 खालील प्रश्नाखेरीज अशा सभेत चालवावयाचे कामकाज निर्दिष्ट केले पाहिजे व अशी नोटीस महानगरपालिका सचिवाने भरपूर खप असलेल्या निदान एका स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरातीद्वारे दिली पाहिजे असे नमुद आहे. या



DRAFT

तरतुदीनुसार नगरसचिव विभागाने आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये सर्वसाधारण सभेच्या नोटीसा खालील वर्तमानपत्रामध्ये दिल्या आहेत. परंतु यापैकी दै.सत्यदूत,दै.पुण्यनगरी, दै.अग्रदुत, दै.नवसंदेश व दै .प्रतिध्वनी ही वर्तमानपत्रे कमी खपाची असल्याने महासभेमध्ये चालवावयाच्या कामकाजाची माहिती जास्तीत जास्त नागरीकापर्यंत पोहोचली नसल्याचे दिसुन येते.

| अ.क्र. | महासभा क्रमांक व दिनांक | वर्तमानपत्राचे नाव व दिनांक |
|---|---|---|
| 1 | मनपा विशेष सभा क्र.01,दि.06/04/13 | दै.सत्यदूत, दि.03/04/2013 |
| 2 | मनपा सभा क्र.01, दि.20/04/2013 | दै.तरुण भारत दि. 13/04/2013 |
| 3 | मनपा सभा क्र.02, दि.13/05/2013 च्या सभेचा कार्यक्रम व पुरवणी कार्यक्रम पत्रिका क्र.02 दि.10/05/2013 | दै.पुण्य नगरी , दि.04/05/2013 व दि.11/05/2013 |
| 4 | मनपा विशेष सभा क्र.02,दि.06/06/13 | दै.अग्रदुत दि.02/06/2013 |
| 5 | मनपा सभा क्र.03, दि.20/07/2013 च्या सभेचा कार्यक्रम व पुरवणी कार्यक्रम पत्रिका क्र.03 दि.17/02/2013 | दै.केसरी दि.13/07/2013 व दै.केसरी दि.18/07/2013 |
| 6 | मनपा सभा क्र.05, दि.19/10/2013 च्या सभेचा कार्यक्रम व पुरवणी कार्यक्रम पत्रिका क्र.05 दि.16/10/2013 | दै.लोकमत दि .12/10/2013 व दै.लोकमत दि.16/10/2013 |
| 7 | मनपा सभा क्र.06, दि.16/11/2013 च्या सभेचा कार्यक्रम व पुरवणी कार्यक्रम पत्रिका क्र.06 दि.13/11/2013 | दै.नवसंदेश दि .08/11/2013 व दै . नवसंदेश दि.13/11/2013 |
| 08 | मनपा सभा क्र.07, दि.20/12/2013 च्या सभेचा कार्यक्रम व पुरवणी कार्यक्रम पत्रिका क्र.07 दि.19/12/2013 | दै.प्रतीध्वनी , दि.12/12/2013 व दै . नवसंदेश दि.19/11/2013 |
| 09 | मनपा सभा क्र.08, दि.15/02/2014 च्या सभेचा कार्यक्रम व पुरवणी कार्यक्रम पत्रिका क्र.07 दि.19/12/2013 | दै.पुढारी, दि. 08/02/2014 व दै .पुढारी दि.13/02/2014 |

अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये उपरोक्त विववरणपत्रामध्ये नमुद केलेली वर्तमानपत्रे ही जास्त खपाची असलेबाबत नमुद केले आहे. परंतु सदरचे वर्तमानपत्रास नगरसचिव विभागाने रोटेशन नुसार महासभेच्या विषयपत्राची नोटीस दिल्याचे दिसून येते . त्यामुळे जास्त खपाच्या वर्तमानपत्रामध्ये विषयपत्राची नोटीस दिली नसल्यामुळे सर्वसाधारण सभेच्या विषयपत्राच्या नोटीशीस व्यापक प्रसिध्दी मिळाली नसल्याचे दिसून येते.

2) आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये महासभेच्या एकुण 8 सभा झाल्या असुन महानगरपालिकेने महासभेच्या कार्यवृत्तांचे पुस्तक नमुना क नियम 4 व 39 प्रमाणे ठेवले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड ,प्रकरण 2, महानगरपालिकेचे कामकाज, खंड(1)(न) नुसार नगरपालिका सचिवाने, प्रत्येक सभेस उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांची नावे आणि अशा सभेतील कामकाज या संबंधीचे कार्यवृत्त सभेच्या

DRAFT

दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर तयार केले पाहिजे आणि ते या प्रयोजनासाठी तरतुद करण्यात आलेल्या पुस्तकात ठेवले पाहिजे आणि त्यावर नंतरच्या सभेत, अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने स्वाक्षरी केली पाहिजे असे नमुद आहे. नगरसचिव विभागाने इतिवृत्त नोंदवही नियम 5 व 39 प्रमाणे मिनिट बुकाचा नमुना क भाग या नमुन्यामध्ये ठेवली असुन महासभा क्र.06 ते महासभा क्र. 08 या सभेतील कामकाजामध्ये प्रत्येक नगरसेवकाने घेतलेला सहभाग व त्यांनी मांडलेले म्हणने लिखित स्वरुपात इतिवृत्त नोंदवहीमध्ये पृष्ठ क्र.01 ते 28 वर नोंदविले आहे. परंतु महासभा क्र.01 ते महासभा क्र. 05 या सभांचे इतिवृत्त लिहिण्यात आलेले नाही.

3) दि.13/05/2013 रोजी झालेल्या महासभा क्र.02 मध्ये खालील विषय मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 2, महानगरपालिकेचे कामकाजमधील खंड 1 (क) अन्वये नगरसेवकांनी दिलेले प्रस्ताव ऐनवेळच्या विषय म्हणुन दाखल करुन सभेने सर्वानुमते मंजुरीचा निर्णय घेतला आहे. या बाबत खालील उदाहरणे नमुन्या दाखल देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | विषय | ठरावाचा अनुक्रमांक |
|---|---|---|
| 1 | सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आरक्षित जमिनीवरील झालेली बांधकामे नियमित करणेचा नगरसेवक श्री .हणुमंत बंडुजी पवार यांनी दिलेला प्रस्ताव मान्य करुन सदर नागरीकांना गुंठेवारी प्रमाणपत्र देणेस सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. | 144 |
| 2 | निलंबित कर्मचा-यांचे बाजुने लागलेल्या न्यायालयीन दाव्याबाबत अपिल न करता त्यांना सेवेमध्ये समाविष्ठ करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव नगरसेवक श्री.युवराज बावडेकर यांनी दिला असुन तो सर्वानुमते मंजुर करण्यात आला आहे. | 145 |
| 3 | सांगली शहर हद्दीमधील स.नं. 261/2ब,261/1 क ही जागा महानगर पालिकेने महासभा ठराव क्र.340 दि.20/10/1999 व महासभा ठराव क्र.95 दि.19/07/2001 अन्वये मनपाच्या अटी व शर्तीनुसार राजीव एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यात दिली आहे. सदर जागेच्या सिटी सर्व्हे उता-यावरील मुळ जागा मालकाची नावे कमी करुन मनपाचे नाव लावुन सदर शाळेच्या बांधकामास परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव नगरसेवक श्री.मुन्ना कुरणे यांनी दिला असुन तो सर्वानुमते मंजुर केला आहे. | 146 |
| 4 | मारुती चौकामध्ये बांधण्यात आलेल्या गाळयांचा कब्जा खोकीधारकांना देण्याबाबतचा प्रस्ताव नगरसेवक श्री .युवराज बावडेकर यांनी दिला असुन तो सर्वानुमते मंजुर केला आहे. | 147 |
| 5 | वॉर्ड क्र .45 मधील प्लॉट क्र .83/7 व 83/2 वरील प्रॉपर्टी उता -यावरील रस्त्याची नोंद करुन मुळ मालकाच्या नावाची त्यावर नोंद करणेबाबतचा प्रस्ताव नगरसेवक श्री .आनंदा मारुती देवमाने यांनी दिला असुन तो सर्वानुमते मंजुर केला आहे. | 148 |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड ,प्रकरण 2, महानगरपालिकेचे कामकाज मधील

खंड(1)(के) अन्वये तातडीच्या प्रसंगी मागणीवरुन बोलावलेल्या सभेव्यतिरिक्त अन्य सभेत किंवा कोणत्याही सभेतील अर्थसंकल्पीय अंदाजावरील चर्चेव्यतिरिक्त अन्य चर्चेच्या वेळी, खंड (आय) अन्वये प्रसिध्द केलेल्या नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कामकाजाखेरीज आणि कलम 44 अन्वये विचारण्यात आलेल्या कोणत्याही प्रश्नाखेरीज किंवा स्थायी समितीला किंवा आयुक्ताला सभेपुढे आणणे इष्ट वाटेल असे उक्त नोटीशीत विनिर्दिष्ट न केलेल्या तातडीच्या कामकाजाव्यतिरिक्त अन्य कोणतेही कामकाज कोणत्याही सभेत चालवता कामा नये आणि जो कोणताही मुळ प्रस्ताव उक्त नोटीशीत किंवा खंड (ज) अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या पुरक घोषणेत ,तशी घोषणा असल्यास ,निर्दिष्ट करण्यात आला नसेल,किंवा स्थायी समितीने, परिवहन समितीने किंवा आयुक्ताने सभेपुढे आणलेल्या कोणत्याही तातडीच्या कामकाजाच्या संदर्भात वरील प्राधिकरणाच्या शिफारशीच्या पुष्टयर्थ नसेल असा मुळ प्रस्ताव मांडता कामा नये किंवा त्यावर चर्चा करता कामा नये. उपरोक्त प्रस्तावांचा समावेश मुळ नोटीशीत तसेच खंड (ज) अन्वये प्रसिध्द केलेल्या नोटीशीत नाही तसेच सदर प्रस्ताव तातडीचे असलेबाबत स्थायी समिती व आयुक्तांनी सभेपुढे ठेवण्याची शिफारस केली नसतानाही नगरसेवकांनी मांडलेल्या वरील प्रस्तावावर महासभेने कोणत्या नियमाने ठराव करुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश प्रशासनास दिले आहेत याचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.126 ने विचारण्यात आला असून नगरसचिव विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड ,प्रकरण 2, महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड(1)(के) मधील तरतुदीनुसार नगरसेवकांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार महासभेने सर्वानुमते निर्णय घेवून महासभेने ठराव मंजुर केलेले आहेत व महासभेने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करणेची जबाबदारी प्रशासनावर असल्याने त्या ठरावाबाबत योग्य ती कार्यवाही करणेचे आदेश प्रशासनास दिले जात असलेचे नमुद केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड ,प्रकरण 2, महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड(1)(के) मधील परंतुकानुसार कोणत्याही सभेपुढे, वर सांगितल्याप्रमाणे कोणतेही तातडीचे कामकाज आणण्यास अशा सभेत उपस्थित असलेल्या पालिका सदस्यापैकी निदान तीन चतुर्थांश पालिका सदस्यांनी असे पालिका सदस्य हे, पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक चतुर्थांशापेक्षा कमी असता कामा नयेत. अनुमती दिली नसेल तर कोणतेही कामकाज अशा सभेपुढे आणता येणार नसलेचे नमुद आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या उत्तरानुसार सर्वानुमते ऐनवेळचे विषय उपस्थित करण्यास परवानगी दिलेल्या नगासेवकाची नावे व त्यांनी याविषयी मांडलेले म्हणने इतिवृत्त नोंदवही मध्ये लिहिले नसल्याने सदर ऐनवेळच्या विषयावर सर्वानुमते निर्णय घेतलेची लेखापरीक्षणाची खात्री पटलेली नाही. तसेच वरील ऐनवेळचे ठराव धोरणात्मक व महानगरपालिकेच्या आर्थिक बाबीशी निगडीत असुन या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती लेखापरीक्षणास दिलेली नाही.

DATSBKM7201 (Ref No : 126)

## *103 वार्षिक प्रशासन अहवाल व वार्षिक लेखे लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*



DRAFT

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम 94 (1) (2) (3) नुसार आयुक्तांनी प्रत्येक एप्रिल महिन्याचे पहिल्या तारखेनंतर मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमाच्या प्रशासना व्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेचे अन्य प्रशासना संबंधी तपशिलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीचा खाती जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रक्कमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणाऱ्या विवरणपत्रासहीत तयार करून स्थायी समितीस सादर करणे आवश्यक असता 2013-14 या आर्थिक वर्षाचा प्रशासनासंबंधीचा तसेच वित्तिय अहवाल मार्च 2016 अखेर स्थायी समितीस सादर केलेला नाही.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम 94 (1) (2) (3) नुसार आयुक्तांनी प्रत्येक एप्रिल महिन्याचे पहिल्या तारखेनंतर मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमाच्या प्रशासना व्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेचे अन्य प्रशासना संबंधी तपशिलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीचा खाती जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रक्कमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणाऱ्या विवरणपत्रासहीत तयार करून स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. सदर अहवालांची प्रत आदेशाची प्रत लेखापरिक्षणास सादर करणेबाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.04, दि.01/09/2015 रोजी आयुक्त व लेखाविभागास निर्गमित करण्यात आला असुन लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि.03/09/2015 रोजी सादर केले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये 2013-14 या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे तयार करुन स्थायी समितीस सादर करण्याची कार्यवाही चालु असल्याचे नमुद आहे.

या बाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)लेखा विभागाने मागील वर्षाच्या नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रक्कमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणाऱ्या विवरणपत्रासहीत तयार करून प्रत्येक एप्रिल महिन्याचे पहिल्या तारखेनंतर स्थायी समितीस सादर करणे आवश्यक असता मार्च 2016 अखेर 2013 -14 या आर्थिक वर्षाचा वित्तिय अहवाल स्थायी समितीस सादर केलेला नसल्याने महानगरपालिकेची आर्थिक स्थितीबाबतची माहिती लेखापरीक्षणास समजुन आली नाही.

### *104 स्थायी समीतीने लेखे ठेवणेसाठीचे निर्देशित केलेले विहित नमुने लेखा विभागाने लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत तसेच उपर्जित द्विनोंद पध्द्तीने लेखे व ताळेबंद ठेवला नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दि.6/7/2005 अन्वये 2005-06 या आर्थिक वर्षापासुन महनगरपालिकांनी उपर्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे आवश्यक असता त्याप्रमाणे लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.तसेच महानगरपालिकेने ठेवलेल्या लेख्यांच्या विहित नमुन्यांना स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 93 अन्वये मुंबई प्रांतिक शिक्षण अधिनियम 1947 च्या कलम 361 च्या तरतुदींच्या व तद्न्वये केलेल्या नियमांच्या अधीन राहून महानगरपालिकेच्या जमा व खर्चाचे लेखे स्थायी समिती वेळोवेळी निर्देश देईल त्या रितीने व नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. तसेच (परंतु असे कि एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विनियोग कर्ज निधी आणि जल व मलप्रवाह निधी यांचे लेखे स्थायी समितीने अन्यथा निर्देश दिला नसेल तर उपार्जित तत्वावर ठेवणे आवश्यक आहे).

DRAFT

महानगरपालिकेच्या लेखा विभागाने ठेवलेल्या लेख्यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्रमांक.06 दि.02/09/2015 रोजी निर्गमित केला असुन त्याचे अनुपालन लेखा विभागाने सादर केलेले नाही. याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)लेखा विभागांचे लेख्यांचे तपासणी करीत असता सदरचे लेखे कोणत्या नियमान्वये ठेवण्यात आलेले आहेत तसेच लेख्यांचे विहित नमुन्यास स्थायी समितीची मान्यता घेतलेबाबतच्या ठरावाच्या प्रतीची मागणी अर्धसमास ज्ञापन क्र.06, दि.02/09/2015 अन्वये लेखा विभागाकडे करण्यात आली होती. परंतु लेखा विभागाने अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन सादर केले नसल्याने सध्याच्या महानगर पालिकेने ठेवलेल्या लेख्यांच्या नमुन्यास स्थायी समितीची मान्यता घेतले आहे किंवा नाही या बाबत लेखापरीक्षाणी खात्री झालेली नाही.

2)शासन निर्णय क्र. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दि. 6/7/2005 अन्वये व भारताचे

नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेमधील (National Municipal Accounts Manual) प्रकरण क्र. 02 ते 05 मधील तरतुदीनुसार 2005-06 या आर्थिक वर्षापासुन महनगरपालिकांनी उपर्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे क्रमप्राप्त आहे. परंतु आर्थिक वर्ष 2005-06 ते 2013-14 अखेर दुहेरी पध्दतीने लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.

3) मुंबई प्रांतिक महानगरपालिकस अधिनियम 1949 चे कलम 93 अन्वये लेख्यांची रित व नमूने ठरविण्याचे अधिकार स्थायी समितीस असल्याने प्रशासनाने सदर शासन निर्णय स्थायी समितीच्या निदर्शनास आणून देवून स्थायी समितीचे निर्देश घेणे आवश्यक असता सदर शासन निर्णय प्रशासनाने स्थायी समितीच्या निदर्शनास आणल्याची नस्ती लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 06)

## *106 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3)(क) खाली करण्यात आलेल्या 17 कामांचे दप्तर लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने रक्कम रु.7916484/- आक्षेपाधिन ठेवण्यात आलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : बांधकाम स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 7916484.00/-

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3)(क) खाली 2013-14 या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या एकुण 17 कामांचे दप्तर लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने या कामावर खर्च झालेल्या रक्कम रु.7916484/- चे लेखापरीक्षण करता आले नसल्याने सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3) (क) अन्वये आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या एखाद्या नगरपालिका प्राधिका-याच्या किंवा राज्य शासनाच्या मंजुरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही आयुक्त यांना करता येते. परंतु आयुक्ताने त्याने केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे व या कामासाठी होणारा संभाव्य खर्च या विषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याकडे ताबडतोब पाठविणे आवश्यक आहे.

DRAFT

या अधिनियमाचे कलम 67(3)(क) खाली 2013-14 या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या एकुण 19 कामांची यादी (**परिशिष्ठ क्र.18**) जोडून सदर कामाच्या मुळ नस्ती, देयके,प्रमाणके, मोजमाप पुस्तके लेखापरीक्षणास सादर करणेबाबत आयुक्त यांना दि.08/07/2016 चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. बांधकाम विभागाने या यादीमधील अ.क्र.10 वरील मनपा सार्व.निवडणुक 2013 प्रभाग समिती क्र.3 मधील मतदान केंद्रावरील दुरुस्ती व मतदान केंद्रापर्यंत जाण्याचा मार्ग तयार करणे, अंदाजपत्रकीय रक्कम रु.2,05,900/- व अ.क्र.15 वरील वानलेसवाडी नाल्याचे ठिकाणी आर.सी.सी.पाईप लाईन टाकणे, प्रभाग समिती क्र.03 , अंदाजपत्रकीय रक्कम रु.662800/- अशा दोन कामांचे अभिलेखे सादर केली असुन त्याचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. परंतु या यादीमधील अन्य कामांचे दप्तर संधी देवुनही सादर केले नसल्याने या कामावरील खर्चाचे लेखापरीक्षण करता आले नसल्याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.133, दि.08/09/2016 अन्वये आयुक्त व मुख्य लेखापरीक्षक यांना कळविण्यात आले असुन त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. या कामांचे दप्तर लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने या कामावरील खर्चाची रक्कम रु.7916484/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATSBKM7201 (Ref No : 133)

DRAFT

# कलम ९ ब खालील आक्षेप

DRAFT

## *1 अनामत नोंदवही व बँक पासबुकमधील ताळमेळ जुळत नसलेने पडलेल्या रु. 2836744/- च्या फरकाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2836744.00/-

***सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील अनामत नोंदवहीची वित्तीय वर्ष 2013-2014 अखेर रोकडवही व बँक पासबुकमध्ये रु. 2836744/- इतक्या रकमेची तफावत आढळुन आली आहे.***

DRAFT

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने अनामत रोकडवही महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 31(1) नुसार नमुना क्र.11 मध्ये ठेवण्यात आली आहे. वित्तीय वर्ष 2013-2014 करीता तपासणी केली असता मार्च 2014 अखेर रोकड वहीत बँक ताळमेळ नोंदविला आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे उणीवा आढळून आल्या आहेत.

1) रोकडवहीतील पृष्ठ क्र.34 वर सुरूवातीची शिल्लक रु.108992553.22/- दाखविण्यात आली आहे. यामध्ये युनियन बँक,मिरज रु.25766771.54/-, युनियन बँक सांगली रु.62158/-, बँक ऑफ महाराष्ट्र रु.54057/-, वसंतदादा शेतकरी सह बँक रु.637056/ या सर्व बँकाच्या बचत खात्यावर ठेवण्यात आलेल्या रक्कमांचा समावेश आहे. तसेच वसंतदादा शेतकरी सह बँक रु.21690000/-, युको बँक रु.31580951/-, सिंडीकेट बँक रु.6446930.25/-,बँक ऑफ इंडिया रु.22741683.43/- अशा या बँकामध्ये मुदतबंद ठेव म्हणून गुंतविण्यात आलेल्या रक्कमांचा समावेश आहे. 31 मार्च 2014 रोजीची रोकडवही नुसार शिल्लक रक्कम रु. 119738031.22/ एवढी आहे. सदर महिन्यातील रोकडवहीची तपासणी केली असता UIDSSMT च्या देयकातून कपात केलेली अनामत रक्कम रु. 2836744/-ची नोंद रोकडवही पृष्ठ क्र.36 अ.क्र.963 व अ.क्र.967 ने दुबार घेतली आहे.

2)रोकडवहीमध्ये 29/03/2014 रोजी रोकडवहीमधील शिल्लक व बँक पासबुक मधील शिल्लक रु. 62356689.31/- यांचा ताळमेळ घेण्यात आला आहे. त्यामध्ये रोकडवहीनुसार शिल्लक रक्कम रु.36585592.54 इतकी आहे व बँकपासबुक प्रमाणे येणारी फरक रक्कम जुळविणेसाठी युनियन बँक पासबुक खाते क्र.424202010502708 या खात्यावर ठेकेदाराकडून बयाणा पोटी जमा झालेली रक्कम रु. 22085353.77/- महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून अनामतीची चलने लेखाशाखेकडे न आल्याने रोकडवहीस जमा घेण्यात आलेली नसल्याची टिप रोकडवहीमध्ये घेतली आहे. तसेच खर्ची पडावयाचे एकूण 102 धनादेशाची रक्कम रु. 828518.00/-, बँक चार्जेस रु. 20481.00/- व आरंभीची शिल्लक रक्कम धरुन एकुण रक्कम रु. 59519945.31 रोकडवहीस ताळमेळ जुळण्यासाठी जमा बाजूस नोंदविण्यात आली आहे. दि. 29/03/2014 रोजीचे युनियन बँक पासबुकची तपासणी केली असता बँकेमध्ये रक्कम रु. 62356689.31/- अशी शिल्लक असल्याचे दिसून येते. त्यामुळे रोकडवही व बँक पासबुक नुसार रु. 2836744/- ची तफावत दिसून येते.

3) ठेकेदारास निविदेची बयाणा रक्कम बँकेमध्ये भरणा करण्यासाठी लेखा विभागाकडून चार प्रतीमध्ये

चलन दिले जाते. ठेकेदाराने बयाणा रक्कम बँकेमध्ये भरल्यानंतर बँकेच्या सही शिक्क्याने एक प्रत बँकेमार्फत ठेकेदारास दिली जाते. एक प्रत बँकेकडे ठेवली जाते व दोन प्रती लेखा शाखेचा शिपाई बँकेमधून लेखा विभागाकडे जमा करतो. यापैकी एक प्रत लेखा शाखा आपलेकडे ठेवते व दुसरी प्रत संबंधित विभागास लेखा विभागाच्या पोहोच रजिस्टरमध्ये नोंद घेवून दिली जाते. संबंधित विभाग त्या चलनाची नोंद त्यांचे विभागाच्या रोकडवहीस घेवून सदर चलन त्यांचे विभागाकडे ठेवते. मक्तेदाराने बयाणा रक्कमेची मागणी ज्या विभागाने निविदा प्रसिध्द केल्या आहेत त्या विभागाकडे केल्यानंतर संबंधित विभाग त्याचे देयक तयार करुन लेखा विभागाकडे पाठवतो व लेखा विभाग त्यानंतर देयकाची रक्कम आदा करतो. परंतु बयाणा रक्कम बँकेमध्ये भरणा केलेली चलने संबंधित विभागांनी लेखा विभागाशी रुजवात घालुन नेली नसल्याने सदर चलनाने भरणा केलेल्या रक्कमाची नोंद लेखा विभागाने त्यांचे अनामत रोकडवहीस केलेली नाहीत. त्यामुळे अनामत रोकडवहीमध्ये बँक पासबुक प्रमाणे जमा झालेल्या रक्कमेपेक्षा रक्कम रु. 22085353.77/- इतकी कमी जमा दिसून येते.

4) सार्वजनिक बांधकाम विभागाने बयाणा रजिस्टर हे महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता नियम क्र.16 (1) व नियम क्र.70 (1) प्रमाणे नमुना क्र.15 मध्ये ठेवण्यात आले आहे. सदर नोंदवही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कनिष्ठ लिपिकामार्फत लिहिली जाते. कनिष्ठ लिपिकांनी दिलेल्या मौखिक माहितीनुसार बँकेमध्ये ठेकेदाराने बयाणा रक्कम भरणा केलेली चलने लेखा विभागाकडून मिळत नसल्याने त्याची नोंद विभागाच्या रजिस्टरमध्ये घेतली नसल्याचे सांगितले आहे. परंतु निविदा प्रक्रीया राबविण्याची जबाबदारी संबंधित विभागाची असल्याने बयाणा रक्कमेची चलने संबंधित विभागाने बँकेमध्ये भरणा करुन त्याची एक प्रत लेखा विभागास देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र. 35 नुसार जमा कारकुनाने संकलित वसुली ठराविक वेळी, रोजच्या रोज अथवा नगरपरिषदेने नियत केलेल्या कालावधीने भरणा करणे आवश्यक आहे. ती भरणा करतेवेळी त्याने सोबत जमापावती पुस्तक,चलान व त्यांचे संकलन पुस्तक आणले अथवा पाठविले पाहिजे. नगरपरिषदेच्या कार्यालयात सदर रक्कम स्वीकार करणा-याकडून त्याची पोचपावती चलनावर व संकलन पुस्तकांतही घेणे आवश्यक आहे. परंतु संबंधित विभागांनी बँकेमध्ये भरणा केलेल्या बयाणा रक्कमेची चलने लेखा विभागाकडे सादर केली नसल्याने लेखा विभागाने या रक्कमांची नोंद रोकडवहीमध्ये घेतली नसल्याचे दिसुन येते.

ठेकेदाराकडून घेतलेल्या बयाणा रक्कमेचा बँकेमध्ये भरणा करणे, भरणा चलनाची प्रत लेखा विभागास देणे, लेखा विभागा बरोबर जमेचा ताळमेळ घेणे ही जबाबदारी निविदा प्रसिध्द करणा-या विभागाची असताना संबंधित विभागांनी बँकेमध्ये भरणा केलेल्या बयाणा जमेची चलने लेखा विभागाकडे जमा केली नसल्याने सदर चलनाने बँकेमध्ये जमा झालेली रक्कम रु. 22085353.77/- ची नोंद लेखाविभागाने रोकडवहीमध्ये घेतलेली नाही. त्यामुळे रोकडवही व बँक पासबुक यांचे शिल्लकेत रक्कम रु. 22085353.77/- चा फरक आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र. 21 दि. 29/09/2015 रोजी निर्गमित केला असून लेखा विभागाने त्याचे अनुपालन दि. 09/10/2015 रोजी सादर केले आहे. सदरील अनुपालन संयुक्तिक नसल्याने रोकडवही व बँक पासबुकमधील फरक रक्कम रु. 2836744/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 21)

## *8 मिरज विभागाकडील मालमत्ता भाडेची थकीत रक्कम वसुल केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : भूमी व मालमत्ता मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*



DRAFT

वसूलपात्र रक्कम रु. 21715269.00/-

***मिरज विभागाकडील मालमत्ता विभागाने भाडे तत्वावरील गाळे, इमारती, खुली जागा, धोबी कट्टे इत्यादीची 2012-2013 अखेरची थकबाकी व 2013-2014 या चालू वर्षाची चालु मागणी वसुलीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 8 अ कलम 81(ब) प्रमाणे (1) नुसार मालमत्तेचे भाडे अथवा कर हे दोन महिने पेक्षा जास्त कालावधीत थकित झाल्यास सदर मालमत्ता नोटीस देवून ताब्यात घेणेची कार्यवाही केली नसल्याने मालमत्ता विभागाची भाड्याची एकुण थकबाकी रक्कम रु. 15747716/- वसुली अभावी प्रलंबित राहीली आहे.***

मिरज मालमत्ता विभागाकडील वित्तीय वर्ष 2013-14 चे मालमत्ता वसुली नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता, खालील नमुद केल्याप्रमाणे मनपाचे भाडे व सेवाकर 2013-14 या आर्थिक वर्षाअखेर थकित आहे. थकबाकी वसुलीसाठी मालमत्ता विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण 8 अ, कलम 81 (ब), प्रमाणे (1) अ (एक) नुसार मालमत्तेचे भाडे अथवा कर हे दोन महिनेपेक्षा जास्त कालावधीपर्यंत थकीत असल्यास अशा सर्व थकबाकीदारांना भाडे जमा करणेबाबत नोटीस देणे आवश्यक होते. तसेच उपरोक्त अधिनियमातील पोट कलम 3 अन्वये जी व्यक्ती उपरोक्त पोटकलम 1 अन्वये दिलेला आदेशाचे पालन करणार नाही अथवा पालन करण्यास नकार देईल त्यांचेकडून सदरची मालमत्ता काढून मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक असताना मालमत्ता विभागाने काहीही कार्यवाही केल्याचे लेखापरीक्षणास दिसून आले नाही. सदरची मालमत्ता विभागाने ताब्यात न घेतल्याने व भाडे वसुल वेळीच न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. मालमत्ता विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 110 नुसार मालमत्तांच्या भाड्याचे मागणी पुस्तक नमुना क्रमांक 81 प्रमाणे ठेवलेले असून सदर मागणी पुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता थकबाकीधारकांचे मिरज विभागातील गाळेधारक, मोकळी जागा, कट्टे व मनपा लाकडी खोकी, खाजगी खोकी यांची भाडे तत्वावरील रक्कम वसुल केलेली नाही. ती पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | मार्केटचे नांव | मार्केट मधील एकुण गाळे | मार्केट मधील थकित रक्कम असलेले गाळे क्रमांक | थकबाकी रुपये | सेवाकर रुपये | एकूण थकबाकी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | लक्ष्मी मार्केट दुकाने | 51 | 2,3,4,6,12,15,16, 17,19,24,25,31, 32,36,39,40,48 | 212342 | 24550 | 236892 |
| 2 | लक्ष्मी मार्केट दुकाने | 46 | 1,2,3,4,8,9,10<br>2,4,6,7,8<br>3<br>4,7,8<br>1,4,5,2 | 84992<br>33567<br>16345<br>17819<br>26416 | 8350<br>5987<br>1583<br>2194<br>2271 | 93342<br>39554<br>17928<br>20013<br>28687 |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पूर्व,पश्चीम, दक्षिण, उत्तर आतील बाजू | | | | | |
| 3 | लक्ष्मी मार्केट पहिला मजला | 4 | 1,2,3,4 | 1068337 | 56309 | 1124646 |
| 4 | लक्ष्मी मार्केट भाजीपाला स्टॉल | 68 | | 105504 | 13005 | 118509 |
| 5 | किसान मार्केट | 14 | 9,10,11,12 | 15223 | 1410 | 16633 |
| 6 | शिवाजी पॅव्हेलियन | 2 | 1,2 | 13027 | 1433 | 14460 |
| 7 | बालगंधर्व नाटय दुकाने | 4 | 1 | 10296 | 1273 | 11569 |
| 8 | हजरत ख्वाजा शॉपिंग सेंटर | 35 | 1,4,12,14,15,16, 17,22,25,32,33, 34,35 | 415594 | 30840 | 446434 |
| 9 | हजरत ख्वाजा शॉपिंग सेंटर पहिला मजला | 4 | 5,6,7,8 | 841836 | 33317 | 875153 |
| 10 | मनपा दवाखाने केबिन | 15 | 2,5,12 | 7381 | 1061 | 8442 |
| 11 | डि टाईप शॉपिंग सेंटर | 24 | 1,2,4,11,12,17, 18,23 | 55251 | 6946 | 62197 |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 12 | गणेश मार्केट दुकाने | 18 | 2,3,8,10 | 56320 | 6775 | 63095 |
| 13 | गणेश मार्केट हॉकर्स स्टॉल | 11 | 1,2,7,11 | 10452 | 1280 | 11732 |
| 14 | गणेश मार्केट पुजा स्टॉल | 43 | 1,2,5,12,13,14, 20,29,31,36,37, 41 | 35329 | 3203 | 38532 |
| 15 | आण्णाबुवा शॉपिंग सेंटर अ बाजु | 30 | 3,4,6,7,8,9,10, 11,12,13,16,17, 18,19,20 | 237091 | 23358 | 260449 |
| 16 | आण्णाबुवा शॉपिंग सेंटर ब बाजु | 23 | 3,12,13,14,15, 16,21,1,2,1 | 2101012 | 109324 | 2210336 |
| 17 | प्राथमिक शाळा शिक्षण मंडळ मिरज | 7 | | 4186620 | 364143 | 4550763 |
| 18 | धोबी कट्टा मिरज | 20 कटटे | 1,9,10,12,13,14, 15,18,19,20 | 18426 | 865 | 19291 |
| 19 | सी टाईप शॉपिंग सेंटर अ बाजू | 30 | | 61952 | 7656 | 69608 |
| 20 | सी टाईप शॉपिंग सेंटर ब बाजू | 45 | 1,3,7,8,9,10,11, 12,15,16,17,19, 20,22,7,10,11, 12,15,17,18,21, 22,5 | 111002 | 2077 | 113079 |
| 21 | खुली जागा जुने मार्केट | 6 | 1,2,3,4,5 | 5062212 | 234160 | 5296372 |



DRAFT

| | | | |
|---|---|---|---|
| एकुण रक्कम | 14804346 | 943370 | 15747716 |

**मिरज विभागाकडील मालमत्ता भाडे तत्वावरील गाळे, इमारती, खुली जागा, धोबी कट्टे, यांची थकित भाडे वसूली**

**मनपाची गाळे, खाजगी जागा, कट्टे यांची एकूण वसूलपात्र रक्कम :-**

**थकित भाडे रु. 14804346/-**

**सेवा कर थकबाकी रु. 943370/-**

**एकत्रीत थकित एकूण रु. 15747716/-**

**ब) मिरज विभागाकडील मालमत्ता भाडे तत्वावरील मनपाची लाकडी खोकी व खाजगी खोकी यांचे थकीत भाडे**

| अ.क्र. | मनपा लाकडी खोकी क्रमांक | थकबाकी | सेवाकर | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2,3,4,5,6,9,11,12,13,14,16, 18,19,20,21,22,23,25,28, 29,31,32,33,34,35,36,37, 38,39,40,41,42,44,45,46, 47,49,50,51,52,53,54,55, 56,57,59,60,61,63,64,65, 66,67,70,71,72,73,74,75, 77,78,79,81,82,83,87,88, 90,91,92,93,95,96,100 | 882717 | 95530 | 978247 |
| | | 882717 | 95530 | 978247 |

| क्र. | तपशिल | थकीत रक्कम | सेवाकर | एकूण |
|---|---|---|---|---|
| 2 | मनपा हद्दीतील खाजगी खोकी | 4589111 | 400195 | 4989306 |

**मनपाची लाकडी खोके व खाजगी खोके यांची एकूण वसूलपात्र रक्कम**

**थकित भाडे रु. 5471828/-**

**सेवा कर थकबाकी रु. 495725/-**

**एकूण थकित रक्कम रु. 5967553/-**

**अर्धसमास ज्ञापन क्र.39 दि.28/12/2015 रोजी निर्गमित केला असुन मिरज मालमत्ता विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.**

**एकुण वसुलपात्र रक्कम :- मनपाची गाळे, खाजगी जागा, कट्टे यांची एकूण वसूलपात्र रक्कम रु.15747716/- व मनपाची लाकडी खोके व खाजगी खोके यांची एकूण वसूलपात्र रक्कम रु. 5967553/- अशी एकुण रक्कम रु.**

**21715269/- वसुलपात्र आहे.**

DATRYJM7501 (Ref No : 39)

## *9 महानगरपालिका निवासस्थानामध्ये राहणा-या कर्मचा-यांचे कपात केलेले मासिक घरभाडे स्वनिधीमध्ये जमा केले जात नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष : मालमत्ता मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 45976.00/-

***महानगरपालिका निवास्थानामध्ये राहणारे अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनातून महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम 81 ड नुसार भाडे कपात केली जाते. परंतु 2013-14 या आर्थिक वर्षात कपात केलेले घरभाडे रु.2302872/- महानगरपालिका निधीमध्ये भरणा केलेले नाही. तसेच 2014 मध्ये मनपा निवास्थानामध्ये राहणा-या 8 (आठ) कर्मचा-यांच्या वेतनामधुन घरभाड्याची रक्कम रु. 45976/- वसुल केलेली नाही.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या निवास्थान नस्तीची तपासणी केली असता नस्तीमध्ये महानगरपालिकेकडे एकूण 121 निवासस्थाने असल्याचे व निवास्थानामध्ये राहत असलेल्या कर्मचा-यांची नोंद आहे. निवासस्थानामध्ये रहात असलेल्या कर्मचा-यांचे मासिक घरभाडे आस्थापना विभागाकडून दरमहाचे वेतन देयकामधून वसूल करण्यात येते. या बाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 120 नुसार महानगरपालिकेने मालमत्ता भाड्याने देण्यासंबंधीचे, नमुना क्र.89 प्रमाणे भाड्याने दिलेल्या मालमत्तेची नोंदवही ठेवणे आवश्यक असता ती ठेवली नसल्याने महानगरपालिकेने मालमत्ता भाड्याने दिलेचा दिनांक, कालावधी,आकारलेला दर, देय रक्कम, वसूल रक्कम यांचा एकत्रित तपशिल समजून येत नाही.

2) निवास्थानामध्ये राहणा-या कर्मचा-यांची मार्च महिन्याची वेतन देयके तपासली असता, निवासस्थानामध्ये रहाणारे अधिकारी/कर्मचारी यांचे मासिक वेतनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम 81 ड नुसार निवासस्थान भाडे कपात केले आहे. परंतु वसुल केलेले भाडे महानगरपालिका निधीमध्ये भरणा केलेले नाही. 2013-14 या आर्थिक वर्षात निवास्थानामध्ये राहणा-या कर्मचा-यांच्या मासिक वेतनामधून घरभाडे रक्कम रू.2302872/- कपात केली आहे. परंतु वसूल भाडे महानगरपालिका निधीमध्ये भरणा केलेले नाही.

3) एखाद्या कर्मचा-याने निवासस्थानाची मागणी केल्यास व निवास्थान रिक्त असल्यास निवास्थान समितीच्या बैठकीमध्ये सूचित केल्यानुसार आयुक्त यांचे मान्यतेने कर्मचा-यांना निवास्थानाचे वितरण करारपत्र करुन केले जाते व त्यासंबंधीचा आदेश उपायुक्त यांचे स्वाक्षरीने काढून प्रशासन अधिकारी यांना

त्याची प्रत दिली जाते व प्रशासन अधिकारी कर्मचा-याचे वेतन देयकामधून दरमहाचे घरभाडे कपात करतात. परंतु 2013-14 या आर्थिक वर्षामधील फेब्रु 2014 ची वेतन देयके तपासली असता खालील कर्मचा-यांच्या वेतनामधून मासिक घरभाडे वसूल केलेले नाही.

| अ.क्र | कर्मचा-याचे नांव | पदनाम | निवासस्थानात रहात असलेला दिनांक | मासिक भाडे रक्कम रुपये | वसुल न केलेली एकुण घरभाडे रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पंगा मोगा दाते | शिपाई | माहिती अप्राप्त | 779 | अप्राप्त |
| 2 | यासीन गौस पठाण | हरकामी | 1/10/11 | 978 X 28 | 27384 |
| 3 | महेंद्र अमर वारे | सफाई कामगार | 1/10/11 | 664 X 28 | 18592 |
| 4 | गणेश रामा वायदंडे | सफाई कामगार | माहिती अप्राप्त | 589 | अप्राप्त |
| 5 | मोसय्या देवसाहेब मद्रासी | खास. सफाई कामगार | माहिती अप्राप्त | 664 | अप्राप्त |
| 6 | अभिजित जंबो मद्रासी | खास. सफाई कामगार | माहिती अप्राप्त | 705 | अप्राप्त |
| 7 | पेदाण्णा रंगाप्पा मद्रासी | खास. सफाई कामगार | माहिती अप्राप्त | 906 | अप्राप्त |
| 8 | उत्तम्मा रंगाप्पा मद्रासी | खास. सफाई कामगार | माहिती अप्राप्त | 820 | अप्राप्त |
| एकूण | | | | | 45976 |

सदरील तक्त्यामधील अ.क्र. 1,3,4,5,6,7,8 मधील कर्मचारी महानगरपालिका निवास्थानामध्ये रहात असल्याचे मालमत्ता विभागाच्या नस्तीमध्ये नमूद आहे. परंतु सदर कर्मचा-यांना निवास्थान कधी वाटप केले आहे या बाबतचे आदेश लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.

4) मालमत्ता विभागाने कर्मचा-यांना निवास्थान वाटप केलेले आदेशाची एक प्रत आस्थापना विभागास दरमहाच्या वेतनामधून भाडे कपात करणेसाठी देणे आवश्यक असता ती दिलेली नसल्याने नमूद कर्मचा-यांच्या वेतनामधून घरभाडे कपात केलेली नाही. महानगरपालिकेच्या दोन विभागामध्ये परस्पर ताळमेळ नसल्याने मनपास घरभाडे रक्कमेपासून वंचित रहावे लागले आहे.

5) उपायुक्त आदेश क्र./मनपा/मालवि/349/2011-12 दि.1/10/2011 ने एकूण 5 कर्मचा-यांना निवास्थान वितरीत केली आहेत व त्याची एक प्रत प्रशासन अधिकारी (आस्था) यांना पुढील कार्यवाहीसाठी दिली आहे. आस्थापना विभागामधील कर्मचारी यांनी सदर आदेश दि.21/11/2011 रोजी मिळाल्याची पोहोच आदेशावर दिली आहे. सदर आदेशाप्रमाणे 1) श्री.अभिजीत देवळेकर,2) अब्दुल रझ्झाक काझी व मुबारक बादशहा मुजावर यांचे वेतनामधून घरभाडे रक्कम कपात केली आहे. परंतु परंतु उपरोक्त तक्त्यामधील अनुक्रमांक 2 व अनुक्रमांक 3 वरील कर्मचारी श्री.महेंद्र अमर वारे व श्री. यासिन गौस पठाण यांचे वेतनमधून दि. 01/10/2011 ते दि. 31/03/2013 पर्यंत निवासस्थान भाडे वसूली केलेली नाही. उपरोक्त तक्त्यातील अनुक्रमांक 1,3,4,5,6,7,8 मधील कर्मचा-यांना निवासस्थान वाटप केलेल्या दिनांका पासून भाडे वसुल करुन लेखापरीक्षणास अनुपालन दाखविले नाही.

DRAFT

प्रशासन अधिकारी (आस्था) यांनी अर्धसमास क्र. 44 दि. 31/12/2015 चे उत्तर दि. 22/01/2016 रोजी दिले आहे. सदरील तक्त्यामधील अनुक्रमांक 2 व अनुक्रमांक 3 वरील कर्मचा-यांचे वेतन देयकात भाडे वसुल केलेबाबत दाखविण्यात आलेले नाही. तसेच सदरील तक्त्यामधील अनुक्रमांक 1,3,4,5,6,7,8 मधील कर्मचा-यांना निवासस्थान वाटप केलेले आदेश लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेले नाहीत.

**वसुलपात्र रक्कम रु. 45976/-**

DATRYJM7501 (Ref No : 44)

## *11 महानगरपालिका क्षेत्रातील मनपा मालकीची जागा, गाळे, खोके, इमारती यांची भाडेवाढ विहित मुदतीत न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : भूमी व मालमत्ता मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 4188173.00/-

***महासभा ठराव क्र. 94 दि. 18/12/2008 नुसार सांगली मनपा क्षेत्रातील मनपा मालकीची जागा, गाळे, खोके, इमारती, यांना प्रत्येक तीन वर्षानी सरसकट 20% भाडेवाढ करण्याचे धोरण निश्चित केले असल्याने या धोरणाप्रमाणे मालमत्ता विभागाने भाड्यामध्ये 20% भाडेवाढ न करता पुर्वीच्याच दराने भाडे वसुल केल्याने मनपाचे रक्कम रु. 4188173/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या अधिनस्त गाळे, खोके, खाजगी जागा, इमारती यांना लागु असलेले भाडे, गाळ्यांची मुदत यांचे लेखापरीक्षण गाळे धारकाचे भाडे करारपत्र व मागणी नोंदवही वरुन करण्यात आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) अन्वये आयुक्तास, महानगर पालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल अशी तरतुद आहे. या तरतुदी नुसार महापालिका क्षेत्रातील खुल्या जागा, दुकान गाळे महानगरपालिकेने महासभेच्या ठरावानुसार भाडे पट्टयाने दिलेल्या आहेत. महानगरपालिका स्थापनेपुर्वी तत्कालीन सांगली मिरज आणि कुपवाड नगरपरिषदेने, नगरपालिका अधिनियम 1965 मधील तरतुदीनुसार अनेक जागा, दुकान गाळे 1 वर्षे, 3 वर्षे, 29 वर्षे, 99 वर्षे अशा भाडे पट्टयाने दिलेल्या आहेत. सदर गाळे भाड्याने देण्याच्या नस्ती,करारपत्र, मागणी नोंदवही, महासभा ठराव यांची तपासणी करुन त्रुटीसंदर्भात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महासभा ठराव क्र. 94 दि. 18/12/2008 नुसार प्रत्येक वर्षी 10% भाडेवाढ न करता महासभेने मनपाचे गाळे, जागा इमारती कट्टे व खोकी यांना प्रत्येक तीन वर्षानी सरसकट 20% भाडे वाढ करण्याचे धोरण

निश्चित केली आहे. परंतु मनपाच्या मालमत्ता विभागाने सदर धोरणाप्रमाणे वित्तीय वर्ष 2009-2010 व वित्तीय वर्ष 2012-2013 मध्ये प्रत्येकी तीन वर्षांनी 20% भाडेवाढ न करता जुन्याच दराने भाडे आकारणी केली आहे. जुन्याच दराने भाडे आकारणी केल्याने सोबत जोडलेल्या **(परिशिष्ठ क्र.1)** प्रमाणे रु. 3727454/- एवढ्या रक्कमेचे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच भाडेवाढ रक्कमेवरील सेवाकराची रक्कम रु. 460719/- इतकी होत असुन वाढीव सेवाकरापोटी शासनाकडे जमा होणारी रक्कम रु460719/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

2) या ठरावामध्ये मनपा क्षेत्रातील ज्या जागा, गाळे भाडयाने दिलेल्या आहेत त्यांची भाडे वसुली थकीत असल्यास दर सहा-सहा महिन्याची नोटीस देऊन भाडे वसुलीसाठी प्रशासनाने कार्यप्रणाली अवलंबिणेचे महासभेने आदेश दिले आहेत. 2013-14 या आर्थिक वर्षामधील मालमत्ता विभागाची थकबाकी रु. 4188173/- इतकी असताना दर सहा सहा महिन्यांनी थकीत भाडे वसूलीची कार्यवाही न केल्याने थकबाकीची रक्कम वाढल्याचे स्पष्ट होते.

सदरील मनपा गाळे, रिकामी जागा, इमारती, घरे (संजयनगर पत्रा चाळ) व मनपा मालकीची खोकी व खाजगी मालकीची खोकी, भाडेवाढ केलेबात अर्धसमास क्र. 47 दि. 12/01/2016 चे उत्तर दि. 25/01/2016 रोजी प्राप्त झाले आहे. तरी सदरील खुलाशामध्ये मालमत्ता विभागाने महासभेने निश्चित केलेप्रमाणे प्रती वर्ष 10% भाडेवाढ न करता 3 वर्षातून 20% भाडे वाढ करून प्रत्यक्ष आकारणी केली असलेचे नमुद केले आहे. परंतु मालमत्ता विभागाने भाडेवाढ न करता जुन्याच दराने भाडे वसुल केल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे. वसुलपात्र रक्कम रु. 4188173/- .

DATRYJM7501 (Ref No : 47)

## *15 सांगली विभागाने घरपट्टीची आकारणी विलंबाने केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 103282.00/-

***बांधकाम विकास नियंत्रण नियमावली नियम 7(2) तसेच बांधकाम परवानगी आदेश अट क्र. 2 नुसार मालमत्ता धारकाने परवानगी दिलेनंतर एक वर्षामध्ये बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे. अथवा बांधकाम परवानगीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. बांधकाम परवानगी दिलेनंतर पुढील एक वर्षापासून कर निर्धारण करणे आवश्यक असता तशी कर आकारणी न करता ज्या वर्षात करनिर्धारण प्रकरणे आले त्याच वर्षापासून कर निर्धारण केल्याने रक्कम रु. 103282/- एवढा कमी कर वसुल झाला आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या सांगली विभागाकडील कर संकलन व कर निर्धारण

विभागाकडील 2013-14 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी कर निर्धारणाच्या निवडक प्रकरणांची पडताळणी केली असता, कर निर्धारण आकारणी विलंबाने केल्याचे आढळुन आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 चे नियम 5 नुसार मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीनी नव्याने उभारण्यात आलेली किंवा पुन्हा बांधण्यात आलेली इमारत यथास्थीती, पुरी होणे किंवा तीचा भोगवाटा करणे यापैकी जी गोष्ट प्रथम घडेल ती गोष्ट घडल्याच्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत आयुक्तास त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे व त्यानंतर अशा इमारतीची पाहणी करुन उक्त अधिनियमाच्या नियम 7 प्रमाणे सदर इमारतीचे कर योग्य मूल्य ठरवुन कर निर्धारण करणे आवश्यक असताना **(परिशिष्ठ क्र. 03 )** मध्ये नमुद मालमत्ता धारकाकडून विलंबाने 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये कर निर्धारण केल्याने महानगरपालिकेचे रक्कम रु. 103282/- चे अर्थिक नुकसान झाले आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र. 76 दि. 05/03/2016 चे उत्तर दि. 04/04/2016 रोजी प्राप्त झाले असून सदर मालमत्तेची कर आकारणी ही इमारत वापर झालेल्या तारखेपासून केली असल्याचे अनुपालनात नमुद केले आहे. नियमानुसार भोगवटा केल्या पासून 15 दिवसाच्या आत आयुक्तांना त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे व त्यानंतर अशा इमारतीची पाहणी करुन उक्त अधिनियमाच्या नियम 7 प्रमाणे सदरील इमारतीचे करनिर्धारण करणे आवश्यक असता तसे सांगली घरपट्टी विभागाने केलेले नाही. विश्‍वकर्मा अपार्टमेंट गुलमोहर कॉलनी यांचे 15 महिन्याचे बील खातेदारांना अदा करण्यात आले असे अनुपालनात सादर केले आहे. परंतु त्यांचेकडून कराची रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

**वसुलपात्र रक्कम रु. 103282/-**

DATRYJM7501 (Ref No : 76)

## *16 महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पिण्याच्या पाण्याचा कोटा वाढवून न घेतल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व मलनि: सा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 8988376.00/-

***महानगरपालिकेने 2013-14 या आर्थिक वर्षात MIDC सांगली यांना त्यांचे SND-1072, SND-1073 व SND-1074 या कनेक्शन वरुन कोट्यापेक्षा जादा पिण्याचे पाणी वापरलेने रक्कम रु. 84,876.75/- आदा केले आहेत. महानगरपालिकेने पिण्याच्या पाण्याचा कोटा वाढवुन घेण्यासाठी MIDC सांगली यांचे बरोबर पत्रव्यवहार करणे आवश्यक असता तो केलेला नाही. तसेच या भागात महानगरपालिकेने पाणीपुरवठा योजना राबवुन पिण्याच्या पाण्याच्या सोय करणे आवश्यक असता ती न केल्याने MIDC ला पुर्ण वर्षामध्ये रु. 8988376/- आदा करावे लागले आहेत.***

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून ज्या भागामध्ये पाणीपुरवठा केला जात नाही त्या भागामध्ये MIDC सांगलीकडून शुध्द पाणी घेवून

नागरीकांना नळ कनेक्शनद्वारे पाणीपुरवठा केला जातो. त्यासाठी महामंडळ 100 घ.मी.साठी रु. 8.50 प्रती घन मिटर असा दर आकारते. तर मंजूर कोट्यापेक्षा जादा पाणी घेतल्यास एम.आय.डी.सी. सांगली त्यास रु. 12.75 घन मिटर दराने आकारणी करते. महानगरपालिकेने 2013-14 या आर्थिक वर्षात MIDC सांगली यांना त्यांचे SND-1072, SND-1073 व SND-1074 या कनेक्शनवरुन 100 घ.मी. कोट्यापेक्षा जादा पिण्याचे पाणी वापरले आहे. महानगरपालिकेने पिण्याच्या पाण्याचा कोटा वाढवून घेण्यासाठी MIDC सांगली बरोबर पत्रव्यवहार केलेला नाही. तसेच या भागात महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजना राबवुन पिण्याच्या पाण्याची सोय करणे आवश्यक असताना ती न केल्याने एम.आय.डी.सी.,सांगली यांना रु. 84,876.75/- अदा करावे लागले आहे. अशा मंजूर कोट्यापेक्षा जादा पाण्यासाठी महानगरपालिका सन 2011-12 पासून जादा दराने रक्कम अदा करत आहे.

या कामाची नस्ती, पाणीपुरवठा देयके व प्रमाणके तपासुन खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) MIDC सांगली यांनी 100 घ.मी प्रती मिटर इतकाच पिण्याच्या पाण्याचा कोटा महानगरपालिकेस मंजूर केला आहे परंतु महानगरपालिकेस जादा पाण्याची आवश्यकता असल्याने महानगरपालिकेने पाण्याचा कोटा वाढवून घेणे आवश्यक होते. परंतु MIDC सांगलीकडून पाण्याचा कोटा वाढवून घेतला नसल्याने व खालील कनेक्शन मधुन जादा पाणी घेतलेने महानगरपालिकेस जादा रक्कम MIDC सांगली यांना आदा करावी लागली आहे.

SND-1072 या कनेक्शनमधून 5291 घन मिटर जादा पाणी घेतल्याने वाढीव दर रु. 4.25 या दराने रुपये 22,486.75/-, SND-1073 या कनेक्शनमधून 9201 घन मिटर X रुपये 4.25 या वाढीव दराने 39,104.25/- व SND- 1074 या कनेक्शनमधून 5479 घन मिटर X रुपये 4.25 या दराने 23,285.75/- अशी रक्कम रुपये 84,876.75/- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला द्यावी लागली आहे.

2) महानगरपालिकेच्या आर्थिक वर्ष 2015-16 अंदाजपत्रकामध्ये आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये प्रत्यक्ष करण्यात आलेल्या खर्चाचे नक्की आकडे देण्यात आले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने MIDC सांगली यांना पिण्याच्या पाण्यासाठी पृष्ठ क्र.42, द्विनोंद कोड B2833, MIDC पाण्याचा आकार या लेखाशिर्षाने रक्कम रु.8988376/- आदा केले आहेत. महानगरपालिकेस केंद्र व राज्यशासनाकडुन UIDSSMT,सुजल निर्माण योजना,नगरोत्थान योजनेमधुन पाणीपुरवठ्याच्या कामासाठी निधी मिळाला आहे. या योजना मधुन ज्या भागांना महानगरपालिका पाणी पोहचवु शकत नाही त्या भागामध्ये प्राधान्याने कामे घेवुन ती कामे पुर्ण करणे आवश्यक असता त्या प्रमाणे कामे केली नसल्याने महानगरपालिकेस MIDC सांगलीकडुन पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे व त्याचे रु.8988376/- आदा केले आहेत.

याबाबत पाणीपुरवठा विभागास अर्धसमास ज्ञापन क्र.60 दि.30/01/2016 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

**आक्षेपाधिन रक्कम रु.8988376/-**

DATPPTM5902 (Ref No : 60)

## *22 मासिक विद्युत देयकाच्या रकमा अदा करताना सवलत कालावधीचा फायदा न घेतल्याने झालेल्या नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : विद्युत मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 23696.00/-

***महानगरपालिकेच्या विद्युत विभागाने MSEB ची विद्युत देयके लेखा शाखेकडे धनादेश काढणेसाठी सवलत दिनांकाच्या आगोदर पाठविली आहेत. परंतु लेखा शाखेने धनादेश सवलतीच्या दिनांकानंतर काढलेने महानगरपालिकेचे रुपये 23696/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या विद्युत विभागातर्फे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील प्रभागांची महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सांगली यांचे कडून प्राप्त झालेल्या विज बीलांची रक्कम आदा करण्यासाठी विहीत नमुन्यात देयक तयार करुन लेखा शाखेकडे देय दिनांकाच्या आठ दिवस आगोदर पाठविले जाते. लेखा शाखा सदर विद्युत देयकातील रकमांची तपासणी करुन देयकाप्रमाणे धनादेश काढुन, देयक व धनादेश पुन्हा विद्युत विभागाकडे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सांगली यांचेकडे भरणा करण्यासाठी पाठविले जाते. त्यानंतर विद्युत विभागकडुन सदरचे धनादेश म.रा.वि.मंडळाकडे जमा केले जातात. यावर खालील अभिप्राय आहेत.

1) विद्युत विभागाने मार्च 2014 मध्ये MSEB मंडळास वीज देयकापोटी रक्कम रु.5567880/- धनादेशाद्वारे आदा केले आहेत. विज वितरण देयकाच्या रकमा भरणा करताना म.रा.वि.मं. सांगली यांनी बिलात नमूद केलेल्या सवलतीच्या तारखेपर्यंत भरणा केल्या नसल्यामुळे विज मंडळाकडून देयकामध्ये मिळणा-या सवलतीच्या दराचा फायदा महानगरपालिकेस मिळालेला नाही. महानगरपालिकेच्या विद्युत विभागाने MSEB ची विद्युत देयके लेखा शाखेकडे धनादेश काढणेसाठी सवलत दिनांकाच्या आगोदर पाठविली आहेत. परंतु लेखा शाखेने धनादेश सवलतीच्या दिनांकानंतर काढलेने (**परिशिष्ठ क्र.07**) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सवलतीचा फायदा मिळाला नसल्याने महानगरपालिकेचे रुपये 23696/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. 23696/-

DATPPTM5902 (Ref No : 89)

## *23 सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेतील घरपट्टी विभागाकडे जमा झालेला महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी उपकर विलंबाने शासनाकडे जमा केलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी (उपकर) अधिनियम 1962 नुसार महानगरपालिका क्षेत्रातील जमिनी व इमारती यावर वसुल करण्यात आलेल्या शिक्षण कर व रोजगार हमी उपकराच्या रकमा महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक इडिसी-1077/प्र.क्र. 205/ल-5 दिनांक 3 एप्रिल 1998 प्रमाणे ज्या आठवडयात रकमा वसुल केल्या जातात अशा रकमांचा भरणा शासकीय कोषागारात पुढील आठवडा संपण्याच्या आत करावयाचा आहे, परंतु महापालिकेने सरासरी चार महिने ते आठ महिने विलंबाने शासकीय कोषागारात रकमा जमा केल्या आहेत.***

महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी (उपकर) अधिनियम 1962 नुसार महानगरपालिका क्षेत्रातील जमिनी व इमारती यावर वसुल करण्यात आलेल्या शिक्षण कर व रोजगार हमी (उपकर) च्या रकमा महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक इडिसी-1077/प्र.क्र. 205/ल-5 मंत्रालय मुंबई दिनांक 3 एप्रिल 1998 प्रमाणे ज्या आठवडयात रकमा वसुल केल्या जातात अशा रकमांचा भरणा शासकीय कोषागारात पुढील आठवडा संपण्याच्या आत करावयाचा आहे. परंतु सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेने उपरोक्त कर/ उपकराच्या वसुल रकमा पुढील प्रमाणे विलंबाने शासकीय कोषागार भरणा केल्या आहेत. याबाबत अर्धसमास क्र. 56 दिनांक 30/01/2016 रोजी निर्गमित केला असता घरपट्टी विभागाचे अनुपालन दि.17/02/2016 रोजी प्राप्त झाले असून यापुढे विहित वेळेत उपरोक्त करांच्या रकमा शासकीय कोषागारात जमा करण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. सदरचे नियमानुसार विहित वेळेत कर/उपकराच्या रक्कमा घरपट्टी विभागाने भरणा केलेल्या नसल्याने दिलेले अनुपालन अमान्य करण्यात येवून खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | वसुलीचा कालावधी | रक्कम रुपये | भरणा दिनांक | प्रमाणक क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **शिक्षण कर** | **01/04/13 ते 30/04/13** | **956799** | **20/12/13** | **5149** |
| **2** | **शिक्षण कर** | **01/05/13 ते 31/08/13** | **2837425** | **20/12/13** | **5148** |
| **3** | **शिक्षण कर** | **01/09/13 ते 11/12/13** | **16545713** | **04/03/14** | **6373** |
| **4** | **शिक्षण कर** | **12/12/13 ते** | **15716819** | **21/05/14** | **523** |

DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **31/03/14** | | | |
| **5** | **रोजगार हमी उपकर** | **01/04/13 ते 30/04/13** | **106998** | **20/12/13** | **5150 अ** |
| **6** | **रोजगार हमी उप कर** | **01/05/13 ते 31/08/13** | **442042** | **20/12/13** | **5150 ब** |
| **7** | **रोजगार हमी उपकर** | **01/09/13 ते 11/12/13** | **2401313** | **04/03/14** | **6376** |
| **8** | **रोजगार हमी उप कर** | **12/12/13 ते 31/03/14** | **2485803** | **21/05/14** | **524** |
| **9** | **मोठा निवासी कर** | **01/04/13 ते 30/04/13** | **37653** | **20/12/13** | **5150 क** |
| **10** | **मोठा निवासी कर** | **01/05/13 ते 31/08/13** | **161136** | **20/12/13** | **5150 ड** |
| **11** | **मोठा निवासी कर** | **01/09/13 ते 11/12/13** | **869064** | **04/03/14** | **6378** |
| **12** | **मोठा निवासी कर** | **12/12/13 ते 31/03/14** | **755840** | **21/05/14** | **525** |

उपरोक्त शासन निर्णयान्वये महानगरपालिकेने प्रत्येक महिन्याच्या 15 तारखेला वसुल व जमा केलेल्या शिक्षण कर, रोजगार हमी उपकर व मोठा निवासी कराची माहिती विहीत नमुन्यात जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवायची आहे. परंतु सदर माहिती जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे पाठविली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 56)

## *25 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष : सुवर्ण जयंती राज्यशासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*



DRAFT

***महिला बचत गटातील काही लाभार्थीकडे दारिद्रय रेषेखालील कार्ड नाहीत. लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असताना ठेवलेली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 192 नुसार नमुना क्र.149 प्रमाणे अनुदान नोंदवहीत अनुदानाच्या रकमांची नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना विभागाने अनुदान नोंद वही ठेवलेली नाही. केंद्र व राज्य शासना कडून प्राप्त अनुदानातून खर्च केलेल्या रकमांची विनियोग प्रमाणपत्रे, बँकाकडील अर्थसहाय्य विनियोग प्रमाणपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे खर्च रक्कमेनुसार विनियोग प्रमाणपत्र तपासता आले नाहीत.***

राज्यामधील नागरी भागामध्ये दारिद्रय रेषेखालील लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी व त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दि. 01/12/1997 पासून केंद्र पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सुरु करण्यात आली आहे.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सर्व महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायती मध्ये राबविण्यात येत आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंमलबजावणीसाठी महत्वाचे निर्देशाचे संकलन पुस्तक जानेवारी 2005 मध्ये प्रकाशित झाले असुन या योजनेच्या व्याप्तीमध्ये नमुद केल्याप्रमाणे या योजने अंतर्गत 1998 व 2005-2006 साली घरोघरी जावून करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार ज्या कुटुंबाचे दरमहा दरडोई उत्पन्न 591.75/- रुपये आहे अशा कुटुंबाना या योजनेचा लाभ देण्यात येतो. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना ही सामुहिक सबलीकरणातून दारिद्रय निर्मुलनावर भर देणारी योजना आहे.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेसाठी केंद्र सरकारच्या नविन मार्गदर्शक सुचना क्र.D.D.NoE-14012/1/2009 UPA Date- 2 April 2009 नुसार दि.1 एप्रिल 2009 पासून अंमलात आल्या आहेत.केंद्र सरकारच्या नविन मार्गदर्शक सुचनेतील निर्देश 4.2.15 नुसार सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील वैयक्तीक लाभार्थ्यास व्यवसायासाठी जास्तीत जास्त रु. 2,00,000/- पर्यंतचे कर्ज प्रस्ताव दाखल करता येतात. वैयक्तीक लाभार्थींना स्वंयनिधी एकुण कर्ज प्रस्तावाच्या 5% (रु.10,000/-) बँकेत भरावे लागतात. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतून 25% अनुदान (रु.50,000/-) लाभार्थ्यांना दिले जाते व उर्वरीत 70% रक्कम (रु.1,40,000/-) बँकेकडून कर्ज स्वरुपात मंजुर केले जातात. 2013-14 या आर्थिक वर्षातील वैयक्तिक लाभार्थी एकुण 181 असुन मार्च 2014 मध्ये 50 लाभार्थ्यांना कर्ज व अनुदान वाटप केले आहे. त्यापैकी निवडक लाभार्थी खालीलप्रमाणे

| अ.क्र | लाभार्थीचे नांव | व्यवसाय | बँकेचे नांव | कर्ज | 25% अनुदान | प्रमाणक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अरविंद आदीनाथ कांबळे | टेबलखुर्ची | कॅनरा बँक | 150000 | 37500 | 144 | 20/3/14 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | चंद्रकांत विश्राम कोटकर | हॉटेल | ओरीयन्टल बँक | 200000 | 50000 | 150 | 24/3/14 |
| 3 | गणेश सुभाष कोळी | म्हैसपालन | IDBI | 70000 | 17500 | 164 | 24/3/14 |
| 4 | मोजन बापु नरगुंदे | फ्रुट विक्री | सिंडीकेट बँक | 200000 | 50000 | 174 | 29/3/14 |
| 5 | सलीम अजिज शेख | चप्पल विक्री | बँक ऑफ इंडिया | 200000 | 50000 | 177 | 29/3/14 |
| 6 | पांडूरंग हिरालाल साबळे | ऑटो कार | सिंडीकेट बँक | 200000 | 50000 | 180 | 29/3/14 |
| 7 | रवि कल्याप्पा हदीमणी | टेबलखुर्ची | पंजाब नॅशनल बँक | 150000 | 37500 | 182 | 29/3/14 |
| 8 | प्रमोद धनपाल धोत्रे | किराणा | ICICI | 80000 | 20000 | 184 | 29/3/14 |
| 9 | गौस नुरमंहमद शेख | कपडे विक्री | सिंडीकेट बँक | 200000 | 50000 | 186 | 29/3/14 |
| 10 | हरीचंद्र आण्णाप्पा नाईक | सेंट्रींग | पंजाब सिंध बँक | 200000 | 50000 | 187 | 29/3/14 |
| | | | | 20031053 | 5025227 | | 29/3/14 |

DRAFT

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना मार्गदर्शक सुचना क्र. D.D.No.E-14012/1/2009 UPA Date- 2 April 2009 मधील निर्देश 5.2 नुसार सुवर्ण जयंती शहरी महिला स्वयंरोजगार बचत गटांना जास्तीत जास्त रक्कम रु.10,000,00/- पर्यंत कर्जाचे प्रस्ताव सादर करता येतात. यापैकी 5% रक्कम रु.50,000/- महिला बचत गटांना स्वंयनिधी म्हणून बँकेत भरावा लागतो. तसेच 35% रक्कमरु.3,50,000/- सुवर्ण जयंती स्वयंरोजगार बचत गट योजनेतून महिला बचत गटांना अनुदान स्वरुपात दिली जाते. व ऊर्वरीत 60% रक्कम रु. 600000/- बचत गटांना कर्ज स्वरुपात बँकेकडून दिली जाते. 2013-14 या आर्थिक वर्षात एकुण 20 बचत गटांना कर्ज व अनुदान वाटप केले आहे त्यापैकी मार्च 2014 मध्ये एकुण 4 बचत गटांना कर्ज व अनुदान वाटप केले आहे ते खालील प्रमाणे

| अ.क्र | बचत गटाचे नांव | व्यवसाय | बँकेचे नांव | कर्ज | 35% | प्रमाणक | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अनुदान | क्रमांक | |
| 1 | अष्टलक्ष्मी महिला बचतगट | भांडी व्यवसाय | युको बँक | 400000 | 140000 | 167 | 29/3/14 |
| 2 | लोकसेवा महिला बचतगट | किराणा दुकाण | स्टेट बँक | 100000 | 35000 | 168 | 29/3/14 |
| 3 | संजिवणी महिला बचतगट | साडी विक्री | पंजाब बँक | 400000 | 140000 | 193 | 29/3/14 |
| 4 | मातोश्री महिला बचतगट | साडी विक्री | पंजाब बँक | 400000 | 140000 | 193 | 29/3/14 |
| | | | | | | | |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेतील सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनंअंतर्गत 2013-14 या वित्तीय वर्षात रक्कम रुपये 1,57,54,263/- इतका खर्च केला असून सदर खर्चाच्या अनुषंगाने प्रस्ताव नस्ती व प्रमाणके तपासुन अर्धसमास पत्र क्र.57 दि.30/01/2016 रोजी निर्गमित केले असता विभागाचे उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत लेखापरिक्षणाचे खालील आभिप्राय आहेत.

01)महिला बचत गटांना 1 वर्ष पूर्ण झाल्यानंतर सुवर्ण जयंती शहरी महिला स्वयंरोजगार योजनेतून फिरता निधी देण्यात येतो. सदर नस्तीची तपासणी केली महिला बचतगटाच्या प्रस्तावाबरोबर लाभार्थ्यांची दारिद्रय रेषेखालील कार्ड जोडण्यात आली आहेत. प्रस्तावासोबत दारिद्र्य रेषेखालील कार्ड जोडण्याची अट असतानाही खालील महिला बचत गटातील लाभार्थ्यांनी दारिद्रय रेषेखालील कार्ड जोडली नसतानाही त्यांना फिरता निधी देण्यात आला आहे.

| अ.क्र | लाभार्थीचे नांव | बचत गटाचे नांव | बचत गटास मंजुर फिरता निधी अनुदान रक्कम रु. | लाभार्थी फिरता निधी अनुदान रक्कम रु. | प्रमाणक क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुमताज झाकीर शेख | श्री महिला बचत गट | 20,000/- | 2000/- | 188 दि.29/03/2014, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | फातिमा शेख | श्री महिला बचत गट | 20,000/- | 2000/ | 188 दि.29/03/2014, |
| 3 | सौ. सरिता चंद्रकांत नाईक | संजिवनी महिला बचत गट | 22,000/- | 2000/ | 193 दि.29/03/2014, |
| 4 | शालन रामचंद्र पुणेकर | संजिवनी महिला बचत गट | 22,000/- | 2000/ | 193 दि.29/03/2014, |
| 5 | विजया रामचंद्र म्हात्रे | सावित्री महिला बचत गट | 24,000/- | 2000/ | 200 दि.29/03/2014, |
| 6 | उषा राजु कोळी | सावित्री महिला बचत गट | 24,000/- | 2000/ | 200 दि.29/03/2014, |

2) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना वर्ष 1997 पासून सुरु झाली असून लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असताना ठेवलेली नाही. त्यामुळे नोंदवही अभावी वर्ष 2013-14 मध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांना यापूर्वी लाभ दिला किंवा कसे तपासता आले नाही.

3) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेसाठी केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून प्रत्येक वर्षी अनुदान प्राप्त होते. मार्च 2013 पर्यंत शिल्लक अनुदान रक्कम रु. 30906659.85 होते व 2013-14 साठी रक्कम रु. 5618913.38 अनुदान प्राप्त झाले असुन 2013-14 अखेर रक्कम रु. 20771010.23 अनुदान शिल्लक होते. सदर अनुदानाच्या रकमा सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या रोखवही मध्ये जमा केलेल्या आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 192 नुसार नमुना क्र. 149 प्रमाणे अनुदान नोंदवहीत अनुदानाच्या रकमांची नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना विभागाने अनुदान नोंद वही ठेवलेली नाही.

4) केंद्र व राज्य शासना कडून प्राप्त अनुदानातून खर्च केलेल्या रकमांची विनियोग प्रमाणपत्रे, बँकाकडील अर्थसहाय्य विनियोग प्रमाणपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे खर्च रकमे नुसार विनियोग प्रमाणपत्र असल्याचे तपासता आले नाही.

5) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत कर्जाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रत्यक्षात या योजनेचा किती लाभ झाला? त्यांचा स्वयंरोजगार व्यवस्थित सुरु आहे की नाही. त्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड

DRAFT

करण्यात येते किंवा नाही याबाबतची तपासणी करणेची कोणतीही यंत्रणा महानगरपालिकेकडे नसल्याने या योजनेच्या फलनिष्पतीबाबतची कोणतीही माहिती समजून येत नाही.

DATPKCM7101 (Ref No : 57)

## *27 कॉम्पेक्टर नंबर MH-10-P1007 च्या दुरुस्तीमधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दरपत्रके प्रसिध्द केल्याची प्रत नस्ती सोबत जोडलेली नाही. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-1093/2635 उद्योग/6 दि. 16/07/1993 नुसार 50 हजाराचे वरील दुरुस्तीच्या कामाची निविदा मागविणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने निविदा न मागविता दरपत्रके मागवुन MH-10-P1007 कॉम्पॅक्टर या वाहनाची दुरुस्ती करुन घेतलेली आहे.***

यंत्रशाळा विभागाची टिपणी दि. 30/09/2013 नुसार प्रभाग समिती क्र. 1 कडील कंटेनर मधील कचरा उचलण्यासाठी वापरात असणारा कॉम्पॅक्टर नंबर MH-10-P1007 चे स्कॅपर प्लेट झीज होऊन तुकडे झाले आहेत. त्यामुळे कचरा व्यवस्थित भरला जात नाही. कचरा लिफ्ट करणारे सिलेंडर लिकेज झाले आहेत. बाजारातील ओला कचरा, मंडईतील पालेभाज्या व इतर ओला कचरा यामुळे वाहनाच्या पीना गंजून खोबले बेअरींग खराब झाले असल्याचे नमुद आहे. कॉम्पॅक्टरच्या दुरुस्तीच्या खर्चाबाबत यंत्रशाळा विभागाने बाजारातून दरपत्रक घेतले असता अंदाजे खर्च रुपये.1,37,000/- येणार असून सदर खर्चास उपआयुक्त यांनी दिनांक 25/10/2013 ला मान्यता दिली आहे. निविदा मागविण्यास उपायुक्त यांनी दि. 28/10/2013 रोजी व निविदा सर्क्युलर प्रसिध्दीस उपायुक्त यांनी दि. 16/11/2013 रोजी मान्यता दिली आहे. परंतु वाहन विभागाने दि. 18/11/2013 रोजी निविदेऐवजी **दरपत्रके** (कोटेशन) मागणीचे सर्क्युलर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असुन दरपत्रके दि. 19/11/2013 पासुन दि. 27/11/2013 पर्यंत दाखल करण्याची मुदत देण्यात आली आहे. प्राप्त दरपत्रके दिनांक 28/11/2013 रोजी उघडण्यात आल्या असता खालील प्रमाणे 3 दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.क्र | दरपत्रक धारकाचे नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स, सांगली. | 1,39,000/- |

| | | |
|---|---|---|
| 2 | **मे. नितिन इंजिनिअरिंग वर्क्स, सांगली.** | **1,34,260/-** |
| 3 | **मे. भारत मोटर्स, सांगली.** | **1,38,000/-** |

सर्वात कमी दराचे दरपत्रक मे. नितिन इंजिनिअरिंग वर्क्स, सांगली. यांचे स्विकारण्यात येऊन उपआयुक्त यांनी दि. 13/12/2013 रोजी मान्यता दिली आहे. सुरक्षा अनामत रक्कम रुपये 6720/- दि. 01/01/2014 रोजी पावती क्र.156958 नुसार भरणा केली असून करारपत्र दि. 13/02/2014 रोजी केले आहे. वाहन दुरुस्ती कामाचे आदेश दि. 17/02/2014 ला दिले आहे. करारपत्रातील शर्ती व अटीनुसार कामाची मुदत वाहन ताब्यात मिळाल्यापासून 15 दिवस आहे. वाहन दिनांक 17/02/2014 ला नितिन इंजिनिअरिंग वर्क्स, सांगली. यांचेकडे दुरुस्तीसाठी दिले आहे. मे. नितिन इंजिनिअरिंग वर्क्स यांचे दि. 22/02/2014 पत्रा नुसार दुरुस्तीसाठी गाडी खोलली असुन महानगरपालिकच्या स्पेसिफिकेशन प्रमाणे माल तयार झाला असल्याने तपासणीसाठी कळविले आहे. दि. 26/02/2014 रोजी मालाची तपासणी केली आहे. मे. नितिन इंजिनिअरिंग वर्क्स, सांगली. यांनी पुढील दुरुस्तीचे काम सुरु केले आहे. मे. नितिन इंजिनिअरिंग वर्क्स, सांगली. यांचे दिनांक. 06/03/2014 च्या पत्रानुसार वाहन दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असुन वाहन ताब्यात घेण्यासाठी महापालिकेस कळविले आहे. मे. नितिन इंजिनिअरिंग वर्क्स, सांगली. यांना खालीलप्रमाणे रक्कम अदा केली आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | रक्कम रु. | आयकर वजाती | निव्वळ रक्कम रु. | प्रमाणक क्र. व दि |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MH-10-P1007 कॉम्पॅक्टर | 1,34,260/- | 3360 | 1,30,900/- | 3106 20/10/2014 |

DRAFT

याबाबत खालील अनियमितता आहे.

1) कॉम्पॅक्टर MH-10-P1007 नस्तीमधील पृष्ठ क्र. 35 वर कनिष्ठ अभियंता (यंत्र) कार्यशाळा विभाग यांनी दरपत्रक संकेत स्थळावर प्रसिध्द करणेसाठी सिस्टिम मॅनेजर सांगली यांना दि.18/10/2013 रोजी पत्र दिले आहे. संकेतस्थळावर दरपत्रक प्रसिध्द केल्याची प्रत नस्ती सोबत जोडलेली नाही.

2)उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-1093/2635 उद्योग/6 दि. 16/07/1993 नुसार 50 हजाराचे वरील दुरुस्तीच्या कामाची निविदा मागविणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने निविदा न मागविता दरपत्रके काढून MH-10-P1007 कॉम्पॅक्टर या वाहनाची दुरुस्ती करुन घेतलेली आहे.याबाबत अर्धसमास पत्र क्र. 75 दि.26/02/2016 रोजी निर्गमित केले असता वाहन विभागाचे उत्तर दि. 26/03/2016 रोजी प्राप्त झाले असून उत्तरामध्ये निविदा न मागविता कोटेशन मागवुन दुरुस्ती केल्याची बाब मान्य करण्यात आली आहे.

## *30 वाहन विभागातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2555.20/-

***वाहन क्रमांक एमएच-10 पी-1002 या वाहनाच्या लॉगबुक व तसलमात रजिस्टरची तपासणी केली असता तसलमात रजिस्टरमध्ये 40 लिटर डीझेलचा खर्च जास्त दाखविला आहे. तसेच वाहनांचे लॉगबुक तपासले असता लॉगबुकमधील काही रकाने अपूर्ण ठेवण्यात आले आहेत.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वाहन विभागाचे 2013-2014 या वर्षाचे लेखापरीक्षण केले असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 153 नुसार नमुना127 प्रमाणे लॉगबुक ठेवण्यात आले आहे. तसेच तसलमात रजि. क्रमांक 108 नियम 104 प्रमाणे ठेवणेत आले आहे.वाहन विभागाकडे 111 वाहने आहेत.त्यातील निवडक वाहनांचे लॉगबुक, इंडेन बुक व तसलमात नोंदवहीची तपासणी करुन या बाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र. 71, दि.26/02/2016 रोजी निर्गमित केला असुन यंत्रशाळा विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास दिलेले नाही.याबाबत खालील अनियमितता दिसुन आल्या आहेत.

1)वाहन क्रमांक एमएच-10पी-1002 या वाहनाच्या लॉगबुकची तपासणी केली असता दि. 13/03/2014 रोजी 60 लिटर डिझेल घेतल्याची नोंद आहे. संबंधित वाहनाच्या तसलमात रजिस्टरची तपासणी केली असता दि. 13/03/2014 रोजी 100 लिटर डिझेल घेतल्याची नोंद आहे. लॉगबुक व तसलमात नोंदवहीमध्ये 40 लिटर डिझेलचा फरक दिसुन येतो. डिझेलचा प्रती लिटर दर 63.88 प्रमाणे 40 लिटरसाठी (40*63.88) रु. 2555.2/- जास्त खर्च तसलमात रजिस्टरमध्ये दाखविल्याचे दिसून येते.

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 153 नुसार नमुना 127 प्रमाणे ठेवण्यात आलेल्या लॉगबुक मध्ये 13 रकाने आहेत ते खालीलप्रमाणे 1) दिनांक 2) मोटार घरातुन वाहन गेल्याची वेळ 3) वाहन मोटार घरात परत आल्याची वेळ 4) प्रवासाची सुरवात 5) प्रवासाचा शेवट 6) सुरवातीचे अंतर (किलो मिटर) 7) नोंद केलेल्या प्रवासाचे अंतिम ठिकाण 8) धावलेल्या कि.मी.ची संख्या 9) वापरलेले पेट्रोल/डिझेलचे लिटर्सचे प्रमाण 10) प्रमाणक क्रमांक 11) प्रवासाचे प्रयोजन 12) प्रवास करणा-या अधिका-यांचे नांव व पदनाम 13) शेरा

खालील काही वाहनांचे लॉगबुक तपासले असता काही रकाने अपूर्ण आहेत.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | लॉगबुक मधील अपूर्ण |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रकाने |
| 1 | MH-10-P-23 | डंपर प्लेसर | अनु.क्र.3) वाहन मोटार घरात परत आल्याची वेळ 4) प्रवासाची सुरवात 5) प्रवासाचा शेवट 10) प्रमाणक क्रमांक |
| 2 | MW-E-P-5003 | कचरा ट्रक | |
| 3 | MH-10-P-1020 | मैला सेक्शन व्हॅन | |
| 4 | MH-10-A-6025 | कचरा ट्रक | |
| 5 | MH-10-P-1044 | शववाहिका | |
| 6 | MH-10-S-4676 | ट्रॅक्टर | |

सदरचे रकाने अपुर्ण ठेवलेने सदरची वाहने कार्यशाळेमध्ये किती वाजता परत आली. तसेच सदरच्या वाहनांनी दुस-या दिवशी प्रवासास किती वाजता सुरवात केली. त्यांना दिवसामध्ये नेमुन दिलेले कचरा उठावाचे काम योग्य रितीने पार पाडले किंवा नाही याबाबतची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

DATPKCM7101 (Ref No : 71)

### *31 डंपर प्लेसर MH-10-P-22 च्या दुरुस्ती खर्चामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***या कामाची निविदा संकेत स्थळावर प्रसिध्द केल्याची प्रत नस्तीसोबत नाही. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-1093/2635 उद्योग/6 दि.16 जुलै 1993 नुसार रु. 50 हजाराचे वरील वाहन दुरुस्ती कामाची निविदा मागविणे आवश्यक असतांना त्यानुसार महापालिकेने निविदा न मागविता दरपत्रके मागवुन वाहनाची दुरुस्ती करुन घेतलेली आहे.***

यंत्रशाळा विभागाची कार्यालयीन टिपणी दि. 20/04/2013 नुसार सांगली मिरज कुपवाड

DRAFT

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे डंपर प्लेसर MH-10-P-22 हे वाहन दैनंदिन कचरा उठाव कामाकरिता वापरात आहे. सदर वाहन 2003 मॉडेलचे असुन त्याचा वापर 10 वर्षापेक्षा जास्त झालेला आहे. सततच्या वापराने वाहनाचे चॅसी कट झाली असून दरवाजे, टपावरील पत्रा, केबिनच्या मागील पत्रा सडलेला असुन अरुंद रस्त्यावरील वापराने वाहन ब-याच वेळा घासले गेल्यामुळे वाहनाचा कलर उडालेला आहे. हायड्रोलिक सिस्टिमचा एम.एस. पाईप सडल्याने वारंवार प्रेशरने पाईप फुटुन ऑईल लिकेज होत आहे. सदर वाहनाच्या दुरुस्तीसाठी स्थानिक कारखानदाराकडून दुरुस्ती बाबत कोटेशन घेतले असता त्यामध्ये रक्कम रुपये. 1,59,000/- पर्यंत खर्च येणार असल्याचे नमूद आहे. उपआयुक्त यांनी दि. 29/04/2013 रोजी खर्चास मान्यता दिली आहे. सदरचा खर्च (027) व साफसफाई B-1208 वाहन देखभाल दुरुस्ती रक्कम रु.20 लाख मधून होणार आहे. निविदा संकेत स्थळावर प्रसिध्दी करणेस उपायुक्त यांनी दि. 30/04/2013 रोजी मान्यता दिली आहे. परंतु वाहन विभागाने महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर निविदे ऐवजी दरपत्रके मागणीची जाहिरात दि. 22/05/2013 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन दरपत्रक भरण्याची मुदत दि. 23/05/2013 ते दिनांक. 04/06/2013 दुपारी 4.00 वाजेपर्यंत देण्यात आली होती. या कामासाठी खालील प्रमाणे एकूण तीन दरपत्रकप्राप्त झाले असुन दि. 05/06/2013 रोजी उघडण्यात आले आहेत.

| अ.क्र. | कोटेशनधारकांची नांवे | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | बारगीर शो मेकर, सांगली. | 1,74,400/- |
| 2 | सांगली गॅरेज, सांगली. | 1,69,500/- |
| 3 | रोशनी गॅरेज, सांगली. | 1,54,618/- |

सर्वात कमी दराचे कोटेशन रोशनी गॅरेज सांगली यांचे स्विकृत करण्यात आले आहे. उपआयुक्त निर्णय क्र. 104/13-14 दि. 25/07/2013 कोटेशन धारकास कामाची समज दि.29/07/2013 देण्यात आली आहे. या कामाच्या करारपत्रावर उपायुक्त यांची स्वाक्षरी दि. 25/10/2013 केली असुन कामाचे आदेश दि. 26/10/2013 रोजी दिले आहे.वाहन दुरुस्तीची वर्क ऑर्डर मान्य कोटेशन धारकास दि. 29/10/2013 रोजी दिली असुन वाहन दुरुस्तीचे काम दि. 07/11/2013 रोजी पुर्ण झाले आहे. महानगरपालिकेने दुरुस्तीनंतर वाहन दि.15/11/2013 रोजी ताब्यात घेतले आहे. मे. रोशनी गॅरेज, सांगली.यांना खालीलप्रमाणे रक्कम अदा केली आहे.

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल डंपर** | **रक्कम रुपये** | **आयकर वजाती रु.** | **निव्वळ रक्कम रु.** | **प्रमाणक क्र. व दिनांक** |
|---|---|---|---|---|---|



DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **प्लेसर MH-10-P-22 दुरुस्ती** | **1,54,618/-** | **3865/-** | **1,50,723/-** | **5122 09/12/2013** |

या कामाची नस्ती, देयक व प्रमाणके यांची तपासणी करुन याबाबत अर्धसमास पत्र क्र.74 दि.26/02/2016 रोजी निर्गमित केले असुन वाहन विभागाने त्याचे अनुपालन दि.23/03/2016 रोजी सादर केले आहे. याबाबत खालील अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1)दरपत्रके संकेत स्थळावर दि. 22/05/2013 रोजी प्रसिध्द केलेचे नस्तीमध्ये नमुद आहे. परंतु दरपत्रके प्रसिध्दीची प्रत नस्ती मध्ये जोडलेली नाही.

2) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-1093/2635 उद्योग/6 दि.16 जुलै 1993 नुसार रु. 50 हजाराचे वरील कामाची निविदा मागविणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने निविदा न मागविता दरपत्रके मागवुन डंपर प्लेसर MH-10-P-22 या वाहनांची दुरुस्ती करुन घेतलेली आहे. अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन वाहन विभागाने दि.23/03/2016 रोजी दिले असुन अनुपालनामध्ये सदर दुरुस्तीची प्रक्रीया मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, प्रकरण 5 संविदा 2 (1) अन्वये दोन लाख रुपये पेक्षा अधिक किंवा महानगरपालिका राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी विहित करील अशा त्याहून अधिक रक्कमेपेक्षा अधिक खर्च होणार असेल असे कोणतेही काम करण्याबाबत किंवा माल पुरविण्याबाबत वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवुन अशा संविदेसाठी निविदा मागविणे आवश्यक आहे. (परंतु दोन लाख रुपयापेक्षा कमी रक्कमेच्या कोणत्याही संविदेची निविदेची सुचना महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल) या नियमानुसार कार्यवाही केल्याचे नमुद आहे. परंतु या नियमाने दोन लेखापेक्षा कमी रक्कमेच्या कामाची निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची अट नमुद असताना दरपत्रके मागवुन दुरूस्तीचे काम केल्याने दिलेले अनुपालन संयुक्तिक नाही.

3) या वाहन दुरुस्तीच्या कामाच्या नस्तीची सुरूवात दि.20 एप्रिल 2013 रोजी केली असुन सक्षम अधिका-यांच्या मंजुरीने कामाची दुरुस्ती करुन वाहन ताब्यात दि.15/11/2013 रोजी घेण्यात आले आहे. सदर प्रक्रीयेमध्ये 7 महिन्याचा विलंब झाला असल्याने सदर वाहनाचा वापर करता आला नसल्याचे दिसून येते.

DATPKCM7101 (Ref No : 74)

***35 सुधारित वेतन बँड मध्ये कमाल टप्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांना एक वेतनवाढ जादा दिल्याने व जादा ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कमेच्या झालेल्या अतिप्रदानाबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 68361.00/-

***6 वे वेतन आयोग सुधारीत वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर पोहोचल्यावर त्याच दिवशी एक वेतनवाढ जादा देवुन उच्च वेतनबँड मंजूर करण्यात आला आहे. तसेच त्यांचे ग्रेडवेतन रु.1600 वरून रु.1800 करण्यात आले असल्याचे आढळुन आले. परंतु महाराष्ट्रनागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009 मधील 10 मधील परि. 4 नुसार सुधारीत वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणा-या कर्मचा-यास लगतचा उच्च वेतनबँड मंजूर करण्यात यावा. हा वेतनबँड मंजूर करताना त्याला एक वेतनवाढीचा फायदा देण्यात यावा असे नमुद असताना या सोबत जोडलेल्या यादीतील कर्मचा-यांना वेतनबँडच्या अंतिम टप्पावर पोहचलेल्या दिवशीच एक वेतनवाढीचा फायदा दिल्याने व ग्रेड वेतन 1600 वरुन वाढवुन 1800 केल्याने त्यांना वेतन व भत्ते, निवृत्ती वेतन/ कु.नि.वेतन उपदान व अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झाले आहे.***

सांगली महानगरपालिकेकडील सेवानिवृत्ती कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता खालील कर्मचारी यांना 6 वा वेतन आयोग सुधारीत वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर पोहोचल्यावर त्याच दिवशी एक वेतनवाढ जादा देवुन उच्च वेतनबँड मंजूर करण्यात आला आहे तसेच त्यांचे ग्रेडवेतन रु.1600 वरून रु.1800 करण्यात आले असल्याचे आढळुन आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009 मधील 10 मधील परि. 4 नुसार सुधारीत वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणा-या कर्मचा-यास लगतचा उच्च वेतनबँड मंजूर करण्यात यावा. हा वेतनबँड मंजूर करताना त्याला एक वेतनवाढीचा फायदा देण्यात यावा असे नमुद असताना या सोबत जोडलेल्या यादीतील कर्मचा-यांना वेतनबँडच्या अंतिम टप्पावर पोहचलेल्या दिवशीच एक वेतनवाढीचा फायदा दिल्याने व ग्रेड वेतन 1600 वरुन वाढवुन 1800 केल्याने त्यांना वेतन व भत्ते, निवृत्ती वेतन/ कु.नि.वेतन उपदान व अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झाले असल्याचे आढळुन आले आहे. याबाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र. 32 दि. 31/10/2015 रोजी निर्गमित केला असुन आस्थापना विभागाने त्याचे अनुपालन दि. 01/01/2016 रोजी सादर केले आहे. अनुपालनामध्ये अतिप्रदान झालेल्या सेवानिवृत्ती वेतन, सेवा उपदान व अंशराशीकरण रक्कम यांची वसुली करण्याची कार्यवाही करीत असल्याचे नमुद केले आहे. सदर अनुपालन विचारात घेवुन लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या अहवाला सोबतच्या (**परिशिष्ठ क्र.08)** मध्ये नमुद केलेले कर्मचारी यांना खालीलप्रमाणे वेतन व भत्ते, निवृत्ती वेतन/ कु.नि.वेतन, उपदान व अंशराशीकरण यांचे अतिप्रदान झाले आहे.

1) श्री.हैबत लक्ष्मण गोरे -सफाई कामगार (अतिप्रदान रक्कम रु.24243 व अनुषंगिक भत्ते) , श्री.बाबुराव नामदेव भोसले -सफाई कामगार (अतिप्रदान रक्कम रु.24363 व अनुषंगिक भत्ते), श्री.परशराम सखाराम माळी -सफाई कामगार (अतिप्रदान रक्कम रु.775 व अनुषंगिक भत्ते), शफीमहम्मद नुरमहम्मद शेख -सफाई कामगार व श्रीम. खुर्शिदबानु शफीमहम्मद शेख (कुटुंब

DRAFT

निवृत्तीधारक) एकत्रित रक्कम (अतिप्रदान रक्कम रु.18980 व अनुषंगिक भत्ते) यांचे अतिप्रदान झाले आहे.

**एकूण वसुलपात्र रक्कम :-** रु.68361 + अनुषंगिक भत्ते

DATRNDM7201 (Ref No : 32)

## ***36 अर्हताकारी सेवा 20 वर्ष पेक्षा कमी असताना स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजुर करुन निवृत्ती वेतन अंशराशीकरण रक्कम आदा केलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 269783.00/-

***राजू फुलया मद्रासी, सफाई कामगार यांची अर्हताकारी सेवा 17 वर्षे 3 महिने 19 दिवस झाली असताना व ती 20 वर्षा पेक्षा कमी असताना स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजुर करण्यात आली आहे. तसेच कर्मचा-यास फक्त सेवा उपदान देय असताना निवृत्ती वेतन व अंशराशीकरण रक्कम आदा केल्याने सदर कर्मचा-यास निवृत्ती वेतन व अंशराशीकरण रक्कमेचे अतिप्रदान झाले आहे.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील सेवानिवृत्ती कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची व निवृत्ती वेतन प्रकरणाची तपासणी केली असता, श्री. राजू फुलया मद्रासी, सफाई कामगार यांना प्रमाणक क्र. 166 दि. 12/12/2013 अन्वये सेवानिवृत्ती वेतन व उपदानाची रक्कम रु. 107008/- व प्रमाणक क्र. 234 दि. 25/02/2014 अन्वये अंशराशीकरणची रक्कम रु. 162775/- अदा केल्याचे आढळुन आले आहे. सदर कर्मचा-याची अर्हताकारी सेवा 17 वर्षे 3 महिने 19 दिवस असताना व ती 20 वर्षा पेक्षा कमी असतना स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर केली आहे. सदर कर्मचा-यास फक्त सेवा उपदान देय असताना निवृत्ती वेतन व अंशराशीकरण रक्कम आदा केल्याने कर्मचा-यास निवृत्ती वेतन व अंशराशीकरण रक्कमेचे अतिप्रदान झाले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 34 दि. 31/10/2015 रोजी निर्गमित केला असुन आस्थापना विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.

राजु फुलय्या मद्रासी यांचे स्वेच्छा सेवानिवृत्ती बाबतच्या क्र. मनपा/आस्थावि/13/2013 दि. /1/2013 रोजीचे टिपणीचे आवलोकन केले असता, मद्रासी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीस परवानगी मिळणेबाबत तीन महिन्याची लेखी नोटीस प्रशासनास दि. 29/12/2012 रोजी दिलेली आहे व आयुक्त यांची प्रस्तावास दि. 14/01/2013 रोजी मान्यता झाली आहे. मद्रासी यांचे सेवापुस्तकाची पडताळणी केली असता त्यांची स्कॅव्हेंजर या पदावर नेमणूक दिनांक 22/12/1988 रोजी झाली आहे. त्यांना मा. आयुक्त यांचे आदेश क्र. 774 दि. 14/01/2013 अन्वये दि. 29/03/2013 रोजी स्वेच्छा सेवा निवृत्ती मंजूर करण्यात आली. त्यांनंतर आस्थापना विभागाने क्र.मनपा/आस्थावि.14/निरंक/ 2013-14 दि.

24/09/2013 ने श्री. मद्रासी यांना निवृत्तीवेतन व आदा करण्यास मंजुरी मिळणेबाबत कार्यालयीन टिपणी सादर केली आहे. सदर टिपणी मध्ये सेवा निवृत्ती मंजुरीस अनुसरुन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 10(1)व नियम 66 अन्वये त्यांना आदेश क्र. मनपा/आस्थावि/13/391/2012-13 दि. 11/03/2013 ने दि. 29/03/2013 रोजी कार्यालयीन वेळेनंतर महानगरपालिकेच्या सेवेमधून सेवानिवृत्त करण्यात आले आहे. श्री. मद्रासी यांची दि. 22/1/1988 पासून दि. 29/03/2013 अखेर एकुण सेवा 24 वर्ष 03 महिने 07 दिवस इतकी झाली असून त्यांच्या सेवेतील गैरहजर कालावधी 06 वर्ष 11 महिने 18 दिवस वजा करुन अर्हताकारी सेवा 17 वर्ष 3 महिने 19 दिवस झाली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील आवश्यक ते सर्व विहित नमुने भरुन घेवून नमुना 2 मध्ये निवृत्ती वेतन उपदान व कुटुंब निवृत्ती वेतन निर्धारित केले असल्याचे टिपणीमध्ये नमुद आहे व या टिपणीस उपायुक्त यांची दि. 13/10/2013 रोजी मान्यता झाली आहे. तसेच पृष्ठ क्र. टभ्-9 आस्थापना विभागाच्या दि. 30/10/2013 च्या टिपणीमध्ये उपायुक्त आदेश क्र. 79/2013-14 दि. 03/10/2013 ने श्री. मद्रासी यांना दि. 29/03/2013 पासून निवृत्तीवेतन रु. 3759/- व सेवा उपदान रु. 65975/- देण्यास मंजुरी मिळाली असल्याचे नमूद आहे.

श्री.मद्रासी यांचे सेवापुस्तक व सेवानिवृत्तीची नस्ती तपासून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 चे नियम 66 प्रमाणे शासकिय कर्मचा-यांला त्याची 20 वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर 3 महिन्यांची लेखा नोटीस देवून सेवेतून केंव्हाही सेवानिवृत्त होता येईल, असे नमुद आहे. श्री. राजु फुलया मद्रासी यांचा एकूण सेवा कालावधी 24 वर्षे 3 महिने 7 दिवस आहे. परंतु त्यांच्या सेवेतील गैर हजर कालावधी 6 वर्षे 11 महिने 18 दिवस हा अर्हताकारी सेवेतून कमी करुन त्यांना 17 वर्षे 3 महिने 19 दिवस अर्हताकारी सेवा असताना निवृत्ती वेतन उपदान व अंशराशीकरण रक्कम अदा केली आहे.

2) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 वधील प्रकरण 10 मध्ये निवृत्तीवेतनाच्या आणि उपदानाच्या रक्कमांचे निर्धारण व प्राधिकृती बाबत नियम दिले आहेत. त्यामधील नियम क्र. 121 मध्ये निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे पूर्ण करण्याबाबतचे एकुण तीन टप्पे दिले आहेत. त्यानुसार नियम क्र. 121 दुसरा टप्पा- सेवापुस्तकामधील उणिवा भरुन काढणे (एक) नुसार कार्यालय प्रमुख सेवा पडताळणीच्या प्रमाणपत्रांची छाननी करताना निवृत्तीवेतनार्ह वेतन आणि निवृत्तीवेतनाकरीता अर्हतकारी सेवा निश्चित करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष संबंध असलेल्या इतर कोणत्याही त्रुटी अपूर्णता किंवा उणिवा देखील निदर्शनास आणुन त्यानंतर सेवापुस्तकामधील नोंदीच्या आधारे निवृत्त वेतनासाठी अर्हतकारी सेवा निश्चित करील असे नमुद आहे. सदर नियमानुसार श्री. मद्रासी यांची अर्हतकारीसेवा 20 वर्षापेक्षा कमी झाली असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ते सेवा निवृत्तीस पात्र नसल्याने आस्थापना विभागाने त्यांचे स्वेच्छासेवानिवृत्ती प्रकरण नामंजूर करणे आवश्यक होते. परंतु आस्थापना विभागाने त्यांचे स्वेच्छासेवानिवृत्तीचे प्रकरण मंजुर करुन त्यांना सेवानिवृत्तीवेतन व अंशराशीकरणाचे लाभ दिल्याने त्यांना आदा केलेली रक्कम रु. 269783/- चे अतिप्रदान झाले आहे.

DATRNDM7201 (Ref No : 34)

DRAFT

## *37 पदोन्नती साखळीतील पदोन्नतीचे पद नसताना एकाकी पदानुसार ग्रेडवेतन मंजूर करणे ऐवजी चुकीचे ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***कर्मचा-यांना त्यांचे कार्यरत पदास पदोन्नती साखळीतील पदोन्नतीचे पद नसताना एकाकी पदानुसार ग्रेडवेतन मंजूर करणे ऐवजी चुकीचे ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कम अर्जित रजा रोखीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झाल्याचे आढळून आले आहे.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील सेवानिवृत्ती कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता खालील कर्मचा-यांना त्यांचे कार्यरत पदास पदोन्नती साखळीतील पदोन्नतीचे पद नसताना एकाकी पदानुसार ग्रेडवेतन मंजूर करणे ऐवजी चुकीचे ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कम अर्जित रजा रोखीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झाल्याचे आढळून आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 35 दि. 31/10/2015 अन्वये कळविले असता विभागाने त्याचे अनुपालन दि. 31/12/2015 रोजी सादर केले असुन त्यामध्ये श्री. गंगाधर शिंदे वाहन चालक व श्री. मारुती पाटील उद्यान पर्यवेक्षक यांना आक्षेपामध्ये नमुद असल्याप्रमाणे अतिप्रदान झालेल्या सेवानिवृत्ती वेतन, सेवा उपदान व अंशराशीकरण रक्कम यांची वसुली करण्याची कार्यवाही ठेवत असल्याचे नमुद केले आहे. व श्री. बाबु शिंदकर जलयंत्र वाचक यांना देण्यात आलेले ग्रेड वेतन बरोबर व योग्य असल्याचे नमुद केले आहे. सदर अनुपालन विचारात घेवून लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) सांगली महानगरपालिका कडील कर्मचारी/अधिकारी यांना दि. 20/07/2001 च्या शासन निर्णया नुसार अश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ व दि. 01/04/2010 च्या शासन निर्णयानुसार सुधारीत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ मंजूर करुन त्याप्रमाणे वेतन निश्चिती करुन वेतन व भत्ते यांचे प्रदान करण्यात आले आहे. परंतु ज्या पदांना साखळी पदोन्नतीमध्ये पदोन्नतीचे पद उपलब्ध नाही अशा पदांना शासन निर्णय दि. 05/07/2010 व शासन निर्णय दि. 06/09/2014 व दि. 10/02/2009 च्या शासन निर्णया प्रमाणे ग्रेडवेतन मंजूर करणे आवश्यक होते परंतु खालील कर्मचा-यांना जादाचे ग्रेडवेतन मंजूर करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे/ अधिकाऱ्यांचे नांव | एकाच पदावरील 12 वर्ष /24 वर्ष | मंजूर केलेले ग्रेड | शासन निर्णय दि.06/02/2014 नुसार मंजूर | फरक रु. |
|---|---|---|---|---|---|

| | व पदनाम | पूर्ण दिनांक | वेतन रु. | करावयाचे ग्रेड वेतन रु. | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | गंगाधर गुंडाप्पा शिंदे अग्निशमन वाहनचालक | 12 वर्ष पूर्ण दि.01/10/1994<br>24 वर्ष पूर्ण दि. 01/10/2006 | 2400/-<br>800/- | 2200/-<br>2750/- | 200/-<br>50/- |
| 2 | बाबू राजू शिंदकर जलयंत्र वाचक | मुकादम पदावर 24 वर्ष पूर्ण दि. 17/10/2010 | 4200/- | 2950/- | 1250/- |
| 3 | मारुती बापू पाटील उद्यान पर्यवेक्षक | पर्यवेक्षक पदावर 24 वर्ष पूर्ण दि. 01/10/2006 | 5400/- | 5100/- | 300/- |

सदर कर्मचा-यांची पदे एकाकी असल्याने व पदोन्नतीचे पद उपलब्ध नसल्याने अशा पदांना शासन निर्णय दि. 05/07/2010 व शासन निर्णय दि. 06/09/2014 व दि. 10/02/2009 च्या शासन निर्णया प्रमाणे ग्रेडवेतन मंजूर करणे आवश्यक असल्याने या कर्मचा-यांची फेर वेतन निश्चीती करुन अतिप्रदान झालेल्या वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांची वसूली करणे आवश्यक आहे.

2) श्री. बाबु शिंदकर हे पूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे जलयंत्र वाचक म्हणून कार्यरत होते. त्यांची सेवा 31/08/1998 रोजी महापालिकेकडे वर्ग केल्यानंतर त्यांना महापालिका पाणीपुरवठा विभागाकडे मिटर रिडर कम क्लार्क असे पद असल्याने मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये जकात विभागाकडे बदली केली. त्यामुळे त्यांना देण्यात आलेले 24 वर्षानंतरचे ग्रेड वेतन रु. 4200/- बरोबर व योग्य असल्याचे अनुपालनामध्ये नमुद केले आहे. परंतु मिटर रिडर कम क्लार्क या पदावरुन वरीष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती देण्यात येत असलेबाबतची कोणतीही कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नसल्याने त्यांना एकाकी पदासाठी असलेली वेतनश्रेणी देय असल्याने शासन निर्णयानुसार एकाकी पदाची वेतनश्रेणी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेसाठी देवून त्याप्रमाणे त्यांची फेरवेतननिश्चिती करण्यात यावी.

DATRNDM7201 (Ref No : 35)

DRAFT

## *38 चुकीच्या वेतननिश्चीतीमुळे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान व अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 91490.00/-

***महानगरपालिकेच्या खालील सेवानिवृत्त कर्मचा- यांना/ अधिका- यांना 6 व्या वेतन आयोगामध्ये आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देताना एक वेतनवाढ जादा मंजुर केल्याने तक्त्यात त्यांच्या नांवासमोर नमुद असलेल्या दिनांकापासून वेतन व भत्ते तसेच त्यांचे सेवानिवृत्ती नंतर निवृत्ती वेतन/ कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान, अंशराशीकरण रक्कम रु. 91490/- यांचे अतिप्रदान झाले आहे.***

DRAFT

सांगली महानगरपालिका कडील सेवानिवृत्ती कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता या सोबत जोडलेल्या यादीमधील कर्मचा-यांना/अधिका-यांना चुकीच्या वेतननिश्चीतीमुळे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण, अर्जित रजा रोखीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झाले असल्याचे आढळून आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 36 दि. 31/10/2015 अन्वये कळविले असता विभागाने त्याचे अनुपालन दि. 01/01/2016 रोजी सादर केले असुन त्यामध्ये आक्षेपामध्ये नमुद असल्याप्रमाणे अतिप्रदान झालेल्या सेवानिवृत्ती वेतन, सेवा उपदान व अंशराशीकरण रक्कम यांची वसुली करण्याची कार्यवाही ठेवत असल्याची नमुद केले आहे. सदर अनुपालन विचारात घेवून लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) खलील सेवानिवृत्त कर्मचा-यांना/अधिका-यांना 6 व्या वेतन आयोगामध्ये आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देताना एक वेतनवाढ जादा मंजुर केल्याने खालील तक्त्यात त्यांच्या नांवासमोर नमुद असलेल्या दिनांकापासून वेतन व भत्ते तसेच त्यांचे सेवानिवृत्ती नंतर निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झाले आहे.

| अ.क्र. | कर्मचारी/ अधिकारी नांव पदनांम | चुकीची वेतन निश्चीती दिनांक | तपशिल | अतिप्रदान रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | राजाराम प्रल्हाद खंडागळे, | 01/01/2006 | 6 वे वेतन आयोग वेतन | 1.वेतन :- दि. 1/10/2009 पासुन दर महा रु. 70 + म.भत्ता+घरभाडे भत्ता<br>2. निवृत्ती वेतन:- दि. 1/12/2013 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कनिष्ठ लिपिक | | निश्चीती चुकीची झाली आहे. | पासुन दर महा रु. 40 + म.भत्ता+घरभाडे भत्ता<br>3. उपदान :-रु. 1040/-<br>4. अंशराशीकरण रक्कम :- रु. 1622/-<br>5. अर्जित रजा रोखीकरण :- रु. 1399/- |
| 2 | शरद श्रीधर गोसावी, वरिष्ठ लिपिक | 01/07/2009 | सुधारीत सेवा अंतर्गत अश्वासित प्रगती योजना वेतन निश्चीती चुकीची झाली आहे. | 1.वेतन :- दि. 1/10/2009 पासुन दर महा रु. 450 + म.भत्ता+घरभाडे भत्ता<br>2. निवृत्ती वेतन:- दि. 1/7/2013 पासुन दर महा रु. 230 + म.भत्ता+घरभाडे भत्ता<br>3. उपदान :- रु. 6670/-<br>4. अर्जित रजा रोखीकरण :- रु. 8740/- |
| 3 | शीला रामचंद्र पवार, वरिष्ठ लिपिक | 01/07/2008 | सुधारीत सेवा अंतर्गत अश्वासित प्रगती योजना वेतन निश्चीती चुकीची झाली आहे. | 1.वेतन :- दि. 1/10/2009 पासुन दर महा रु. 450 + म.भत्ता+घरभाडे भत्ता<br>2. निवृत्ती वेतन:- दि. 1/11/2013 पासुन दर महा रु. 230 + म.भत्ता+घरभाडे भत्ता<br>3. उपदान :- रु. 6900/-<br>4. अंशराशीकरण रक्कम :- रु. 9242/-<br>5. अर्जित रजा रोखीकरण :- रु. 7837/- |
| 4 | बाबू राजू शिंदकर, | 17/10/2010 | सुधारीत सेवा | 1.वेतन :- दि. 1/10/2009 पासुन दर महा रु. 420 + म.भत्ता+घरभाडे भत्ता |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | जलयंत्र वाचक | | अंतर्गत अश्वासित प्रगती योजना वेतन निश्चीती चुकीची झाली आहे. | 2. निवृत्ती वेतनः- दि. 1/7/2013 पासुन दर महा रु. 230 + म.भत्ता+घरभाडे भत्ता<br>3. उपदान :- रु. 6900/-<br>4. अंशराशीकरण रक्कम :- रु. 9242/-<br>5. अर्जित रजा रोखीकरण :- रु. 7837/- |
| 5 | दादासाहेब आनंदा देवकुळे, जलयंत्र दुरुस्तीकार | 01/10/2006 | सुधारीत सेवा अंतर्गत अश्वासित प्रगती योजना वेतन निश्चीती चुकीची झाली आहे. | 1.वेतन :- दि. 1/10/2009 पासुन दर महा रु. 450 + म.भत्ता+घरभाडे भत्ता<br>2. निवृत्ती वेतनः- दि. 1/6/2013 पासुन दर महा रु. 225 + म.भत्ता+घरभाडे भत्ता<br>3. उपदान :- रु. 6975/-<br>4. अंशराशीकरण रक्कम :- रु. 9040/-<br>5. अर्जित रजा रोखीकरण :- रु. 8046/- |

DRAFT

तरी या कर्मचा-यांची उपरोक्त परिशिष्ठ मध्ये नमुद असलेप्रमाणे वेतन, निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन व त्यावरील अनुषंगीक महागाई भत्ता व घरभाडे भत्ता यामधील जादा अदा रक्कम परिगणीत करुन वसूल करणे आवश्यक आहे. तसेच वरील कर्मचा-यांना अतिप्रदान झालेल्या उपदानची एकुण रक्कम रु. 28485/- अंशराशीकरण एकुण रक्कम रु. 29146/- व अर्जित रजा रोखीकरण एकुण रक्कम 33859/- असे एकुण 91490/- वसुल करणे आवश्यक आहे

DATRNDM7201 (Ref No : 36)

## *39 वाढीव कुटुंब निवृत्ती वेतन विहीत मुदतीनंतर कमी केले नसल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन  मनपा निधी*

*अनियमितता कलम  : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 135570.00/-

***महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्ती वेतन) 1982 चे नियम 116(4)(अ)(एक) व (दोन) नुसार वाढीव कुटुंब निवृत्ती वेतन 7 वर्ष किंवा कर्मचा-याचे 65 वर्ष या पैकी जे अगोदर होईल त्या दिनांका पर्यंत देय असताना कांही कुटुंब निवृत्तीधारकांना 7 वर्षाच्या मुदतीनंतरही उच्च दराने कुटुंब निवृत्ती वेतन अदा केल्याने कुटुंब निवृत्ती वेतन व अनुषंगीक भत्त्याची रक्कम रु. 1,35,570/- चे अतिप्रदान झाले आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील सेवानिवृत्त /मयत कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन देयकाची तपासणी केली असता खालील कुटुंब निवृत्ती वेतनधारकांचे वाढीव कुटुंब निवृत्ती वेतनाची रक्कम विहीत मुदतीनंतर कमी करणे आवश्यक असताना त्यांना जादा कुटुंब निवृत्ती वेतन अदा केल्याचे आढळून आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 36 दि. 31/10/2015 अन्वये कळविले असता विभागाने त्याचे अनुपालन दि. 05/12/2015 रोजी सादर केले असुन त्यामध्ये आक्षेपामध्ये नमुद असल्याप्रमाणे अतिप्रदान झालेल्या खालील कुटुंब निवृत्ती वेतनधारकाकडून कुटुंब निवृत्ती वेतनाची रक्कम रु. 1,35,570/- यांची वसुली करण्याची कार्यवाही ठेवत असल्याचे नमुद केले आहे. तसेच त्यांना योग्य त्या दराने कुटुंब निवृत्ती वेतन माहे नोव्हेंबर अदा डिसेंबरच्या निवृत्ती वेतन देयकापासून सुरु केल्याचे नमुद केले आहे. ज्या कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना कमी कुटुंब निवृत्तीवेतन अदा झालेले आहे. त्यांची विवरणपत्रे तयार करुन रक्कम अदा करण्यात येईल असे नमुद केले आहे. सदर अनुपालन विचारात घेवून लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कुटुंब निवृत्ती वेतन धारकांचे नाव | दिनांक | देय कुटुंब निवृत्ती वेतन | अदा कुटुंब निवृत्ती वेतन | अतिप्रदान रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सरस्वती बाबासाहेब कांबळे | 31/08/2013 पासून | 2882/- | 3910/- | 47895/- |
| 2 | रजिया बशीर करीम | 01/04/2014 | 2882/- | 4120/- | 47901/- |
| 3 | मंगल दिलीप राक्षे | 01/04/2014 | 2882/- | 3910/- | 39774/- |

DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एकुण | 1,35,570/- |

1) शासन निर्णय दि.22/06/2009 मधील परि. क्र. 8 नुसार कुटुंब निवृत्ती वेतनाची परिगणना मुळ वेतनाच्या 30% अशा एकरुप दराने काढणे आवश्यक आहे. तसेच सेवेत असलेल्या ज्या कर्मचा-याचा मृत्यु सेवेत असताना दि. 01/01/2006 नंतर झाला असेल/ होईल अशा कर्मचा-यांच्या वारसांना 10 वर्षा पर्यंत उच्च दराने कुटुंब निवृत्ती वेतन मिळेल असे नमुद आहे. तसेच जे कर्मचारी सेवानिवृत्तीनंतर मयत झाले आहेत. त्यांच्या वारसांना महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन 1982 मधील कुटुंब निवृत्ती वेतन 1964 च्या तरतुदी लागू आहेत. त्यांना 10 वर्षे पर्यंत उच्च दराने कुटुंब निवृत्ती वेतन न देता विहीत मुदतीनंतर सर्वसाधारण दराने कुटुंब निवृत्ती वेतन देय आहे. परंतु वरील कुटुंब निवृत्ती वेतनधारकांचे बाबतीत ते ज्या कर्मचा-यांचे कुटुंब निवृत्ती वेतन घेत आहेत त्या कर्मचा-यांचा मृत्यू सेवेत असताना झाला नसल्याने सदर कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना उपरोक्त शासन निर्णया नुसार वाढीव कुटुंब निवृत्ती वेतन 10 वर्षापर्यंत न देता महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्ती वेतन) 1982 चे नियम 116(4) (अ) (एक) व (दोन) नुसार वाढीव कुटुंब निवृत्ती वेतन 7 वर्ष किंवा कर्मचा-याचे 65 वर्ष या पैकी जे अगोदर होईल त्या दिनांकापर्यंत देय असल्याने वरील कुटुंब निवृत्तीधारकांना विहित मुदतीनंतरही उच्च दराने कुटुंब निवृत्ती वेतन अदा केल्याने कुटुंब निवृत्ती वेतन व अनुषंगिक भत्त्याची रक्कम रु. 1,35,570/- चे अतिप्रदान झाले आहे.
वसुलपात्र रक्कम :- जादा आदा कुटुंब निवृत्तीवेतनाची रक्कम रु. 1,35,570/-

DATRNDM7201 (Ref No : 37)

## *40 मनपा हद्दीतील रिकाम्या भुखंडावर (मोकळ्या जमीनीवर) कर निर्धारण केले नसल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

DRAFT

वसूलपात्र रक्कम रु. 144438.00/-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 75 नुसार महानगरपालिका हद्दीतील सर्व इमारती वा जमिनी वर कर निर्धारण करणे आवश्यक असताना कुपवाड विभागाकडील रिकाम्या भुखंडावर कर निर्धारण केले नसल्याचे आढळुन आले. त्यामुळे महानगरपालिकेचे महसुली नुकसान होत आहे.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या कुपवाड विभागाकडील 2013-14या आर्थिक वर्षामध्ये नव्याने आकारणी केलेल्या कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता रिकाम्या भुखंडावर कर निर्धारण केले नसल्याचे आढळुन आले आहे . याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 51 दि. 29/01/2016 अन्वये कळविले असता विभागाने त्याचे अनुपालन दि. 18/02/2016 रोजी सादर केले असुन त्यामध्ये विभागाने आक्षेपातील वस्तुस्थीती खरी असुन रिकाम्या भुखंडावर कर निर्धारण करण्याची कार्यवाही पुढ़ील आर्थिक वर्षापासुन करीत असल्याचे नमुद केले आहे.
सदर अनुपालन विचारात घेवून लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 75 नुसार हद्दीतील सर्व इमारती वा जमिनी वर

कर निर्धारण करणे आवश्यक आहे. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये नव्या मालमत्तावर कर निर्धारण करण्यात आले आहे. कर निर्धारण प्रकरणांच्या नस्तीमध्ये सदर मालमत्तावर 2013-14 या वित्तीय वर्षापासुन कर निर्धारण केले असल्याचे आढळुन आले. या नस्तीची तपासणी केली असता मालमत्ता धारकाने या इमारतीचा भुखंड / जमिन पुर्वी खरेदी केल्याचे खरेदीपत्र/ कब्जापट्टी/ 7/12 उतारा/खरेदी पत्र इ. कागदापत्रे नस्तीसोबत जोडली आहेत यावरुन या मालमत्ता धारकांनी सदरचा भुखंड/जमिन 2013-14 पुर्वी खरेदी केलेचे दिसून येते. परंतु या रिकाम्या भुखंडावर महानगरपालिकेने ठरविलेल्या मालमत्ता मासिक भाडे मुल्याचा प्रति चौ.मी. तक्त्यानुसार क्र. 7 मध्ये असलेल्या दरानुसार आकारणी करणे आवश्यक होते. परंतु सोबतच्या **(परिशिष्ठ क्र. 10 )** मध्ये नमुद असलेल्या रिकाम्या भूखंडावर (मोकळया जमिनीवर) त्याप्रमाणे आकारणी करुन कर निर्धारण केलेले नसल्याने महानगर पालिकेस रु. 1,44,438/- चे महसुली उत्पन्न मिळालेले नाही.

2) सुलतान महमद मुजावर स.न. 471/1 प्लॉट नं. 18 मिळकत क्र. 310/113/3 या मोकळ्या जामिनी चे क्षेत्रफळ 297 चौ.मी. जागेस 2013-14 मध्ये खालील सुत्रानुसार रु. 990/- वार्षिक भाडे मुल्यानुसार कर निर्धारण केल्याचे आढळुन आले परंतु 297 चौ.मी.X दर 3/- X10/9 या सुत्राच्या आधारे रु.990/- वार्षिक भाडे मुल्य निश्चीत केले आहे. त्या सुत्राबाबतचे आदेश/परिपत्रक याबाबतचे अभिलेख लेखा परीक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास ज्ञापनाव्दारे कळवुनही सादर केले नसल्याने आकारणी योग्य असल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

3) रिकाम्या भुखंडाच्या करनिर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता वार्षिक भाडेमुल्य आकारणेसाठी रु. 3/- प्रती चौ.मी.हा दर घेण्यात आला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदरचा दर सन 2001 पासून असल्याचे नमुद आहे. परंतु तो कोणत्या ठरावाने ठरविण्यात आला आहे त्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत. सदर दर अत्यल्प असुन महानगरपालिकेस यापासून कमी प्रमाणात महसूली उत्पन्न मिळत असल्याने त्यात सुधारणा करणे

DRAFT

अवश्यक आहे.

**वसुलपात्र रक्कम रु.144438/-**

DATRNDM7201 (Ref No : 51)

## *41 कुपवाड विभागाकडील मालमत्ता कर आकारणी मधील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| ***कुपवाड हद्दीमधील ज्या मालमत्ताधारकांकडे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व भोगवटा दाखला नाही अशी बांधकामे अनधिकृत ठरत असल्याने अशा बांधकामांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 267 अ नुसार नियमीत मालमत्ता/कराव्यतिरिक्त दुप्पट दराने शास्ती लावणे आवश्यक आहे. 2013-14 मध्ये नव्याने आकारणी केलेल्या 138 मालमत्ता पैकी 10 एवढ्या मालमत्ताना दुप्पट दराने शास्ती आकारण्यात आली आहे. परंतु उर्वरीत 128 अवैध बांधकामावर दुप्पट दराने शास्तीची आकारणी केली नसल्याने मनपाचे रु.1,83,532/- एवढे नुकसान 2013-2014 या आर्थिक वर्षा पासुन दरवर्षी होत आहे.*** |

DRAFT

कर संकलन व कर आकारणी विभाग कुपवाड यांचेकडील 2013-14 या वित्तीय वर्षातील नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणापैकी निवडक प्रकरणांची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियममितता आढळुन आल्या.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसुची ड प्रकरण 8 नियम 17 नुसार मालमत्ता धारकाकडून मालमत्तेच्या करपात्र मुल्य व करनिर्धारण बाबत तक्रार, आक्षेप/ हरकत नोंदविण्यासाठी विहित नमुन्यात नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता नियम 75 (5)नुसार मध्ये निर्धारण सूचीतील मालमत्तेच्या करपात्र मुल्य व करनिर्धारण या संबंधातील आक्षेप/ हरकती नोंदविण्यासाठी आवश्यक असलेले पुस्तक, नमुना क्र. 44 मध्ये विहित केल्याप्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. तसेच तपासणीचे परिमाण व आक्षेपांचे निराकरण यांची योग्य ती नोंद या नोंदवहीत प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिका-याच्या/ सक्षम अधिका-याच्या स्वाक्षरीनिशी करणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवली नसल्याने करनिर्धारणाबाबत एकूण किती तक्रारी प्राप्त झाल्या व किती तक्रारींचे निराकारण करुन करनिर्धारण अंतिम करण्यात आले ते समजून येत नाही.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 75 (6) प्रमाणे प्रत्येक महिन्याच्या अखेरीस त्या महिन्यात ज्या इमारती/घरांना प्रतिपूर्ती प्रमाणपत्र/भोगवटा प्रमाणपत्र दिले असेल असे प्रमाणपत्र देणा-या नगररचना विभागाने अशा इमारत/घराचे विवरणपत्र करनिर्धारण विभागास दिले पाहिजे त्यासाठी इमारत परवाने देणा-या विभागाने इमारत परवाना पुस्तक (नोंदवही) नमुना क्र. 45 मध्ये ठेवले पाहिजे व त्याची एक प्रत करनिर्धारण विभागास देणे आवश्यक आहे. परंतु सदर नोंदवही

लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्याने 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये एकूण किती नविन इमारतींना बांधकाम परवानगी देण्यात आली व किती इमारतींना भोगवटा/प्रतिपूर्ती प्रमाणपत्र देण्यात आले व त्याप्रमाणे एकूण किती इमारतींचे करनिर्धारण घरपट्टी विभागाने केले आहे याची माहिती लेखापरीक्षणास समजून आलेली नाही.

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 75 (7) नुसार नमुना क्रमांक 46 प्रमाणे ठेवलेल्या करातील वाढ व घट दर्शविणा-या पुस्तकात (नोंदवहीत) नोंदविणे आवश्यक आहे. परंतु विभागाकडे अशी नोंदवही ठेवली नसल्याने 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये एकूण किती इमारती वाढल्या व किती इमारतींची घरपट्टी कमी करण्यात आली याची माहिती लेखापरीक्षणास समजून आलेली नाही.

4) कुपवाड विभागाने दिलेल्या माहिती नुसार करनिर्धारण केलेल्या मालमत्ता प्रकरणाची तपासणी केली असता 138 मालमत्ता पैकी 128 मालमत्ताना बांधकाम नियमावली नुसार बांधकाम परवानगी घेतली नसल्याचे आढळून आले आहे. तसेच 10 मालमत्ता धारकांनी बांधकाम परवाना घेतला आहे परंतु पूर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही. सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली नियम 6.7.1 नुसार बांधकामाला बांधकाम पूर्व परवानगी घेवुन बांधकाम परवानापत्र घेणे आवश्यक आहे. तसेच नियम 7.6 नुसार बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेवुन नियम 7.7 नुसार भोगवटा करण्याबाबतची परवानगी घेण्यात आल्याशिवाय सदरचे बांधकाम अधिकृत होत नसल्याचे नमुद आहे. त्यामुळे सदरची बांधकामे /अनधिकृत ठरत असल्याने अशा बांधकामांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे **कलम 267 अ नुसार** नियमीत मालमत्ता/कराव्यतिरिक्त दुप्पट दराने शास्ती लावणे आवश्यक आहे. 2013-14 मध्ये नव्याने आकारणी केलेल्या 138 मालमत्ता पैकी 10 एवढ्या मालमत्ताना दुप्पट दराने शास्ती आकारण्यात आली आहे. परंतु **(परिशिष्ठ क्र.11)** उर्वरीत अशा प्रकारच्या अवैध बांधकामावर दुप्पट दराने शास्तीची आकारणी केली नसल्याने मनपाचे रु.1,83,532/- एवढे नुकसान 2013-2014 पासुन दरवर्षी होत आहे.

5) महापालिका ठराव क्र 6 दि. 19/11/2008 अन्वये गुंठेवारी विभाग वगळुन अधिनियमातील सुधारित तरतुदीनुसार अनाधिकृत बांधकामाबाबत दुप्पट दराने शास्तीची आकारणी करुन वसूली करणेबाबत मान्यता देण्यात आली. गुंठेवारी क्षेत्राविषयी सविस्तर अहवाल तयार करुन गुंठेवारी समिती मार्फत सदर तरतुदीची अंमलबजावणी करावी अगर कसे याबाबत गुंठेवारी समितीच्या शिफारशीने मान्यतेसाठी अहवाल सादर करण्यात यावा असे आदेशित करण्यात आले होते. परंतु त्यामुळे अशा गुंठेवारी क्षेत्रातील विनापरवाना बंधकामांवर शास्तीची आकारणी झाली नाही.

शासनाने अधिसुचना काढुन दि. 04/01/2008 पासुन अवैध/बिगर परवाना बांधकामांवर शास्ती लावण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांच्या कलम 267 (अ) नुसार तरतुद केली असताना महापालिकेने विसंगत ठराव केला आहे व अशा विसंगत ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाने नियमबाह्य केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

6) महापालिका कर्मचा-याकडून सर्व्हे मध्ये आढळलेल्या मालमत्तावर मालमत्ताकर आकारणी बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची ड प्रकरण 8 नियम 20 व 21 नुसार मालमत्ताधारकांना नोटीसीव्दारे उक्त कायद्यातील कलम 16 ला अधिन राहून त्याबाबत लेखी अर्ज देवुन 15 दिवसात हरकत देण्याचे कळविले जाते. परंतु 2013-14 मध्ये नव्याने आकारणी करण्यात आलेल्या मालमत्ता धारकांकडून ते सदर जागेवर कोणत्या दिनांकापासुन वास्तव्य करीत आहेत याचा

खात्रीलायक पुरवा नस्तीस आढळुन आला नसल्याने त्यांचे मालमत्तावर दि. 20/03/2014 पासून कर आकारणी कशाचे आधारे करण्यात आली हे लेखा परीक्षणास समजु शकले नाही.

**वसुलपात्र रक्कम :-** अनाधिकृत मालमत्तावर दुप्पट दराने शास्ती लावलेली नसल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीची रक्कम रु. 1,83,532/-

DATRNDM7201 (Ref No : 53)

## *42 मिरज विभागाने मालमत्ता कर आकारणी विलंबाने केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 36815.00/-

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 चे नियम 5 नुसार मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र असलेल्या व्यक्तींनी नव्याने उभारण्यात आलेली किंवा पुन्हा बांधण्यात आलेली इमारत यथास्थीती, पुरी होणे किंवा तीचा भोगवटा करणे यापैकी जी गोष्ट प्रथम घडेल ती गोष्ट घडल्याच्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत आयुक्तास त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे. व त्यानंतर अशा इमारतीची पाहणी करुन उक्त अधिनियमाच्या नियम 7 प्रमाणे सदर इमारतीचे कर योग्य मुल्य ठरवुन कर निर्धारण केले पाहिजे असे असताना खालील मालमत्ता धारकाकडुन विलंबाने 2013-14 या आर्थिक वर्षापासून कर निर्धारण केल्याने महानगरपालिकेचे रक्कम रु. 36815/- चे नुकसान झाले आहे.***

DRAFT

सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मिरज कर संकलन व कर निर्धारण विभागाकडील 2013- 2014 या आर्थिक वर्षामध्ये नव्याने आकारणी केलेल्य 243 प्रकरणापैकी निवडक प्रकरणांची तपासणी केली असता खालील प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी विलंबाने केल्याचे आढळुन आले.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण 8, कराधान, नियम 5 नुसार मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तींनी नव्याने उभारण्यात आलेली किंवा पुन्हा बांधण्यात आलेली इमारत यथास्थीती, पुरी होणे किंवा तीचा भोगवटा करणे यापैकी जी गोष्ट प्रथम घडेल ती गोष्ट घडल्याच्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत आयुक्तास त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे व त्यानंतर अशा इमारतीची पाहणी करून उक्त अधिनियमाच्या नियम 7 प्रमाणे सदर इमारतीचे कर योग्य मुल्य ठरवुन कर निर्धारण केले पाहिजे तसेच महानगरपालिकेने भोगवटा धारकास दिलेल्या बांधकाम परवानगीच्या प्रारंभ प्रमाणपत्राच्या मागील पृष्ठावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966चे तरतुदीखालील व नियम क्र.6.7.1 नुसार अटी दिल्या आहेत. त्यामधील अट क्र.2 मध्ये प्रारंभ प्रमाणपत्र हे बांधकाम परवाना दिल्यातारखेपासून एक वर्ष मुदतीकरीता अधारभुत राहिल.ही मुदत संपण्यापुर्वी त्याचे नुतनीकरण करून घ्यावे लागेल व ते प्रचलित नियमानुसार असल्यास त्यावेळी

ते केले जाईल असे नमुद आहे. परंतु खालील मालमत्ताधारकांनी बांधकामाची एक वर्षाची मुदत संपल्यानंतर त्याचे नुतनीकरण केलेले नाही. सदरच्या मालमत्तांचे एक वर्षानंतर करनिर्धारण न करता विलंबाने 2013-14 या आर्थिक वर्षापासून कर निर्धारण केल्याने महानगरपालिकेचे रक्कम रु. 36815/- चे नुकसान झाल्याचे आढळुन आले.

| अ.क्र | नांव व पत्ता | बांधकाम परवाना दिनांक | खरेदी दिनांक | कर निर्धारण केलेला दिनांक | वार्षिक आकारणी रक्कम रुपये | विलंब कालावधी | कमी आकारणी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | जेम्स नेव्हेल बेतशर,बुधगांवकर मळा मिरज | 20/05/ 2011 | - | 01/04/ 2013 | 6139/- | 11 महिने | 5627/- |
| 2 | प्रकाश हिम्मतराव चव्हाण. आदि लक्ष्मी अपार्टमेंट, बुधगांवकर मळा रोड, मिरज | | 23/10/2012 | 01/04/ 2013 | 2274/- | 6 महिने | 1137/- |
| 3 | अनिता अशोक खेबुडकर,आदि लक्ष्मी अपार्टमेंट | 0706/ 2008 | 18/09/2012 | 01/04/ 2013 | 2274/- | 7 महिने | 1327/- |
| 4 | सचिन मारुती ढवळे.आदि लक्ष्मी अपार्टमेंट | 07/06/ 2008 | 06/12/2012 | 01/04/ 2013 | 2274/- | 4 महिने | 758/- |
| 5 | रुपाली विजय जाधव.आदिलक्ष्मी अपार्टमेंट | 07/06/ 2008 | 06/12/2012 | 01/04/ 2013 | 2274/- | 4 महिने | 758/- |
| 6 | विकास पांडुरंग पिंपळे | 07/06/2008 | 10/10/2012 | 01/04/ 2013 | 2274 | 6 महिने | 1137/- |

DRAFT

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | सुषमा विवेकानंद शिंगाडे.संजीवनी कॉम्प्लेक्स, मराठे मिल रोड, मिरज | - | 03/01/2013 | 01/04/2013 | 2828/- | 3 महिने | 707/- |
| 12 | कांतीलाल देवराजकिरण परमार<br>ॲक्सीस बँक ATM | - | लिव्ह ॲन्ड लायसेन्स ॲग्रीमेंट दि. 15/12/2010 | 01/04/2011 | 61560/- | 4 महिने | 20520/- |
| 14 | सुप्रिया प्रशांत सिंग.सुंदर नगर बंगला, कुमार भगवानदास चड्डा | - | भोगवाटा प्रमाणपत्र दि. 27/02/2009 | 01/04/2010 | 3717/- | 1 वर्ष 2 महिने | 4337/- |
| | | | | | एकूण | | 36815/ |

DATRNDM7201 (Ref No : 54)

DRAFT

## *43 मिरज विभागाकडील मालमत्ता कर आकारणी मधील अनियमिततावाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 339302.00/-

***मिरज हद्दीमधील ज्या मालमत्ताधारकांकडे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व भोगवटा दाखला नाही अशी बांधकामे अनधिकृत ठरत असल्याने अशा बांधकामांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 267 अ नुसार नियमीत मालमत्ता कराव्यतिरिक्त दुप्पट दराने शास्ती लावणे आवश्यक आहे. 2013-14 मध्ये नव्याने आकारणी केलेल्या 138 अवैध बांधकामावर दुप्पट दराने शास्तीची आकारणी केली नसल्याने मनपाचे रक्कम रु. 339302/- एवढे नुकसान 2013 - 2014 या आर्थिक वर्षापासुन दरवर्षी होत आहे.***

कर संकलन व कर आकारणी विभाग मिरज यांचेकडील 2013-14 या वित्तीय वर्षातील नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणापैकी निवडक प्रकरणांची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियममितता आढळुन आल्या आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसुची ड प्रकरण 8 नियम 17 नुसार मालमत्ता धारकाकडून मालमत्तेच्या करपात्र मुल्य व करनिर्धारण बाबत तक्रार, आक्षेप/हरकत नोंदविण्यासाठी विहित नमुन्यात नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 75 नुसार नमुना क्र. 44 मध्ये नोंदवही ठेवुन तपासणीचे परिमाण व आक्षेपांचे निराकरण यांची योग्य ती नोंद या नोंदवहीत प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिका-याच्या / सक्षम अधिका-याच्या स्वाक्षरीनिशी करणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवली नसल्याचे एकूण किती तक्रारी प्राप्त झाल्या व किती तक्रारींचे निराकारण करुन करनिर्धारण अंतिम करण्यात आले ते समजून येत नाही.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 75 (6) प्रमाणे प्रत्येक महिन्याच्या अखेरीस त्या महिन्यात ज्या इमारती/घरांना प्रतिपूर्ती प्रमाणपत्र/ भोगवटा प्रमाणपत्र दिले असेल असे प्रमाणपत्र देणा-या नगररचना विभागाने अशा इमारत/घराचे विवरणपत्र करनिर्धारण विभागास दिले पाहिजे त्यासाठी इमारत परवाने देणा-या विभागाने इमारत परवाना पुस्तक (नोंदवही) नमुना क्र. 45 मध्ये ठेवले पाहिजे व त्याची एक प्रत करनिर्धारण विभागास देणे आवश्यक आहे. परंतु सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्याने 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये एकूण किती नविन इमारतींना बांधकाम परवानगी देण्यात आली व किती इमारतींना भोगवटा/प्रतिपूर्ती प्रमाणपत्र देण्यात आले व त्याप्रमाणे एकूण किती इमारतींचे करनिर्धारण घरपट्टी विभागाने केले आहे याची माहिती लेखापरीक्षणास समजून आलेली नाही .

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 75 (7) नुसार नमुना क्रमांक 46 प्रमाणे ठेवलेल्या वाढ वा घट दर्शविणा-या पुस्तकात करामधील वाढ व घट (नोंदवहीत) नोंदविणे आवश्यक आहे. परंतु विभागाकडे अशी नोंदवही ठेवली नसल्याने 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये एकूण किती इमारती वाढल्या व किती इमारतींची घरपट्टी कमी करण्यात आली याची माहिती लेखापरीक्षणास समजून आलेली नाही.

4) घरपट्टी विभागाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार दि. 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये 243 नवीन मालमत्तावर घरपट्टीची आकारणी केली आहे. सदर मालमत्तावर सन 2001 मध्ये निर्धारीत केलेल्या दरानुसार कर निर्धारण केले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 कराधान नियम 21(2) अन्वये मालमत्ताचे दर चार वर्षानी पुनर्विलोकन करुन नवीन आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे. परंतु 2001 पासुन महानगरपालिकेने करांचे पुनर्विलोकन केले नसल्याने 2001 पासुन 2013-14 या आर्थिक वर्षापर्यंत एकाच दराने नविन मालमत्तांचे करनिर्धारण करुन घरपट्टीची आकारणी केली आहे.

5) विभागाने दिलेल्य माहिती नुसार 243 मालमत्ता पैकी 139 मालमत्ताना बांधकाम नियमावली नुसार बांधकाम परवानगी घेतली नसल्याचे आढळून आले आहे. तसेच 42 मालमत्ता धारकांनी बांधकाम परवाना घेतला आहे. परंतु पूर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली नियम 6.7.1 नुसार इमारतीचे बांधकामास परवानगी घेवुन बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तसेच

DRAFT

नियम 7.6 नुसार बांधकाम पुर्ण झाल्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतलेनंतर नियम 7.7 मध्ये भोगवटा करण्याबाबतची परवानगी घेण्यात आल्याशिवाय सदरचे बांधकाम अधिकृत होत नसल्याचे नमुद आहे. त्यामुळे ज्या इमारतीचा वापर बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र न घेता केला जात आहे ती बांधकामे अवैध/अनधिकृत ठरत असल्याने अशा बांधकामांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 267 अ नुसार नियमीत मालमत्ता/कराव्यतिरिक्त दुप्पट दराने शास्ती लावणे आवश्यक आहे. 2013-14 मध्ये नव्याने आकारणी केलेल्या 243 मालमत्ता पैकी 42 एवढ्या मालमत्ताना दुप्पट दराने शास्ती आकारण्यात आली आहे. परंतु **(परिशिष्ठ क्र.12)** मध्ये नमुद केलेल्या 138 अवैध बांधकामावर दुप्पट दराने शास्तीची आकारणी केली नसल्याने मनपाचे रक्कम रु. 339302/- एवढे नुकसान 2013 - 2014 पासुन दरवर्षी होत आहे.

6) महापालिका ठराव क्र 6 दि. 19/11/2008 अन्वये गुंठेवारी विभाग वगळुन अधिनियमातील सुधारित तरतुदीनुसार अनाधिकृत बांधकामाबाबत दुप्पट दराने शास्तीची आकारणी करुन वसूली करणेबाबत मान्यता देण्यात आली. गुंठेवारी क्षेत्राविषयी सविस्तर अहवाल तयार करुन गुंठेवारी समिती मार्फत सदर तरतुदीची अंमलबजावणी करावी अगर कसे याबाबत गुंठेवारी समितीच्या शिफारसीने मान्यतेसाठी अहवाल सादर करण्यात यावा असे आदेशित करण्यात आले होते. परंतु त्यामुळे अशा गुंठेवारी क्षेत्रातील विनापरवाना बंधकामांवर शास्तीची आकारणी झाली नाही. शाससनाने अधिसुचना काढुन दि. 04/01/2008 पासुन अवैध/बिगर परवाना बांधकामांवर शास्ती लावण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांच्या कलम 267 (अ) नुसार तरतुद केली असताना याबाबत महापालिकेने विसंगत ठराव केला आहे व अशा विसंगत ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाने नियमबाह्य केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

7) महापालिका कर्मचा-याकडून मिरज विभागामध्ये केलेल्या सर्व्हेमध्ये आढळलेल्या मालमत्तावर , मालमत्ताकर आकारणी बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची ड प्रकरण 8 नियम 20 व 21 नुसार मालमत्ता धारकांना नोटीसीव्दारे उक्त कायद्यातील कलम 16 ला अधिन राहून त्याबाबत लेखी अर्ज देवुन 15 दिवसात हरकत देण्याचे कळविले जाते. परंतु 2013-14 मध्ये नव्याने आकारणी करण्यात आलेल्या मालमत्ता धारकांकडून ते सदर जागेवर कोणत्या दिनांकापासुन वास्तव्य करीत आहेत याचा खात्रीलायक पुरवा नस्तीस आढळुन आला नसल्याने त्यांचे मालमत्तावर दि. 20/03/2014 पासून कर आकारणी कशाचे आधारे करण्यात आली आहे हे लेखा परीक्षणास समजु शकले नाही.

DATRNDM7201 (Ref No : 55)

## *44 सुजल निर्मल अभियान योजने अंतर्गत पॅकेज क्र. 1.1 व 1.3 मधील हिराबाग केंद्र येथे टाकी बांधणे, वितरण व्यवस्था बळकट करणे, बल्क मीटर बसविणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**सुजल निर्मल अभियान योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनिस्  राज्य व मनपा निधी*

DRAFT

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1291876.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1980.00/-

***कामाची मुदत दि.10/10/2014 अखेर असतानाही जानेवारी 2016 अखेर काम अपूर्ण असल्याचे दिसून येते. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय सुनिअ/2010/प्र.क्र.460/ पाणीपुरवठा-22 दि.23/11/2010 नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी सुजल निर्मल योजनेमधुन करण्यात येणा-या रु.29.85 कोटी रक्कमांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार राज्य शासनाकडून 70 टक्के अनुदान मिळणार असून महानगरपालिकेने 20 टक्के रक्कम कर्जाद्वारे उभी करावयाची आहे व उर्वरित 10 टक्के रक्कम महानगरपालिकेने स्वनिधी म्हणून योजनेसाठी खर्च करावयाची आहे. योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार 70 टक्के रक्कम राज्यशासनाचे अनुदानामधुन व 30 टक्के रक्कम महानगरपालिका स्वनिधीमधुन खर्च करणे आवश्यक असता ठेकेदारास सर्व रक्कम शासन निधीमधुन आदा केली असल्याने योजनेमधुन सुरू असलेल्या या कामास तसेच अन्य कामास निधी कमी पडून कामे अपुर्ण राहणार आहेत. सुरक्षा अनामतपोटी दिलेल्या बँक गॅरेंटीची मुदत वाढविल्याची कागदपत्रे दाखविली नसल्याने बँक गॅरेंटीची विधीग्राह्यता तपासता आलेली नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडे सुजल निर्मल अभियान योजनेतंर्गत पॅकेज क्र. 1.1 आणि 1.3 मधील हिराबाग केंद्र येथे टाकी बांधणे, वितरण व्यवस्था बळकट करणे, बल्क मीटर बसविणे या कामावर वित्तीय वर्ष 2011-12 ते 2013-14 पर्यंत एकुण र.रु. 54803870/- खर्च झाला आहे. तसेच वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये या कामावर खालील प्रमाणकाव्दारे रक्कम रु. 89,87,985/- खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 01 | 04/05/2013 | 36,71,930/- | 10 वे धावते देयक |
| 2 | 05 | 09/06/2013 | 15,33,280/- | 11 वे धावते देयक |
| 3 | 09 | 17/06/2013 | 4,63,674/- | 12वे धावते देयक (पार्ट पेमेंट) |
| 4 | 11 | 05/09/2013 | 1,00,000/- | 12 वे धावते देयक (उर्व.रक्कम) |
| 5 | 12 | 17/09/2013 | 15,59,500/- | 13 वे धावते देयक |
| 6 | 15 | 22/10/2013 | 97998/- | 14 वे धावते देयक |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | 19 | 20/03/2014 | 679620/- | 15 वे धावते देयक |
| एकूण | | | 89,87,985/- | |

**या कामाची नस्ती, बी-1 टेंडर, धावती देयके, ठेकेदारास आदा केलेल्या रक्कमांची प्रमाणके व मोजमाप पुस्तके यांची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.**

1) या कामाचा कार्यादेश दि. 23/12/2010 रोजी कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी दिला असुन निविदेनुसार कामाची मुदत 12 महिने व करारपत्र व कामाचे आदेशानुसार 14 महिने (पावसाळ्यासहित) देण्यात आली आहे. त्यानुसार सदर काम 22/02/2012 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक होते. वित्तीय वर्ष 2013-14 मधील 15 वे धावते देयकानुसार सदरचे काम अपुर्ण असल्याचे आढळुन आले आहे. नस्तीमधील कागदपत्रावरुन ठेकेदारास आयुक्त यांनी प्रथमत: 31/03/2013 अखेर मुदतवाढ दिलेली होती. त्यानंतर आदेश क्र. 192/2013-14 दि. 30/09/2013 अन्वये ठेकेदारास वाळु उपलब्ध नसल्याने व टाकीचे कामास वाळुची आवश्यकता असल्याने ठेकेदाराच्या मागणी नुसार व कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांचे अहवाला नुसार दि. 31/10/2013 पर्यंत भाववाढ फायद्या शिवाय मुदतवाढ देण्यात आली असल्याचे नमुद करण्यात आले आहे. या कामाच्या बी-1 टेंडरमधील क्लॉज क्रमांक 6 नुसार कामाच्या मुदतवाढी बाबत कंत्राटदाराने मुदत संपण्यापूर्वी 30 दिवस अगोदर लिखित स्वरुपात अर्ज करणे आवश्यक आहे. परंतु नस्तीची तपासणी केली असता नस्तीमध्ये मुदतवाढीसाठी कंत्राटदाराने केलेल्या अर्जाची प्रत आढळून आलेली नाही.

2) सदर काम मार्च 2014 पर्यंत पूर्ण झाले नसल्याचे 15 वे धावते देयकाची तपासणी केली असता दिसून आले आहे. मुदतीत काम पुर्ण न झाल्याने टेंडर मधील contract conditions clause No 2 नुसार ठेकेदाराने मुदतीत काम पूर्ण न केल्यास In the event of the operator Failing to comply with these conditions he shall be liable to pay as compensation an amount as Muncipal commissinor whole decision in writing shall be final may decide of the said estimeted cost of whole work for every day that the due quantity of work remains incomplete Provided always that the total amount of compensation to be paid under the provision of this clause shall not exceed 10% of estimated cost of this work as shown in the tender ( 5% for liquidated damage & 5% for penalty) यानुसार दंडनीय कार्यवाही करणे आवश्यक असताना ती केली नसल्याचे आढळुन आले आहे.

3) मोजमाप नोंदवही क्र. 20 पृष्ठ क्र. 84 नुसार कामावर एकुण रु.5,48,03,870/- खर्च झाला असल्याचे आढळुन आले आहे. या कामाची निविदा 14% जादा दराने मंजूर केली असल्याने स्वीकृत निविदा रक्कम रु.6,07,41,480/- इतकी होत आहे. या कामावर 90% खर्च झाला आहे. परंतु उर्वरित राहिलेला 10 टक्के खर्च न केल्याने अद्यापही सदरचे काम अपुर्ण राहिल्याने नागरीकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याचा उद्देश साध्य झालेला नसुन सदर कामाच्या अंमलबजावणीमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते.

4) या कामाचे धावते देयक क्र. 10 ते 15 च्या नोंदी मोजमाप नोंदवही क्र. 20 मधील पृष्ठ क्र.

DRAFT

65 ते 80 वर नोंदविलेल्या आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका मधील नियम क्र. 13 नुसार मोजमाप पुस्तकात नोंदविण्यात आलेली मोजमापे देयक तयार केल्यानंतर मोजमाप पुस्तकात लाल शाईने तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. तसेच नियम 15 नुसार देयक मंजूर केल्यानंतर मोजमाप पुस्तकात दुसरी तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच देयकाचे प्रदान केल्यानंतर मोजमाप पुस्तकात प्रदानाचा प्रमाणक क्रमांक, दिनांक व धनादेश क्रमांक नोंदविण्यात आलेला नाही त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) सदर कामासाठी IDBI बँक शाखा, कफ परेड, मुंबई यांचेकडील रु. 15,20,000/- रकमेची बँक गॅरंटी दि. 07/12/2010 पासून 1 वर्षाकरीता होती. तीचे दि. 09/01/2014 पर्यंत नुतनीकरण केल्याचे नस्तीस आढळुन आले आहे. परंतु सदरचे काम लेखापरीक्षण कालावधीपर्यंत अपूर्ण असल्याने दि. 09/01/2014 च्या पुढील कालावधीसाठी सदर बँक गॅरंटीचे नुतनीकरण करणे आवश्यक असता ते केले बाबतची कागदपत्रे नस्तीस आढळुन आली नसल्याने बँक गॅरेंटीची विधीग्राह्यता तपासता आलेली नाही.

5) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय सुनिअ/2010/प्र.क्र.460/ पाणीपुरवठा -22 दि.23/11/2010 नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी सुजल निर्मल योजनेमधुन करण्यात येणा-या रु.29.85 कोटी रक्कमांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार राज्य शासनाकडून 70 टक्के अनुदान मिळणार असून महानगरपालिकेने 20 टक्के रक्कम कर्जाद्वारे उभी करावयाची आहे व उर्वरित 10 टक्के रक्कम महानगरपालिकेने स्वनिधी म्हणून योजनेसाठी खर्च करावयाची आहे. 2013-14 अखेर या कामावर 7 व्या धावत्या देयकाअखेर ठेकेदारास रक्कम रु.41221487 /- आदा केले आहेत. सदर रक्कम राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानामधून ठेकेदारास आदा करण्यात आली आहे. या कामाची निविदा किंमत रु.51029043/- असुन निविदा 14 टक्के जादा दराने मंजुर केल्याने या कामाची किंमत रु.58173189 इतकी होत आहे. राज्य शासनाकडून 70 टक्के प्रमाणे रु.35720330/- अनुदान प्राप्त झाल्याने उर्वरित रु.22452859 महानगरपालिकेने कर्ज व स्वनिधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. नस्तीची तपासणी केली असता या योजनेसाठी महानगरपालिकेने अद्याप कर्ज काढलेले नाही. त्यामुळे ठेकेदारास कामाची देयके देताना 61.40 टक्के रक्कम शासननिधीमधून व 38.59 टक्के रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च करणे आवश्यक होते. महानगरपालिकेने ठेकेदारास आर्थिक वर्ष 2013 -14 अखेर रु.41221487 /- आदा केले आहेत. अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 61.40 टक्के प्रमाणे रु.25309993/- व स्वनिधीमधून 38.59 टक्क्याप्रमाणे रु.15907371.83 /- खर्च करणे आवश्यक असता सर्व रक्कम प्राप्त शासन अनुदानामधून खर्च करण्यात आली आहे. शासननिधी व महानगरपालिका निधीची रक्कम त्यांचे हिश्श्याचे टक्केवारीनुसार प्रत्येक देयकामधून खर्च केली नसल्याने या योजनेच्या कामांना निधी कमी पडून कामे अर्धवट राहणार असल्याचे स्पष्ट होते.

6) या कामाची नस्ती तपासली असता जानेवारी 2016 अखेर काम अपूर्ण असल्याचे दिसून येते. कामाची मुदत 12 महिने (पावसाळ्यासह) दि.10/10/2014 अखेर असताना काम पूर्ण न झाल्याने नागरिकांना शुध्द पाणी पुरविण्याचा हेतू साध्य झाला नसल्याचे स्पष्ट होते.

7) या कामाचे नस्तीवरील पृष्ठ क्र. 17 व 18 वरील कार्यालयीन टिपणी मध्ये निविदा 2009-10

DRAFT

च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुची प्रमाणे तयार केली होती. त्यामध्ये नोव्हे. 2009 नंतर महाराष्ट्र शासन व केंद्रशासन यांच्या धोरणात बदल झाल्याने व्हॅट, कामगार कल्याण निधी, रॉयल्टी यामध्ये फरक झाल्याचे नमुद आहे. त्यानुसार रॉयल्टी मध्ये फरकाच्या रकमेसहीत रु. (770938+770938) असे एकूण 15,41,876/- गृहीत धरुन दरपृथ्थकरण केले असल्याचे नमुद आहे. परंतु सदर कामाचे 15 वे धावते देयकापर्यंत रक्कम रु. 2,50,000/- रॉयल्टी रक्कम ठेकेदाराच्या बिलातून कपात केल्याचे आढळुन आले. महाराष्ट्र शासन महसूल आणि वने विभाग अधिसूचनला क्रं. गौण खनिज-10/1009/पी.के. 309/ख(3) दि. 11/02/2010 नुसार रक्कम रु. 200 प्रती ब्रास किंवा रु. 70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे. व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. परंतु सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या परिमाणानुसार रॉयल्टीची रक्कम देयकातून वसूल करुन महसूल विभागास देणे आवश्यक असताना मोघमपणे रु.2,50,000/- कशाच्या अधारे कपात करण्यात आली याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नसल्याने सदर कामावरील वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या परिमाणानुसार रॉयल्टी रक्कम परिगणित करुन उर्वरीत रक्कम ठेकेदाराकडून वसूल करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

8) मोजमाप नोंदवही क्र. 20 मधील पृष्ठ क्र. 68 वर नोंदविलेल्या 11 वे धावते देयकामध्ये P&S ISI Mark DIK 9 of following class and diameters 400 mm dia. DIK 7 pipe या बाबीचा दर 419.63 ऐवजी 419.00 असा दर्शविला आहे. सदर बाबीवर 10 वे देयकापर्यंत रक्कम रु. 30,05,994.32/- ठेकेदारास आदा केली होती. परंतु 11 वे ते 15 वे धावते देयकांमध्ये सदर बाबीवरील खर्चाची रक्कम रु. 30,01,481.36/- अशी नमुद केली असल्याने फरक रक्कम रु. 4512.96/- चे दुबार प्रदान ठेकेदारास होण्याची शक्यता आहे.

8) सुजल निर्मल अभियान अंतर्गत कामाकरिता Expression of Interest व्दारे निविदा मागविण्यात आल्यामुळे अन्य कामाच्या अटीमध्ये clause 5.4 escalation of price for work : Price ecalation clause shall be applicable on approved initial rates only after 24 months. No escalation will be provided within 24 months. No escalation price shall be allowed for the period of delay causes by operator reasons pertaining to operator. अशी अट आहे. परंतु या कामाच्या निविदेमध्ये वरील अट नसल्यामुळे ठेकेदारास किंमत/दरवाढ देण्यात आली आहे. एकाच वेळी काढण्यात आलेल्या एकाच प्रकारच्या कामाच्या निविदा अटीमध्ये भिन्नता करण्याचे प्रयोजन लेखापरीक्षणास अर्धसमास ज्ञापन क्र.67 दि. 26/02/2016 अन्वये मागणी करून ही दिलेले नाही. सदरच्या कामास विहित मुदतीनंतर खुपच विलंब झाल्याने ठेकेदारास 11 वे धावते देयकापर्यंत एकुण रक्कम रु. 42,18,008/- किंमत दरवाढ द्यावी लागली आहे. वरील प्रमाणे अटी व शर्ती मध्ये किंमत/ दरवाढबाबत अटीचा समावेश नसल्याने व सदरचे काम विहित मुदतीत पूर्ण झाले नसल्याने रक्कम रु.42,18,008/- चे शासन निधीचे नुकसान झाले आहे.

9) मोजमाप पुस्तकामधील नोंदविलेल्या परिमाणाची अंकगणिती तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे चुका आढळुन आल्याने ठेकेदारास कमी/जादा रक्कमेचे प्रदान झाले आहे.

अ) मोजमाप पुस्तक क्रं. 20 मधील पृष्ठ क्र. 58 व 59 मधील नोंदीनुसार बाब क्रं. 15

DRAFT

Providing and supplying situ cement concrete या बाबीचे परिमान 50.47 घ.मी. ऐवजी 50.57 घ.मी. नमुद करुन त्यातून 22.29 घ.मी. वजा जाता 28.18 घ.मी. ऐवजी 28.27 घ.मी. नमुद केले आहे. व पृष्ठ क्रं. 63 वरील सदर बाबीचे परिमाण 28.37 घ.मी. नमुद करुन त्याचा दर रु. 3521.92/- प्रमाणे रु. 99916.87/- चे प्रदान झाले असल्याने रक्कम रु. 669/- चे अतिप्रदान झाले आहे. सदरचे काम निविदे रकमेपेक्षा 14% जादा दराने मंजूर असल्याने अतिप्रदान रक्कम 669/- व त्यावरील 14% रक्कम रु. 94/- असे एकूण रु. 763/- वसूलपात्र आहेत.

ब) मोजमाप पुस्तक क्रं. 20 मधील पृष्ठ क्र. 58 वरील नोंदीनुसार बाब क्रं. 2 Providing and supplying ISI Std. DI Flange/S & S Specials या बाबीचे परिमान 135.93 कि.ग्रॅ. ऐवजी 141.52 कि.ग्रॅ. नमुद केले आहे. त्यामध्ये 21.87 कि.ग्रॅ. MS Angle चे परिमाण मिसळले असता व त्याचे दुप्पट केली असता. एकूण परिमाण 315.60 कि.ग्रॅ. ऐवजी 326.78 कि.ग्रॅ. केल्याने ज्यादा परिमाण 11.17 कि.ग्रॅ. रु. 95.58/- दरा प्रमाणे एकूण रक्कम रु.1068/- चे अतिप्रदान झाले आहे. सदरचे काम निविदे रकमेपेक्षा 14% जादा दराने मंजूर असल्याने अतिप्रदान रक्कम 669/- व त्यावरील 14% रक्कम रु. 149/- असे एकूण रु. 1217/- वसूलपात्र आहेत.

वरील उदाहरणे ही निवडक तपासणीमध्ये आढळुन आल्याने प्रदानापूर्वी मोजमाप नोंदवहीची मोजमापे, परिमाण, दर व देयकातील नमुद परिमाण, दर याची योग्य तपासणी होऊन योग्य त्या रकमेचे प्रदान होणे अवश्यक असताना अशी कार्यवाही होत नसल्याचे आढळुन आले.

10) अंदाजपत्रक व मोजमाप नोंदवही यानुसार कामाचे बाबनिहाय परिमाण यांची पडताळणी केली असता धावते देयक क्र. 15 अखेर खालील बाबीं वरती अंदाजपत्रकापेक्षा जादा प्रमाणात खर्च झाल्याचे आढळुन आले आहे.

| **अ.क्र** | **बाब क्र** | **मोजमाप नोंदवही नुसारचे परिमाण** | **अंदाजपत्रक नुसारचे परिमाण** | **जादा परिमाण** | **दर** | **रक्कम रु.** |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **बाब क्र. 2 500 एम.एम पाईप** | **65 मीटर** | **32 मीटर** | **33 मीटर** | **14247.82प्रती मिटर** | **470178/-** |
| **2** | **बाब क्र. 4 डि. आय स्पेशल्स** | **4.02 M.T.** | **1.40 M.T.** | **2.62 M.T.** | **68276/-** | **178883/-** |
| **3** | **बाब क्र. 15 सी.सी. एम 150** | **37.17 घ.मी.** | **13.81 घ.मी.** | **23.36 घ.मी.** | **3521.92** | **82272/-** |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **4** | **बाब क्र. 19 भुयारी वीज,टेलीफोन,पाणी पाईप शोधणे व जोडणे** | **6.74 कि.मी** | **4.77 कि.मी** | **1.97 कि.मी** | **10,000/-** | **19700/-** |
| **5** | **बाब क्र. (एक्स्ट्रा ॲटम 1) स्टीलबार रेनफोर्समेंट** | **559.01 एम.टी.** | **-** | **559.01 एम.टी.** | **49.30** | **27559/-** |
| **6** | **बाब क्र. (एक्स्ट्रा ॲटम 2) प्लीन्थ फिलिंग** | **132 घ.मी.** | **-** | **132 घ.मी.** | **525/-** | **69300/-** |

सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (अ) (1)नुसार कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणे कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- पर्यंत वाढ करण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (2)(अ) ज्यावेळी अतिरिक्त काम, मंजूर निविदेमध्ये अगोदरच समाविष्ट करण्यात आलेल्या समान कामाशी तुलना करण्याजोगे असेल त्यावेळी प्रभारी अभियंता व कंत्राटदार यांनी परस्परात निश्चित करावयाचा व मंजूर करावयाचा दर, शक्यतोवर ,निविदेमधील समान बाबीच्या दरावर अधारित असणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या प्रकरण 7 संविदा मधील कलम 73 नुसार महानगरपालिके च्या वतीने संविदा करुन देण्याचा अधिकार आयुक्त यांना असल्याने जादाचे काम करताना आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक असताना ती घेण्यात आलेली नाही.

11) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग कडील शासन निर्णय क संकिर्ण 2008/ 1338/प्र.क्रं. 171/08 नवि-20 दिनांक. 02/03/2009 नुसार ड वर्ग महानगरपालिकेकडील 50 लाखा पेक्षा अधिक किमतीच्या सर्व विकासकामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण करणे आवश्यक आहे व त्यापेक्षा कमी किमतीच्या कामांच्या संदर्भात Random पध्दतीने किमान 10% कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे . परंतु या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेचे नस्तीची तपासणी केली असता दिसुन येत नाही. कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखा परीक्षण करुन कामाची गुणवत्ता व दर्जा तपासण्यात आलेला नाही.

आक्षेपाधिन रक्कम :- गौण खनिज रॉयल्टीची वसुल न केलेली रक्कम रु.1291876/-

वसुलपात्र रक्कम :- मोजमाप पुस्तकामध्ये अंकगणितीय चुकामुळे वसुल करावयाची रक्कम रु.1980/-



DRAFT

## *45 सुजल निर्मल अभियानांतर्गत अस्तित्वातील वितरण व्यवस्था बळकटीकरण करणे, बल्क मीटर बसविणे व योजना 24/7 प्रणाली अंतर्गत चालविणे (पॅकेज क्र. 2.1 व 2.3) या कामातील अनियमिततेबाबत.*

**सुजल निर्मल अभियान**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 09**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनिस् राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 19829377.00/-

***पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय सुनिअ/2010/प्र.क्र.460/ पाणीपुरवठा-22 दि.23/11/2010 मधील योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार राज्य शासनाकडून 70 टक्के अनुदान मिळणार असून महानगरपालिकेने 20 टक्के रक्कम कर्जाद्वारे उभी करावयाची आहे व उर्वरित 10 टक्के रक्कम महानगरपालिकेने स्वनिधीमध्ये तरतुद करुन खर्च करावयाची आहे. 2013-14 अखेर या कामावर 12 व्या धावत्या देयकापर्यंत ठेकेदारास रक्कम रु.60498759 /- आदा केले आहेत. सदर रक्कम राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानामधून ठेकेदारास आदा करण्यात आली आहे. बाब क्र. 46 मध्ये Providing and developing sutaible software for water billing and customer information यासाठी रक्कम रुपये 20,00,000/- गृहीत धरण्यात आलेली आहे. परंतु सदरची रक्कम कशाच्या आधारे अंदाजित करण्यात आली आहे. याबाबतची कागदपत्रे नस्तीस आढळुन आलेली नाहीत. सदर बाबीवर 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये रक्कम रुपये 16,00,000/- खर्च करण्यात आला आहे.आयुक्तांची प्रशासकीय मान्यता न घेताच रु. 15209377/- किंमतीच्या अतिरिक्त बाबी करण्यात आल्या आहेत.***

DRAFT

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडे सुजल निर्मल अभियान योजनेतंर्गत अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेचे बळकटीकरण करणे, बल्क मीटर बसविणे व योजना 24x7 अंतर्गत चालविणे. पॅकेज क्र. 2.3 व 2.1 चे ठेकेदार मे. तत्व ग्लोबल वॉटर टेक्नॉलॉजी चन्नई यांना 2011-12 ते 2013-14 पर्यंतचा खर्च (12 वे धावते देयक पर्यंतचा) 6,04,98,759/- आदा केले असुन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये सदर कामावर खालील प्रमाणकाव्दारे रक्कम रूपये 63,36,056/- खर्च केला आहे.

| अ.क्र | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 20/05/2013 | 495457/- | 11 वे धावते देयक MBND 28 (39 ते 65) |
| 2 | 10 | 05/09/2013 | 1381485/- | 12 वे धावते देयक MBND |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | 28 (66 ते 76) |
| एकूण | | | 6336056/- | |

**वरील कामाची नस्ती, बी-1 टेंडर, प्रमाणके व धावते देयकांची मोजमाप नोंदवहीसह तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.**

1) या कामाचा ठेकेदारास कार्यादेश दि. 23/12/2010 रोजी दिला असुन, कामाची मुदत निविदेनुसार 12 महिने व करारपत्र व कामाचे आदेशानुसार 14 महिने (पावसाळ्यासहित) होती. त्यानुसार दि. 22/02/2012 पर्यंत काम पुर्ण होणे आवश्यक होते. परंतु वित्तीय वर्ष 2013-14 मधील 12 वे धावते देयकानुसार सदरचे काम अपुर्ण असल्याचे आढळुन आले. निविदा क्लॉज 6 नुसार कामाच्या मुदतवाढीसाठी कंत्राटदाराने मुदत संपण्यापूर्वी 30 दिवस अगोदर लिखित स्वरुपात अर्ज करणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणी मुदतवाढी बाबत कंत्राटदाराकडून निवेदन करण्यात आलेले नाही. त्यामुळे मुदतवाढीबाबतचा तपशिल उपलब्ध नस्तीमध्ये आढळुन आलेला नाही.

नस्तीवरील कागदपत्रावरुन ठेकेदारास मा.आयुक्त यांनी प्रथमत: दि.31/03/2013 अखेर मुदतवाढ दिलेली होती. त्यानंतर आदेश क्र. 192/2013-14 दि. 30/09/2013 अन्वये ठेकेदारास वाळु उपलब्ध नसल्याने व टाकीचे कामास वाळुची आवश्यकता असल्याने ठेकेदाराची मागणी व कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांचे अहवालानुसार दि. 31/10/2013 पर्यंत भाववाढ फायद्याशिवाय मुदतवाढ देण्यात आली असल्याचे आढळुन आले. परंतु सदर काम मार्च 2014 पर्यंत पूर्ण झाले नसल्याचे 12 वे धावते देयका नुसार दिसून येते. मुदतीत काम पुर्ण न झाल्याने टेंडर मधील contract conditions clause No 2 नुसार ठेकेदाराने मुदतीत कामाचे टप्पेनिहाय काम पूर्ण न केल्यास In the event of the oprator Failing to comply with these conditions he shall be liable to pay as compensation an amount as Muncipal Commissinor whole decision in writing shall be final may decide of the said estimeted cost of whole work for every day that the due quantity of work remains incomplete. Provided always that the total amount of compensation to be paid under the provision of this clause shall not exceed 10% of estimated cost of this work as shown in the tender ( 5% for liquidated damage & 5% for penalty) यानुसार दंडनीय कार्यवाही करणे आवश्यक असताना ती केली नसल्याचे आढळुन आले आहे.

2) मोजमाप नोंदवही क्र. 28 पृष्ठ क्र. 76 वर नमुद सदर कामावर एकुण 6,04,98,759/- खर्च झाला असल्याचे आढळुन आले. सदर कामाची 13.5% जादा दराने स्वीकृत निविदा रक्कम 8,32,05,995/- असल्याने सदर कामावर 73% खर्च करण्यात आला आहे. परंतु उर्वरित 27 टक्के खर्च न केल्याने काम पुर्ण झाले नसल्याचे आढळुन आले. त्यामुळे कामाचा उद्देश साध्य झालेला नसुन सदर कामाच्या अंमलबजावणीमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते.

3) या कामाचे धावते देयक क्र. 11 व 12 च्या नोंदी मोजमाप नोंदवही क्र. 20 मधील पृष्ठ क्र. 65 ते 80 वर नोंदविलेल्या आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका मधील नियम क्र. 13 नुसार मोजमाप पुस्तकात नोंदविण्यात आलेली मोजमापे देयक तयार केल्यानंतर मोजमाप पुस्तकात लाल शाईने तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. तसेच नियम 15 नुसार देयक मंजूर केल्यानंतर मोजमाप पुस्तकात दुसरी तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली

DRAFT

नाही. तसेच मोजमाप पुस्तकात देयकाचे प्रदान केल्यानंतर प्रदानाचा प्रमाणक क्रमांक, दिनांक व धनादेश क्रमांक नोंदविण्यात आलेला नाही त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
4) सदर कामासाठी सुरक्षा अनामत म्हणुन युनियन बँक ऑफ इंडिया शाखा समाचार मार्ग, मुंबई यांचेकडील रु. 15,20,000/- रकमेची बँक गॅरंटी देण्यात आली आहे. सदर बँक गॅरेंटीची मुदत दि. 08/12/2010 पासून 1 वर्षाकरीता होती. तिचे दि. 31/03/2013 पर्यंतची नुतनीकरण केल्याचे नस्तीस आढळुन आले आहे. परंतु सदरचे काम लेखापरीक्षण कालावधीपर्यंत अपूर्ण असल्याने दि. 31/03/2013 च्या पुढील कालावधीसाठी सदर बँक गॅरंटीचे नुतनीकरण करणे आवश्यक असता ते केले बाबतची कागदपत्रे दाखविली नसल्याने बँक गॅरेंटीची विधीग्राह्यता तपासता आलेली नाही.
5) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय सुनिअ/2010/प्र.क्र.460/ पाणीपुरवठा -22 दि.23/11/2010 नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी सुजल निर्मल योजनेमधुन करण्यात येणा-या रु.29.85 कोटी रक्कमांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार राज्य शासनाकडून 70 टक्के अनुदान मिळणार असून महानगरपालिकेने 20 टक्के रक्कम कर्जाद्वारे उभी करावयाची आहे व उर्वरित 10 टक्के रक्कम महानगरपालिकेने स्वनिधीमध्ये तरतुद करुन खर्च करावयाची आहे. 2013-14 अखेर या कामावर 12 व्या धावत्या देयकापर्यंत ठेकेदारास रक्कम रु.60498759 /- आदा केले आहेत. सदर रक्कम राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानामधून ठेकेदारास आदा करण्यात आली आहे. या कामाची निविदा किंमत रु.83205995/- असुन निविदा 13.5 टक्के जादा दराने मंजुर केल्याने या कामाची किंमत रु.94438808.86 इतकी होत आहे. राज्य शासनाकडून मुळ निविदा रक्कम रु.83205995/- च्या 70 टक्के प्रमाणे रु.58244196 /- अनुदान मिळणार असल्याने उर्वरित रु.361944612 /- महानगरपालिकेने कर्ज व स्वनिधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. नस्तीची तपासणी केली असता या योजनेसाठी महानगरपालिकेने अद्याप कर्ज काढलेले नाही . ठेकेदारास कामाची देयके देताना 61.67 टक्के रक्कम शासननिधीमधून व 38.32 टक्के रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने आर्थिक वर्ष 2011-12 ते 2013 -14 अखेर ठेकेदारास रु.60498759/- आदा केले आहेत. अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 61.40 टक्के प्रमाणे रु.37146238/- व स्वनिधीमधून 38.59 टक्क्याप्रमाणे रु.23352521/- खर्च करणे आवश्यक असता सर्व रक्कम प्राप्त शासन अनुदानामधून खर्च करण्यात आली आहे. शासननिधी व महानगरपालिका निधीची रक्कम त्यांचे हिश्श्याचे टक्केवारीनुसार प्रत्येक देयकामधून खर्च करणे आवश्यक असता नियमबाह्यपणे शासन निधीतून सर्व देयके दिल्याने शासन निधीचा वापर जादा झाला आहे. परंतु त्याप्रमाणात काम पूर्ण न झाल्याने सदरची योजना निधी अभावी रखडली आहे.
6) सदर कामाचे बी 1 टेंडर मधील बाब क्र. 46 मध्ये Providing and developing sutaible software for water billing and coustmer information यासाठी रक्कम रुपये 20,00,000/- गृहीत धरण्यात आलेली आहे. परंतु सदरची रक्कम कशाच्या आधारे अंदाजित करण्यात आली आहे. याबाबतची कागदपत्रे नस्तीस आढळुन आलेली नाहीत. सदर बाबीवर 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये रक्कम रुपये 16,00,000/- खर्च करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग कडील शासन निर्णय क संकिर्ण 2008/ 1338/प्र.क्रं. 171/08 नवि-20 दिनांक. 02/03/2009 नुसार ड वर्ग महानगरपालिकेकडील 50 लाखा पेक्षा अधिक किमतीच्या सर्व विकासकामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण करणे आवश्यक आहे व त्यापेक्षा कमी किमतीच्या कामांच्या संदर्भात Random पध्दतीने

DRAFT

किमान 10% कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे . परंतु या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेचे नस्तीची तपासणी केली असता दिसुन येत नाही.

7) तसेच बाब क्र. 51, technical services for establishment of base line, parameters, review of rehablitation, plan submmission etc. यासाठी (parformance based) रक्कम रुपये 15,00,000/- गृहीत धरण्यात आले आहेत परंतू सदरची रक्कम कशाच्या आधारे परिगणीत करुन अंदाजित करण्यात आली आहे याबाबतची कागदपत्रे नस्तीमध्ये आढळुन आलेली नाहीत.

8) अंदाजपत्रक व मोजमाप नोंदवही यानुसार कामाचे बाबनिहाय परिमाण यांची पडताळणी केली असता धावते देयक क्र. 12 अखेर खालील बाबींवरती अंदाजपत्रकापेक्षा जादा प्रमाणात खर्च झाल्याचे आढळुन आले आहे.

| अ.क्र | बाब क्र | मोजमाप नोंदवही नुसारचे परिमाण | अंदाजपत्रकनुसारचे परिमाण | जादा परिमाण | दर रु. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| | **सब वर्क बी 1** | | | | | |
| 1 | **बाब क्र. 1,3,4 सर्व प्रकारची खोदाई** | **28127.71 घ.मी.** | **23375.84 घ.मी.** | **4751.87 घ.मी.** | **193.31 (ॲव्हरेज)** | **9,18,611/-** |
| 2 | **बाब क्र. 6 डि आय पाईप्स,** | | | | | |
| | **1) 150 mm DI K 7** | **6158 मिटर** | **2409 मिटर** | **3749 मिटर** | **1286.74** | **48,23,988/-** |
| | **2) 250 mm DI K 7** | **509 मिटर** | **213 मिटर** | **296 मिटर** | **1996.81** | **5,91,056/-** |
| | **3) 300 mm DI K 7** | **978 मिटर** | **308 मिटर** | **370 मिटर** | **3086.08** | **11,41,850/-** |
| 3 | **बाब क्र. 7 lowering & laying, DI pipes** | | | | | |
| | **1)150 एमएम** | **6169 मिटर** | **2409 मिटर** | **3760 मिटर** | **79.54** | **2,99,070/-** |
| | **2)250 एमएम** | **507 मिटर** | **213 मिटर** | **294 मिटर** | **141.05** | **41669/-** |
| | **3) 300 एमएम** | **684 मिटर** | **308 मिटर** | **376 मिटर** | **170.74** | **64198/-** |
| 4 | **बाब क्र. 8** | **Providing,प्रोव्हायडिंग लोरिंग ॲन्ड जॉईंटिंग एचडिपी पाईप** | | | | |
| | **1) 90 एमएम** | **6639** | **267 मिटर** | **6372** | **237.19** | **15,11,375/-** |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मिटर | | मिटर | | |
| | 2)110 एमएम | 16478 मिटर | 11823 मिटर | 4655 मिटर | 325.70 | 15,16,134/- |
| 5 | बाब क्र. 15 प्रोव्हायडिंग ॲन्ड सप्लाईं ऑल सॉकेट टिज | | | | | |
| | 1) 150x150x100 | 52 नग | 3 नग | 49 नग | 4968.39 | 2,43,451/- |
| | 2) 200x200x200 | 4 नग | 2 नग | 2 नग | 8320.22 | 16,640/- |
| | 3) 200x200x150 | 7 नग | 5 नग | 2 नग | 7829.68 | 15,659/- |
| | 4) 200x200x100 | 13 नग | 10 नग | 3 नग | 7115.41 | 21,346/- |
| 6 | बाब क्र. 21 मेकिंग क्रॉस कनेक्शन 100 एमएम | 130 नग | 4 नग | 126 नग | 1468.79 | 1,85,067/- |
| 7 | बाब क्र. 23 प्रोव्हायडिंग ॲन्ड सप्लाईं ISI.Std. स्पेशल्स | 29 क्वि. | 10 क्वि. | 19 क्वि. | 6827.60 | 1,29,724/- |
| 8 | बाब क्र. 24 प्रोव्हायडिंग ॲन्ड इन्स्टॉलिंग वॉटर मिटर 15 एमएम | 2970 नग | 2850 नग | 120 नग | 1970 | 2,36,400/- |
| 9 | बाब क्र. 25 प्रोव्हायडिंग ॲन्ड इन्स्टॉलिंग फ्लँज एन्ड बल्क मिटर | 4 नग | 1 नग | 3 नग | 19922 | 59,766/- |
| 10 | बाब क्र. 26 रिप्लेसमेंट जी आय पि व्ही सी पाईप वुईथ एमडिपीई पाईप 20 एमएम | 19700 मिटर | 15675 मिटर | 4025 मिटर | 137.01 | 5,51,465/- |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बाब क्र. 28 प्रोव्हायडिंग ॲन्ड फिक्सींग एचडिपीई पाईप | | | | | |
| | 1) 90x20 एमएम | 1862 नग | 894 नग | 968 नग | 933 | 9,03,144/- |
| | 2) 110x20 एमएम | 592 नग | 330 नग | 262 नग | 1720 | 4,50,640/- |
| 11 | बाब क्र. 31 प्रोव्हायडिंग लोअरिंग लेईंग स्लुस वॉल्व्ह 100 एमएम | 28 नग | 2 नग | 26 नग | 14663 | 3,81,238/- |
| 12 | बाब क्र. 37 प्रोव्हायडिंग कन्स्ट्रक्टींग चेंबर्स | | | | | |
| | 1) 0.9x0.9x1.2 | 12 नग | 1 नग | 11 नग | 45 | 49500/- |
| | 2) 1.2x1.2x1.2 | 6 नग | 4 नग | 2 नग | 8100 | 16200/- |
| | 3) 1.5x1.5x1.5 | 3 नग | 2 नग | 1 नग | 12700 | 12700/- |
| 13 | बाब क्र. 40 प्रोव्हायडिंग फिक्सींग सी आय रोड बॉक्स | 48 नग | 44 नग | 4 नग | 2241.9 | 8968/- |
| 14 | बाब क्र. 48 रिपेअर्स डिआय सि आय पाईप्स | 45 नग | 15 नग | 30 नग | 2604.08 | 78122/- |
| | सब वर्क बी 2 | | | | | |
| 15 | बाब क्र. 6 प्रोव्हायडिंग ॲन्ड सप्लाईं ISI.Std. स्पेशल्स | 2383 कि.ग्रॅ | 1443 कि.ग्रॅ | 937 कि.ग्रॅ | 68.28 | 63978/- |
| 16 | बाब क्र. 8 प्रोव्हायडिंग | 12.69 घ.मी. | 6.58 घ.मी. | 6.11 घ.मी. | 6247.41 | 38,172/- |



DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **ॲन्ड कास्टींग सिटु सिमेंट कॉन्क्रीट** | | | | | |
| **17** | **बाब क्र. 13 मॅन्युफॅक्चरींग सप्लाईंग कमीश्नींग इलेक्ट्रो मॅग्नेटींग फ्लो मीटर** | | | | | |
| | **1) 100 एमएम** | **2 नग** | **1 नग** | **1 नग** | **171547.08** | **171547/-** |
| | **2) 150 एमएम** | **3 नग** | **2 नग** | **1 नग** | **184390.58** | **184391/-** |
| | **3) 250 एमएम** | **3 नग** | **1 नग** | **2 नग** | **241654.19** | **4,83,308/-** |
| | | | | | **एकूण** | **15209377** |

सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (अ) (1)नुसार कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणे कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- पर्यंत वाढ करण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम 227 (2)(अ) ज्यावेळी अतिरिक्त काम, मंजूर निविदेमध्ये अगोदरच समाविष्ट करण्यात आलेल्या समान कामाशी तुलना करण्याजोगे असेल त्यावेळी प्रभारी अभियंता व कंत्राटदार यांनी परस्परात निश्चित करावयाचा व मंजूर करावयाचा दर, शक्यतोवर ,निविदेमधील समान बाबीच्या दरावर अधारित असणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या प्रकरण 7 संविदा मधील कलम 73 नुसार महानगर पालिकेच्या वतीने संविदा करुन देण्याचा अधिकार आयुक्त यांना असल्याने जादाचे काम करताना आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक असताना ती घेण्यात आलेली नाही. त्यामुळे जादा कामावर झालेली रक्कम रु.15209377/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

09) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग कडील शासन निर्णय क संकिर्ण 2008/ 1338/प्र.क्रं. 171/08 नवि-20 दिनांक. 02/03/2009 नुसार ड वर्ग महानगरपालिकेकडील 50 लाखा पेक्षा अधिक किमतीच्या सर्व विकासकामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण करणे आवश्यक आहे व त्यापेक्षा कमी किमतीच्या कामांच्या संदर्भात Random पध्दतीने किमान 10% कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे . परंतु या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेचे नस्तीची तपासणी केली असता दिसुन येत नाही. कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखा परीक्षण करुन कामाची गुणवत्ता व दर्जा तपासण्यात आलेला नाही.

आक्षेपाधिन रक्कम :- बँक गॅरेंटी नुतनीकरण रक्कम रु.1520000/- + वॉटर बिलींग सॉफ्टवेअर सिस्टिम रक्कम रु.1600000/- + टेक्निकल सर्व्हिसेस रक्कम रु.1500000/- + अंदाजपत्रकापेक्षा जादा बाबी केलेल्या कामाची रक्कम रु.15209377/-

**एकुण आक्षेपाधिन रक्कम रु.19829377/-**

DATRNDM7201 (Ref No : 68)

DRAFT

## *46 सुजल निर्मल अभियान योजने अंतर्गत मिरज जलशुध्दीकरण येथे 10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपारिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**सुजल निर्मल योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 07**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनिस्स मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4358347.00/-

***या कामाचा कार्यादेश दि. 09/03/2012 रोजीचा असुन कामाची मुदत निविदेनुसार 12 महिने असल्याने काम 08/03/2013 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक होते. आयुक्त यांनी कामास 31/05/2013 पर्यंत भाववाढ फायद्याशिवाय मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतु सदर काम दि.31/03/2014 रोजी पुर्ण केले असल्याने जादा विलंब कालावधीस मान्यता घेतलेली कागदपत्रे तसेच कामाच्या सुरक्षा अनामतपोटी दिलेली बँक गॅरेंटीची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत. कामाची सर्व देयके शासननिधीमधुन खर्च टाकण्यात आली आहेत.***

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, पाणीपुरवठा विभाग सांगली, मिरज विभागातील सुजल निर्मल अभियानांतर्गत 10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपरिक मिरज जलशुध्दीकरण केंद्र बांधणे कामाचे लेखापरीक्षणा करिता उपलब्ध करण्यात आलेली कामाची नस्ती, कागदपत्र, दस्तावेज, प्रदान प्रामाणके, मोजमाप पुस्तक इत्यादीचे लेखापरीक्षण केले त्याबाबत खालीलप्रमाणे आहे .

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाला सुजल निर्मल योजनेंतर्गत 49.20 कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प आराखडा सादर केला आहे. सदर प्रस्तावाला महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्र.सुनिअ-2010/ प्र.क्र. 460/ पापु-22 दिनांक 23 नोव्हेंबर, 2010 अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प आराखड्यात रुपये 4 (चार) कोटी किंमतीच्या मिरज येथील जलशुध्दीकरणकेंद्राचे नुतनीकरण तसेच विस्तारीकरण करणे कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. शासनाला प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याला मंजुरी मिळण्याच्या दरम्यान सुजल निर्मल कामांचे 6 पॅकेज करून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व्दारे इच्छुक ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या. त्याकरिता दिनांक 27/03/2010 च्या दैनिक पुढारी व इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रांत जाहिरात देण्यात आली होती. निविदा सूचनेस प्रतिसाद दिलेल्या ठेकेदारांच्या निविदांची छाननी करून पात्र ठेकेदार ठरविण्यात आले. तथापि योजनेचे सल्लागार मे. डी.आर.ए. कन्सल्टंट, नागपूर यांचेशी पॅकेज एकत्रित करून पॅकेजची संख्या कमी करणे व कामाचे स्वरूप, तांत्रिक बाबी त्यासाठी लागणाऱ्या तांत्रिक क्षमता असलेले ठेकेदार यांचा अभ्यास करून 6 पॅकेजचे 3 गट करण्यात आले. त्यास स्थायी समिती ठराव क्र. 126, दिनांक 12/07/2010 अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

प्रस्तुत काम गट क्र. 3 अंतर्गत अस्तित्वातील मिरज जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता सध्याच्या

DRAFT

19.20 द.ल.लि. वरून 28 द.ल.लि. वाढविणे सिव्हिल मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल कामांमध्ये सुधारणा करणे तसेच जलशुध्दीकरण केंद्र पाच वर्षासाठी देखभाल दुरुस्तीसह चालविणे या रुपये चार कोटी किंमतीच्या कामाचा समावेश करण्यात आला असून गट 3 करता एकूण पाच ठेकेदार पात्र ठरविण्यात आले.

मे. व्हिओलिया वॉटर इंडिया लि. दिल्ली. 2) मे. कॅस्कल एन व्ही युनायटेड किंग्डम. 3) मे. लक्ष्मी इंजिनिअरिंग सर्व्हीसेस प्रा. लि. कोल्हापूर 4) मे. मिश्रा असोसिएटस्. 5) मे. एस एम सी इंफ्रा. लि. ठाणे. निविदा सूचना प्रसिद्धीनुसार 29/04/2011 रोजी उपायुक्त यांचे सोबतच्या प्री-बीड मिटींगमध्ये ठेकेदारांकडून निविदा सादर करण्याचा कालावधी अपुरा असल्याने मुदतवाढ मागणी करण्यात आली. त्यानुसार निविदा सादर करण्याची मुदत दि.19/05/2011 वरून दि. 6/06/2011 पर्यंत वाढविण्यात आली. त्यानंतर मे. मे. व्हिओलिया वॉटर इंडिया लि. दिल्ली. यांनी दिनांक 19/05/2011 च्या फॅक्सव्दारे 4 जुलै, 2011 पर्यंत मुदतवाढीची मागणी कळविली. परंतु मुदत वाढ देण्यात आली नाही. मुदत वाढ दिनांक 07/06/2011 पर्यंत एकही निविदादाराने निविदा सादर केली नाही. त्यामुळे दिनांक 19/05/2011, 7/06/2011, 15/06/2011 दिनांक 24/06/2011 व 6/07/2011 पर्यंत मुदतवाढ वाढविण्यात आली निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांक 6/07/2011 पर्यंत फक्त दोन निविदादारांनी निविदा सादर केल्या. तपशील खालीलप्रमाणे.

मे. एस.एम.सी. इंफ्रा. लि. ठाणे. : एकूण रुपये 10,47,60,700/- व मे. लक्ष्मी इंजिनिअरिंग सर्व्हीसेस प्रा. लि. कोल्हापूर एकूण रुपये 15,49,50,000/-

सदर निविदादारांनी देऊ केलेले दर वाजवी नसल्याने, 10 द.ल.लि. क्षमतेचे नविन अपारंपरिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे व चालू जलशुध्दीकरण केंद्राची कामे चालू दरसूचीनुसार चार कोटी रुपयात होऊ शकतात त्यासाठी सदर निविदा प्रक्रिया रद्द करून खुल्या ई-निविदा मागविणे योग्य होईल असा प्रस्ताव कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांनी स्थायी समितीला सादर केल्यानुसार स्थायी समिती ठराव क्रमांक 289, दिनांक 30/08/2011 अन्वये प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

प्रस्तुत 4 कोटी रुपये प्रकल्प आराखडा कामांमध्ये 10 द.ल.लि. क्षमतेचे नविन अपारंपरिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाची दरसूची 2010-11 नुसार अंदाजपत्रकीय किंमत रुपये 1,70,00,000/- विचारात घेऊन त्यानुसार निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा सूचना पत्र क्र. मनपा/ पापुवि/ मि/731/ 2011, दिनांक 14/09/2011 नुसार दैनिक पुढारी या एकमेव वृत्तपत्रात जाहिरात देऊन ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत.

निविदा प्रसिद्धी दिनांक : 14/09/2011

निविदा फॉर्म विक्री कालावधी : निविदा सूचना प्रसिद्धीच्या दिनांक पासून 28/10/2011 दुपारी 4.00 वाजेपर्यंत

निविदा सादर करण्याचा दिनांक : दिनांक 29/09/2011 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत जाहीर निविदा सूचनेस प्रतिसाद म्हणून चार निविदा दारांनी निविदा फॉर्म विकत घेतले त्यापैकी तीन निविदादारांनी निविदा सादर केल्या. 1) मे. एस व्ही जाधव रुपये 2,05,88,700/ 2) पी.टी. माळी रुपये 2,13,16,700/- व मे. लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्विसेस कोल्हापूर रुपये 2,17,60,000/- निविदा ई-निविदा पद्धतीने सादर केल्या आहेत. ई-निविदा E-Tendering Form of Comercial Evaluation प्रपत्रानुसार सर्वात कमी दर देऊ करणारे मे. एस.व्ही.जाधव रुपये 2,05,88,700/- यांना पत्र क्र. मनपा/ मि/तांशा/ 890/2011, दिनांक 18/11/2011 अन्वये वाटाघाटी करिता बोलाविण्यात आले. वाटाघाटी

दिनांक 18/11/2011 रोजी दुपारी 4 वाजता करण्यात आल्या. वाटाघाटीवेळी निविदादार एस.व्ही.जाधव यांनी निविदा दरांबाबत दरसूची 2011-12 वर आधारित कामाची किंमत रुपये 2 कोटी होते. त्यामुळे सदर किंमतीच्या 1.85 टक्के जादा दराने काम करण्याबाबत संमती दर्शविली. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. 488 दिनांक 27.12.2011 अन्वये मंजुरी देण्यात आल्याने श्री. एस.व्ही.जाधव, मिरज यांनी प्रस्तुत कामाची अनामत रक्कम व महापलिकेबरोबर करारनामा करण्यात आल्यानंतर दिनांक 9/03/2012 च्या आदेशानुसार कामाचे आदेश देण्यात आले आहेत.

कामाचे नाव : सुजल निर्मल अभियानांतर्गत 10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपरिक मिरज जलशुध्दीकरण केंद्र बांधणे.

स्थायी समिती मंजुरी : स्थायी समिती ठराव क्र. 126, दिनांक 12/05/2010 अन्वये स्थायी समिती ठराव क्र. 488 दिनांक 27/12/2011 अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सुजल निर्मल अभियानांतर्गत मिरज येथे 10 द.ल.ली. क्षमतेचे अपारंपरिक जलशुध्दीकरण केंद्र तयार करून चालू जलशुध्दीकरणकेंद्राची दुरुस्ती करणे कामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2010-11 च्या दरसुचीवर आधारित अंदाजित रक्कम रुपये 1,70,00,000/- वर दरसूचीतील नियम 8 नुसार मनपा क्षेत्रातील 5% रक्कम वाढीव गृहीत धरून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1,78,50,000/- ची तुलना करता आलेल्या निविदांमध्ये सर्वात कमी दराचे निविदा धारक मे. शशांक व्ही. जाधव मिरज यांचा निविदा दर 15.34 टक्के जादा दराबाबत वाटाघाटी करून मूळ निविदा किमतीवर 11.10 टक्के जास्त व चालू दरसुची 2011-12 च्या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1,98,31,500/- वर मे. शशांक व्ही. जाधव मिरज यांचे निविदेस मंजुरी दिलेली आहे.

कामाचे आदेश : मनपा/ पापुवि/ मि/ तांशा/ 159/ 2012, दिनांक 9/03/2012 अन्वये अंदाजपत्रकीय रकमेच्या 16.65 टक्के जादा दराने मंजूर करण्यात आले आहे. परंतु 2011-12 या आर्थिक वर्षाचे दरसूचीप्रमाणे निविदा रक्कम रु.1,98,31,500/- होत असल्याने त्या किंमतीवर निविदा मंजुर करणेत आली आहे.

कामाचा कालावधी : कामाचे आदेश मिळाल्यापासून 12 महिने

काम पूर्ण दि. 31/03/2014. (अंतिम देयक फेब्रु 2016 अखेर प्रदान केलेले नाही)

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडे सुजल निर्मल अभियान योजनेअंतर्गत मिरज जलशुध्दीकरण येथे 10 द.ल.लि. क्षमतेचा अनकन्व्हेन्शनल जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामावर वित्तीय वर्ष 2011-12 ते 2013-14 पर्यंत एकुण र.रु. 1,92,65,331/- खर्च झाला असुन वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये या कामावर खालील नमुद प्रमाणकाव्दारे रक्कम रु. 43,58,347/- चा खर्च सुजल निर्मल अभियान या निधीमधून करण्यात आला आहे.

| अ.क्र | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 04 | 29/05/2013 | 27,33,634/- | 7 वे धावते देयक |
| 2 | 07 | 12/07/2013 | 9,89,542/- | 8 वे धावते देयक |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **3** | **13** | **19/09/2013** | **6,35,171/-** | **9 वे धावते देयक** |
| **एकूण** | | | **43,58,347/-** | |

**या कामाची नस्ती,बी-1 टेंडर, प्रमाणके व धावते देयकांची मोजमाप नोंदवहीसह तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.**

1) सदर कामाचे आदेश दि. 09/03/2012 रोजीचे असुन सदर कामाची मुदत निविदेनुसार 12 महिने (पावसाळ्यासहित) होती. त्यानुसार सदर काम 08/03/2013 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक होते. परंतु वित्तीय वर्ष 2013-14 मधील 9 वे धावते देयकानुसार सदरचे काम अपुर्ण असल्याचे आढळुन आले. नस्तीवरील कागदपत्रावरुन ठेकेदारास मा आयुक्त यांनी आदेश क्र. 11/2013-14 दि. 18/04/2013 अन्वये ठेकेदारास वाळु, खडी व दगडाचा पुरवठा शासकीय आडचणीमुळे होऊ शकत नसल्याने ठेकेदाराच्या मागणी नुसार व कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांचे अहवाला नुसार दि. 31/05/2013 पर्यंत भाववाढ फायद्याशिवाय मुदतवाढ देण्यात आली असल्याचे आढळुन आले. परंतु सदर काम दि. 31/03/2014 रोजी पूर्ण झाले असल्याने दि.31/05/2013 ते दि.31/03/2014 अखेरच्या कालावधीसाठी मुदतवाढीचे आदेश नस्तीस आढळुन आले नाहीत. निविदा अटी नुसार कंत्राटदाराने कामाच्या नियोजनाचा बार चार्ट द्यावयाचा आहे व त्यानुसार काम करावयाचे आहे. परंतु असा बार चार्ट नस्तीस आढळुन आला नाही. काम पूर्ण करुन घेण्याच्या अंमलबजावणीमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते. त्यामुळे शासन निधी रुपये 1,92,65,331/- नाहक गुंतुन पडलेला आहे. त्यामुळे सदर निविदादार कामाला विलंब झाल्यामुळे निविदा अट बी-2 नुसार 1% दरापर्यंत दंडनीय रकमेस पात्र आहेत. मुदतीत काम पुर्ण न झाल्याने टेंडर मधील contract conditions **clause No 2 नुसार** ठेकेदाराने मुदतीत कामाचे टप्पेनिहाय काम पूर्ण न केल्यास In the event of the oprator Failing to comply with these conditions he shall be liable to pay as compensation an amount as Muncipal commissinor whole decision in writing shall be final may decide of the said estimeted cost of whole work for every day thet the due quantity of work remains incomplete Provided always that the totel amount of compensation to be paid under the provision of this clause shall not exceed 10% of estimated cost of this work as shown in the tender ( 5% for liquidated damage & 5% for penalty) यानुसार दंडनीय कार्यवाही करणे आवश्यक असताना ती केली नसल्याचे आढळुन आले. निविदा क्लॉज 6 नुसार कामाच्या मुदतवाढी बाबत कंत्राटदाराने मुदत संपण्यापूर्वी 30 दिवस अगोदर मुदतवाढी बाबत लिखित स्वरुपात अर्ज करणे आवश्यक आहे परंतु सदर प्रकरणी मुदतवाढी बाबत कंत्राटदाराकडून निवेदन करण्यात आलेले नाही. त्यामुळे मुदतवाढीबाबतचा तपशिल नस्तीमध्ये आढळुन आलेला नाही.

2) मोजमाप नोंदवही क्र. 7 पृष्ठ क्र. 91 नुसार या कामावर एकुण 1,92,65,331/- खर्च झाला असल्याचे आढळुन आले. सदर कामावर 94.5% खर्च झाला असुन उर्वरित 5.5 टक्के खर्च केला नसल्याने काम अपुर्ण राहिले आहे. त्यामुळे कामाचा उद्देश साध्य झालेला नसुन सदर कामाच्या अंमलबजावणीमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते.

3) या कामाचे धावते देयक क्र. 7 ते 9 च्या नोंदी मोजमाप नोंदवही क्र. 7 मधील पृष्ठ क्र. 79

DRAFT

ते 91 नोंदविलेल्या आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका मधील नियम क्र. 13 नुसार मोजमाप पुस्तकात नोंदवहयात आलेली मोजमापे देयक तयार केल्यानंतर मोजमाप पुस्तकात लाल शाईने तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. तसेच नियम 15 नुसार देयक मंजूर केल्यानंतर मोजमाप पुस्तकात दुसरी तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच मोजमाप पुस्तकात देयकाचे प्रदान केल्यानंतर प्रदानाचा प्रमाणक क्रमांक, दिनांक व धनादेश क्रमांक नोंदविण्यात आलेला नाही त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सदर कामासाठी आवश्यक असणा-या बँक गॅरंटीची कागदपत्रे नस्तीस आढळुन आली नसल्याने बँक गॅरंटीची विधीग्राहयता तपासता आली नाही.

5) ) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय सुनिअ/2010/प्र.क्र.460/ पाणीपुरवठा -22 दि.23/11/2010 नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी सुजल निर्मल योजनेमधुन करण्यात येणा-या रु.29.85 कोटी रक्कमांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार राज्य शासनाकडून 70 टक्के अनुदान मिळणार असून महानगरपालिकेने 20 टक्के रक्कम कर्जाद्वारे उभी करावयाची आहे व उर्वरित 10 टक्के रक्कम महानगरपालिकेने स्वनिधीमध्ये तरतुद करुन खर्च करावयाची आहे. 2011-12 ते 2013-14 अखेर या कामावर 09 व्या धावत्या देयकापर्यंत ठेकेदारास रक्कम रु.19265331/- आदा केले आहेत. सदर रक्कम राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानामधून ठेकेदारास आदा करण्यात आली आहे. या कामाची निविदा किंमत रु.17000000/- असुन निविदा 16.65 टक्के जादा दराने मंजुर केल्याने या कामाची किंमत रु.19830500 /- इतकी होत आहे. राज्य शासनाकडून 70 टक्के प्रमाणे रु. 11900000/- अनुदान मिळणार असल्याने उर्वरित रक्कम रु.7930500/- महानगरपालिकेने कर्ज व स्वनिधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. नस्तीची तपासणी केली असता या योजनेसाठी महानगरपालिकेने अद्याप कर्ज काढलेले नाही . ठेकेदारास कामाची देयके देताना 60 टक्के रक्कम शासननिधीमधून व 40 टक्के रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने आर्थिक वर्ष 2011-12 ते 2013 -14 अखेर ठेकेदारास रु.19265331/- आदा केले आहेत. अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 60 टक्के प्रमाणे रु.11898300/- व स्वनिधीमधून 40 टक्क्याप्रमाणे रु.7706132/- खर्च करणे आवश्यक असता सर्व रक्कम प्राप्त शासन अनुदानामधून खर्च करण्यात आली आहे. शासननिधी व महानगरपालिका निधीची रक्कम त्यांचे हिश्श्याचे टक्केवारीनुसार प्रत्येक देयकामधून खर्च करणे आवश्यक असता नियमबाहयपणे शासन निधीतून सर्व देयके दिल्याने शासन निधीचा वापर जादा झाला आहे. परंतु त्याप्रमाणात काम पूर्ण न झाल्याने सदरची योजना निधी अभावी रखडली आहे.

6) सदर कामावर वित्तीय वर्ष 2013-14 पर्यंत 1,92,65,331/- खर्च झाला आहे. ठेकेदाराच्या देयकातून व्हॅट, आयकर, कामगार कल्याण उपकर व सुरक्षा ठेव इत्यादीच्या रकमा कपात करण्यात आल्याचे आढळुन आले परंतु रॉयल्टीची रक्कम कपात करण्यात आली नसल्याचे आढळुन आले. महाराष्ट्र शासन महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं. गौण खनिज-10/1009/पी.के. 309/ख(3) दि. 11/02/2010 नुसार रक्कम रु. 200 प्रती ब्रास किंवा रु. 70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे. व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिल्या नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. परंतु सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या परिमाणानुसार रॉयल्टीची

DRAFT

रक्कम देयकातून वसूल करुन महसूल विभागास देणे आवश्यक असताना या प्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे आढळुन आले. वित्तीय वर्ष 2012-13 च्या लेखापरीक्षणातील अर्धसमास पत्र क्र. 155 दि. 01/10/2014 यास विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये सदर कामावर वापरण्यात आलेल्या 615.63 घ.मी. गौण खनिजासाठीची रॉयल्टी रक्कम 43507/- अंतिम देयकातून वसूल करण्याचे मान्य केले होते. सदर काम 31 मार्च 2014 रोजी पूर्ण झाले असून त्याचे 10 वे अंतिम देयक 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये अदा केले आहे. परंतु सदर देयकात रॉयल्टीची रक्कम वसुल केली नसल्याचे आढळुन आले. तरी सदर कामावर वापरण्यात आलेल्या गौण खनीजाबाबतची रॉयल्टी रक्कम परीगणीत करुन वसुल करुन उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे महसुल विभागास देणे आवश्यक आहे.

07) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग कडील शासन निर्णय क संकिर्ण 2008/ 1338/प्र.क्रं. 171/08 नवि-20 दिनांक. 02/03/2009 नुसार ड वर्ग महानगरपालिकेकडील 50 लाखा पेक्षा अधिक किमतीच्या सर्व विकासकामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण करणे आवश्यक आहे व त्यापेक्षा कमी किमतीच्या कामांच्या संदर्भात Random पध्दतीने किमान 10% कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे . परंतु या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेचे नस्तीची तपासणी केली असता दिसुन येत नाही. कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखा परीक्षण करुन कामाची गुणवत्ता व दर्जा तपासण्यात आलेला नाही.

**आक्षेपाधिन रक्कम रु. 4358347/-**

DATRNDM7201 (Ref No : 69)

## *47 सुजल निर्मल अभियान योजनेअंतर्गत पॅकेज क्र. 1.1 व 1.3 मधील शामराव नगर येथे ऑक्सीडेशनल पॉन्ड टाकी बांधणे, इंटेकवेल नुतनीकरण, फिडर मेन टाकणे, वितरण व्यवस्था नुतनीकरण करणे या कामातील अनियमिततABाबत.*

**सुजल निर्मल अभियान योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 12**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनिस्स मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1981837.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 131866.00/-

***सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद 265 नुसार जेव्हा कामामध्ये महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे आदेश घेणे आवश्यक आहे. या कामांना प्रशासकीय मंजुरी आयुक्त यांनी दिली असल्याने अंदाजपत्रकामधील बाबीपेक्षा जास्त परिमाण झालेल्या बाबी करण्याअगोदर आयुक्त यांची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेताच जादा काम करुन घेतल्याने जादा कामाची रक्कम रु.1981837/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. या कामामध्ये Sluice Valve व Double Flannged Valve पुरविण्याच्या दोन अतिरिक्त बाबी करण्यात आल्या आहेत व त्याची रक्कम चालु दरसुचीनुसार आदा करणे आवश्यक असताना या***



DRAFT

***रक्कमेवर 14 टक्के जादाने रु. 131866/- ठेकेदारास आदा केल्याने सदर रक्कम वसुलपात्र करण्यात येत आहे.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडे सुजल निर्मल अभियान योजनेतंर्गत पॅकेज क्र. 1.1 आणि 1.3 मधील शामराव नगर येथे ऑक्सीडेशनल पॉन्ड टाकी बांधणे, इंन्टेकवेल नुतनीकरण, फिडर मेन टाकणे वितरण व्यवस्था नुतनीकरण करणे, या कामावर वित्तीय वर्ष 2011-12 ते 2013-14 पर्यंत एकुण र.रु. 4,12,21,487/- खर्च झाला असुन वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये या कामावर खालील नमुद प्रमाणकाव्दारे रक्कम रु. 59,90,172/- खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 08 | 12/07/2013 | 42,78,465/- | 6 वे धावते देयक |
| 2 | 17 | 20/03/2014 | 17,11,707/- | 7 वे धावते देयक |
| एकूण | | | 59,90,172/- | |

वरील प्रमाणकांची, धावते देयकांची मोजमाप नोंदवहीसह तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) या कामाचे आदेश दि. 23/12/2010 रोजीचे असुन कामाची मुदत निविदेनुसार 12 महिने व करारपत्र व कामाचे आदेशानुसार 14 महिने (पावसाळ्यासहित) होती. त्यानुसार सदर काम 22/02/2012 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक होते. परंतु वित्तीय वर्ष 2013-14 मधील 7 वे धावते देयकानुसार सदरचे काम अपुर्ण असल्याचे आढळुन आले आहे. नस्तीमधील कागदपत्रावरुन ठेकेदारास आयुक्त यांनी प्रथमत: 31/03/2013 अखेर मुदतवाढ दिलेली होती. त्यानंतर आदेश क्र. 192/2013-14 दि. 30/09/2013 अन्वये ठेकेदारास वाळु उपलब्ध नसल्याने व टाकीचे कामास वाळुची आवश्यकता असल्याने ठेकेदाराच्या मागणी नुसार व कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांचे अहवाला नुसार दि. 31/10/2013 पर्यंत भाववाढ फायद्याशिवाय मुदतवाढ देण्यात आली असल्याचे आढळुन आले. निविदा क्लॉज 6 नुसार कामाच्या मुदतवाढी बाबत कंत्राटदाराने मुदत संपण्यसापूर्वी 30 दिवस अगोदर मुदतवाढी बाबत लिखित स्वरुपात अर्ज करणे आवश्यक आहे परंतु सदर प्रकरणी मुदतवाढी बाबत कंत्राटदाराकडून निवेदन करण्यात आलेले नाही. त्यामुळे मुदतवाढीबाबतचा तपशिल उपलब्ध नस्तीमध्ये आढळुन आलेला नाही.

सदर काम मार्च 2014 पर्यंत पूर्ण झाले नसल्याचे 7 वे धावते देयका नुसार दिसून येते. मुदतीत काम पुर्ण न झाल्याने टेंडर मधील contract conditions clause No 2 नुसार ठेकेदाराने मुदतीत कामाचे टप्पेनिहाय काम पूर्ण न केल्यास In the event of the operator Failing to comply with these conditions, he shall be liable to pay as compensation an amount as Muncipal commissinor whole decision in writing shall be final may

decide of the said estimated cost of whole work for every day that the due quantity of work remains incomplete. Provided always that the total amount of compensation to be paid under the provision of this clause shall not exceed 10% of estimated cost of this work as shown in the tender ( 5% for liquidated damage & 5% for penalty) यानुसार दंडनीय कार्यवाही करणे आवश्यक असताना ती केली नसल्याचे आढळुन आले.

2) मोजमाप नोंदवही क्र. 19 पृष्ठ क्र. 54 वर नमुद असलेप्रमाणे 7 वे धावते देयक अखेर या कामावर एकुण 4,12,21,487/- खर्च झालेला आहे. सदर कामाची 14% जादा दराने स्वीकृत निविदा रक्कम 5,10,29,043/- असल्याने या कामावर 71% खर्च झाला असुन उर्वरित 29 टक्के खर्च केला नसल्याने काम अपुर्ण राहिले आहे. त्यामुळे कामाचा उद्देश साध्य झालेला नसुन सदर कामाच्या अंमलबजावणीमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते.

3) या कामाचे धावते देयक क्र. 6 ते 7 च्या नोंदी मोजमाप नोंदवही क्र. 19 मधील पृष्ठ क्र. 39 ते 54 नोंदविलेल्या आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका मधील नियम क्र. 13 नुसार मोजमाप पुस्तकात नोंदवह्यात आलेली मोजमापे देयक तयार केल्यानंतर मोजमाप पुस्तकात लाल शाईने तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. तसेच नियम 15 नुसार देयक मंजूर केल्यानंतर मोजमाप पुस्तकात दुसरी तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच मोजमाप पुस्तकात देयकाचे प्रदान केल्यानंतर प्रदानाचा प्रमाणक क्रमांक, दिनांक व धनादेश क्रमांक नोंदविण्यात आलेला नाही त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सदर कामासाठी IDBI बँक शाखा कफ परेड, मुंबई यांचेकडील रु. 15,20,000/- रकमेची बँक गॅरंटी दि. 07/12/2010 पासून 1 वर्षाकरीता होती. तीचे दि. 09/01/2014 पर्यंतची नुतनीकरण केल्याचे नस्तीस आढळुन आले. परंतु सदरचे काम लेखापरीक्षण कालावधीपर्यंत अपूर्ण असल्याने दि. 09/01/2014 च्या पुढील कालावधीसाठी सदर बँक गॅरंटीचे नुतनीकरण करणे आवश्यक असता ते केले बाबतची कागदपत्रे नस्तीस आढळुन आली नाहीत.

5) या कामाची निविदा रक्कम रु. 5,10,29,043/- असुन काम 14% जादा दराने मंजुर झाले असल्याने वरील जादा 14% दराची रक्कम प्रत्येक देयकाच्यावेळी मनपा निधीतून खर्च करणे आवश्यक असताना ती नियमबाह्यपणे शासन निधीतून खर्च केल्याने सदर योजनेस उपलब्ध शासन निधीचा वापर जादा झाला आहे. 7 वे धावते देयकापर्यंत 14% जादा दरासहीत सदर योजनेवर 4,12,21,487/- एवढा खर्च झाला आहे. सदर खर्चा मधील 14% जादा खर्चाची रक्कम रु. 46,51,370/- त्वरीत मनपा निधीतून सुजल निर्मल अभियान योजना या निधीकडे वर्ग केली नाही.

6) सदर कामाचे 7 वे धावते देयकापर्यंत रॉयल्टी रक्कम ठेकेदाराच्या बिलातून कपात केली नसल्याचे आढळुन आले. महाराष्ट्र शासन महसूल आणि वने विभाग अधिसूचनला क्रं. गौण खनिज-10/1009/पी.के. 309/ख(3) दि. 11/02/2010 नुसार रक्कम रु. 200 प्रती ब्रास किंवा रु. 70.67/घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे. व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिल्या नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. परंतु सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या परिमाणानुसार रॉयल्टीची रक्कम रु.53000/- देयकातून वसूल करुन महसूल

DRAFT

विभागास देणे आवश्यक आहे.

7) सुजल निर्मल अभियान अंतर्गत कामाकरिता Expression of Interest व्दारे मागविण्यात आले असल्यामुळे अन्य कामाच्या अटीमध्ये clause 5.4 escalation of price for work : Price escalation clause shall be applicable on approved initial rates only after 24 months. No escalation will be provided within 24 months. No escalation price shall be allowed for the period of delay causes by operator reasons pertaining to operator अशी अट आहे. परंतु या कामाच्या निविदेमध्ये वरील अटीचा अंतर्भाव केला नसल्यामुळे ठेकेदारास पहिल्या देयकापासून किंमत/दरवाढ(Price Escalation) देण्यात आली आहे. एकाच वेळी काढण्यात आलेल्या एकाच प्रकारच्या कामाच्या निविदा अटीमध्ये भिन्नता असल्याचे दिसुन येते. सदरच्या कामास विहित मुदतीनंतर खुपच विलंब झाल्याने ठेकेदारास 7 वे धावते देयकापर्यंत एकुण रक्कम रु. 33,46,019/- किंमत दरवाढ द्यावी लागली आहे. अन्य कामाच्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे clause 5.4 escalation of price for work चा समावेश या निविदा अटी शर्ती मध्ये नसल्याने या कामास प्रथम देयकापासुन भाववाढ द्यावी लागल्याने तसेच सदरचे काम विहित मुदतीत पूर्ण झाले नसल्याने रक्कम रु. 33,46,019/- चे शासन निधीचे नुकसान झाले आहे.

8) निविदा क्र. बी 1/ बी मधील बाब क्र. 7 मध्ये डिवॉटरींग साठी मक्तेदारास रु. 4,75,000/- अदा केले आहेत. परंतु प्रत्यक्ष कामावरती कीती HP चा पंप वापरण्यात आला, दररोज पंप चालु केल्याची व पंप बंद केल्याची वेळ, एकुण पंप चालु असल्याचे तास याबाबींची नोंद नस्तीमध्ये तसेच मोजमाप पुस्तकामध्ये न करताच डिवॉटरींगची रक्कम आदा करण्यात आली आहे. त्यामुळे ठेकेदारास आदा केलेली डिवॉटरींची रक्कम रु. 4,75,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

9) मोजमाप पुस्तक क्र. 19 मधील पृष्ठ क्र. 51 ते 54 वर या कामाचे धावते देयक क्र. 7 ची मोजमापे नोंदविण्यात आली आहेत. सदर धावते देयकाचे गोषवा-यामध्ये अंकगणितीय चुकामुळे स्तंभ क्र. 7 मध्ये खालील बाबींची रक्कम जादा नोंदविली असल्याने या रक्कमेचे अतिप्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

| अ.क्र | बाब क्र. | तपशिल | परिमाण | दर रु. | योग्य रक्कम रु. | नोंदविलेली रक्कम रु. | फरक रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | बी 1/ सी बाब | 400 mm डि आय पाईप पुरवठा | 2319.75 मिटर | 454.82 (10%) | 1055069 | 1176546 | 1,21,677 |

DRAFT

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्र.1 | | | | | | |
| 2 | बाब क्र. 2 | Supply of ISI Specials | 6.295 मिटर | 76468.80 (80%) | 481371 | 568545 | 87174 |
| 3 | बाब क्र. 6 | खोदाई (0.1 ते 1.5 मिटर) | 3945.50 घ.मी. | 105.55 | 416447 | 1574643 | 1158195 |
| 4 | बाब क्र. 8 | पाया खोदाई | 38.15 घ.मी. | 344.41 | 13139 | 18580 | 5441 |
| 5 | बाब क्र. 10 | प्लीन्थ फिलिंग | 592 घ.मी. | 44.54 | 26368 | 28171 | 1803 |
| 6 | बाब क्र. 7 | Lowering,laying 400 MM DI pipe | 2592 मीटर | 237.88 (90%) | 616585 | 66652 | 49917 |
| 7 | बी 1/ डी बाब क्र.1 | Prov.300 MM DI pipe | 1120.15 मिटर | 308.6 | 345678 | 354677 | 8999 |
| 9 | बाब क्र. 6 | पाया खोदाई | 1433.78 घ.मी. | 105.55 | 151335 | 156291 | 4956 |
| 10 | बाब क्र. 7 | Lowering,laying 300 MM DI pipe | 1125.96 मीटर | 170.74 (90%) | 192246 | 216589 | 24342 |

DRAFT

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | एकुण | 1462504 |

10) अंदाजपत्रक व मोजमाप नोंदवही यानुसार कामाचे बाबनिहाय परिमाण यांची पडताळणी केली असता धावते देयक क्र. 15 अखेर खालील बाबींवरती अंदाजपत्रकापेक्षा जादा प्रमाणात खर्च झाल्याचे आढळुन आले.

| अ.क्र | बाब क्र | मोजमाप नोंदवही नुसारचे परिमाण | अंदाजपत्रक नुसारचे परिमाण | जादा परिमाण | दर | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| | बी 1/बी | | | | | |
| 1 | बाब क्र. 3 खोदाई (0 ते 1.5) | 5849.75 घ.मी. | 1737 घ.मी. | 4112.75 | 359.5 (ॲवरेज) | 1478534/- |
| 2 | बाब क्र. 8 ट्रेन्चेस रिफीलिंग | 5516.29घ.मी. | 1675.51 घ.मी. | 3839.78 घ.मी. | 41.36 | 158813/- |
| | बी 1/सी | | | | | |
| 3 | बाब क्र. 6 खोदाई (0 ते 1.5) | 3945.50 घ.मी. | 1262.50 घ.मी. | 2683 घ.मी. | 105.55 | 283191/- |
| 4 | बाब क्र. 6 खोदाई (1.5 ते 3) | 322.53घ.मी. | 31.95 घ.मी. | 290.58 घ.मी. | 115.54 | 33574/- |
| 5 | बाब क्र. 16 | 3007.07 घ.मी. | 2617.19 घ.मी. | 389.88 घ.मी. | 41.36 | 16125/- |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **ट्रेन्चेस रिफीलिंग** | | | | | |
| **6** | **बाब क्र. 19 डिटेक्टींग अंडरग्राऊंड सर्व्हिसेस** | **2.30 कि.मी.** | **1.14 कि.मी.** | **1.16 कि.मी.** | **10000** | **11600/-** |
| | | | | | **एकुण** | **1981837** |

सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद 265 नुसार जेव्हा कामामध्ये महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे आदेश घेणे आवश्यक आहे. या कामांना प्रशासकीय मंजुरी आयुक्त यांनी दिली असल्याने अंदाजपत्रकामधील बाबीपेक्षा जास्त परिमाण झालेल्या बाबी करण्याअगोदर आयुक्त यांची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेताच जादा काम करुन घेतल्याने जादा कामाची रक्कम रु.**1981837/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.**

11) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग कडील शासन निर्णय क संकिर्ण 2008/1338/प्र.क्रं. 171/08 नवि-20 दिनांक. 02/03/22009 नुसार ड वर्ग महानगरपालिकेकडील 50 लाखा पेक्षा अधिक किमतीच्या सर्व विकासकांची व त्यापेक्षा कमी किमतीच्या कामाच्या संदर्भात Random पध्दतीने किमान 10% कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखा परीक्षण करुन घेणे. त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखा परीक्षण (Third Party Technical Audit) करुण घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. अशा प्रकारे उक्त कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखा परीक्षण केल्याची कागदपत्रे नस्तीस आढळुन आली नाहीत.

12) मोजमाप नोंद वही क्र. 19 मधील पान नं. 50 वर नमुद असलेप्रमाणे पुरवठादाराने बटरफलाय व्हाल्व्ह ऐवजी 300 mm diam स्लुईस वॉल्व्हचा पुरवठा केल्याने 2012-13 च्या DSR प्रमाणे (Final Reduced Rate) रु. 53299/- प्रमाणे एका नगाचे रु. 53299/- पुरवठादारास आदा केले आहेत. व या रकमेवर 14% ने जादा रक्कम रुपये 7470/- देय नसताना 6 वे धावते देयकामध्ये अदा केल्याने सदर रकमेचे अतिप्रदान झाले आहे.तसेच मोजमाप नोंद वही क्र. 19 मधील पान नं. 52 वर नमुद असलेप्रमाणे पुरवठादाराने कार्यकारी अभियंता यांच्या सुचनेप्रमाणे **MS Double Flanged Valve** चा पुरवठा केल्याने चालु डिएसआर प्रमाणे (Reduced Rate) एकूण रक्कम रु. 8,88,540 /- अधिक 14% रक्कम 1,24,396/- पुरवठादारास आदा केले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिरिक्त खर्चाचे प्रदान दर मंजुर करणेबाबत क्र. PWM- 1086/सी.आर.-103/ इमारती-2 दि. 08 मे 1986 ने परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यानुसार कामाच्या स्विकृत निविदेमध्ये अंतर्भुत नसलेल्या कामाची अतिरिक्त बाब जेव्हा करावयाची वेळ येते तेव्हा महाराष्ट्र सार्वाजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 227 ते 232 मधील तरतुदीप्रमाणे अतिरिक्त बाबींचा दर हा चालु विभागिय

DRAFT

दरसूचीप्रमाणे येणा-या दराप्रमाणे मंजुर करणे आवश्यक आहे. सदर बाबीसाठी 2012-13 च्या चालू दरसूचीनुसार दर दिला आहे. परंतु या दरावर पुन्हा निविदादरापेक्षा 14% प्रमाणे जादा रक्कम रुपये 1,24,396/- दिल्याने सदर रकमेचे अतिप्रदान झाले आहे. या दोन्ही बाबीसाठी रक्कम रु.131866/- चे जादा प्रदान ठेकेदारास केले आहे.

**आक्षेपाधिन रक्कम :-** अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा जादा परिमाणाचे काम केलेल्या बाबीवरील खर्च :- रु. 1981837/- **+** धावते देयकाचे गोषवा-यामध्ये जादा नोंदविलेली रक्कम रु.1462504/- = **रु.21444341/-**

**वसुलपात्र रक्कम :-** अतिरिक्त बाबीवर चालु दरसुचीपेक्षा 14 टक्के जादाने दिलेली रक्कम रु. **131866/-**

DATRNDM7201 (Ref No : 70)

## *48 सुजल निर्मल अभियान योजनेअंतर्गत मिरज पाणीपुरवठा विभागातील अस्तीत्वातील 19.20 द.ल.लि. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता 28.80 द.ल.लि. पर्यंत वाढवणे व अस्तीत्वातील जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे. या कामातील अनियमितता.*

**सुजल निर्मल अभियान योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 09**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनिस्स राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 29834599.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7721472.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 10779.00/-

***सदर कामाचा कार्यादेश दि. 13/09/2012 रोजी दिला असुन निविदेनुसार कामाची मुदत 6 महिने असल्याने काम 13/03/2013 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक होते. कामास आयुक्त यांनी दि.30/09/2013 अखेर व त्यानंतर दुसरी मुदतवाढ दि.31/03/2014 पर्यंत दिली असुन वित्तीय वर्ष 2013-14 मधील 9 वे धावते देयकानुसार तसेच नस्तीचे अवलोकन केले असता सदरचे काम मार्च 2016 अखेर अपुर्ण असल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे कामावर खर्च झालेली रक्कम रु. 2,98,34,599/- गुंतुन पडलेचे स्पष्ट होते. कामामधील बाबीवर अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा जादा परिमाणाचे काम केल्याने रक्कम रु.7621472/- ठेकेदारास आदा केली आहे. सदर जादा कामाचे परिमाणास आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडे सुजल निर्मल अभियान योजनेतंर्गत मिरज पाणीपुरवठा विभागातील अस्तीत्वातील 19.20 द.ल.लि. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता 28.80 द.ल.लि. पर्यंत वाढवणे व अस्तीत्वातील जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे. या कामावर वित्तीय

DRAFT

वर्ष 2011-12 ते 2013-14 पर्यंत एकुण रक्कम रु. 2,98,34,599/- खर्च झाला असुन वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये या कामावर खालील प्रमाणकाव्दारे रक्कम रु. 1,68,03,667/- खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 03 | 21/05/2013 | 42,55,189/- | 5 वे धावते देयक |
| 2 | 06 | 06/07/2013 | 39,14,005/- | 6 वे धावते देयक |
| 3 | 14 | 19/09/2013 | 33,04,516/- | 7 वे धावते देयक |
| 4 | 16 | 19/11/2013 | 23,00,000/- | 8 वे धावते देयक (पार्ट पेमेंट) |
| 5 | 18 | 20/03/2014 | 11,89,297/- | 8 वे धावते देयक (उर्वरीत रक्कम) |
| 6 | 20 | 20/03/2014 | 18,40,660/- | 9 वे धावते देयक |
| एकूण | | | 1,68,03,667/- | |

**या कामाची नस्ती, बी-1 टेंडर, धावती देयके, ठेकेदारास आदा केलेल्या रक्कमांची प्रमाणके व मोजमाप पुस्तके यांची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.**

1) सदर कामाचा कार्यादेश दि. 13/09/2012 रोजी कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा विभाग यांनी दिला असुन निविदेनुसार कामाची मुदत 6 महिने देण्यात आली आहे. त्यानुसार सदर काम 13/03/2013 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक होते. वित्तीय वर्ष 2013-14 मधील 9 वे धावते देयकानुसार सदरचे काम अपुर्ण असल्याचे आढळुन आले आहे. नस्तीमधील कागदपत्रावरुन ठेकेदारास आयुक्त यांनी प्रथमत: 30/09/2013 अखेर मुदतवाढ दिलेली होती. त्यानंतर आदेश क्र. 192/2013-14 दि. 30/09/2013 अन्वये ठेकेदारास वाळु उपलब्ध नसल्याने व टाकीचे कामास वाळुची आवश्यकता चालू पाणी पुरवठा सुरु ठेवून काम करावे लागत असल्याने ठेकेदाराच्या मागणी नुसार व कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांचे अहवालानुसार दि. 31/03/2014 पर्यंत भाववाढ फायद्या शिवाय मुदतवाढ देण्यात आली असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर काम मार्च 2014 पर्यंत पूर्ण झाले नसल्याचे 9 वे धावते देयकाची तपासणी केली असता दिसून आले आहे. मुदतीत काम पुर्ण न झाल्याने टेंडर मधील contract conditions clause No 2 नुसार ठेकेदाराने मुदतीत काम पूर्ण न केल्यास In the event of the oprator Failing to comply with these conditions he shall be liable to pay as compensation an amount as Muncipal commissinor whole decision in writing shall be final may

decide of the said estimated cost of whole work for every day that the due quantity of work remains incomplete. Provided always that the total amount of compensation to be paid under the provision of this clause shall not exceed 10% of estimated cost of this work as shown in the tender ( 5% for liquidated damage & 5% for penalty) यानुसार दंडनीय कार्यवाही करणे आवश्यक असताना ती केली नसल्याचे आढळुन आले.

2) मोजमाप नोंदवही क्र. 9 पृष्ठ क्र. 41 नुसार कामावर एकुण 2,98,34,599/- खर्च झाला असल्याचे आढळुन आले. सदर कामाची 9.75% जादा दराने स्वीकृत निविदा रक्कम 2,49,36,277/- असल्याने सदर कामावर 120% जादा खर्च होऊनही काम पुर्ण झाले नसल्याचे आढळुन आले. त्यामुळे कामाचा उद्देश साध्य झालेला नसुन सदर कामाच्या अंमलबजावणीमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे दिसून येते.

3) या कामाचे धावते देयक क्र. 5 वे ते 9 वे च्या नोंदी मोजमाप नोंदवही क्र. 8 मधील पृष्ठ क्र. 53 ते 102 व मोजमाप नोंदवही क्रं. 9 मधील पृष्ठ क्रं. 7 ते 41 नोंदविलेल्या आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका मधील नियम क्र. 13 नुसार मोजमाप पुस्तकात नोंदवहयात आलेली मोजमापे देयक तयार केल्यानंतर मोजमाप पुस्तकात लाल शाईने तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. तसेच नियम 15 नुसार देयक मंजूर केल्यानंतर मोजमाप पुस्तकात दुसरी तिरकी रेषा मारणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच मोजमाप पुस्तकात देयकाचे प्रदान केल्यानंतर प्रदानाचा प्रमाणक क्रमांक, दिनांक व धनादेश क्रमांक नोंदविण्यात आलेला नाही त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सदर कामासाठी IDBI बँक शाखा शिवाजी चौक कोल्हापूर यांचेकडील रु. 6,27,000/- रकमेची बँक गॅरंटी दि. 07/12/2010 पासून 1 वर्षाकरीता होती. तीचे दि. 09/01/2014 पर्यंतची नुतनीकरण केल्याचे नस्तीस आढळुन आले. परंतु सदरचे काम लेखापरीक्षण कालावधीपर्यंत अपूर्ण असल्याने दि. 09/01/2014 च्या पुढील कालावधीसाठी सदर बँक गॅरंटीचे नुतनीकरण करणे आवश्यक असता ते केले बाबतची कागदपत्रे नस्तीस आढळुन आली नसल्याने बँक गॅरेंटीची विधीग्राहयता तपासता आलेली नाही.

5) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय सुनिअ/2010/प्र.क्र.460/ पाणीपुरवठा -22 दि.23/11/2010 नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी सुजल निर्मल योजनेमधुन करण्यात येणा-या रु. 29.85 कोटी रक्कमांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार राज्य शासनाकडून 70 टक्के अनुदान मिळणार असून महानगरपालिकेने 20 टक्के रक्कम कर्जाद्वारे उभी करावयाची आहे व उर्वरित 10 टक्के रक्कम महानगरपालिकेने स्वनिधी म्हणून योजनेसाठी खर्च करावयाची आहे. 20013-14 अखेर या कामावर 9 व्या धावत्या देयकाअखेर ठेकेदारास रक्कम रु. 2,98,34,599 /- आदा केले आहेत. सदर रक्कम राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानामधून ठेकेदारास आदा करण्यात आली आहे. या कामाची निविदा किंमत रु. 2,28,18,702/- असुन निविदा 9.75% जादा दराने मंजुर केल्याने या कामाची किंमत रु. 2,49,36,277 इतकी होत आहे. राज्य शासनाकडून मुळ निविदा रकमेच्या 70 टक्के प्रमाणे रु. 1,59,73,091/- अनुदान प्राप्त झाल्याने उर्वरित रु. 1,38,61,508/- महानगरपालिकेने कर्ज व स्वनिधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. नस्तीची तपासणी केली असता या योजनेसाठी

DRAFT

महानगरपालिकेने अद्याप कर्ज काढलेले नाही. त्यामुळे ठेकेदारास कामाची देयके देताना 64 टक्के रक्कम शासननिधीमधून व 36 टक्के रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च करणे आवश्यक होते. महानगरपालिकेने ठेकेदारास आर्थिक वर्ष 2013 -14 अखेर रु.1,68,03,667/- आदा केले आहेत. अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 64 टक्के प्रमाणे रु.1,07,54,347/- व स्वनिधीमधून 34 टक्क्याप्रमाणे रु.60,49,320 /- खर्च करणे आवश्यक असता शासन अनुदानामधुन रक्कम रु.60,49,320 /- जादा खर्च करण्यात आला आहे. शासननिधी व महानगरपालिका निधीची रक्कम त्यांचे हिश्श्याचे टक्केवारीनुसार प्रत्येक देयकामधून खर्च केली नसल्याने या योजनेच्या कामांना निधी कमी पडून कामे अर्धवट राहणार असल्याचे स्पष्ट होते.

6) या कामाची नस्ती तपासली असता जानेवारी 2016 अखेर काम अपूर्ण असल्याचे दिसून येते. कामाची मुदत 6 महिने दि.13/03/2013 अखेर असताना काम पूर्ण न झाल्याने नागरिकांना शुध्द पाणी पुरविण्याचा हेतू साध्य झाला नसल्याचे स्पष्ट होते.

7) मोजमाप पुस्तकामधील नोंदविलेल्या परिमाणाची अंकगणिती तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे चुका आढळुन आल्याने ठेकेदारास कमी/जादा रक्कमेचे प्रदान झाले आहे.

अ) मोजमाप पुस्तक क्रं.9 मधील पृष्ठ क्र. 17 मधील नोंदीनुसार बाब क्रं. 6 Providing and casting in situ cement concrete M 250 for slab चे परिमाण 60.91 घ.मी. मधून open deduction चे परिमाण 0.73 घ.मी. वजा करणे ऐवजी 0.45 घ.मी. वजा केल्याने ठेकेदारास या बाबीचे परिमाण 60.18 घ.मी. ऐवजी 60.46 घ.मी. नमुद करुन त्याचा दर रु. 8261.68 प्रमाणे रु. 4,97,187.90 ऐवजी रु. 4,99,501.17 चे प्रदान झाले असल्याने रक्कम रु. 2313./- चे अतिप्रदान झाले आहे. सदरचे काम निविदे रकमेपेक्षा 9.75% जादा दराने मंजूर असल्याने अतिप्रदान रक्कम 2313/- व त्यावरील 9.75% रक्कम रु. 226/- असे एकूण रु. 2539/- वसूलपात्र आहेत.

ब) मोजमाप पुस्तक क्रं. 9 मधील पृष्ठ क्र. 12 वरील नोंदीनुसार बाब क्रं. 38 Providing and fixing GI pipe railing 1 m hight यांची क्र. 1 ते 5 ची बेरीज 204.30 मी. ऐवजी 214.30 मी. नमुद केल्याने सदर बाबीचा दर रु. 750.75 प्रमाणे रक्कम रु. 1,53,378/- ऐवजी 1,60,847/- अदा केल्याने रक्कम रु 7508/- चे अतिप्रदान झाले आहे. सदरचे काम निविदे रकमेपेक्षा 9.75% जादा दराने मंजूर असल्याने अतिप्रदान रक्कम 7508/- व त्यावरील 9.75% रक्कम रु. 732/- असे एकूण रु. 8240/- वसूलपात्र आहेत.

वरील उदाहरणे ही निवडक तपासणीमध्ये आढळुन आल्याने प्रदानापूर्वी मोजमाप नोंदवहीची मोजमापे, परिमाण, दर व देयकातील नमुद परिमाण, दर याची योग्य तपासणी होऊन योग्य त्या रकमेचे प्रदान होणे अवश्यक असताना अशी कार्यवाही होत नसल्याचे आढळुन आले.

8) अंदाजपत्रक व मोजमाप नोंदवही यानुसार कामाचे बाबनिहाय परिमाण यांची पडताळणी केली असता धावते देयक क्र. 9 अखेर सोबत जोडलेल्या **(परिशिष्ट क्र.13)** मध्ये नमुद असलेल्या बाबीं अंदाजपत्रकामधील परिमाणापेक्षा जादा केल्याने रक्कम रु.7721472/- जादा खर्च झाला आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 265 नुसार जेव्हा महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे आदेश घेणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या प्रकरण 7 संविदा मधील कलम 73 नुसार महानगरपालिकेच्या वतीने संविदा करुन देण्याचा अधिकार आयुक्त यांना असल्याने जादाचे काम करताना आयुक्त यांची

DRAFT

प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक असताना ती घेण्यात आलेली नसल्याने जादा कामाची रक्कम रु. 7721472/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

9) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग कडील शासन निर्णय क संकिर्ण 2008/ 1338/प्र.क्रं. 171/08 नवि-20 दिनांक. 02/03/2009 नुसार ड वर्ग महानगरपालिकेकडील 50 लाखा पेक्षा अधिक किमतीच्या सर्व विकासकामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण करणे आवश्यक आहे व त्यापेक्षा कमी किमतीच्या कामांच्या संदर्भात Random पध्दतीने किमान 10% कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे . परंतु या कामाची रक्कम 50 लाखापेक्षा जास्त असतानाही या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतलेचे नस्तीची तपासणी केली असता दिसुन येत नाही. त्यामुळे कामाची गुणवत्ता व दर्जा योग्य असल्याची लेखापरीक्षणाची खात्री होत नाही.

**आक्षेपाधिन रक्कम :-** अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा जादा काम प्रशासकीय मंजुरी न घेता केल्याने ठेकेदारास आदा केलेली रक्कम रु.7721472/-

**वसुलपात्र रक्कम :-** मोजमापपुस्तिकेमध्ये अंकगणितीय परिगणना चुकीची केलेने वसुल करावयाची रक्कम रु. 10779/-

DATRNDM7201 (Ref No : 77)

## *50 क्षेत्रफळ कमी धरुन आकारणी केल्याने उपकर, स्थानिक संस्था कर व दंडात्मक शुल्काची रक्कम कमी वसुल झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : नगररचना मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 30705.00/-

| |
|---|
| ***सनाऊल्ला हुसेन थरथरी सि.स.नं./1263/A खणभाग सांगली मधील बांधकाम परवाना नकाशाची तपासणी केली असता, नकाशामध्ये बांधकाम क्षेत्र 822.80 चौ.मी. दाखविले आहे परंतु उपकर व स्थानिक संस्था कर 737.17 चौ.मी.क्षेत्रफळा वर वसुल केल्याने 85.63 चौ.मी. कमी दाखविलेल्या क्षेत्रफळावर उपकर व स्थानिक संस्था कराची रु.21579/- ची कमी वसुली झाली आहे. नकाशामध्ये दुसरा, तिसरा व चौथ्या मजल्यावरील बंदीस्त बाल्कनीचे क्षेत्रफळाची बेरीज 72.39 चौ.मी. येत असताना अंकगणितीय आकडेमोडीमध्ये सदर क्षेत्रफळ 57.18 चौ.मी. दाखविलेने कमी दाखविलेल्या 15.21 चौ.मी.वर रु.9126/- चे कमी दंडात्मक शुल्क वसुल केले आहे.*** |

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या सांगली नगररचना विभागाचे दि.2013 -14 या वित्तीय वर्षामध्ये बांधकाम परवानगी दिलेल्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे



DRAFT

बांधकाम शुल्क, दंडात्मक शुल्क कमी वसुल केल्याचे आढळुन आले आहे.या बाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.95, दि.12/04/2016 रोजी निर्गमित केला असुन नगररचना विभागाने त्याचे अनुपालन दि.13/05/2016 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालनाचे अवलोकन करुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) सनाऊल्ला हुसेन थरथरी सि.स.नं./1263/A खणभाग सांगली यांना बांधकाम परवानगी क्र. 544 दि. 18/03/2014 अन्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आली आहे. सदर नस्ती मधील बांधकाम परवाना नकाशाची तपासणी केली असता , नकाशामध्ये बांधकाम क्षेत्र 822.80 चौ.मी. दाखविले आहे परंतु उपकर व स्थानिक संस्था कर 737.17 चौ.मी.क्षेत्रफळा वर वसुल केल्याने 85.63 चौ.मी. कमी दाखविलेल्या क्षेत्रफळावर उपकर व स्थानिक संस्था कराची खालील प्रमाणे कमी वसुली झाली आहे. नकाशामध्ये दुसरा ,तिसरा व चौथ्या मजल्यावरील बंदीस्त बाल्कनीचे क्षेत्रफळाची बेरीज 72.39 चौ.मी.येत आहे. परंतु अंकगणितीय आकडेमोडीमध्ये सदर क्षेत्रफळ 57.18 चौ.मी. दाखविलेने कमी दाखविलेल्या 15.21 चौ.मी.वर खालील प्रमाणे दंडात्मक शुल्काची कमी वसुली झाली आहे .

| अ.क्र. | बाब | क्षेत्रफळ चौ.मी. | दर रु./ चौ.मी. | एकुण रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | उपकर | 85.63 | 102 | 8734 |
| 2 | एलबीटी | 85.63 | 150 | 12845 |
| 3 | दंडात्मक शुल्क | 15.21 | 600 | 9126 |
| | | | एकुण | 30705/- |

कमी भरणा रक्कम रु.30705/- ची वसुली करणे आवश्यक आहे . याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.95 दि.12/04/2016 रोजी निर्गमित केला असुन नगररचना विभागाने त्याचे अनुपालन दि.13/05/2016 रोजी सादर केले आहे. अनुपालनामध्ये लेखापरीक्षणामध्ये घेतलेला आक्षेप मान्य केला असुन बांधकाम धारकाकडुन वसुलीची कार्यवाही करण्यात येत असल्याचे नमुद आहे.

**वसुलपात्र रक्कम :-** एलबीटी,उपकर व दंडात्मक रक्कमेची वसुल करावयाची रक्कम रु.30705/-

DATRNDM7201 (Ref No : 95)

## *53 शालेय क्रिडा स्पर्धा 2013-14 च्या खर्च रक्कमेची उपप्रमाणके, विनियोग दाखले व खर्चा बाबतची अनुषंगिक अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : क्रिडा विभाग मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 350000.00/-

***2013-14 या वर्षाच्या शालेय क्रिडा स्पर्धासाठी रक्कम रु. 3,50,000/- जिल्हा क्रिडा अधिकारी, सांगली यांना प्रमाणक क्र. 5256 दि. 01/01/2014 अन्वये देण्यात आले आहेत. परंतु क्रिडा स्पर्धेसाठी खर्च केलेल्या रक्कमेची उपप्रमाणके, खरेदीप्रकीयेची नस्ती, पंच मानधनाची मानधन पत्रके लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नसल्याने रक्कम रु. 3,50,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे लेखा परीक्षण मध्ये 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये शालेय क्रिडा स्पर्धा 2013-14 साठी र.रु. 3,50,000/- जिल्हा क्रिडा अधिकारी यांना प्रमाणक क्र. 5256 दि. 01/01/2014 अन्वये देण्यात आले.

**सदर प्रमाणकाची व नस्तीची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.**

1) शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-1796/5क330/क्रीमुये-9 दि. 14/11/2003 च्या निर्णयानुसार महानगरपालिका हद्दीत येणा-या महानगरपालिका शाळा व खाजगी शाळा यांच्या आंतरशालेय स्पर्धेचे आयोजन महानगरपालिकेने क्रिडा समिती स्थापन करुन करणेचे आहे. त्यानुसार महानगरपालिकेने स्थापन केलेल्या क्रिडा समीतीच्या दि. 19/09/2013 रोजीच्या बैठकीमध्ये 2013-14 च्या शालेय स्पर्धेचे आयोजन करणेसाठी मान्यता देण्यात आली. त्यानुसार आयुक्त निर्णय क्रमांक 209/2013-14 दि. 10/12/2013 अन्वये रक्कम.रु. 3,50,000/- जिल्हा क्रिडा अधिकारी सांगली यांना देण्यात मान्यता देण्यात आली. उपरोक्त शासन निर्णयामध्ये स्पर्धेचे आयोजन महानगरपालिकेने करणेचे नमुद असताना जिल्हा क्रिडा अधिकारी सांगली यांना रक्कम कोणत्या आधारे देण्यात आली. याचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.104 दि. 04/05/2016 अन्वये मागणी करुन ही देण्यात आलेला नाही.

2) सदरची रक्कम जिल्हा क्रिडा अधिकारी यांना दि. 01/01/2014 रोजी धनादेश क्र. 70243 अन्वये देण्यात आली होती. सदरची रक्कम देय मानधन, क्रिडा स्पर्धा पुस्तिका छपाई, प्रमाणपत्र व वेळापत्रक छपाई, क्रिडा साहित्य खरेदी, स्टेशनरी पोस्टेज इ. साहित्य खर्च यासाठी देण्यात आली होती. परंतु सदर रक्कम पैकी किती रक्कम खर्च झाली किती रक्कम क्रिडा अधिकारी यांचेकडे शिल्लक होती याची तपाशिलवार माहिती नस्तीमध्ये आढळुन आली नाही.

3) नस्तीमध्ये असलेल्या पत्र क्र. मनपा/क्रिडावि/सां/14/13/14 दि. 03/01/2014 अन्वये जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे कडे खर्च रकमेचे विनियोग प्रमाणपत्र, खर्चाचा सविस्तर तपशिल खर्ची बिले, प्रमाणपत्र छपाई खर्च, वितरण शिल्लक सहभागी शाळांची यादी स्पर्धक संख्या, पंच मानधन वितरीत केलेल्याची पोहोच इ. खर्चाचा हिशोब व खर्चाची कागदपत्रे नस्ती महानगरपालिकेस सादर करणेबाबत कळविले होते. परंतु लेखा परीक्षण कालावधी पर्यंत जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाकडुन सदरची माहिती कागदपत्रे प्राप्त न झाल्याने लेखा परीक्षणास सादर केली नसल्याचे संबंधितानी लेखा परीक्षणास सांगितले आहे.

4) छपाईचे काम व क्रिडा साहित्य खरेदी विहित नियमानुसार करणे आवश्यक होते. तसेच पंच मानधन त्यांचे हजेरी नुसार आदा करुन पोहोच घेणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही न करता ठोक रक्कम जिल्हा क्रिडा अधिकारी यांना देण्यात आली आहे. तसेच शिल्लक रक्कम व

DRAFT

क्रिडा साहित्य महानगरपालिकेने परत जमा करुन घेणे आवश्यक असताना शिल्लक रक्कम व साहित्य महानगरपालिकेच्या क्रिडा विभागाने जमा करुन घेतलेले नाही.

याबाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.104, दि.04/05/2016 रोजी निर्गमित केला असुन क्रिडा विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही.

DATRNDM7201 (Ref No : 104)

## *56 वॉर्ड क्र. 21 मधील भिमनगर येथील रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण करणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 141566.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 12064.00/-

***सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 227 (अ) (1) नुसार कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणे कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- पर्यंत वाढ करण्याचा अधिकार आहे. परंतु ट्रेंचेसचे केलेले अतिरिक्त काम हे रु. 1,41,566/- चे असल्याने त्यास आयुक्त यांची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेताच काम केले आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस नागरी दलित सुधार योजने अंतर्गत राज्य शासनाकडू मंजुर अनुदान रक्कम रु.8500000/- प्राप्त झाले असुन त्यामधुन वॉर्ड क्र. 21 मधील भिमनगर येथील रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण करणे या कामास जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

निविदा रक्कम रु. 8,31,500/-

**अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष :-** आर्थिक वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पातील 006) इतर योजना 41216, नागरी दलित वस्ती सुधार योजना

प्रशासकीय मान्यता :- सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस नागरी दलित सुधार योजने अंतर्गत मंजुर अनुदान रक्कम रु.8500000/- मधुन महानगरपालिकेने एकुण रु.8492114/- कामांना मा.जिल्हाधिकारी,सांगली यांनी आरआर / क्रमांक / नपा / आरआर / 462 दि. 27/7/2012



DRAFT

रोजी मान्यता दिली आहे.

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.77 दि.21/09/12

स्थायी समिती सभा क्र.14,ठराव क्र.243,विषय क्र.ऐन दि.29/8/2012 ने मंजुरी दिली आहे.

शासन निर्णय क्र.सीएटी 07/06/ प्र.क्र.94/इमा.2 दि.16/11/2006 चे शासन निर्णयाने व स्थायी समिती ठराव क्र.446 दि.14/11/2006 अन्वये 33 टक्के सुशिक्षित बेरोजगार अभियंताकडून, 33 टक्के मजुर सोसायटीकडून व 34 टक्के निविदा मागवून करणेस उपरोक्त ठरावाने मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार सदरचे काम मजूर सोसायटी यांचेकडून करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे जिल्हा निबंधक यांना काम वाटप करुन मजूर सोसायटीच्या नावे शिफारस करण्याबाबत शहर अभियंता यांनी पत्र क्र. मनपा/मागास समिती/55/ 2012-13 दि. 06/09/2012 अन्वये विनंती केली होती. त्यानुसार उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली यांनी त्यांचेकडील पत्र क्र. फेड/काम/सन 2012/789 दि. 18/09/2012 अन्वये सदरचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूर सहकारी सोसायटी, सांगली. यांना वाटप करुन त्यांचेकडून काम करुन घेण्यास कळविले होते.

ठेकेदाराचे नाव :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूर सहकारी सोसायटी, सांगली. यांना अंदाजपत्रकीय दराने काम देण्यात आले आहे.

निविदा मंजुरीची समज :- शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/77/2012-13 दि.21/09/2012 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली त्यामध्ये अंदाजपत्रकीय रकमेच्या 5 टक्के रक्कम रु. 41600/- सुरक्षा अनामत भरणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु मक्तेदाराने 1 टक्के सुरक्षा अनामत रक्कम रु.8400/ ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र.264086 ने दि.27/09/2012 ने भरणा केली आहे. व उर्वरीत रक्कम देयकातून वसुल करण्यात आली आहे.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.27/09/2012 रोजी केले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/मागास समिती/131/2012-13 दि.08/11/2012 ने सदरचे काम दि. 15/11/2012 पासून सुरु करण्याचे कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु :- दि.15/11/2012

कामाची मुदत :- 90 दिवस

काम पुर्ण :- दि.25/04/2013.

सदर ठिकाणी अतिक्रमण असल्याने व पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु असल्याने पुढील निर्णय होई

DRAFT

पर्यंत काम तहकुबीचे आदेश उपअभियंता यांनी दि. 19/11/2012 रोजीचे पत्राने ठेकेदारास दिले आहेत. त्यानंतर दि. 11/02/2013 चे पत्रान्वये अतिक्रमण व पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाल्याने काम सुरु करुन मुदतीत पूर्ण करण्याचे समज दिली.

या कामाचे देयक लेखा विभागाने **प्रमाणक क्र. 01 दि.01/06/2013 रक्कम रु.8,31,500/- ने** ठेकेदारास आदा केले आहे.

मोजमाप पुस्तक क्र.13 पृष्ठ क्र.79 ते 81.

**या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका, देयक व प्रमाणके यांची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.**

1)अंदाजपत्रक व मोजमाप नोंदवही क्र. 13 चे पृष्ठ क्र. 79 ते 81 यांचा ताळमेळ घेतला असता ट्रेंचेसची बाब अंदाजपत्रकात नमुद नसतानाही या बाबीवर खालील प्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | बाब क्रमांक व तपशिल | अंदाजपत्रका प्रमाणे परिमाण | मोजमाप नोंदवही प्रमाणे परिमाण | तफावत परिमाण | दर रक्कम रुपये | जादा अदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ट्रेंचेस | - | 33.81 cum | 33.81 cum | 4187.10 | 1,41,566/- |
| | | | | एकुण | | 1,41,566/- |

सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिच्छेद 227 (अ) (1)नुसार कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणेसाठी कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- पर्यंत वाढ करण्याचा अधिकार आहे. या बाबीचा खर्च रु.10000/- पेक्षा जास्त असल्याने या अतिरिक्त बाबीसाठी आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक असता ती न घेताचे सदर अतिरिक्त बाब करण्यात आली आहे.

2) या कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु नस्तीची तपासणी केली असता विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच काम केलेले आहे. निविदा अटी व शर्तीमधील अट क्र.17 नुसार बदल किंवा वाढ केलेली बाब प्राकलनामध्ये नसल्यास आयुक्त यांचे मान्यतेने दर ठरविले जातील असे नमुद असताना अतिरिक्त केलेल्या कामाचे दरास आयुक्त व

DRAFT

विभागप्रमुखांची पुर्व मान्यता न घेताच काम करण्यात आले आहे.

3) या कामासाठी बाब क्र.2 Providing & Laying in Situ M10 Cement Concrete हे काम 196.67 घ.मी करण्यात आले आहे. ठेकेदाराने रॉयल्टी भरणा केलेला पुरावा सोबत जोडला नसल्याने त्याच्या देयकामधुन 78.66 घ.मी. वाळुची रॉयल्टी रक्कम रु.5506/- वसुल केली आहे. या कामासाठी 170.67 घ.मी. खडी लागली आहे. परंतु 170.67 घ.मी. खडी X रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रॉयल्टीची रक्कम रु.12064/- ठेकेदाराकडुन वसुल केली नाही.

या कामामधील उणिवाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.111, दि.20/05/2016 रोजी देण्यात आला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

**वसुलपात्र रक्कम रु.12064/-**

**आक्षेपाधिन रक्कम :- अतिरिक्त बाबीची रक्कम रु. 1,41,566/-**

DATRNDM7201 (Ref No : 111)

## *57 चिंतामणी नगर येथील सांस्कृतीक हॉल बांधणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 52444.00/-

***या कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु अ.क्र.1 ने केलेले खुदाईचे तसेच अ.क्र. 2 व 3 ने सिमेंट काँक्रीटचे रु. 52444/- चे केलेल्या जादा कामास विभागप्रमुख व आयुक्त यांची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेताच काम केलेने रक्कम रु. 52444/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत***

चिंतामणी नगर येथील सांस्कृतीक हॉल बांधणे या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता शहर अभियंता यांचे दि.27/07/2011 च्या कार्यालयीन टिपणीमध्ये सन 2010-11 मध्ये एकुण 21 कामांचा व रक्कम रु.13332587/- मात्रचा प्रस्ताव जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे पाठविला होता . सदर प्रस्तावास जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र.नपा/दलित वस्ती/आर.आर./195/2011 अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर कामी रक्कम रु.12500000/- अनुदान प्राप्त झाले आहे.
निविदा रक्कम रू. 4,95,923/-
अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष:- आर्थिक वर्ष 2010-11 च्या अर्थसंकल्पातील 006) इतर योजना 41216, नागरी दलित वस्ती सुधार योजना.

**प्रशासकीय मान्यता:-** सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडुन नागरी दलित सुधार योजने अंतर्गत करण्यात येणा-या कामांच्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, सांगली यांनी नपा/दलित वस्ती/आरआर/195/2011 दि. 31/03/2011 रोजी मान्यता दिली आहे.

या कामाची जाहिर निविदा दै.नवसंदेश या वर्तमानपत्रामध्ये देण्यात आली असुन ई निविदा दि.11/07/2012 रोजी उघडण्यात आली असता एकही निविदा प्राप्त झाली नसल्याने निविदेस दि.19/07/2012 रोजी प्रथम मुदतवाढ देण्यात आली आहे. निविदा दि.20/07/2012 रोजी उघडण्यात आल्यानंतरही निविदा प्राप्त झाल्या नसल्याने पुन्हा दि.26/07/2012 पर्यंत दुसरी मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर निविदा दि.03/08/2012 रोजी उघडण्यात आल्यानंतर एकच निविदा प्राप्त झाली आहे. दोनदा मुदतवाढ दिल्यानंतर एकच निविदा प्राप्त झाल्याने ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.ZPA 2008 /प्र.क्र.358/वित्त- 09 दि. 24/06/2008 नुसार निविदा उघडली असता ती अंदाजपत्रका प्रमाणे असल्याने त्यास आयुक्त यांनी दि. 03/10/2012 रोजी मान्यता दिली.

**ठेकेदाराचे नांव:-** अंकुर बहुउद्देशीय स्वयंरोजगार सेवा सह संस्था सांगली

**निविदा मंजुरीची समज:-** शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/103/2012-13 दि. 11/10/2012

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु. 100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि. 31/10/2012 रोजी केले आहे.

**कामाचा कार्यादेश:-** शहर अभियंता यांचे पत्र क्र. मनपा/मागास समिती/117/2012-13 दि. 31/10/2012 ने सदरचे काम दि. 01/11/2012 पासून सुरु करण्याचे कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु:- दि. 01/11/2012

कामाची मुदत:- 120 दिवस

काम पुर्ण:- मुदतीत काम पुर्ण नाही. जागेबाबत वाद झाल्याने काम तहकुब होते. काम पूर्ण दि. 20/03/2014

**प्रमाणक क्र.02 दि. 22/07/2013 रक्कम रु. 300504/- (पहिले धावते देयक)**

**मोजमाप पुस्तक क्र. 21 पृष्ठ क्र. 56 ते 59.**

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तका, देयक व प्रमाणके यांची तपासणी केली असता खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) दलित वस्ती सुधार योजनेमधुन महानगरपालिके मार्फत करण्यात येणा-या 21 कामांच्या प्रस्तावांना जिल्हाधिकारी सांगली यांनी पत्र क्र.नपा/दलित वस्ती/आर.आर./ 195/ 2011 दि.21/03/2011 ने प्रशासकीय मान्यता दिली आहे व या योजनेसाठी रक्कम रु.1,25,00,000/- चा निधी महानगरपालिकेस दि.19/04/2011 रोजी प्राप्त झाला आहे. उपायुक्त यांनी नागरी दलित वस्ती अंतर्गत करावयाच्या कामासाठी महासभेची प्रशासकीय मान्यता मिळण बाबतचे विषयपत्र दि.05/07/011 रोजी तयार करुन नगरसचिव यांचे कडे पाठविले होते. या विषयपत्रामध्ये शासनाकडुन योजनेसाठी निधी कमी आल्याने 21 ऐवजी 19 कामांना प्रशासकीय मंजुरी मिळविण्याचे प्रस्तावित केले आहे व या विषयपत्रानुसार कामे करण्यास स्थायी समिती सभा क्र.07, ठराव क्र.175, विषय क्र.17 दि.12/07/2011 ने मान्यता दिली आहे. या योजनेस शासन निधी दि.19/04/2011 रोजी प्राप्त झाल्यानंतरही कामांना प्रशासकीय मान्यता देणेसाठीचा प्रस्ताव तयार करण्यास प्रशासनास 4 महिन्याचा विलंब झाल्याने या योजनेची कामे सुरु होण्यास विलंब लागला आहे.

DRAFT

2) या निधीमधुन करण्यात येणा-या कामांच्या प्रशासकीय मान्यतेच्या विषयपत्रामध्ये या कामाचा समावेश करण्यात आलेला नाही तसेच स्थायी समितीने केलेल्या ठरावामध्ये सुध्दा या कामाचा समावेश नसतानाही हे काम नागरी दलित वस्ती सुधार योजनेमधुन करण्यात आले आहे.

2) या कामाची नस्ती तपासली असता शहर अभियंता यांनी दि.20/03/2014 रोजी काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. कामाचा कार्यादेश दि.01/11/12 रोजी देण्यात आला असुन कामाची मुदत 120 दिवस देण्यात आली आहे. त्यानुसार काम दि.28/02/2013 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक होते. परंतु काम दि.20/03/2014 रोजी पुर्ण झाले आहे. या कामाच्या नस्तीमध्ये काम खाजगी जागेत चालु असल्याने काम बंद करण्याची तक्रार दि.05/01/2013 रोजी केल्याचे पत्र आहे. तसेच नस्तीमध्ये शहर अभियंता यांनी सहा संचालक नगर रचना यांना मनपा /मावदस/135/2012-13 दि.29/11/2012 चे पत्राने या ठिकाणी काम सुरु करताना जागेबाबतचा वाद सुरु झाल्याने या ओपनस्पेसवर काम करावे अगर कसे या बाबत मार्गदर्शन मागविले आहे व सदर जागेचा 7/12 उतारा पाहून सांगली सर्व्हे नंबर 201/1ब क्षेत्र 3.3 हेक्टर 08 आर ही जागा प्रशासक सांगली नगरपालिका यांचे नावावर असलेचे सहाय्यक नगर रचानाकार यांनी शहर अभियंता यांना दि.11/12/2012 रोजी कळविले आहे. जिल्हाधिकारी यांनी दि.18/04/2011 रोजी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशामधील अट क्र.2 नुसार मंजुर करण्यात आलेल्या कामासाठीचे रेखांकन/नकाशे सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून मंजुर करुन घेण्यात यावेत तसेच अट क्र.03 नुसार प्रस्तावित केलेली कामे नगरपालिकेच्या मालकीच्या ताब्यात असलेल्या जमीनीवर घेण्यात यावीत असे नमुद आहे. परंतु बांधकाम विभागाने रेखांकन/नकाशे नगररचना विभागाकडुन मंजुर करुन न घेता तसेच जागेच्या मालकी बाबतच्या कागदपत्रांची खातरजमा करुन न घेताच काम सुरु केल्याने जागेच्या मालकीवरुन वाद उत्पन्न होवून काम पुर्ण होण्यास सुमारे एक वर्षाचा जादा कालवधी लागला असल्याचे दिसुन येते. त्यामुळे दलित वस्तीमधील नागरीकांना सोयीसुविधा मिळण्यास विलंब लागत असल्याचे स्पष्ट होते.

3) या कामाचे प्राकलन व मोजमाप पुस्तिका यांची तपासणी केली असता अंदाजपत्रकामध्ये नमुद असलेल्या परिमाणापेक्षा खालील प्रमाणे जादाचे काम करण्यात आले आहे. या कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु विभागप्रमुखांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच जादाचे काम करण्यात आल्याने त्यावर खर्च झालेली जादाची रक्कम रु.52444/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब क्रमांक व तपशिल | अंदाजपत्रका प्रमाणे परिणाम घ.मी. | मोजमाप नोंदवही प्रमाणे परिमाण घ.मी. | तफावत परिमाण | दर रक्कम रुपये प्रती घ.मी. | जादा अदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पाया खुदाई | 27.72 | 89.91 | 62.19 | 79.30 | 4932/- |
| 2 | 1:4:8 सिमेंट | 3.94 | 13.07 | 9.13 | 1961.95 | 17913/- |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | काँक्रीट | | | | | |
| 3 | सिमेंट काँक्रीट (M-15) | 3.5 | 13.04 | 9.54 | 3102.60 | 29599/- |

4) जिल्हाधिकारी यांचे दि.18/04/2011 चे प्रशासकीय मान्यतेच्या आदेशामधील अट क्र.05 नुसार प्रस्तुत कामे केलेल्या खर्चाची वापर प्रमाणपत्रे तात्काळ शासनाकडे पाठविण्याची आहेत.नागरी दलित वस्ती सुधार योजनेसाठी शासनाकडुन दि.19/04/2011 रोजी रक्कम रु.1 कोटी 25 लाख प्राप्त झाले आहेत. परंतु मार्च 2014 पर्यंत महानगरपालिकेकडून या योजनेमधील कामावर खर्च चालु असल्याने सदर कामाचे उपयोगिता प्रमाणपत्रे पाठविण्यात आली नसल्याचे दिसुन येते.

या कामामधील अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.112, दि.20/05/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु. 52444/-

DATRNDM7201 (Ref No : 112)

## *58 वॉर्ड क्र. 30 नवीन वसाहत अंतर्गत रस्ते सिमेंट काँक्रीटचे करणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 75799.00/-

***कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 227 (अ) (1) नुसार कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणे कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- पर्यंत वाढ करण्याचा अधिकार आहे. परंतु ट्रेंचेसचे केलेले अतिरिक्त काम हे रु. 75799/- चे असल्याने त्यास आयुक्त यांची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेताच अतिरिक्त काम केलेले आहे.***

वॉर्ड क्र. 30 नवीन वसाहत अंतर्गत रस्ते सिमेंट काँक्रीटचे करणे या कामाची अंदाजपत्रकीय व निविदा



DRAFT

रक्कम रु. 4,01,900/- इतकी असुन सदर काम नागरी दलित वस्ती सुधार योजनेमधुन करण्यात आले आहे.

अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष:- आर्थिक वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पातील 006) इतर योजना 41216, नागरी दलित वस्ती सुधार योजना.

**प्रशासकीय मान्यता:-** सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस नागरी दलित सुधार योजने अंतर्गत मंजुर अनुदान रक्कम रु. 75,00,000/- मधुन महानगरपालिकेचे एकुण रु. 70,14,700/- चे 15 कामांना मा. जिल्हाधिकारी, सांगली यांनी क्रमांक/नादव/आरआर/181 दि. 05/02/2013 रोजी मान्यता दिली आहे.या मध्ये या कामाचा समावेश आहे.

स्थायी समिती सभा क्र. 12 ठराव क्र. 453, विषय क्र. ऐन. दि. 20/03/2013 ने या योजनेमधुन काम करण्यास मंजुरी दिली आहे.

उपरोक्त ठरावाने सदरचे काम निबंधक मंजूर सोसायटी यांचेकडून नावे निश्चीत करुन घेवून मंजूर सोसायटीकडून काम करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे जिल्हा निबंधक यांना काम वाटप करुन मंजूर सोसायटीच्या नावे शिफारस करण्याबाबत शहर अभियंता यांनी पत्र क्र. मनपा/मागास समिती/22/2013-14 दि. 17/05/2013 अन्वये विनंती केली होती. त्यानुसार उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली यांनी त्यांचेकडील पत्र क्र. फेड/काम/सन 2013/130 दि. 31/05/2013 अन्वये सदरचे काम तुळजाभवानी मजूर सह. सोसायटी, सांगली. यांना वाटप करुन त्यांचेकडून सदरचे काम करुन घेण्यास कळविले होते.

**ठेकेदाराचे नांव:-** तुळजाभवानी मजूर सह. सोसायटी लि. सांगली.

**निविदा मंजुरीची समज:-** शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/48/2013-14 दि. 06/08/2014 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली त्यामध्ये अंदाजपत्रक रकमेच्या 5 टक्के रक्कम 20100/- सुरक्षा अनामत भरणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु मक्तेदाराने 1 टक्के सुरक्षा अनामत रक्कम रु. 4020/- ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र. 39516 ने दि. 07/08/2013 ने भरणा केली आहे. व उर्वरीत रक्कम देयकातून वसुल करण्यात आली.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु. 100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि. 07/08/2013 रोजी केले आहे.

**कामाचा कार्यादेश:-** शहर अभियंता यांचे पत्र क्र. मनपा/मागास समिती/53/2013-14 दि. 12/08/2013 ने सदरचे काम दि. 13/08/2013 पासून सुरु करण्याचे कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु:- दि. 13/08/2013

कामाची मुदत:- 60 दिवस

काम पुर्ण:- दि. 10/09/2013

**प्रमाणपत्र क्र. 06 दि. 05/10/2013 रक्कम रु. 4,00,576/-**

**मोजमाप पुस्तक क्र. 16, पृष्ठ क्र. 69 ते 70**

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तीका, देयक व प्रमाणके यांची तपासणी केली असता खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1)अंदाजपत्रक व मोजमाप नोंदवही क्र. 16 चे पृष्ठ क्र. 69 ते 70 यांचा ताळमेळ घेतला असता खालीलप्रमाणे ट्रेंचेसची बाब अंदाजपत्रकात नमुद नसतानाही त्या बाबीवर खालील प्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | बाब क्रमांक व तपशिल | अंदाजपत्रका प्रमाणे परिणाम घ.मी. | मोज.नोंदवही नुसार परिमाण घ.मी. | तफावत परिमाणघ.मी. | दर रक्कम रुपये | जादा अदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | खुदाई | 32.40 | 90.53 | 58.13 | 98.05 | 6000/- |
| 2 | सिमेंट काँक्रीट M 10 | 32.43 | 52.87 | 20.44 | 3414.8 | 69799/- |
| | | | | | एकुण | 75799 |

1) सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 227 (अ) (1)नुसार कामाच्या अतिरिक्त बाबी पार पाडणे कार्यकारी अभियंता यांना प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी रुपये 10,000/- पर्यंत वाढ करण्याचा अधिकार आहे. परंतु ट्रेंचेसचे केलेले अतिरिक्त काम हे रु. 75799/- चे असल्याने त्यास आयुक्त यांची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेताच अतिरिक्त काम केलेले आहे. कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. तसेच निविदा अटी व शर्तीमधील अट क्र.17 नुसार बदल किंवा वाढ केलेली बाब प्राकलनमध्ये नसल्यास आयुक्त यांचे मान्यतेने दर ठरविले जातील असे नमुद असताना जादा केलेल्या कामास आयुक्त व विभागप्रमुखांची पुर्व मान्यता न घेताच तसेच या अतिरिक्त बाबीचे दर न ठरविताच काम केलेने रक्कम रु.75799/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

या कामामधील उणिवाबाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र.113, दि.23/05/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

DATRNDM7201 (Ref No : 113)

## *59 वॉर्ड क्र. 59 गणेश नगर, डी.ए. पाटील घर, बेडकर किराणा दुकान, शास्त्रीनगर समाज मंदिर रस्ता सिमेंट काँक्रीट करणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : सार्व.बांधकाम राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 139298.00/-

| |
|---|
| ***या कामामध्ये पेव्हींग ब्लॉक्स टाकुन जॉगिंग ट्रॅक विकसित करणेची बाब करणेचे प्राकलनामध्ये नमुद आहे.*** |



DRAFT

***परंतु प्रत्यक्षात जॉगिंग ट्रॅक करणे ऐवजी सदर ठिकाणचे पेव्हिंग ब्लॉक्सचे परिमाण बेंडके ओळ व समाजमंदीर या ठिकाणी वापरण्यात येवुन या ठिकाणी जादाचे काम केल्याने जादा बाबीवर खर्च केलेली रक्कम रु.139298/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस नागरी दलित सुधार योजने अंतर्गत मंजुर अनुदान रक्कम रु. 75,00,000/- मधुन महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये करण्यात येणा-या रक्कम रु. 74,99,964/- च्या एकुण 16 कामांचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केला होता, यापैकी 15 कामांना जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. बांधकाम विभागाने या ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता या भागामध्ये गटर नसल्याने सांडपाणी रस्त्यावर येवुन रहदारीस अडथळा येत असल्याचे दिसुन आले. त्यामुळे सदर काम तातडीने होणेसाठी मजुर सोसायटीकडुन करणेचा प्रस्ताव बांधकाम विभागाने तयार केला असुन आयुक्तांनी त्यास दि.10/05/2013 रोजी मान्यता दिली आहे.

निविदा रक्कम 5,00,200/-

**अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष:-** आर्थिक वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पातील 006) इतर योजना 41216, नागरी दलित वस्ती सुधार योजना

**प्रशासकीय मान्यता:-** मा. जिल्हाधिकारी, सांगली यांचे आदेश क्रमांक/नदव/आरआर/181 दि. 05/02/2013 ने मान्यता दिली आहे.

महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453 विषय क्र.ऐन, दि.20/03/2013 ने सदर काम मजुर सोसायटीकडून करुन घेण्यास मान्यता झाली आहे.

स्थायी समिती सभा क्र. 12 ठराव क्र. 453, विषय क्र. ऐन. दि. 20/03/2013 ने मंजुरी दिली आहे. शहर अभियंता यांनी पत्र क्र. मनपा/मागास समिती/22/2013-14 दि. 17/05/2013 अन्वये वरील काम करणेसाठी मजुर सोसायटीच्या नावाची शिफारस करण्याकरीता जिल्हा निबंधक, मजुर सोसायटी, सांगली यांना विनंती केली आहे. त्यानुसार उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली यांनी त्यांचेकडील पत्र क्र. फेड/काम/सन 2013/130 दि. 31/05/2013 अन्वये सदरचे काम तुळजाभवानी मजूर सह. सोसायटी, सांगली. यांना वाटप करुन त्यांचेकडून सदरचे काम करुन घेण्यास कळविले आहे.

स्थायी समिती सभा क्र. 12 ठराव क्र. 453, विषय क्र. ऐन. दि. 20/03/2013 ने मंजुरी दिली आहे. उपरोक्त ठरावाने सदरचे काम निबंधक मंजूर सोसायटी यांचेकडून नावे निश्चीत करुन घेवून मंजूर सोसायटीकडून काम करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे जिल्हा निबंधक यांना काम वाटप करुन मंजूर सोसायटीच्या नावे शिफारस करण्याबाबत शहर अभियंता यांनी पत्र क्र. 209/2013-14/मनपा/मागास समिती/20/2013-14 दि. 06/09/2012 अन्वये विनंती केली होती. त्यानुसार उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली यांनी त्यांचेकडील पत्र क्र. फेड/काम/सन 2012/128 दि. 31/05/2013 अन्वये सदरचे काम वरद मजूर सह. सोसायटी, सांगली. यांना वाटप करुन त्यांचेकडून सदरचे काम करुन घेण्यास कळविले होते.

**ठेकेदाराचे नांव:- वरद मजूर सह. सोसायटी, सांगली.**

**निविदा मंजुरीची समज:-** शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./ मागास समिती /49/2013-14 दि.

DRAFT

06/08/2013 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली त्यामध्ये अंदाजपत्रक रकमेच्या 5 टक्के रक्कम 25010/- सुरक्षा अनामत भरणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु मक्तेदाराने 1 टक्के सुरक्षा अनामत रक्कम रु. 5010/- ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र. 39517 ने दि. 07/08/2013 ने भरणा केली आहे. व उर्वरीत रक्कम देयकातून वसुल करण्यात आली.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु. 100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि. 07/08/2013 रोजी केले आहे. **कामाचा कार्यादेश:-** शहर अभियंता यांचे पत्र क्र. मनपा/मागास समिती/58/2013-14 दि. 19/08/2013 ने सदरचे काम दि. 20/08/2013 पासून सुरु करण्याचे कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु:- दि. 20/08/2013
कामाची मुदत:- 60 दिवस
काम पुर्ण:- दि. 15/01/2014

दि. 02/09/2013 ने ठेकेदारास सदर ठिकाणी व पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु असल्याने पुढील निर्णय होई पर्यंत काम तहकुबीचे आदेश उपअभियंता यांनी दिले आहेत. त्यानंतर दि. 09/12/2014 चे पत्रान्वये अतिक्रमण व पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाल्याने काम सुरु करुन मुदतीत पूर्ण करण्याचे समज दिली.

**प्रमाणपत्र क्र. 21 दि. 19/03/2014 रक्कम रु. 498511/-**
**मोजमाप पुस्तक क्र. 16 पृष्ठ क्र. 75 ते 76**

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तीका, देयक व प्रमाणके यांची तपासणी केली असता खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) या कामाचे प्राकलन व मोजमाप नोंदवही क्र. 16 चे पृष्ठ क्र. 75 ते 76 यांचा ताळमेळ घेतला असता खालील बाबींचे काम मंजुर अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या परिमाणापेक्षा जादा केले आहे.

| अ.क्र | बाब क्रमांक व तपशिल | अंदाजपत्रका प्रमाणे परिणाम घमी | मोजमाप नोंदवही प्रमाणे परिमाण घमी | तफावत परिमाण घमी | दर रक्कम रुपये | जादा अदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M10 Cement Concrete | 30 | 42.23 | 12.23 | 3414.80 | 41763/- |
| 2 | पेव्हींग ब्लॉक्स | | | | | |
| | अ)बेंडकळे बोळ | 75 sqm | 139.54 sqm | 64.54 sqm | 702.50 | 45339.35 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ब) समाज मंदिर | 75 sqm | 208.75 sqm | 133.75 sqm | 702.50 | 93959/- |

2) या कामाची तपासणी केली असता प्राकलनामध्ये जॉगींग ट्रॅक करणे या कामाचे परिमाण 100 मिटर लांबी x 2 मिटर रुंदी = 200 चौ.मी. अंदाजित केले असुन त्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक्स टाकण्याचे प्रस्तावित केले आहे. मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता या ठिकाणी जॉगिंग ट्रॅक चे काम केल्याबाबतची मोजमापे नोंदवही मध्ये नमुद केलेली नाहीत. या वरुन जॉगिंग ट्रॅकसाठी करण्यात येणा-या पेव्हिंग ब्लॉक्सचे परिमाण वर दिलेल्या ठिकाणी वापरुन ज्यादाचे काम करण्यात आले असल्याचे अढळुन आले आहे . या कामाच्या निविदा अटी /शर्ती मधील अट क्र .15 नुसार मंजु र कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे . परंतु विभागप्रमुखांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच सिमेंट कॉंक्रीट व पेव्हींग ब्लॉक्स चे जादाचे काम करण्यात आल्याने त्यावर खर्च झालेली रक्कम रु. 181061/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
या कामामधील उणिवाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र .114, दि.23/05/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

DATRNDM7201 (Ref No : 114)

DRAFT

### *60 वॉर्ड क्र.14 केशव कॉलनी अंतर्गत रस्ते करणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 493185.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4987.00/-

***कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 4987/- देयकामधुन वसुल केलेली नाही. रस्त्याचे कामामध्ये वापरण्यात आलेल्या डांबर व खडी इ.ची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी होणे आवश्यक आहे.. परंतु या कामासाठी वापरण्यात आलेली खडी,डांबर या साहित्याचा गुणवत्ता चाचणी तपासणी अहवाल न घेताच ठेकेदारास कामाचे देयक प्रदान केलेने या बाबीवर झालेल्या खर्चाची रक्कम रु.493185/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.***

महानगरपालिका हद्दीमधील वॉर्ड क्र.14 केशव कॉलनी अंतर्गत रस्ते करणेसाठी स्थानिक नगरसेवक व नागरीकांनी मागणी केल्याने शाखा अभियंता व नगर अभियंता यांनी कामाच्या जागेची प्रत्यक्ष

पहाणी केली असता या ठीकाणी रस्ते खराब झालेचे तसेच ठिकठीकाणी खड्डे पडलेचे दिसुन आले. त्यामुळे सदरच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक असल्याने या कामाचे 2011-12 च्या जिल्हा दरसूचीप्रमाणे रक्कम रु.498800 /- चे अंदाजपत्रक तयार केले असुन त्यास शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 संविदा खंड (2)(1) नुसार रितसर जाहिर निविदा मागवुन करुन घेण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी मिळण्याची टिपणी शहर अभियंता यांनी आयुक्त यांचेकडे दि.13/07/2012 रोजी सादर केली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.498800 /-

DSR :- 2011-12

अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष :- सार्वजनिक बांधकाम विभागाकडील द्विनोंद कोड 41667) केशव कॉलनी मधील अंतर्गत रस्ते व गटारी करणे

प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त निर्णय क्र.114/2012-13 , दि.07/08/2012 ने जाहिर निवादा मागवुन काम करण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.र.न.245, दि.13/07/2012.

या कामाची जाहिर निविदा सूचना क्र.9/12-13 ,दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन दि.05/09/2012 अखेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. या निविदा प्रक्रीयेमध्ये 3 निविदाकारांनी भाग घेतला असुन प्राप्त निविदा दि.09/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आल्या. 1) श्री.राहुल गणपती कुंभार (अंदाजपत्रकीय दराने),2) भरत गणपती कुंभार (11 टक्के जादा दराने), 3) व्यंकटेश एंटरप्राइझेस (15 टक्के जादा दराने) अशा एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमीचे ठेकेदार श्री.राहुल गणपती कुंभार यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्य करण्यात आली आहे.

आयुक्त निर्णय क्र.539/2012-13 दि.09/11/2012 ने मक्तेदार श्री.राहुल संभाजी कुंभार यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी पत्र क्र. क्रमनपा /सा /बांधावि/687/2012-13 दि. 22/11/2012 ने ठेकेदारास दिली आहे व या कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.5000/- ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्रमांक 38626 ने महानगरपालिकेकडे दि.22/11/2012 रोजी भरणा केली आहे.

या कामाचे ठेकेदाराबरोबर करारपत्र रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.01/01/2012 रोजी करण्यात आले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र. मनपा / सा/बांधवि/ 1042/2012-13 दि.21/01/2013.

कामाची मुदत:- 60 दिवस

काम सुरु. दि.21/01/2013. काम पुर्ण दि. 11/03/2013.

मोजमाप पुस्तक क्र.14 पृष्ठ क्र.10 ते 12.

या कामाची नस्ती ,देयक, प्रमाणके व मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन खालील अभिप्राय देण्यात आले आहेत

DRAFT

1)या कामाचे रक्कम रु.498756/- चे देयक बांधकाम विभागाने दि.30/03/2013 रोजी तयार करुन लेखा विभागास सादर केले असुन लेखा विभागाने दि.26/10/2013 रोजी रु.92190/-, दि.10/01/2014 रोजी रु.130000/- व दि.30/03/2014 रोजी प्रमाणक क्र.6634 ने रु.276566/- असे तीन टप्प्यामध्ये विभागुन दिले आहे. देयकाची रक्कम विभागुन देण्यामध्ये एक वर्षाचा दिनावधी गेला आहे. सदर देयकाची रक्कम विभागुन देण्याचे प्रायोजन अर्धसमास ज्ञापन क्र.115, दि.23/05/2016 अन्वये मागणी करुन ही मिळालेले नाही.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे या कामाच्या दरपृथ्थकरणामध्ये कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु कामगार कल्याण उपकराची रक्कम देयकामधुन वसुल करण्यात आलेली नसल्याने कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.498756/- च्या 1 टक्के प्रमाणे रक्कम रु.4987/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.8.1.2007 नुसार दिलेले काम विहीत केलेल्या विनिर्दिष्टानुसार होण्यासाठी बांधकाम साहित्य म्हणजे डांबर, खडी इ.ची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी होणे आवश्यक आहे. या कामासाठी बाब क्र.2 ने 75 MM BBM करणे हे काम 124 घ.मी X रु.227.20 प्रती घ.मी. दराने व बाब क्र.3 25mm Primix Butuminous Carprt करणे हे काम 2100 चौ.मी X रु.221.40 प्रती चौ.मी. दराने केले आहे. परंतु या कामासाठी लागणारी खडी,डांबर या साहित्याचा गुणवत्ता तपासणी अहवाल न घेताच ठेकेदारास कामाचे देयक प्रदान केलेने या बाबीवर झालेल्या खर्चाची रक्कम रु.493185/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

4) या कामाच्या प्राकलनामध्ये बाब क्र.2 ने 75 MM BBM करणे या कामाचे परिमाण 1852.500 चौ.मी. अंदाजित केले आहे. परंतु मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता हे काम 2100 चौ.मी. करण्यात आले आहे. या कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु विभागप्रमुखांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच 247.5 चौ.मी. जादाचे काम करण्यात आल्याने त्यावर खर्च झालेली जादाची रक्कम रु. 54796/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

या कामामधील उणिवाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.115, दि.23/05/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

**वसुलपात्र रक्कम :-** कामगार कल्याण उपकर रु. 4987/-

**आक्षेपाधिन रक्कम :-** कामामध्ये वापरण्यात आलेल्या खडी, डांबर याची तसेच कामामध्ये वापरलेल्या खडी व डांबराचे प्रमाण योग्य असलेबाबतचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच देयक आदा केल्याने रक्कम रु. 493185/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

DATRNDM7201 (Ref No : 115)

## *62 चुकीच्या वेतननिश्चीतीमुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 33561.00/-

***श्री. मोहन दत्तू कांबळे यांची 5 व्या वेतन आयोगामधील वेतननिश्चिती चुकीची करण्यात आली असुन ते दि. 31/05/2013 रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांना आदा केलेल्या निवृत्ती वेतनातील जादा आदा निवृत्ती वेतन व त्यावरील अनुषंगिक भत्ते यांची परिगणना करुन अतिप्रदान रक्कम वसुल करणे व निवृत्ती वेतनामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच त्यांना अतिप्रदान झालेल्या उपदानची रक्कम रु. 9833/- व अंशराशिकरण रक्कम रु. 13833/- वसुल करणे आवश्यक आहे. तसेच अर्जित रजा 239 दिवसाचे रोखीकरण मध्ये रु. 9895/- चे अतिप्रदान झाले आहे. त्यामुळे सदरची एकुण अतिप्रदान रक्कम रु.33561/- आहे.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाकडील सेवानिवृत्तधारकाच्या सेवापुस्तकांची पडताळणी केली असता खालील कर्मचा-यांना चुकीच्या वेतन निश्चीतीमुळे वेतन व भत्ते, निवृत्ती वेतन, सेवा उपदान व अंशराशीकरण रक्कम अर्जित रजा रोखीकरण यांचे अतिप्रदान झाल्याचे आढळुन आले आहे. याबाबतचा अर्धसमास ज्ञापन क्र. 25 दि.29/09/2015 रोजी निर्गमित केला असुन आस्थापना विभागाने त्याचे अनुपालन सादर केले नाही. यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मोहन दत्तू कांबळे मिटर सुपरवायझर, हे दि. 31/05/2013 रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाले असून प्रमाणक क्र. 150 दि. 20/11/2013 अन्वये निवृत्ती वेतन व उपदान रकमेचे रुपये 267302/- व प्रमाणक क्र. 179 दि. 12/12/2013 अन्वये अंशराशीकरण रकमेचे रुपये 316826/- प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रदानाच्या तपासणी अनुषंगाने त्यांच्या सेवा पुस्तकाची तपासणी केली असता त्यांना दि. 01/12/2006 पासून कालबध्द पदोन्नत्ती मंजुर केली असुन त्यामध्ये दि. 01/10/1996 रोजी 4 था वेतन आयोग वेतन श्रेणी 1200-1800 मधील वेतन रु. 1150 वरुन वेतन निश्चित केले आहे व 5 व्या वेतन आयोगामध्ये वेतनश्रेणी रु. 4000-6000 मध्ये दि. 01/01/1996 रोजी रु. 4000 वेतन निश्चित केले आहे. परंतु श्री. मोहन कांबळे यांना 1200-1800 वेतनश्रेणी दि. 01/10/1996 पासून लागु केली असल्याने त्यांचे दि. 01/01/1996 रोजी वेतनश्रेणी 950-1400 मधील वेतन रुपये 1150 नुसार वेतनश्रेणी 3050-4590 या वेतनश्रेणीतल वेतन रुपये 3650 वर वेतन निश्चित करुन दि. 01/10/1996 ची नियमित वेतनवाढ गृहीत धरुन कालबध्द पदोन्नती वेतन निश्चित करणे आवश्यक असताना दि. 01/01/1996 रोजी वेतन रु. 4000 निश्चित केल्याने त्यांना वेतन व भत्याचे अतिप्रदान झाले आहे. ते परिगणीत करुन अतिप्रदान रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

1) 5 व्या वेतन आयोग वेतन संरचनेनुसार द्यावयाचे वेतन

| अ.क्र. | दिनांक | देय वेतन रू. | अदा वेतन रु. |
|---|---|---|---|
| 1 | 01/01/1996 | 3575 | 4000 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 01/10/1996 | 4000 | 4100 |
| 3 | 01/10/1997 | 4100 | 4200 |
| 4 | 01/10/1998 | 4200 | 4300 |
| 5 | 01/10/1999 | 4300 | 4400 |
| 6 | 01/10/2000 | 4400 | 4500 |
| 7 | 01/10/2001 | 4500 | 4600 |
| 8 | 01/10/2002 | 4600 | 4700 |
| 9 | 01/10/2003 | 4700 | 4800 |
| 10 | 01/10/2004 | 4800 | 4900 |
| 11 | 01/10/2005 | 4900 | 5000 |
| 12 | 01/10/2006 | 5000 | 5200 |
| 13 | 01/10/2007 | 5200 | 5400 |
| 14 | 01/10/2008 | 5300 | 5400 |
| 15 | 01/10/2009 | 5400 | 5500 |

2) 6 व्या वेतन आयोग वेतन संरचनेनुसार द्यावयाचे वेतन

| अ.क्र. | दिनांक | देय वेतन | अदा वेतन |
|---|---|---|---|
| 1 | 01/01/2006 | 9120+2400 | 9300+2400 |
| 2 | 01/07/2006 | 9470+2400 | 9660+2400 |
| 3 | 01/07/2007 | 9830+2400 | 10030+2400 |
| 4 | 01/07/2008 | 10200+2400 | 10410+2400 |
| 5 | 01/07/2009 | 10580+2400 | 10800+2400 |
| 6 | 01/07/2010 | 10970+2400 | 11200+2400 |
| 7 | 01/07/2011 | 11380+2400 | 11610+2400 |
| 8 | 01/07/2012 | 11800+2400 | 12040+2400 |

3)सुधारीत अश्वासीत प्रगती योजनेमध्ये निश्चित करावयाचे वेतन

| अ.क्र. | दिनांक | देय वेतन | अदा वेतन |
|---|---|---|---|

DRAFT

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 01/10/2008 | 10580+2800 | -- |
| 2 | 01/07/2009 | 10990+2800 | 11620+2800 |
| 3 | 01/07/2010 | 11410+2800 | 12060+2800 |
| 4 | 01/07/2011 | 11840+2800 | 12510+2800 |
| 5 | 01/07/2012 | 12280+2800 | 12970+2800 |
| 6 | 01/07/2013 | 12280+2800 | 12970+2800 |

तरी दिनांक 01/01/1996 ते 31/05/2013 या कालावधीतील वेतन व भत्याची अतिप्रदान रक्कम परिगणित करुन वसुल करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | अदा | देय | जादा अदा |
|---|---|---|---|---|
| 1 | निवृत्ती वेतन | 7885 | 7540/- | 345+मभ (दर महा) |
| 2 | उपदान | 224723/- | 214890/- | 9833/- |
| 3 | अंशराशीकरण | 3154x8.371x12 = 316826/ | 302963/- | 13863/- |

2) श्री. मोहन दत्तू कांबळे हे दि. 31/05/2013 रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांना आदा केलेल्या निवृत्ती वेतनातील जादा आदा निवृत्ती वेतन व त्यावरील अनुषंगिक भत्ते यांची परिगणना करुन अतिप्रदान रक्कम वसुल करणे व निवृत्ती वेतनामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच त्यांना अतिप्रदान झालेल्या उपदानची रक्कम रु. 9833/- व अंशराशिकरण रक्कम रु. 13833/- वसुल करणे आवश्यक आहे. तसेच अर्जित रजा 239 दिवसाचे रोखीकरण मध्ये रु. 9895/- चे अतिप्रदान झाले आहे. त्यामुळे सदरची एकुण अतिप्रदान रक्कम रु.33561/- वसुलपात्र आहे.

DATRNDM7201 (Ref No : 25)

DRAFT

## *65 सुधारित वेतन बँड मध्ये कमाल टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांना एक वेतनवाढ जादा दिल्याने व जादा ग्रेडवेतन मंजूर केल्याने झालेल्या वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009, नियम 10 मधील परि. 4 नुसार सुधारीत वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणा-या कर्मचा-यास लगतचा उच्च वेतनबँड मंजूर करणे आवश्यक आहे. हा वेतनबँड मंजूर करताना त्याला एक वेतनवाढीचा फायदा देण्यात यावा असे नमुद असताना श्री.हटवाल यांना वेतन बँडच्या अंतिम टप्प्यावर पोहचलेल्या दिवशीच एक वेतनवाढीचा फायदा दिल्याने व ग्रेड वेतन 1600 वरुन वाढवुन 1800 केल्याने त्यांना वेतन व भत्ते, निवृत्ती वेतन/ कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान व अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झाले असल्याचे आढळुन आले आहे.***

DRAFT

सांगली महानगरपालिकेकडील खालील सेवानिवृत्ती कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1) सदर कर्मचा-यांना 6 वा वेतन आयोग सुधारीत वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर पोहोचल्यावर त्याच दिवशी एक वेतनवाढ जादा देवुन उच्च वेतन बँड मंजूर करण्यात आला आहे तसेच त्यांचे ग्रेड वेतन 1600 वरून वाढवुन 1800 करण्यात आले असल्याचे आढळुन आले आहे. परंतु महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009 मधील 10 मधील परि. 4 नुसार सुधारीत वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणा-या कर्मचा-यास लगतचा उच्च वेतनबँड मंजूर करण्यात यावा. हा वेतनबँड मंजूर करताना त्याला एक वेतनवाढीचा फायदा देण्यात यावा असे नमुद असताना या सोबत जोडलेल्या (**परिशिष्ठ क्र.09)** मधील कर्मचा-यांना वेतन बँडच्या अंतिम टप्प्यावर पोहचलेल्या दिवशीच एक वेतनवाढीचा फायदा दिल्याने व ग्रेड वेतन 1600 वरुन वाढवुन 1800 केल्याने त्यांना वेतन व भत्ते, निवृत्ती वेतन/ कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान व अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झाले असल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे सोबत जोडलेल्या यादीमध्ये नमुद असले प्रमाणे अतिप्रदान रक्कम व त्यावरील अनुषंगिक भत्ते यांची परिगणना करुन रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

2) मनोज प्रल्हाद हटवाल, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असता 6 व्या वेतन आयोगामध्ये त्यांची वेतननिश्चिती रु. 4440-7440 (ग्रेड पे 1600) या वेतनश्रेणीमध्ये केली असुन त्यांचे दि.1/07/2008 रोजीचे वेतन रु.7580/- झालेले आहे. सदर कर्मचारी वेतनश्रेणीमधील कमाल टप्प्यावर पोहचल्याने दि.01/07/2009 रोजी, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009, नियम 10 मधील परि. 4 नुसार सुधारीत वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणा-या

कर्मचा-यास लगतचा उच्च वेतनबँड मंजूर करणे आवश्यक आहे. या तरतुदीनुसार 5200-20200 हा वेतनबँड श्री.हटवाल यांना आस्थापना विभागाने मंजूर केला आहे. परंतु 01/07/2009 ची वेतनवाढ देताना ग्रेड वेतन 1600 ऐवजी 1800 धरुन दिल्याने त्यांचे वेतन रु.7860 ऐवजी रु.7870/- वर निश्चित झाले आहे. त्यामुळे त्यांना वेतन व अनुषंगिक भत्त्याचे खालीलप्रमाणे अतिप्रदान झाले आहे ते संबंधिताकडून वसुल करण्यात यावे.

| अ.क्र. | वेतनवाढ दिनांक | दिलेले वेतन | द्यावयाचे वेतन | फरक |
|---|---|---|---|---|
| 1 | 01/07/2008 | 7580 | 7580 | 0 |
| 2 | 01/07/2008 | 7870<br>(ग्रेड पे 1800) | 7580<br>(ग्रेड पे 1600) | 290 |
| 3 | 01/07/2009 | 8170 | 7860 | 310 |
| 4 | 01/07/2010 | 8470 | 8150 | 320 |
| 5 | 01/07/2011 | 8770 | 8450 | 320 |
| 6 | 01/07/2012 | 9100 | 8760 | 340 |

DRAFT

3) श्री.हटवाल यांना आदा केलेल्या निवृत्ती वेतन व उपदान व अंशराशीकरण प्रमाणकांची तपासणी केली असता, प्रमाणक क्र.165 दि.12/12/2013 अन्वये निवृत्ती वेतन व उपदानाची रक्कम रु.197290/- , प्रमाणक क्र.215 दि.24/01/2014 अन्वये अंशराशीकरण रक्कम रु.233164/-, या रक्कमा वेतन रु.9100 अधिक रु.1800 ग्रेड वेतन परिगणित करून आदा केल्या आहेत. सदर निवृत्ती लाभाच्या रक्कमा अंतिम वेतन रु. 8760 + ग्रेड वेतन 1600 धरुन खालील प्रमाणे आदा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | तपशिल | आदा केलेली रक्कम | आदा करावयाची रक्कम | फरक |
|---|---|---|---|---|
| 1 | निवृत्ती वेतन | 5450 | 5180 | 270 |
| 2 | उपदान | 158050 | 150220 | 7830 |
| 3 | अंशराशीकरण | 233164 | 221613 | 11551 |

श्री.हटवाल यांना दि.01/05/2013 पासुन निवृत्तीवेतन व अनुषंगिक भत्त्याचे अतिप्रदान झाल्याने सदर रक्कमा परिगणित करुन त्यांना झालेल्या अति प्रदानाची वसुली करण्यात यावी.

DATRNDM7201 (Ref No : 33)

## *68 बांधकाम परवाना दिलेल्या व्यक्तिकडुन एल.बी.टी.ची उर्वरित 50 टक्के रक्कम वसुल केली नसलेने झालेल्या नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : नगररचना मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 820709.00/-

***नगरविकास विभाग, अधिसुचना क्र. स्थासंक 0209/प्र.क्र.65/09/नवि.34 दि. 25 मार्च 2010 मधील नियम 27(4) नुसार महानगरपालिकेच्या हद्दीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणारा कोणताही बांधकाम व्यावसायिक / कंत्राटदार, स्थानिक संस्था कर या खाली महानगरपालिकेकडे स्वतः ची नोंदणी करील आणि त्याला, शहराच्या हद्दीत बांधकामाकरीता क) चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उद्वाहन नसेल तेथे) रुपये 100 (रुपये शंभर) प्रति चौ.मी. प्रमाणे ठोक प्रदान करेल. जो कंत्राटदार ठोक कर प्रदानाचा पर्याय स्वीकारेल तो प्रारंभ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यावर स्थानिक संस्था कराच्या अशा देय 50% आगाऊ रक्कमेचे प्रदान करु शकेल. या प्रमाणे परिशिष्ठामधील नमुद व्यक्तींनी प्रारंभ प्रमाणपत्र घेताना 50 टक्के एलबीटीचा भरणा केलेला आहे. परंतु उर्वरित 50 टक्के रक्कम रु.820709/- चा भरणा केलेला नाही.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकच्या नगर रचना विभाग अंतर्गत सांगली मिरज आणि वानलेसवाडी या विभागातील मार्च 2014 मध्ये बांधकाम परवाना दिलेली प्रकरणे, बांधकाम परवानगी नोंदवही वरुन तपासली असता महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र. स्थासंक 0209/प्र.क्र.65/09/नवि.34 दि. 25 मार्च 2010 मधील नियम 27(4) नुसार महानगरपालिकेच्या हद्दीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणारा कोणताही बांधकाम व्यावसायिक / कंत्राटदार, स्थानिक संस्था कर या खाली महानगरपालिकेकडे स्वत:ची नोंदणी करील आणि त्याला, शहराच्या हद्दीत बांधकामाकरीता किंवा वापराकरीता आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा पर्याय असेल किंवा खालील मानकानुसार स्थानिक संस्था कराचे ठोक प्रदान करण्याचा पर्याय असेल.

क) चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उद्वाहन नसेल तेथे) रुपये 100 (रुपये शंभर) प्रति चौ.मी. प्रमाणे ठोक प्रदान करेल. जो कंत्राटदार ठोक कर प्रदानाचा पर्याय स्वीकारेल तो प्रारंभ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यावर स्थानिक संस्था कराच्या अशा देय 50% आगाऊ रक्कमेचे प्रदान करु शकेल असे निर्देशित केले आहे.

आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये नगररचना विभागाने बांधकाम परवाना दिलेल्या नस्तींचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्र.96, दि.12/04/2016 रोजी निर्गमित करण्यात आला असुन त्याचे अनुपालन नगररचना विभागाने दि.13/05/2016 रोजी दिले आहे. अनुपालनामध्ये एलबीटी वसुलीची

कार्यवाही सुरु असल्याचे नमुद केले आहे. याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) नगररचना विभागाने 2013-14 मध्ये नविन बांधकामांचे प्रारंभ प्रमाणपत्र देताना बांधकामांच्या प्रती चौ.मी. नुसार रु.100/- (रुपये शंभर) प्रमाणे एकुण करावयाच्या बांधकामाच्या चौ.मी. प्रमाणे व्यावसायीकाकडून 50% रक्कम एल.बी.टी.पोटी घेतलेली आहे. नगररचना विभाग नागरीकांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे तरतुदी खाली व नियम क्र.6.7.1 नुसार बांधकाम परवाना मंजुरी प्रारंभ प्रमाणपत्र देतो. सदर प्रारंभ प्रमाणपत्र मधील अट क्र. 2 मध्ये प्रारंभ प्रमाणपत्र हे बांधकाम परवाना दिल्या तारखेपासून एक वर्ष मुदतीकरीता आधारभूत राहील ही मुदत संपल्यानंतर त्याचे नुतनीकरण करुन घ्यावे लागेल व ते प्रचलित नियमानुसार असल्यास त्याचे त्यावेळी नुतनीकरण केले जाईल असे नमुद आहे. परंतु (**परिशिष्ठ क्र.14**) मध्ये नमुद बांधकाम परवानाधारक व्यक्तिंनी एक वर्ष मुदतीनंतरही बांधकाम परवानगी अर्जाचे नुतनीकरण केलेले नाही. तसेच त्यांनी स्थानिक संस्था कराची उर्वरित 50 टक्के रक्कमही भरणा केलेले नाही. विवरणपत्रामध्ये नमुद व्यक्तिकडून स्थानिक संस्था कराची रक्कम रु.808742/- वसुलपात्र आहे.

वसुलपात्र रक्कम :- स्थानिक संस्था कराची उर्वरित 50 टक्के रक्कम रु. 820709/-

DATRYJM7501 (Ref No : 96)

## *71 सांगली, मिरज आणि कुपवाड हद्दीतील अस्तित्वातील 22 उंच टाक्या व 3 संप पंप हाऊस दुरुस्त करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा केंद्र,राज्य व स्वनिधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 273276.00/-

***ठेकेदाराकडून कामाचा बार चार्ट न घेता काम करण्यात येत असल्याने या कामास वारंवार मुदतवाढ दिल्याने काम पुर्ण होण्यास विलंब लागत आहे. कामास विलंब होत असतानाही विलंबाबाबतचा दंड ठेकेदाराकडुन वसुल केलेला नाही. ठेकेदाराकडून बार चार्ट प्रमाणे काम करुन घेतलेले नाही. तसेच काम विहित वेळेत पुर्ण करण्यासाठी ठेकेदारास नोटीसा दिलेल्या नाहीत. कामास विलंब लागत असल्याने वसुल करावयाची विलंबाची दंड रक्कम रु.121000/-, विमा रक्कम रु.144412/-, गौण खनिज रॉयल्टी रक्कम रु.7864/- अशी एकुण रक्कम रु.273276/- कामाच्या देयकामधुन वसुल केलेली नाही.***

सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका,पाणीपुरवठा योजनेतुन 1950 ते 1990 दरम्यान बांधण्यात आलेल्या 22 उंच टाक्या व 3 संप पंप हाऊस दुरुस्ती करण्याची कार्यवाही करणेसाठी UIDSSMT अंतर्गत तांत्रिक सल्लागार श्री.बी.एन.पारीख सांगली यांचेकडुन 2011-12 चे दरसूची प्रमाणे अंदाजपत्रके तयार करुन त्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.42 दि.02/04/2012 अन्वये



DRAFT

दिलेल्या मान्यतेने रु.33500189/- मात्र अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कामगिरीसाठी ई टेंडर पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. निविदा दै.केसरी व दै.पुढारी या वर्तमानपत्रातुन दि.09/5/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे व ठेकेदाराबरोबर पाणी पुरवठा विभागाने निविदापूर्व बैठक दि.18/5/2012 रोजी घेतली आहे व उपस्थित मुद्द्याबाबत खुलासा दि.22/5/2012 रोजी करण्यात आला आहे. निविदेस एकुण तीन निविदाधारकांनी प्रतिसाद दिला असुन श्री.पी.टी.माळी, सांगली 23.40 टक्के जादाने, श्री.शशांक जाधव, मिरज 25 टक्के जादाने, मे.आकार इन्फ्रा,मुंबई 29.99 टक्के जादाप्रमाणे या सर्व निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जादा दराने आल्या आहेत. सर्वात कमीचे निविदाधारक श्री.पी.टी.माळी,सांगली यांना आयुक्त यांचे दालनात दि.11/06/2012 रोजी चर्चेस बोलवुन दराबाबत स्पष्टीकरण देण्याबाबतचे आदेश देण्यात आले. त्यास अनुसरुन मक्तेदार यांनी दि.16/06/12 रोजी स्पष्टीकरण सादर केले आहे. दि.01/08/2012 रोजी आयुक्त यांचे दालनात ठेकेदाराबरोबर झालेल्या वाटाघाटीमध्ये ठेकेदाराने अंदाजपत्रकीय रक्कम रु. 33500189/- वर 9 टक्के जादा दराने काम करण्यास मान्यता दिली असून, त्या मधून पाणीपुरवठा योजने अंतर्गत अस्तित्वा तील उंच जलकुंभ, संप व पंप हाऊस यांची दुरुस्ती करणे हे काम करणेत आले आहे.

स्थायी समिती सभा क्र.12 ठराव क्र.202 दि.17/8/2012 ने उपायुक्त (पाणीपुरवठा मिरज) यांचे विषयपत्रानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9 टक्के जादाने कामगिरी करुन घेण्यास व खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

**कामाची वर्क ऑर्डर :-** जा.क्र.मनपा/पापुवि/ 682/2012दि.11/09/2012 रोजी देण्यात आली असून कामाची मुदत 6 महिने इतकी आहे.(पृष्ठ क्र.244) , दि.10/03/2013

कामाचे करारपत्र रु.16250/- रक्कमेच्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.30/08/2012 रोजी केलेले आहे. (नस्तीमधील पृष्ठ क्र.236 ते 243)

कामाचा विमा ,महाराष्ट्र राज्य विमा संचालनालयाकडे दि.10/09/2013 ते 10/09/2014 या कालावधीसाठी रु.36515206/- या रक्कमेवर रु.39215/- भरला आहे.(पृ.क्र.245)

2012 - 13 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्र.67 मध्ये या कामात झालेल्या अनियमितता नमूद केल्या आहेत.

2013-14 या आर्थिक वर्षामध्ये या कामावर खालील प्रमाणकाने खर्च केला आहे.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|
| 01 | 13/05/2013 | 3538868 |
| 03 | 28/06/2013 | 3295015 |
| 11 | 26/09/2013 | 2383898 |

मोजमाप पुस्तक क्र.6 (पृष्ठ क्र.98-98) व मोजमाप पुस्तक क्र.10 (पृष्ठ क्र.11-22) मध्ये या कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेली आहेत.

DRAFT

**या कामाची नस्ती, टेंडर फाईल व प्रमाणके तपासून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.**

1) कामाच्या नस्तीमधील पृष्ठ क्र.T-27, दि.07/03/2013 वर आज अखेर रु.11460662/- मात्र खर्च झाला असून जवळ जवळ 55 टक्के काम पूर्ण झालेचे नमुद आहे तसेच ठेकेदाराने दि.15/02/2013 रोजीच्या पत्रान्वये (नस्तीमधील पृष्ठ क्र.298 वर ) या कामाकरीता ब-याच प्रमाणात गौण खनिज लागत असल्याने व शासनाने गौण खनिजावर निर्बंध घातल्याने त्याचा पुरवठा कमी होत आहे. तसेच कामासाठी वेगवेगळया व्यासाचे पाईप लागत असल्याचे व कांही ठिकाणी रुफ स्लॅब फोडून नव्याने टाकणे, कंपाऊंड वॉल बांधणे ही कामे करावी लागत असल्याने कामास दि.31/07/2013 पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी मागणी केली आहे. ठेकेदाराने केलेल्या मागणीप्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी दि.31/07/2013 पर्यंत मुदतवाढ देण्याची केलेल्या शिफारशीस आयुक्त यांनी दि.26/03/2013 रोजी मान्यता दिली आहे.

नस्तीमधील (पृष्ठ क्र.T-35), दि.03/08/2013 वर पाणीपुरवठा विभागाने सादर केलेल्या टिपणीमध्ये आज अखेर रु.22073978/- मात्र खर्च झाला असून जवळ जवळ 70 टक्के काम पूर्ण झाले आहे. ठेकेदाराने दि.10/08/2013 रोजीच्या पत्रान्वये सदर कामाकरीता ब-याच प्रमाणात गौण खनिज लागत असल्याने व शासनाने गौण खनिजावर निर्बंध घातल्याने गौण खनिजाचा पुरवठा कमी होत आहे. तसेच जुन्या टाकीच्या पाईप लाईन बदलणे, पाणी सोडबंद व्हॉल्व बदलने इ.महत्वाची कामे बाकी असल्याने पुन्हा दि.30/09/2013 पर्यंत मुदतवाढ देण्याची शिफारस केली आहे. या मुदतवाढीवर कोणताही निर्णय झाला नसताना पाणी पुरवठा विभागाने दि.05/02/2014 रोजी पुन्हा टिपणी सादर केली आहे.(पृष्ठ क्र.41).टिपणीमध्ये सद्यस्थितीमध्ये काम पुर्ण झाले असून फक्त अंतिम देयक तयार करणे बाकी असुन जलशुध्दीकरण केंद्राची दर्शनी भिंत रस्ता रुंदीकरणामध्ये पडल्याने तो भाग बंदीस्त करणे आवश्यक आहे व सदरचे काम टेंडरमध्ये नसताना करुन घेण्यात आल्याने दि.28/02/2014 अखेर मुदतवाढ देणे योग्य होईल अशा स्वरुपाची टिपणी पाणीपुरवठा शाखा अभियंता मिरज यांनी दि.05/2/2014 रोजी कार्यकारी अभियंता यांना सादर केली आहे. सदर टिपणीनुसार मुदतवाढीची शिफारस करुन टिपणी उपायुक्त व आयुक्त यांचे कडे सादर केली असुन आयुक्तांनी मुदतवाढीस दि.28/03/2014 रोजी मान्यता दिली आहे. सदर टिपणीचे अवलोकन केले असता टिपणी कार्यकारी अभियंता यांचेकडे दि.05/02/2014 ते दि.28/02/2014 अखेर 23 दिवस प्रलंबित असल्याचे दिसून येते. टिपणी प्रलंबित राहिलेने मुदवाढीचा प्रस्ताव आयुक्त यांचेकडे मुदतवाढ मागणीचा कालावधी संपलेनंतर गेली आहे व आयुक्तांची मान्यता मुदतवाढ दि.28/2/2014 संपल्यानंतर दि.28/3/2014 रोजी म्हणजे एक महिने उशिराने मिळाली आहे.

2) या कामाची मुदत दि.10/03/2013 रोजी संपल्यानंतर प्रथम मुदतवाढ 6 महिन्यासाठी आयुक्त यांचे मंजूरीने दि.31/07/2013 पर्यंत दिली आहे. या मुदतीत ठेकेदाराकडून काम करुन घेण्याची जबाबदारी ही पाणीपुरवठा विभागाची होती. वेळेत काम होत नसेल तर ठेकेदारास वेळोवेळी अपूर्ण काम पुर्ण करण्यासाठी नोटीस देणे आवश्यक होते. निविदा खंड 1 व 2 मध्ये देण्यात आलेल्या निविदा

DRAFT

अटी शर्ती मधील अट क्र.31 नुसार कामास दिलेल्या मुदतीप्रमाणे कामाची प्रगती होणे आवश्यक आहे. काम मुदतीत करण्यासाठी कामाचा बार चार्ट कामाचे सुरवातीस ठेकेदाराकडुन घेणे आवश्यक असता तो घेण्यात आलेला नाही. कामास मुदतवाढ दिल्यानंतरही ठेकेदाराकडून बार चार्ट घेतलेला नाही. ठेकेदाराची मुदतवाढीची मागणी मान्य करताना जी कामे प्रलंबित आहे. त्याचा बार चार्ट ठेकेदाराकडून घेवून त्याचा अभ्यास करुन पाणीपुरवठा विभागाने मुदतवाढ प्रस्ताव आयुक्ताकडे सादर करणे आवश्यक असता विभागाने फक्त ढोबळ कारणे नमुद करुन मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केल्याने मुदतवाढीच्या कालावधीमध्ये ही काम पूर्ण झाली नसल्याचे स्पष्ट होते. कामाची प्रगती न पाहता वारंवार मुदतवाढ दिल्याने काम पूर्ण होण्यास विलंब लागत असल्याचे दिसून येते.

3) प्रथम मुदतवाढ दि.31/07/2013 रोजी संपल्यानंतर सुध्दा काम पुर्ण न झाल्याने ठेकेदाराने दि.01/08/2013 च्या पत्रान्वये पुन्हा व्दितीय मुदतवाढीसाठी अर्ज सादर केला आहे. (पृष्ठ क्र.326). पाणीपुरवठा विभागाचे शिफारशीनुसार आयुक्त यांनी दि.28/02/2014 अखेर मुदतवाढ मान्य केली आहे. बी -1 टेंडरमधील क्लॉज क्रमांक 6 नुसार ठेकेदाराने कामाची मुदत संपण्याचे अगोदर 1 महिना अगोदर मुदतवाढीचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांचेकडे मुदतवाढीच्या कारणासहित दाखल करणे आवश्यक आहे व कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावात दिलेल्या कारणांची शहानिशा करुन मुदतवाढीची मागणी योग्य असल्यास आपल्या शिफारशीनुसार प्रस्ताव आयुक्त यांचे मान्यतेस पाठविणे आवश्यक आहे. परंतु सदर मुदतवाढीचा प्रस्ताव ठेकेदाराने कामाची मुदत संपल्यानंतर एक महिना विलंबाने सादर केला आहे व पाणीपुरवठा विभागाने सदर अर्जास अनुसरुन मुदतवाढीची टिपणी तयार केली आहे. परंतु त्यावर पुढे कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता (पृष्ठ क्र.342) वर ठेकेदाराने दि.01/08/2013 रोजी केलेला मुदतवाढीचा अर्ज लावण्यात आला आहे. सदर अर्ज पाणीपुरवठा विभागास आवक रजिस्टर क्र.6508 आवक दि.09/12/ 2013 रोजी चार महिने विलंबाने नोंदविला आहे. सदर अर्जामध्ये ठेकेदाराने दि.28/02/2014 पर्यंत मुदतवाढीची मागणी केली आहे. त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने पुन्हा आयुक्त यांचेकडे कामाच्या मुदतवाढीची शिफारस करुन त्यास मान्यता घेतली आहे.

4) ठेकेदाराने 01/08/2013 या एकाच दिवशी मुदतवाढीची दोन पत्र दिली आहेत. पृष्ठ क्र.326 वरील पत्रावर पाणीपुरवठा विभागाचा आवक रजिस्टर क्रमांक 4091,दि.03/08/2013 नमूद आहे व या पत्रामध्ये दि.30/09/2013 अखेर मुदतवाढीची मागणी केली आहे व (पृष्ठ क्र.342) वरील पत्रावर आवक रजिस्टर क्रमांक 6508 दि.09/12/2013 नमूद आहे व त्यामध्ये दि.28/02/2014 पर्यंत मुदतवाढीची मागणी केली आहे. ठेकेदाराने एकाच दिवशी दिलेल्या मुदतवाढीच्या पत्रानुसार पाणीपुरवठा विभागाने टिपणीमध्ये दोन वेळा वेगवेगळे प्रस्ताव तयार केले आहेत व त्याप्रमाणे पाणीपुरवठा विभागाने कोणतीही खातरजमा न करता दोन वेगवेगळया मुदतवाढीचे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केले आहेत.

6) निविदा शर्तीमधील अट क्र.15 मध्ये महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न

DRAFT

केल्यास दंडाची आकारणी करणेचे नमुद आहे. त्यानुसार रु. 5 लाखापेक्षा अधिक रक्कमेच्या कामास दर दिवसास रु.500/- प्रमाणे दंड आकारण्याची तरतुद आहे. परंतु पाणीपुरवठा विभागाने ठेकेदाराने काम 242 दिवस विलंबाने केलेबाबत दंड न आकारता वारंवार मुदतवाढी दिल्याने काम पूर्ण होण्यास विलंब लागत आहे. पहिली मुदतवाढ दि.31/07/2013 पर्यंत दिल्यानंतर ठेकेदाराकडून काम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी पाणीपुरवठा विभागाची असताना त्यांनी काम पुर्ण करुन न घेता ठेकेदाराच्या पत्रानुसार मुदतवाढीचे प्रस्ताव सादर करुन नियमबाह्यपणे मुदतवाढी मंजूर करुन घेतल्या आहेत. कामास झालेल्या विलंबाबत दि.1/07/2013 ते 28/02/2014 अखेर 242 दिवसासाठीचा रु.500/- प्रमाणे प्रती दिन दंडाची रक्कम रु.1,21,000/- ठेकेदाराकडून वसूल केलेली नाही.

7) विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचेकडे कामाचा विमा दि.11/09/12 ते 10/09/2013 या कालावधीसाठी उतरविला आहे. ठेकेदाराने दि.31/08/2013 अखेर रु.22073978/- चे काम पूर्ण केले असल्याने निविदा रक्कम रु.36515206/ - रु. 22073978/- = उर्वरित रक्कम रु.14441228/- वर 1 टक्केप्रमाणे ठेकेदाराकडून रक्कम रु.144412/- वसूल केलेली नाही.

8) प्रमाणक क्र.1 ची तपासणी केली असता देयकामध्ये नमूद केलेला कामाचा तपशिल, मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेल्या कामाच्या गोषवा-यामधील अनुक्रमांकानुसार(Abstract) नोंदविला नसल्याने मोजमाप पुस्तकामधील नोंदीनुसार देयक तपासताना अडचण निर्माण होत आहे .गोषवा-यामध्ये नोंदविलेल्या बाबींच्या अनुक्रमांकानुसार देयक का तयार करण्यात आले नाही याचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.81 दि.15/03/2016 अन्वये मागणी करुनही केलेला नाही.

9) या कामाचे धावते देयक क्र. 5 ची रक्कम प्रमाणक क्र.1 ने ठेकेदारास आदा केली आहे. कामासाठी वापरलेल्या गौण खनिजाचे विवरणपत्र जोडले आहे. विवरणपत्रामध्ये PCC 150 चे काम 11.54 घ.मी. झाले असून या कामासाठी 14.04 घ.मी. खडी व वाळू लागले आहे. गिलाव्याचे काम 763.56 चौ.मी. झाले असून त्यासाठी 43.89 घमी वाळू लागली आहे. UCR चे बांधकामासाठी दगड 43.09 घ.मी. लागला आहे. धावते देयक क्रं. 6, प्रमाणक क्र.3 ने ठेकेदारास आदा केले आहे. सिमेंट वापर विवरणपत्रामध्ये PCC 150 चे 5.19 घ.मी. कामासाठी वाळू व खडी 6.30 घ.मी., RCC M 250 घ.मी चे काम 8.81 घ.मी झाले असून त्यासाठी वाळू व खडी 5.24 घ.मी.लागली आहे.. धावते देयक क्र. 7 ची रक्कम प्रमाणक क्र. 10 ने देण्यात आली असून PCC 150 चे काम 34.35 घ.मी.झाले असून या कामासाठी खडी व वाळू 41.81 घ.मी.लागली आहे. या कामासाठी एकूण गौणखनिज 111.28 घ.मी.लागले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रंमांक गौण खनिज -10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही पाणीपुरवठा विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम

DRAFT

कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. या कामासाठी एकूण 111.28 घ.मी गौणखनीज वापरण्यात आले असून त्यावर 70.67 घ.मी. प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसूल विभागाकडे भरल्याच्या पावत्या देयकाबरोबर सादर केला नसल्याने रु.7864/- वसूल करणेत यावेत.

10) या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 33500189/- असून शासनाकडून अंदाजपत्रकीय रक्कमे इतकेच अनुदान मिळणार आहे. निविदा 9 टक्के जादा दराने मंजूर केली असल्याने जादाची रक्कम रु.3015017.01/- महानगरपालिकेने स्वनिधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. 2013-14 अखेर धावते देयक क्र.7 अखेर एकूण रक्कम रु.9217781 खर्च झाले आहेत. देयकामध्ये अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 9 टक्के जादाची रक्कम रु. 742308/- महानगरपालिकेने स्वनिधीमधून देणे आवश्यक असता ती योजनेसाठी आलेल्या शासन निधीमधूनच खर्च करण्यात आली आहे.

11) या कामाच्या निविदा शर्तीमधील अट क्र.6 मध्ये निविदा दर हा मक्तेदारास द्यावा लागणा-या जकात वगैरे सर्व करासह देणेचा आहे. या कामासाठी प्रमाणक क्र.03 ने बाब क्र.11 ,बाब क्र.13, बाब क्र.14 व बाब क्र.30 , MS Special पोटी रक्कम रु. 361253/- ठेकेदारास आदा केले आहेत. परंतु या मालावर 4 टक्के प्रमाणे जकात भरलेच्या पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नसल्याने रक्कम रु. 14450/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

**वसुलपात्र रक्कम :-** कामास विलंब लागत असल्याने वसुल करावयाची विलंबाची दंड रक्कम रु.121000/- + विमा रक्कम रु.144412/- + गौण खनिज रॉयल्टी रक्कम रु.7864/- + जकात रक्कम रु.14450 = **रु.287726/-**

DATSBKM7201 (Ref No : 81)

## *72 सांगलीवाडी येथे 15 लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे तसेच शामरावनगर येथे वितरण नलिका टाकणे व विविध ठिकाणी कंपाऊंड वॉल बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**UIDSSMT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र,राज्य व मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1040551.00/-

***या कामाची मुदत दि.10/10/2014 अखेर असताना मार्च 2016 अखेर देखिल काम पुर्ण झालेले नाही. कामाची देयके देताना शासन हिस्सा व मनपा हिश्श्यामधुन देणे आवश्यक असता सर्व देयके शासन निधीमधुन देण्यात आली असल्याने शासननिधीमधुन रक्कम रु.10667252/- जादा खर्च झाला आहे. कामाची वर्क ऑर्डर***

DRAFT

***दिल्यानंतर कामाची जागा निश्चित न केल्याने काम चालु होण्यास 5 महिन्याचा विलंब लागला आहे. कामाच्या देयकामधुन जकात व विम्याची रक्कम रु. 1040551/- कपात केलेली नाही.***

अंदाजपत्रकीय खाते :- 41221 लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत विकास योजनेसाठी केंद्र शासनाकडून आलेल्या अनुदानामधून होणारा खर्च. आर्थिक तरतुद रु.41 कोटी.

केंद्रशासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचा पायाभुत विकास कार्यक्रमांतर्गत रु. 79.02 कोटी किमतीच्या विषयांकीत योजनेला केंद्र शासनाकडून माहे सप्टे.2006 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार केंद्रशासनाचा हिस्सा रु.63.22 कोटी (80 टक्के),राज्य शासनाचा हिस्सा रु.7.90 टक्के (10 टक्के), मनपा हिस्सा 7.90 टक्के (10 टक्के) असा आहे. या मंजुर योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन रु.35.40 कोटी (रु.14.78 कोटी +20.62 कोटी) इतका निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे. यापैकी महानगरपालिकेने रु.14.78 कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केला आहे व या रक्कमेतुन पुर्ण ठेव तत्वावर अधारित मंजुर योजनेतील कुपवाड झोनसाठीच्या गट क्र.1 मधील कामे पुर्ण झाली आहेत. तसेच महानगरपालिकेने अन्य कामासाठी दोन पॅकेज तयार केली असुन त्याची किंमत रु.60.56 कोटी इतकी होत आहे. यामध्ये उंच टाक्या बांधणे,गुरुत्वनलिका व वितरण व्यवस्थेसाठी पाईप लाईन पुरविणे, त्यासाठी खुदाई करणे, जोडणे,चाचणी देणे,पंपीग मशिनरी पुरविणे,बसविणे, चाचणी देणे व माळबंगला येथे 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाचा समावेश आहे. महानगरपालिकेस दि.01/08/2012 ने रु.35 कोटी 56 लाख शासनाकडुन प्राप्त झाले आहेत. या योजनेस तांत्रिक मान्यता देत असताना मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदरचे काम हाती घेण्यापुर्वी कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास मंजुरी घेणेबाबत अट घातली आहे. त्यास अनुसरुन मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणयांचे पत्र क्र.6 दि.06/01/2011 रोजी तांत्रिक मान्यता दिली आहे.

Govt. of India ,Ministry of Urban Development , Encloser to Note No. Q12045 / 15/ 2/ UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत DPR ला मान्यता दिली आहे. त्यानुसार योजनेची सुधारित appraised cost रु.14597.05 लाख या रक्कमेला मान्यता दिली आहे व योजनेची मुळ किंमत रु.7902/- लाख व सुधारित किंमत रु.14597.05 लाख या मधील फरक रक्कम रु.6695/- लाख रक्कमेची तरतुद राज्यशासन व महानगरपालिका यांनी स्वनिधीमधुन करण्याबाबत नमुद आहे.

या कामाची निविदा किंमत रु.5,08,50,950/- असून निविदा नोटीस क्र.12/1 ने ई निविदा मागविणेची जाहिरात दै.सकाळ व दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.16/01/2013 व दि.17/01/2013 रोजी प्रसिध्द करण्यात आली. जाहिर निविदा प्रक्रीयेनुसार ठेकेदाराकडून prequalification साठी अर्ज मागविले होते. याबाबत पात्र व अपात्र ठेकेदारांची यादी वेबसाईटवर आयुक्त यांचे मंजुरीने दि. 28/01/2013 ने

DRAFT

टाकण्यात आली. यापैकी पात्र निविदाधारक मे.एस.व्ही.जाधव,मिरज, रचना इंजिनिअर्स,कोल्हापूर ,श्री.विजय साळुंखे, पुणे ,लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग कोल्हापूर या ठेकेदारांनी निविदा फॉर्म विकत घेवून दि.05/2/2013 च्या निविदा पुर्व बैठक व खुलासे यानंतर निविदा भरुन सादर केल्या आहेत. निविदा प्रक्रीयेनुसार या ठेकेदारांचा प्रथम लखोटा दि.14/02/2013 रोजी उघडण्यात आला असून कागदपत्रे बरोबर असल्याने दराचा लखोटा दि.20/02/2013 रोजी उघडण्यात आला आहे. त्यानुसार **श्री.विजय साळुंखे, पुणे(12.88 टक्के जादाने)**, मे.एस.व्ही.जाधव,मिरज(14.5 टक्के जादाने) , रचना इंजिनिअर्स,कोल्हापूर (15.5 टक्के जादाने), लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग कोल्हापूर, (15.5 टक्के जादाने) निविदा भरल्या आहेत.

सदर कामाची निविदा किंमत सन 2011-12 च्या दरसूचीनुसार रु.5,08,50,950/- इतकी असून श्री. विजय साळुंखे, पुणे यांचा सर्वात कमीचा देकार 12.88 टक्के जादाने म्हणजेच रु.5,74,00,552.36/- आहे. या कामाचे दरपृथ्थकरण केले असुन सन 2012 -13 च्या दरसूचीनुसार कामाची किंमत रु. 5,25,73,635/- इतकी झाली आहे. दरसूचीतील जनरल नोटप्रमाणे खालील बाबींचा समावेश दरामध्ये केलेले आहे. As per govt. Circuler No.DSR 1090/cr-6453/PCN-3 dated 14/7/1993 1% for labour Amenities Rs.525736/-, As per Govt.Circuler in industries & Power GR No. BCA- 2009/CR -108 Laboyr 7-4A dated 17/06/2010 1% cess on Labour Welfare Rs. 525736/-. सदर दरांचा समावेश केल्यानंतर चालू दरसूची 2012-13 नुसार कामाची एकूण किंमत रु. 53625108/- इतकी झालेली आहे. चालूदरसुची (2012-13) बरोबर तुलना करिता ठेकेदाराचा देकाराचा दर 7.04 टक्के जादाचा आहे. प्राप्त दर जादाचे असल्याने आयुक्त यांचे आदेशा नुसार दर कमी करण्यासाठी ठेकेदारास दि.21/03/2013 रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यावेळी दर कमी करण्यास ठेकेदाराने नकार दिला असून याबाबत दि.22/03/2013 रोजी ठेकेदाराने महानगरपालिकेस दिलेल्या पत्रामध्ये भाववाढीची खालील कारणे नमूद केली आहेत. 1) निविदेमध्ये भाववाढ क्लॉज नमूद नाही. 2) सांगली जिल्ह्यात वाळूचे लिलाव झाले नसल्याने वाळूचे दर वाढले आहेत.3) वितरण व्यवस्थेचे काम करताना सर्व्हिस केबल, पाणीपुरवठा व ड्रेनेज पाईप लाईनची मोडतोड होणार आहे. त्यामुळे दिलेला दर योग्य असल्याचे नमूद आहे.

उपायुक्त पाणीपुरवठा विभाग यांचे दि.02/04/2013 ने पाठविलेल्या विषयपत्रानुसार या कामास महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.6, विषय क्रमांक 06 दिनांक 06/04/2013 ने मान्यता दिली आहे. सदर मान्यतेमध्ये या योजनेचा मिशन पिरियड मार्च 2014 पर्यंत असून यामध्ये उपलब्ध अनुदान खर्च होणे आवश्यक आहे. या कामाचे फेर टेंडर काढल्यास कालावधीदेखील जास्त लागू शकतो शिवाय दरवाढीमुळे फेरनिविदेमध्ये जास्तीचे दर येण्याची शक्यता प्राप्त परिस्थितीमध्ये अधिक वाटते. महाराष्ट्र शासनाकडून ही योजना पूर्ण करण्यासाठी सन 2008-09 च्या दरसूचीनुसार होणारी किंमत व मंजुर योजनेची किंमत यामधील 50 टक्के फरक अनुदान स्वरुपात व 50 टक्के सॉफ्ट लोन स्वरुपात मिळणार आहे. योजना सुधारीत करुन अनुदान प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

DRAFT

तरी सदर उपांगावर शासन अनुदानापेक्षा जादा होणा-या खर्चास, 50 टक्के सॉफ्ट लोन घेण्यासाठी व सदरच्या ठेकेदाराचे सन 2012-13 च्या दरसूचीनुसार होणा-या किंमतीवर 7.04 टक्के जादा दराचे निविदा दरास म्हणजेच रु.5,74,00,552/- इतक्या रक्कमेस विषयपत्रातील शिफारशीनुसार महासभेने मान्यता दिल्याचे ठरावामध्ये नमूद आहे.

ठेकेदारास या कामाची समज पाणीपुरवठा विभागाने क्र.मनपा/पापुवि/सां/ 28/13-14 दि.09/04/2013 या पत्राने दिली असुन कामाचे करारपत्र रितसर आवश्यक त्या किंमतीच्या स्टँप पेपरवर सात दिवसाचे आत करुन देण्याचे पत्रामध्ये नमूद आहे. कामाचे करारपत्र रु.56,000/- च्या स्टँप पेपरवर वर दि. 06/05/2013 रोजी केले आहे.

कामाची वर्क ऑर्डर पत्र क्र.मनपा/पापुवि/सां/116/13-14 ने दि.10/05/2013 रोजी दिली आहे.
कामाची मुदत :- 12 महिने(पावसाळ्यासह) दि.10/10/2014 पर्यंत.(पृष्ठ क्र.597/4)

पाणीपुरवठा विभागाने No./WWW/UIDSSMT/150/13-14 दि.24/05/2013 रोजी ठेकेदारास दिलेल्या पत्रामध्ये कामाची मुदत 12 महिने असून सदर काम दिलेल्या मुदतीत पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच UIDSSMT योजनेचा मिशन पेरियड हा मार्च 2014 पर्यंत असून काम वेळेत पूर्ण होणे आवश्यक असल्याने या कामाचा बार चार्ट कार्यालयास लवकर देण्याची मागणी केली आहे. .(पृष्ठ क्र.599) या कामाचा SBC Report (Safe Bearing Capacity Report) वालचंद कॉलेज सांगली यांनी दि.11/07/2013 रोजी दिला आहे. (पृष्ठ क्र.615).या कामाच्या RCC Design & Drawing ला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांनी तांत्रिक मान्यता दिली असुन (पृष्ठ क्र.667) त्याप्रमाणे काम करण्याचे आदेश कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारास पत्र क्र.WWW/ MIRAJ/ 1331/2013-14 ने दि.22/08/2013 रोजी दिले आहेत.(नस्तीमधील पृष्ठ क्र.639).

2013-14 या आर्थिक वर्षामध्ये खालील प्रमाणे ठेकेदारास त्याने केलेल्या कामाची देयके आदा केली आहेत.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|
| 25 | 15/02/2014 | 16441981 |
| 26 | 15/02/2014 | 1984781 |

मोजमाप पुस्तक क्रमांक. 12, पृष्ठ क्र. 9 ते 21 तसेच मोजमाप पुस्तक क्र.12, पृष्ठ क्र.22 ते 41 वर या कामाची मोजमापे नोंदविली आहेत.

**या कामाचे टेंडर डॉक्यूमेंट, प्रि बिड मिटींगचा अहवाल, बी -1 टेंडरचे शेड्यूल, देयके, प्रमाणके व मोजमाप पुस्तिका यांचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.82 दि.15/03/2016 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमितते बाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.**

1) या कामाचा कार्यादेश पाणीपुरवठा विभागाने ठेकेदारास दि.10/05/2013 रोजी दिला असून कामाची

DRAFT

मुदत 12 महिने (पावसाळ्यासह) दि.10/10/2014 पर्यंत दिली आहे. वर्क ऑर्डर दिल्यानंतर पाणीपुरवठा विभागाने या कामाचा SBC Report (Safe Bearing Capacity Report) देणेबाबत वालचंद कॉलेजला No./WWW/UIDSSMT/196/13-14 दि.14/06/2013 रोजीचे पत्राने कळविले आहे व त्यानुसार याबाबतचा अहवाल वालचंद कॉलेजने दि.11/07/2013 रोजी पाणीपुरवठा विभागास दिला असुन कार्यालयाने त्याप्रमाणे काम करण्याचा आदेश ठेकेदारास दि.22/08/2013 रोजी दिला आहे. महाराष्ट्र बांधकाम नियमावली कलम 141 (12) नुसार एखाद्या कामाचे Detailed Estimate तयार करण्या अगोदर ज्या ठिकाणी काम करणार आहे त्या ठिकाणी ट्रायल पिट घेवून जमीनीचा भुस्तर तपासून सदर जागा कामासाठी योग्य असलेबाबत तसेच पाया किती खोलीवर घेणे आवश्यक आहे ती खोली ठरविणे आवश्यक आहे. परंतु पाणीपुरवठा विभागाने वर्क ऑर्डर दिल्यानंतर या बाबतची कार्यवाही केल्याने टाकीचे बांधकाम सुरु होण्यास पाच महिन्याचा विलंब लागला आहे. तसेच ठेकेदाराकडून कामाचा बार चार्ट घेण्यात आलेला नाही.

2) या कामाचे धावते देयक क्र.1 ची तपासणी केली असता, देयकासोबत Cement Consumption Statement जोडले आहे. त्यानुसार PCC M150 चे काम 81.93Cum झाले असून त्यासाठी 5.80 बॅग्ज सिमेंट प्रती घ.मी.वापरण्यात आले आहे. RCCM200 चे काम 127.99Cum झाले असून त्यासाठी 8.50 बॅग्ज सिमेंट प्रती घ.मी. , BB Msonary 1:6 चे काम 164.16Cum झाले असून त्यासाठी 1.44 बॅग्ज सिमेंट प्रती घ.मी., Plaster चे काम 2173.84 घ.मी झाले असून त्यासाठी 0.27 बॅग्ज सिमेंट प्रती घ.मी. लागले आहे. PCC M150 चे कामासाठी वाळू 33.25 घ.मी. व खडी 66.5 घ.मी.लागली आहे. RCCM200 चे कामासाठी वाळू 83.76 घ.मी व खडी 125.63 घ.मी लागली आहे. तसेच प्लास्टर 1:4 साठी वाळू 80.80 घ.मी. लागली आहे. या कामासाठी एकूण गौण खनिज 389.94 घ.मी. लागले असून महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी भरल्याच्या पावत्या लेखापरीक्षणास दाखविल्या नसल्याने 389.94 घ.मी. X रु. 70.67/घ.मी प्रमाणे रु.27557/- ठेकेदाराकडून वसूलपात्र आहेत.

3) या कामाचे मोजमाप पुस्तक क्र.12 पृष्ठ क्र.17 ची तपासणी केली असता कार्यकारी अभियंता यांनी सब वर्क क्र. 2 वितरण नलिका टाकणे या कामातील बाब क्र.1. DIK-7 विविध व्यासाच्या 100 मि.मि.- 907.50 मिटर, 150 मि.मि.- 3536.50 मिटर, 250 मि.मि.- 418 मिटर व 250 मि.मि.- 382.50 मिटर वितरण नलिका पुरविणे या कामाची एकूण किंमत रु.72,96,164.28 साठी 5 टक्के किमतीचे चेकींग दाखविले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग ,शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 1097 /सीआर 622/इमारती 2 दि.22/08/2005 नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट 42 अ.क्र.70 मध्ये उल्लेखिलेल्या मोजमापे तपासणीच्या अधिकारात सुधारणा करण्यात आली आहे. क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांचेकडून विहित टक्केवारी नुसार मापांची तपासणी केली जात नाही वा केवळ औपचारिकता म्हणून कामातील महत्वाच्या बाबी जसे खोदकाम, भरावाचे

DRAFT

काम, झाकली जाणारी मापे इत्यादी बाबी सोयीस्करपणे वगळून अन्य बाबींच्या मापाची तपासणी दर्शविण्याची प्रवृत्ती क्षेत्रिय कार्यकारी अभियंता वर्गात वाढत आहे. त्यामुळे शासनाने या शासन परिपत्रकाप्रमाणे खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

त्याप्रमाणे प्रच्छन्न मापे (Hidden Measurements) विशेषत: मातीकाम, खोदकाम, पुलांचे पायव्याचे काम, बी.बी.एम. इत्यादी बाबींची किमान 5 टक्के तपासणी क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी करणे बंधनकारक आहे. परंतु या शासन निर्णयानुसार कार्यकारी अभियंता, जलनिस्सारण आणि पाणीपुरवठा यांनी सिमेंट कॉंक्रीट व खुदाई या कामांची तपासणी केलेली नाही.

4) या कामामधील PCC M150 चा दर रु.4277.70 प्रती घ.मी, RCC M 200 चा दर रु.5276.25 प्रती घ.मी., providing @ casting in situ RCC M 200 चा दर रु.6924.75 प्रती घ.मी., providing @ casting in situ CC M 200 चा दर रु.6981.45 प्रती घ.मी. ठरविला आहे. या दरामध्ये खडी व वाळू हे गौण खनिज बाहेरुन आणल्याने त्यासाठीच्या लिड चार्जेसचा समावेश करुन सदर दर ठरविला आहे. परंतु सदर दर दरपृथ्थकरणाने ठरविल्याचे स्टेटमेंट लेखापरीक्षणास दाखविले नसल्याने दिलेला दर योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही.

5) या कामाचे प्रथम व व्दितीय देयकाने ठेकेदारास प्रमाणक क्र.25 व 26 ने रक्कम रु.18426762/- आदा केले आहेत. सदर देयक केंद्रशासनाकडून आलेल्या अनुदानामधून आदा केले आहे Govt of India , Ministry of Urban Development यांचे दि.08/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे व त्यामध्ये या कामाचा समावेश केलेला आहे. सदर सुधारीत मान्यता देताना या कामासाठी केंद्र शासनाकडून कोणतेही अनुदान मिळणार नसून या कामाचा खर्च राज्य शासन व महानगरपालिका यांनी त्यांचे निधीतून करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहे. शासनाने सन 2005-06 चे दरसूचीनुसार तयार केलेल्या निविदा किंमतीस डी.पी.आर.मध्ये मान्यता दिली आहे. मंजुर डी.पी.आर नुसार या कामाची किंमत रु.269.02 लाख असून केंद्र व राज्य शासनाकडून 90 टक्के प्रमाणे रु.242.11 लाख अनुदान शासनाकडून प्राप्त झाले आहे. या कामाची मंजूर निविदा किंमत रु. 574 लक्ष इतकी असल्याने व शासनाकडून रक्कम रु.242.11 लाख अनुदान या कामासाठी प्राप्त झाल्याने उर्वरित रु.331.89 लाख रक्कम महानगरपालिकेच्या स्वनिधी मधून खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदारास कामाची देयके देताना 42.11 टक्के रक्कम शासननिधीमधून व 57.89 टक्के रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च करणे आवश्यक होते. महानगरपालिकेने ठेकेदारास आर्थिक वर्ष 2013 -14 मध्ये रु.18426762/- आदा केले आहेत. अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 42.11 टक्के प्रमाणे रु.77,59,509/- व स्वनिधीमधून 57.82 टक्क्याप्रमाणे रु.10667252/- खर्च करणे आवश्यक असता सर्व रक्कम शासननिधीमधून खर्च करण्यात आली आहे या वित्तिय अनियमिततेचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.82 दि.15/03/2016 अन्वये मागणी करुनही दिलेला नाही.

6) सदर कामावर 31 मार्च 2014 अखेर रु.18426762/- खर्च झालेला आहे. कामाची अंदाजपत्रकीय

DRAFT

किंमत रु.5,74,00,552/- इतकी आहे. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये या कामावर 32 टक्केच खर्च झाला आहे. या कामाची नस्ती तपासली असता जानेवारी 2016 अखेर काम अपूर्ण असल्याचे दिसून येते. कामाची मुदत 12 महिने (पावसाळ्यासह) दि.10/10/2014 अखेर असताना काम पूर्ण न झाल्याने नागरिकांना शुध्द पाणी पुरविण्याचा हेतू साध्य झाला नसल्याचे स्पष्ट होते.

7) पाणीपुरवठा विभागाने ठेकेदारास सदर काम चालू दरसूची 2012-13 ने येणा-या कामाच्या रु.50850950/- किमतीच्या 7.05 टक्के जादा दराने दिले आहे. जादा दराचे दरपृथ्थकरणामध्ये कामगार कल्याण उपकर 1 टक्का व 1% for labour Amenitie चा समावेश करुन दरपृथ्थकरण केले आहे. As per Govt.Circuler No.DSR-1089/CR-6453/PLN-3,Dt.14/07/1993, 1% for labour amenities is not considered in the DSR except concrete item while arriving the rates. या निविदेमध्ये RCC उंच कॉँक्रीट टाकीच्या कामाची किंमत रु.10275583/- इतकी धरण्यात आलेली असून शासन निर्णयाप्रमाणे सदर काम कॉँक्रीटचे असल्याने या रक्कमेवर 1 टक्का labour amenities आकारता येत नसतानाही दरपृथ्थकरणात सदर रक्कम धरण्यात आली आहे. त्यामुळे टाकीच्या कामाची किंमत रु.10275583/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.102755/- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहेत. तसेच महानगरपालिकेने निविदा चालू दरसूचीच्या 7.05 टक्के जादाने देताना त्या का जादा दराने आल्या आहेत याबाबत पाणीपुरवठा विभागाने बाबवार Rate Analysis करुन निविदा अंतिम करणे आवश्यक असता पाणीपुरवठा विभागाने कामगार कल्याण उपकर व Labour Amenities या बाबी व्यतिरिक्त अन्य बाबींचे तपशिलवार दरपृथ्थकरण न करताच 7.5 टक्के जादा दराची निविदा मंजुर केल्याने महानगरपालिकेचे (रु.57400552.36/- - रु.50850950/-) = रु. 6549602/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

8) या कामाच्या प्री बिड मिटींग दि.05/02/2013 रोजी झाली आहे. मिटींगमध्ये ठेकेदाराने टेंडरचे दर सर्व करासहित भरणेचे आहेत तसेच ठेकेदाराने कामासाठी घेतलेल्या मटेरिअल वर ऑक्ट्रॉय/ LBT भरणे आवश्यक असल्याचे कार्यवृत्तांतामध्ये नमूद केले आहे. (clarification on points raised by contractors during prebid meeting held on 05/02/2013). MJP, DSR 2012-13 ,General Notes मधील अ.क्र.22 नुसार Pipes, Specials,Valves वर आकारण्यात येणा-या जकातीचा समावेश DSR मध्ये केला नसल्याने एस्टिमेट तयार करताना 4 टक्के ऑक्ट्रॉयचा समावेश या बाबींचे दरात करुन दर अंतिम करणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने 4 टक्के ऑक्ट्रॉयचा समावेश करुन या बाबींचे दर अंतिम केले आहेत. परंतु देयकाची तपासणी केली असता या बाबींवरची जकात भरलेच्या पावत्या देयकाबरोबर लावल्या नसल्याने ठेकेदाराच्या देयकामधून 4 टक्केप्रमाणे जकात कपात करणे आवश्यक आहे. या कामाच्या प्रमाणक क्र. 25 व 26 मधुन Supply of DIK7 pipes, pipes & CI/DF Valves या बाबी करीता ठेकेदारास रु.10974731.92 /- आदा केले आहेत. या बाबीवरील 4 टक्केपर्यंत येणारी जकातीची रक्कम रु.438989/- इतकी होत आहे. देयकासोबत जकात भरल्याच्या पावत्या जोडल्या नसल्याने

DRAFT

ठेकेदाराकडून जकातीची रक्कम रु.438989/- वसूल करण्यात यावी.

9) करारपत्रातील अट क्र.6 नुसार कामाचा विमा काढणे आवश्यक आहे. नस्तीची व देयकाची तपासणी केली असता देयकामधून विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/ सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1% विम्याची रक्कम कपात करणे आवश्यक असता ती कपात केली नसल्याने अंदाजपत्रकीय रक्कम रु. रु.5,74,00,552/-च्या 1 टक्केप्रमाणे रक्कम रु.574005/- कपात करण्यात यावेत.

10) UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रामध्ये General Comments for project implementation साठी दिल्या आहेत. त्यानुसार योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी वेळापत्रक तयार करुन त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. जेणेकरुन योजनेस विलंब लागून योजनेचा खर्च वाढणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असलेचे नमूद आहे. परंतु या कामाची नस्ती पाहिली असता फेब्रुवारी 2016 अखेर 90 टक्के काम पुर्ण झाले असून ऑगस्ट 2016 पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे नस्तीमध्ये नमूद केले आहे. यावरुन दि.10/10/2014 पर्यंत पूर्ण होणारे काम त्यानंतर दोन वर्षानंतरही पूर्ण झाले नसल्याने काम नियोजनबध्द रितीने राबविले गेले नसल्याचे स्पष्ट होते.

11) शामरावनगर, मिरज येथे सुजल निर्मल योजनेतून 15 लाख लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे हे काम करण्यात आले असून त्याच्या वितरणनलिकेचे काम UIDSSMT या योजनेतून करण्यात आले आहे. केंद्र व राज्य शासनाने UIDSSMT योजना ही सांगली व कुपवाड शहरासाठी मंजूर केली असलेने या योजनेतून सांगली व कुपवाड शहरांच्या पाणीपुरवठा योजना करणे आवश्यक असता मिरज विभागासाठी या योजनेतून वितरण नलिकेचे काम करणेत आल्याचे दिसुन येते. तसेच UIDSSMT योजनेमधून करण्यात येणा-या कामांना केंद्रशासनाच्या CHPEEO कडून दि.08/12/2011 रोजी सुधारीत DPR ला मान्यता घेतली आहे. सदर सुधारीत DPR मध्ये सांगली व कुपवाड विभागाची 2025 पर्यंतची लोकसंख्या वाढ 523992 व 2040 पर्यंतची लोकसंख्या वाढ 7,65,503 इतकी तसेच पाण्याची मागणी 2025 पर्यंत 86.59 MLD व 2040 पर्यंत 124 MLD होईल असे गृहीत धरुन उंच पाण्याच्या टाक्या, साठवण टाक्या तसेच सांगली व कुपवाडसाठी वितरण व्यवस्था करणे ही कामे या योजनेमधून मंजूर केली आहेत. परंतु पाणी पुरवठा विभागाने वितरण व्यवस्थेचे काम सांगली,कुपवाड विभागामध्ये न करता मिरज विभागामध्ये केलेचे दिसून येते.

**वसुलपात्र रक्कम** :- गौण खनिज रॉयल्टी रक्कम रु.27557/- + जकातीची रक्कम रु. रु.438989/- + विमा रक्कम रु.574005/- = 1040551/-

DATSBKM7201 (Ref No : 82)

## *73 कोल्हापूर रोड येथे 15 लाख लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे, वितरण व्यवस्था व कंपाऊंड वॉल बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**UIDSSMT**

DRAFT

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 13**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र,राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 616531.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2094008.00/-

***UIDSSMT योजनेमधील सुधारित कामांना शासनाने दि.31/01/2012 रोजी मान्यता दिली असुन कामांचे टेंडर काढण्याच्या नस्तीची सुरवात पाणी पुरवठा विभागाने दि.23/10/2012 रोजी म्हणजे 9 महिने विलंबाने केली आहे तसेच कामाची वर्क ऑर्डर दि.09/05/2013 रोजी देण्यात आली आहे. या सर्व कार्यवाहीमध्ये सुमारे दिड वर्षाचा अवधी गेल्याने कामाच्या किमतीमध्ये वाढ झालेली आहे. निविदा मजिप्रा चालू दरसुची 2012-13 च्या 8.83 टक्के जादाने मंजुर केली आहे. परंतु सार्व. बांध काम परिपत्रक क्र.डी.पी.डब्ल्यु 1996/16 (ब)/ लेखापरीक्षा मंत्रालय दि. 20 सप्टेंबर 1997 नुसार चालू दरसूचीच्या 5 टक्केपेक्षा जादा अधिक्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असता ती घेण्यात आलेली नाही. Trail Pit न घेता Raft Fondation साठी ठेकेदाराच्या मागणीनुसार दरपृथ: करणामध्ये रक्कम धरण्यात आली आहे. परंतु प्रत्यक्षात कमी रक्कमेमध्ये काम झाल्याने ठेकेदारास रक्कम रु.1512433/-जादा आदा करावी लागली आहे. देयकामधुन विमा रक्कम रु.196268/- कपात केलेली नाही. दरपृथ: करणामध्ये Labour Amenities ची 1 टक्का रक्कम धरण्यात आली आहे. सदरची रक्कम कॉंक्रीट कामाचा समावेश करुन धरण्यात आलेने ठेकेदारास रक्कम रु.102755/- चे अतिप्रदान झाले आहे. तसेच कामासाठी आयात केलेल्या मालाची जकात रक्कम रु.275800/- भरणा केली नसल्याने ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे. देयकाची रक्कम आदा करताना शासननिधीमधुन 41.69 टक्के व स्वनिधीमधुन 58.30 टक्कयाप्रमाणे आदा करणे आवश्यक असता सर्व रक्कम शासननिधी मधुन आदा करण्यात आल्याने योजनेमधील कामांना निधी कमी पडून निधी अभावी कामे प्रलंबित राहिली आहेत.***

DRAFT

अंदाजपत्रकीय खाते :- 41221 लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत विकास योजना

आर्थिक तरतुद रु.41 कोटी.

केंद्रशासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचा पायाभुत विकास कार्यक्रमांतर्गत रु. 79.02 कोटी किमतीच्या विषयांकीत योजनेला केंद्र शासनाकडून माहे सप्टे. 2006 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार केंद्रशासनाचा हिस्सा रु.63.22 कोटी (80 टक्के), राज्य शासनाचा हिस्सा रु.7.90 कोटी (10 टक्के), मनपा हिस्सा रु.7.90 कोटी (10 टक्के) असा आहे. या मंजुर योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन दि.11/03/2008 रोजी रु.14.78 कोटी, दि.11/06/2010 रोजी रु.20.62 कोटी व दि.21/07/2012 रोजी रु.35.56 कोटी असा एकूण निधी रु.70.96 कोटी इतका निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे. यापैकी महानगरपालिकेने रु.14.78 कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केला आहे व या रक्कमेतुन पुर्ण ठेव तत्वावर

अधारित मंजुर योजनेतील कुपवाड झोनसाठीच्या गट क्र.1 मधील कामे पुर्ण झाली आहेत. तसेच महानगरपालिकेने अन्य कामासाठी दोन पॅकेज तयार केली असुन त्याची किंमत रु.60.56 कोटी इतकी होत आहे. यामध्ये उंच टाक्या बांधणे, गुरुत्वनलिका व वितरण व्यवस्थेसाठी पाईप लाईन पुरविणे,त्यासाठी खुदाई करणे, जोडणे, चाचणी देणे ,पंपीग मशिनरी पुरविणे, बसविणे व चाचणी देणे व माळबंगला येथे 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुध्दीकरण कैंद्र बांधणे या कामाचा समावेश आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र क्र.6 ने दि.06/01/2011 रोजी योजनेच्या तांत्रिक बदलास मान्यता दिली आहे. या योजनेस तांत्रिक मान्यता देत असताना मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदरचे काम हाती घेण्यापुर्वी कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास मंजुरी घेणेबाबत अट घातली आहे.

या कामाची नस्तीची तपासणी केली असता, पाणीपुरवठा विभागाने दि.23/10/2012 रोजी लिहिलेल्या टिपणीमध्ये (पृष्ठ क्र.टी -1 ), सांगली शहरात 15 लक्ष लिटरच्या 4 व 25 लक्ष लिटर क्षमतेची 1 अशा एकूण 5 टाक्या बांधणे व 105 कि.मी लांबीची वितरण नलिका टाकणे व उंच टाकी भोवती कंपाऊंड वॉल बांधणे (2.88 + 11.46 + 0.62= 14.96 कोटी ) या कामांचा समावेश व तरतुद मूळ मंजूर योजनेमध्ये नसल्याने या कामासाठी सुधारित अंदाजपत्रके व आराखडे तयार करुन या तांत्रिक बदलास महासभा ठराव क्र.193 दि.10/01/ 2011 ने मान्यता घेतल्याचे नमूद आहे. सदर तांत्रिक बदलाचे प्रस्ताव कैंद्रशासनाकडील Ministry Of Urban Development Dept. कडील CPHEEO ने 23/11/2011 रोजीच्या बैठकीमध्ये मान्य करुन SLSC महाराष्ट्र शासनाकडे पाठविले होते. सदर प्रस्ताव SLSC(State Level Sanction Commitee) च्या दि.31/01/2012 च्या बैठकीमध्ये मान्य करण्यात आले आहेत. सांगली शहरासाठी सन 2025 मधील लोकसंख्येच्या मागणी नुसार उंच टाक्यासाठी व वितरण व्यवस्थेसाठी तरतुद नव्हती. सबब तांत्रिक बदलाच्या प्रस्तावामध्ये या कामासाठी ढोबळ तरतुद करण्यात आली आहे. मार्च 2012 मध्ये तांत्रिक बदलास मान्यता मिळाल्यानंतर वितरण व्यवस्थेसाठी सर्व्हेक्षण करण्याचे काम हाती घेवून सांगलीवाडी, कोल्हापूर रोड व शामराव नगर उंच टाकीच्या कमांड एरियाचे सर्व्हेक्षण पूर्ण करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. UIDSSMT योजनेचे काम पूर्ण करण्याची मुदत मार्च 2014 पर्यंत असल्याने सर्वेक्षण पुर्ण झालेल्या कामांची निविदा काढणे आवश्यक असल्याचे टिपणीमध्ये नमुद आहे.

Govt. of India ,Ministry of Urban Development , Encloser to Note No. Q12045 / 15/ 2/ UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे. त्यानुसार योजनेची सुधारित appraised cost रु.14597.05 लाख या रक्कमेला मान्यता दिली आहे व योजनेची मुळ किंमत रु.7902/- लाख व सुधारित किंमत रु.14597.05 लाख या मधील फरक रक्कम रु.6695/- लाख रक्कमेची तरतुद राज्यशासन व महानगरपालिका यांनी स्वनिधीमधुन करण्याबाबत नमुद आहे.

सदरची मुळ मंजुर योजना 2005-06 सालच्या दरावर आधारित असून प्रस्तावित कामाची मंजुर



DRAFT

किंमत रु.288.19 लक्ष आहे. कोल्हापूर रोड येथे उंच पाण्याची टाकी बांधणे या कामाची निविदा किंमत रु.54154205/- (सन 2011 -12 च्या मजिप्रा दरसूचीनुसार) असून ई निविदा नोटीस क्र.12/4 ने ई निविदा मागविणेची जाहिरात दै.सकाळ व दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.16/01/2013 व दि.17/01/2013 रोजी प्रसिध्द करण्यात आली. जाहिर निविदा प्रक्रीयेनुसार ठेकेदाराकडून prequalification साठी अर्ज मागविले होते. याबाबत पात्र व अपात्र ठेकेदारांची यादी वेबसाईटवर आयुक्त यांचे मंजुरीने दि. 28/01/2013 रोजी टाकण्यात आली. यापैकी पात्र निविदाधारक मे.एस.व्ही.जाधव,मिरज, रचना इंजिनिअर्स , कोल्हापूर ,श्री.विजय साळुंखे, पुणे ,लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग कोल्हापूर या ठेकेदारांनी निविदा फॉर्म विकत घेवून दि.05/2/2013 च्या निविदा पुर्व बैठक व खुलासे यानंतर निविदा भरुन सादर केल्या आहेत.

निविदा प्रक्रीयेनुसार या ठेकेदारांचा प्रथम तांत्रिक लखोटा दि.14/2/2013 रोजी उघडण्यात आला असून 4 ही ठेकेदारांची कागदपत्रे बरोबर असल्याने दराचा लखोटा दि.16/02/2013 रोजी उघडण्यात आला आहे. त्यानुसार रचना इंजिनिअर्स,कोल्हापूर (14.95 टक्के जादाने), लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग कोल्हापूर, (17.35 टक्के जादाने), श्री.विजय साळुंखे, पुणे (17.35 टक्के जादाने), मे.एस.व्ही.जाधव,मिरज(18.01 टक्के जादाने) यांनी निविदा दरापेक्षा जादा दराने निविदा भरल्या आहेत.

या कामाची निविदा किंमत सन 2011-12 च्या मजिप्रा दरसूचीनुसार रु.54154205 /- इतकी असून रचना इंजिनिअर्स, कोल्हापूर यांचा सर्वात कमीचा देकार 14.95 टक्के जादाने म्हणजेच रु.62250258.64/- आहे. या कामाचे पाणीपुरवठा विभागाने दरपृथ्थकरण केले असुन (नस्ती मधील पृष्ठ क्र. 19) , 2012 -13 च्या चालू दरसूचीनुसार कामाची किंमत रु. 56023554/- इतकी झाली आहे. दरसूचीतील जनरल नोटप्रमाणे खालील बाबींचा समावेश दरामध्ये करणेचा आहे. As per govt. Circuler No.DSR 1090/cr-6453/PCN-3 dated 14/7/1993 1% for labour Amenities Rs.560235 /- व As per Govt.Circuler in industries & Power GR No. BCA- 2009/CR - 108 Laboyr 7-4A dated 17/06/2010 1% cess on Labour Welfare Rs. 560235/-. सदर दरांचा समावेश केल्यानंतर चालू दरसूची 2012-13 नुसार कामाची एकूण किंमत रु.57144025/- इतकी झालेली आहे. चालू दरसुची (2012-13) बरोबर निविदा दराची तुलना केली असता ठेकेदाराचा देकार दर 8.93 टक्के जादाचा आहे. प्राप्त दर जादाचे असल्याने आयुक्त यांचे आदेशानुसार दर कमी करण्यासाठी आयुक्त यांचे आदेशाने ठेकेदारास दर कमी करण्यासाठी दि.21/03/2013 रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार दि.22/03/2013 रोजी ठेकेदाराने दिलेल्या पत्रामध्ये भाववाढीची खालील कारणे नमूद केली आहेत. 1) सदरच्या ठिकाणी उंच टाकी बांधण्यासाठी राफ्ट फाऊंडेशनची आवश्यकता आहे. त्यासाठी DSR मधील तरतुदीनुसार एकूण किंमतीवर 7.5 टक्के वाढविण्यात आले आहेत. त्यासाठी रु.24.71 लक्ष अपेक्षित आहेत.2) DI पाईपचा दर चालू दरसूचीपेक्षा 4.5 ते 6 टक्के वाढला आहे. 3)निविदेमध्ये भाववाढ क्लॉज नमूद नाही. 4) सांगली जिल्हयात वाळूचे

DRAFT

लिलाव झाले नसल्याने वाळूचे दर वाढलेने दिलेला दर योग्य असल्याचे नमूद आहे.

कार्यकारी अभियंता यांनी या योजनेचा मिशन कालावधी मार्च 2014 पर्यंत असल्याने व सदरचे काम एक वर्ष मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने देवू केलेला दर योग्य असल्याने सन 2012-13 च्या दरसूचीवर 8.93 टक्के जादा दराने निविदा मंजूर करण्याची शिफारस केली आहे व त्याप्रमाणे आयुक्त यांनी ठेकेदाराच्या निविदेस दि.01/04/2013 रोजी मंजूर दिली आहे.

महासभेची मंजुरी :- उपायुक्त (पाणीपुरवठा विभाग) यांचे दि.02/04/2013 चे विषयपत्रानुसार महासभेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेल्या 8.93 टक्के जादा दराच्या निविदेस महासभा क्र.विशेष सभा 01,ठराव क्र.07, विषय क्र.07, दि.06/04/2013 ने मंजुरी देण्यात आली आहे.

कामाची समज :- कार्यकारी अभियंता पत्र क्र.मनपा/पापुवि/सां/24/2013-14 दि.09/04/2013 ने कामाची समज देण्यात आली असुन ठेकेदाराने या कामाचे रु.61500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क दि.12/04/2013 रोजी E Stamp ने भरणा केले असून कामाचा करारनामा महानगरपालिकेचे सिल लावून दि.02/05/2013 रोजी करण्यात आला आहे.

कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.15,57,000/- ठेकेदाराने कर्नाटक बँक BG N0.37/13 दि.09/04/2013 ने महानगरपालिकेकडे आदा केली आहे.

कामाचा कार्यादेश :- क्र.मनपा/पापुवि/सां/113/2013-14 दि.09/05/2013 या पत्राने कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी ठेकेदारास कामाचा कार्यादेश दिला आहे.

कामाची मुदत :- 12 महिने(पावसाळ्यासहित) ,कामास प्रथम मुदतवाढ:- दि.31/12/2014 पर्यंत, दुसरी मुदतवाढ :- दि.31/08/2016 अखेर

2013-14 या आर्थिक वर्षात ठेकेदारास खालील प्रमाणे रक्कम आदा केली आहे.

| धावते देयक क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रु. | मोजमाप पुस्तिका क्र. | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 10 | 26/09/2013 | 8950272 | 11 | 02 ते 04 |
| 02 | 19 | 15/02/2014 | 1586708 | 11 | 04 ते 06 |
| 03 | 20 | 15/02/2014 | 2544154 | 11 | 07 ते 16 |
| 04 | 21 | 15/02/2014 | 2779089 | 11 | 17 ते21 |
| 05 | 22 | 15/02/2014 | 2179367 | 11 | 27 ते32 |
| 06 | 30 | 17/02/2014 | 1587285 | 11 | 32 ते 39 |
| | | एकूण | 19626875 | | |

**या कामाची नस्ती, देयके, प्रमाणके व मोजमाप पुस्तकाची तपासणी करुन कामामधील आक्षेपा बाबत चा अर्धसमास ज्ञापन क्र.83 दि.15/03/2016 रोजी निर्गमित करण्यात आला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.**

DRAFT

1) UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर. ला मान्यता दिली आहे. तसेच राज्य शासनाच्या SLSC(State Level Sanctioning Committee) च्या 14 व्या मिटींगमध्ये या योजनेमधील सुधारित कामांना दि.31/01/2012 रोजी मान्यता दिली आहे. शासनाने योजनेस मान्यता दिल्या नंतर या कामांचे टेंडर काढण्याच्या नस्तीची सुरवात पाणी पुरवठा विभागाने दि.23/10/2012 रोजी म्हणजे 9 महिने विलंबाने केली असुन कामाची वर्क ऑर्डर दि.09/05/2013 रोजी देण्यात आली आहे. या सर्व कार्यवाहीमध्ये सुमारे दिड वर्षाचा अवधी गेला आहे. या कामाची निविदा सन 2011-12 या आर्थिक वर्षाचे मजिप्राचे DSR प्रमाणे मागविण्यात आली असून निविदा कामाचे दरपृथ्थकरण 2012-13 या आर्थिक वर्षाचे DSR बरोबर करुन ठेकेदाराची 8.53 टक्के जादा दराची निविदा मंजुर करण्यात आली आहे. कामाची मान्यता दि.31/01/ 2012 रोजी मिळाल्यानंतर कामाच्या निविदेची कार्यवाही तत्परतेने करणे आवश्यक होते. परंतु निविदा मागविणे व मंजूर करणेची कार्यवाही विलंबाने केलेने काम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 14.95 टक्के जादा दराने आले आहे. नस्तीमधील पृष्ठ क्र.351 वर शासन परिपत्रक जोडण्यात आलेले आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक : युआयडी-2009 /प्र.क्र.158/नवि-33 दि.10 ऑगष्ट 2009 नुसार शासन परिपत्रक दिनांक 20/10/1993 मध्ये UIDSSMT योजनेअंतर्गत 10 टक्केपेक्षा जास्त दराने आलेल्या निविदा मंजूर करण्यास संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येत असल्याने याबाबत शासन परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे. मंजूर अंदाजपत्रकामधील रक्कमेपेक्षा कमाल 10 टक्क्याहून जास्त रक्कमेच्या निविदा आल्यास त्या का जास्त आहेत याचे काळजीपूर्वक बाबनिहाय परिक्षण (Rate Analysis) करणे आवश्यक आहे, तसेच फेर निविदा मागविण्यात गांभीर्याने विचार करणे इष्ट ठरते असे परिपत्रकामध्ये नमुद आहे. सदर परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 10 टक्क्याहून जादाची निविदा आल्याने नियमाप्रमाणे फेर निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतु फेरनिविदा न मागविता सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे DSR बरोबर तुलना करुन 8.57 टक्के जादा दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. निविदा उशिरा मागविणे, जादाची निविदा 10 टक्केपेक्षा कमीने दाखविण्यासाठी चालू दरसूचीबरोबर दरपृथ्थकरण करणे या अनियमिततेमुळे ठेकेदाराचा देकार रु.6,22,50,258 - रु.56033554, (2012-13 नुसार निविदेची किंमत) महानगरपालिकेचे रु.6216704/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

2), सार्वजनिक बांधकाम विभागाने अधिकार प्रदान करणे व निविदा मंजूरीबाबतचे परिपत्रक क्र.डी.पी.डब्ल्यु 1996/16 (ब)/ लेखापरीक्षा मंत्रालय दि. 20 सप्टेंबर 1997 ने निर्गमित केले आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता रु.25 लाख, अधिक्षक अभियंता रु. 1 कोटी 25 लाख, मुख्य अभियंता यांना निविदा मंजूरीचे पूर्ण अधिकार दिलेले आहेत. या परिपत्रकामधील 1(ब) मध्ये अधिक्यास मंजूरी देण्याचे अधिकार नमुद केले आहेत. त्यानुसार (निविदेतील अंदाजपत्रकाच्या चालू दरसूचीच्या अधारे येणा-या किंमतीवर) , कार्यकारी अभियंता -निरंक, अधिक्षक अभियंता- 5 टक्के रु. 25 लाख पर्यंतच्या निविदेसाठी, मुख्य अभियंता - 5 टक्के रु.125 लाख पर्यंतच्या निविदेसाठी अधिकार

DRAFT

देण्यात आलेले आहेत. तसेच ज्या ठिकाणी निविदेचे अधिक्य चालू दरसूचीच्या अधारे येणा-या सुधारीत किमतीच्या 5 टक्केहून जास्त नाही. परंतु प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेपेक्षा रु.10 लाखाने जास्त आहे, अशा प्रकरणामधील अधिक्यास शासनाकडून पूर्वमंजूरी घेण्यात यावी असे नमुद आहे. या कामाची निविदा चालू दरसूचीबरोबर(सन 2012-13) दरपृथ्थकरण करून चालू दरसूचीपेक्षा 8.57 टक्के जादाने मंजूर केली आहे. परंतु शासन निर्णयाप्रमाणे चालू दरसूचीच्या 5 टक्केपेक्षा जादाचे निविदादरास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेताच निविदा कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांचे स्तरावर मंजूर करण्यात आलेली आहे.

3) या योजनेमध्ये आयुक्त, सांगली यांनी सुचविलेल्या सुधारित कामांच्या तांत्रिक बदलांना मुख्य अभियंता, No.CE(Pune)/TB-3/SangliWSS/Tech.Deviation/C320/68 ,Dated 06/01/2011 यांचे पत्राने मान्यता देण्यात आली आहे. सदर पत्रामधील अट क्र.2 व अट क्र.3 नुसार योजनेतील सुधारित कामांची अंदाजपत्रके तयार करुन त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेणेत यावी असे नमुद केले आहे. या योजनेच्या सर्व कामांना तांत्रिक मान्यता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिली असल्याने सुधारित कामाच्या अंदाजपत्रकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असता तांत्रिक मान्यता न घेताच या कामांची निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

4) UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर. ला मान्यता दिलेनंतर राज्य शासनाच्या SLSC (State Level Sanctioning Committee) च्या 14 व्या मिटींगमध्ये या योजनेमधील सुधारित कामाच्या प्रस्तावाला दि.31/01/ 2012 रोजी खालील अटीस अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे. 1) मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी या योजनेच्या मुळ DPR मध्ये नमुद केलेल्या दरसूचीनुसार असलेली कामांची किंमत व सुधारित कामांना मान्यता दिल्यानंतर त्यावर्षीच्या दरसूची नुसार होणारी कामांची किंमत या मधील फरकाची रक्कम काढून द्यावयाची आहे. त्यानुसार SLNA(State Level Nodle Agency) कडून राज्य शासनाकडे महानगरपालिकेस वाढीव अनुदानासाठी प्रस्ताव पठविण्यात येणार आहे. या अटीप्रमाणे महानगरपालिकेने या बाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठविल्या बाबतची कागदपत्रे नस्तीमध्ये दिसून आलेली नाहीत तसेच DSR Difference ची रक्कम मिळविण्यासाठी काय कार्यवाही केली याची माहिती लेखापरीक्षणास देण्यात आलेली नाही.

5) या कामाचा कार्यादेश दि.09/05/2013 रोजी देण्यात आला असून कामाची मुदत 12 महिने आहे. पाणीपुरवठा विभागाने पत्र क्र./WWD/UIDSSMT/15/13-14 दि.24/05/2013 ने ठेकेदारास या कामाचा Bar Chart कार्यालयास सादर करणे व मान्य करुन घेणे बाबत कळविले आहे. त्यानुसार कामाचा बार चार्ट ठेकेदाराने दि.13/07/2013 रोजी सादर केला आहे. सदर बार चार्ट कार्यालयास बारनिशी नं.429 ने दि.02/08/2013 रोजी मिळाल्याची नोंद आहे. यावरुन बार चार्ट ठेकेदाराने तीन महिने विलंबाने सादर केला असल्याचे दिसुन येते. या कामामधील ऊंच पाण्याच्या टाकीच्या (ESR), (RCC Design & Drawings) Approve करणेबाबतचे पत्र पाणीपुरवठा विभागाने वालचंद कॉलेज

DRAFT

ऑफ इंजिनिअरींग,सांगली यांना दि.13/09/2013 रोजी पाठविले आहे व त्यानुसार कॉलेजने दि.19/09/2013 रोजी कामाचे Drawings Approve करुन दिली आहेत व त्याप्रमाणे ऊंच टाकीचे काम करणेबाबतचे पत्र क्र.WWD/Miraj/1409/13-14 दि. 23/09/2013 रोजी पाणीपुरवठा विभागाने ठेकेदारास दिले आहे. वर्क ऑर्डर दिल्यानंतर टाकीचे Design & Drawings Approve होणेस 05 महिन्याचा विलंब झाला आहे. या अनियमिततेमुळ काम पूर्ण होण्यास उशिर होणार असल्याचे स्पष्ट होते.

6) ठेकेदार रचना इंजिनिअर्सची सर्वात कमीची निविदा 14.95 टक्के जादा दराची असून ठेकेदारास दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलविले असता त्याने जादा दराबाबतचे पत्र दिले आहे. नस्ती मधील पृष्ठ क्र.347 वर जोडण्यात आलेल्या ठेकेदाराने दि. 22/03/2013 दिलेल्या पत्राची तपासणी केली असता त्यामध्ये Raft Foundation च्या कामासाठी एस्टिमेटमध्ये 7.5 लाख रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे. परंतु या कामाच्या वर्कींग डिझाईन नुसार या रक्कमेमध्ये काम करणे अशक्य आहे. याठिकाणी खुदाई 1700 घ.मी.,PCC - 82 CuM,RCC Raft 132CuM व Steel Reinforcement साठी 14 MT सळी लागणार असून यासाठी 24.71 लाखाचा खर्च अपेक्षित असल्याचे नमूद आहे. महाराष्ट्र बांधकाम नियमावली मधील परिच्छेद 141 (12) नुसार एखाद्या कामाचे तपशीलवार अंदाजपत्रक तयार करण्या अगोदर ज्या ठिकाणी काम करणार आहे त्या ठिकाणी चाचणीदाखल खड्डे खणून (ट्रायल पिट) जमीनीचा भुस्तर तपासून सदर जागा कामासाठी योग्य असलेबाबत तसेच पाया किती खोलीवर घेणे आवश्यक आहे ती खोली ठरविणे आवश्यक आहे. परंतु ट्रायल पिट न घेताच कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आल्याने कामाचा खर्च वाढला असल्याचे दिसून येते. ठेकेदाराने वाटाघाटीमध्ये सदर ठिकाणी राफ्ट फाऊंडेशन टाकावे लागणार असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार सदर जागेची पाहणी करुन ट्रायल पिट घेवून राफ्ट फाऊंडेशन टाकण्याची आवश्यकता तपासून त्यानुसार कामाचे पुरक अंदाजपत्रक तयार करण्याची जबाबदारी पाणीपुरवठा विभागाची असताना त्यांनी ठेकेदाराने वाटाघाटीमध्ये दिलेल्या माहितीनुसार जादा दराचे निविदेस मान्यता दिली आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली कलम 263 नुसार अधिक खर्च अंतर्भूत करणारा कुठलाही महत्वाचा फेरफार कामामध्ये करणे आवश्यक असेल तर या फेरफारासाठी सुधारित किंवा पूरक अंदाज तयार करुन एस्टिमेट मंजूरीसाठी सक्षम प्राधिका-याकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतु सुधारित अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिका-याची मंजूरी न घेताच जादा दराच्या निविदेस मंजूर दिली आहे.

या कामाच्या मोजमाप पुस्तक क्र.11,पृष्ठ क्र. 01 ते 09 वर या कामाच्या राफ्ट फाऊंडेशनसाठी लागणारी सळीची मापे नोंदविली आहेत. त्यानुसार या कामासाठी एकूण सळी 15.28 मेट्रीक टन लागली आहे. MJP DSR (2012-13), पृष्ठ क्र.46, बाब क्र.(8) (b) Providing and Fixing in Position Steel Reinforcement साठीचा दर रु.61996 /- प्रती मेट्रीक टन नमूद आहे. सळीचे एकूण परिमाण 15.28 मेट्रीक टन X रु.61996/- = रु.947298.88/- इतका खर्च झाला आहे. तसेच

DRAFT

राफ्टसाठी टाकलेल्या स्लॅबची मापे मोजमाप पुस्तक क्र.11 मधील पृष्ठ क्र.10 वर नोंदविण्यात आलेली आहेत. त्यानुसार एकूण स्लॅबचे काम 119.07 घ.मी.झालेले आहे. MJP DSR (2012-13), पृष्ठ क्र.42, बाब क्र.(2)(d) Providing ,Laying and Casting M300 For Raft Foundation साठीचा दर रु.6393 / प्रती घ.मी. आहे. त्यानुसार 119.07 घ.मी. X रु.6393.45 /- = रु.761268/- इतका खर्च झाला आहे. या राफ्टच्या कामासाठी एकूण रु.1708566.88/- खर्च झालेला आहे. महानगरपालिकेने या कामाचे पुरक अंदाजपत्रक न करताचा ठेकेदाराने दिलेल्या किंमतीनुसार या कामाची किंमत रु.24,71,000/- वाटाघाटीमध्ये मान्य करुन निविदा मंजुर केल्याने महानगरपालिकेचे ( रु.24,71,000 + अंदाजपत्रकामधील दर 7.50 लाख = रु.3221000 ) - रु. 1708566.88/- = रु.1512433 /- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

7) या कामाचे धावते देयक क्र.3 ची रक्कम रु.2544154/- ठेकेदारास प्रमाणक क्र.20, दि.15/02/ 2014 ने आदा केली आहे. या धावत्या देयकाबरोबर जोडण्यात आलेल्या Cement Consumption Statement मध्ये PCC M300 काँक्रीटचे काम 150 घ.मी. झाल्याची नोंद आहे. या कामामध्ये वापरलेल्या सिमेंट,वाळू, खडी व स्टिल योग्य गुणवत्तेचे असलेबाबतचा चाचणी अहवाल देयकासोबत जोडण्यात आलेला आहे. परंतु सिमेंट काँक्रीट M300 या विनिर्देशानुसार असलेबाबतचा शासकीय प्रयोगशाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल सोबत जोडलेला नाही. गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच देयक पारीत केलेने Subwork PCC ESR 15Lakh lit Item No.1 :- Design & Con.RCC ESR 15 Lakh Lit. साठी आदा केलेली रक्कम रु.616531/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

8) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2012-13 च्या विभागीय दरसूचीमधील जनरल नोट्स अ.क्र. 27 वर दरसूचीमध्ये 1 टक्के विम्याची तरतुद केली असल्याने ठेकेदाराच्या देयकामधून 1 टक्का विम्याची रक्कम कपात करुन शासकीय विमा निधीमध्ये भरणे आवश्यक आहे. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये या कामापोटी रु.19626875/- ठेकेदारास आदा केले आहेत. परंतु देयकामधुन 1 टक्का विमा कपात केला नसल्याने रु.196268/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

9) ठेकेदाराने वाटाघाटीने दर ठरविताना या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये labour amenities चा 1 टक्का दर धरला नसल्याने तो दर धरून जादा दराची निविदा भरली असल्याचे वाटाघाटीनंतर दिलेल्या पत्रामध्ये नमुद केले आहे. पाणीपुरवठा विभागाने दरपृथ्थकरण करताना 2012-13 च्या दरसूचीनुसार होणारी निविदा किंमत रु.56023554 /- वर 1 टक्का labour amenities व 1 टक्का कामगार कल्याण उपकर धरुन निविदा रक्कम रु.57144025/- येत असल्याचे नस्तीमध्ये नमूद केले आहे. As per Govt.Circuler No.DSR-1089/CR-6453/PLN-3,Dt.14/07/1993, 1% for labour amenities is not considered in the DSR except concrete item while arriving the rates. या निविदेमध्ये RCC काँक्रीट उंच टाकीच्या कामाची किंमत रु.10275530/- इतकी धरण्यात आलेली असून शासन निर्णयाप्रमाणे सदर काम काँक्रीटचे असल्याने या रक्कमेवर 1 टक्का labour amenities आकारता येत नसतानाही दरपृथ्थकरणात या बाबीवरील रक्कम धरुन ठेकेदारास आदा

DRAFT

केल्याने रक्कम रु.102755/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

10) MJP, DSR 2012-13 ,General Notes मधील अ.क्र.22 नुसार Pipes,Specials,Valves वर आकारण्यात येणा-या जकातीचा समावेश DSR मध्ये केला नसल्याने एस्टिमेट तयार करताना 4 टक्के ऑक्ट्रॉयचा समावेश या बाबींचे दरात करुन दर अंतिम करणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने 4 टक्के ऑक्ट्रॉयचा समावेश करुन या बाबींचे दर अंतिम केले आहेत. परंतु देयकाची तपासणी केली असता या बाबीवरची जकात भरलेच्या पावत्या देयकाबरोबर लावल्या नसल्याने ठेकेदाराच्या देयकामधून 4 टक्केप्रमाणे जकात कपात करणे आवश्यक आहे. या कामाच्या प्रमाणक क्र.10, 19, व 22 मधुन Supplying pipes & CI/DF Valves या बाबी करीता ठेकेदारास रु.10785531/- आदा केले आहेत. या बाबीवरील 4 टक्केपर्यंत येणारी जकातीची रक्कम रु.431421/- इतकी होत आहे. ठेकेदाराने स्थानिक संस्था करापोटी महानगरपालिच्या.युनियन बँक सांगलीच्या 424202010502707 या खात्यावर दि.24/10/2013 रोजी रु.155626/- रक्कम भरली आहे. परंतु दरपृथ्थकरणाने 4 टक्के प्रमाणे जकातीची रक्कम धरुन दर ठरविण्यात आल्यामुळे रु. 431421- रु.155626 = रक्कम रु.275800/- ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

11)या कामाचे धावते देयक क्र. 2 व 4 ची तपासणी केली असता, देयकासोबत Cement Consumption Statement जोडले आहे. त्यानुसार RCC M300 चे काम 95.55Cum झाले असून त्यासाठी 9.20 बॅग्ज सिमेंट प्रती घ.मी. लागले आहे. याकामासाठी वाळू 31.85 घ.मी. व खडी 63.70 घ.मी.लागली आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी भरल्याच्या पावत्या लेखापरीक्षणास दाखविल्या नसल्याने 95.55 घ.मी. X रु. 70.67/घ.मी प्रमाणे रु.6752/- ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावेत.

12) 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये ठेकेदारास रु.19626875/- आदा केले आहेत. सर्व रक्कम केंद्रशासनाकडून आलेल्या अनुदानामधूनच आदा केली आहे. Govt of India , Ministry of Urban Development यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे व त्यामध्ये या कामाचा समावेश केलेला आहे. सदर सुधारीत मान्यता देताना या कामासाठी केंद्र शासनाकडून कोणतेही अनुदान मिळणार नसून या कामाचा खर्च राज्य शासन व महानगर पालिका यांनी त्यांचे निधीतून करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहे. शासनाने सन 2005-06 चे दरसूचीनुसार तयार केलेल्या निविदा किंमतीस डी.पी.आर.मध्ये मान्यता दिली आहे. मंजुर डी.पी.आर नुसार या कामाची किंमत रु.288.19 लक्ष असून केंद्र व राज्य शासनाकडून 90 टक्के प्रमाणे रु.259.37/- लाख अनुदान शासना कडून प्राप्त झाले आहे. या कामाची मंजूर निविदा किंमत रु.622 लक्ष इतकी असल्याने व शासनाकडून रक्कम रु.259.37 लाख अनुदान या कामासाठी प्राप्त झाल्याने उर्वरित रक्कम रु.362.62 लाख रक्कम महानगरपालिकेच्या स्वनिधी मधून खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदारास कामाची देयके प्रदान करताना 41.69 टक्के रक्कम शासननिधीमधून व 58.30

DRAFT

टक्के रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च करणे आवश्यक होते. महानगरपालिकेने ठेकेदारास आर्थिक वर्ष 2013 -14 मध्ये रु.19626875/- आदा केले आहेत. अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 41.69 टक्के प्रमाणे रु.8182444/- व 58.30 टक्क्याप्रमाणे रु.11444431/- स्वनिधीमधून खर्च करणे आवश्यक असता सर्व रक्कम शासननिधीमधून खर्च करण्यात आली आहे या वित्तिय अनियमिततेमुळे या योजनेअंतर्गत करण्यात येणा-या या कामास तसेच अन्य कामांना निधी कमी पडून योजनेची प्रगती रखडणार असून निधी अभावी कामे अपूर्ण राहणार असल्याचे स्पष्ट होते. रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च का करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र. 83, दि.15/03/2016 ने मागणी करुन ही पाणीपुरवठा विभागाने दिलेला नाही.

12)या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता आक्टो.2015 पर्यंत या कामाची रु. 120 लक्ष रक्कमेची देयके दि.13/02/2014 पासून फेब्रु 2016 पर्यंत प्रलंबित असून उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी अंदाजे रु.225 लक्ष रक्कमेची आवश्यकता असल्याचे तसेच सदर काम प्रगतीत असून एकूण सरासरी 75 टक्के काम पूर्ण झाले असल्याचे नस्तीमध्ये नमूद आहे. नस्तीमधील प्री बीड मिटींगचे प्रोसिडींगमध्ये ठेकेदाराने मुद्दा क्र.3 ने या कामासाठी महानगरपालिकेकडे निधी आहे का असा मुद्दा उपस्थितीत केला होता व त्यावर या कामासाठी महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध असल्याचे Clarification महानगरपालिकेने दिले आहे. परंतु ठेकेदाराची देयके महानगरपालिकेने निधी अभावी प्रलंबित ठेवल्याचे दिसून येते. ठेकेदारास महानगरपालिकेने या योजनेतील कामाची देयके शासन व मनपा निधीमधून ठरलेल्या टक्केवारीनुसार न देता प्रथम उपलब्ध असलेल्या शासन निधीमधून दिल्याने व सदर निधीमधील रक्कम संपल्याने व महानगरपालिकेने स्वनिधीमधून या कामासाठी निधी उपलब्ध न केल्याने, आर्थिक वर्ष 2013 पासून ठेकेदाराच्या झालेल्या कामाची देयके दिली नसल्याने ठेकेदाराकडून कामाची गती योग्यरितीने राखली जात नसल्याचे कामास विलंब लागत असल्याचे दिसून येते. स्वनिधीमधून ठेकेदारास रक्कम का देण्यात आलेली नाही याचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र. 83 दि.15/03/2016 ने मागणी करुन ही पाणीपुरवठा विभागाने दिलेला नाही.

13)या कामाची पात्र व अपात्र ठेकेदाराची यादी पाहता मे. ए.ई.इन्फ्रा प्रोजेक्ट या ठेकेदारास अपात्र केले असून पात्र अपात्र ठेकेदारांची यादी वेबसाईटवर आयुक्त यांचे मंजूरीने दि.28/01/2013 रोजी प्रसिध्द केलेचे पाणीपुरवठा विभागाचे दि.01/03/2013 चे टिपणीमध्ये नमूद केले आहे. परंतु सदर ठेकेदारांना का अपात्र केले आहे त्याची कारणे व अपात्रते बाबतची कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून आलेली नाहीत. एकाच दिवशी एकाच निवेदेने मागविलेल्या या योजनेतील माळबंगला येथे 25 लाख लिटरची टाकी बांधणे व वितरण नलिका टाकणे या कामाची तपासणी केली असता मे.ए.ई.इन्फ्रा प्रोजेक्ट ही पात्र कंपनी सर्वात कमीची निविदादार असल्याने त्यांना हे काम पाणीपुरवठा विभागाने दिले आहे. 15 लाख लिटर क्षमतेची टाकी बांधणे,वितरण व्यवस्था करणे या कमी क्षमतेच्या टाकीचे निविदा प्रक्रीयेमध्ये मे.ए.ई. इन्फ्रा प्रोजेक्ट ही कंपनी अपात्र ठरते व जास्त क्षमतेची 25 लाख लिटरची ऊंच पाण्याची टाकी

DRAFT

बांधणे व वितरण व्यवस्था टाकणे या कामासाठी सदर कंपनी पात्र ठरुन त्यांची निविदा मान्य ठरते यामध्ये विरोधाभास वाटत आहे. सदर कंपनीस अपात्र का ठरविण्यात आले याची माहिती व वेबसाईटवर टाकण्यात आलेली पात्र /अपात्र ठेकेदारांची यादीची प्रमाणित प्रत लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

**वसुलपात्र रक्कम** :- Trail Pit न घेता Raft Foundation साठी ठेकेदाराच्या मागणीनुसार दरपृथ:करणामध्ये धरण्यात आलेली रक्कम परंतु प्रत्यक्षात कमी रक्कमेमध्ये काम झाल्याने ठेकेदारास आदा केलेली जादाची रक्कम रु.1512433/- + देयकामधुन कपात न केलेली विमा रक्कम रु.196268/- + Labour Amenities पोटी दरपृथ:करणामध्ये धरलेली कॉंक्रीट कामाची जादा धरण्यात आलेली रक्कम रु.102755/- + मालाची जकात न भरणा केलेली रक्कम रु.275800/- + रॉयल्टी रक्कम रु.6752/- = रु.2094008/-

**आक्षेपाधिन रक्कम :-** 300MM कॉंक्रीटचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच आदा केलेली रक्कम रु.616531/-

DATSBKM7201 (Ref No : 83)

## ***74 माळबंगला येथे 25 लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ,वसंत कॉलनी,काळी खण ESR झोन येथे वितरण व्यवस्था व कंपौंड वॉल बांधणे या कामामधील अनियमिततेबाबत.***

**UIDSSMT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 14**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनि: सा केंद्र,राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1346463.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2371874.00/-

***UIDSSMT योजने अंतर्गत सांगलीवाडी येथे 15 लाख लिटर क्षमतेची ऊंच टाकी बांधणे व वितरण नलिका टाकणे हे काम महानगरपालिकेने 2012-13 मजिप्रा दरसूचीवर 7.05 टक्के जादा दराने मंजुर केले आहे. परंतु माळबंगला येथील ऊंच टाकी बांधणे व वितरणनलिका टाकणे या अन्य एका कामाची निविदा 9.65 टक्के जादा दराने मंजुर केली आहे. सदर दोन्ही कामे एकाच टेंडरने मागविण्यात आली असुन दोन्ही कामाचे स्वरुप सारखेच आहे. परंतु ठेकेदाराने वाटाघाटीमध्ये दर कमी न केल्याने व महानगरपालिकेने जादा दराने निविदा मंजुर करताना त्या जादा दराने का आल्या आहेत याचे दरपृथ: करण केलेले नाही. तसेच सांगलवाडी येथील ऊंच टाकीचे आलेल्या दराशी तुलना करुन ठेकेदाराबरोबर दर कमी करण्यासाठी वाटाघाटी न केल्याने व सांगलवाडीचे कामाच्या दरापेक्षा 2.05 टक्के जादा दराने निविदा मंजुर केल्याने महानगरपालिकेचे (2012-13 चे दरसुचीनुसार निविदेची किंमत रु.61980712 X 2.05 टक्के) प्रमाणे रु.1270604/- चे आर्थिक नुकसान झाले***

***आहे. कामाची आर.सी.सी. रेखांकने व नकाशे तांत्रिक संस्थेकडून मंजूर करून घेण्यात आलेली नाहीत. देयकामधुन विमा,रॉयल्टी,जकातीची रक्कम कपात करुन घेतलेली नसल्याने रु.2371874/- चे ठेकेदारास अतिप्रदान झाले आहे.***

केंद्रशासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचा पायाभुत विकास कार्यक्रमांतर्गत रु. 79.02 कोटी किमतीच्या विषयांकीत योजनेला केंद्रशासनाकडून माहे सप्टे.2006 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार केंद्रशासनाचा हिस्सा रु.63.22 कोटी (80 टक्के), राज्य शासनाचा हिस्सा रु.7.90 कोटी (10 टक्के), मनपा हिस्सा 7.90 कोटी (10 टक्के) असा आहे. या मंजुर योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन दि.11/03/2008 रोजी रु.14.78 कोटी, दि.11/06/2010 रोजी रु.20.62 कोटी व दि.21/07/2012 रोजी रु.35.56 कोटी असा एकूण निधी रु.70.96 कोटी इतका निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे. यापैकी महानगरपालिकेने रु.14.78 कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केला आहे व या रक्कमेतुन पुर्ण ठेव तत्वावर अधारित मंजुर योजनेतील कुपवाड झोनसाठीच्या गट क्र.1 मधील कामे झालेली आहेत. तसेच महानगरपालिकेने अन्य कामासाठी दोन पॅकेज तयार केली असुन त्याची किंमत रु.60.56 कोटी इतकी होत आहे. यामध्ये उंच टाक्या बांधणे, गुरुत्वनलिका व वितरण व्यवस्थेसाठी पाईप लाईन पुरविणे,त्यासाठी खुदाई करणे, जोडणे, चाचणी देणे ,पंपीग मशिनरी पुरविणे, बसविणे व चाचणी देणे व माळबंगला येथे 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाचा समावेश आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणयांचे पत्र क्र.6 ने दि.06/01/2011 रोजी योजनेच्या तांत्रिक बदलास मान्यता दिली आहे. या योजनेस तांत्रिक मान्यता देत असताना मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदरचे काम हाती घेण्यापुर्वी कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास मंजुरी घेणेबाबत अट घातली आहे.

या कामाची नस्तीची तपासणी केली असता, पाणीपुरवठा विभागाने दि.23/10/2012 रोजी लिहिलेल्या टिपणीमध्ये (पृष्ठ क्र.टी -1 ), सांगली शहरात 15 लक्ष लिटरच्या 4 व 25 लक्ष लिटर क्षमतेची 1 अशा एकूण 5 टाक्या बांधणे व 105 कि.मी लांबीची वितरण नलिका टाकणे व उंच टाकी भोवती कंपाऊंड वॉल बांधणे (2.88 + 11.46 + 0.62= 14.96 कोटी ) या कामांचा समावेश व तरतुद मूळ मंजूर योजनेमध्ये नसल्याने या कामासाठी सुधारित अंदाजपत्रके व आराखडे तयार करुन या तांत्रिक बदलास महासभा ठराव क्र.193 दि.10/01/ 2011 ने मान्यता घेतल्याचे नमूद आहे. सदर तांत्रिक बदलाचे प्रस्ताव केंद्रशासना कडील Ministry Of Urban Development Dept. कडील CPHEEO ने 23/11/2011 रोजीच्या बैठकीमध्ये मान्य करुन SLSC महाराष्ट्र शासनाकडे पाठविले होते. सदर प्रस्ताव SLSC (State Level Sanction Commitee) च्या दि.31/01/2012 च्या बैठकीमध्ये मान्य करण्यात आले आहेत. सांगली शहरासाठी सन 2025 चे मागणीनुसार उंच टाक्यासाठी व वितरण व्यवस्थेसाठी तरतुद नव्हती. सबब तांत्रिक बदलाच्या प्रस्तावामध्ये या कामासाठी ढोबळ तरतुद

DRAFT

करण्यात आली आहे. मार्च 2012 मध्ये तांत्रिक बदलास मान्यता मिळाल्यानंतर वितरण व्यवस्थेसाठी सर्व्हेक्षण करण्याचे काम हाती घेवून सांगलीवाडी, कोल्हापूर रोड व शामराव नगर उंच टाकीच्या कमांड एरियाचे सर्व्हेक्षण पूर्ण करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. UIDSSMT योजनेचे काम पूर्ण करण्याची मुदत मार्च 2014 पर्यंत असल्याने सर्वेक्षण पुर्ण झालेल्या कामांची निविदा काढणे आवश्यक आहे.

Govt. of India ,Ministry of Urban Development , Encloser to Note No. Q12045 /15/ 2/ UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे. त्यानुसार योजनेची सुधारित appraised cost रु.14597.05 लाख यास मान्यता दिली आहे. योजनेची मुळ किंमत रु.7902/- लाख व सुधारित किंमत रु.14597.05 लाख या मधील फरक रक्कम रु.6695/- लाख रक्कमेची तरतुद राज्यशासन व महानगरपालिका यांनी स्वनिधीमधुन करण्याबाबत नमुद आहे.

सदरची मुळ मंजुर योजना 2005-06 सालच्या दरसूचीवर आधारित असून प्रस्तावित कामाची मंजुर किंमत रु.33548462/- आहे. मालबंगला येथे 25 लाख लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे, वितरण व्यवस्था टाकणे व कंपौंड वॉल बांधणे या कामाची निविदा किंमत रु.58089345 /- (सन 2011 -12 च्या मजिप्रा दरसूचीनुसार) असून ई निविदा नोटीस क्र.12/4 ने ई निविदा मागविणेची जाहिरात दै.सकाळ व दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.16/01/2013 व दि.17/01/2013 रोजी प्रसिध्द करण्यात आली. जाहिर निविदा प्रक्रीयेनुसार ठेकेदाराकडून prequalification साठी अर्ज मागविले होते. याबाबत पात्र व अपात्र ठेकेदारांची यादी वेबसाईटवर आयुक्त यांचे मंजुरीने दि. 28/01/2013 ने टाकण्यात आली. यापैकी पात्र निविदाधारक मे.एस.व्ही.जाधव,मिरज, रचना इंजिनिअर्स,कोल्हापूर , श्री. विजय साळुंखे, पुणे ,लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग कोल्हापूर,ए.ई.इन्फ्रा प्रोजेक्ट या ठेकेदारांनी निविदा विकत घेवून दि.05/2/2013 च्या निविदा पुर्व बैठक व खुलासे यानंतर निविदा भरुन सादर केल्या आहेत.

निविदा प्रक्रीयेनुसार या ठेकेदारांचा प्रथम तांत्रिक लखोटा दि.14/2/2013 रोजी उघडण्यात आला असून 4 ही ठेकेदारांची कागदपत्रे बरोबर असल्याने दराचा लखोटा दि.16/02/2013 रोजी उघडण्यात आला आहे. त्यानुसार मे.ए.ई.इन्फ्रा प्रोजेक्ट,ठाणे, (17.5 टक्के जादाने) रचना इंजिनिअर्स,कोल्हापूर (19.85 टक्के जादाने), लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग कोल्हापूर, (19.4टक्के जादाने), श्री.विजय साळुंखे, पुणे (18.6 टक्के जादाने), मे.एस.व्ही.जाधव,मिरज(19 टक्के जादाने) निविदा भरल्या आहेत.

या कामाची निविदा किंमत सन 2011-12 च्या दरसूचीनुसार रु.58089345 /- इतकी असून मे.ए.ई.इन्फ्रा प्रोजेक्ट,ठाणे, यांचा सर्वात कमीचा देकार 17.5 टक्के जादाने म्हणजेच रु.68254980.37/- आहे. प्राप्त दर जादाचे असल्याने आयुक्त यांचे आदेशानुसार दर कमी करण्यासाठी आयुक्त यांचे आदेशाने ठेकेदारास दर कमी करण्यासाठी दि.21/03/2013 रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार दि.22/03/2013 रोजी ठेकेदाराने दिलेल्या पत्रामध्ये

DRAFT

भाववाढीची खालील कारणे नमूद केली आहेत. 1) बाजारात वाळू व खडीचे दर वाढले आहेत. 2) मजुरीचे दरही वाढले आहेत. त्यामुळे ठेकेदाराने पुर्वी देवू केलेला 17.50 टक्के जादाचा दर 0.5 टक्के कमी करुन निविदादरापेक्षा 17 टक्के जादा दराने काम करणेची तयारी दर्शविली आहे. या कामाचे पाणीपुरवठा विभागाने दरपृथ:करण केले असुन (नस्तीमधील पृष्ठ क्र. टी- 23) सन 2011-12 च्या दरसूचीनुसार निविदा किंमत रु.58069345/- असून , ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनंतर निविदादरापेक्षा 17 टक्के जादाने दराने काम मंजूर केलेनंतर कामाची किंमत रु.67964533/- इतकी होत आहे. सन 2012-13 चे दरसूचीनुसार ठेकेदाराचा सुधारित देकार 67964533 - 61980712/- (2012-13 चे दरसूची नुसार किंमत ) % 61980712 X 100 = 9.65 टक्के जादा दराने निविदा मंजूर केलेली आहे.

कार्यकारी अभियंता यांनी या योजनेचा मिशन कालावधी मार्च 2014 पर्यंत असल्याने व सदरचे काम एक वर्ष मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने देवू केलेला दर योग्य असल्याने सन 2012-13 च्या दरसूचीवर 9.65 टक्के जादा दराने निविदा मंजूर करण्याची शिफारस केली आहे व त्याप्रमाणे आयुक्त यांनी निविदा दि.01/04/2013 रोजी मंजूर केली आहे.

महासभेची मंजुरी :- उपायुक्त (पाणीपुरवठा विभाग) यांचे दि.02/04/2013 चे विषयपत्रानुसार ठेवण्यात आलेला 9.65 टक्के जादा दराच्या निविदेस महासभा क्र.विशेष सभा 01,ठराव क्र.04,विषय क्र.04,दि.06/04/2013 ने मंजुरी देण्यात आली आहे.

कामाची समज :- कार्यकारी अभियंता पत्र क्र.मनपा/पापुवि/सां/25/2013-14 दि.09/04/2013 ने कामाची समज देण्यात आली असुन या कामाचे रु.61500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क ठेकेदाराने दि.12/04/2013 रोजी E Stamp ने भरणा केले असून कामाचा करारनामा महानगरपालिकेचे सिल लावून दि.02/05/2013 रोजी करण्यात आला आहे.(नस्तीमधील पृष्ठ क्र.519)

कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.17,00,000/- ठेकेदाराने पंजाब नॅशनल बँक, BG N0.1144ILG010513, बँक गॅरेंटीच्या स्वरुपात दि.12/04/2013 रोजी महानगरपालिकेस दिलेली आहे. .(पृष्ठ क्र.531) ,बँक गॅरेंटीची मुदत एक वर्ष(12/04/2014अखेर)

कामाचे करारनामा रु.67100/- चे मुद्रांक शुल्क शासनाकडे भरणा करुन दि.06/05/2013 रोजी महानगरपालिकेची मुद्रा लावून केला आहे.

कामाचा कार्यादेश :- क्र.मनपा/पापुवि/सां/115/2013-14 दि.11/05/2013 या पत्राने कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारास कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे.(पृष्ठ क्र.625)

कामाची मुदत :- 12 महिने दि. 09/05/2014 पर्यंत (पावसाळ्यासहित)

कामास प्रथम मुदतवाढीचा अर्ज ठेकेदाराने दि.07/01/2015 रोजी केला आहे. शाखा अभियंता यांनी मुदतवाढीची टिपणी दि.21/01/2015 रोजी वरीष्ठाकडे सादर केली आहे. उपायुक्त यांनी मुदतवाढीची नस्ती सादर करण्यास विलंब का झाला असा आक्षेप लावून टिपणी पाणीपुरवठा विभागाकडे दि.20/11/2015 रोजी परत पाठविली आहे. या बाबत पाणीपुरवठा विभागाने मार्च 2016 पर्यंत

कोणतीही कार्यवाही केलेली नाही.त्यामुळे मुदतवाढ प्रस्ताव प्रलंबित आहे.

2013-14 या आर्थिक वर्षात ठेकेदारास खालील प्रमाणे रक्कम आदा केली आहे.

| धावते देयक क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रु. | मोजमाप पुस्तिका क्र. | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 08 | 17/09/2013 | 12614377 | 31A | 02 ते 10 |
| 02 | 14 | 21/10/2013 | 9640221 | 31A | 10 ते 28 |
| 03 | 23 | 15/02/2014 | 4241965 | 31A | 29 ते 38 |
| 04 | 24 | 15/02/2014 | 3673133 | 31 | 39 ते 70 |
| | | एकूण | 30169696 | | |

या कामाची नस्ती, देयके, प्रमाणके व मोजमाप पुस्तकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.84 दि.15/03/2015 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) UIDSSMT/08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे. तसेच राज्य शासनाच्या SLSC(State Level Sanctioning Committee) च्या 14 व्या मिटींगमध्ये या योजनेमधील सुधारित कामांना दि.31/01/2012 रोजी मान्यता दिली आहे. शासनाची योजनेस मान्यता झाले नंतर या कामांचे टेंडर काढण्याच्या नस्तीची सुरुवात पाणीपुरवठा विभागाने दि.23/10/2012 रोजी म्हणजे 9 महिने विलंबाने केली असून कामाची वर्क ऑर्डर दि.11/05/2013 रोजी देण्यात आली आहे. या सर्व कार्यवाहीमध्ये सुमारे दिड वर्षाचा अवधी गेला आहे. या कामाची निविदा सन 2011-12 या आर्थिक वर्षाचे मजिप्राचे DSR प्रमाणे मागविण्यात आली असून ठेकेदाराबरोबर वाटाघाटीने 17 टक्के जादाने मंजुर केली आहे. सदर निविदा कामाचे दरपृथ्थकरण पुन्हा 2012-13 या आर्थिक वर्षाचे DSR बरोबर करुन ठेकेदाराची 9.65 टक्के जादा दराची निविदा मंजुर करण्यात आली आहे. सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दि.31/01/2012 रोजी मिळाल्यानंतर कामाच्या निविदेची कार्यवाही पाणीपुरवठा विभागाने तत्परतेने करणे आवश्यक होते. परंतु निविदा मागविणे व मंजूर करणेची कार्यवाही विलंबाने केलेने काम 17 टक्के जादाने आले आहे. नस्तीमध्ये (पृष्ठ क्र.501) वर UIDSSMT योजने अंतर्गत प्राप्त जादा दराच्या निविदा स्विकारण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेचे नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक: युआयडी-2009 /प्र.क्र.158/नवि-33 दि.10 ऑगष्ट 2009 जोडण्यात आले आहे. या परिपत्रकामध्ये शासन परिपत्रक दिनांक 20/10/1993 चा संदर्भ देण्यात आला असून त्यानुसार UIDSSMT योजनेअंतर्गत प्राप्त निविदा 10 टक्केपेक्षा जास्त दराने आल्यास निविदा मंजूर करण्यास संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येत असल्याने याबाबत शासन परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे. मंजूर अंदाजपत्रका मधील रक्कमे पेक्षा कमाल 10 टक्क्याहून जास्त रक्कमेच्या निविदा आल्यास त्या का जास्त आहेत याचे काळजीपूर्वक बाबनिहाय परिक्षण

DRAFT

(Rate Analysis) करणे आवश्यक आहे, तसेच फेर निविदा मागविण्याबाबत गांभीर्याने विचार करणे इष्ट ठरते असे परिपत्रकामध्ये नमुद आहे. सदर परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे 10 टक्केपेक्षा जादाची निविदा आल्याने नियमाप्रमाणे फेर निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतु फेरनिविदा न मागविता सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे DSR बरोबर तुलना करुन 9.65 टक्के जादा दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. निविदा उशिरा मागविणे, जादाची निविदा 10 टक्केपेक्षा कमीने दाखविण्यासाठी चालू दरसूचीबरोबर दरपृथ्थकरण करुन 10 टक्केपेक्षा कमीने दाखविणे या अनियमिततेमुळे ठेकेदाराचा देकार रु.67964533 - रु.61980712, (2012-13 नुसार निविदेची किंमत) महानगरपालिकेचे रु.5983812/-चे आर्थिक नुकसान झाले आहे.

2)UIDSSMT योजनेअंतर्गत सांगलीवाडी येथे 15 लाख लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे व वितरण नलिका टाकणे हे काम महानगरपालिकेने 2012-13 च्या दरसूचीवर 7.05 टक्के जादा दराने मंजूर केले आहे. सदर दोन्ही कामे एकाच टेंडरने मागविण्यात आली आहेत. दोन्ही कामे एकाच प्रकारची आहेत. परंतु माळबंगला येथील उंच टाकीचे निविदा मंजूर करताना 9.65 टक्के जादा दराने मंजूर केल्याने 9.65 टक्के - 7.05 टक्के = 2.05 टक्के आर्थिक नुकसान झाले आहे. (2012-13 चे दरसुचीनुसार निविदेची किंमत रु.61980712X 2.05 टक्के ) प्रमाणे रु.1270604/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच जादा दराने निविदा मंजूर करताना त्या का जास्त आल्या आहेत या बाबत नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक: युआयडी-2009 /प्र.क्र.158/नवि-33 दि.10 ऑगष्ट 2009 नुसार बाबनिहाय परिक्षण (Rate Analysis) करणे आवश्यक असतानाही पाणीपुरवठा विभागाने दरपृथ्थकरण न करताच जादा दराची निविदा मंजूर केली आहे.

3) सार्वजनिक बांधकाम विभागाने अधिकार प्रदान करणे व निविदा मंजूरीबाबतचे परिपत्रक क्र.डी.पी डब्ल्यु 1996/16 (ब)/ लेखापरीक्षा मंत्रालय दि. 20 सप्टेंबर 1997 ने निर्गमित केले आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता रु.25 लाख, अधिक्षक अभियंता रु. 1 कोटी 25 लाख, मुख्य अभियंता यांना निविदा मंजूरीचे पूर्ण अधिकार दिलेले आहेत. या परिपत्रकामधील 1(ब) मध्ये अधिक्यास मंजूरी देण्याचे अधिकार नमुद केले आहेत. त्यानुसार (निविदेतील अंदाजपत्रकाच्या चालू दरसूचीच्या अधारे येणा-या किंमतीवर) , कार्यकारी अभियंता -निरंक, अधिक्षक अभियंता- 5 टक्के रु. 25 लाख पर्यंतच्या निविदेसाठी, मुख्य अभियंता - 5 टक्के रु.125 लाख पर्यंतच्या निविदेसाठी अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच ज्या ठिकाणी निविदेचे अधिक्य चालू दरसूचीच्या अधारे येणा-या सुधारीत किमतीच्या 5 टक्केहून जास्त नाही. परंतु प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेपेक्षा रु.10 लाखाने जास्त आहे, अशा प्रकरणामधील अधिक्यास शासनाकडून पूर्वमंजूरी घेण्यात यावी असे नमुद आहे. या कामाची निविदा चालू दरसूचीबरोबर (सन 2012-13) दरपृथ्थकरण करून चालू दरसूचीपेक्षा 9.65 टक्के जादाने मंजूर केली आहे. या योजनेसाठी 90 टक्के रक्कम शासनाकडून प्राप्त झाली आहे. परंतु शासन निर्णयाप्रमाणे चालू दरसूचीच्या 5 टक्केपेक्षा जादाचे निविदादरास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेताच निविदा कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांचे स्तरावर मंजूर करण्यात

DRAFT

आलेली आहे. या अनियमिततेबाबत खुलासा पाणीपुरवठा विभागाने अर्धसमास ज्ञापन क्र.84 दि.15/03/2015 ने मागणी करुन दिलेला नाही.

4) या योजनेमध्ये आयुक्त, सांगली यांनी सुचविलेल्या सुधारित कामांच्या तांत्रिक बदलांना मुख्य अभियंता, No.CE(Pune)/TB-3/SangliWSS/Tech.Deviation/C320/68 ,Dated 06/01/2011 यांचे पत्राने मान्यता देण्यात आली आहे. सदर पत्रामधील अट क्र.2 व अट क्र.3 नुसार योजनेतील सुधारित कामांची अंदाजपत्रके तयार करुन त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेणेत यावी असे नमुद केले आहे. या योजनेच्या सर्व कामांना तांत्रिक मान्यता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिली असल्याने सुधारित कामाच्या अंदाजपत्रकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असता मान्यता न घेताच या कामांची निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

5) UIDSSMT/08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिलेनंतर राज्य शासनाच्या SLSC (State Level Sanctioning Committee) च्या 14 व्या मिटींगमध्ये या योजनेमधील सुधारित कामाच्या प्रस्तावाला दि.31/01/2012 रोजी खालील अटीस अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे. 1) मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी या योजनेच्या मुळ DPR मध्ये नमुद केलेल्या दरसूचीनुसार असलेली कामांची किंमत व सुधारित कामांना मान्यता दिल्यानंतर त्यावर्षीच्या दरसूची नुसार होणारी कामांची किंमत या मधील फरकाची रक्कम काढून द्यावयाची आहे. त्यानुसार SLNA(State Level Nodle Agency) कडून राज्य शासनाकडे महानगरपालिकेस वाढीव अनुदानासाठी प्रस्ताव पठविण्यात येणार आहे. या अटी प्रमाणे महानगरपालिकेने या बाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठविल्या बाबतची कागदपत्रे नस्तीमध्ये दिसून आलेली नाहीत. DSR Difference ची रक्कम मिळविण्यासाठी काय कार्यवाही केली याची माहिती लेखापरीक्षणास देण्यात आलेली नाही.

6) या कामाच्या बीड डॉक्यूमेंट VOLUME I & II ची तपासणी केली असता पृष्ठ क्र.68 वर कामाबाबत Supplementary Conditions दिल्या आहेत. त्यामधील अट क्र.1 नुसार ठेकेदाराने काम दिलेल्या मुदतीत करण्यासाठी कामाचा बार चार्ट देणे आवश्यक आहे. परंतु नस्तीमध्ये कामाचा बार चार्ट दिसून आलेला नाही. कामाची मुदत 12 महिन्याची असल्याने बार चार्ट प्रमाणे काम करुन घेणे आवश्यक असता तो न घेताच काम सुरू करण्यात आलेने कामाच्या प्रगतीवर नियंत्रण ठेवणे आडचणीचे ठरणार असल्याचे दिसून येते.

7)UIDSSMT च्या अन्य ऊंच पाण्याच्या टाकीचे (ESR), RCC Design & Drawings पाणीपुरवठा विभागाने वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग कडून approve करुन घेतली आहेत व त्यानुसार काम करण्याचे आदेश ठेकेदारास दिलेले आहेत. परंतु या कामाच्या उंच टाकीचे Drawings Approve करुन घेतल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये दिसून येत नसल्याने काम कामाच्या तांत्रिक बाबीची खात्री करता आलेली नाही.

8) या कामाचे प्रथम धावते देयकाची तपासणी केली असता, या धावत्या देयकाबरोबर Cement

DRAFT

Consumption Statement जोडण्यात आले आहे. त्यामध्ये PCC M200 कॉंक्रीटचे काम 34.08 घ.मी. झाल्याची नोंद आहे (मोजमाप पुस्तक क्र.31A ,पृष्ठ क्र.18). या कामासाठी एकूण वाळू 12.39 घ.मी. व खडी 24.78 घ.मी.वापरण्यात आली आहे. तसेच या कामाच्या दुस-या धावत्या देयकाची तपासणी केली असता Casting of footing M300 चे काम 85.35 घ.मी.झाल्याची नोंद आहे (मोजमाप पुस्तक क्र.31A ,पृष्ठ क्र.18). या कामासाठी वाळू 51.75 घ.मी. व खडी 73.6 घ.मी. वापरली आहे. या कामामध्ये एकूण गौण खनिज 162.52 घ.मी. वापरले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी भरल्याच्या पावत्या लेखापरीक्षणास दाखविल्या नसल्याने 162.52 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.11485/- रॉयल्टी वसूल करणे आवश्यक आहे..

9) या कामाच्या बीड डॉक्यूमेंट VOLUME I & II ची तपासणी केली असता पृष्ठ क्र.88 वर कामासाठी वापरण्यात येणा-या सिमेंट,वाळू, खडी , स्टिल व कॉंक्रीट योग्य दर्जाचे असल्याबाबतचा शासकीय प्रयोगशाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल सोबत जोडलेला नाही. गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच देयक पारीत केलेने Subwork 1 RCC ESR 25Lakh lit Item No.1 :- Design & Con.RCC ESR 25 Lakh Lit. साठी आदा केलेली रक्कम रु.1346463/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

10) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2012-13 च्या विभागीय दरसूचीमधील जनरल नोट्स अ.क्र. 27 वर दरसूचीमध्ये 1 टक्के विम्याची तरतुद केली असल्याने ठेकेदाराच्या देयकामधून 1 टक्का विम्याची रक्कम कपात करुन शासकीय विमा निधीमध्ये भरणे आवश्यक आहे असे नमूद आहे. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये या कामापोटी रु. 30169696 /- ठेकेदारास आदा केले आहेत. परंतु देयकामधुन 1 टक्का विमा कपात केला नसल्याने रु.301696/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

11) या कामाच्या नस्तीमधील पृष्ठ क्र.19 वर पाणीपुरवठा विभागाच्या दि.01/03/2013 च्या कार्यालयीन टिपणीमध्ये महानगरपालिकेने केलेल्या अंदाजपत्रकामध्ये labour amenities चा 1 टक्का व कामगार कल्याण उपकराचा 1 टक्का दर धरला नसल्याने तो दर धरुन 2012-13 च्या दरसूचीनुसार दरपृथ्थकरण केले असता या निविदेचा दर 10.12 टक्के जादाने येत असल्याचे नमूद केले आहे. परंतु As per Govt.Circuler No.DSR-1089/CR-6453/PLN-3,Dt.14/07/1993, 1% for labour amenities is not considered in the DSR except concrete item while arriving the rates. या निविदेमध्ये कॉंक्रीट RCC उंच टाकीच्या कामाची किंमत रु.13464633/- इतकी धरण्यात आलेली असून शासन निर्णयाप्रमाणे सदर काम कॉंक्रीटचे असल्याने या रक्कमेवर 1 टक्का labour amenities आकारता येत नसतानाही दरपृथ्थकरणात धरलेली रक्कम रु.134646/- ठेकेदारास आदा केली असल्याने ती ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

DRAFT

12) MJP, DSR 2012-13 ,General Notes मधील अ.क्र.22 नुसार Pipes,Specials,Valves वर आकारण्यात येणा-या जकातीचा समावेश DSR मध्ये केला नसल्याने एस्टिमेट तयार करताना 4 टक्के ऑक्ट्रॉयचा समावेश या बाबींचे दरात करुन दर अंतिम करणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने 4 टक्के ऑक्ट्रॉयचा समावेश करुन या बाबींचे दर अंतिम केले आहेत. तसेच बीड डॉक्यूमेंट VOLUME I &II मध्ये पृष्ठ क्र.72 वर जनरल कंडीशन दिल्या आहेत. त्यामधील अट क्र.3 नुसार ठेकेदाराने आयात केलेल्या पाईप व इतर साहित्यावर आकारण्यात येणा-या जकातीची रक्कम भरावयाची असुन त्यासाठी त्याला Exmption Certificate मिळणार नसल्याचे स्पष्ट नमूद आहे. त्यामुळे ठेकेदाराने जकात भरणे आवश्यक आहे. देयकाची तपासणी केली असता या बाबीवरची जकात भरलेच्या पावत्या देयकाबरोबर लावल्या नसल्याने ठेकेदाराच्या देयकामधून 4 टक्केप्रमाणे जकात कपात करणे आवश्यक आहे. या कामाच्या प्रमाणक क्र.10, 14, व 23 मधुन Supplying pipes & CI/DF Valves या बाबी करीता ठेकेदारास रु.16336180.66/- आदा केले आहेत. या बाबीवरील 4 टक्केपर्यंत येणारी जकातीची रक्कम रु.653447/- इतकी होत आहे. सदर रक्कम ठेकेदाराकडून वसूल केलेली नाही.

13) 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये ठेकेदारास रु. 30169696/- आदा केले आहेत. सर्व रक्कम केंद्र शासनाकडून आलेल्या अनुदानामधूनच आदा केली आहे. Govt of India , Ministry of Urban Development यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे व त्यामध्ये या कामाचा समावेश केलेला आहे. सदर सुधारीत मान्यता देताना या कामासाठी केंद्र शासनाकडून कोणतेही अनुदान मिळणार नसून या कामाचा खर्च राज्यशासन व महानगरपालिका यांनी त्यांचे निधीतून करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहे. शासनाने सन 2005-06 चे दरसूचीनुसार तयार केलेल्या निविदा किंमतीस डी.पी.आर.मध्ये मान्यता दिली आहे. मंजुर डी.पी.आर नुसार या कामाची किंमत रु.33548462/- इतकी असून केंद्र व राज्य शासनाकडून 90 टक्के प्रमाणे रु.30193615/- अनुदान शासनाकडून प्राप्त झाले आहे. या कामाची मंजूर निविदा किंमत रु.67964533/- इतकी असल्याने व शासनाकडून रक्कम रु.30193615/- अनुदान या कामासाठी प्राप्त झाल्याने उर्वरित रक्कम रु.37770917/- महानगरपालिकेच्या स्वनिधी मधून खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदारास कामाची देयके प्रदान करताना 44.42 टक्के रक्कम शासन निधी मधून व 55.57 टक्के रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च करणे आवश्यक होते. महानगर पालिकेने ठेकेदारास 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये रु. 30169696/- आदा केले आहेत. अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 44.42 टक्के प्रमाणे रु.13401379/- व 55.57 टक्क्याप्रमाणे रु.16768317/- स्वनिधीमधून खर्च करणे आवश्यक असता रक्कम रु.16768317/- शासन निधी मधून खर्च करण्यात आली आहे या वित्तिय अनियमिततेमुळे या योजनेअंतर्गत करण्यात येणा-या अन्य कामांना निधी कमी पडून योजनेची प्रगती रखडणार असून निधी अभावी कामे अपूर्ण राहणार असल्याचे स्पष्ट होते. महानगरपालिका हिश्श्याची रक्कम स्वनिधीमधून खर्च का करण्यात आली नाही. याबाबत खुलासा

DRAFT

अर्धसमास ज्ञापन क्र.84 दि.15/03/2015 अन्वये मागणी करुन ही पाणीपुरवठा विभागाने केलेला नाही.

14) या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता या कामाची रु.18420152/- ची देयके दि.13/06/2014 पासून फेब्रु 2016 पर्यंत प्रलंबित असून उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी अंदाजे रक्कम रु.19350766/-ची आवश्यकता असल्याचे तसेच सदर काम प्रगतीत असून एकूण सरासरी 75 टक्के काम पूर्ण झाले असल्याचे नमूद आहे. नस्तीमधील प्री बीड मिटींगचे प्रोसिडींगमध्ये ठेकेदाराने मुद्दा क्र.3 ने या कामासाठी महानगरपालिकेकडे निधी आहे का असा मुद्दा उपस्थितीत केला होता व त्यावर या कामासाठी महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध असल्याचे Clarification महानगरपालिकेने दिले आहे.तसेच बीड डॉक्यूमेंट V0LUME I&II मधील क्लॉज 10 नुसार ठेकेदाराने झालेल्या कामाचे बील Engineer in Charge कडे दर महिन्यास सादर करावयाचे असून सदर देयक महानगरपालिकेने तपासून 10 दिवसाचे आत त्या देयकाची रक्कम ठेकेदारास आदा करावयाची आहे परंतु महानगरपालिकेने स्वनिधीतून देयके देण्यासाठी आर्थिक तरतुदच केली नसल्याने निधी अभावी देयके प्रलंबित राहिल्याचे दिसून येते.

वसुलपात्र रक्कम :- सांगलीवाडी येथील ऊंच पाण्याची टाकी बांधणे व वितरणव्यवस्था टाकणे या कामापेक्षा 2.05 टक्के जादाने या कामाची निविदा मंजुर केल्याने झालेले आर्थिक नुकसान रु.1270600/- + देयकामधुन कपात न केलेली विमा रक्कम रु.301696/- + Labour Amenities पोटी दरपृथ:करणामध्ये धरलेली काँक्रीट कामाची जादा धरण्यात आलेली रक्कम रु.134646/- + मालाची जकात न भरणा केलेली रक्कम रु.653447/- + रॉयल्टी रक्कम रु.11485 /- = रु.2371874/-

आक्षेपाधिन रक्कम :- कामासाठी वापरण्यात आलेल्या सिमेंट,वाळु,खडी, स्टिल व काँक्रीट योग्य दर्जाचे असलेबाबतचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच देयक आदा केलेने रक्कम रु.1346463/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

DRAFT

DATSBKM7201 (Ref No : 84)

## *75 महानगरपालिका हद्दीत 15 लाख लिटर क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणे, संजय नगर,माळबंगला परिसरात वितरण व्यवस्था करणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**UIDSSMT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 14**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जल नि: स केंद्र,राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4356824.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6321352.00/-

***UIDSSMT योजनेअंतर्गत मंजूर असलेले अन्य काम सांगलीवाडी येथे 15 लाख लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे व वितरणनलिका टाकणे हे महानगरपालिकेने 2012-13 च्या दरसूचीवर 7.05 टक्के जादा दराने मंजूर केले आहे. सदर दोन्ही कामे एकाच टेंडरने मागविण्यात आली आहेत. दोन्ही कामे टाकी बांधणे व वितरणनलिका टाकणे अशी एकाच प्रकारची आहेत. परंतु समतानगर येथील उंच टाकीचे निविदा मंजूर करताना 9.34 टक्के जादा दराने मंजूर केल्याने 2.29 टक्केने (2012-13 चे DSR नुसार निविदेची किंमत रु.74355408X 2.05 टक्के) प्रमाणे रु.1524286/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. कामाची वर्क ऑर्डर दि.08/05/2013 ने दिली आहे. परंतु प्रत्यक्षात काम करताना त्या ठिकाणी MSEB चे उच्च विद्युत दाबवाहिनी असल्याने डिसेंबर 2013 नंतर सदर दाबवाहिनी शिफ्ट केलेने काम सुरू होण्यास 6 महिन्याचा विलंब झाला आहे. राफ्ट फाऊंडेशनचे काम पुरक अंदाजपत्रक न करता केल्याने रु.3220000/- तसेच जकात, रॉयल्टी, Labour Amenities इ. ची एकुण रक्कम रु. 6321352/- देयकामधुन वसुल करण्यात आलेली नाही. महानगरपालिकेने स्वनिधीमधुन आपल्या हिश्श्याची रक्कम रु.17922472/- खर्ची न टाकता सर्व रक्कम शासननिधीमधुन खर्च केली आहे.***

केंद्रशासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचा पायाभुत विकास कार्यक्रमांतर्गत रु. 79.02 कोटी किमतीच्या विषयांकीत योजनेला केंद्र शासनाकडून माहे सप्टे.2006 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार केंद्रशासनाचा हिस्सा रु.63.22 कोटी (80 टक्के), राज्य शासनाचा हिस्सा रु.7.90 कोटी (10 टक्के), मनपा हिस्सा 7.90 कोटी (10 टक्के) असा आहे. या मंजुर योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन दि.11/03/2008 रोजी रु.14.78 कोटी, दि.11/06/2010 रोजी रु.20.62 कोटी व दि.21/07/2012 रोजी रु.35.56 कोटी असा एकूण निधी रु.70.96 कोटी इतका निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे. यापैकी महानगरपालिकेने रु.14.78 कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केला आहे व या रक्कमेतुन पुर्ण ठेव तत्वावर अधारित मंजुर योजनेतील कुपवाड झोनसाठीच्या गट क्र.1 मधील कामे पुर्ण करण्यात आली आहेत. तसेच महानगरपालिकेने अन्य कामासाठी दोन पॅकेज तयार केली असुन त्याची किंमत रु.60.56 कोटी इतकी होत आहे. यामध्ये उंच टाक्या बांधणे, गुरुत्वनलिका व वितरण व्यवस्थेसाठी पाईप लाईन पुरविणे,त्यासाठी खुदाई करणे, जोडणे, चाचणी देणे ,पंपीग मशिनरी पुरविणे, बसविणे व चाचणी देणे व माळबंगला येथे 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाचा समावेश आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र क्र.6, दि.06/01/2011 रोजी योजनेच्या तांत्रिक बदलास मान्यता दिली आहे. या योजनेस तांत्रिक मान्यता देत असताना मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदरचे काम हाती घेण्यापुर्वी कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक मंजुरी घेणेबाबत अट घातली आहे.

या कामाची नस्तीची तपासणी केली असता, पाणीपुरवठा विभागाने दि.23/10/2012 रोजी लिहिलेल्या टिपणीमध्ये (पृष्ठ क्र.टी -1 ), सांगली शहरात 15 लक्ष लिटरच्या 4 व 25 लक्ष लिटर क्षमतेची 1

DRAFT

अशा एकूण 5 टाक्या बांधणे व 105 कि.मी लांबीची वितरण नलिका टाकणे व उंच टाकी भोवती कंपाऊंड वॉल बांधणे (2.88 + 11.46 + 0.62= 14.96 कोटी ) या कामांचा समावेश व तरतुद मूळ मंजूर योजनेमध्ये नसल्याने या कामासाठी सुधारित अंदाजपत्रके व आराखडे तयार करुन या तांत्रिक बदलास महासभा ठराव क्र.193 दि.10/01/ 2011 ने मान्यता घेतल्याचे नमूद आहे. सदर तांत्रिक बदलाचे प्रस्ताव केंद्रशासनाचे Ministry Of Urban Development Dept. कडील CPHEE0 ने 23/11/2011 रोजीच्या बैठकीमध्ये मान्य करुन SLSC महाराष्ट्र शासनाकडे पाठविले होते. सदर प्रस्ताव SLSC(State Level Sanction Commitee) च्या दि.31/01/2012 च्या बैठकीमध्ये मान्य करण्यात आले आहेत. सांगली शहरासाठी सन 2025 चे मागणीनुसार उंच टाक्या व वितरण व्यवस्थेसाठी तरतुद नव्हती. सबब तांत्रिक बदलाच्या प्रस्तावामध्ये या कामासाठी ढोबळ तरतुद करण्यात आली आहे. मार्च 2012 मध्ये तांत्रिक बदलास मान्यता मिळाल्यानंतर वितरण व्यवस्थेसाठी सर्व्हेक्षण करण्याचे काम हाती घेवून सांगलीवाडी, कोल्हापूर रोड व शामराव नगर उंच टाकीच्या कमांड एरियाचे सर्व्हेक्षण पूर्ण करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. UIDSSMT योजनेचे काम पूर्ण करण्याची मुदत मार्च 2014 पर्यंत असल्याने सर्वेक्षण पुर्ण झालेल्या कामांची निविदा काढणे आवश्यक आहे.

Govt. of India ,Ministry of Urban Development , Encloser to Note No. Q12045 / 15/ 2/ UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे. त्यानुसार योजनेची सुधारित appraised cost रु.14597.05 लाख यास मान्यता दिली आहे. योजनेची मुळ किंमत रु.7902/- लाख व सुधारित किंमत रु.14597.05 लाख या मधील फरक रक्कम रु.6695/- लाख रक्कमेची तरतुद राज्यशासन व महानगरपालिका यांनी स्वनिधीमधुन करण्याबाबत नमुद आहे.

मंजूर योजनेमध्ये प्रस्तावित जलकुंभ कर्नाळ रोड येथे बांधावयाचा होता. सदर 15 लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी कर्नाळा रोड परीसर पुरपट्टयात येत आहे व त्या ठिकाणचा डी.पी.प्लॅनही मंजूर नसल्याने सदर जलकुंभ कर्नाळ रोड ऐवजी समतानगर येथे बांधण्याची शिफारस कार्यकारी अभियंता यांनी केली आहे व त्यास आयुक्त यांनीही मंजूरी दिली आहे. जागा बदलास व मंजुर निविदेप्रमाणे काम करण्यास महासभा क्रमांक (विशेष सभा) 01,ठराव क्र.5 विषय क्र.5 दि. 06/04/2013 ने मान्यता दिली आहे. सदरची मंजुर योजना 2005-06 सालच्या दरावर आधारित असून मनपा हद्दीत पाण्याची उंच टाकी बांधणे व वितरण व्यवस्था करणे या कामाची मंजुर किंमत रु.40657107/- आहे. तसेच या कामाची (सन 2011 -12 च्या मजिप्रा दरसूचीनुसार) निविदा किंमत रु.73947276/- असून ई निविदा नोटीस क्र.12/5 ने मागविणेची जाहिरात दै.सकाळ व दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.16/01/2013 व दि.17/01/2013 रोजी प्रसिध्द करण्यात आली. जाहिर निविदा प्रक्रीयेनुसार ठेकेदाराकडून prequalification साठी अर्ज मागविले होते. याबाबत पात्र व अपात्र ठेकेदारांची यादी वेबसाईटवर आयुक्त यांचे मंजुरीने दि. 28/01/2013 ने टाकण्यात आली. यापैकी पात्र निविदाधारक

DRAFT

मे.एस.व्ही.जाधव,मिरज, रचना इंजिनिअर्स,कोल्हापूर , श्री. विजय साळुंखे, पुणे ,लक्ष्मी सिव्हील इंजि. कोल्हापूर, या ठेकेदारांनी निविदा विकत घेवून दि.05/2/2013 च्या निविदा पुर्व बैठक व खुलासे झालेनंतर निविदा भरुन सादर केल्या आहेत.

निविदा प्रक्रीयेनुसार या ठेकेदारांचा प्रथम तांत्रिक लखोटा दि.14/2/2013 रोजी उघडण्यात आला असून 4 ही ठेकेदारांची कागदपत्रे बरोबर असल्याने दराचा लखोटा दि.16/02/2013 रोजी उघडण्यात आला आहे. त्यानुसार मे.एस.व्ही.जाधव,मिरज(14.21 टक्के जादाने), रचना इंजिनिअर्स,कोल्हापूर (15.9 टक्के जादाने), लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग कोल्हापूर, (15.7टक्के जादाने), श्री.विजय साळुंखे, पुणे (16.85 टक्के जादाने), निविदा भरल्या आहेत.

या कामाची निविदा किंमत सन 2011-12 च्या दरसूचीनुसार रु.73947276/- इतकी असून मे.एस.व्ही.जाधव यांचा सर्वात कमीचा देकार निविदा किंमतीवर 14.21 टक्के जादाने म्हणजेच रु.84458881/- आहे. निविदेची तुलना 2012-13 च्या दरसूचीबरोबर केली असता निविदा किंमत रु.74355408/- इतकी झाली आहे. DSR जनरल नोट प्रमाणे कामगार कल्याण उपकर व लेबर ॲमेनिटीसाठी 1 टक्केचा समावेश अंदाजपत्रकामध्ये केल्यावर निविदेची किंमत रु.75842516/- इतकी झाली असुन 2012-13 च्या चालु दरसूचीबरोबर तुलना करिता ठेकेदाराचा दर 11.36 टक्के जादाने आला आहे. आयुक्त यांचे आदेशानुसार दर कमी करण्यासाठी ठेकेदारास दि.21/03/2013 रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार दि.22/03/2013 रोजी ठेकेदाराने दिलेल्या पत्रामध्ये भाववाढीची खालील कारणे नमूद केली आहेत. 1) वाळूचे लिलाव न झाल्याने बाजारात वाळूचे दर दुपटीने वाढले आहेत. 2) DI Pipe चे दर 6 ते 7 टक्क्यांनी वाढले आहेत 3) राफ्ट फाऊंडेशनसाठी डीएसआर मधील तरतुदीनुसार एकुण रक्कमेवर 7.5 टक्के वाढ दाखविली आहे. परंतु प्रत्यक्षात रु.24.70 लक्ष वाढत आहेत. तसेच निविदेमध्ये भाववाढ क्लॉज नाही. त्यामुळे ठेकेदाराने पूर्वीचा 14.21 टक्के जादाचा दर कमी करुन 12.15 टक्के जादा दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. पाणीपुरवठा विभागाने 12.15 टक्के जादा दराची चालू दरसुचीबरोबर तुलना केली आहे (पृष्ठ क्र. टी- 23). सन 2011-12 च्या दरसूचीनुसार कामाची निविदा किंमत रु.73947276/- असून , ठेकेदाराबरोबर केलेल्या वाटाघाटीनंतर निविदादरापेक्षा 12.15 टक्के जादाने दराने काम मंजूर केलेनंतर कामाची किंमत रु.82931870/- इतकी होत आहे. सन 2012-13 चे दरसूचीनुसार ठेकेदाराचा सुधारित देकार 82931870 - 75842516 (2012-13 चे दरसूची नुसार किंमत ) % 75842516 X 100 = 9.34 टक्के जादा दराने निविदा मंजूर केलेली आहे.

कार्यकारी अभियंता यांनी या योजनेचा मिशन कालावधी मार्च 2014 पर्यंत असल्याने व सदरचे काम एक वर्ष मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने देवू केलेला दर योग्य असल्याने सन 2012-13 च्या दरसूचीवर 9.34 टक्के जादा दराने निविदा मंजूर करण्याची शिफारस केली आहे व त्याप्रमाणे आयुक्त यांनी निविदा दि.02/04/2013 रोजी निविदा मंजूर केली आहे.

महासभेची मंजुरी :- उपायुक्त (पाणीपुरवठा विभाग) यांचे दि.02/04/2013 चे विषयपत्रानुसार सादर

DRAFT

केलेल्या 9.34 टक्के जादा दराच्या निविदेस महासभा क्र.विशेष सभा 01,ठराव क्र.05,विषय क्र.05, दि.06/04/2013 ने मंजुरी देण्यात आली आहे. (नस्ती पृष्ठ क्र.299)

कामाची समज :- कार्यकारी अभियंता पत्र क्र.मनपा/पापुवि/सां/26/2013-14 दि.09/04/2013

करारपत्र :- या कामाचे करारपत्र रु.82100/- किंमतीचे मुद्रांक शुल्क पेपरवर महानगरपालिकेचे सिल लावून दि.02/05/2013 रोजी करण्यात आला आहे.(नस्तीमधील पृष्ठ क्र.327).

सुरक्षा अनामत :- कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.20,74,000/- ठेकेदाराने IDBI Bank BG No. 130463IBGP00035, बँक गॅरेंटीच्या स्वरुपात दि.10/04/2013 रोजी महानगरपालिकेस दिलेली आहे. .(पृष्ठ क्र.361) ,बँक गॅरेंटीची मुदत एक वर्ष (09/04/2014 अखेर)

कामाचे करारनामा रु.67100/- चे मुद्रांक शुल्क शासनाकडे भरणा करुन दि.06/05/2013 रोजी महानगरपालिकेची मुद्रा लावून केला आहे.

कामाचा कार्यादेश :- क्र.मनपा/पापुवि/सां/109/2013-14 दि.08/05/2013 या पत्राने कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारास कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे.(नस्तीमधील पृष्ठ क्र.395)

कामाची मुदत :- 12 महिने दि. 07/05/2014 पर्यंत (पावसाळ्यासहित)

कामास प्रथम मुदतवाढीचा अर्ज ठेकेदाराने दि.03/07/2014 रोजी केला असुन कामास मार्च 2015 पर्यंत मुदतवाढीची मागणी केली आहे. शाखा अभियंता यांनी मुदतवाढीची टिपणी दि.08/10/2014 रोजी वरीष्ठाकडे सादर केली असुन त्यामध्ये टाकीचे काम 60 टक्के पुर्ण झालेले असुन मार्च 2015 पर्यंत कामास मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. आयुक्त यांनी मुदतवाढीस दि.13/11/2014 रोजी मान्यता दिली आहे.

2013-14 या आर्थिक वर्षात ठेकेदारास खालील प्रमाणे रक्कम आदा केली आहे.

| धावते देयक क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रु. | M.B.No. | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 09 | 19/09/2013 | 5418567 | 09 | 06 ते 07 |
| 02 | 12 | 10/10/2013 | 12492024 | 09 | 07 ते 08 |
| 03 | 28 | 15/02/2014 | 3965142 | 09 | 21 ते 26 |
| 04 | 29 | 15/02/2014 | 8085299 | 09 | 09 ते 20 |
| 05 | 31 | 17/02/2014 | 2117851 | 09 | 27 ते 32 |
| | | एकूण | 32078883 | | |

या कामाची नस्ती,देयके,प्रमाणके व मोजमाप पुस्तकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.85 दि.15/03/2016 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर. ला मान्यता दिली आहे. तसेच राज्य शासनाच्या SLSC(State Level SanctioningCommittee)

DRAFT

च्या 14 व्या मिटींगमध्ये या योजनेमधील सुधारित कामांना दि.31/01/2012 रोजी मान्यता दिली आहे. शासनाची योजनेस मान्यता झालेनंतर या कामांचे टेंडर काढण्याच्या नस्तीची सुरुवात पाणीपुरवठा विभागाने दि.23/10/2012 रोजी म्हणजे 9 महिने विलंबाने केली असून कामाची वर्क ऑर्डर दि.08/05/2013 रोजी देण्यात आली आहे. या सर्व कार्यवाहीमध्ये सुमारे दिड वर्षाचा अवधी गेला आहे. या कामाची निविदा सन 2011-12 या आर्थिक वर्षाचे मजिप्राचे DSR प्रमाणे मागवि- ण्यात आली असून निविदा कामाचे दरपृथःकरण 2012-13 या आर्थिक वर्षाचे DSR बरोबर करुन ठेकेदाराची 9.34 टक्के जादा दराची निविदा मंजुर करण्यात आली आहे. कामास सुधारीत मान्यता दि.31/01/2012 रोजी मिळाल्यानंतर कामाच्या निविदेची कार्यवाही पाणीपुरवठा विभागाने तत्परतेने करणे आवश्यक होते. परंतु निविदा मागविणे व मंजूर करणेची कार्यवाही विलंबाने केलेने काम 2011-12 च्या दरसुचीवर निविदा दराच्या 14.21 टक्के जादाने आले आहे. नस्तीमध्ये (पृष्ठ क्र.293) वर UIDSSMT योजने अंतर्गत प्राप्त जादा दराच्या निविदा स्विकारण्या संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेचे नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक : युआयडी-2009 /प्र.क्र.158 / नवि-33 दि.10 ऑगष्ट 2009 जोडण्यात आले आहे. या परिपत्रकामध्ये शासन परिपत्रक दि. 20/10/ 1993 चा संदर्भ देण्यात आला असुन त्यानुसार UIDSSMT योजनेअंतर्गत प्राप्त निविदा 10 टक्केपेक्षा जास्त दराने आल्यास संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येत असल्याने याबाबत शासन परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे. मंजूर अंदाजपत्रका मधील रक्कमेपेक्षा कमाल 10 टक्क्याहून जास्त रक्कमेच्या निविदा आल्यास त्या का जास्त आहेत याचे काळजीपूर्वक बाबनिहाय परिक्षण (Rate Analysis) करणे आवश्यक आहे, तसेच फेर निविदा मागविण्यात गांभीर्याने विचार करणे इष्ट ठरते असे नमुद आहे. सदर परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे 10 टक्केपेक्षा जादाची निविदा आल्याने नियमाप्रमाणे फेर निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतु फेरनिविदा न मागविता सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे DSR बरोबर तुलना करुन 9.34 टक्के जादा दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. सन 2012-13 च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या चालू दरसूचीबरोबर तुलना करुन जादा दराची निविदा मंजूर करताना ती जादा दराने का आली आहे. याचे पाणीपुरवठा विभागाने दरपृथ्थकरण केलेले नाही. निविदा उशिरा मागविणे, जादाची निविदा 10 टक्केपेक्षा कमीने दाखविण्यासाठी चालू दरसूचीबरोबर दरपृथ्थकरण करुन 10 टक्केपेक्षा कमीने दाखविणे या अनियमिततेमुळे ठेकेदाराचा देकार रु.82931870 - रु.74355408, (2012-13 नुसार निविदेची किंमत) महानगरपालिकेचे रु.8576462/-चे आर्थिक नुकसान झाले आहे.

UIDSSMT योजनेअंतर्गत मंजूर असलेले अन्य काम सांगलीवाडी येथे 15 लाख लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे व वितरणनलिका टाकणे हे महानगरपालिकेने 2012-13 च्या दरसूचीवर 7.05 टक्के जादा दराने मंजूर केले आहे. सदर दोन्ही कामे एकाच टेंडरने मागविण्यात आली आहेत. दोन्ही कामे टाकी बांधणे व वितरणनलिका टाकणे अशी एकाच प्रकारची आहेत. परंतु समतानगर येथील उंच टाकीचे निविदा मंजूर करताना 9.34 टक्के जादा दराने मंजूर केल्याने 9.34 टक्के - 7.05 टक्के =

DRAFT

2.29 टक्के आर्थिक नुकसान झाले आहे. (2012-13 चे दरसुचीनुसार निविदेची किंमत रु.74355408X 2.05 टक्के ) प्रमाणे रु.1524286/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच चालू दरसूचीवर जादा दराने निविदा मंजूर करताना त्या का जास्त आल्या आहेत या बाबतचे बाबवार दरपृथ:करण पाणीपुरवठा विभागाने न करताच जादा दराची निविदा मंजूर केली आहे.

2), सार्वजनिक बांधकाम विभागाने अधिकार प्रदान करणे व निविदा मंजूरीबाबतचे परिपत्रक क्र.डी. पी.डब्ल्यु 1996/16 (ब)/ लेखापरीक्षा मंत्रालय दि. 20 सप्टेंबर 1997 ने निर्गमित केले आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता रु.25 लाख, अधिक्षक अभियंता रु. 1 कोटी 25 लाख, मुख्य अभियंता यांना निविदा मंजूरीचे पूर्ण अधिकार दिलेले आहेत. या परिपत्रकामधील 1(ब) मध्ये अधिक्यास मंजूरी देण्याचे अधिकार नमुद केले आहेत. त्यानुसार (निविदेतील अंदाजपत्रकाच्या चालू दरसूचीच्या अधारे येणा-या किंमतीवर) , कार्यकारी अभियंता -निरंक, अधिक्षक अभियंता- 5 टक्के रु. 25 लाख पर्यंतच्या निविदेसाठी, मुख्य अभियंता - 5 टक्के रु.125 लाख पर्यंतच्या निविदेसाठी अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच ज्या ठिकाणी निविदेचे अधिक्य चालू दरसूचीच्या अधारे येणा-या सुधारीत किमतीच्या 5 टक्केहून जास्त नाही. परंतु प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेपेक्षा रु.10 लाखाने जास्त आहे, अशा प्रकरणामधील अधिक्यास शासनाकडून पूर्वमंजूरी घेण्यात यावी असे नमुद आहे. या कामाची निविदा चालू दरसूचीबरोबर (सन 2012-13) दरपृथ्थकरण करून चालू दरसूचीपेक्षा 9.34 टक्के जादाने मंजूर केली आहे. या योजनेसाठी 90 टक्के रक्कम शासनाकडून प्राप्त झाली आहे. परंतु शासन निर्णयाप्रमाणे चालू दरसूचीच्या 5 टक्केपेक्षा जादाचे निविदादरास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असता ती न घेताच निविदा कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांचे स्तरावर मंजूर करण्यात आलेली आहे. या अनियमिततेबाबत खुलासा पाणीपुरवठा विभागाने अर्धसमास ज्ञापन क्र.85 दि.15/03/2015 ने मागणी करुन दिलेला नाही.

3) या योजनेमध्ये आयुक्त, सांगली यांनी सुचविलेल्या सुधारित कामांच्या तांत्रिक बदलांना मुख्य अभियंता, No.CE(Pune)/TB-3/SangliWSS/Tech.Deviation/C320/68 ,Dated 06/01/2011 यांचे पत्राने मान्यता देण्यात आली आहे. सदर पत्रामधील अट क्र.2 व अट क्र.3 नुसार योजनेतील सुधारित कामांची अंदाजपत्रके तयार करून त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेणेत यावी असे नमुद केले आहे. या योजनेच्या सर्व कामांना तांत्रिक मान्यता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिली असल्याने नव्याने अंतर्भुत केलेल्या या योजनेमधील सुधारित कामाच्या अंदाजपत्रकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असता मान्यता न घेताच या कामांची निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

4) UIDSSMT / 08-CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर. ला मान्यता दिलेनंतर राज्य शासनाच्या SLSC (State Level Sanctioning Committee) च्या 14 व्या मिटींगमध्ये या योजनेमधील सुधारित कामाच्या प्रस्तावाला दि.31/01/2012 रोजी खालील अटीस अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे. 1) मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी या

DRAFT

योजनेच्या मुळ DPR मध्ये नमुद केलेल्या दरसूचीनुसार असलेली कामांची किंमत व सुधारित कामांना मान्यता दिल्यानंतर त्यावर्षीच्या दरसूची नुसार होणारी कामांची किंमत या मधील फरकाची रक्कम काढून द्यावयाची आहे. त्यानुसार SLNA(State Level Nodle Agency) कडून राज्य शासनाकडे महानगरपालिकेस वाढीव अनुदानासाठी प्रस्ताव पठविण्यात येणार आहे. या अटीप्रमाणे महानगरपालिकेने या बाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठविल्या बाबतची कागदपत्रे नस्तीमध्ये दिसून आलेली नाहीत. DSR Difference ची रक्कम मिळविण्यासाठी काय कार्यवाही केली याची माहिती लेखापरीक्षणास देण्यात आलेली नाही.

5) या कामाच्या बीड डॉक्यूमेंट VOLUME I & II ची तपासणी केली असता पृष्ठ क्र.68 वर कामाबाबत Supplementary Conditions दिल्या आहेत. त्यामधील अट क्र.1 नुसार ठेकेदाराने काम दिलेल्या मुदतीत करण्यासाठी कामाचा बार चार्ट देणे आवश्यक आहे. पाणीपुररवठा विभागाने दि.24/05/2013 रोजीच्या पत्रान्वये ठेकेदाराकडे बार चार्टची मागणी केली आहे व ठेकेदाराने दि.01/06/2013 रोजीच्या पत्रान्वये बार चार्ट कार्यालयास सादर केला आहे व त्याची नोंद पाणीपुरवठा विभागाने आवक रजि.क्र.1359 ने दि.01/06/2013 घेतली आाहे.त्यानुसार टाकीचे Design Approval व खुदाई जून 2013 अखेर पूर्ण करणार असल्याचे नमूद आहे. (नस्ती पृष्ठ क्र.407). परंतु नस्तीची तपासणी केली असता या वालचंद कॉलेजने या कामाच्या ठिकाणची भुस्तर तपासणी करुन टाकीच्या Safe Bearing Capacity चा तांत्रिक अहवाल दि.25/06/2013 रोजी दिला आहे व टाकीचे Design & Drawings मध्ये योग्य त्या सुधारणा करून दि.16/07/2013 रोजी मान्य केले आहे.(नस्ती पृष्ठ क्र.407). तसेच उंच टाकीचे बांधकाम करण्याच्या ठिकाणावरुन महाराष्ट्र विद्युत मंडळाची उच्च विद्युत दाबवाहिनी गेल्याने ती शिफ्ट करण्याचे पत्र पाणीपुरवठा विभागाने MSEB ला दि.04/06/2013 रोजी दिले आहे व या कामाची रक्कम रु.224000/-महानगरपालिकेने MSEB कडे धनादेशाने दि.06/12/2013 रोजी भरणा केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद 141 (12) नुसार एखाद्या कामाचे Detailed Estimate तयार करण्याअगोदर ट्रायल पिट घेवून जमीनीचा भुस्तर तपासून सदर जागा कामासाठी योग्य आहे किंवा नाही तसेच पाया किती खोलीवर घेणे आवश्यक आहे ते ठरविणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी जमीनीचा भुस्तर न तपासताच कामाचे अंदाजपत्रक तयार केलेने व वर्क ऑर्डर दिल्यानंतर भुस्तर तपासणीचे काम केले आहे. मोजमाप पुस्तक क्र.09,पृष्ठ क्र.01 वर पाया खुदाईचे काम दि.11/08/2013 रोजी पुर्ण झाल्याचे नमुद आहे. यावरुन काम सुरू करण्यास विलंब झाला असल्याने बार चार्टमध्ये नमूद केल्याप्रमाणे कामाची गती राखली जात नसल्याचे दिसुन येते. तसेच नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 165 नुसार कामाचे अंतिम तपशीलवार अंदाज तयार करण्याअगोदर जागेबाबत स्थानिक निरीक्षण करणे आवश्यक आहे. परंतु स्थानिक निरिक्षण योग्यरितीने न केल्याने MSEB ची उच्च विद्युतदाब वाहिनी शिफ्ट करण्याचा प्रश्न वर्क आर्डर दिल्यानंतर उपस्थित झाला असल्याने व त्याची मान्यता घेण्यास उशिर लागल्याने कामाच्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण झाला आहे.

DRAFT

6)या कामाचे ठेकेदार मे.एस.व्ही.जाधव यांची सर्वात कमीची निविदा 2011-12 च्या दरसूचीवर केलेल्या निविदा दरापेक्षा 14.21 टक्के जादाची असून ठेकेदारास दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलविले असता त्याने दि.22/03/2013 रोजी महानगरपालिकेस दिलेल्या पत्रामध्ये या ठिकाणी राफ्ट फाऊंडेशनची आवश्यक आहे. व त्यासाठी एस्टिमेट मध्ये धरण्यात आलेली 7.5 लाख इतकी रक्कम पुरेशी नाही. कारण प्रत्यक्ष राफ्ट करताना अंदाजे 1700 घनमीटर खुदाई, 80 घ.मी.पीसीसी,132 घमी आरसीसी राफ्ट,14 मेट्रीक टन सळीची आवश्यकता आहे व त्याचा अंदाजे खर्च रु.24.70 लक्ष रुपये अपेक्षित असल्याचे नमुद आहे व त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने केलेल्या दरपृथ्थकरणामध्ये याबाबीचा समावेश करुन निविदा जादा दराने दिली आहे. ठेकेदाराने वाटाघाटीमध्ये सदर ठिकाणी राफ्ट फाऊंडेशन टाकावे लागणार असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार सदर जागेची पाहणी करुन ट्रायल पिट घेवून राफ्ट फाऊंडेशन टाकण्याची आवश्यकता तपासून त्यानुसार कामाचे पुरक अंदाजपत्रक तयार करण्याची जबाबदारी पाणीपुरवठा विभागाची असताना त्यांनी ठेकेदाराने वाटाघाटीमध्ये दिलेल्या माहितीनुसार जादा दराचे निविदेस मान्यता दिली आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद 263 नुसार अधिक खर्च अंतर्भूत करणारा कुठलाही महत्वाचा फेरफार कामामध्ये करणे आवश्यक असेल तर या फेरफारासाठी सुधारित किंवा पूरक अंदाज तयार करुन  एस्टिमेट मंजूरीसाठी सक्षम प्राधिका-याकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतु सुधारित अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिका-याची मंजूरी न घेताच काम मंजूर केले आहे.

7)या कामाच्या मोजमाप पुस्तक क्र.09,पृष्ठ क्र. 01 ते 03 वर या कामाच्या राफ्ट फाऊंडेशनसाठी लागणारी सळीची मापे नोंदविली आहेत. त्यानुसार या कामासाठी एकूण सळी 6.558 मेट्रीक टन लागली आहे. MJP DSR (2012-13), पृष्ठ क्र.46, बाब क्र.(8) (b) Providing and Fixing in Position Steel Reinforcement साठीचा दर रु.61996 /- प्रती मेट्रीक टन नमूद आहे. सळीचे एकूण परिमाण 6.558 मेट्रीक टन X रु.61996/- = रु.406569/- इतका खर्च झाला आहे. तसेच राफ्टसाठी टाकलेल्या स्लॅबची मापे  मोजमाप पुस्तक क्र.09 मधील पृष्ठ क्र.03 वर नोंदविण्यात आलेली आहेत. त्यानुसार एकूण स्लॅबचे काम 99.18 घ.मी.झालेले आहे. MJP DSR (2012-13), पृष्ठ क्र.42, बाब क्र.(2)(d) Providing ,Laying and Casting M300 For Raft Foundation साठीचा दर रु.6393 / प्रती घ.मी. आहे. त्यानुसार 99.18 घ.मी. X रु.6393.45 /- = रु.761268/- इतका खर्च झाला आहे.  या राफ्टच्या कामासाठी एकूण रु.634102/- खर्च झालेला आहे. महानगरपालिकेने या कामाचे पुरक अंदाजपत्रक न करताचा ठेकेदाराने दिलेल्या किंमतीनुसार या कामाची किंमत रु.24,70,000/- वाटाघाटीमध्ये मान्य करुन निविदा मंजुर केल्याने महानगरपालिकेचे ( रु.24,70,000 + अंदाजपत्रकामधील दर 7.50 लाख =) - रु.761268 /-  = रु.3220000/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

8) या कामाचे मोजमाप पुस्तक क्र.09 ,पृष्ठ क्र.01 ची तपासणी केली असता PCC M200 काँक्रीटचे काम 35.76 घ.मी. झाल्याची नोंद आहे  या कामासाठी एकूण वाळू 12.95 घ.मी. व खडी 25.89

DRAFT

घ.मी.वापरण्यात आली आहे. तसेच मोजमाप पुस्तक 11, पृष्ठ क्र.03 ची तपासणी केली असता Casting of footing, M 300 चे काम 99.18 घ.मी.झाल्याची नोंद आहे. या कामासाठी वाळू 59.35 घ.मी. व खडी 84.41 घ.मी. वापरली आहे. या कामामध्ये एकूण गौण खनिज 182.6 घ.मी. वापरले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी भरल्याच्या पावत्या लेखापरीक्षणास दाखविल्या नसल्याने 182.6 घ.मी.X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.12904/- रॉयल्टी वसूल करणे आवश्यक आहे.

9) या कामाच्या बीड डॉक्यूमेंट VOLUME I & II ची तपासणी केली असता पृष्ठ क्र.88 वर कामासाठी वापरण्यात येणा-या सिमेंट,वाळू, खडी , स्टिल व कॉंक्रीट योग्य दर्जाचे असल्याबाबतचा शासकीय प्रयोगशाळेचा गुणवत्ता चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. परंतु धावते देयक क्र. 2 ते 4 ची तपासणी केली असता उंच टाकीसाठी वापरलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल सोबत नसताना देयक पारीत केलेने Subwork 1 RCC ESR 15Lakh lit Item No.1 :- Design & Con.RCC ESR 15 Lakh Lit. साठी आदा केलेली रक्कम रु.4356824 /- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

10) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2012-13 च्या विभागीय दरसूचीमधील जनरल नोट्स अ.क्र. 27 वर दरसूचीमध्ये 1 टक्के विम्याची तरतुद केली असल्याने ठेकेदाराच्या देयकामधून 1 टक्का विम्याची रक्कम कपात करुन शासकीय विमा निधीमध्ये भरणे आवश्यक आहे असे नमूद आहे. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये या कामापोटी रु. 32078883 /- ठेकेदारास आदा केले आहेत. परंतु देयकामधुन 1 टक्का विमा कपात केला नसल्याने रु.320788/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

11) या कामाच्या नस्तीमधील पृष्ठ क्र.19 वर पाणीपुरवठा विभागाच्या दि.01/03/2013 च्या कार्यालयीन टिपणीमध्ये महानगरपालिकेने केलेल्या अंदाजपत्रकामध्ये labour amenities चा 1 टक्का व कामगार कल्याण उपकराचा 1 टक्का दर धरला नसल्याने तो दर धरुन 2012-13 च्या दरसूचीनुसार दरपृथ्थकरण केले असता या निविदेचा दर 10.12 टक्के जादाने येत असल्याचे नमूद केले आहे. परंतु As per Govt.Circuler No.DSR-1089/CR-6453/PLN-3,Dt.14/07/1993, 1% for labour amenities is not considered in the DSR except concrete item while arriving the rates. या निविदेमध्ये कॉंक्रीट RCC उंच टाकीच्या कामाची किंमत रु.10275530/- इतकी धरण्यात आलेली असून शासन निर्णयाप्रमाणे टाकीचे काम कॉंक्रीटचे असल्याने या रक्कमेवर 1 टक्का labour amenities आकारता येत नसतानाही दरपृथ्थकरणात धरली आहे व ठेकेदारास आदा केली असल्याने रक्कम रु.102755/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

12) MJP, DSR 2012-13 ,General Notes मधील अ.क्र.22 नुसार Pipes,Specials,Valves वर आकारण्यात येणा-या जकातीचा समावेश DSR मध्ये केला नसल्याने एस्टिमेट तयार करताना 4



DRAFT

टक्के ऑक्ट्रॉयचा समावेश या बाबींचे दरात करुन दर अंतिम करणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने 4 टक्के ऑक्ट्रॉयचा समावेश करुन या बाबींचे दर अंतिम केले आहेत. तसेच बीड डॉक्यूमेंट VOLUME I &II मध्ये पृष्ठ क्र.72 वर जनरल कंडीशन दिल्या आहेत. त्यामधील अट क्र.3 नुसार ठेकेदाराने आयात केलेल्या पाईप व इतर साहित्यावर आकारण्यात येणा-या जकातीची रक्कम भरावयाची असुन त्यासाठी त्याला Exmption Certificate मिळणार नसल्याचे स्पष्ट नमूद आहे. त्यामुळे ठेकेदाराने या साहित्याची जकात भरणे आवश्यक आहे. देयकाची तपासणी केली असता या बाबीवरची जकात भरलेच्या पावत्या देयकाबरोबर लावल्या नसल्याने ठेकेदाराच्या देयकामधून 4 टक्केप्रमाणे जकात कपात करणे आवश्यक आहे. या कामाच्या प्रमाणक क्र.09, 12,28,29,31 मधुन Supplying pipes & CI/DF Valves या बाबी करीता ठेकेदारास रु.28065470.14/- आदा केले आहेत. या बाबीवरील 4 टक्के प्रमाणे येणारी जकातीची रक्कम रु.1122619/- इतकी होत आहे. सदर रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी.

13) 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये ठेकेदारास या कामापोटी रु. 32078883 /- आदा केले आहेत. सर्व रक्कम केंद्र शासनाकडून आलेल्या अनुदानामधूनच आदा केली आहे. Govt of India , Ministry of Urban Development यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे व त्यामध्ये या कामाचा समावेश केलेला आहे. सदर सुधारीत मान्यता देताना या कामासाठी केंद्र शासनाकडून कोणतेही अनुदान मिळणार नसून या कामाचा खर्च राज्य शासन व महानगरपालिका यांनी त्यांचे निधीतून करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहे. शासनाने सन 2005-06 चे दरसूचीनुसार तयार केलेल्या निविदा किंमतीस डी.पी.आर.मध्ये मान्यता दिली आहे. मंजुर डी.पी.आर नुसार या कामाची किंमत रु.40657107/- इतकी असून केंद्र व राज्य शासनाकडून 90 टक्के प्रमाणे रु.36591396/- अनुदान प्राप्त झाले आहे. या कामाची मंजूर निविदा किंमत रु.82931870/- इतकी असल्याने व शासनाकडून रक्कम रु.36591396/- अनुदान या कामासाठी प्राप्त झाल्याने उर्वरित रक्कम रु.46340473/- महानगरपालिकेच्या स्वनिधी मधून खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदारास कामाची देयके प्रदान करताना 44.13 टक्के रक्कम शासननिधी मधून व 55.87 टक्के रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च करणे आवश्यक होते. महानगरपालिकेने ठेकेदारास आर्थिक वर्ष 2013 -14 मध्ये रु.32078883/- आदा केले आहेत. अनुदान खर्ची करण्याचे हिश्श्याप्रमाणे शासननिधीमधून 44.13 टक्के प्रमाणे रु.14156411/- व 55.87 टक्क्याप्रमाणे रु.17922472/- स्वनिधीमधून खर्च करणे आवश्यक असता सर्व रक्कम शासननिधीमधून खर्च करण्यात आली आहे. या वित्तिय अनियमिततेमुळे या योजनेअंतर्गत करण्यात येणा-या अन्य कामांना व सदर कामास निधी कमी पडून योजनेची प्रगती रखडणार असून निधी अभावी कामे अपूर्ण राहणार असल्याचे स्पष्ट होते. रक्कम महानगरपालिका निधीमधून खर्च का करण्यात आलेली नाही. याबाबतचा खुलासा पाणीपुरवठा विभागाने अर्धसमास ज्ञापन क्र.85, दि.15/03/2016 अन्वये मागणी करुन ही दिलेला नाही.

14) या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता या कामाची धावते देयक क्र.09 ते धावते देयक

DRAFT

क्र.13 ची रक्कम रु.18865213/- ,दि.10/07/2014 पासून डिसें 2016 पर्यंत प्रलंबित असून उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी अंदाजे रक्कम रु.31987774/-ची आवश्यकता असल्याचे नस्तीमध्ये नमुद आहे. तसेच आयुक्त यांचे मुदतवाढ मंजुरी आदेश क्र.582 / 2015-16 नुसार या कामाच्या उंच टाकीचे काम 90 टक्के व 28 किमी लांबीच्या वितरण व्यवस्था पैकी 25 कि.मी.चे काम पूर्ण झाले असुन रस्ता क्रॉसिंग करणे व प्रलंबित देयकाचा उल्लेख करुन ठेकेदाराने डिसेंबर 2015 पर्यंत मुदतवाढीची मागणी केली आहे. त्यानुसार आयुक्त यांनी कामास डिसेंबर 2015 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. नस्तीमधील प्री बीड मिटींगचे प्रोसिडींगमध्ये मुद्दा क्र.3 ने या कामासाठी निधी आहे का असा मुद्दा ठेकेदारांनी उपस्थितीत केला होता व त्यावर या कामासाठी महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध असल्याचे Clarification महानगरपालिकेने दिले आहे. तसेच बीड डॉक्यूमेंट V0LUME I&II मधील क्लॉज 10 नुसार ठेकेदाराने झालेल्या कामाचे बील Engineer in Charge कडे दर महिन्यास सादर करावयाचे असून सदर देयक महानगरपालिकेने तपासून 10 दिवसाचे आत त्या देयकाची रक्कम ठेकेदारास आदा करावयाची आहे परंतु महानगरपालिकेने स्वनिधीतून देयके देण्यासाठी आर्थिक तरतुदच केली नसल्याने निधी अभावी देयके व काम प्रलंबित राहिल्याचे दिसून येते.

**वसुलपात्र रक्कम :-** सांगलीवाडी येथील टाकीच्या कामापेक्षा या कामाची निविदा 2.05 टक्के जादा दराने मंजुर केल्याने झालेले आर्थिक नुकसान रु.1524286/- + Trail Pit न घेता Raft Foundation साठी ठेकेदाराच्या मागणीनुसार दरपृथ:करणामध्ये धरण्यात आलेली रक्कम परंतु प्रत्यक्षात कमी रक्कमेमध्ये काम झाल्याने ठेकेदारास आदा करावयास लागलेली जादाची रक्कम रु.3220000/- + देयकामधुन कपात न केलेली विमा रक्कम रु.320788/- + Labour Amenities पोटी दरपृथ:करणा मध्ये कॉंक्रीट कामाची जादा धरण्यात आलेली रक्कम रु.120755 /- + मालाची जकात न भरणा केलेली रक्कम रु.1122619/- + रॉयल्टी रक्कम रु.12904/- = रु.6321352/-

आक्षेपाधिन रक्कम :- उंच कॉंक्रीट टाकीच्या कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच आदा केलेली रक्कम रु.4356824/-

DRAFT

DATSBKM7201 (Ref No : 85)

## *76 माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथुन कुपवाड झोनकरीता नविन 200 HP क्षमतेचे पंप पुरविणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**UIDSSMT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनि:सा केंद्र,राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1763351.00/-

***70 MLD जलशुध्दीकरण केंद्राचे काम पुर्ण होत असुन त्या ठिकाणी पंपाची आवश्यकता असल्याने तातडीने दोन पंप दि.30/04/2013 रोजी खरेदी करण्यात आले आहेत. मार्च 2016 अखेर जलशुध्दीकरण केंद्राचे काम अपुर्ण असल्याने त्या ठिकाणाहुन अद्यापही पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित झाल्यानंतरच या पंपाचा वापर होणार असल्याने पंप खरेदीवर करण्यात आलेला खर्चाची रक्कम रु.1763351/- अनावश्यकपणे गुंतुन पडल्याचे दिसुन येते.***

अंदाजपत्रकीय खाते :- 41221 लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत विकास योजना
आर्थिक तरतुद रु.41 कोटी.

केंद्रशासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचा पायाभुत विकास कार्यक्रमांतर्गत रु. 79.02 कोटी किमतीच्या विषयांकीत योजनेला केंद्र शासनाकडून माहे सप्टे.2006 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनेच्या मंजुर आकृतीबंधानुसार केंद्रशासनाचा हिस्सा रु.63.22 कोटी (80 टक्के), राज्य शासनाचा हिस्सा रु.7.90 कोटी (10 टक्के), मनपा हिस्सा 7.90 कोटी (10 टक्के) असा आहे. या मंजुर योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन दि.11/03/2008 रोजी रु.14.78 कोटी, दि.11/06/2010 रोजी रु.20.62 कोटी व दि.21/07/2012 रोजी रु.35.56 कोटी असा एकूण निधी रु.70.96 कोटी इतका निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे. यापैकी महानगरपालिकेने रु.14.78 कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केला आहे व या रक्कमेतुन पुर्ण ठेव तत्वावर अधारित मंजुर योजनेतील कुपवाड झोनसाठीच्या गट क्र.1 मधील कामे पुर्ण करण्यात आली आहेत.

माळबंगला येथुन कुपवाड येथील उंच टाकी भरणेकरीता पंपिंग मशिनरी खरेदी करणे या कामाचा समावेश पॅकेज 3.2 मध्ये असुन माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथुन कुपवाड झोन मधील टाक्या भरणे करिता नविन 200 HP क्षमतेचे तीन व्ही. टी.पंप पुरविणे, उभारणी करणे व चाचणी करणे या कामाचा अंतर्भाव आहे व त्याचे रु.96 लक्षचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शासनाची मान्यता घेतली आहे. या कामाचा सुधारित प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला असुन त्यानुसार या कामाची किंमत रु. 87.34 कोटी येत आहे. जलशुध्दीकरण केंद्राचे काम अपुर्ण असुन पुर्ण क्षमतेने पाणी पुरवठा सुरु होण्यास विलंब लागणार असल्याने तीन पंप घेणे ऐवजी सध्या एका टाकीचे काम पुर्ण होत असल्याने व त्यास जुन्या जलशुध्दीकरण केंद्रामधुन पाणी पुरविणे शक्य असल्याने एक पंप घेणेची टिपणी पाणीपुरवठा विभागाने आयुक्ताकडे दि.25/11/2010 ने सादर केली आहे व आयुक्त यांनी पंप घेणेस दि.10/12/2010 रोजी मान्यता दिली आहे. सदर कामाच्या निविदा जा प्रक्र 8/10-11 ने दि.02/01/2011 रोजी दैनिक केसरी व ई टेंडर द्वारे प्रसिध्द केल्या (पृष्ठ क्र.39) असुन मे.प्रेसिजन इंजिनिअर्स, मिरज (9.95 टक्के जादा), मे.लक्ष्मी इंजिनिअरींग (9.5 टक्के जादा), अलाईड इलेक्ट्रोमेकॅनिकल प्राय. लिमि. पुणे (10.6 टक्के जादा) एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. सर्वात कमीचे निविदाधारक लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. यांना दि.31/01/2011 रोजी वाटाघाटीसाठी दि. 31/01/2011 व दि. 08/02/2011 रोजी बोलविले असुन ठेकेदाराने निविदादरापेक्षा



DRAFT

8 टक्के जादा दराने काम करण्यास दि.10/02/2011 च्या पत्रान्वये (पृष्ठ क्र.223) मान्य केले आहे. या कामाची निविदा सन 2009 -10 च्या मजिप्रा दरसूचीवर मागविण्यात आली असुन निविदेची किंमत रु.3103652/- इतकी आहे. ठेकेदाराचा वाटाघाटीनंतरचा देकार रु.3351944/- इतका आहे. पाणीपुरवठा विभागाने सन 2010-11 च्या मजिप्रा दरसुचीबरोबर दरपृथक्करण केले असुन त्यानुसार निविदेची किंमत रु.3354224/- इतकी आली आहे. चालु दरसूचीनुसार ठेकेदाराच्या दराशी तुलना केली असता ठेकेदाराचा दर 0.07 टक्के इतका कमीने आला आहे. सदर पंप पाणीपुरवठा विभागाने 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये घेतला असुन या कामाच्या निविदा दरास व खर्चास स्थायी समिती सभा क्र.29, ठराव क्र. 529 दि.04/03/2011 ने मान्यता दिली आहे. सदर काम ठेकेदाराने माहे डिसेंबर 2011 मध्ये पुर्ण केले आहे.

या कामाच्या नस्तीमधील पृष्ठ क्र. टी-15 दि.07/08/2012 च्या टिपणीचे अवलोकन केले असता कुपवाड विभागास पाणीपुरवठा करणे करीता एकच पंप कार्यरत असुन दि.15/07/2012 रोजी पंप बंद पडल्याने या भागाचा पाणीपुरवठा दोन दिवस खंडीत झाला होता. भविष्यात अशी अडचण होवू नये या साठी स्टँडबाय पंप घेणे आवश्यक आहे.  या करीता या कामाचे मंजुर निविदाधारक मे.लक्ष्मी इंजिनिअरींग सर्व्हिसेस हे पुर्वीचेच मंजुर दराप्रमाणे दोन व्हीटी पंप देण्यास तयार असल्याने त्यांचेकडुन वरीलप्रमाणे पंप घेण्याची शिफारस केली आहे. सध्याचे मंजुर निविदेप्रमाणे पंपिंग मशिनरी घेतलेस रक्कम रु. 52.81 लक्ष खर्च येणार आहे व सध्याच्या बाजारभावाप्रमाणे व सन 2011-12 चे दरसूचीप्रमाणे हा पंप घेतल्यास अंदाजे खर्च रु. 54.96 लक्ष इतका येणार आहे. निविदादार जुन्या दराप्रमाणे काम करणेस तयार असल्याने रक्कम रु.2.15 लक्षची बचत होणार आहे. सदर पंप खरेदीची टिपणी पाणीपुरवठा विभागाने आयुक्ताकडे सादर केली आहे. व आयुक्त यांनी दि.21/08/2012 रोजी पंप खरेदीस मान्यता दिली आहे. सदर पंप खरेदीचा प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समितीकडे दि. 23/08/2012 च्या विषयपत्रानुसार पाठविण्यात आला असुन स्थायी समिती सभा क्र.14, ठराव क्रमांक 233 विषय क्र.06 दि.29/08/2012 ने पंप खरेदीस मान्यता दिली आहे. निविदादाराने या कामाचे करारपत्र रक्कम रु. 4200/- च्या मुद्रांक पेपरवर दि.31/08/2012 केले आहे.

या कामाचा कार्यादेश पाणीपुरवठा विभागाने ठेकेदारास आदेश क्र.मनपा/पापुवि/सां/154/12-13 दि.14/09/ 2012 रोजी दिला आहे. (पृष्ठ क्र.647),

कामाची मुदत- 6 महिने.

ठेकेदाराने  Vertical Turbine Pump - 2 नग, Sluice Valve PN 16 - 2 नग , Reflux Valve PN 16 - 2 नग या साहित्याचा पुरवठा दि.30/04/2013 रोजी केला असुन मोजमाप पुस्तक क्र. 17, पृष्ठ क्र. 35 व 36 वर कामाची मापे नोंदविण्यात आली आहेत. या कामाच्या धावत्या देयकाची रक्कम रु.1763351/- ठेकेदारास प्रमाणक क्र. 02 ने दि.28/06/2013 रोजी आदा केली आहे

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक व प्रमाणकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.99 दि.21/04/ 2016 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले

DRAFT

नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) कुपवाड विभागाकडे एकच मोटार व पंप आहे व पंप नादुरूस्त झालेस पाणीपुरवठा खंडीत होऊ नये तसेच 70 MLD जलशुध्दीकरण केंद्राचे काम पुर्ण होत असुन त्या ठिकाणी पंपाची आवश्यकता असल्याने तातडीने पंप खरेदी करण्यात आले आहेत. मार्च 2016 अखेर जलशुध्दीकरण केंद्राचे काम अपुर्ण असल्याने त्या ठिकाणाहुन अद्यापही पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित झाल्यानंतरच या पंपाचा वापर होणार असल्याने पंप खरेदीवर करण्यात आलेला खर्चाची रक्कम रु.1763351/- अनावश्यकपणे गुंतुन पडल्याचे दिसुन येते.

3) सदर कामाचे दरपृथ्थकरण पृष्ठ क्र. 551 वर करण्यात आले असुन त्यामध्ये 4 टक्के जकातीची रक्कम रु.78180/- चा समावेश करुन निविदेची रक्कम रु.4890570/- ठरविण्यात आली आहे व या रक्कमेवर 8 टक्के जादा दराने रक्कम रु.5281815.60/- वर निविदा मान्य करण्यात आली आहे. परंतु धावते देयक क्र. 2 ची रक्कम रु.1763351/- प्रमाणकाची तपासणी केली असता, देयकाबरोबर जकात भरल्याच्या पावत्या जोडण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे जकातीची रक्कम रु.78180/- कपात करण्यात यावी.

4)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जनरल नोटस अ.क्र. 2 नुसार दरसुचीमध्ये नमुद केलेल्या बाबींच्या दरामध्ये सर्व कर, शुल्क व विम्याच्या रक्कमेचा समावेश आहे. त्यामुळे या कामाच्या देयकामधून विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,यांचे पत्र क्र.प्रविनी-2305/ सहविमा /साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार 1% विम्याची रक्कम कपात करणे आवश्यक आहे. परंतु सदर देयकामधुन विमा रक्कम कपात केली नसल्याने रक्कम रु.1763351/- च्या 1 टक्के प्रमाणे रु.17633/- कपात करणे आवश्यक आहे.

DATSBKM7201 (Ref No : 99)

## *78 मिरज शहर भुयारी गटर योजनेमध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत.*

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 23**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनिस: राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 83423987.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 47337557.00/-

***नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक –एनयुआर - 2008/प्र.क्र.203/नवि-33, दि:20 फेब्रुवारी 2010 मधील अनुक्रमांक 05 नुसार नगरोत्थान महाभियानात सहभागी होण्यासाठी महानगरपालिकेने राज्य शासनाबरोबर सामंजस्याचा लेखी करार करुन शासनाने विहीत केलेला सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम मान्य केले आहे. कराराप्रमाणे महानगरपालिकेचे लेखे 2012-13 पासुन द्विनोंद पध्दतीमध्ये ठेवणे आवश्यक***

DRAFT

***आहे. परंतु 2013-14 या आर्थिक वर्षाचे लेखे सिंगल एन्ट्री सिस्टिममध्ये ठेवण्यात आले आहेत. महानगरपालिकेने मत्ता व दायित्व यांचे मुल्यांकन केलेले नाही. ई गव्हर्नन्स अंतर्गत अ.क्र.2 मधील a) ते l) मध्ये दिलेल्या सुधारणा HCL कंपनीशी BOT तत्वावर करार करुन केल्या आहेत. परंतु कंपनीची देयके दिली नसल्याने त्यांनी काम बंद केले असून सर्व काम पुन्हा 2013-14 या आर्थिक वर्षापासुन मॅन्युअली चालू झाले आहे. या कराराअंतर्गत सुधारणामधील अ.क्र.3 नुसार 2012-13 पासुन घरपट्टी भांडवली मुल्यावर चालु करण्याचे नमूद आहे. परंतु महानगरपालिकेने 2013 -14 या आर्थिक वर्षा अखेर घरपट्टीची वसुली भांडवली मूल्यावर चालू केलेली नाही. महासभा क्रमांक (विस) 01, ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 ने भुयारी गटार योजनेसाठी महानगरपालिका हिश्श्याची रक्कमेची तरतुद करण्यासाठी अंदाजे रु.125 कोटी कर्ज उभारणीस व चालु व्याजदर व 10 वर्ष कर्ज परतफेड कालावधी धरता दरवर्षी रु.20 कोटीची अतिरिक्त तरतुद कर्ज फेडीसाठी अर्थसंकल्पात करणेस व सिंकींग फंडामध्ये सदर रक्कम वर्ग करुन कर्जफेड नियमित स्वरुपात करणेसाठी सभेने मान्यता दिली आहे. परंतु सिंकींग फंड उभारण्यात आलेला नाही. कामाचा बार चार्ट ठेकेदाराने विलंबाने दिलेला आहे. या कामाची निविदेचे दरपृथ:करण चालू दरसूची 2012-13 बरोबर करुन चालू निविदा दराच्या 9.72 टक्के जादा दराने निविदा मंजुर केली आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.डी.पी.डब्ल्यु 1996/16 ब/ लेखापरीक्षा, मंत्रालय दि.20/09/1997 नुसार चालू दरसूचीच्या अधारे दरपृथ:करण केलेल्या निविदेचे अधिक्य 5 टक्केपेक्षा जास्त आल्यास अशा अधिक्यास शासनाची पुर्वमंजुरी घेणे आवश्यक असता ती घेण्यात आलेली नाही. जादाचे काम करताना सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद 263 नुसार कार्यकारी अभियंता यांनी पुरक अंदाजपत्रक तयार करुन त्यास आयुक्तांची मान्यता घेतल्यानंतर काम करणे आवश्यक असता कार्यकारी अभियंता व स्थानिक नगरसेवक यांनी दिलेल्या तोंडी सूचनेनुसार ड्रेनेज लाईनचे 13 कि.मी.चे जादा काम करण्यात आले आहे. या कामाचा डी.पी.आर. मजिप्राने सन 2003 मध्ये UIDSSMT योजनेसाठी तयार केला होता. मजिप्राने भुयारी गटार योजनेचा पुन्हा सर्व्हे करुन सुधारित डीपीआर तयार न करता जुनाच डी.पी.आर. 2010-11 च्या दरसूचीमधील दर वापरुन नगरोत्थान योजनेसाठी वापरण्यात आला आहे. ठेकेदाराची देयके आदा करताना शासन व मनपा हिस्सा याप्रमाणे आदा न करता सर्व देयके स्वनिधी मधुन आदा केली आहेत.***

DRAFT

सांगली,मिरज आणि कुपवाड शहरातील ड्रेनेज व्यवस्था मूळ शहरापुरतीच असून,कुपवाडसह विस्तारित भागात ड्रेनेज व्यवस्था तातडीने राबविणे आवश्यक आहे. तसेच मूळ शहरातील ड्रेनेज व्यवस्था कालबाह्य झाल्याने शहरासाठी भुयारी गटर राबविणे आवश्यक आहे. यासाठीचा प्रस्ताव केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहराच्या पायाभूत विकास कार्यक्रमांतर्गत (UIDSSMT) केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. त्यास राज्यस्तरीय नोडल एजन्सी (SLSC) दि.28/09/2006 रोजी मान्यता झाली आहे. परंतु केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली नसल्याने व भविष्यात निधी उपलब्ध होण्याची शक्यता नसल्याने सदरचे दोन्ही प्रकल्प मार्गी लागण्यासाठी राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत या दोन्ही प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे.

मिरज शहर भुयारी गटार योजनेसाठी राज्यस्तरीय प्रकल्प व सनियंत्रण समितीची मान्यता दि.01/10/2011 रोजीच्या बैठकीमध्ये मिळाली आहे. या योजनेसाठी नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.नगरो-2011/प्र.क्र.-218/11/नवि -33,दि. 31 मार्च 2012 ने रु. 7 कोटी 07 लाख इतका निधी मंजुर होवून दि. 04/05/2012 रोजी प्राप्त झाला आहे. (सदरचा शासन निर्णय सन 2011-12 जलनिस्सारण विभाग सांगली महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान योजने अंतर्गत महापालिका क्षेत्रातील वानलेसवाडी इत्यादी मिरज शहरासाठी भुमीगत ड्रेनेज योजने अंतर्गत अंदाजपत्रके, आराखडे तयार करणे बाबत या फाईलचे पृष्ठ क्र.747 वर आहे ) सदर शासन निर्णयातील अट क्र.6 नुसार दि.01/04/2012 पासून महानगरपालिका क्षेत्रात भांडवली मूल्यावर अधारित मालमत्ताकर प्रणाली लागू करावी. महानगरपालिकेने सिकींग फंड तयार करुन त्यातील निधीचा वापर फक्त कर्जाच्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी करावा. अट क्र.7 नुसार प्रकल्पातील किमतीपोटी MUIDCL कडून महानगरपालिकेस प्राप्त होणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड महानगरपालिकेने प्रामुख्याने तेराव्या वित्त आयोगातील होणा-या निधीतून तसेच रस्ते अनुदानातून मिळणा-या निधीतून करण्याचे नियोजन करावे व त्यादृष्टीने सदर स्त्रोतातून महानगरपालिकेस प्राप्त होणा-या रक्कमा कर्जापोटी शासनास परस्पर वळत्या करून संबंधित वित्तिय संस्थेस म्हणजेच MUIDCL यास कर्जाच्या परतफेडीपोटी वर्ग करण्यास महानगरपालिकेची संमती आहे असा ठराव महानगरपालिकेने करुन त्याची प्रत शासनास सादर करावी. अट क्र. 8 वरील अटींच्या पुर्ततेस आधिन राहून करारनाम्यात नमूद केलेल्या सुधारणाबाबत वर्षनिहाय केलेली प्रगती पाहून तसेच वितरीत केलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र दिल्यानंतरच सदर योजने अंतर्गत राज्य शासनाचा पुढील हिस्सा वितरित करण्यात येईल.(पृष्ठ क्र.220). तसेच नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक - नगरो 2012/ प्र.क्र.189/ नवि 33 दि.25/03/2013 ने सांगली गटार योजनेसाठी पहिल्या हप्त्यातील उर्वरित रक्कम रु.10.28 कोटी व मिरज गटार योजनेसाठी पहिल्या हप्त्याची उर्वरित रक्कम रु.7.07 कोटी अनुदान उपलब्ध करण्यास या शासन निर्णयाने खालील अटींच्या अधिन मान्यता दिली आहे.

अ) निधीचा वापर नमुद प्रकल्पाकरीताच असणे आवश्यक राहील. सदर निधीचा इतर बाबींवरील वापर ही आर्थिक अनियमितता मानली जाईल.

ब)सदर प्रकल्पाकरिता मंजूर निविदा किंमतीपेक्षा निविदा स्विकृतीची किंमत आधिक असल्यास त्याचे दायित्व महानगरपालिकेवर राहिल.

क) प्रकल्पाच्या किंमतीपोटी MUIDCL/ MUINFRA कडून संबंधीत नागरी स्वराज्य संस्थेस प्राप्त होणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड या नागरी स्वराज्य संस्थेने प्रामुख्याने तेराव्या वित्त आयोगातील मिळणा-या निधीतून करण्याचे नियोजन करावे व त्या दृष्टीने सदर स्त्रोतातून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस प्राप्त होणा-या रक्कमा कर्जापाटी शासनाने परस्पर वळत्या करुन संबंधीत वित्तिय संस्थेस कर्जाच्या परतफेडीसाठी वर्ग करण्यासंबंधी नागरी स्वराज्य संस्थेची संमंती आहे असा ठराव करुन त्याची प्रत शासनास सादर करावी. सदर निधीचे वितरण महाराष्ट्र शासन,नगरविकास

DRAFT

विभाग शासन निर्णय क्रमांक : नगरो -2014 /प्र.क्र.219/नवि -33 दि.12 फेब्रुवारी 2015 चे शासन निर्णयाने केले आहे.

कुपवाड शहराकरीता अद्याप कोणत्याही भुयारी गटर योजनेची सुविधा नसल्याने कुपवाड शहराकरीता नव्याने योजना मंजुरीसाठी सांगली व मिरज या दोन्ही शहराबरोबर सादर करण्याचे ठरले आहे. योजनेच्या किमती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नाव | किंमत कोटी रु. |
|---|---|---|
| 1 | सांगली शहर भुयारी गटर योजना टप्पा क्र.2 भाग 2 | 108.66 |
| 2 | मिरज शहराकरिता भुयारी गटर योजना | 62.30 |
| 3 | कुपवाड शहर भुयारी गटर योजना | 146.31 |
| | एकूण | 317.27 |

नगरोत्थान योजने अंतर्गत खालीलप्रमाणे आकृतीबंध आहे. (रुपये कोटीमध्ये)

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनेची किंमत रु. | शासकीय अनुदान 50% रु. | MUIDCL कर्ज रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | सांगली शहर भुयारी गटर योजना टप्पा क्र.2 भाग 2 | 108.66 | 54.33 | 54.33 |
| 2 | मिरज शहराकरिता भुयारी गटर योजना | 62.30 | 31.15 | 31.15 |
| 3 | कुपवाड शहर भुयारी गटर योजना | 146.31 | 73.15 | 73.15 |
| | एकूण | 317.27 | 158.63 | 158.63 |

DRAFT

वरील आकृतीबंधाप्रमाणे सांगली, मिरज आणि कुपवाड या तिन्ही शहराकरीता भुयारी गटर योजनेचे एकूण रक्कम रु.317.27 कोटीच्या योजनेस महासभा क्र. 08 ठराव क्र.222 दि.20/03/ 2010 रोजी ऐनवेळच्या विषयाने मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेकरीता महानगरपालिकेने 50 टक्के इतका निधी रक्कम रु.158.63 कोटी कर्ज रुपाने उभा करणेस महासभेने मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानात सहभागी होण्यासाठी शासनाबरोबर लेखी करार करणे आणि त्याचबरोबर महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एनयुआर-222008/प्र.क्र.203/नवि-33/मंत्रालय मुंबई दि.20/02/2010 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व अटी व शर्तीचा स्विकार करून सदर तिन्ही शहरांच्या भुयारी गटर योजनेवरील आकृतीबंधाप्रमाणे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान सुवर्णजयंती महा अभियान योजने अंतर्गत सहभागी होणेकामी मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणेस आणि सदरची योजना राबविणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस महासभेने मंजूरी दिली आहे.

या कामाच्या निविदा नस्तीमधील दि.28/11/2011 वर (पृष्ठ क्र.T-3 ते T-19) जलनि:सारण

विभागाने भुयारी गटार योजनेची निविदा काढणेसाठी दोन पर्याय दिले असलेचे नमूद आहे. पर्याय क्र.1 नुसार सांगली भुयारी गटार योजनेची कामे तीन गटात विभागणी करुन गट क्र. 1 मध्ये गटार योजनेची सर्व पाईप लाइन टाकणे रक्कम रु.46,68,48,715/-, गट क्र.2 मलशुध्दीकरण केंद्र रक्कम रु.17,33,60,000/-, गट क्र.3. पंप हाऊस व पंपिंग मशिनरी व किरकोळ कामे करणे रक्कम रु.4,53,63,727/-, या कामाचा समावेश होता.

पर्याय क्र.2 नुसार भुयारी गटार योजनेची कामे चार गटात विभागणी करूण करणे गट क्र.1 नुसार मुख्य मलनि:सारण वाहिन्या व दाब नलिका टाकणे रक्कम रु.29,45,46,634/-, गट क्र.2 नुसार मलनि:सारण मधील उपवाहिन्या व शाखा वाहिन्या टाकणे रक्कम रु.17,23,02,081/-,गट क्र.3 नुसार मलशुध्दीकरण केंद्र रक्कम रु.17,33,60,000/-, गट क्र.4. पंप हाऊस व पंपिंग मशिनरी व किरकोळ कामे करणे रक्कम रु.4,53,63,727/-. असे दोन पर्याय सुचविण्यात आले. यापैकी पर्याय क्र. 2 प्रमाणे काम करण्यास आयुक्त यांनी मान्यता दिली असून त्याप्रमाणे काम करणेची शिफारस केली आहे. आयुक्त यांनी प्रस्तावास दिलेल्या मंजूरीप्रमाणे उपायुक्त यांनी दि.01/12/2011 रोजी विषयपत्र तयार करून स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर केले आहे. विषयपत्रामध्ये भुयारी गटार योजनेची आर्थिक व भौतिक व्याप्ती मोठी आहे. यामुळे कामे करताना उपांगांचे गट तयार करुन निविदा मागवाव्या लागणार आहेत. कामाचे गट तयार करताना उपांगाचा प्रकार उदा. पाईपलाईन आर.सी.सी.वर्क अथवा यांत्रिकी तसेच किंमत व कालावधी यांचा विचार करावा लागणार आहे. कामाच्या प्रकारानुसार त्या त्या कामात प्राविण्य असणारे ठेकेदार नेमावे लागणार आहेत. निविदा मागविताना उपलब्ध होणा-या निधीचा विचार करावा लागेल. या सर्वांचा विचार करुन सांगलीसाठी व मिरज साठी चार गट तयार करण्यात आलेचे विषयपत्रामध्ये नमुद आहे. (पृष्ठ क्र. 37 ते 49).

पाणीपुरवठा विभागाच्या दि.06/07/2012 च्या निविदा नस्ती मधील पृष्ठ क्र. (T29) नुसार सांगली व मिरज शहरांच्या भुयारी गटार योजनांच्या कामांची जाहिर निविदा मागविणेसाठी प्रशासनाच्या दि.01/02/2012 रोजीच्या प्रस्तावानुसार स्थायी समिती ठराव क्र.635 विषय क्र.26 दि.05/03/2012 अन्वये सांगली भुयारी गटार योजनेच्या रु.68,55,72,442/- या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या एकत्रित खर्चाच्या निविदा मागविणेस व स्थायी समिती ठराव क्र. 636 विषय क्र.27 अन्वये मिरज भुयारी गटार योजनेच्या एकत्रित निविदा मागविण्यास व यासाठी येणाऱ्या रु.55,55,80,821 च्या खर्चास तसेच प्रसिध्दीचे खर्चास दि.05/03/2012 रोजी मान्यता मिळाली आहे. (पृष्ठ क्र.59 व 60). तद्नंतर योजनेच्या पूर्व अर्हता, शर्ती व अटी या योजनेचे पी.एम.सी. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून प्राप्त करुन या कामासाठी दि.29 एप्रिल 2012 रोजी दै.सकाळ व इंडियन एक्सप्रेस या राज्यस्तरीय वृत्तपत्रांमध्ये जाहीर ई निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. या कामाच्या निविदा दि. 30/05/2012 पासून दि.01/06/2012 पर्यंत सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ई टेंडरद्वारे केंव्हाही दाखल करण्यात येतील. वरील कामाच्या निविदा दि.02/06/ 2012 रोजी शक्य झाल्यास उघडण्यात येतील. जाहीर केलेल्या निविदा कार्यक्रमानुसार इच्छुक ठेकेदारांनी दि.01/05/2012

DRAFT

ते 15/05/2012 या कालावधीत पूर्व अर्हता अटींची पूर्तता करणारी कागदपत्रे ई- निविदाद्वारे सादर करावयाची होती. सदर पूर्व अर्हता अटी उघडून तपासणीचा कालावधी दि.18/05/2012 ते 23/05/2012 होता. त्यानुसार दि.18/05/2012 व 19/05/2012 रोजी ठेकेदारांची पूर्व अर्हता अटीबाबतची कागदपत्रे संगणकावरुन डाऊनलोड करण्यात आली. सांगली व मिरज या दोन विविध कामासाठी प्रत्येकी नऊ ठेकेदारांनी निविदा दाखल केल्या आहेत. त्यांची नावे खालील प्रमाणे 1) एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्राय. लिमिटेड, ठाणे. 2) घारपुरे इंजिनिअरींग अँड कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड पुणे. 3)सिव एआयपीपीएल - जॉईन्ट व्हेंचर. 4) एस.एम.पी.एल.इन्फ्रा लि. 5) मे.खिलारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड 6) मे.रॅमकी इन्फ्रास्टक्चर प्रायव्हेट लिमिटेड हैद्राबाद. 7) लक्ष्मी एच.डी.ओ.जे.व्ही. 8) किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड 9) मे.आर.बी.कृष्णानी प्रो.राजीव बी.कृष्णानी.पृष्ठ क्र. (T26) .सांगली व मिरजेच्या पूर्वअर्हता अटी व शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ठेकेदारांच्या सर्व प्राप्त कागदपत्रांची छाननी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंत्यांच्या मदतीने करण्यात आली. पात्रतेच्या निकषानुसार विस्तृत तक्ता नस्तीमधील पृष्ठ क्र. 133 ते 139 वर लगत केला आहे. त्यानुसार पात्र ठेकेदारांची यादी पुढीलप्रमाणे  आहे. 1) एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्राय. लिमिटेड, ठाणे. 2) घारपुरे इंजिनिअरींग अँड कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड पुणे. 3) मे.रॅमकी इन्फ्रास्टक्चर प्रायव्हेट लिमिटेड हैद्राबाद. 4) लक्ष्मी एच.डी.ओ.जे.व्ही. निविदेचे पुढील टप्प्याचे सुधारीत वेळापत्रक पृष्ठ क्र.141 वर लगत आहे. वरील प्रमाणे पात्र ठेकेदारांच्या यादीस व सुधारीत वेळापत्रकास आयुक्त यांनी दि.04/06/2012 रोजी मान्यता दिली आहे.  दरम्यान दि.12/06/2012 रोजीच्या महासभेमध्ये नगरसेवक श्री.मुन्ना कुरणे यांनी सांगली महानगरपालिकेच्या सभा कामकाज नियमावलीमधील कलम 3/23 अन्वये प्रशासनाने पात्र ठरविलेल्या रॅम्के इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस कोल्हापूर व पुणे महानगरपालिकेने काळ्या यादीमध्ये टाकले आहे. डी.पी.आर. मध्ये मिरजेसाठी WSP (West Stabilisation Pond) या तंत्राचा वापर severage treatment plant (STP) साठी प्रस्तावित केला असताना प्रशासनाने निविदेमध्ये  SBR (Sequential Batch Reactor)  तंत्राचा वापर असलेल्या कंपन्यांसाठी निविदा काढली आहे. असा अरोपाचा प्रस्ताव दाखल केला आहे.   दिलेल्या प्रस्तावावर महासभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा.महापौर यांनी दिलेल्या सुचना व चर्चेत उपस्थीत केलेले मुद्दे व त्यावर प्रशासनाने दिलेली उत्तरे याबाबतचा अहवाल उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांनी दि.12/07/2012 रोजी होणा-या स्थायी समितीच्या बैठकीसाठी  विषयपत्राने सादर केला आहे. स्थायी समिती सभा क्र.09 ,ठराव क्र.141 विषय क्र.22 दि.17/07/12 ने या अहवालाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करुन सदर निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक बाबींची दक्षता घेणे हे महानगरपालिका प्रशासनाचे काम आहे. तांत्रिक व कायदेशीर बाबी प्रशासनाने तपासून निविदा प्रक्रिया तात्काळ सुरू करावे असे समितीने प्रशासनास आदेश केले आहेत. (पृष्ठ क्र.246). त्यानुसार आयुक्त यांनी निविदाबाबतचे सुधारित वेळापत्रक तयार केले आहे. ऑनलाईन टेंडर डॉक्यूमेंट खरेदी करणे 31/07/2012, प्री बीड मिटींग दि.06/08/2012, ऑनलाईन प्री बीड क्लेरिफिकेशन दि.10/08/2012, ऑनलाईन सबमिशन ऑफ बीड 10/08/2012 ते 16/08/2012.

DRAFT

ऑनलाईन टेंडर ओपनिंग दि.17/08/2012. (पृष्ठ क्र.249).

मिरज भुयारी गटार योजना, अंदाजपत्रकीय रक्कम रु.52,20,73,415/- या कामाच्या ई टेंडरद्वारे प्राप्त निविदा दि.21/08/2012 रोजी उघडण्यात आल्या होत्या. या कामासाठी एकूण तीन निविदा आलेल्या आहेत. 1) एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड आलेला दर रु.94,52,66,125/- एस्टीमेट रक्कमेच्या 81.06 टक्के जादा 2)घारपूरे इंजिनिअरींग अँड कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड आलेला दर रु.99,15,21,829/- एस्टीमेट रक्कमेच्या 89.92 टक्के जादा 3) लक्ष्मी इंजिनिअरींग सर्व्हीसेस अँड प्रायव्हेट लिमिटेड आलेला दर रु.100,96,89,984/- एस्टीमेट रक्कमेच्या 93.4 टक्के जादाने आलेला आहे. (नस्तीमधील पृष्ठ क्र.535).

प्राप्त निविदांचा किमान देकार मुळ निविदा किमतीवरती अनुक्रमे 81 टक्के व 81.06 टक्के असा जादा होता. कामाच्या निविदा या सन 2010-11 च्या दरसूचीवर आधारीत होत्या. निविदा उघडण्यात आल्या त्यावेळी सन 2011-12 ची दरसूची लागू होती. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सदर निविदेचे मुल्यांकन करुन घेण्यात आले होते. निविदा दर जास्त असल्याने आयुक्तसो यांच्या स्तरावर ठेकेदाराबरोबर निविदा समितीसमोर वाटाघाटी झाल्या. त्यात ठेकेदाराने त्यांचा निविदा दर मिरजेसाठी 81.06 टक्केवरुन 61.71 टक्के ने कमी केला आहे व तसे ठेकेदाराने महानगरपालिकेस SMC/PROJ/2012/SMKC/01 दि.23/08/2012 चे पत्राने कळविले आहे. (पृष्ठ क्र.613). सदर दर तात्कालीन दरसूचीनुसार (2011-12) जास्त असल्याने ठेकेदारास दि.28/08/2012 रोजी फेर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु त्याच वेळी सन 2012-13 ची दरसूची प्रसिध्द होण्याच्या मार्गावर असल्याने ठेकेदाराने नविन दरसूचीनुसार मुल्यांकन करण्याची विनंती केली होती. तसेच महासभा क्रमांक 10 ,ठराव क्र.350 विषय क्रमांक 1(ज) नुसार दि.23/01/2013 ने निविदा काढून सहा महिन्याचा कालावधी झाले आहेत. परंतु निविदेस अंतिम मान्यता झालेली नाही. 2012-13 ची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसूची प्रसिध्द झाल्यानंतर आलेल्या निविदा मान्यतेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने महासभेस लवकरात लवकर सादर करावा असे या ठरावान्वये आदेशीत केले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुणे यांनी जाक्र.मु.अ./प्रव्यससे(पुणे)/ताशां-4/ प्र.क्र.98/332 दि.13/02/2013 चे पत्राने सांगली भुयारी गटार योजनेच्या निविदेची सन 2012-13 दरसूचीनुसार मुल्यांकित किंमत रु.883697125/- व मिरज भुयारी गटार योजनेची मुल्यांकित किंमत रु.706741177/- झाली असल्याचे कळविले आहे.(पृष्ठ क्र.632) . त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने जा.क्र/ड्रेनेज 224/12-13 दि.01/03/2013 चे पत्राने सांगली भुयारी गटार योजनेसाठी व मिरज भुयारी गटार योजनेसाठी जा.क्र/ड्रेनेज 225/12-13 दि.01/03/2013 रोजी पत्र पाठवुन ठेकेदार एस.एम.सी.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.ठाणे यांना अंतिम देकार रक्कमेच्या वाटाघाटीस आयुक्त यांचे कार्यालयात दि.12/03/2013 रोजी उपस्थित राहण्यासाठी कळविले आहे. (पृष्ठ क्र.649). दि.12/03/2013 रोजी झालेल्या वाटाघाटीच्या अनुषंगाने ठेकेदाराने त्यांचे दि.12/03/2013 व दि.14/03/2013 च्या पत्राने आपले लेखी म्हणने महानगरपालिकेस दि.21/03/2013 रोजी सादर केले

DRAFT

आहे. (पृष्ठ क्र.655) या पत्रामध्ये कॉम्पोझिट व्हॅट, काम करताना युटीलिटीजची दुरुस्ती, शुगरकेन एरिया असल्याने कामगारांची कमतरता या अडचणींचा उल्लेख ठेकेदाराने दोन्हीही निविदांना चालु दरसूचीच्या (सन 2012-13) 9.72 टक्के जादा दराने काम करणेस लेखी सहमती दिली आहे.

ठेकेदाराचा प्राप्त देकार पाहता, सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

ब) मिरज भुयारी गटार योजना टप्पा क्र.2 (पृष्ठ क्र.599 महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र जाक्र.मुअ. (प्र.व्य.स.से.)/पुणे /तांशा -4 /1665 दि.27/08/2012)

| | | |
|---|---|---|
| 1 | निविदेची किंमत 2010 -11 दरसूची | रु. 50,45,60,058 /- |
| 2 | न्यूनतम ठेकेदाराचा देकार | रु.913556441/- (81.06%) जादा |
| 3 | 2011-12 नुसार मजिप्राने केलेली मुल्यांकित किंमत | रु.66,04,95,000/- (30.91%) जादा |
| 4 | प्रथम वाटाघाटीनंतर ठेकेदाराचा देकार | रु.81,59,24,069/- (61.71%)जादा |
| 5 | सन 2012-13 नुसार मजीप्राने केलेली मुल्यांकित किंमत | रु.70,67,41,177/- (36.56% )जादा |
| 6 | सन 2012-13 च्या मुल्यांकित किमतीशी तुलना करता ठेकेदाराचा देकार | 15.45 टक्के |
| 7 | दि.12/03/2013 च्या वाटाघाटीनंतरचा ठेकेदाराच देकार | रु.77,54,36,420/- सन 2012-13 मुल्यांकित किमतीच्या 9.72 टक्के जादा |
| 8 | निविदा किमतीच्या तुलनेत ठेकेदाराचा अंतिम देकार | 53.68 टक्के जादा |

सांगली भूयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 आणि मिरज भूयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 योजनांच्या कामाच्या निविदांचा आलेला देकार व अनुषंगिक बाबींबाबत निर्णय घेणेसाठी उपायुक्त यांनी क्र/मनपा/ जलवि/ 256/12-13 दि.30/03/2013 रोजी महासभेकडे खालील प्रमाणे विषयपत्र सादर केले आहे. (पृष्ठ क्र.693 ते 698)

दोन्ही योजनेतील प्रसिध्द केलेल्या निविदेतील कामांची एकत्रित किंमत मंजूर योजनेप्रमाणे रु.115.16 कोटी एवढी होती. सन 2012-13 च्या दरसूचीनुसार दोन्ही योजनांची मजीप्राकडुन केलेली मुल्यांकित रक्कम रु.159.04 कोटी एवढी आहे. सुधारित योजना सादर केलेनंतर या किमतीला शासनाकडुन मंजूरी मिळू शकेल. योजनेच्या आकृतीबंधाप्रमाणे रु.79.52 कोटी (50 टक्के) शासना कडुन प्राप्त होवु शकतील. तसेच उर्वरित रक्कम रु. 79.52 कोटी (50 टक्के) महानगरपालिकेस कर्ज रुपाने उपलब्ध करुन द्यावे लागतील. ठेकेदाराचा अंतिम देकार एकत्रित रु.174.50 कोटी एवढा आहे. सुधारीत योजनेच्या किंमतीपेक्षा जास्तीचा दर महानगरपालिकेस सोसावा लागणार आहे. ठेकेदाराच्या अंतिम देकारानुसार येणा-या वाढीव खर्चासाठी (15.46 कोटी) व दरसूचीतील फरक रु.43.87 कोटी असा एकूण 59.33 कोटी मंजूर रक्कमेपेक्षा जादा खर्च अपेक्षित आहे. दरसूचीतील फरक रक्कम

DRAFT

रु.43.87 कोटीसाठी योजना सुधारीत करून शासनास सादर करुन मान्यता घ्यावी लागणार आहे. तसेच जादा देकारासाठीचे रु.15.46 कोटी महानगरपालिकेस स्वनिधीमधून खर्च करावे लागणार आहेत. दरसूचीतील फरक व मुळ मंजूर किंमत यांचे एकत्रित रक्कमेच्या 50 टक्के म्हणजेच रु.79.52 कोटी महानगरपालिकेस उभा करावे लागणार आहेत. दोन्ही योजनासाठी सुधारीत योजनेच्या 50 टक्के महानगरपालिका हिस्सा व ठेकेदाराचा चालू दरसूचीवरील जादाचा देकार रु.15.46 कोटी असा एकत्रित रु.94.98 कोटी तसेच संभाव्य भाववाढीचा विचार करता रु.100 कोटीपर्यंत वित्तिय भार महानगरपालिकेस कर्ज अथवा स्वनिधीच्या स्वरुपात द्यावा लागणार आहे. सदरचे विषयपत्र उपायुक्त(जलवि) यांनी दि.30/03/2013 रोजी सादर केले आहे व सदर विषयपत्र अवलोकनी घेवून महासभेने महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 खालीलप्रमाणे मान्यता दिली आहे. (पृष्ठ क्र.699 ते 707)

1) सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 च्या निविदा दरास निविदा किमतीच्या 49.82 टक्के जादा दराने तसेच चालु दरसूचीनुसार (सन 2012-13) 9.72 टक्के जादा दरास ही सभा मान्यता देत आहे.

2) मिरज भुयारी गटर योजना टप्पा क्र.2 च्या निविदा दरास निविदा किंमतीच्या 53.68 टक्के जादा दराने तसेच चालु दरसूचीनुसार (सन 2012-13) 9.72 टक्के जादा दरास मान्यता देत आहे.

3) दरसूचीतील फरक मिळणेसाठी सुधारीत योजना शासनास सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

4) अंदाजे रु.125 कोटी कर्ज उभारणीस ही सभा मान्यता देत आहे.

5) चालु व्याजदर व 10 वर्ष कर्ज परतफेड कालावधी धरता दरवर्षी रु.20 कोटीची अतिरिक्त तरतुद कर्ज फेडीसाठी अर्थसंकल्पात करणे व सिंकींग फंडामध्ये सदर रक्कम वर्ग करुन कर्जफेड नियमित स्वरुपात करणे यासाठी ही सभा मान्यता देत आहे.

6) महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा,जलनि:सारण, घरपट्टी व मालमत्ता इत्यादी विभागांचे सेवांचे दर /सेवाशुल्क इत्यादींची आकारणी महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र.शासन निर्णय क्र.संकिर्ण-2009/प्र.क्र.207/09/नवि 20/मंत्रालय मुंबई दि.02/08/2010 व महाराष्ट्र शासनाशी दि.02/08/2010 रोजी केलेल्या सामंजस्य कराराप्रमाणे सुधारीत कर आकारणी व इतर प्रशासकीय व आर्थिक सुधारणा करणे, विषयाची प्रक्रिया चालु आर्थिक वर्षापासून सुरु करण्यास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गतच्या मिरज गटार योजना टप्पा क्र.2 (उपमलनि:सारण वाहिन्या, मलनि:सारण वाहिन्या, दाबनलिका, पंपगृह उत्प्रेक्षण यंत्रणा, मलशुध्दीकरण केंद्र, विल्हेवाट व्यवस्था, चाचणी देणे ई काम.) अंदाजित खर्च रु.504560058/-करारपत्र महानगरपालिका व ठेकेदार एस.एम.सी.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे मध्ये दि.30/04/2013 रोजी झाला आहे. ठेकेदाराने रु.5 लाख मुद्रांक शुल्कापोटी भरणा केले आहेत.

DRAFT

कामाची समज:- कार्यकारी अभियंता मलनि:सारण विभाग यांचे पत्र क्र.मनपा /जलवि/ सां/17/ दि.09/04/2013 अन्वये कामाची समज देण्यात आली असून सुरक्षा अनामत रक्कम स्विकृत निविदेच्या 2.5 टक्के राष्ट्रीयकृत बँकेच्या ठेव पावती किंवा बँक गॅरेंटीच्या स्वरुपात सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या नावे ठेवुन करारपत्र करणेस व उर्वरित 2.5 टक्के रक्कम देयकामधून कपात करणेस ठेकेदारास कळविण्यात आले आहे. त्यानुसार ठेकेदाराने आय.डी.बी.आय बँक ठाणे, या बँकेची बँक गॅरेंटी क्र.1307831BGF00068, रक्कम रु.19385911/-, मुदत दि.12/04/2015 पर्यंत ठेकेदाराने दिली आहे.

कामाची वर्कऑर्डर :- क्रं/ ड्रेनेज डिपार्टमेंट / नगरोत्थान/ सांगली/92/ 13-14 दि.30/04/2013 (मिरज भूयारी गटार टप्पा क्र.2 ची (नस्ती क्र.1 पृष्ठ क्र.24)

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गतच्या मिरज गटार योजना टप्पा क्र.2 (उप मलनि:सारण वाहिन्या, मलनि:सारण वाहिन्या, दाबनलिका, पंपगृह उत्प्रेक्षण यंत्रणा, मलशुध्दीकरण केंद्र, विल्हेवाट व्यवस्था, चाचणी देणे ई काम.) अंदाजित खर्च रु.504560058/- ,निविदा मंजूर केल्यानंतरचा दर रु.775436420/- (53.82 टक्के जादा दराने) करारपत्र महानगरपालिका व ठेकेदार एस.एम.सी.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे मध्ये दि.29/04/2013 रोजी झाला आहे. ठेकेदाराने रु.5 लाख मुद्रांक शुल्कापोटी भरणा केले आहेत.

जमवाजमव उचल :- मुख्य करारपत्रामधील मुद्दा क्र.11 अन्वये ठेकेदारास जमवाजमव उचल अनुज्ञेय आहे. बी-1 करारपत्रात समाविष्ठ असलेल्या देकार पूर्व बैठकीच्या खुलाशातील जोडपत्र 1 नुसार पृष्ठ क्र.22 वर याबाबतचा तपशिल दिलेला आहे. यानुसार निविदा किमतीच्या 10 टक्के जमवाजमव उचल अनुज्ञेय आहे. ठेकेदाराने तीन महिन्याचे आत मागणी सादर करणे आवश्यक आहे. यासाठी ठेकेदाराने तितक्याच रक्कमेची बँकेची हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. यानुसार ठेकेदारांनी त्यांचे पत्र क्र.SMCIPU/tender/SMKC/MP/2013-14/7, दि.17/05/2013 अन्वये रु.50456006/- या किमतीच्या IDBI बँकेची हमीपत्रे सादर केली आहेत (मिरज भुयारी टप्पा क्र.2, नस्ती क्र.1 पृष्ठ क्र.35)

| अ.क्र. | बँक गॅरेंटी तपशिल | रक्कम रु. | मुदत दिनांकापर्यंत |
|---|---|---|---|
| 1 | 1307831BGA00026 | 6300000.00 | 15/08/2013 |
| 2 | 1307831BGA00027 | 6300000.00 | 15/11/2013 |
| 3 | 1307831BGA00028 | 6300000.00 | 15/02/2014 |
| 4 | 1307831BGA00029 | 6300000.00 | 15/05/2014 |
| 5 | 1307831BGA00030 | 6300000.00 | 15/08/2014 |
| 6 | 1307831BGA00031 | 6300000.00 | 15/11/2014 |
| 7 | 1307831BGA00032 | 6300000.00 | 15/11/2014 |
| 8 | 1307831BGA0033 | 6356006.00 | 15/11/2014 |

DRAFT

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक -एनयुआर -2008/प्र.क्र.203/नवि-33,दि.20 फेब्रुवारी 2010 मधील (7) नुसार महाभियाना अंतर्गत मंजूर प्रकल्पांना अनुदान व कर्ज उपलब्ध करून देण्याची कार्यपध्दती:-

(iii) मंजूर प्रकल्पांना शासनाचे देय अनूदान दोन टप्प्यात मंजूर करण्यात येईल. अनुदानाचा 50 टक्के भाग प्रकल्प मंजूरी नंतर वितरीत करण्यात येईल. उर्वरित 50 टक्के अनुदान प्रथम टप्प्याच्या अनुदानाच्या 70 टक्के रक्कम खर्च झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वितरीत करण्यात येईल. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस आवश्यक असल्यास कर्जाची रक्कम त्यानंतर वर नमूद केल्याप्रमाणे मंजूर वितरीत करण्यात येईल.

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक -एनयुआर -2008/प्र.क्र.203/नवि-33,दि.20 फेब्रुवारी 2010 यासोबतचे परिशिष्ट ॥ विविध नागरी सेवांसाठी शासनाने विहित केलेली मानके खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | सेवा | एकक | विहित मानके |
|---|---|---|---|
| 1 | पाणीपुरवठा नळजोडणी | % | 100% |
| 2 | दरडोई पाणीपुरवठा | अ) लिटर प्रतिदिन:- ज्या ठिकाणी भूयारी मलनि:सारण व्यवस्था नाही<br>ब) लिटर प्रतिदिन:- ज्या ठिकाणी भूयारी मलनि:सारण व्यवस्था आहे | 70 लिटर<br>135 लिटर |
| 3 | मिटर नळजोडण्या | % | 100 % |
| 4 | गैरमहसुली पाण्याचे प्रमाण | % | 15 % |
| 5 | पाणीपुरवठयाचे सातत्य | तास प्रतिदिन | 24 तास प्रतिदिन |
| 6 | तक्रारी निराकरणाचे प्रमाण | % | 80 % |
| 7 | पाणीपुरवठयाचा दर्जा | % | 100% |
| 8 | पाणीपुरवठया करिता होणा-या खर्चाची वसूली | % | 100% |
| 9 | पाणीपुरवठयाशी निगडीत शुल्क वसुलीतील कार्यक्षमता | % | 100% |

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक -एनयुआर -2008/प्र.क्र.203/नवि-33,दि.20 फेब्रुवारी 2010 मधील अनुक्रमांक 05 नुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानात सहभागी होण्यासाठी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने राज्य शासनाबरोबर सामंजस्याचा लेखी करार करुन शासनाने विहीत केलेला सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम मान्य करणे बंधनकारक

DRAFT

राहील व याबाबत ठराव करणे आवश्यक राहील. सदर सुधार कार्यक्रम राबविण्यास महानगरपालिकेने महासभा क्र.08, ठराव क्र.222 विषय क्र.ऐन , दि.20/03/2010 ने मान्य केले आहे व त्याप्रमाणे महाराष्ट्र शासन व सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेमध्ये दि.18 नोव्हे. 2011 मध्ये सामंजस्य करार रु. 100 चे मुद्रांकावर करण्यात आला आहे. सदर करारावर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त व महापौर यांनी स्वाक्षरी केली आहे. सदर कराराची प्रत जलनि:स्सारण विभाग सांगली सन 2011-12, महाराष्ट्र शासनाचा नगरोत्थान योजनेअंतर्गत महापालिका क्षेत्रातील वॉनलेसवाडी,गव्हरमेंट कॉलनी व मिरज शहरासाठी भुमिगत ड्रेनेज योजनेअंतर्गत अंदाजपत्रके आराखडे तयार करणेबाबत.या फाईलमध्ये पृष्ठ क्र.607 ते 619 वर लावण्यात आली आहे. करारामधील सुधारणेच्या अटी व शर्ती व त्यासाठी लागणारा कालावधी खालीलप्रमाणे आहे.

Anexure A

Timelines for Reforms

Sangli Miraj Kupwad Municipal Corporation commits to undertake the following reforms stipulated under Maharashtra suvernjayanti nagrothan mahaabhiyan as per the timeline indicate herein below and also agrees to implement any other reform that state government may prescribed as condation for financial assistance under the said abhiyan.

| sr.no. | Reforms | Timeline |
|---|---|---|
| 1 | implementation of Double Entry Accrual based Accounting System<br>1) Listing and valuation of assets and liabilaties.<br>2) drawing up of opening balance sheet<br>3)Full migration to Double entry Accrual based Accounting System | 2012-13 |
| 2 | E Governance<br>a) Registration of Birth & Death<br>b)Property Tax Assesment<br>c)water billing & Accounting<br>d)Food lincense<br>e)Market lincense<br>f)Accounts(Double Entry Accounting)<br>g)Complaints & Grivences Redressal Management.<br>h)User workflow managment system.<br>i)Enterprise Information Portal | 2012-13 |

DRAFT

| | | |
|---|---|---|
| | j)Citizen Facilitation Center<br>k)Town Planning<br>l)E Tendering | |
| 3 | Property Tax Reform<br>a)Setting up a non Discretionary method for Determination of property tax (**Capital Value Based System)**<br>b)Use GIS based property tax system<br>d)Achivement of 95% coverage Ratio<br>e) Achivement of 90% collection ratio | 2012-13 |
| 4 | Levy of Appropriate User Charges | 2012-13 |
| 5 | Internal earmarking within the Budget for basic services to Urban Poor. | 2012-13 |
| 6 | Rain Water Harvesting | 2013-14 |
| 7 | Recycling & Reuse of Waste Water<br>a)Adoption of Bylaws<br>b) 20% Use of Gray Water | 2013-14 |
| 8 | Water Audit | 2013-14 |
| 9 | Energy Audit<br>a) Water Supply<br>b)Sewage Treatment &Disposal<br>c)Street Lights<br>d)Municipal Buildings | 2013-14 |
| 10 | Encouraging Public Private Partnership | 2014-15 |
| 11 | Provision of Basic Services to Urban Poor<br>a)Water Supply<br>b)Sanitation<br>c)Primary Health<br>d)Solid Waste Management<br>e)Street Light<br>f)Roads & Drains<br>g)Primary Health<br>h) Primary Education | 2014-15 |
| 12 | Administrative Reforms<br>a)Adoption of Model Recruitment Rules<br>b)Delegation of Power<br>c)Rationalisation Of Human Resource | 2014-15 |

DRAFT

| | | |
|---|---|---|
| | d)Caderisation of Municipal Services<br>e)Training need Assessment<br>f)Training of Humen Resources<br>g) Reduction in Establishment Expenditure<br>h) To create Sinking Fund | |
| 13 | Public Discloser Of Information | 2013-14 |

**या कामाची नस्ती, डि.पी.आर. बी-1 टेंडर ,एस्टिमेट, Volume No -I (Technical Bid) & Volume No -II (Price Bid) & July 12, शासन निर्णय व मोजमाप पुस्तक यांचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.42 , दि.31/12/2015 रोजी निर्गमित केला असुन जलनि:सारण विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.**

1) नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक -एनयुआर - 2008/प्र.क्र.203/नवि-33,दि.20 फेब्रुवारी 2010 मधील अनुक्रमांक 05 नुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानात सहभागी होण्यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने राज्य शासनाबरोबर सामंजस्याचा लेखी करार करुन शासनाने विहीत केलेला सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम मान्य केला आहे. कराराप्रमाणे महानगरपालिकेचे लेखे द्विनोंद पध्दतीमध्ये ठेवणे आवश्यक आहे. या अनुषंगाने महानगरपालिकेच्या लेखा विभागाचे 2013-14 या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सर्व लेखे सिंगल एन्ट्री सिस्टिममध्ये ठेवण्यात आले आहेत. महानगरपालिकेने मत्ता व दायित्व यांचे मुल्यांकन केलेले नाही तसेच लेखे सिंगल एन्ट्री सिस्टिमवरुन डबल एन्ट्री सिस्टिम मध्ये तयार करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेने शासनाशी केलेल्या कराराप्रमाणे एक वर्षाचे आत सदर सुधारणा केलेल्या नाहीत.

2) ई गव्हर्नन्स अंतर्गत अ.क्र.2 मधील a) ते l) मध्ये दिलेल्या सुधारणा करणेसाठी महानगर पालिकेने HCL या कंपनीकडून BOT तत्वावर सर्व विभागांचे संगणकीकरण करुन घेतले आहे. परंतु महानगरपालिकेने HCLकंपनीबरोबर केलेल्या कराराप्रमाणे HCL कंपनीस रक्कम आदा न केल्याने HCL कंपनीने महानगरपालिकेस कोर्टामार्फत नोटीस देवून काम ऑक्टोबर 2013 पासुन बंद केले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे इ गव्हर्नन्स अंतर्गत चालू असलेले काम बंद पडले असून सर्व काम पुन्हा 2013-14 या आर्थिक वर्षापासुन मॅन्युअली चालू झाले आहे. त्यामुळे मनपामध्ये कराराप्रमाणे ई गव्हर्नन्सचे काम चालु नसल्याचे दिसुन येते.

3) या कराराअंतर्गत सुधारणामधील अ.क्र.3 नुसार 2012-13 पासुन घरपट्टी भांडवली मुल्यावर चालु करण्याचे नमूद आहे. परंतु महानगरपालिकेने 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये घरपट्टीची वसुली भांडवली मूल्यावर चालू केलेली नाही.

DRAFT

4)महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 ने सांगली व मिरज गटार योजनेसाठी महानगरपालिका हिश्श्याच्या रक्कमेची तरतुद करण्यासाठी अंदाजे रु.125 कोटी कर्ज उभारणीस व चालु व्याजदर व 10 वर्ष कर्ज परतफेड कालावधी धरता दरवर्षी रु.20 कोटीची अतिरिक्त तरतुद कर्ज फेडीसाठी अर्थसंकल्पात करणेस व सिंकींग फंडामध्ये सदर रक्कम वर्ग करुन कर्जफेड नियमित स्वरुपात करणेसाठी सभेने मान्यता दिली आहे. यासाठी 2013 -14 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.12 वर द्विनोंद कोड C609D नगरोत्थान योजने अंतर्गत जलनि:सारण मनपा हिस्सा कर्ज या लेखाशिर्षाखाली रु.20 कोटीची तरतूद केली आहे. आर्थिक वर्ष 2015 -16 च्या अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.13 वर द्विनोंद कोड C609D या लेखाशिर्षांतर्गत 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष जमा निरंक दिसून येते. म्हणजेच महानगरपालिकेने कर्ज उभारणीसाठी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण दहा, कर्ज घेण्याचे अधिकार कलम 109 (1) नुसार महानगरपालिकेस कायम स्वरुपाचे काम पार पाडण्यासाठी शासनाच्या पूर्वमंजूरीने कर्ज घेता येते. त्याप्रमाणे महानगरपालिकेने वरील महासभा ठरावाप्रमाणे सिकींग फंड निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. परंतु यास शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच घेण्यात यावयाच्या कर्जाच्या परतफेडीसाठी महानगरपालिका अधिनियम कलम 112 नुसार कर्जनिवारण निधी स्थापन करुन चक्रवाढ व्याजाच्या संचित रक्कमासह जी रक्कम, सर्व खर्चाच्या रकमा दिल्यानंतर, मान्य केलेल्या कालावधीत कर्ज चुकते करण्यासाठी पुरेशी होईल अशी रक्कम अशा निधीत मान्य केलेल्या तारखास भरणे आवश्यक आहे. परंतु महानगर पालिकेने अंदाजपत्रकामध्ये सिकींग फंडाची तरतुद केलेली नाही तसेच कर्जनिवारण निधीची स्थापना केलेली नाही. महानगरपालिका हिश्श्याच्या रक्कमेची तरतुद अंदाजपत्रकात केली नसलेने सदर खर्च महानगरपालिका कशा पध्दतीने करणार आहे. याचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.42 ने मागणी करुन ही जलनि:सारण विभागाने केलेला नाही.

5) मिरज भुयारी गटार टप्पा क्र.2 नस्ती क्र.1 मध्ये (पृष्ठ क्र.167) वर बार चार्ट संदर्भात टिपणी लिहिली आहे. सदर काम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा (PMC) तत्वावर पूर्ण करुन घेण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार ठेकेदारास सांगली शहरातील U सिव्हरमधील सुमारे 4 कि.मी. व मिरज शहरातील सुमारे 2 कि.मी .कामासाठी दि.21/05/2013 रोजी लाईन आऊट देण्यात आली आहे. तथापि केवळ 60 मिटरचे खुदाई काम करण्यात आले आहे. ठेकेदाराने कामासाठी पाईप आणलेल्या नाहीत. त्याच प्रमाणे ठेकेदाराकडून विषयांकित कामे दोन वर्षाच्या निविदा कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन आराखडा(बार चार्ट) दिलेला नाही. याबाबत इकडील पत्र क्र.तांशा-195 दि.24/05/2013 अन्वये ठेकेदारास पत्र पाठविण्यात आलेचे उपविभागीय अभियंता,मजीप्रा, नागरी व ग्रामीण योजना,उपविभाग क्र.2 सांगली यांनी कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनि:सारण विभाग सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांना जा.क्र./208/13 म.जी.प्रा.नागरी व ग्रामीण योजना उपविभाग क्र.2 सांगली दि.12/06/2013 या

पत्रान्वये कळविले आहे व या पत्रास अनुसरुन कामाचा बार चार्ट सादर करणेचे पत्र पाणीपुरवठा विभागाने ठेकेदारास जाक्र/ मनपा/ जलवि/----/ 13-14 दि.18/06/2013 ने दिले आहे व त्या पत्रास अनुसरुन बार चार्ट Smc Infrastructure Pvt ltd (पृष्ठ क्र.323) वर कंपनीने दि.15/10/2013 रोजी मिरज गटार योजनेसाठी तयार केलेला बार चार्ट पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागास सादर केला आहे. त्यानुसार मे 2013 ते 24 एप्रिल 2015 पर्यंत मुदतीमध्ये काम पूर्ण होण्यासाठीचा बार चार्ट नस्तीमध्ये जोडला आहे. मिरज गटार योजना टप्पा 2 चे VOLUME -I (Technical Bid) & July - 2012 चे पृष्ठ क्र.23 वर General Rules & Directions For The Gauidance Of Contractors दिल्या आहेत. त्यामधील अट क्र. 31 नुसार पात्र निविदाधारकास कामाची वर्क ऑर्डर मिळाल्यानंतर काम सुरू करण्यापूर्वी कामाचा संगणकीकृत बार चार्ट सादर करावयाचा आहे व बार चार्टप्रमाणे कामाची गती ठेवावयाची आहे. या कामाचा कार्यादेश ठेकेदारास दि. 30/04/2013 रोजी दिला आहे. परंतु ठेकेदाराने कामाचा बार चार्ट मात्र दि.15/10/2013 रोजी म्हणजे साडे पाच महिने विलंबाने कार्यालयास सादर केला आहे. ठेकेदाराने विलंबाने कामाच्या प्रगतीबाबतचा बार चार्ट दिल्याने साडेपाच महिने कामाच्या प्रगतीवर पाणीपुरवठा विभागास लक्ष ठेवता आले नसल्याचे स्पष्ट होते. तसेच मिरज भुयारी गटार योजनेची नस्ती क्र.1 मधील T-7 वर दि.23/10/2013 रोजी जलनि:सारण विभागाने ठेकेदाराच्या कामाच्या संथप्रगतीमुळे दंड आकारणी बाबत टिपणी सादर केली आहे. त्यामध्ये कामाच्या प्रगतीबाबत आयुक्तांनी दि.18/10/2013 रोजी बैठक घेतली या बैठकीमध्ये ठेकेदाराने बार चार्टप्रमाणे आपेक्षित प्रगती साध्य केली नसल्याने ठेकेदारावर निविदा अटी शर्तीनुसार दंड आकारण्याचे आदेश दिले आहेत. बी-1 शेड्यूलमधील कंडीशन ऑफ कॉन्ट्रॅक्टमधील क्लॉज क्र. 2 नुसार ¼ कालावधीत ¼ काम करणे आवश्यक आहे. कामाची मुदत 24 महिने असल्याने व ¼ कालावधी झालेला असल्याने पेनल्टी कलमाखाली ठेकेदारास अपेक्षित प्रगती साधे पर्यंत दररोज रु.1000/- प्रमाणे दंड प्रस्तावित केला आहे. त्यास कार्यकारी अभियांनी दि. 24/10/2013 रोजी मान्यता दिली आहे व प्रकरण मुख्य लेखापरीक्षक यांचेकडे दि.07/11/2013 रोजी अभिप्रायासाठी पाठविले आहे. मुख्य लेखापरीक्षक यांनी निविदा अटी शर्ती व पेनल्टी क्लॉज सह प्रकरण फेरसादर करणेची शिफारस दि.13/11/2013 रोजी करून टिपणी पाणीपुरवठा विभागाकडे दिली आहे. परंतु पाणीपुरवठा विभागाने प्रकरण फेरसादर केलेले नाही. त्यामुळे ठेकेदारावर दंड आकारण्याची कार्यवाही झालेली नाही.

6)मिरज गटार योजनेसाठी ठेकेदाराने चेंबरवर झाकण्यासाठी Manhole Frame & Cover - 560mm , Total Quantity 500 Nos. पुरवठा केला आहे. सदर पुरवठा साहित्य योग्य गुणवत्तेचे असलेबाबत Third Party Inspection करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने ITENG Engineering, मुंबई यांना पत्र क्र./ड्रेनेज विभाग /327/13-14 दि.19/09/2013 ने पत्र पाठविले आहे. सदर कंपनी मजीप्राने गुणवत्तेसाठी Approve केलेल्या लिस्टमध्ये आहे का याचा पाणीपुरवठा विभागाने खुलासा केलेला नाही. (पृष्ठ क्र.239). या कामाचे धावते देयक क्र.02, प्रमाणक क्र.10, दि.29/03/2014 ने आयटम क्र.12, Providing & constructing on sewer,B.B.masonary circular manhole

DRAFT

concentric cone 1.50M diam at bottom &0.50M diam.at top & upto a depth of 5.00M etc comp. 178 नग X रु.24038.70/ प्रती नग = रु.4278888.60/- ठेकेदारास आदा केले आहेत. ITENG Engineering, मुंबई ही कंपनी मजीप्राने गुणवत्तेसाठी Approve केलेल्या लिस्टमध्ये असलेबाबतचा खुलासा पाणीपुरवठा विभागाने केला नसल्याने सदरची रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

7) मिरज शहर भुयारी गटार योजनेसाठी राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता व सनियंत्रण समितीची मान्यता दि.01/10/2011 रोजीच्या बैठकीमध्ये मिळाली आहे. या योजनेसाठी नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.नगरो-2011/प्र.क्र.-218/11/नवि -33, दि.31 मार्च 2012 ने रु.07 कोटी 07 लाख इतका निधी मंजुर होवून दि. 04/05/2012 रोजी प्राप्त झाला आहे. प्रशासनाने निविदा नस्तीमधील दि. 28/11/2011 मधील (पृष्ठ क्र.T-3 ते T-19) वर जलनि:सारण विभागाने भुयारी गटार योजनेची निविदा काढणेसाठी दोन पर्याय दिले आहेत. यापैकी पर्याय क्र.2 नुसार भुयारी गटार योजनेची कामे चार गटात विभागणी करून करणे गट क्र.1 नुसार मुख्य मलनि:सारण वाहिन्या व दाब नलिका टाकणे रक्कम रु.29,45,46,634/-, गट क्र.2 नुसार मलनि:सारण मधील उपवाहिन्या व शाखा वाहिन्या टाकणे रक्कम रु.17,23,02,081/-, गट क्र.3 नुसार मलशुध्दीकरण केंद्र रक्कम रु.17,33,60,000/-, गट क्र.4. पंप हाऊस व पंपिंग मशिनरी व किरकोळ कामे करणे रक्कम रु.4,53,63,727/-. आयुक्त यांनी मान्यता दिली असून त्याप्रमाणे काम करणेची शिफारस केली आहे. आयुक्त यांनी प्रस्तावास दिलेल्या मंजूरीप्रमाणे उपायुक्त यांनी दि.01/12/2011 रोजी विषयपत्र तयार करून स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर केले आहे. परंतु स्थायी समिती ठराव क्र.635 विषय क्र.26 दि.05/03/2012 अन्वये सांगली भुयारी गटार योजनेच्या रु.68,55,72,442/- या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या एकत्रित खर्चाच्या निविदा मागविणेस व स्थायी समिती ठराव क्र. 636 विषय क्र.27 अन्वये मिरज भुयारी गटार योजनेच्या एकत्रित निविदा मागविण्यास व यासाठी येणा-या रु.55,55,80,821 च्या खर्चास तसेच प्रसिध्दीचे खर्चास दि.05/03/2012 रोजी मान्यता मिळाली आहे. प्रशासनाने विषयपत्र पाठविलेनंतर स्थायी समितीने निविदा मागविण्याचे प्रस्तावास तीन महिने विलंबाने मान्यता दिली आहे. तसेच प्रशासनाने या कामाची चार विभागात विभागणी करुन निविदा मागविण्याची शिफारस केली असता स्थायी समितीने एकत्रित निविदा मागविण्याचा आदेश दिल्याने चार विभागातील वेगवेगळी कामे करणा-या निविदाधारकांना या कामाच्या निविदा स्पर्धेमध्ये भाग घेता आलेला नाही. तसेच सदर कामाच्या निविदा दि.21/04/2012 रोजी मागविल्या असुन निविदा दि.21/08/2012 रोजी उघडण्यात आल्या आहेत व कमी देकाराच्या ठेकेदाराबरोबर वाटाघाटी दि.12/03/2012 व दि.14/03/2012 रोजी करुन ठेकेदाराची निविदा महासभेने महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 ने मंजुर केली आहे. मिरज भुयारी गटार योजनेचा निधी दि.04/05/2012 रोजी मिळाल्यानंतर टेंडर काढणे व मंजूर करणे यासाठी एक वर्षाचा दिनावधी गेला आहे. त्यामुळे 2011-12 च्या चालू दर सूची प्रमाणे निविदा मंजूर न होता ठेकेदारास 2012-13 च्या

DRAFT

चालू दरसूची प्रमाणे निविदा दर वाटाघाटीने द्यावे लागले आहे. निविदेची सन 2011 -12 च्या दर सूचीप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुल्यांकित केलेली किंमत रु.66,04,95,000/- होत असून सन 2012 -13 च्या दरसूचीप्रमाणे मुल्यांकित केलेली किंमत रु.706741177/- इतकी होत आहे. निविदा काढणे व त्यावर निर्णय घेणे यामध्ये एक वर्षाचा कालावधी गेल्याने योजनेची किंमत रु.4,62,46,177/- ने वाढली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे रक्कम रु.4,62,46,177/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

8) मिरज भुयारी गटार योजनेच्या निविदेची किंमत 2010 -11 दरसूची प्रमाणे रु.504560058 /- असून ठेकेदाराचा न्यूनतम देकार रु. रु.913556441/- (81.06%) जादा आहे. निविदा 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये उघडल्यामुळे मजीप्राने 2011-12 चे दरसूचीप्रमाणे निविदेची किंमत मुल्यांकित केली असून ती रु.66,04,95,000/- (30.91%) जादा इतकी होते. त्यानंतर महानगरपालिकेने ठेकेदाराबरोबर वाटाघाटी केल्या असून ठेकेदाराने प्रथम वाटाघाटीनंतर रु.81,59,24,069/- (61.71%) जादाचा देकार दि.23/08/2012 च्या पत्राने महानगरपालिकेस दिला आहे. परंतु महानगरपालिकेने या निविदा दराबाबत व निविदा मंजूरी बाबत कोणताही निर्णय घेतला नाही. या निर्णय प्रक्रीयेमध्ये दिनावधी गेल्याने व सन 2012-13 ची दरसूची प्राप्त झाल्याने सन 2012-13 नुसार मजीप्राने निविदेची मुल्यांकित किंमत रु.70,67,41,177/- (36.56% जादा) इतकी केली आहे. सन 2012-13 च्या मुल्यांकित किमतीशी तुलना करता ठेकेदाराचा देकार 15.45 टक्के इतका होतो. महानगरपालि केने पुन्हा ठेकेदाराबरोबर वाटाघाटी केल्या असून दि.12/03/2013 च्या वाटाघाटीनंतरचा ठेकेदाराचा देकार रु.77,54,36,420/- इतका आहे. सन 2012-13 च्या दरसूचीनुसार मुल्यांकित किमतीच्या 9.72 टक्के जादा इतका आला आहे. नस्तीमधील पृष्ठ क्र.657 वर नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक : युआयडी -2009/ प्र.क्र.158/प्र.क्र.158/नवि -33 दि.10 ऑगष्ट 2009 चे लहान व मध्यम शहरांच्या पायभूत सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) योजने अंतर्गत प्राप्त निविदा स्विकारण्या संदर्भात मार्गदर्शक सूचनेचे परिपत्रक जोडले आहे. सदर परिपत्रकानुसार (UIDSSMT) योजने अंतर्गत प्राप्त होणा-या निविदा चालू वर्षाच्या दरसूचीचा विचार करता होणा-या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा कमाल 10 टक्केहून जास्त असल्यास संचालक नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविल्या जातात. त्यासाठी शासन परिपत्रक क्र.जीईएन -1093/2365/प्र.क्र.126/93/नवि -14, दि.20/10/1993 चा आधार घेतला जातो. शासन परिपत्रक दिनांक 20/10/1993 मध्ये मंजूर अंदाजपत्रकातील रक्कमेपेक्षा कमाल 10 टक्केहून जास्त रक्कमेच्या निविदा आल्यास त्या का जास्त आहेत त्याचे काळजीपूर्वक बाबनिहाय परिक्षण करणे आवश्यक आहे, तसेच फेर निविदा मागविण्या बाबत गांभीर्याने विचार करणे इष्ट ठरते असे नमूद आहे. ठेकेदाराने प्रथम वाटाघाटी नंतर दि.23/08/ 2012 च्या पत्राने महानगरपालिकेस कळविलेला दर रु.815924069/- निविदा किंमतीच्या 61.71 टक्के दिला आहे. वरील शासन निर्णयाप्रमाणे निविदा दर 10 टक्केपेक्षा जास्त असल्याने प्रशासनाने नविन निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु प्रशासनाने दि.21/08/2012 रोजी निविदा उघडल्यानंतर निविदा 10

DRAFT

टक्केपेक्षा जादा दराने आल्यामुळे निविदा प्रक्रीया रद्द करुन फेर निविदा न मागविता 7 महिन्यांनी पुन्हा मंजूर निविदा दराची 2012-13 च्या चालू दरसूचीशी तुलना केली आहे. त्यानुसार ठेकेदाराचा दर चालू दरसूचीनुसार 15.45 टक्के जादाने असल्याने प्रशासनाने ठेकेदाराशी दि.12/03/ 2013 रोजी पुन्हा वाटाघाटी केल्या आहेत व ठेकेदाराने 2012-13 च्या चालू दरसूचीनुसार आलेल्या निविदा किंमतीच्या 9.72 टक्के या दराने काम करणेस तयार असलेचे पत्राने कळविले आहे. प्रथम देकार रक्कम 10 टक्केपेक्षा जादा आल्याने महानगरपालिकेने रितसर निविदा न मागविल्याने महानगरपालिकेस नविन निविदेच्या स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसल्याचे दिसून येते. तसेच प्रशासनाने वरील शासन निर्णयानुसार 9.72 टक्के जादा दराने आलेल्या निविदेचे काळजीपूर्वक दरपृथ:करण न करताच निविदा मंजूर केली असल्याने महानगरपालिकेचे चालु निविदादराच्या (सन 2012-13) 9.72 टक्के जादा दराने रु.6,86,95,243/- आर्थिक नुकसान झाले आहे. (सन 2012-13 नुसार मजीप्राने केलेली मुल्यांकित किंमत रु.70,67,41,177/- - ठेकेदाराचा निविदा दर रु.77,54,36,420/-). सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.डी.पी.डब्ल्यु 1996/16 (ब)/ लेखापरीक्षा मंत्रालय दि. 20 सप्टेंबर 1997 निविदा मंजूरीबाबत अधिकार प्रदान करणेचा शासन निर्णय झाला आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता रु.25 लाख, अधिक्षक अभियंता रु.1 कोटी 25 लाख, मुख्य अभियंता निविदा मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. तसेच या परिपत्रकामधील 1(ब) नुसार (निविदेतील अंदाजपत्रकाच्या चालू दरसूचीच्या अधारे येणा-या किंमतीवर) अधिक्यास मंजूरी देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यकारी अभियंता -निरंक, अधिक्षक अभियंता - 5 टक्के रु. 25 लाख पर्यंतच्या निविदेसाठी, मुख्य अभियंता - 5 टक्के रु.125 लाख पर्यंतच्या निविदेसाठी देण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी निविदेचे अधिक्य चालू दरसूचीच्या अधारे येणा-या सुधारीत किमतीच्या 5 टक्केहून जास्त नाही. परंतु प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेपेक्षा रु.10 लाखाने जास्त आहे, अशा प्रकरणामधील अधिक्यास शासनाकडून पूर्वमंजूरी घेण्यात आली पाहिजे असे नमूद आहे. परंतु या निविदेचे आधिक्य चालू दरसूचीच्या 5 टक्केपेक्षा जास्त असतानाही शासनाकडून पूर्व मंजूरी न घेताच निविदा महानगरपालिकेने मंजूर केली आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांना चालू दरसूचीनुसार येणा-या अधिक्यास मंजूरी देण्याचे अधिकार नसतानाही त्यांनी या निविदेस मान्यता दिली आहे. सदर निविदेमध्ये आलेला जादाचा दर हा योग्य असलेबाबतची खात्री या योजनेचे प्रकल्प सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी करुन तशी तांत्रिक मान्यता मुख्य अभियंता यांनी देणे आवश्यक असता त्यांनी या अधिक्यास मंजूरी दिलेली नाही. सदर बाब ही अत्यंत गंभीर असून वित्तिय औचित्याचा भंग करणारी आहे.

9)प्रशासनाने ठेकेदाराची निविदा 2012-13 च्या दरसूचीनुसार आलेल्या किमतीच्या 9.72 टक्के जादा दराने मंजूर केली आहे. तसेच निविदा Volume -I (Technical Bid) & July 2012 मधील पृष्ठ क्र.94 , Clause 62, Price Variation Clause नुसार सिमेंट,इंधन व स्टील मधील भाव फरक Wholesale Price Index For All Commodities prepeared by the office of the

Economic Adviser, Ministry of Industry, Government Of India मध्ये प्रसिध्द केलेल्या दराप्रमाणे देण्याचे नमूद केले आहे. ठेकेदाराची निविदा 9.72 टक्के जादा दराने मंजूर केले असून त्याला पुन्हा भाववाढ ही देण्याचे मान्य केल्याने ठेकेदारास दुहेरी फायदा दिला असल्याचे दिसून येते.

10) मुख्य करारपत्रामधील मुद्दा क्र.11 अन्वये ठेकेदारास जमवाजमव उचल अनुज्ञेय आहे. तसेच बी -1 करारपत्रामधील समाविष्ठ पूर्व अहर्तता बैठकीच्या खुलाशातील जोडपत्र 1 पृष्ठ क्र. 22 वर जमवाजमव उचली बाबत कलम अंतर्भुत आहे. यानुसार निविदा किंमतीच्या 10 टक्के जमवाजमव उचल (Mobilisation Advance) 10 टक्के व्याजाने ठेकेदारास द्यावयाचा आहे. त्याप्रमाणे ठेकेदारास आयुक्त यांचे दि.17/06/2013 च्या मान्यतेने रु.50476006/- ची उचल प्रमाणक क्र.02 दि.09 जुन 2013 ने दिली आहे व त्याची नोंद मोजमाप पुस्तक क्र.8 पृष्ठ क्र.1 वर केली आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. आयकर-१०९१/प्र.क्र.१३२/का/अर्थ मंत्रालय मुंबई दि. १३/१०/१९९३ अन्वये मोबिलायझेशन अॅडव्हान्स रक्कम रु.50476006/- वर २% प्रमाणे आयकर रु. 10,09,520/- वसूल केलेला नाही.

11) या कामाचे दुसरे धावते देयक प्रमाणक क्र.10, दि.29/03/2014 ने रक्कम रु.1,47,92,894/- ने ठेकेदारास दिले आहे व या कामाची नोंद मोजमाप मोजणी पुस्तक क्र.17, पृष्ठ क्र. 1 ते 06 वर केली आहे. या कामाच्या देयकामध्ये अंदाजपत्रकीय रक्कम या रकान्यामध्ये रु.40 कोटी (खाते 41310 नगरोत्थान योजने अंतर्गत होणारा खर्च जलनि:सारण शासन) दर्शविली असून या बिलाचे निव्वळ मूल्य रु.1,47,92,894/-, मागील खर्च रु.51961761/-, ती शिल्लक धरुन एकूण खर्च रु.66754655/- व उपलब्ध शिल्लक रु.33,32,45,345/- दाखविली आहे. परंतु या कामाच्या प्रथम देयकाची तपासणी केली असता या देयकामधुन एकूण झालेला खर्च या रकान्यामध्ये मागील खर्च रु.66754655, देयकाची रक्कम रु.128486660/- असा एकूण खर्च रु.191329247/- दाखविला आहे. प्रथम देयकामध्ये एकुण खर्च रु. 191329247/- दाखविण्यात आला आहे परंतु दुस-या धावत्या देयकमाध्ये मागील खर्च रु.51961761/-दाखविण्यात आला आहे. सदर दोन बिलामध्ये दर्शविण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय रकान्यातील मागील खर्चामध्ये रक्कम रु.139367486/- च्या तफावतीबाबत खुलासा जलनि:सारण विभागाने केलेला नाही.

12) पहिल्या धावत्या देयकामधून मोबीलायझेशन अॅडव्हान्सपोटी दिलेल्या रक्कमेपैकी रक्कम रु. 25697332/- चा प्रथम हप्ता कपात केला आहे. तसेच जमवाजमव उचल रक्कम रु.50456006 /- वर दि.31/03/2014 अखेर एकूण 283 दिवसाचे 10 टक्के दराने रु.3912068/- व्याज कपात केले आहे. तसेच कामगार कल्याण उपकर रु.1284866, आयकर रु.2569733/-,व्हॅट रु. 2569733/-,अनामत रु.3212166/ व LBT रु.321216/- अशी कपात करुन रक्कम रु.88919546/- आदा करणेची शिफारस कार्यकारी अभियंता यांनी देयकावर केली आहे. परंतु मुख्य लेखाधिकारी यांनी सदर बीलातील रक्कम रु.128486660/- पैकी ठेकेदारास रक्कम रु.73200000/- कपातीसह देण्यात यावी व उर्वरित रक्कम रु.55286660/- नंतर कपातीसह आदा करावी असा आदेश प्रमाणकावर लिहिला आहे व देयक

DRAFT

उपाआयुक्त यांचेकडे मंजूरीसाठी पाठविले आहे. कार्यकारी अभियंता यांनी मंजूर केलेली देयक रक्कम व मुख्य लेखाधिकारी यांनी मंजूर केलेली देयक रक्कमेमधील फरकाबाबत खुलासा केलेला नाही.

13) मिरज भुयारी गटार योजनेच्या खर्चासाठी ठेकेदारास मोबिलायझेशन ॲडव्हान्सपोटी रक्कम रु.5,04,76,006/- अधिक पहिल्या धावत्या देयकाने रु.128486660/- असे एकूण रु.178962666/- आदा केले आहेत. नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक- नगरो 2012/ प्र.क्र.189/ नवि -33 दि. 25 मार्च 2013 नुसार शासनाकडून मिरज भुयारी गटार योजनेसाठी किंमत रु.56.53 कोटी ठरविण्यात आली असून त्यामध्ये राज्य शासनाचे अनुज्ञेय अनुदान रु.28.265 कोटी आहे. त्यापैकी राज्य शासनाच्या पहिल्या हप्त्याचा निधी रु.14.13 कोटी इतका असुन 25 मार्च 2013 अखेर रु.14.14 कोटी शासनाकडून प्राप्त झाले आहेत. शासन निर्णयामधील प्रस्तावनेमध्ये 50 टक्केच अनुदान शासनाकडून मिळणार असून उर्वरित 50 टक्के रक्कम महानगरपालिकांनी स्वनिधी व कर्जरुपाने उभा करावयाची आहे. या कामाची निविदा रक्कम रु.50.42 कोटीची असुन त्यापैकी रक्कम रु.25.22 कोटी शासनाकडून मिळणार असल्याने योजनेस आलेले अनुदान व योजनेचा होणारा खर्च याप्रमाणे राज्य शासनाच्या अनुदानामधून 32.53 टक्के व महानगरपालिका हिश्श्यामधून 67.47 टक्के खर्च करणे आवश्यक आहे. 2012-13 या आर्थिक वर्षात या कामावर रक्कम रु.193755560/- इतका खर्च झाला असल्याने शासन निधीमधून 32.53 टक्केप्रमाणे रु.63028638/- व महानगर पालिका हिश्श्यामधून 67.47 टक्केप्रमाणे रु.130726876/- खर्च करणे आवश्यक असताना सर्व खर्च शासननिधी मधूनच केल्याने महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये वाढ झाली आहे. तसेच महानगर पालिकेने शासन निर्णयाप्रमाणे स्वनिधीची रक्कम बजेटमध्ये उपलब्ध करुन खर्च केलेली नाही.

14) महासभा क्र.08, ठराव क्र.222, दि.20/03/2010 रोजी ऐनवेळच्या विषयाने सदर योजनेकरीता महानगरपालिकेने 50 टक्के इतका निधी रक्कम रु.158.63 कोटी कर्ज रुपाने उभा करणेस महासभेने मान्यता दिली आहे. परंतु महानगरपालिकेने 2012-13 या आर्थिक वर्षात कर्ज ही घेतलेले नाही तसेच स्वनिधीमध्ये ही या योजनेच्या खर्चाची तरतुद केलेली नाही. या वित्तिय अनियमिततेबाबत तसेच या योजनेचा पुढील खर्च कशा पध्दतीने करण्यात येणार आहे याबाबतचा खुलासा जलनि:सारण विभागाने केलेला नाही.

15) मिरज भुयारी गटार योजना टप्पा क्र.2 नस्ती क्र.1 मध्ये ठेकेदाराने जा.क्र.एस.एम.सी./ सांगली /92/ 13-14 दि.25/12/2013 चे पत्रामध्ये मालगाव येथील आमननगर रस्ता क्र.1,2,3 व इतर ठिकाणची लॅटरल्स व ब्रँचेसचे काम हे निविदा डिझाईन व ड्रॉइंगमध्ये नमूद केलेल्या कामाच्या लांबी व्यतिरिक्त जादा काम करण्याच्या सूचना कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व जलनि:सारण विभाग व स्थानिक नगरसेवकांनी दिल्याप्रमाणे करित असल्याचे नमुद आहे. तसेच ठेकेदाराने जा.क्र. एस.एम.सी. /सांगली / 92/66/13-14 दि.12/02/2014 चे पत्रामध्ये उपरोक्त नमुद केलेले वाढीव काम 13 कि.मी. इतके होत असुन त्यापैकी 2 कि.मी.चे काम पूर्ण केले आहे. तसेच खतिब नगर,रविंद्र नगर या ठिकाणी निविदा डिझाईन ड्रॉईंग व्यतिरिक्त अंदाजे लांबी 1200 मिटरचे वाढीव काम असून त्यापैकी

DRAFT

610 मीटरचे काम पूर्ण केलेचे नमूद आहे. तसेच या योजनेचे PMC(Project Management Consultant) उपविभागीय अभियंता, मजीप्रा, नागरी व ग्रामीण योजना, उपविभाग क्र.2 सांगली यांनी पत्र जा.क्र/तांशा/ मिरज/भुगयो/10/2013 दि.02/01/2014 ने कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा व जलनि:सारण विभाग,सांगली महानगरपालिका यांना मिरज भुयारी गटार योजनेमध्ये स्विकृत निविदे अंतर्गत समाविष्ठ असणा-या पाईपलाईन व्यतिरिक्त इतर ठिकाणी जादाची पाईप लाईन टाकणे बाबतचे पत्र दिले आहे. पत्रामध्ये दि.24/12/2013 रोजी आपण व संबंधित ठेकेदाराचे प्रतिनिधी, नगरसेवक श्री.सुरेश आवटी यांनी टाकळी रोड व मालगाव रोड या कामावरती भेट देवून यामध्ये अमननगर येथे वाढीव पाईप लाईन टाका व टाकळी रोड येथे सुध्दा कांही भागात पाईपलाईन टाका अशा सूचना दिल्या आहेत व त्याप्रमाणे आपल्या तोंडी सूचनेप्रमाणे जादाचे पाईपलाईन टाकणेचे काम चालू आहे. याकामासाठी जादाच्या टाकाव्या लागणा-या पाईपलाईन्सच्या बाबतीत लेखी परवानगी देण्याचे आपण मान्य केले आहे. तरी याबाबतीत संबंधित ठेकेदाराकडून जादा होणा-या पाईपलाईनचा सविस्तर प्रस्ताव घेवून या कार्यालयास कळविण्याचे सूचित केले आहे. परंतु जलनि:सारण विभागाने ठेकेदारास वाढीव कामाचे लेखी पत्र दिल्याचे तसेच मजिप्राला जादाचे काम करुन घेण्याबाबत कळविल्याचे नस्तीची तपासणी केली असता दिसून येत नाही. मिरज गटार योजना टप्पा क्र. 2 Volume - I (Technical Bid) & July 2012 Form B-I of Contract मधील Clause 14 नुसार जागेवरील प्राप्त परिस्थितीनुसार जादा काम करावयाचे असल्यास Engineer in Charge ने ठेकेदारास लेखी कळविले पाहिजे व त्यानंतर ठेकेदाराने जादाचे काम करणे आवश्यक आहे. परंतु ठेकेदाराला कोणतीही लेखी सूचना न देता सदरचे काम ठेकेदारा कडून तोंडी सूचनेनुसार जलनि:सारण विभागाने करुन घेतले आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली कलम 263 नुसार मुळ मंजुरी देणा-या अधिका-याच्या मान्यते शिवाय, कार्यकारी अभियंता कमी प्रतीच्या अभिकल्पनामध्येही कुठलाही महत्वाचा फेरफार करणार नाही. अधिक खर्च अंतर्भूत करणारा कुठलाही महत्वाचा फेरफार करणे आवश्यक असेल तर या फेरफारासाठी सुधारित किंवा पूरक अंदाज तयार करुन तांत्रिक मंजूरीसाठी सक्षम प्राधिका-याकडे पाठविणे आवश्यक आहे. या कामास तांत्रिक मंजूरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिली असल्याने जादा खर्चाचे अराखडे तयार करुन प्राधिकरणाकडे सादर करणे आवश्यक होते व त्यांची तांत्रिक मान्यता घेवून कामाच्या खर्चाचे पुरक अंदाज तयार करुन त्यास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक असता सर्वसाधारण सभेची जादा कामास व खर्चास मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे योजनेचा खर्च वाढून योजनेस निधी कमी पडणार आहे. उदा. मोजमाप पुस्तिका क्र.11 पृष्ठ क्रं. 62 ची तपासणी केली असता P ZONE दत्त कॉलनी नं.1 चेंबर न.699 A TO 699 लांबी 270 मिटर NP- II, 150 मि.मि.ची वाढीव पाईप लाईन टाकण्यात आली आहे. सदर वाढीव कामामध्ये Suply of pipe, पाईपसाठी Excavation, Lowering & laying of pipe, man hole chambers या खर्चाचा समावेश आहे. या वाढीव कामावर रु.10,35,171.14 /- खर्च झाला आहे. सदर वाढीव कामाची Volume - I (Technical Bid) & July

DRAFT

2012 Form B-I of Contract मधील Clause 14 नुसार जागेवरील प्राप्त परिस्थितीनुसार Engineer in Charge ची ठेकेदाराने लेखी मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु ठेकेदाराने संबंधितांची मान्यता न घेताच जादाचे काम केले आहे व पाणीपुरवठा विभागाने जादा कामाची रक्कम रु.10,35,171.14 /- , प्रमाणक क्र.210 ने दि.29/03/2014 रोजी ठेकेदारास आदा केली आहे. अशा प्रकारे कोणत्याही मान्यतेशिवाय योजनेचे काम करून घेतल्याने योजनेचा खर्च वाढून मूळ योजनेस निधी कमी पडणार आहे.

16) मिरज भुयारी गटार योजनेमधील कामाचे प्रमाणक क्र. 210 , दि.29/03/2014 ने रु.1,47,92,894/- ठेकेदारास आदा केले आहेत. सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र. 17 पृष्ठ क्र.1 ते 5 वर नोंदविण्यात आलेली आहेत. या मध्ये STP(Severage Treatment Plant) च्या कामाचे देयकाची स्थापत्य कामाचे उपांगासाठी 45 टक्के व यांत्रिकी कामाचे उपांगासाठी 55 टक्केप्रमाणे विभागणी करुन ठकेदारास देयक आदा करण्याचे कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.ताशां / 5 / सांगली भुगयो /2553 दि.17/07/2013 चे पत्राने मान्य करण्यात आले आहे. मोजमाप पुस्तक क्र. 17 मधील पृष्ठ क्र.01 वर Subwork No.9, Item No.01 Excavation for seqentiai Batch Reactor Tank साठी 3735.72 घ.मी. खुदाईचे काम करण्यात आले आहे. तसेच क्लोरिन कॉन्टॅक्ट टॅंकसाठी 377.27 घ.मी.चे अशी एकूण 4112.35 घ.मी.खुदाई करण्यात आली आहे. सदर खुदाई कामाचे ठेकेदारास अनुक्रमे रु.3326400 व रु.166320/- असे एकूण रु.3492720/- आदा करण्यात आले आहे. खुदाईमधून निघालेल्या मालावर महानगरपालिकेची मालकी असल्याने सदर खुदाई केलेला मुरुम स्टॅंडर्ड स्पेसिफिकेशन पुस्तकामधील Rd 2.10 नुसार महानगरपालिकेकडे ठेकेदाराने जमा करणे आवश्यक असता तो केलेचा मोजमाप पुस्तिकेवरून दिसून येत नाही. खुदाई केलेला मुरूम महानगरपालिकेने ताब्यात न घेताच ठेकेदारास खुदाईची रक्कम आदा केल्याने रक्कम रु. 3492720/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

17) उपविभागीय अभियंता, मजिप्रा, नागरी व ग्रामीण योजना उपविभाग क्र.2 सांगली यांनी जा.क्र./आस्था/134 /2014 मजीप्रा नागरी व ग्रामीण योजना उपविभाग क्र.2 सांगली दि.29/03/2014 रोजीचे पत्राने ठेकेदार SMC Infrastructure Pvt Ltd यांना सांगली/मिरज भुयारी गटार योजनांची अंतर्गत कामे नियोजित वेळेत पुर्ण करण्याच्या दृष्टीने उर्वरित कामांचा नियोजन आराखडा देणेबाबत कळविले आहे. सदर पत्रामध्ये निविदेनुसार मिरज भुयारी गटार योजनेसाठी एकूण 68 कि.मी. पैकी 15 कि.मी. सिव्हर नलिकेचे काम करण्यात आले आहे. विषयांकित कामे निविदा मुदतीनुसार एप्रिल 2015 अखेर पुर्ण करणे आवश्यक असल्याने उर्वरित कामे पुर्ण करणेच्या दृष्टीने कामांचा नियोजन आराखडा देण्याचे ठेकेदारास या पत्रान्वये सूचित केले आहे. परंतु ठेकेदाराने नविन आराखडा दिलेला नाही. ठेकेदाराकडून बारचार्ट प्रमाणे काम करुन घेण्याची जबाबदारी या योजनेचे पी.एम.सी. म्हणून कार्यरत असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची आहे व त्यावर नियंत्रण ठेवणेची जबाबदारी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागाची असताना दोन्हीही एजन्सींनी ठेकेदाराकडून

बार चार्टप्रमाणे काम करुन न घेतल्याने योजनेच्या कामास विलंब होत असल्याचे दिसून येते.

18) धावते देयक क्र.1 मोजमाप क्र.10 (पृष्ठ क्र.1 ते 13) प्रमाणक क्र.11 दि.29/03/2015 रु.128486660/- ची तपासणी केली असता देयका बरोबर ठेकेदाराने कामासाठी गौणखनिज वापरल्याच्या पावत्या सोबत जोडलेल्या नाहीत. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही पाणीपुरवठा विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. ठेकेदाराने खालील बाबीसाठी गौण खनिज वापरले आहे. परंतु गौणखनिजाची रॉयल्टी रक्कम शासनाकडे भरणा केली नसल्याने रक्कम रु. 81860/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

Item No.12 :- Providing & Constructing on sever,B.B.masonary circular manhole concentric cone 1.50 m diam.at bottom &0.50 m dia.at top & upto a depth of 5.00m etc comp

1)178 No.Chambers 0f Depth 2.00 to 2.50m, Rs.24038.70/ no.= Rs.4278888.60/-
178No. x sand 1.35 cum/No + Metal 0.80 cum/No = 2.15 cum/No
178x 2.15cum/No = 382.70 cum x Royalty Charges Rs.70.67/cum = Rs.27045/-

2) 99 No. Chambers 0f Depth 2.50 to 3.00m, Rs.29092.70/ no.= Rs.2880142.65/-
99No. x sand 2.40 cum/No + Metal 0.90 cum/No = 3.30 cum/No
99 x 3.30 cum/No = 326.70 cum xRoyalty Charges Rs.70.67/cum = Rs.23088/-

3) 58 No. Chambers 0f Depth 3.00 to 3.50m, Rs.34146.00/ no.= Rs. 1980468.00/-
58No. x sand 2.70 cum/No + Metal 0.90 cum/No = 3.60 cum/No
58 x 3.60 cum/No = 208.80 cum xRoyalty Charges Rs.70.67 /cum = Rs.14756/-

4) 39 No. Chambers 0f Depth 3.00 to 3.50m, Rs.34146.00/ no.= Rs.1980468.00/-
39No. x sand 2.70 cum/No + Metal 0.90 cum/No = 3.60 cum/No
39 x 3.60 cum/No = 140.40 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.9922/-

5) 17 No. Chambers 0f Depth 4.00 to 4.50m, Rs.44253.30/ no.= Rs.752306.00/-

DRAFT

17No. x sand 3.30 cum/No + Metal 0.90 cum/No = 4.20 cum/No
17 x 4.20 cum/No = 71.40 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.5046/-

6) 05 No. Chambers 0f Depth 4.50 to 5.00m, Rs.49306.95/ no.= Rs.246534.75/-
05No. x sand 3.60 cum/No + Metal 0.90 cum/No = 4.50 cum/No
05 x 4.50 cum/No = 22.50 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.1590/-

Item No.13:- Providing & Constructing on sever,B.B.masonary circular manhole concentric cone 1.50 m diam.at bottom &0.50 m dia.at top & upto a depth of 9.00m etc comp
1)01 No.Chambers 0f Depth 5.00 to 5.50m, Rs.61635/ no.= Rs.61635/-
01No. x sand 4.85 cum/No + Metal 1.00 cum/No = 5.85 cum/No
01 x 5.85 cum/No = 5.85 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.413/-
बाब क्र.12 व 13 साठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची एकूण रॉयल्टी रक्कम रु.81860/-
19) मोजमाप पुस्तिका क्र.10 मध्ये या कामाच्या मोजमापाचा बाबवार गोषवारा देण्यात आला आहे. त्याप्रमाणे पृष्ठ क्र. 10(L) वर बाब क्र.3 खुदाई करणे :- एकूण 26998.18 घ.मी खुदाईचे काम केले असुन त्याची रक्कम रु.11236024.24/- इतकी होत आहे. सदर खुदाईची सविस्तर मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र.16 पृष्ठ क्र. 29 (L) ते 29 वर नोंदविण्यात आली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग ,शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 1097 /सीआर 622/इमारती 2 दि.22/08/2005 नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट 42 अ.क्र.70 मध्ये उल्लेखिलेल्या मोजमापे तपासणीच्या अधिकारात सुधारणा करण्यात आली आहे. क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांचेकडून विहित टक्केवारी नुसार मापांची तपासणी केली जात नाही वा केवळ औपचारिकता म्हणून कामातील महत्वाच्या बाबी जसे खोदकाम,भरावाचे काम, झाकली जाणारी मापे इत्यादी बाबी सोयीस्करपणे वगळून अन्य बाबींच्या मापाची तपासणी दर्शविण्याची प्रवृत्ती क्षेत्रिय कार्यकारी अभियंता वर्गात वाढत आहे. त्यामुळे शासनाने या शासन परिपत्रकाप्रमाणे खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.
i) प्रच्छन्न मापे (Hidden Measurements) विशेषत: मातीकाम, खोदकाम, पुलांचे पायव्याचे काम, बी.बी.एम. इत्यादी बाबींची किमान 5 टक्के तपासणी क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी करणे बंधनकारक आहे. परंतु सदर खोदकामाची 5 टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी केलेली नाही. त्यामुळे खुदाई केलेल्या कामाची रक्कम रु. 11236024.24/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
20) **या कामाच्या डि.पी.आर.ची तपासणी केली असता सदर डि**.पी.आर. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महानगरपालिकेस केंद्र शासनाचे UIDSSMT योजनेसाठी सन 2003 या वर्षात तयार करुन सादर केला होता. नगरोत्थान योजनेसाठी मजिप्राने सन 2003 साली तयार केलेला डि.पी.आर. त्यावेळेच्या

DRAFT

एस्टिमेटसह आहे तसा वापरला असुन फक्त एस्टिमेटमधील बाबींच्या दरामध्ये सन 2010 -11 च्या दरसूचीमधील दर नमूद करुन बदल केला आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एनयुआर- 2008/प्र.क्र.2003 नवि-33,दि. 20/02/2010 मधील अट क्र.4 (i) नुसार नगरोत्थान महाभियानाअंतर्गत सहभाग घेणा-या प्रत्येक नागरी क्षेत्रासाठी शहराच्या पुढील 20 वर्षाचा संभाव्य विकास लक्षात घेवून शहर विकास आराखडा करणे अनिवार्य आहे. शहर विकास आराखड्यात भविष्यातील गरजांच्या आधारे विविध मूलभूत नागरी सुविधा तसेच शैक्षणिक व आरोग्य विषयक पायाभूत सुविधा तसेच शहरांच्या सामाजिक सोयीच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजनांचा अंतर्भाव असणे आवश्यक आहे. वरील संदर्भानुसार मजिप्राने या नगरोत्थान योजनेसाठी पुन्हा नव्याने सर्वेक्षण करुन ज्या भागामध्ये महानगरपालिकेने 2003 ते 2010-11 अखेर स्वखर्चाने किंवा अन्य योजनेमधून ड्रेनेज लाईन टाकली आहे, तो भाग वगळणे आवश्यक होते. तसेच मागील 7 वर्षामध्ये ज्या भागामध्ये नागरी विस्तार झाला आहे. तो भाग प्राकलनामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक होते. परंतु याचा विचार न करता जुनाच डिपीआर दरसूचीमध्ये बदल करुन महानगरपालिकेस सादर केला आहे. पाणीपुरवठा विभागाने या डिपीआरचा अभ्यास करुन त्यामधील त्रुटी शोधणे आवश्यक होते. परंतु पाणीपुरवठा विभागाने मजिप्राने दिलेल्या डिपीआरमधील त्रुटी न काढता महासभेची मंजूरी घेवून डिपीआर शासनाकडे पाठविला आहे व शासनाने त्यास मंजूरी दिली आहे. मजिप्राने तयार केलेल्या डिपीआरची रक्कम महानगरपालिका आदा करणार असल्याने, महानगरपालिकेने मजिप्राकडून पुन्हा सर्वेक्षण करुन नविन डिपीआर तयार करुन घेणे आवश्यक होते. परंतु महानगरपालिकेने जुनाच डिपाआर एस्टिमेटमधील किंमतीमध्ये बदल करुन स्विकारला आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीमध्ये आडथळे येत आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,मुंबई यांनी जा.क्र.मजीप्रा/सस/ तांशा-1/813/180 दि.20 फेब्रुवारी 2014 रोजी दिलेल्या पत्रामध्ये भुयारी गटार योजनांची अंदाजपत्रके तयार करणे, तांत्रिक तपासणी करणे इत्यादी कामे मजीप्राने केली असून त्यापोटी मजीप्रास देय असणा-या एकूण रु.368.16 लक्ष इतक्या रक्कमेपैकी केवळ 101.48 लक्ष इतकीच रक्कम मजीप्रास आदा केली असून अद्याप रु.266.68 लक्ष इतकी रक्कम प्रलंबित असल्याचे नमूद आहे. महानगरपालिकने प्रमाणक क्र. 7 दि.24/03/2014 ने रु.50 लाख रक्कम मजिप्रास, 41310 नगरोत्थान योजने अंतर्गत होणारा खर्च या लेखाशीर्षामधून आदा केली आहे. मजीप्राने जुनाच डिपीआर महानगरपालिकेस सादर केला असल्याने या अनियमिततेबाबत मजीप्रास महानगरपालिकेने दिलेली रक्कम रु.151.48 लक्ष आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

21) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एनयुआर- 2008/प्र.क्र.2003 नवि-33, दि.20/02/2010 मधील v) नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांना सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा करणे शक्य व्हावे या करिता MUIDCL( महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड) या शासनप्रणीत कंपनीला सक्षम करण्यासाठी राज्य शासन व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड (MUIF) मध्ये प्रत्येकी रु.250 कोटी इतकी

DRAFT

गुंतवणुक करुन रु.500 कोटीचा स्वतंत्र प्रकल्प वित्त पुरवठा निधी स्थापन करण्यासाठी शासन निर्णय क्र. एनयुआर -2009/प्र.क्र.127/09/नवि-33 दि.31/08/2009 अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. सदर निधीमधून MUIDCL प्रस्तुत महाभियाना अंतर्गत मंजूर प्रकल्पाकरिता सवलतीच्या दराने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्ज मंजूर व वितरीत करणार आहे. या शासन निर्णया न्वये दरसूचीतील फरकामुळे सदर प्रकल्पांच्या अंदाजपत्रकीय किमतीमध्ये होणारी वाढ याची 50 टक्के रक्कम पूरक अनुदानाच्या स्वरुपात राज्यशासनाकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मिरज भुयारी गटार योजनेची सन 2010-11 च्या दरसूचीप्रमाणे होणारी निविदा किंमत रु.50,45,60,058/- इतकी आहे. 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये सदर कामाच्या निविदा दि.21/04/2012 रोजी मागविल्या असुन निविदा दि.21/08/2012 रोजी उघडण्यात आल्या आहेत व कमी देकाराच्या ठेकेदाराबरोबर वाटाघाटी दि.12/03/2012 व दि.14/03/2012 रोजी करुन ठेकेदाराची निविदा महासभेने महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 ने मंजुर केली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या कामाची 2011-12 च्या दरसूचीनुसार मुल्यांकित केलेली किंमत रु.66,04,95,000/- असून ठेकेदाराचा मंजूर निविदा दर रु.77,54,36,420/- इतका आहे. दि.31/08/2009 च्या शासन निर्णयानुसार निविदा रक्कम रु. 50,45,60,058 - रु.66,04,95,000/- = रु.155934942/- च्या 50 टक्के रक्कम रु.7,79,67,471/- शासनाकडून पुरक अनुदानाच्या स्वरुपात मिळणार आहेत. सदर जादा अनुदानाची रक्कम मिळविण्यासाठी महानगरपालिकेने कोणतेही प्रयत्न केले नसल्याचे नस्तीची तपासणी केले असता दिसून आले आहे.

22)शासन निर्णय दि.20 फेब्रु.2010 मधील 7 (iii) नुसार मंजूर प्रकल्पांना शासनाचे देय अनूदान दोन टप्प्यात मंजूर करण्यात येणार आहे. अनुदानाचा 50 टक्के भाग प्रकल्प मंजूरी नंतर वितरीत करण्यात येईल. उर्वरित 50 टक्के अनुदान प्रथम टप्प्याच्या अनुदानाच्या 70 टक्के रक्कम खर्च झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वितरीत करण्यात येईल असे नमुद आहे. शासनाने महानगरपालिकेस दि.31/03/2012 रोजी रु.7 कोटी 07 लाख व दि.25/03/2013 रोजी रु.7 कोटी 07 लाख असे एकूण 14 कोटी 14 लाख पहिल्या टप्प्याच्या हप्त्यापोटी महानगरपालिकेस आदा केले आहेत. 2012-13 या आर्थिक वर्षात या योजनेवर एकूण रक्कम रु.193755560/- खर्च झाला आहे. त्यामधून ठेकेदारास आदा केलेली मोबिलायझेशन ॲडव्हान्स रक्कम रु.50476006/- वजा करता रु.143279555/- इतका खर्च झाला आहे. सदर खर्च पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या अनुदानाच्या 70 टक्के पेक्षा जास्त झाल्याने या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर करुन दुस-या टप्प्याच्या अनुदानाची मागणी करणे आवश्यक असता महानगरपालिकेने उपयोगिता प्रमाणपत्रे शासनाकडे पाठविलेली नसल्याने दुस-या टप्प्याचे अनुदान महानगरपालिकेस मिळालेले नाही.

23) महानगरपालिकेस ठेकेदाराच्या मंजूर निविदेची रक्कम रु. 77,54,36,420/- वजा निविदेची मुल्यांकित किंमत रु.66,04,95,000/- = रु.11,49,41,420/- अधिक (निविदा रक्कम रु. 50,45,60,058 - निविदेची मुल्यांकित रक्कम रु.66,04,95,000/- = रु.155934942/-) च्या 50

टक्के दरसूचीमधील निविदा दर फरक रक्कम रु.7,79,67,471/- अशी एकूण रक्कम रु.192908891/- महानगरपालिकेस स्वनिधीमधून उभारावी लागणार आहे. परंतु महानगरपालिकेने स्वनिधीची रक्कम उभारणेचे कोणतेही प्रयत्न केलेचे अंदाजपत्रकाची तसेच नस्तीची तपासणी केली असता दिसून येत नाही.

**वसुलपात्र रक्कम :-** निविदा काढणे व स्विकारणे यामध्ये एक वर्षाचा कालावधी गेल्याने व नविन दरसूची 2012-13 च्या मुल्यांकीत किंमतीबरोबर दरपृथ:करण करुन निविदा मंजुर केल्याने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रु.46246177/- + मोबिलायझेशन ॲडव्हान्सवरील आयकराची 2 टक्केप्रमाणे कपात करावयाची रक्कम रु.1009520/- + गौण खनिजावरील रॉयल्टीची रक्कम रु.81860/- = रु.47337557/-

**आक्षेपाधिन रक्कम :-** या कामाची निविदा 2012-13 च्या मजिप्रा चालू दरसूचीबरोबर तुलना करुन 9.72 टक्के जादाने मंजुर केली आहे. परंतु जादा दर का आले आहेत याचे दरपृथ:करण न करताच जादा दरास मंजुरी दिल्याने जादाची रक्कम रु.68695243/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत + या कामामधील Severage Treatment Plant साठी खुदाई केलेला मुरुम महानगरपालिकेच्या ताब्यात दिला नसल्याने या खुदाईची रक्कम रु.3492720/- + खुदाईच्या 5 टक्के कामाची कार्यकारी अभियंता यांनी जागेवर जावून तपासणी केली नसल्याने रक्कम रु.11236024/- = रु.83423987/-

DATSBKM7201 (Ref No : 42)

DRAFT

## *79 सांगली शहर भुयारी गटार योजनेच्या कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत.*

**महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 21**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनिस: राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 92960057.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 56401940.00/-

***नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक –एनयुआर - 2008/प्र.क्र.203/नवि-33, दि.20 फेब्रुवारी 2010 मधील अनुक्रमांक 05 नुसार नगरोत्थान महाभियानात सहभागी होण्यासाठी महानगरपालिकेने राज्य शासनाबरोबर सामंजस्याचा लेखी करार करुन शासनाने विहीत केलेला सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम मान्य केला आहे. कराराप्रमाणे महानगरपालिकेचे लेखे 2012-13 पासुन द्विनोंद पध्दतीमध्ये ठेवणे आवश्यक आहे. परंतु 2013-14 या आर्थिक वर्षाचे लेखे सिंगल एन्ट्री सिस्टिममध्ये ठेवण्यात आले आहेत. महानगरपालिकेने मत्ता व दायित्व यांचे मुल्यांकन केलेले नाही. ई गव्हर्नन्स अंतर्गत अ.क्र.2 मधील a) ते l) मध्ये दिलेल्या सुधारणा HCL कंपनीशी BOT तत्वावर करार करुन केल्या आहेत. परंतु कंपनीची देयके दिली नसल्याने त्यांनी काम बंद केले असून सर्व काम पुन्हा 2013-14 या आर्थिक वर्षापासुन मॅन्युअली चालू झाले***

***आहे. या कराराअंतर्गत सुधारणामधील अ.क्र.3 नुसार 2012-13 पासुन घरपट्टी भांडवली मुल्यावर चालु करण्याचे नमूद आहे. परंतु महानगरपालिकेने 2013 -14 या आर्थिक वर्षा अखेर घरपट्टीची वसुली भांडवली मूल्यावर चालू केलेली नाही. महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 ने भुयारी गटार योजनेसाठी महानगरपालिका हिश्श्याची रक्कमेची तरतुद करण्यासाठी अंदाजे रु.125 कोटी कर्ज उभारणीस व चालु व्याजदर व 10 वर्ष कर्ज परतफेड कालावधी धरता दरवर्षी रु.20 कोटीची अतिरिक्त तरतुद कर्ज फेडीसाठी अर्थसंकल्पात करणेस व सिंकींग फंडामध्ये सदर रक्कम वर्ग करुन कर्जफेड नियमित स्वरुपात करणेसाठी सभेने मान्यता दिली आहे. परंतु सिंकींग फंड उभारण्यात आलेला नाही. कामाचा बार चार्ट ठेकेदाराने विलंबाने दिलेला आहे. या कामाची निविदेचे दरपृथ:करण चालू दरसूची 2012-13 बरोबर करुन चालू निविदा दराच्या 9.72 टक्के जादा दराने निविदा मंजुर केली आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.डी.पी.डब्ल्यु 1996/16 ब/ लेखापरीक्षा, मंत्रालय दि.20/09/1997 नुसार चालू दरसूचीच्या अधारे दरपृथ:करण केलेल्या निविदेचे अधिक्य 5 टक्केपेक्षा जास्त आल्यास अशा अधिक्यास शासनाची पुर्वमंजुरी घेणे आवश्यक असता ती घेण्यात आलेली नाही. जादाचे काम करताना सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिच्छेद 263 नुसार कार्यकारी अभियंता यांनी पुरक अंदाजपत्रक तयार करुन त्यास आयुक्तांची मान्यता घेतल्यानंतर काम करणे आवश्यक असता कार्यकारी अभियंता व स्थानिक नगरसेवक यांनी दिलेल्या तोंडी सूचनेनुसार सांगलवाडी ड्रेनेज लाईनचे 2200 मीटरचे जादा काम करण्यात आले आहे. या कामाचा डी.पी.आर. मजिप्राने सन 2003 मध्ये UIDSSMT योजनेसाठी तयार केला होता. मजिप्राने भुयारी गटार योजनेचा पुन्हा सर्व्हे करुन सुधारित डीपीआर तयार न करता जुनाच डी.पी.आर. 2010-11 च्या दरसूचीमधील दर वापरुन नगरोत्थान योजनेसाठी वापरण्यात आला आहे. ठेकेदाराची देयके आदा करताना शासन व मनपा हिस्सा याप्रमाणे आदा न करता सर्व देयके स्वनिधी मधुन आदा केली आहेत. सदरचे काम रेल्वेलाईन, जिल्हापरिषद व सार्व.बांधकाम विभागाच्या रस्त्या खालुन जाणार असल्याने या विभागांची मान्यता घेतली नसल्याने काम करण्यास विलंब लागणार आहे.***

सांगली,मिरज आणि कुपवाड शहरातील ड्रेनेज व्यवस्था मूळ शहरापुरतीच असून, कुपवाडसह विस्तारित भागात ड्रेनेज व्यवस्था तातडीने राबविणे आवश्यक आहे. तसेच मूळ शहरातील ड्रेनेज व्यवस्था कालबाह्य झाल्याने शहरासाठी भुयारी गटर राबविणे आवश्यक आहे. यासाठीचा प्रस्ताव केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहराच्या पायाभूत विकास कार्यक्रमांतर्गत (UIDSSMT) केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. त्यास राज्यस्तरीय नोडल एजन्सी (SLSC) दि.28/09/2006 रोजी मान्यता झाली आहे. परंतु केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली नसल्याने व भविष्यात निधी उपलब्ध होण्याची शक्यता नसल्याने सदरचे दोन्ही प्रकल्प मार्गी लागण्यासाठी राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान योजने अंतर्गत सदरचे दोन्ही प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत सांगली शहराच्या भुयारी गटर योजनेस राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता व सनियंत्रण समितीची मान्यता दि.06/08/2011 रोजीच्या बैठकीमध्ये मिळाली. या योजनेसाठी नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.नगरी /2011 /प्र.क्र.176/नवि -33 मंत्रालय दि. 01 नोव्हे.2011

DRAFT

नुसार सांगली भुयारी गटार योजनेसाठी खालील प्रमाणे निधी वितरीत करण्यात आला आहे. (पृष्ठ क्र.57) .

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | किंमत रू. | शासनाचा हिस्सा रू. | वितरीत करावयाची रक्कम 25 टक्के रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | सांगली भुयारी गटार | 82.22 | 41.11 | 10.28 |

यापैकी रु.10 कोटी 28 लाख इतका निधी दि.01/11/2012 च्या शासन निर्णयानुसार मंजुर होवून दि.31/01/2012 रोजी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. सदर निधी वितरीत करताना शासनाने खालील अटी स्थानिक स्वराज्य संस्थांना घातल्या आहेत.

1.सदर प्रकल्पाकरीता बँकेत स्वतंत्र खाते उघडण्यात यावे व शासनाकडून प्राप्त होणारा निधी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्शाची स्वत:च्या उत्पन्नातून / हिश्शापोटी घेतलेल्या कर्जाची रक्कम देखील याच खात्यात जमा करावी.

2)सदर निधीचा वापर या प्रकल्पाकरीताच करणे आवश्यक आहे. इतर बाबीवर खर्च ही आर्थिक अनियमितता मानली जाईल.

3)सदर प्रकल्पाकरीता निधी मंजूर करताना मंजूर किमतीपेक्षा आधिक्य आल्यास त्याचे दायित्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे राहिल. तसेच अट क्र.3 नुसार करारनाम्यात नमूद केलेल्या सुधारणाबाबत वर्षनिहाय केलेली प्रगती पाहून तसेच वितरीत केलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र दिल्यानंतरच सदर योजनेअंतर्गत राज्य शासनाचा पुढील हिस्सा वितरीत करण्यात येईल.

तसेच नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक - नगरो 2012/प्र.क्र.189/नवि 33 दि.25/03/2013 ने सांगली गटार योजनेसाठी पहिल्या हप्त्यातील उर्वरित रक्कम रु.10.28 कोटी व मिरज गटार योजनेसाठी पहिल्या हप्त्याची उर्वरित रक्कम रु.7.07 कोटी अनुदान उपलब्ध करण्यास या शासन निर्णयाने खालील अटींच्या अधिन मान्यता दिली आहे.

अ) निधीचा वापर नमुद प्रकल्पाकरीताच असणे आवश्यक राहील. सदर निधीचा इतर बाबींवरील वापर ही आर्थिक अनियमितता मानली जाईल.

ब)सदर प्रकल्पाकरिता मंजूर निविदा किंमतीपेक्षा निविदा स्विकृतीची किंमत आधिक असल्यास त्याचे दायित्व महानगरपालिकेवर राहिल.

क) प्रकल्पाच्या किंमतीपोटी MUIDCL/ MUINFRA कडून संबंधीत नागरी स्वराज्य संस्थेस प्राप्त होणा-या कर्जाच्या रक्कमेची परतफेड या नागरी स्वराज्य संस्थेने प्रामुख्याने तेराव्या वित्त आयोगातील मिळणा-या निधीतून करण्याचे नियोजन करावे व त्या दृष्टीने सदर स्त्रोतातून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस प्राप्त होणा-या रक्कमा कर्जापाटी शासनाने परस्पर वळत्या करुन संबंधीत वित्तिय संस्थेस कर्जाच्या परतफेडीसाठी वर्ग करण्यासंबंधी नागरी स्वराज्य संस्थेची संमती आहे असा ठराव करुन त्याची प्रत शासनास सादर करावी. सदर निधीचे वितरण महाराष्ट्र शासन,नगरविकास

DRAFT

विभाग शासन निर्णय क्रमांक : नगरो -2014 /प्र.क्र.219/नवि -33 दि.12 फेब्रुवारी 2015 चे शासन निर्णयाने केले आहे. कुपवाड शहराकरीता अद्याप कोणत्याही भुयारी गटर योजनेची सुविधा नसल्याने कुपवाड शहराकरीता नव्याने योजना मंजुरीसाठी सांगली व मिरज या दोन्ही शहराबरोबर सादर करण्याचे ठरले आहे. योजनेच्या किमती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नाव | किंमत कोटी रु. |
|---|---|---|
| 1 | सांगली शहर भुयारी गटर योजना टप्पा क्र.2 भाग 2 | 108.66 |
| 2 | मिरज शहराकरिता भुयारी गटर योजना | 62.30 |
| 3 | कुपवाड शहर भुयारी गटर योजना | 146.31 |
| | एकूण | 317.27 |

नगरोत्थान योजने अंतर्गत खालीलप्रमाणे आकृतीबंध आहे. (रुपये कोटीमध्ये)

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनेची किंमत रु. | शासकीय अनुदान 50% रु. | MUIDCL कर्ज रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | सांगली शहर भुयारी गटर योजना टप्पा क्र.2 भाग 2 | 108.66 | 54.33 | 54.33 |
| 2 | मिरज शहराकरिता भुयारी गटर योजना | 62.30 | 31.15 | 31.15 |
| 3 | कुपवाड शहर भुयारी गटर योजना | 146.31 | 73.15 | 73.15 |
| | एकूण | 317.27 | 158.63 | 158.63 |

DRAFT

वरील आकृतीबंधाप्रमाणे सांगली, मिरज आणि कुपवाड या तिन्ही शहराकरीता भुयारी गटर योजनेचे एकूण रक्कम रु.317.49 कोटीच्या योजनेस महासभा क्र.08 ठराव क्र.222 दि.20/03/2010 रोजी ऐनवेळच्या विषयाने मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेकरीता महानगरपालिकेने 50 टक्के इतका निधी रक्कम रु.158.63 कोटी कर्ज रुपाने उभा करणेस महासभेने मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानात सहभागी होण्यासाठी शासनाबरोबर लेखी करार करणे आणि त्याचबरोबर महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एनयुआर-222008/प्र.क्र.203/नवि-33/मंत्रालय मुंबई दि.20/02/2010 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व अटी व शर्तींचा स्विकार करून सदर तिन्ही शहरांच्या भुयारी गटर योजनेवरील आकृतीबंधाप्रमाणे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान सुवर्णजयंती महा अभियान योजने अंतर्गत सहभागी होणेकामी मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणेस आणि सदरची योजना राबविणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस महासभेने मंजूरी दिली आहे.

निविदा नस्तीमधील दि.28/11/2011 मधील (पृष्ठ क्र.T-3 ते T-19) वर जलनि:सारण विभागाने भुयारी गटार योजनेची निविदा काढणेसाठी दोन पर्याय दिले होते. पर्याय क्र.1 नुसार सांगली भुयारी

गटार योजनेची कामे तीन गटात विभागणी करुन गट क्र. 1 मध्ये गटार योजनेची सर्व पाईप लाइन टाकणे रक्कम रु.46,68,48,715/-, गट क्र.2 मलशुध्दीकरण केंद्र रक्कम रु.17,33,60,000/-, गट क्र.3. पंप हाऊस व पंपिंग मशिनरी व किरकोळ कामे करणे रक्कम रु.4,53,63,727/-, या कामाचा समावेश होता.

पर्याय क्र.2 नुसार भुयारी गटार योजनेची कामे चार गटात विभागणी करूण करणे गट क्र.1 नुसार मुख्य मलनि:सारण वाहिन्या व दाब नलिका टाकणे रक्कम रु.29,45,46,634/-, गट क्र.2 नुसार मलनि:सारण मधील उपवाहिन्या व शाखा वाहिन्या टाकणे रक्कम रु.17,23,02,081/-, गट क्र.3 नुसार मलशुध्दीकरण केंद्र रक्कम रु.17,33,60,000/-, गट क्र.4. पंप हाऊस व पंपिंग मशिनरी व किरकोळ कामे करणे रक्कम रु.4,53,63,727/-. असे दोन पर्याय सुचविण्यात आले. यापैकी पर्याय क्र. 2 प्रमाणे काम करण्यास आयुक्त यांनी मान्यता दिली असून त्याप्रमाणे काम करणेची शिफारस केली आहे. आयुक्त यांनी प्रस्तावास दिलेल्या मंजूरीप्रमाणे उपायुक्त यांनी दि.01/12/2011 रोजी विषयपत्र तयार करून स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर केले आहे. विषयपत्रामध्ये भुयारी गटार योजनेची आर्थिक व भौतिक व्याप्ती मोठी आहे. यामुळे कामे करताना उपांगांचे गट तयार करुन निविदा मागवाव्या लागणार आहेत. कामाचे गट तयार करताना उपांगाचा प्रकार उदा. पाईपलाईन आर.सी.सी.वर्क अथवा यांत्रिकी तसेच किंमत व कालावधी यांचा विचार करावा लागणार आहे. कामाच्या प्रकारानुसार त्या त्या कामात प्राविण्य असणारे ठेकेदार नेमावे लागणार आहेत. निविदा मागविताना उपलब्ध होणा-या निधीचा विचार करावा लागेल. या सर्वांचा विचार करुन सांगलीसाठी व मिरज साठी चार गट तयार करण्यात आले आहेत. (नस्तीमधील पृष्ठ क्र.37 ते 49).

पाणीपुरवठा विभागाच्या दि.06/07/2012 च्या निविदा नस्ती मधील पृष्ठ क्र. (T29) नुसार सांगली व मिरज शहरांच्या भुयारी गटार योजनांच्या कामांची जाहिर निविदा मागविणेसाठी प्रशासनाच्या दि.01/02/2012 रोजीच्या प्रस्तावानुसार स्थायी समिती ठराव क्र.635 विषय क्र.26 दि.05/03/2012 अन्वये सांगली भुयारी गटार योजनेच्या रु.68,55,72,442/- या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या एकत्रित खर्चाच्या निविदा मागविणेस तसेच प्रसिध्दीचे खर्चास दि.05/03/2012 रोजी मान्यता मिळाली आहे. (पृष्ठ क्र.59 व 60). तद्नंतर योजनेच्या पूर्व अर्हता, शर्ती व अटी या योजनेचे पी.एम.सी. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून प्राप्त करुन या कामासाठी दि.29 एप्रिल 2012 रोजी दै.सकाळ व इंडियन एक्सप्रेस या राज्यस्तरीय वृत्तपत्रांमध्ये जाहीर ई निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. या कामाच्या निविदा दि. 30/05/2012 पासून दि.01/06/2012 पर्यंत सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ई टेंडरद्वारे केंव्हाही दाखल करण्यात येतील. वरील कामाच्या निविदा दि.02/06/2012 रोजी शक्य झाल्यास उघडण्यात येतील. जाहीर केलेल्या निविदा कार्यक्रमानुसार इच्छुक ठेकेदारांनी दि.01/05/2012 ते 15/05/2012 या कालावधीत पूर्व अर्हता अटींची पूर्तता करणारी कागदपत्रे ई- निविदाद्वारे सादर करावयाची होती. सदर पूर्व अर्हता अटी उघडून तपासणीचा कालावधी दि.18/05/2012 ते 23/05/2012

DRAFT

होता. त्यानुसार दि.18/05/2012 व 19/05/2012 रोजी ठेकेदारांची पूर्व अर्हता अटीबाबतची कागदपत्रे संगणकावरुन डाऊनलोड करण्यात आली. सांगली व मिरज या दोन विविध कामासाठी प्रत्येकी नऊ ठेकेदारांनी निविदा दाखल केल्या आहेत. त्यांची नावे खालील प्रमाणे 1) एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्राय. लिमिटेड, ठाणे. 2) घारपुरे इंजिनिअरींग अँड कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड पुणे.3)सिव एआयपीपीएल - जॉईन्ट व्हेंचर. 4) एस.एम.पी.एल.इन्फ्रा लि. 5) मे.खिलारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड 6) मे.रॅमकी इन्फ्रास्टक्चर प्रायव्हेट लिमिटेड हैद्राबाद. 7) लक्ष्मी एच.डी.ओ.जे.व्ही. 8) किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड 9) मे.आर.बी.कृष्णानी प्रो.राजीव बी.कृष्णानी.पृष्ठ क्र. (T26) .सांगली व मिरजेच्या पूर्वअर्हता अटी व शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ठेकेदारांच्या सर्व प्राप्त कागदपत्रांची छाननी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंत्यांच्या मदतीने करण्यात आली. पात्रतेच्या निकषानुसार विस्तृत तक्ता तयार करण्यात आला आहे. सदर तक्ता नस्तीमधील पृष्ठ क्र. 133 ते 139 वर लगत केला आहे. त्यानुसार पात्र ठेकेदारांची यादी पुढीलप्रमाणे आहे. 1) एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्राय. लिमिटेड, ठाणे. 2) घारपुरे इंजिनिअरींग अँड कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड पुणे. 3) मे.रॅमकी इन्फ्रास्टक्चर प्रायव्हेट लिमिटेड हैद्राबाद. 4) लक्ष्मी एच.डी.ओ.जे.व्ही. निविदेचे पुढील टप्प्याचे सुधारीत वेळापत्रक पृष्ठ क्र.141 वर लगत आहे. वरील प्रमाणे पात्र ठेकेदारांच्या यादीस व सुधारीत वेळापत्रकास आयुक्त यांनी दि.04/06/2012 रोजी मान्यता दिली आहे. दरम्यान दि.12/06/2012 रोजीच्या महासभेमध्ये नगरसेवक श्री.मुन्ना कुरणे यांनी सांगली महानगरपालिकेच्या सभा कामकाज नियमावलीमधील कलम 3/23 अन्वये प्रशासनाने पात्र ठरविलेल्या रॅम्के इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस कोल्हापूर व पुणे महानगरपालिकेने काळ्या यादीमध्ये टाकले आहे. डी.पी.आर. मध्ये मिरजेसाठी WSP (West Stabilisation Pond) या तंत्राचा वापर severage treatment plant (STP) साठी प्रस्तावित केला असताना प्रशासनाने निविदेमध्ये SBR (Sequential Batch Reactor) तंत्राचा वापर असलेल्या कंपन्यांसाठी निविदा काढली आहे. असा अरोपाचा प्रस्ताव दाखल केला आहे. दिलेल्या प्रस्तावावर महासभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा.महापौर यांनी दिलेल्या सुचना व चर्चेत उपस्थीत केलेले मुद्दे व त्यावर प्रशासनाने दिलेली उत्तरे याबाबतचा अहवाल उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांनी दि.12/07/2012 रोजी होणा-या स्थायी समितीच्या बैठकीसाठी विषयपत्राने सादर केला आहे. स्थायी समिती सभा क्र.09 ,ठराव क्र.141 विषय क्र.22 दि.17/07/2012 ने या अहवालाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करुन सदर निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक बाबींची दक्षता घेणे हे महानगरपालिका प्रशासनाचे काम आहे. तांत्रिक व कायदेशीर बाबी प्रशासनाने तपासून निविदा प्रक्रिया तात्काळ सुरू करावे असे समितीने प्रशासनास आदेश केले आहेत. (पृष्ठ क्र.246). त्यानुसार आयुक्त यांनी निविदाबाबतचे सुधारित वेळापत्रक तयार केले आहे. ऑनलाईन टेंडर डॉक्यूमेंट खरेदी करणे 31/07/2012,प्री बीड मिटींग दि.06/08/2012, ऑनलाईन प्री बीड क्लेरिफिकेशन दि.10/08/2012,ऑनलाईन सबमिशन ऑफ बीड 10/08/2012 ते 16/08/2012. ऑनलाईन टेंडर ओपनिंग दि.17/08/2012. (पृष्ठ क्र.249).

DRAFT

सांगली भुयारी गटार योजना, अंदाजपत्रकीय रक्कम रु.65,23,10,522/- या कामाच्या ई टेंडरद्वारे प्राप्त निविदा दि.21/08/2012 रोजी उघडण्यात आल्या होत्या. या कामासाठी एकूण तीन निविदा आलेल्या आहेत. 1)एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड आलेला दर रु.118,06,82,044/- एस्टीमेट रक्कमेच्या 81 टक्के जादा 2)घारपूरे इंजिनिअरींग अँड कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड आलेला दर रु.125,08,70,656/- एस्टीमेट रक्कमेच्या 91.76 टक्के जादा 3) लक्ष्मी इंजिनिअरींग सर्व्हीसेस अँड प्रायव्हेट लिमिटेड आलेला दर रु.125,50,45,444/- एस्टीमेट रक्कमेच्या 92.4 टक्के जादाने आलेला आहे.(पृष्ठ क्र.533).

प्राप्त निविदांचा किमान देकार मुळ निविदा किमतीवरती सांगलीसाठी 81 टक्के असा जादा होता. कामाच्या निविदा या सन 2010-11 च्या दरसूचीवर आधारीत होत्या. निविदा उघडण्यात आल्या त्यावेळी सन 2011-12 ची दरसूची लागू होती. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सदर निविदेचे मुल्यांकन करुन घेण्यात आले होते. निविदा दर जास्त असल्याने आयुक्त यांच्या स्तरावर ठेकेदाराबरोबर निविदा समितीसमोर वाटाघाटी झाल्या. त्यात ठेकेदाराने त्यांचा निविदा दर सांगलीसाठी 81 टक्केवरुन 61.71 टक्केने कमी केला आहे व तसे ठेकेदाराने महानगरपालिकेस SMC/ PROJ / 2012/SMKC/01 दि.23/08/2012 चे पत्राने कळविले आहे. (पृष्ठ क्र.613). सदर दर तात्कालीन दरसूचीनुसार (2011-12) जास्त असल्याने ठेकेदारास दि.28/08/2012 रोजी फेर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु त्याच वेळी सन 2012-13 ची दरसूची प्रसिध्द होण्याच्या मार्गावर असल्याने ठेकेदाराने नविन दरसूचीनुसार मुल्यांकन करण्याची विनंती केली होती. तसेच महासभा क्रमांक 10 ,ठराव क्र.350 विषय क्रमांक 1(ज) नुसार दि.23/01/2013 ने निविदा काढून सहा महिन्याचा कालावधी झाले आहेत. परंतु निविदेस अंतिम मान्यता झालेली नाही. 2012-13 चा डिएस.आर प्रसिध्द झाल्यानंतर आलेल्या निविदा मान्यतेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने महासभेस लवकरात लवकर सादर करावा असे या ठरावान्वये आदेशीत केले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुणे यांनी जाक्र.मु.अ./प्रव्यससे(पुणे)/ताशां-4/ प्र.क्र.98/332 दि.13/02/2013 चे पत्राने सांगली भुयारी गटार योजनेच्या निविदेची सन 2012-13 दरसूचीनुसार मुल्यांकित किंमत रु.883697125/- व मिरज भुयारी गटार योजनेची मुल्यांकित किंमत रु.706741177/- झाली असल्याचे कळविले आहे.(पृष्ठ क्र.632) . त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने जा.क्र/ड्रेनेज 224/12-13 दि.01/03/2013 चे पत्राने सांगली भुयारी गटार योजनेसाठी व मिरज भुयारी गटार योजनेसाठी जा.क्र/ड्रेनेज 225/12-13 दि.01/03/2013 रोजी पत्र पाठवुन ठेकेदार एस.एम.सी.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.ठाणे यांना अंतिम देकार रक्कमेच्या वाटाघाटीस आयुक्त यांचे कार्यालयात दि.12/03/2013 रोजी उपस्थित राहण्यासाठी कळविले आहे. (पृष्ठ क्र.649). दि.12/03/2013 रोजी झालेल्या वाटाघाटीच्या बैठकीच्या अनुषंगाने ठेकेदाराने त्यांचे दि.12/03/2013 व दि.14/03/2013 च्या पत्राने आपले लेखी म्हणने महानगरपालिकेस दि.21/03/2013 रोजी सादर केले आहे.(पृष्ठ क्र.655) पत्रामध्ये कॉम्पोझिट व्हॅट, काम करताना युटीलिटीजची दुरुस्ती, शुगरकेन

DRAFT

एरिया असल्याने कामगारांची कमतरता या अडचणींचा उल्लेख ठेकेदाराने दोन्हीही निविदांना चालु दरसूचीच्या (सन 2012-13) 9.72 टक्के जादा दराने काम करणेस लेखी सहमती दिली आहे.
ठेकेदाराचा प्राप्त देकार पाहता, सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.
अ)सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 (पृष्ठ क्र.597 महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र

| | | |
|---|---|---|
| 1 | निविदेची किंमत 2010 -11 दरसूची | रु.647154675/- |
| 2 | न्यूनतम ठेकेदाराचा देकार | रु.117,13,49,962/- (81%) जादा |
| 3 | 2011-12 नुसार मजिप्राने केलेली मुल्यांकित किंमत | रु.82,86,62,485/- (28.04%) जादा |
| 4 | प्रथम वाटाघाटीनंतर ठेकेदाराचा देकार | रु.104,6513825/- (61.71%)जादा |
| 5 | सन 2012-13 नुसार मजीप्राने केलेली मुल्यांकित किंमत | रु.883697125/- (36.56% )जादा |
| 6 | सन 2012-13 च्या मुल्यांकित किमतीशी तुलना करता ठेकेदाराचा देकार | रु.18.42 टक्के |
| 7 | दि.12/03/2013 च्या वाटाघाटीनंतरचा ठेकेदाराच देकार | रु.969592485/- सन 2012-13 मुल्यांकित किमतीच्या 9.72 टक्के जादा |
| 8 | निविदा किमतीच्या तुलनेत ठेकेदाराचा अंतिम देकार | 49.82 टक्के जादा |

DRAFT

सांगली भूयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 आणि मिरज भूयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 योजनांच्या कामाच्या निविदांचा आलेला देकार व अनुषंगिक बाबींबाबत निर्णय घेणेसाठी उपायुक्त यांनी क्र/मनपा/ जलवि/ 256/12-13 दि.30/03/2013 रोजी महासभेकडे खालील प्रमाणे विषयपत्र सादर केले आहे. (पृष्ठ क्र.693 ते 698)

दोन्ही योजनेतील प्रसिध्द केलेल्या निविदेतील कामांची एकत्रित किंमत मंजूर योजनेप्रमाणे रु.115.16 कोटी एवढी होती. सन 2012-13 च्या दरसूचीनुसार दोन्ही योजनांची मजीप्राकडुन केलेली मुल्यांकित रक्कम रु.159.04 कोटी एवढी आहे. सुधारित योजना सादर केलेनंतर या किमतीला शासनाकडुन मंजूरी मिळू शकेल. योजनेच्या आकृतीबंधाप्रमाणे रु.79.52 कोटी (50 टक्के) शासना कडुन प्राप्त होवु शकतील. तसेच उर्वरित रक्कम रु. 79.52 कोटी (50 टक्के) महानगरपालिकेस कर्ज रुपाने उपलब्ध करुन द्यावे लागतील. ठेकेदाराचा अंतिम देकार एकत्रित रु.174.50 कोटी एवढा आहे. सुधारीत योजनेच्या किंमतीपेक्षा जास्तीचा दर महानगरपालिकेस सोसावा लागणार आहे. ठेकेदाराच्या अंतिम देकारानुसार येणा-या वाढीव खर्चासाठी (15.46 कोटी) व दरसूचीतील फरक रु.43.87 कोटी असा एकूण 59.33 कोटी मंजूर रक्कमेपेक्षा जादा खर्च अपेक्षित आहे. दरसूचीतील फरक रक्कम रु.43.87 कोटीसाठी योजना सुधारीत करून शासनास सादर करुन मान्यता घ्यावी लागणार आहे.

तसेच जादा देकारासाठीचे रु.15.46 कोटी महानगरपालिकेस स्वनिधीमधून खर्च करावे लागणार आहेत. दरसूचीतील फरक व मुळ मंजूर किंमत यांचे एकत्रित रक्कमेच्या 50 टक्के म्हणजेच रु.79.52 कोटी महानगरपालिकेस उभा करावे लागणार आहेत. दोन्ही योजनासाठी सुधारीत योजनेच्या 50 टक्के महानगरपालिका हिस्सा व ठेकेदाराचा चालू दरसूचीवरील जादाचा देकार रु.15.46 कोटी असा एकत्रित रु.94.98 कोटी तसेच संभाव्य भाववाढीचा विचार करता रु.100 कोटीपर्यंत वित्तिय भार महानगरपालिकेस कर्ज अथवा स्वनिधीच्या स्वरुपात द्यावा लागणार आहे. सदरचे विषयपत्र उपायुक्त(जलवि) यांनी दि.30/03/2013 रोजी सादर केले आहे व सदर विषयपत्र अवलोकनी घेवून महासभेने महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 खालीलप्रमाणे मान्यता दिली आहे. (पृष्ठ क्र.699 ते 707)

1) सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 च्या निविदा दरास निविदा किमतीच्या 49.82 टक्के जादा दराने तसेच चालु दरसूचीनुसार (सन 2012-13) 9.72 टक्के जादा दरास ही सभा मान्यता देत आहे.

2) मिरज भुयारी गटर योजना टप्पा क्र.2 च्या निविदा दरास निविदा किंमतीच्या 53.68 टक्के जादा दराने तसेच चालु दरसूचीनुसार (सन 2012-13) 9.72 टक्के जादा दरास मान्यता देत आहे.

3) दरसूचीतील फरक मिळणेसाठी सुधारीत योजना शासनास सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

4) अंदाजे रु.125 कोटी कर्ज उभारणीस ही सभा मान्यता देत आहे.

5) चालु व्याजदर व 10 वर्ष कर्ज परतफेड कालावधी धरता दरवर्षी रु.20 कोटीची अतिरिक्त तरतुद कर्ज फेडीसाठी अर्थसंकल्पात करणे व सिंकींग फंडामध्ये सदर रक्कम वर्ग करुन कर्जफेड नियमित स्वरुपात करणे यासाठी ही सभा मान्यता देत आहे.

6) महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा, जलनि:सारण, घरपट्टी व मालमत्ता इत्यादी विभागांचे सेवांचे दर / सेवाशुल्क इत्यादींची आकारणी महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र.शासन निर्णय क्र.संकिर्ण-2009 / प्र.क्र.207/09/नवि 20/मंत्रालय मुंबई दि.02/08/2010 व महाराष्ट्र शासनाशी दि.02/08/2010 रोजी केलेल्या सामंजस्य कराराप्रमाणे सुधारीत कर आकारणी व इतर प्रशासकीय व आर्थिक सुधारणा करणे, विषयाची प्रक्रिया चालु आर्थिक वर्षापासून सुरु करण्यास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता दिली आहे.

कामाची वर्कऑर्डर :-कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा व जलनि:सारण विभाग यांचे पत्र क्र/ ड्रेनेज डिपार्टमेंट / नगरोत्थान/ सांगली/93/ 13-14 दि.30/04/2013 अन्वये दिली आहे. (पृष्ठ क्र.24)

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गतच्या सांगली गटार योजना टप्पा क्र.2 (उपमलनि:सारण वाहिन्या, मलनि:सारण वाहिन्या, दाबनलिका, पंपगृह उत्प्रेक्षण यंत्रणा, मलशुध्दीकरण केंद्र, विल्हेवाट व्यवस्था, चाचणी देणे इ. काम) अंदाजित खर्च रु.647154675/- , निविदा मंजूर केल्यानंतरचा दर रु.96,95,92,485/- (49.82 टक्के जादा दराने) असुन या कामाचे करारपत्र

DRAFT

महानगरपालिका व ठेकेदार एस.एम.सी.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे मध्ये दि.29/04/2013 रोजी झाला आहे. ठेकेदाराने रु.5 लाख मुद्रांक शुल्कापोटी भरणा केले आहेत.

**कामाची समज:-** कार्यकारी अभियंता मलनि:सारण विभाग यांचे पत्र क्र.मनपा /जलवि/ सां/16/ दि.09/04/2013 अन्वये कामाची समज देण्यात आली असून सुरक्षा अनामत रक्कम स्विकृत निविदेच्या 2.5 टक्के राष्ट्रीयकृत बँकेच्या ठेव पावती किंवा बँक गॅरेंटीच्या स्वरुपात सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या नावे ठेवुन करारपत्र करणेस व उर्वरित 2.5 टक्के रक्कम देयकामधून कपात करणेस ठेकेदारास कळविण्यात आले आहे. त्यानुसार ठेकेदाराने आय.डी.बी.आय बँक ठाणे, या बँकेची बँक गॅरेंटी क्र.1307831BGF00070, रक्कम रु.24239813 /-, मुदत दि.14/04/2015 पर्यंत ठेकेदाराने दिली आहे.(नस्तीमधील पृष्ठ क्र.15 ते 29)

कामाची वर्कऑर्डर :- जलनि:सारण विभागाचे पत्र क्र/ड्रेनेज डिपार्टमेंट/ नगरोत्थान /सांगली /93 /13-14 दि.30/04/2013 ने कामाची वर्कऑर्डर देण्यात आली आहे. (नस्तीमधील पृष्ठ क्र.31)

जमवाजमव उचल :- मुख्य करारपत्रामधील मुद्दा क्र.11 अन्वये ठेकेदारास जमवाजमव उचल अनुज्ञेय आहे. बी-1 करारपत्रात समाविष्ठ असलेल्या देकार पूर्व बैठकीच्या खुलाशातील जोडपत्र 1 नुसार पृष्ठ क्र.22 वर याबाबतचा तपशिल दिलेला आहे. यानुसार निविदा किमतीच्या 10 टक्के जमवाजमव उचल अनुज्ञेय आहे. ठेकेदाराने तीन महिन्याचे आत मागणी सादर करणे आवश्यक आहे. यासाठी ठेकेदाराने तितक्याच रक्कमेची बँकेची हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. यानुसार ठेकेदारांनी त्यांचे पत्र क्र.SMCIPU/tender/SMKC/MP/2013-14/7, दि.17/05/2013 अन्वये रु.64715468/- किमतीच्या IDBI बँकेची हमीपत्रे सादर केली आहेत व त्यानुसार प्रमाणक क्र.3, दि.07/08/2013 ने ठेकेदारास धनादेश क्र.803507 ने रु. 64715468/- आदा केले आहेत.

| अ.क्र. | बँक गॅरेंटी तपशिल | रक्कम रु. | मुदत दिनांकापर्यंत |
|---|---|---|---|
| 1 | 1307831BGA00053 | 809000000 | 11/10/2013 |
| 2 | 1307831BGA00054 | 809000000 | 11/01/2014 |
| 3 | 1307831BGA00055 | 809000000 | 11/04/2014 |
| 4 | 1307831BGA00056 | 809000000 | 11/07/2014 |
| 5 | 1307831BGA00057 | 809000000 | 11/10/2014 |
| 6 | 1307831BGA00058 | 809000000 | 11/01/2015 |
| 7 | 1307831BGA00059 | 809000000 | 11/04/2015 |
| 8 | 1307831BGA00060 | 809000000 | 11/07/2015 |

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक -एनयुआर -2008/प्र.क्र.203/नवि- 33, दि.20 फेब्रुवारी 2010 मधील (7) नुसार महाभियाना अंतर्गत मंजूर प्रकल्पांना अनुदान व कर्ज उपलब्ध करून देण्याची कार्यपध्दती:-

(iii) मंजूर प्रकल्पांना शासनाचे देय अनूदान दोन टप्प्यात मंजूर करण्यात येईल. अनुदानाचा 50



DRAFT

टक्के भग प्रकल्प मंजूरी नंतर वितरीत करण्यात येईल. उर्वरित 50 टक्के अनुदान प्रथम टप्प्याच्या अनुदानाच्या 70 टक्के रक्कम खर्च झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वितरीत करण्यात येईल. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस आवश्यक असल्यास कर्जाची रक्कम त्यानंतर वर नमूद केल्याप्रमाणे मंजूर वितरीत करण्यात येईल.

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक -एनयुआर -2008/प्र.क्र.203/नवि-33,दि.20 फेब्रुवारी 2010 यासोबतचे परिशिष्ट II विविध नागरी सेवांसाठी शासनाने विहित केलेली मानके खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | सेवा | एकक | विहित मानके |
|---|---|---|---|
| 1 | पाणीपुरवठा नळजोडणी | % | 100% |
| 2 | दरडोई पाणीपुरवठा | अ) लिटर प्रतिदिन:- ज्या ठिकाणी भूयारी मलनि:सारण व्यवस्था नाही<br>ब) लिटर प्रतिदिन:- ज्या ठिकाणी भूयारी मलनि:सारण व्यवस्था आहे | 70<br>135 |
| 3 | मिटर नळजोडण्या | % | 100 % |
| 4 | गैरमहसुली पाण्याचे प्रमाण | % | 15 % |
| 5 | पाणीपुरवठयाचे सातत्य | तास प्रतिदिन | 24 तास प्रतिदिन |
| 6 | तक्रारी निराकरणाचे प्रमाण | % | 80 % |
| 7 | पाणीपुरवठयाचा दर्जा | % | 100% |
| 8 | पाणीपुरवठया करिता होणा-या खर्चाची वसूली | % | 100% |
| 9 | पाणीपुरवठयाशी निगडीत शुल्क वसुलीतील कार्यक्षमता | % | 100% |

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक -एनयुआर -2008/प्र.क्र.203/नवि-33,दि.20 फेब्रुवारी 2010 मधील अनुक्रमांक 05 नुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानात सहभागी होण्यासाठी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने राज्य शासनाबरोबर सामंजस्याचा लेखी करार करुन शासनाने विहीत केलेला सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम मान्य करणे बंधनकारक राहील व याबाबत ठराव करणे आवश्यक राहील. सदर सुधार कार्यक्रम राबविण्यास महानगरपालिकेने महासभा क्र.08, ठराव क्र.222 विषय क्र.ऐन , दि.20/03/2010 ने मान्य केले आहे व त्याप्रमाणे महाराष्ट्र शासन व सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेमध्ये **दि.18 नोव्हे. 2011 मध्ये सामंजस्य करार** रु.100/- चे मुद्रांकावर करण्यात आला आहे. सदर करारावर

महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त व महापौर यांनी स्वाक्षरी केली आहे. सदर कराराची प्रत जलनि:सारण विभाग सांगली सन 2011-12, महाराष्ट्र शासनाचा नगरोत्थान योजनेअंतर्गत महापालिका क्षेत्रातील वॉनलेसवाडी,गव्हरमेंट कॉलनी व मिरज शहरासाठी भुमिगत ड्रेनेज योजनेअंतर्गत अंदाजपत्रके आराखडे तयार करणेबाबत या फाईलमध्ये पृष्ठ क्र.607 ते 619 वर लावण्यात आली आहे. करारामधील सुधारणेच्या अटी व शर्ती व त्यासाठी लागणारा कालावधी खालीलप्रमाणे आहे.

Anexure A

Timelines for Reforms

Sangli Miraj Kupwad Municipal Corporation commits to undertake the following reforms stipulated under Maharashtra suvernjayanti nagrothan mahaabhiyan as prr the timeline indicate herein below and also agrees to implement any other reform that state government may prescribed as condation for for financial assistance under the said abhiyan.

| sr.no. | Reforms | Timeline |
|---|---|---|
| 1 | implementation of Double Entry Accrual based Accounting System<br>1) Listing and valuation of assets and liabilaties.<br>2) drawing up of opening balance sheet<br>3)Full migration to Double entry Accrual based Accounting System | 2012-13 |
| 2 | E Governance<br>a) Registration of Birth & Death<br>b)Property Tax Assesment<br>c)water billing & Accounting<br>d)Food lincense<br>e)Market lincense<br>f)Accounts(Double Entrry Accounting)<br>g)Complaints & Grie vencs Redressal Management.<br>h)User workflow managment system.<br>i)Enterprise Information Portal<br>j)Citizen Facilitation Center<br>k)Town Planning<br>l)E Tendering | 2012-13 |
| 3 | Property Tax Reform | 2012-13 |

DRAFT

| | | |
|---|---|---|
| | a)Setting up a non Discrsetionary method for Determination of property tax (Capital Value Based System)<br>b)Use GIS based property tax system<br>d)Achivement of 95% coverage Ratio<br>e) Achivement of 90% collection ratio | |
| 4 | Levy of Appropriate User Charges | 2012-13 |
| 5 | Internal earmarking within the Budget for basic services to Urban Poor. | 2012-13 |
| 6 | Rain Water Harvesting | 2013-14 |
| 7 | Recycling & Reuse of Waste Water<br>a)Adoption of Bylaws<br>b) 20% Use of Gray Water | 2013-14 |
| 8 | Water Audit | 2013-14 |
| 9 | Energy Audit<br>a) Water Supply<br>b)Sewage Treatment &Disposal<br>c)Street Lights<br>d)Municipal Buildings | 2013-14 |
| 10 | Encouraging Public Private Partnership | 2014-15 |
| 11 | Provision of Basic Services to Urban Poor<br>a)Water Supply<br>b)Sanitation<br>c)Primary Health<br>d)Solid Waste Management<br>e)Street Light<br>f)Roads & Drains<br>g)Primary Health<br>h) Primary Education | 2014-15 |
| 12 | Administrative Reforms<br>a)Adoption of Model Recruitment Rules<br>b)Delegation of Power<br>c)Rationalasation Of Humen Resource<br>d)Caderisation of Municipal Services<br>e)Training need Assessment<br>f)Traing of Humen Resources<br>g) Reduction in Establishment Expenditure | 2014-15 |

DRAFT

| | | |
|---|---|---|
| | h) To create Sinking Fund | |
| 13 | Public Discloser Of Information | 2013-14 |

या कामाची नस्ती, बी-1 टेंडर ,एस्टिमेट,Volume No -I (Technical Bid) & Volume No -II (Price Bid) & July 12, शासन निर्णय व मोजमाप पुस्तक यांचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र.43 दि.31/12/2015 रोजी निर्गमित केला असुन जलनि:सारण विभागाने त्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक -एनयुआर -2008/प्र.क्र.203/नवि-33,दि.20 फेब्रुवारी 2010 मधील अनुक्रमांक 05 नुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानात सहभागी होण्यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने राज्य शासनाबरोबर सामंजस्य लेखी करार करार केला आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या लेखा विभागाचे 2013-14 या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सर्व लेखे सिंगल एन्ट्री सिस्टिममध्ये ठेवण्यात आले आहेत. महानगरपालिकेने मत्ता व दायित्व यांचे मुल्यांकन केलेले नाही तसेच लेखे सिंगल एन्ट्री सिस्टिमवरुन डबल एन्ट्री सिस्टिममध्ये तयार करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेने शासनाशी केलेल्या कराराप्रमाणे एक वर्षाचे आत सदर सुधारणा करण्यात आलेल्या नसल्याचे स्पष्ट होते.

2) महानगरपालिकेने शासनाबरोबर केलेल्या सामंजस्य करारामधील ई - गव्हर्नन्स अंतर्गत अ.क्र.2 मधील a) ते l) मध्ये दिलेल्या सुधारणा करणेसाठी महानगरपालिकेने HCI या कंपनीकडून BOT तत्वावर सर्व विभागांचे संगणकीकरण करुन घेतले आहे. परंतु महानगरपालिकेने HCI कंपनीबरोबर केलेल्या कराराप्रमाणे HCI कंपनीस त्यांनी केलेल्या कामाची रक्कम आदा न केल्याने HCI कंपनीने महानगरपालिकेस कोर्टामार्फत नोटीस देवून संगणकीय प्रणालीद्वारे चालू असलेले काम 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये बंद केले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे ई- गव्हर्नन्स अंतर्गत चालू असलेले काम बंद पडले असून सर्व काम पुन्हा मॅन्युअली चालू झाले आहे.

3) सामंजस्य करारामधील अ.क्र.3 नुसार एक वर्षामध्ये घरपट्टी भांडवली मुल्यावर चालु करण्याचे करारामध्ये नमूद आहे. परंतु महानगरपालिकेने 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये घरपट्टीची वसुली भांडवली मूल्यावर चालू केलेली नाही.

4)महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 ने सांगली व मिरज गटार योजनेसाठी महानगरपालिका हिश्शाची रक्कमेची तरतुद करण्यासाठी अंदाजे रु.125 कोटी कर्ज उभारणीस व चालु व्याजदर व 10 वर्ष कर्ज परतफेड कालावधी धरता दरवर्षी रु.20 कोटीची अतिरिक्त तरतुद कर्ज फेडीसाठी अर्थसंकल्पात करणेस व सिंकींग फंडामध्ये सदर रक्कम वर्ग करुन कर्जफेड नियमित स्वरुपात करणेसाठी सभेने मान्यता दिली आहे. यासाठी 2013 -14 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.12 वर द्विनोंद कोड C609D नगरोत्थान योजने अंतर्गत जलनि:सारण

मनपा हिस्सा कर्ज या लेखाशिर्षाखाली रु.20 कोटीची तरतूद केली आहे. आर्थिक वर्ष 2015 -16 च्या अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.13 वर द्विनोंद कोड C609D या लेखाशिर्षांतर्गत 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष जमा निरंक दिसून येते. म्हणजेच महानगरपालिकेने 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये कर्ज उभारणी केलेली नाही. तसेच महानगरपालिकेने सर्वसाधारण सभेच्या निर्णयाप्रमाणे सिकींग फंडाची अंदाजपत्रकास तरतुद करुन त्यामध्ये कर्जफेडीची रक्कम वर्ग केलेली नाही. तसेच महानगरपालिका हिश्श्याच्या रक्कमेची तरतुद अंदाजपत्रकात केली नसलेने सदर खर्च महानगरपालिका कशा पध्दतीने करणार आहे. याबाबतचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.43, दि.31/12/2015 ने मागणी करुनही जलनि:सारण विभागाने लेखापरीक्षणास दिलेला नाही.

5)सांगली भुयारी गटार टप्पा क्र.2 नस्ती क्र.1 मध्ये (पृष्ठ क्र.93) उपविभागीय अभियंता, मजिप्रा,नागरी व ग्रामीण योजना उपविभाग क्र.2 सांगली यांनी जा.क्र./208/013 ने दि.12/06/2013 चे पत्राने सांगली व मिरज भुयारी गटार योजनेच्या कामाच्या संथगतीबाबत व ठेकेदाराने कामाचा बार चार्ट दिला नसलेबाबत ,कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनि:सारण विभाग, महानगर पालिका, सांगली यांना कळविले आहे. पत्रामध्ये सदर काम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा (PMC) तत्वावर पूर्ण करुन घेण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार ठेकेदारास सांगली शहरातील U सिव्हरमधील सुमारे 4 कि.मी. व मिरज शहरातील सुमारे 2 कि.मी .कामासाठी दि.21/05/2013 रोजी लाईन आऊट देण्यात आली आहे. तथापि दि.12/06/2013 अखेर केवळ 60 मिटरचे खुदाई काम करण्यात आले आहे. ठेकेदाराने कामासाठी अद्याप पाईप आणलेल्या नाहीत. त्याच प्रमाणे ठेकेदाराकडून विषयांकित कामे दोन वर्षाच्या निविदा कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन आराखडा (बार चार्ट) दिलेला नाही. याबाबतचे पत्र क्र.तांशा-195 दि.24/05/2013 अन्वये ठेकेदारास पाठविण्यात आलेचे नमुद आहे व या पत्रास अनुसरुन कामाचा बार चार्ट सादर करणेचे पत्र पाणीपुरवठा विभागाने ठेकेदारास जाक्र/ मनपा/ जलवि/----/ 13-14 दि.18/06/ 2013 ने दिले आहे व Smc Infrastructure Pvt ltd या ठेकेदार कंपनीने दि.15/10/2013 रोजी पाणीपुरवठा विभागास सांगली गटार योजनेसाठी 1 मे 2013 ते 24 एप्रिल 2015 या मुदतीमध्ये काम पूर्ण होण्यासाठीचा बार चार्ट नस्तीमध्ये जोडला आहे. (पृष्ठ क्र.329). मिरज गटार योजना टप्पा 2 चे VOLUME -I (Technical Bid) & July - 2012 चे पृष्ठ क्र.23 वर General Rules & Directions For The Gauidance Of Contractors दिल्या आहेत. त्यामधील अट क्र. 31 नुसार पात्र निविदाधारकास कामाची वर्क ऑर्डर मिळाल्यानंतर काम सुरू करण्यापूर्वी कामाचा संगणकीकृत बार चार्ट पाणीपुरवठा विभागास सादर करावयाचा आहे व बार चार्टप्रमाणे कामाची गती ठेवावयाची आहे. या कामाचा कार्यादेश ठेकेदारास दि. 30/04/2013 रोजी दिला आहे. परंतु ठेकेदाराने कामाचा बार चार्ट मात्र दि.15/10/2013 रोजी साडे पाच महिने विलंबाने कार्यालयास सादर केला आहे. ठेकेदाराने विलंबाने कामाच्या प्रगतीबाबतचा बार चार्ट दिल्याने साडेपाच महिन्याच्या कामाच्या प्रगतीवर पाणीपुरवठा विभागास लक्ष ठेवता आले नसल्याचे स्पष्ट होते. तसेच सांगली भुयारी गटार योजनेची नस्ती क्र.1

DRAFT

मधील T- 7 वर दि.23/10/2013 रोजी जलनि:सारण विभागाने ठेकेदाराच्या कामाच्या संथ प्रगतीमुळे दंड आकारणी बाबत टिपणी सादर केली आहे. त्यामध्ये कामाच्या प्रगतीबाबत आयुक्तांनी दि.18/10/2013 रोजी बैठक घेतली. या बैठकीमध्ये ठेकेदाराने बार चार्टप्रमाणे आपेक्षित प्रगती साध्य केली नसल्याने ठेकेदारावर निविदा अटी शर्तीनुसार दंड आकारण्याचे आदेश दिले आहेत. बी-1 शेड्यूलमधील कंडीशन ऑफ कॉन्ट्रॅक्ट मधील क्लॉज क्र.2 नुसार ¼ कालावधीसाठी ¼ काम करणे आवश्यक आहे. कामाची मुदत 24 महिने असल्याने व ¼ कालावधी झालेला असल्याने पेनल्टी कलमाखाली ठेकेदारास अपेक्षित प्रगती साधे पर्यंत दि.21/10/ 2013 पासून दररोज रु.1000/- प्रमाणे दंड प्रस्तावित केला आहे. त्यास कार्यकारी अभियांनी दि. 23/10/2013 रोजी मान्यता दिली आहे व प्रकरण मुख्य लेखापरीक्षक यांचेकडे दि.25/10/2013 रोजी पाठविले आहे. मुख्य लेखापरीक्षक यांनी कार्यकारी अभियंता यांचे सूचनेप्रमाणे दंडाची कार्यवाही करणेची शिफारस दि.31/10/2013 रोजी करून टिपणी पाणीपुरवठा विभागाकडे दिली आहे. परंतु पाणीपुरवठा विभागाने सदर टिपणी आयुक्त यांचेकडे सादर केलेली नसल्याने दंड वसुली बाबतचा निर्णय झाला नसल्याचे दिसुन येते.

6) सांगली शहराच्या भुयारी गटर योजनेस राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता व सनियंत्रण समितीची मान्यता दि.06/08/2011 रोजीच्या बैठकीमध्ये मिळाली. या योजनेसाठी नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.नगरी /2011 /प्र.क्र.176/नवि -33 मंत्रालय दि. 01 नोव्हे.2011 नुसार सांगली भुयारी गटार योजनेसाठी योजनेची किंमत रु.82.22 कोटी ठरवून शासनाचा 50 टक्केप्रमाणे हिस्सा रु.41.11 कोटी देण्याचे मान्य केले आहे व त्यापैकी 25 टक्केप्रमाणे होणारी रक्कम रु.10.28 कोटी महानगरपालिकेस मंजूर केली आहे.

सांगली मिरज भुयारी गटार योजनेच्या निविदा नस्तीमधील दि.28/11/2011 मधील (पृष्ठ क्र.T-3 ते T-19) वर जलनि:सारण विभागाने भुयारी गटार योजनेची निविदा काढणेसाठी दोन पर्याय दिले होते. यापैकी पर्याय क्र.2 नुसार भुयारी गटार योजनेची कामे चार गटात विभागणी करुन करणे. गट क्र.1 नुसार मुख्य मलनि:सारण वाहिन्या व दाब नलिका टाकणे रक्कम रु.29,45,46,634/-, गट क्र.2 नुसार मलनि:सारण मधील उपवाहिन्या व शाखा वाहिन्या टाकणे रक्कम रु.17,23,02,081/-,गट क्र.3 नुसार मलशुध्दीकरण केंद्र रक्कम रु.17,33,60,000/-, गट क्र.4. पंप हाऊस व पंपिंग मशिनरी व किरकोळ कामे करणे रक्कम रु.4,53,63,727/-. पर्याय क्र.2 नुसार काम करण्यास आयुक्त यांनी मान्यता दिली असून त्याप्रमाणे काम करणेची शिफारस केली आहे. आयुक्त यांनी प्रस्तावास दिलेल्या मंजूरीप्रमाणे उपायुक्त यांनी दि.01/12/2011 रोजी विषयपत्र तयार करून स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर केले आहे. परंतु स्थायी समिती ठराव क्र.635 विषय क्र.26 दि.05/03/2012 अन्वये सांगली भुयारी गटार योजनेच्या रु.68,55,72,442/- या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या एकत्रित खर्चाच्या निविदा मागविणेस व यासाठी येणा-या रु.68,55,72,442/- च्या खर्चास तसेच प्रसिध्दीचे खर्चास दि.05/03/2012 रोजी मान्यता मिळाली आहे. प्रशासनाने विषयपत्र पाठविलेनंतर स्थायी समितीने निविदा मागविण्याचे प्रस्तावास तीन महिने विलंबाने मान्यता दिली आहे. तसेच प्रशासनाने

DRAFT

या कामाची चार विभागात विभागणी करुन निविदा मागविण्याची शिफारस केली असता स्थायी समितीने एकत्रित निविदा मागविण्याचा आदेश दिल्याने चार विभागातील वेगवेगळी कामे करणाऱ्या निविदाधारकांना या कामाच्या निविदा स्पर्धेमध्ये भाग घेता आलेला नाही. तसेच सदर कामाच्या निविदा दि.21/04/2012 रोजी मागविल्या असुन निविदा दि.21/08/2012 रोजी उघडण्यात आल्या आहेत व कमी देकाराच्या ठेकेदाराबरोबर वाटाघाटी दि.12/03/2013 व दि.14/03/2013 रोजी करुन ठेकेदाराची निविदा महासभेने महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 ने मंजुर केली आहे. सांगली भुयारी गटार योजनेचा निधी दि.04/05/2012 रोजी मिळाल्यानंतर टेंडर काढणे व मंजूर करणे यासाठी एक वर्षाचा दिनावधी गेला आहे. त्यामुळे 2011-12 च्या चालू दरसूची प्रमाणे निविदा मंजूर न होता ठेकेदाराबरोबर 2012-13 च्या चालू दरसूची प्रमाणे वाटाघाटी कराव्या लागल्या आहेत. निविदेची 2010 -11 च्या दरसूचीप्रमाणे होणारी रक्कम रु.647154675/- असुन निविदेची सन 2011 -12 च्या दर सूचीप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुल्यांकित केलेली किंमत रु.828662485 /- होत असून सन 2012 -13 च्या दरसूचीप्रमाणे मुल्यांकित केलेली किंमत रु. 883697125/- इतकी होत आहे. निविदा काढणे व त्यावर निर्णय घेणे यामध्ये एक वर्षाचा कालावधी गेल्याने योजनेची किंमत रु.5,50,34,640/- ने वाढली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे रक्कम रु. 5,50,34,640/-चे आर्थिक नुकसान झाले आहे.

7) सांगली भुयारी गटार योजनेची निविदेची किंमत 2010 -11 दरसूची प्रमाणे किंमत रु. रु.647154675/- असून ठेकेदाराचा न्यूनतम देकार रु.117,13,49962 /- (81%) जादा आहे. निविदा 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये उघडल्यामुळे मजीप्राने 2011-12 चे दरसूचीप्रमाणे निविदेची किंमत मुल्यांकित केली असून ती रु.82,86,62,485/- (28.04%) जादा इतकी होते. त्यानंतर महानगरपालिकेने ठेकेदाराबरोबर वाटाघाटी केल्या असून ठेकेदाराने प्रथम वाटाघाटीनंतर रु.104,65,13,825/- (61.71%) जादाचा देकार दि.23/08/2012 च्या पत्राने महानगरपालिकेस दिला आहे. परंतु महानगरपालिकेने या निविदा दराबाबत व निविदा मंजूरी बाबत कोणताही निर्णय घेतला नाही. महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाबरोबर सन 2012-13 च्या नविन दरसूचीप्रमाणे निविदेचे दरपृथःकरण करुन देण्याबाबतचा पत्रव्यवहार केला आहे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुणे यांनी मु.अ./ प्रव्यससे (पुणे) / ताशां-4/ प्र.क्र.98/ 332 दि.13/02/2013 चे पत्राने सांगली भुयारी गटार योजनेच्या निविदेची सन 2012-13 दरसूचीनुसार मुल्यांकित किंमत रु.883697125/- व मिरज भुयारी गटार योजनेची मुल्यांकित किंमत रु.706741177/- झाली असल्याचे कळविले आहे. निविदा उघडणे ते दरपृथःकरण करणे या सर्व निर्णयप्रक्रीयेमध्ये 7 महिन्याचा दिनावधी गेला आहे.

सन 2012-13 नुसार मजीप्राने निविदेची मुल्यांकित किंमत रु. 88,36,97,125/- (36.56% ) जादा इतकी केली आहे. सन 2012-13 च्या मुल्यांकित किमतीशी तुलना करता ठेकेदाराचा देकार 18.42 टक्के इतका होतो. महानगरपालिकेने पुन्हा ठेकेदाराबरोबर वाटाघाटी केल्या असून दि.12/03/2013

DRAFT

च्या वाटाघाटीनंतरचा ठेकेदाराचा देकार रु.96,95,92,485/- इतका आहे. सन 2012-13 च्या दरसूचीनुसार मुल्यांकित किमतीच्या 9.72 टक्के जादा इतका आला आहे. जलनि:सारण विभाग सांगली महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील वॉनलेसवाडी गव्हरमेंट कॉलनी व मिरज शहरासाठी भूमिगत ड्रेनेज योजनेअंतर्गत अंदाजपत्रके आराखडे तयार करणे बाबत या नस्तीमधील पृष्ठ क्र.657 वर नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक : युआयडी - 2009/ प्र.क्र.158 /प्र.क्र. 158/नवि -33 दि.10 ऑगष्ट 2009 चे लहान व मध्यम शहरांच्या पायभूत सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) योजने अंतर्गत प्राप्त निविदा स्विकारण्या संदर्भात मार्गदर्शक सूचनेचे परिपत्रक जोडले आहे. सदर परिपत्रकानुसार (UIDSSMT) योजने अंतर्गत प्राप्त होणा-या निविदा चालू वर्षाच्या दरसूचीचा विचार करता होणा-या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा कमाल 10 टक्केहून जास्त असल्यास संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविल्या जातात. त्यासाठी शासन परिपत्रक क्र.जीईएन -1093/2365/प्र.क्र.126/93/नवि -14,दि.20/10/1993 चा आधार घेतला जातो. शासन परिपत्रक दिनांक 20/10/1993 मध्ये मंजूर अंदाजपत्रकातील रक्कमेपेक्षा कमाल 10 टक्केहून जास्त रक्कमेच्या निविदा आल्यास त्या का जास्त आहेत त्याचे काळजीपूर्वक बाबनिहाय परिक्षण करणे आवश्यक आहे, तसेच फेर निविदा मागविण्या बाबत गांभीर्याने विचार करणे इष्ट ठरते असे नमूद आहे. ठेकेदाराने प्रथम वाटाघाटी नंतर दि.23/08/ 2012 च्या पत्राने महानगरपालिकेस कळविलेला दर रु.104,65,13,825/- निविदा किंमतीच्या 61.71 टक्के दिला आहे. वरील शासन निर्णयाप्रमाणे निविदा दर 10 टक्केपेक्षा जास्त असल्याने प्रशासनाने नविन निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु प्रशासनाने निविदा न मागविता 7 महिन्यांनी पुन्हा मंजूर निविदा दराची 2012-13 च्या चालू दरसूचीशी तुलना केली आहे. सन 2012-13 च्या मुल्यांकित किमतीशी तुलना करता ठेकेदाराचा दर 15.45 टक्के जादाने असल्याने प्रशासनाने ठेकेदाराशी पुन्हा दि.12/03/2013 रोजी वाटाघाटी केल्या आहेत व ठेकेदाराने 2012-13 च्या चालू दरसूचीनुसार आलेल्या निविदा किंमतीच्या 9.72 टक्के या दराने काम करणेस तयार असलेचे पत्राने कळविले आहे. प्रथम देकार रक्कम 10 टक्केपेक्षा जादा आल्याने महानगरपालिकेने रितसर फेर निविदा न मागविता मंजूर ठेकेदाराची निविदा मंजूर केल्याने महानगरपालिकेस नविन निविदेच्या स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसल्याचे दिसून येते. तसेच प्रशासनाने वरील शासन निर्णयानुसार 9.72 टक्के जादा दराने आलेल्या निविदेचे काळजीपूर्वक दरपृथ:करण न करताच निविदा मंजूर केली असल्याने महानगरपालिकेचे 9.72 टक्के जादा दराने रु.85895300/- आर्थिक नुकसान झाले आहे. (सन 2012-13 नुसार मजीप्राने केलेली मुल्यांकित किंमत रु.88,36,97,125/- - ठेकेदाराचा निविदा दर रु.96,95,92,425/-). तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.डी.पी.डब्ल्यु 1996/16 (ब)/ लेखापरीक्षा मंत्रालय दि. 20 सप्टेंबर 1997 नुसार निविदा मंजूरीबाबत अधिकार प्रदान करणेचा शासन निर्णय झाला आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता रु. 25 लाख, अधिक्षक अभियंता रु. 1 कोटी 25 लाख, मुख्य अभियंता निविदा मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. तसेच या परिपत्रकामधील 1(ब) नुसार (निविदेतील

DRAFT

अंदाजपत्रकाच्या चालू दरसूचीच्या अधारे येणा-या किंमतीवर) अधिक्यास मंजूरी देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यकारी अभियंता -निरंक, अधिक्षक अभियंता - 5 टक्के रु. 25 लाख पर्यंतच्या निविदेसाठी, मुख्य अभियंता- 5 टक्के रु.125 लाख पर्यंतच्या निविदेसाठी देण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी निविदेचे अधिक्य चालू दरसूचीच्या अधारे येणा-या सुधारीत किमतीच्या 5 टक्केहून जास्त नाही. परंतु प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेपेक्षा रु.10 लाखाने जास्त आहे, अशा प्रकरणामधील अधिक्यास शासनाकडून पूर्वमंजूरी घेण्यात आली पाहिजे असे नमूद आहे. परंतु या निविदेचे आधिक्य चालू दरसूचीच्या 5 टक्केपेक्षा जास्त असतानाही शासनाकडून पूर्व मंजूरी न घेताच निविदा महानगरपालिकेने मंजूर केली आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांना चालू दरसूचीनुसार येणा-या अधिक्यास मंजूरी देण्याचे अधिकार नसतानाही त्यांनी या निविदेस मान्यता दिली आहे.

8)प्रशासनाने ठेकेदाराची निविदा 2012-13 च्या दरसूचीनुसार आलेल्या किमतीच्या 9.72 टक्के जादा दराने मंजूर केली आहे. तसेच निविदा Volume -I (Technical Bid) & July 2012 मधील पृष्ठ क्र.94 , Clause 62, Price Variation Clause नुसार सिमेंट, इंधन व स्टील मधील भाव फरक Wholesale Price Index For All Commodities prepeared by the office of the Economic Adviser, Ministry of Industry, Government Of India मध्ये प्रसिध्द केलेल्या दराप्रमाणे देण्याचे नमूद केले आहे. ठेकेदाराची निविदा 9.72 टक्के जादा दराने मंजूर केले असून त्याला पुन्हा भाववाढ ही देण्याचे मान्य केल्याने ठेकेदारास दुहेरी फायदा होणार आहे.

9) ठेकेदारास मुख्य करारपत्रामधील मुद्दा क्र.11 अन्वये ठेकेदारास जमवाजमव उचल अनुज्ञेय आहे. तसेच बी -1 करारपत्रामधील समाविष्ठ पूर्व अहर्तता बैठकीच्या खुलाशातील जोडपत्र 1 पृष्ठ क्र.22 वर जमवाजमव उचली बाबत कलम अंतर्भुत आहे. यानुसार निविदा किंमतीच्या 10 टक्के जमवा जमव उचल (Mobilisation Advance) 10 टक्के व्याजाने ठेकेदारास द्यावयाचा आहे. तसेच सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.2 नस्ती क्र.1 मधील पृष्ठ क्र.T-4 वरील टिपणीमध्ये मोबिलायझेशन ॲडव्हान्सची वसुली पहिल्या देयकापासून बील रक्कमेच्या 20 टक्के प्रमाणे करावयाची आहे. संपूर्ण ॲडव्हान्सची वसूली संपूर्ण काम 75 टक्के पर्यंत करण्याची आहे. त्याप्रमाणे ठेकेदारास आयुक्त यांचे दि.23/08/2013 च्या मान्यतेने रु.64715468/- ची उचल दिली आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. आयकर-1091/प्र.क्र.132/का/अर्थ मंत्रालय मुंबई दि. 13/10/1993 अन्वये मोबिलायझेशन ॲडव्हान्स रक्कम रु. 64715468/- वर 2% प्रमाणे आयकर वसूल करणे आवश्यक असता सदर रक्कम ठेकेदाराकडून वसुल केलेली नाही.

10) सांगली भुयारी गटार योजनेच्या खर्चापोटी ठेकेदारास मोबिलायझेशन ॲडव्हान्स रु.64715468 /- प्रमाणक क्र.2 दि.07 ऑगष्ट 2013 ने दिले आहे. तसेच पहिले धावते देयक, प्रमाणक क्र.08 दि.28/03/2014 रक्कम रु.44312752/-, दुसरे धावते देयक देयक प्रमाणक क्र.09 दि.28/03/2014 रु.59899984/- असे एकूण तीन प्रमाणकाने रु.168928204/- ठेकेदारास आदा केले आहेत. नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक- नगरो 2012/ प्र.क्र.189/ नवि -33 दि. 25 मार्च 2013

DRAFT

नुसार शासनाकडून सांगली भुयारी गटार योजनेची किंमत रु.82.22 कोटी ठरविण्यात आली असून त्यामध्ये राज्य शासनाचे अनुज्ञेय अनुदान रु.41.11 कोटी आहे. त्यापैकी राज्य शासनाने पहिल्या हप्त्यापोटी द्यावयाचा निधी रु.20.555 कोटी इतका असुन 25 मार्च 2013 अखेर रु.20.56 कोटी शासनाकडून प्राप्त झाले आहेत. या शासन निर्णयामधील प्रस्तावनेमध्ये मंजूर निविदा किंमतीच्या 50 टक्केच अनुदान शासनाकडून मिळणार असून उर्वरित 50 टक्के रक्कम मनपाने स्वनिधी व कर्जरुपाने उभा करावयाची आहे. 2012-13 या आर्थिक वर्षात या कामावर रु.168928204/- इतका निधी खर्च झाला आहे. या कामासाठी ठेकेदाराचा अंतिम देकार 96.95 कोटी असुन शासनाने रु. 82.22 कोटीच्या योजनेस मंजुरी दिली आहे. यापैकी 50 टक्के रक्कम शासन देणार असल्याने उर्वरित रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. त्यानुसार शासन निधी हिश्श्यामधून 42.40 टक्केप्रमाणे रु.69177702/- व महानगरपालिका हिश्श्यामधून 57.8 टक्केप्रमाणे रु.99750502 /- खर्च करणे आवश्यक असताना सर्व खर्च शासननिधीमधूनच केल्याने महानगर पालिकेच्या दायित्वामध्ये वाढ झाली आहे. तसेच महानगरपालिकेने शासन निर्णयाप्रमाणे स्वनिधीची रक्कम बजेटमध्ये उपलब्ध करुन खर्च केली नाही तसेच या बाबतचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.43 अन्वये मागणी करुन ही जलनि:सारण विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

महासभा क्र.08 ठराव क्र.222 दि.20/03/2010 रोजी ऐनवेळच्या विषयाने या कामास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर योजनेकरीता महानगरपालिकेच्या हिश्श्याची 50 टक्के रक्कम रु.158.63 कोटी कर्ज रुपाने उभा करणेस मान्यता दिली आहे. परंतु महानगरपालिकेने 2012-13 या आर्थिक वर्षात कर्ज ही घेतलेले नाही तसेच स्वनिधीमधून महानगरपालिकेच्या हिश्श्याची रक्कम खर्च केलेली नाही. या वित्तिय अनियमिततेबाबत खुलासा जलनि:सारण विभागाने केलेला नाही.

11) सांगली शहर भुयारी गटार योजनेतील ड्रेनेजची पाईप लाईन कोल्हापूर रोडच्या बाजूस टाकणेसाठी परवानगी मिळणेबाबत उपविभागीय अभियंता, मजीप्रा नागरी व ग्रामीण योजना उपविभाग 2 यांनी ताक्र.तांशा/2/652/2013 या पत्रान्वये कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग ताराबाई पार्क, कोल्हापूर यांचेकडे मागणी केली आहे. तसेच सांगली भुयारी गटार टप्पा क्र.2, भाग 2 नस्ती क्र.1 मधील (पृष्ठ क्र.355) उपविभागीय अभियंता, मजिप्रा,नागरी व ग्रामीण योजना उपविभाग क्र.2 सांगली यांनी जा.क्र./ताशा/670/013 ,दि.29/10/2013 चे पत्रान्वये अंकली रोड पंपिंग स्टेशन पासून येणारी 450 मि.मि.व्यासाची (DIK9) दाबनलिका व पंपिंग स्टेशनकडे जाणारी मेन सिव्हर नलिका 100 फुटी रोड शांतीबेन सोसायटी पासून धामणी जकात नाक्यापर्यंत रोडच्या बाजूने टाकणे प्रस्तावित आहे. त्यानुसार सध्या या रोडच्या बाजूने दाबनलिकेचे काम सुरू करण्यात आले आहे. सदर 100 फुटी रस्ता ते धामणी जकात नाक्यापर्यंतचा रस्ता जिल्हापरिषद अखत्यारीत असल्याने रस्ता खुदाई परवानगी करिता संबंधित खात्याकडे पत्रव्यवहार केला असून उप अभियंता, पंचायत समिती, मिरज यांनी जाक्रपंस /बांधकाम/रेशा/ 35/2013 बांधकाम उपविभाग ,पं.स.मिरज दि.28/10/2013 चे पत्रान्वये खुदाई पोटी रक्कम रु. 281410/- भरणा करणेबाबत कळविले आहे.(पृष्ठ क्र.357). परंतु सदर रक्कम

DRAFT

महानगरपालिकेने अद्याप भरणा केली नसल्याने योजनेचे काम बंद ठेवावे लागत असल्याचे, उपविभागीय अभियंता, मजिप्रा, नागरी व ग्रामीण योजना उपविभाग क्र.2 सांगली यांनी जा.क्र./तांशा 2 /भुगयो/51/2014 दि.05/02/2014 चे पत्रान्वये कार्यकारी अभियंता,महानगरपालिका सांगली यांना कळविले आहे (पृष्ठ क्र.725) .या कामाबाबत कार्यकारी अभियंता,सांगली मनपा यांनी पत्र क्र. जाक्र.मनपा / जलवि /सां / 631/13-14 दि.07/03/2014 ने वरील खात्यांची परवानगी घेण्याची कार्यवाही चालू असल्याचे ठेकेदारास कळविले आहे (पृष्ठ क्र.847). पंचायत समिती मिरज यांनी दि.28/10/2013 ने रस्ता खुदाईची रक्कम भरणा करण्याचे कळवूनही महानगरपालिकेने 07/03/2014 अखेर रक्कम भरणा केली नसल्याने काम बंद असलेचे दिसून येते. रस्ता खुदाईची रक्कम भरण्यास विलंब लागत असल्याने कामाची प्रगती कमी झालेचे दिसून येते.

12) या कामाचे ठेकेदार SMC Infrastructure Pvt Ltd यांनी एसएमसी/सांगली /93/52/13-14 दि.10/02/2014 च्या पत्राने सांगलवाडी येथील वाढीव कामाचे ठोस आदेश मिळणेबाबतची मागणी पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागाकडे केली आहे. सदर पत्रामध्ये दि.28/12/2013 पासुन सांगलवाडी येथील 2200 मिटर जादाचे ड्रेनेज लाईनचे काम हे आपल्या तोंडी सूचनेनुसार व आम्हाला आपण दिलेल्या लाईन आऊट वर प्रगतीपथावर आहे. सदर काम निविदेतील डिझाईन ड्रॉईंग व्यतिरि- क्त असल्यामुळे या कामाची वाढीव लांबी आपल्या तोंडी सुचनेप्रमाणेच आहे अथवा त्याहीपेक्षा जास्त आहे. याची आम्हास त्वरित लेखी आदेश द्यावेत अशी मागणी पत्रामधून केली आहे. तसेच या जादा कामाचे लेखी आदेश देण्याची मागणी मजीप्राने दि.05/02/2015 चे पत्राने जलनि:सारण विभाग, सांगली यांचेकडे केली आहे. तसेच कार्यकारी अभियंता जलनि:सारण यांनी जा.क्र.मनपा/ जलवि /सां / 631/13-14 दि.07/03/2014 ने ठेकेदार यांना समडोळी रस्त्यावर यापूर्वी महानगरपालिकेने स्वखर्चाने ड्रेनेज लाईन टाकल्याने त्या लाईनचा लेआऊट व लांबी ही धरण रस्त्याला वापरुन त्याप्रमाणे काम करणेत यावे असे कळविले आहे. सदर काम हे एस्टिमेटमध्ये अंतर्भुत नसल्याने नविन कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेवून काम करणेत आलेले नाही. मिरज गटार योजना टप्पा क्र.2 Volume - I (Technical Bid)& July 2012 Form B-I of Contract मधील Clause 14 नुसार जागेवरील प्राप्त परिस्थितीनुसार जादा काम करावयाचे असल्यास Engineer in Charge ने ठेकेदारास लेखी कळविले पाहिजे व त्यानंतर ठेकेदाराने जादाचे काम करणे आवश्यक आहे. परंतु ठेकेदाराला कोणतीही लेखी सूचना न देता सदरचे काम ठेकेदाराकडून तोंडी सूचनेनुसार जलनि:सारण विभागाने करुन घेतले आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली कलम 263 नुसार मुळ मंजुरी देणा-या अधिका-याच्या मान्यते शिवाय, कार्यकारी अभियंता कमी प्रतीच्या अभिकल्पनामध्येही कुठलाही महत्वाचा फेरफार करणार नाही. अधिक खर्च अंतर्भूत करणारा कुठलाही महत्वाचा फेरफार करणे आवश्यक असेल तर या फेरफारासाठी सुधारित किंवा पूरक अंदाज मंजूरी साठी सादर करणे आवश्यक आहे. सदर योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत शासनाने मंजूर केलेली आहे. या योजनेची तांत्रिक मंजूरी अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दिली

DRAFT

आहे. त्यामुळे या फेरफारासाठी सुधारित अथवा पुरक अंदाज मंजूर करून न घेताच जादाचे काम केले आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पथक सांगली, यांनी जा.क्रं.ताशा/सांभुगयों/ क्र.123 /12 दि.18/04/2012 रोजी कार्यकारी अभियंता, सांमिकु शहर मनपा, पाणीपुरवठा, सांगली यांना दिलेल्या पत्रामध्ये सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 च्या कामाकरीता कार्यवाही अंदाजपत्रकास (Working Estimate) मुख्य अभियंता यांची मंजुरी झाली आहे. या योजनेच्या कामासाठी एकच निविदा जाहिर करण्याच्या दृष्टीने सविस्तर निविदा प्रपत्रे व कार्यवाही अंदाजपत्रके, स्पेसिफिकेशन नकाशे व सन 2011-12 चे दरसूचीनुसार मुल्यांकन जोडले आहे व सदर कार्यवाही अंदाजपत्रक तपासणीसाठी महानगरपालिकेस सादर केलेचे नमुद आहे. वरील कार्यवाही अंदाजपत्रक तयार करण्यासाठी, सन 2005-06 मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने भुयारी गटार योजनेसाठी केलेल्या सर्व्हेक्षणाचे सद्यस्थितीनुसार कार्यवाही, सर्वेक्षण व डिझाईन करुन घेणेसाठी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना यांनी त्यांचे प.क्र.सांगली/ सांभयो/ 2628 दि.23/05/2011 अन्वये श्री.जी.एस.काळे असोशिएटस यांना कामाचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे टोटल स्टेशनद्वारे सर्वेक्षण व सिव्हर लाईनचे डिझाईन नव्याने करुन कामाचे कार्यवाही अंदाजपत्रक, डिझाईन व त्या प्रमाणे कामाची निविदा कागदपत्रे इत्यादी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग पुणे यांचे कडे इकडील पत्र क्र.ताशा/95 दि.17/03/2012 अन्वये मंजुरीसाठी पाठविण्यात आली होती. त्यास मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पुणे यांचे पत्र क्र.मुअ/प्रव्यवससे/पुणे/ताशा-4/634 दि.16/04/2012 ने मान्यता झाली आहे. कार्यवाही अंदाजपत्रक तयार करताना ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन आहे ती ठिकाणे कमी करणे व ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन नाही ती ठिकाणे कार्यवाही अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करणे आवश्यक होते. परंतु समडोळी रस्त्यावर यापूर्वी महानगरपालिकेने स्वखर्चाने ड्रेनेज लाईन टाकल्याने त्या लाईनचा लेआऊट व लांबी ही धरण रस्त्याला वापरुन त्याप्रमाणे काम करणे व सांगलवाडी येथील 2200 मिटरचे जादा ड्रेनेज लाईनचे काम ठेकेदाराने मजीप्रा व मनपा जलनि:सारण विभागाने दिलेल्या तोंडी सूचनेनुसार केले आहे. या कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र. 12 पृष्ठ क्र. 6 ते 11 वर नमुद आहेत. सदर काम चेंबर क्र. 1ते 8 व 1 ते 14 या दरम्यान झाली असून एकूण लांबी 582 मिटर झाली असून यासाठी NP- II पाईप 250 मि.मि. ते 350 मि.मि. वाढीव पाईप लाईन टाकण्यात आली आहे. सदर वाढीव कामामध्ये Suply of pipe, पाईपसाठी Excavation,Lowering & laying of pipe,man hole chambers या खर्चाचा समावेश आहे. या वाढीव कामावर रु. 1550179.10/ खर्च झाला आहे. या उदाहरणावरून वर्कींग एस्टिमेट जागेवर जावुन न करताच काम केले असल्याचे स्पष्ट होते. तसेच सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद 264 नुसार ज्या बांधकामासाठी सक्षम प्राधिका-याकडून खर्चाच्या अंदाजांना मंजूरी दिली असेल, अशा बांधकामाच्या बाबतीत प्राधिका-यांच्या मंजूरीच्या अधिकार कक्षेत येणार नाही असा ज्यादा खर्च होण्याचा ज्यामध्ये संभव असेल अशी कुठलीही वाढ किंवा फेरफार करण्यास वरीष्ठ

प्राधिका-याच्या मंजूरीशिवाय परवानगी देण्यात येवू नये अशी तरतुद असतानाही रु.1550179.10/- चा जादा खर्च कोणत्याही मान्यतेशिवाय करण्यात आला आहे.

13) सांगली भुयारी गटार योजनेमधील कामाचे प्रमाणक क्र. 09 दि.28/03/2014 ने रु.59899984/- ठेकेदारास आदा केले आहेत. सदर देयकाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र. 14 पृष्ठ क्र.01 ते 03 वर नोंदविण्यात आलेली आहेत. या मध्ये STP व त्याच्या उपांगाचे, स्थापत्य कामाचे देयक 45 टक्के व यांत्रिकी कामाचे 55 टक्के ठकेदारास आदा करण्याचे कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.ताशां / 5/ सांगली भुगोयो/2553 दि.17/07/2013 चे पत्राने मान्य करण्यात आले आहे. मोजमाप पुस्तक क्र. 18 मधील पृष्ठ क्र.02 ते 06 मध्ये या कामाची सविस्तर मोजमापे लिहिली आहेत. Subwork No.7, Excavation for seqentiai Batch Reactor Tank साठी एकूण 4135.35 घ.मी. खुदाईचे काम करण्यात आले आहे. तसेच क्लोरिन कॉन्टॅक्ट टँकसाठी 732.16 घ.मी.चे अशी एकूण 4867.51 घ.मी.खुदाई करण्यात आली आहे. सदर खुदाई कामाचे ठेकेदारास एकूण रु.6075912/- आदा करण्यात आले आहे. खुदाईमधून निघालेल्या मालावर महानगरपालिकेची मालकी असल्याने सदर खुदाई केलेला माल स्टँडर्ड स्पेसिफिकेशन पुस्तकामधील Rd 2.10 नुसार महानगरपालिकेकडे ठेकेदाराने जमा करणे आवश्यक असता तो केलेचा मोजमाप पुस्तिकेवरून दिसून येत नाही. त्यामुळे ठेकेदारास खुदाईची रक्कम आदा केल्याने रक्कम रु. 6075912 /- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

14) सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 या नस्तीमध्ये पृष्ठ क्र. 237 वर O.No./ TB/ Sangli, USD/354/2013 MJP Rural & Urban Scheme Sub Division No.2 Sangli , Dt. 29/08/2013 या पत्राने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने, सांगली भुयारी गटार जलनि:सारण योजनेची पाईप लाइन रेल्वे मार्गाखालून जाणार असल्याने ती टाकण्यासाठी परवानगी मिळणेबाबत, पाईपलाईन पुलाखालून व रेल्वेलाईन खालून टाकणेचा survey करणेबाबत तसेच यासाठी रेल्वेचे शुल्क भरणेबाबतचे पत्र डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर, सेंट्रल रेल्वे, वर्क्स डिव्हिजन पुणे यांना पाठविले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली पुस्तिकेमधील प्रकरण 3 ,बांधकामे (छ) प्रकल्प तयार करणे, यामधील परिच्छेद 152 नुसार प्रकल्प तयार करताना रस्ते, कालवे,नदीचे बंधारे यांच्या प्रकल्पांचे बाबतीत ,ती जवळपासच्या रेल्वेमार्गास आडथळा निर्माण करित असतील तर, कार्यकारी अभियंत्याने अधिक्षक अभियंत्यास कळवून ,संबंधित रेल्वे प्रशासनाला नकाशाची एक प्रत व त्या सोबत, एक इंच बरोबर एक मैल अशा प्रमाणातील निर्देश सूची ही सादर करावी व त्या सूचीत सर्व जलमार्गाचे आकार व स्थाने दर्शविलेली असावीत आणि अशा जलमार्गाबाबत रेल्वे प्रशासनाकडून अभिप्राय मागवावेत. वरिष्ठ प्राधिका-यांनी प्रकल्प सादर करताना रेल्वे प्रशासनाकडून आलेली उत्तरे ही सोबत जोडावीत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या कामाचा Detailed Project Report (DPR) तयार केला असून ज्या ठिकाणी पाईप लाईन टाकताना रेल्वे क्रॉसिंग करावे लागणार आहे त्या ठिकाणची माहिती, नकाशे रेल्वे खात्यास देवून या बाबत त्यांचे अभिप्राय व परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु DPR ची तपासणी केली असता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रेल्वे खात्याबरोबर रेल्वे क्रॉसिंग बाबत

DRAFT

कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. तसेच योजनेचे काम चालू झाल्यानंतर दि.29/08/ 2013 च्या उपरोक्त पत्राने जीवन प्राधिकरणाने रेल्वे क्रॉसिंगसाठी रेल्वे खात्याकडे मागणी केली आहे. त्यानंतर परवानगी मिळणे बाबत मजीप्राने पुढे कोणताही पत्र व्यवहार रेल्वे खात्याबरोबर केलेला नाही. चालू लेखापरीक्षण कालावधी (ऑक्टोबर 2015) अखेर परवानगी मिळाली नसल्याने योजना पूर्ण होण्यास विलंब लागणार आहे.

खालील ठिकाणी रेल्वे लाईन खालून ड्रेनेज पाईप लाईन जाणार आहे.

1)सांगली रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे पूलाखालून 700 मि.मि. व्यासाची आर.सी.सी. पाईप लाईन टाकणे (chainage 271/2 - 3)]

2) At Railway chainage 270/1-2 (For 300mm Diam.RCC Drainage line)

3) At Railway chainage 269/8-9, Near Sangli Tasgoan Overbridge(For 300mm Diam.RCC Drainage line)

4) At Railway chainage 269/0-1, (For 250mm Diam.D.I.K9 Rising Main)

15) उपविभागीय अभियंता, मजिप्रा, नागरी व ग्रामीण योजना उपविभाग क्र.2 सांगली यांनी जा.क्र./आस्था/134 /2014, दि.29/03/2014 चे पत्राने ठेकेदार SMC Infrastructure Pvt Ltd यांना सांगली/मिरज भुयारी गटार योजनांची अंतर्गत कामे नियोजित वेळेत पुर्ण करण्याच्या दृष्टीने उर्वरित कामांचा नियोजन आराखडा देणेबाबत कळविले आहे. सदर पत्रामध्ये निविदेनुसार सांगली भुयारी गटार योजनेसाठी एकूण 95.60 कि.मी. सिव्हर नलिकेचे काम अपेक्षित आहे. त्यापैकी पहिल्या देयकापर्यंत 4.50 कि.मी.चे काम करण्यात आले आहे. तसेच मिरज भुयारी गटार योजनेसाठी एकूण 68 कि.मी. पैकी 15 कि.मी. सिव्हर नलिकेचे काम करण्यात आले आहे. विषयांकित कामे निविदा मुदतीनुसार एप्रिल 2015 अखेर पुर्ण करणे आवश्यक असल्याने उर्वरित कामे पुर्ण करणेच्या दृष्टीने कामांचा नियोजन आराखडा देण्याचे ठेकेदारास या पत्रान्वये सूचित केले आहे. ठेकेदाराकडून बारचार्ट प्रमाणे काम करुन घेण्याची जबाबदारी या योजनेचे पी.एम.सी. असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची आहे व त्यावर नियंत्रण ठेवणेची जबाबदारी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागाची असताना दोन्हीही एजन्सींनी ठेकेदाराकडून बार चार्टप्रमाणे सांगली भुयारी गटार योजने साठी 50.60 कि.मी. सिव्हर नलिकेचे काम व मिरज भुयारी गटार योजनेसाठी एकूण 45 चे कि.मी. काम करुन घेतले नसल्याने कामास विलंब होत असल्याचे दिसून येते. तसेच या पत्रान्वये ठेकेदारास सूचित केल्यानुसार या योजनेची उर्वरित कामे पुर्ण करणेच्या दृष्टीने कामांचा सुधारित नियोजन आराखडा ठेकेदाराने दिलेला नाही.

16) सांगली भुयारी गटार योजनेच्या खर्चापोटी ठेकेदारास मोबिलायझेशन ॲडव्हान्स ,प्रमाणक क्र.2 दि.07/09/2013 ने रु.64715468 /- दिला आहे. तसेच पहिले धावते देयक प्रमाणक क्र.08 दि.28/03/2014 रक्कम रु.44312752/-, दुसरे धावते देयक देयक प्रमाणक क्र.09 दि.28/03/2014 रु.59899984/- असे एकूण तीन प्रमाणकाने रु.168928204/- ठेकेदारास आदा केले आहेत. सांगली व

DRAFT

मिरज भुयारी गटार योजनांच्या कामांच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) कामासाठी महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये दि.1 ऑक्टोबर 2013 रोजी करारनामा झाला असून करारपत्रामधील अट क्र.4.2 (vi) नुसार मजीप्राने ठेकेदाराकडुन दैनंदिन जलनि:सारण योजनेचे कामकाज करुन घ्यावयाचे आहे. तसेच कॉन्ट्रॅक्टरच्या कामाची देयके प्रमाणित करुन महानगर पालिकेस सादर करावयाची आहेत. परंतु वरील प्रमाणकांचे लेखापरीक्षण केले असता मजीप्राने देयके तयार केली आहेत. परंतु या कामावर काम करणा-या अभियंत्यांनी स्वाक्षरीसह प्रमाणित न करताच महानगरपालिकेस सादर केली आहेत. तसेच करारपत्रातील अट क्र.6 नुसार All bills of the contractor shall be subject to scrutiny and approval by MJP. MJP shall certify the bills of the contractor as pre-condition for release of payment by the commissioner of SMKC. महानगरपालिकेने या अटीप्रमाणे मजीप्राने प्रमाणित केलेल्या देयकाची रक्कम ठेकेदारास आदा करणे आवश्यक होते. परंतु महानगरपालिकेने मजीप्राने देयके प्रमाणित केली नसतानाही ठेकेदारास वर दिलेल्या तीन प्रमाणकाने रक्कम रु.168928204/- ठेकेदारास आदा केले आहेत.

17) धावते देयक क्र.1 मोजमाप क्र.15 पृष्ठ क्र.1 ते 05, प्रमाणक क्र.08 दि.28/03/2015 ने ठेकेदारास रु.44312752/- आदा केले आहेत. सदर देयकाची तपासणी केली असता देयका बरोबर ठेकेदाराने कामासाठी वापरण्यात आलेल्या गौणखनिजाची रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सोबत जोडलेल्या नाहीत. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे रॉयल्टी ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही पाणीपुरवठा विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. ठेकेदाराने खालील बाबीसाठी गौण खनिज वापरले आहे. परंतु त्याची रॉयल्टी भरणा केली नसल्याने रक्कम रु.72991/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

खालील कामांच्या रॉयल्टीची रक्कम वसुल करण्यात यावी.

Subwork N0.1 Primary & Major Sewere Secondary Sewer Lines

Item No.12 :- Providing & Constructing on sever,B.B.masonary circular manhole concentric cone 1.50 m diam.at bottom & 0.50 m dia.at top & upto a depth of 5.00m etc comp

1)16 No.Chambers 0f Depth 2.00 to 2.50m, Rs.24038.70/ no.= Rs.384619.20/-

16No. x sand 2.00 cum/No + Metal 0.90 cum/No = 2.90 cum/No

16No. x 2.90 cum/No = 46.4 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.3279/-

DRAFT

2) 11 No. Chambers 0f Depth 2.50 to 3.00m, Rs.29092.70/ no.= Rs.320015.85/-
11No. x sand 2.40 cum/No + Metal 0.90 cum/No = 3.30 cum/No
11 x3.30 cum/No = 36.30 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.2565/-

3) 03 No. Chambers 0f Depth 3.00 to 3.50m, Rs.34146.00/ no.= Rs.102438.00/-
03No. x sand 2.70 cum/No + Metal 0.90 cum/No = 3.60 cum/No
03x 3.60 cum/No =10.80 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.763/-
4) 04 No. Chambers 0f Depth 3.50 to 4.00m, Rs.39199.65/ no.= Rs.156798.60/-
04No. x sand 3.00 cum/No + Metal 0.90 cum/No = 3.90 cum/No
04 x 3.90 cum/No =15.60 cum xRoyalty Charges Rs.70.67 /cum = Rs.1102/-
Sub estimate No.2A- Remaining work of R sever
Item No.09 :- Providing & Constructing on sever,B.B.masonary circular manhole concentric cone 1.2 m diam.at bottom & 0.50 m dia.at top & upto a depth of 2.00m etc comp
1)15 No.Chambers 0f Depth 1.50m, Rs.14843.85/ no.= Rs.22657.75/-
15No. x sand 1.10 cum/No + Metal 0.80 cum/No = 1.90 cum/No
15 x 1.90 cum/No = 28.50 cum x Royalty Charges Rs.70.67/cum = Rs.2014/-

2) 25 No. Chambers 0f Depth 2.00m, Rs.17288.25/ no.= Rs.432206.25/-
25No. x sand 1.35 cum/No + Metal 0.80 cum/No = 2.15 cum/No
25 x 2.15 cum/No = 53.75 cum xRoyalty Charges Rs.70.67 /cum = Rs.3798/-
Sub estimate No.2B- Remaining work of U sever
Item No.09 :- Providing & Constructing on sever,B.B.masonary circular manhole concentric cone 1.2 m diam.at bottom & 0.50 m dia.at top & upto a depth of 2.00m etc comp
1)07 No.Chambers 0f Depth 2m, Rs.17288.25/ no.= Rs.121017.75/-
07No. x sand 1.35 cum/No + Metal 0.80 cum/No = 2.15 cum/No
07x 2.15 cum/No = 15.05 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.1064/-
Item No.10 :- Providing & Constructing on sever,B.B.masonary circular manhole concentric cone 1.50 m diam.at bottom & 0.50 m dia.at top & upto a depth of 5.00m etc comp
1)06 No.Chambers 0f Depth 2.5M, Rs.24038.70/ no.= Rs.144232.20/-

DRAFT

06No. x sand 2.00 cum/No + Metal 0.90 cum/No = 2.90 cum/No

06 x 2.90 cum/No = 17.40 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.1230/-

1)01 No.Chambers 0f Depth 3M, Rs.29092.35/ no.= Rs. Rs.29092.35/

01No. x sand 2.40 cum/No + Metal 0.90 cum/No = 3.30 cum/No

01 x 1.80 cum/No = 3.30 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.233/-

Sub estimate No.2B- Remaining works of U sever & its Branches U5/3- U5/2- U5/1

Item No.09 :- Providing & Constructing on sever,B.B.masonary circular manhole concentric cone 1.2 m diam.at bottom & 0.50 m dia.at top & upto a depth of 2.00m etc comp

1)01 No.Chambers 0f Depth 1.50m, Rs.14843.85/ no.= Rs. 14843.85/

01No. x sand 1.10 cum/No + Metal 0.80 cum/No = 1.90 cum/No

01 x 0.90 cum/No = 1.90 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.134/-

2)02 No.Chambers 0f Depth 2.00m, Rs.17288.25/ no.= Rs. 34576.50/

02No. x sand 0.70 cum/No + Metal 0.30 cum/No = 1.00 cum/No

02 x 1.00 cum/No = 2.00 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.141.34/-

Item No.10 :- Providing & Constructing on sever,B.B.masonary circular manhole concentric cone 1.50 m diam.at bottom & 0.50 m dia.at top & upto a depth of 5.00m etc comp

1)04 No.Chambers 0f Depth 2.50m, Rs.24038.70/ no.= Rs. 96154.80/

04No. x sand 1.00 cum/No + Metal 0.50 cum/No = 1.50 cum/No

04 x 1.50 cum/No = 6.00 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.424.02/-

2)03 No.Chambers 0f Depth 3.00m, Rs.29092.35/ no.= Rs. 87277.05/

03No. x sand 1.30 cum/No + Metal 0.50 cum/No = 1.80 cum/No

03 x 1.80 cum/No = 5.40 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.381.61/-

3)01 No.Chambers 0f Depth 5.00m, Rs.49306.95/ no.= Rs. 49306.95/

01No. x sand 2.10 cum/No + Metal 0.50 cum/No = 2.60 cum/No

01 x 2.60 cum/No = 2.60 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.183.74/-

Sub estimate No.2a- Remaining work of R sever For modified Branches R5- R4- R3

Item No.09 :- Providing & Constructing on sever,B.B.masonary circular manhole

DRAFT

concentric cone 1.2 m diam.at bottom & 0.50 m dia.at top & upto a depth of 2.00m etc comp

1)24 No.Chambers 0f Depth 1.50m, Rs.14843.85/ no.= Rs. 356252.40/

24No. x sand 0.60 cum/No + Metal 0.30 cum/No = 0.90 cum/No

24 x 0.90 cum/No = 21.60 cum x Royalty Charges Rs.70.67/cum = Rs.1526.47/-

2)20 No.Chambers 0f Depth 2.00m, Rs.17288.25/ no.= Rs. 345765/

20No. x sand 0.70 cum/No + Metal 0.30 cum/No = 1.00 cum/No

20 x 1.00 cum/No = 20.00 cum x Royalty Charges Rs.70.67 /cum = Rs.1413.40/-

एकूण रॉयल्टी चार्जेस :- रु.20252.56/-

तसेच Severage Treatment Plant व क्लोरिन कंटॅट टॅंकसाठी 574.06 घ.मी M200, PCC टाकण्यात आले आहे. त्याची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र. 14 पृष्ठ क्र.2 वर घेण्यात आली आहेत. या कामासाठी खालील प्रमाणे गौण खनिज वापरले आहे. परंतु त्याच्या रॉयल्टीची रक्कम देयकामधून कपात केलेली नाही.

PCC 574.06 cum x sand 0.60 cum/No + Metal 0.70 cum/No = 1.30 cum/No

574.06 cum x 1.30 cum/No = 746.27 cum x Royalty Charges Rs. 70.67 /cum = ए रॉयल्टीची वसूल पात्र रक्कम रू.52739/-

एकूण रॉयल्टीची वसूलपात्र रक्कम रु.52739/- + रु.20252.56/- = रु.72991/-

18) मोजमाप पुस्तिका क्र.15 मध्ये या कामाच्या मोजमापाचा बाबवार गोषवारा देण्यात आला आहे. त्याप्रमाणे पृष्ठ क्र. 2(L) वर बाब क्र.3 खुदाई करणे :- एकूण 5010.47 घ.मी.चे काम केले असुन त्याची रक्कम रु.623496.78/- इतकी होत आहे. सदर खुदाईची सविस्तर मापे मोजमाप पुस्तिका क्र.12 पृष्ठ क्र. 25 (L) वर नोंदविण्यात आली आहेत. तसेच मोजमाप पुस्तिका 12 पृष्ठ क्र.12 ते 13 वर 1294.68 घ.मी. खुदाईची मापे नोंदविण्यात आली आहेत. सदर खुदाई कामाची रक्कम रु.365348/- ठेकेदारास आदा केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग ,शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 1097 /सीआर 622/इमारती 2 दि.22/08/2005 नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट 42 अ.क्र.70 मध्ये उल्लेखिलेल्या मोजमापे तपासणीच्या अधिकारा त सुधारणा करण्यात आली आहे. क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांचेकडून विहित टक्केवारी नुसार मापांची तपासणी केली जात नाही वा केवळ औपचारिकता म्हणून कामातील महत्वाच्या बाबी जसे खोदकाम, भरावाचे काम, झाकली जाणारी मापे इत्यादी बाबी सोयीस्करपणे वगळून अन्य बाबींच्या मापाची तपासणी दर्शविण्याची प्रवृत्ती क्षेत्रिय कार्यकारी अभियंता वर्गात वाढत आहे. त्यामुळे या परिपत्रकाप्रमाणे खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

1) प्रच्छन्न मापे (Hidden Measurements) विशेषत: मातीकाम, खोदकाम, पुलांचे पायव्याचे काम, बी.बी.एम. इत्यादी बाबींची किमान 5 टक्के तपासणी क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी करणे

DRAFT

बंधनकारक आहे. परंतु सदर खोदकामाची 5 टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी केली नसल्याने ठेकेदारास आदा केलेली खुदाईची रक्कम रु.988845/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

19) या कामाच्या डि.पी.आर.ची तपासणी केली असता सदर डि.पी.आर. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महानगरपालिकेस केंद्र शासनाचे UIDSSMT योजनेसाठी सन 2003 या वर्षात तयार करुन सादर केला होता. नगरोत्थान योजनेसाठी मजिप्राने सन 2003 साली तयार केलेला डि.पी.आर. त्यावेळेच्या एस्टिमेटसह आहे तसा वापरला असुन फक्त एस्टिमेटमधील बाबींच्या दरामध्ये सन 2010 -11 च्या दरसूचीमधील दर नमूद करुन बदल केला आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एनयुआर- 2008/प्र.क्र.2003 नवि-33,दि. 20/02/2010 मधील अट क्र.4 (i) नुसार नगरोत्थान महाभियानाअंतर्गत सहभाग घेणा-या प्रत्येक नागरी क्षेत्रासाठी शहराच्या पुढील 20 वर्षाचा संभाव्य विकास लक्षात घेवून शहर विकास आराखडा करणे अनिवार्य आहे. शहर विकास आराखड्यात भविष्यातील गरजांच्या आधारे विविध मूलभूत नागरी सुविधा तसेच शैक्षणिक व आरोग्य विषयक पायाभूत सुविधा तसेच शहरांच्या सामाजिक सोयीच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजनांचा अंतर्भाव असणे आवश्यक आहे. वरील संदर्भानुसार मजिप्राने या नगरोत्थान योजनेसाठी पुन्हा नव्याने सर्वेक्षण करुन ज्या भागामध्ये महानगरपालिकेने 2003 ते 2010-11 अखेर स्वखर्चाने किंवा अन्य योजनेमधून ड्रेनेज लाईन टाकली आहे, तो भाग वगळणे आवश्यक होते. तसेच मागील 7 वर्षामध्ये ज्या भागामध्ये नागरी विस्तार झाला आहे. तो भाग प्राकलनामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक होते. परंतु याचा विचार न करता जुनाच डिपीआर दरसूचीमध्ये बदल करुन महानगरपालिकेस सादर केला आहे. पाणीपुरवठा विभागाने या डिपीआरचा अभ्यास करुन त्यामधील त्रुटी शोधणे आवश्यक होते. परंतु पाणीपुरवठा विभागाने मजिप्राने दिलेल्या डिपीआरमधील त्रुटी न काढता महासभेची मंजूरी घेवून डिपीआर शासनाकडे पाठविला आहे व शासनाने त्यास मंजूरी दिली आहे. मजिप्राने तयार केलेल्या डिपीआरची रक्कम महानगरपालिका आदा करणार असल्याने, महानगरपालिकेने मजिप्राकडून पुन्हा सर्वेक्षण करुन नविन डिपीआर तयार करुन घेणे आवश्यक होते. परंतु महानगरपालिकेने जुनाच डिपाआर एस्टिमेटच्या किंमतीमध्ये बदल करुन स्विकारला आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणी मध्ये आडथळे येत आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई यांनी जा.क्र.मजीप्रा/सस/ तांशा-1/813/180 दि.20 फेब्रुवारी 2014 रोजी दिलेल्या पत्रामध्ये भुयारी गटार योजनांची अंदाजपत्रके तयार करणे, तांत्रिक तपासणी करणे इत्यादी कामे मजीप्राने केली असून त्यापोटी मजीप्रास देय असणा-या एकूण रु.368.16 लक्ष इतक्या रक्कमेपैकी केवळ 101.48 लक्ष इतकीच रक्कम मजीप्रास आदा केली असून अद्याप रु.266.68 लक्ष इतकी रक्कम प्रलंबित असल्याचे नमूद आहे. महानगरपालिकने प्रमाणक क्र. 7 दि.24/03/2014 ने रु.50 लाख रक्कम मजिप्रास, 41310 नगरोत्थान योजने अंतर्गत होणारा खर्च या लेखाशीर्षामधून आदा केली आहे. मजीप्राने जुनाच डिपीआर दरसूचीमधील दरामध्ये बदल करुन महानगरपालिकेस सादर केला असल्याने या अनियमित तेबाबत मजीप्रास महानगरपालिकेने दिलेली रक्कम रु.151.48 लक्ष आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

DRAFT

20) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एनयुआर- 2008/प्र.क्र.2003 नवि-33, दि.20/02/2010 मधील v) नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांना सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा करणे शक्य व्हावे या करिता MUIDCL( महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड) या शासनप्रणीत कंपनीला सक्षम करण्यासाठी राज्य शासन व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड (MUIF) मध्ये प्रत्येकी रु.250 कोटी इतकी गुंतवणुक करुन रु.500 कोटीचा स्वतंत्र प्रकल्प वित्त पुरवठा निधी स्थापन करण्यासाठी शासन निर्णय क्र. एनयुआर -2009/प्र.क्र.127/09/नवि-33 दि.31/08/2009 अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. सदर निधीमधून MUIDCL प्रस्तुत महाभियाना अंतर्गत मंजूर प्रकल्पाकरिता सवलतीच्या दराने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्ज मंजूर व वितरीत करणार आहे. या शासन निर्णयान्वये दरसूचीतील फरकामुळे सदर प्रकल्पांच्या अंदाजपत्रकीय किमतीमध्ये होणारी वाढ याची 50 टक्के रक्कम पूरक अनुदानाच्या स्वरुपात राज्यशासनाकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सांगली भुयारी गटार योजनेची सन 2010-11 च्या दरसूचीप्रमाणे होणारी निविदा किंमत रु.64,71,54,675/- इतकी आहे. 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये सदर कामाच्या निविदा दि.21/04/2012 रोजी मागविल्या असुन निविदा दि.21/08/2012 रोजी उघडण्यात आल्या आहेत व कमी देकाराच्या ठेकेदाराबरोबर वाटाघाटी दि.12/03/2012 व दि.14/03/2012 रोजी करुन ठेकेदाराची निविदा महासभेने महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 ने मंजुर केली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या कामाची 2011-12 च्या दरसूचीनुसार मुल्यांकित केलेली किंमत रु.82,86,62,485/-असून ठेकेदाराचा मंजूर निविदा दर रु.969592485/- इतका आहे. दि.31/08/2009 च्या शासन निर्णयानुसार निविदा रक्कम रु. 647154675 - रु.828662485/- (सन 2011- 12 चा दरसूचीप्रमाणे दर) = रु.18,15,07,810/- च्या 50 टक्के रक्कम रु.09,07,53,905/- शासनाकडून पुरक अनुदानाच्या स्वरुपात मिळणार आहेत. सदर जादा अनुदानाची रक्कम मिळविण्यासाठी महानगरपालिकेने कोणतेही प्रयत्न केले नसल्याचे नस्तीची तपासणी केले असता दिसून आले आहे.

21)शासन निर्णय दि.20 फेब्रु.2010 मधील 7 (iii) नुसार मंजूर प्रकल्पांना शासनाचे देय अनूदान दोन टप्प्यात मंजूर करण्यात येणार आहे. अनुदानाचा 50 टक्के भाग प्रकल्प मंजूरी नंतर वितरीत करण्यात येईल. उर्वरित 50 टक्के अनुदान प्रथम टप्प्याच्या अनुदानाच्या 70 टक्के रक्कम खर्च झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वितरीत करण्यात येईल असे नमुद आहे. शासनाने महानगरपालिकेस दि.31/01/2012 रोजी रु.10 कोटी 28 लाख व दि.25/03/2013 रोजी रु.10 कोटी 28 लाख असे एकूण 20 कोटी 56 लाख पहिल्या टप्प्याच्या हप्त्यापोटी महानगर-पालिकेस आदा केले आहेत. 2012-13 या आर्थिक वर्षात या योजनेवर शासन अनुदानामधुन एकूण रक्कम रु.168928204/- खर्च झाला आहे. सदर खर्च पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या शासन अनुदानाच्या 70 टक्के पेक्षा जास्त झाल्याने या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर करुन दुसऱ्या



DRAFT

टप्प्याच्या अनुदानाची मागणी करणे आवश्यक असता महानगरपालिकेने उपयोगिता प्रमाणपत्रे शासनाकडे पाठविलेली नसल्याने दुस-या टप्प्याचे अनुदान महानगरपालिकेस मिळालेले नाही.

22) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.नगरी /2011 /प्र.क्र.176/नवि -33 मंत्रालय दि. 01 नोव्हें. 2011 नुसार सांगली भुयारी गटार योजना मंजुर केली असुन शासन निर्णयामध्ये दिलेल्या आकृतीबंधानुसार सांगली भुयारी गटार योजनची किंमत रु.82.22 कोटी इतकी असुन त्यामध्ये 50 टक्केप्रमाणे शासनाकडून रु.41.11 कोटी मिळणार असुन उर्वरित 50 टक्के रक्कम महानगरपालिकेने स्वनिधी व कर्जाद्वारे उभी करावयाची आहे. या योजनेस महासभेने महासभा क्रमांक (विस) 01,ठराव क्र.01, विषय क्र.01 दि.06/04/2013 खालीलप्रमाणे मान्यता दिली आहे. 1) सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.2 भाग 2 च्या निविदा दरास निविदा किमतीच्या 49.82 टक्के जादा दराने तसेच चालु दरसूचीनुसार (सन 2012-13) 9.72 टक्के जादा दरास 2) दरसूचीतील फरक मिळणेसाठी सुधारीत योजना शासनास सादर करण्यास 3) सांगली व मिरज भुयारी गटार योजनेसाठी अंदाजे रु.125 कोटी कर्ज उभारणीस 4) चालु व्याजदर व 10 वर्ष कर्ज परतफेड कालावधी धरता दरवर्षी रु.20 कोटीची अतिरिक्त तरतुद कर्ज फेडीसाठी अर्थसंकल्पात करणे व सिंकींग फंडामध्ये सदर रक्कम वर्ग करुन कर्जफेड नियमित स्वरुपात करणे यासाठी सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या कामाची 2011-12 च्या दरसूचीनुसार मुल्यांकित केलेली किंमत रु.82,86,62,485/- असून ठेकेदाराचा मंजूर निविदा दर रु.969592485/- इतका आहे. दि.31/08/ 2009 च्या शासन निर्णयानुसार निविदा रक्कम रु. 647154675(2009 -10 च्या दरसूचीनुसार) - रु.828662485/- (सन 2011- 12 चा दरसूचीनुसार दर) = रु.18,15,07,810/- च्या 50 टक्के रक्कम रु.09,07,53,905/- शासनाकडून पुरक अनुदानाच्या स्वरुपात मिळणार असून उर्वरित रक्कम महानगरपालिकेस उभारावी लागणार आहे. तसेच मंजूर निविदा रक्कम रु.969592485 - रु.82,86,62,485/ (2011-12 च्या दरसूचीनुसार मुल्यांकित केलेली किंमत) = रु.140930000 + रु.09,07,53,905/- अशी एकूण रक्कम रु.231683905/- महानगरपालिकेस स्वनिधीमधून उभारावी लागणार आहे. परंतु महानगरपालिकेने स्वनिधीची रक्कम उभारणेचे कोणतेही प्रयत्न केलेचे अंदाजपत्रकाची तसेच नस्तीची तपासणी केली असता दिसून येत नाही.

**वसुलपात्र रक्कम :-** निविदा काढणे व स्विकारणे यामध्ये एक वर्षाचा कालावधी गेल्याने व नविन दरसूची 2012-13 च्या मुल्यांकीत किंमतीबरोबर दरपृथ:करण करुन निविदा मंजुर केल्याने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रु.55034640 /- + मोबिलायझेशन ॲडव्हान्सवरील आयकराची 2 टक्केप्रमाणे कपात करावयाची रक्कम रु.1294309/- + गौण खनिजावरील रॉयल्टीची रक्कम रु.72991 /- = रु.56401940/-

**आक्षेपाधिन रक्कम :-** या कामाची निविदा 2012-13 च्या मजिप्रा चालू दरसूचीबरोबर तुलना करुन 9.72 टक्के जादाने मंजुर केली आहे. परंतु जादा दर का आले आहेत याचे दरपृथ:करण न करताच जादा दरास मंजुरी दिल्याने जादाची रक्कम रु.85895300/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत +

DRAFT

कामामधील Severage Treatment Plant साठी खुदाई केलेला मुरुम महानगरपालिकेच्या ताब्यात दिला नसल्याने या खुदाईची रक्कम रु.6075912 /- + खुदाईच्या 5 टक्के कामाची कार्यकारी अभियंता यांनी जागेवर जावून तपासणी केली नसल्याने खुदाई कामाची रक्कम रु.988845/- = रु.92960057/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

DATSBKM7201 (Ref No : 43)

## *83 वॉर्ड क्र.69 मधील स्वामी समर्थ मंदिर परिसर येथील रस्ते डांबरी करणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 41978.00/-

***या कामाची निविदा दरापेक्षा 29 टक्के कमीची निविदा मंजुर करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, नियम पुस्तिकेमधील नियम 150 नुसार 10% पेक्षा कमी दराने निविदा स्विकृत केल्यास, कमी आलेल्या दराप्रमाणे नविन संक्षिप्त प्राकलन(abstract estimate) तयार करुन त्यास कार्यकारी अभियंत्याची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तसेच मुळ प्राकलन रद्द करून त्याऐवजी स्विकृत केलेल्या कमी दराच्या प्राकलनाचा समावेश नस्तीमध्ये करुन त्याप्रमाणे काम करणे आवश्यक असता, पूर्वीचे प्राकलन रद्द न करताच सदर काम करण्यात आले आहे. कामाचे रेखांकन व नकाशे सहा.संचालक नगररचना यांचेकडून मंजुर करण्यात आलेले नाहीत. निविदा मंजुरीची समज दिल्यानंतर सात दिवसाचे आत सुरक्षा अनामत भरणा करणे आवश्यक असता ती भरणा केली नसल्याने काम सुरु होण्यास 4 महिन्याच विलंब लागला आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस नागरी दलित सुधार योजने अंतर्गत रक्कम रु.8500000/- चे अनुदान राज्य शासनाकडून मंजुर झाले असुन या अनुदानामधुन अंदाजपत्रकीय रक्कम रु.8492114/- च्या एकुण 14 कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

काम करण्यास मा.जिल्हाधिकारी,सांगली यांनी दि. 27/7/2012 चे आदेशाने मान्यता दिली आहे. अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष :- आर्थिक वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पातील 006) इतर योजना 41216, नागरी दलित वस्ती सुधार योजना.

निविदा रक्कम रु. 622900/-

प्रशासकीय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,सांगली यांनी आरआर / क्रमांक / नपा / आरआर / 462 दि. 27/7/2012 अन्वये या कामास प्रशासकीय मान्यता दिली आहे.



DRAFT

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.र.न.21 दि.20/04/12
स्थायी समिती सभा क्र.14, ठराव क्र.243, विषय क्र.ऐन दि.29/8/2012 ने कामास मंजुरी दिली आहे.
मा.आयुक्त निर्णय क्र.332 दि.7/12/2011 ने निविदा मागविण्यास मंजुरी दिली आहे.
या कामाची जाहिर निविदा क्र.2 /2012-13 दि.08/09/2012 रोजी दै.पुढारी या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करुन ई निविदा मागविण्यात आल्या आहेत. या कामाच्या निविदा इ- टेंडर गठण समितीसमोर दि.12/10/2012 रोजी उघडण्यात आल्या असुन खालील ठेकेदारांच्या 1) ए.आय.मुरगुडे (29 टकके कमी), 2) ए.पी.धंडे (24.99 टक्के कमी),3)जी.व्ही.पाटील (24.21 टकके कमी), 4) एस.बी.चौगुले (21 टक्के कमी),5) व्ही.ए.पाटील (19 टक्के कमी), 6) आर.बी.आडमुठे (5.73 टक्के कमी), 7) डी.बी.गुंजाटे (5.55 टक्के कमी) एकुण 7 निविदा प्राप्त झाल्या आहेत.
या कामाचे सर्वात कमीचे ठेकेदार श्री.ए.आय.म्हारगुडे यांची निविदा दरापेक्षा 29 टक्के कमीची निविदा मंजुर करण्यात आली आहे.
आयुक्त निर्णय क्र.709/2012-13 दि.10 डिसेंबर 2012 ने ठेकेदाराकडून काम करुन घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.
निविदा मंजुरीची समज :- शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/146/2012-13 दि.12/12/2012 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली आहे. या कामाची 1 टक्के सुरक्षा अनामत रक्कम रु.6230/ ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र.39502 ने दि.30/01/2013 ने भरणा केली आहे. उपअभियंता मागासवर्गीय विकास व दलित वस्ती सुधार समिती यांनी ठेकेदारास जा.क्र./मनपा/मावदसुस/5/सांगली दि.10/04/2013 च्या पत्राने 1.50 टक्के जादा सुरक्षा अनामत भरणेची समज दिली आहे. पत्रामध्ये आपणास वारंवार तोंडी सुचना देवुनही आपण जादा सुरक्षा अनामत भरणा करणेस टाळाटाळ करीत असलेने सत्वर जादाची सुरक्षा अनामत भरणा करावी अन्यथा आपले नाव काळया यादीत टाकण्यात येईल असे नमुद आहे. यानंतर ठेकेदाराने जादाची सुरक्षा अनामत रु.9435/- सर्वसाधारण पावती क्र.39508 ने दि.10/04/2013 रोजी भरण्यात आली आहे.
या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.29/01/2013 रोजी केले आहे.
कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/मागास समिती/13 दि.26/04/2013 ने कार्यादेश देण्यात आला आहे.
काम सुरु :- दि.29/04/2013
कामाची मुदत :- 45 दिवस
काम पुर्ण :- दि.24/12/2013.
उपअभियंता यांनी दि.07/05/2013 रोजीचे आदेशान्वये पावसाळा तसेच कामाचे ठिकाणी पाइपलाइनचे काम सुरू होणार असल्याने सुरु असलेली कामगिरी तहकुब करण्याची समज ठेकेदारास दिली आहे.
उपअभियंता यांनी जा.क्र./सार्व/बांधावि/59/2012-13 दि.19/11/2013 चे पत्रान्वये ठेकेदारास थांबविलेले काम पुन्हा सुरू करण्याबाबत नोटीस दिली आहे.

DRAFT

प्रमाणक क्र. 16 , दि.30/01/2014 ने ठेकेदारास केलेल्या कामाच्या पोटी रक्कम रु.388080/- आदा केले आहेत.

मोजमाप पुस्तक क्र.14 पृष्ठ क्र.17 ते 19.

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका, देयक व प्रमाणके यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.116 दि. 20/06/2016 रोजी निर्गमित केला असुन दलित वस्ती विभागाने त्याचे अनुपालन दि.26/07/2016 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. सदरचे अनुपालन तपासुन खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) या कामाच्या निविदेमधील अटी शर्तीची तपासणी केली असता अट क्र.1 नुसार कामाच्या मंजुर ठेकेदाराकडून 5 टक्के सुरक्षा अनामत भरुन घेण्याची आहे. तसेच ठेकेदारास दि.12/12/2012 रोजी दिलेल्या निविदा मंजुरीच्या समजेमध्ये त्याने रु.31150/- सुरक्षा अनामत रक्कम भरुन करारपत्र करणेबाबत कळविले आहे. परंतु ठेकेदाराने दि.30/01/13 रोजी रक्कम रु.6230/- भरणा भरणा केली आहे व बांधकाम विभागाने काढलेल्या नोटीशीनंतर सुरक्षा रक्कमेच्या 1.5 टक्के अतिरिक्त रक्कम रु.9345/- दि.10/04/2013 रोजी भरणा केली आहे. अटी शर्तीनुसार 5 टक्के सुरक्षा अनामत ठेकेदाराकडून एकाच वेळी भरणा करुन घेतली नसून काम सुरू होण्यास 4 महिन्याचा विलंब झाला आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये या पुढे 5 टक्के सुरक्षा अनामत एक रकमी भरणा करण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे नमुद आहे.

2) महानगरपालिकेचा ठेकेदारास द्यावयाचा निविदा मंजुरी समजेचा नमुना छापिल स्वरुपात असुन त्यामध्ये निविदा मंजुरी समज मिळाल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम रु.31150/- भरणा करुन सात दिवसाच्या आत रु.100 रक्कमेच्या स्टँम्प पेपरवर करारपत्र करुन देण्याचे नमुद आहे. सात दिवसाच्या आत करारपत्र करुन न दिल्यास टेंडर अटी शर्तीमधील क्र.40 नुसार ठेकेदाराच्या नावे असलेली कामगिरी रद्द करुन या कामी भरणा केलेली सुरक्षा अनामत पक्क्या खाती जमा करुन ठेकेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात येणार असल्याचे नमुद आहे. परंतु बांधकाम विभागाने ठेकेदाराबरोबर दि.29/01/2013 रोजी करारपत्र केले असुन करारपत्र करताना सुरक्षा अनामतपोटी रक्कम रु. 6230/- भरणा करुन घेतली आहे व त्यानंतर उर्वरित रक्कम भरणा करण्यासाठी ठेकेदारास नोटीस काढण्यात आली. ठेकेदाराबरोबर करारपत्र करताना पुर्ण सुरक्षा अनामत रक्कम भरणा करुन घेतली नसल्याने व ठेकेदाराने उर्वरित सुरक्षा अनामत भरणेस 4 महिन्याचा विलंब करुन सुध्दा ठेकेदाराची अनामत रक्कम जमा करुन त्याची निविदा रद्द करण्याची कार्यवाही प्रशासनाने केलेली नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये अनामत रक्कम भरुन घेण्यास विलंब झाल्याने तसेच देयकामधुन उर्वरित रक्कम कपात करण्यात आली असल्याने निविदा रद्द करण्यात आली नसल्याचे नमुद आहे. सुरक्षा अनामत रक्कम निविदा मंजुरीची समज मिळाल्यानंतर सात दिवसात भरणे आवश्यक असता ती भरणा केली नसल्याने बांधकाम विभागाने दिलेले अनुपालन संयुक्तिक वाटत नाही.

3) ठेकेदारास कामाची वर्क ऑर्डर दि.26/04/2013 रोजी दिल्यानंतर उपअभियंता,बांधकाम विभाग

DRAFT

यांनी कामाच्या ठिकाणी पाईपलाईनचे काम सुरु करण्यात येणार असल्याने तसेच पावसाळ्याचे दिवस असल्याने ठेकेदारास दि.07/05/2013 रोजी काम बंद करण्याचे आदेश दिले आहेत व दि.19/11/2013 रोजी पाईप लाईनचे काम पुर्ण झाले असुन तहकुब असलेले काम पुन्हा चालु करण्याचे आदेश दिले आहेत. पाणीपुरवठा व बांधकाम हे दोन्ही विभाग महानगरपालिकेच्याच अधिपत्याखाली कार्यरत असल्याने विकास कामे करताना दोहोमध्ये समन्वय असणे गरजेचे आहे. परंतु या ठिकाणी काम करताना दोन्ही विभागामध्ये समन्वय नसल्याने रस्त्याचे काम बंद ठेवावे लागल्याचे दिसुन येते. तसेच या ठिकाणी पाईपलाईनचे काम सुरु असल्याबाबत पाणीपुरवठा विभागाने बांधकाम विभागाबरोबर केलेला कोणताही पत्रव्यवहार नस्तीमध्ये नसल्याने कामगिरी पाईपलाइनचे काम चालु असल्याचे कारणासाठी थांबविले बाबतची लेखापरीक्षणाची खात्री होत नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये रस्त्याचे ठिकाणी पाणीपुरवठा विभागाचे पाईप लाईनचे काम सुरु असल्याबाबतचा पत्रव्यवहार दाखविण्यात आला नसल्याने या ठिकाणी पाईप लाईनचे काम सुरु असल्याने रस्त्याचे काम बंद ठेवावे लागलेबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटविण्यात आली नाही.

4) या कामाची निविदा दरापेक्षा 29 टक्के कमीची निविदा मंजुर करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, नियम पुस्तिकेमधील नियम 150 नुसार 10% पेक्षा कमी दराने निविदा स्विकृत केल्यास, कमी आलेल्या दराप्रमाणे नविन संक्षिप्त प्राकलन(abstract estimate) तयार करुन त्यास कार्यकारी अभियंत्याची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तसेच मुळ प्राकलन रद्द करून त्याऐवजी स्विकृत केलेल्या कमी दराच्या प्राकलनाचा समावेश नस्तीमध्ये करुन त्याप्रमाणे काम करणे आवश्यक असता, पूर्वीचे प्राकलन रद्द न करताच सदर काम करण्यात आले आहे. घट अंदाजपत्रक तयार करुन त्यास कार्यकारी अभियंता यांची मंजुरी न घेताच काम करण्यात आले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सदर कामासाठी वेगळे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेण्याची आवश्यकता नसल्याचे नमुद आहे. बांधकाम विभागाने नियमानुसार घट अंदाजपत्रक तयार करुन त्यास कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेतली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

5) कामाच्या नस्तीमध्ये प्राकलन व प्रस्तावित कामाचा नकाशा जोडला आहे. परंतु नकाशामध्ये स्वामी समर्थ मंदीर परिसरामधील नेमके कोणते रस्ते तयार करावयाचे आहेत. ते रस्ते मोजमापा सहित नकाशामध्ये दाखविण्यात आले नसलेने परिसरामधील नेमक्या कोणत्या रस्त्याची कामे करणेत येणार आहे ते समजुन येत नाही. जिल्हाधिकारी सांगली यांनी दलित वस्ती सुधार योजने मधील या कामांना प्रशासकीस मंजुरी देताना या कामासाठीचे रेखांकन व नकाशे सहाय्यक संचालक यांचेकडुन मंजुर करुन घेण्याची अट क्र.2 आदेशामध्ये नमुद केली आहे. कामाच्या नस्तीमध्ये सहा. संचालक , नगररचना यांनी स्वाक्षरी केलेल्या त्या भागाच्या नकाशाची प्रत जोडण्यात आली आहे. परंतु नगररचनाकार यांनी त्या भागातील तयार करण्यात यावयाच्या रस्त्यांची रेखांकने मंजुर करुन नकाशात दाखविली नसल्याने भागामधील नेमके कोणते रस्ते करण्यात आले आहेत ते समजुन येत नाही. मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता पृष्ठ क्र.18 वर बाब क्र.5 नुसार Providing &

DRAFT

Laying BBM Surface 75 MM thick completely हे काम 5 ठिकाणी केलेचे नमुद आहे. परंतु रस्त्याच्या कामाचे नकाशे नस्तीमध्ये नसल्याने भागातील कोणते रस्ते केले ते समजुन येत नाही. त्यामुळे बाब क्रं. 05, 75 MM BBM करणे हे काम 1010.03 चौ.मी. करणेत आले असुन या कामाची रु.200.65 प्रती चौ.मी. प्रमाणे ठेकेदारास आदा केलेली रक्कम रु.202662/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये सोबत हातनकाशे जोडण्यात आल्याचे नमुद आहे. परंतु कामासाठीचे रेखांकन व नकाशे सहाय्यक संचालक यांचेकडुन मंजुर करुन घेण्याची अट क्र.2 प्रशासकीय मंजुरीच्या आदेशामध्ये नमुद केली असल्याने दिलेले अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

6)या कामाच्या देयकाची व मोजमाप पुस्तकाची तपासणी केली असता बाब क्र.02 मुरुम पुरविणे 432 घ.मी., बाब क्र.03 खडी पुरविणे 102 घ.मी. व बाब क्र.04 सॉफ्ट मुरूम पुरविणे 60 घ.मी या बाबी करण्यासाठी एकुण 594 घ.मी. गौण खनिज कामाच्या ठिकाणी वापरण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार DSR तयार करताना बांधकामाच्या ज्या बाबीमध्ये गौण खनिजाचा समावेश आहे त्या बाबींचे दर ठरविताना त्यामध्ये रॉयल्टी रक्कमेचा समावेश केला असल्याने कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रॉयल्टी रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला गौण खनिजाच्या रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद शासन निर्णयामध्ये करण्यात आली आहे. या कामाच्या देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 594 घ.मी. X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.41978 /- रॉयल्टी रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये रॉयल्टीच्या पावत्या नस्ती सोबत जोडण्यात आल्याचे नमुद आहे. परंतु पावत्या दाखविल्या नसल्याने रक्कम रु.41978 /- वसुलपात्र करण्यात येत आहे.

रॉयल्टीची वसुलपात्र रक्कम रु. 41978/-

DATSBKM7201 (Ref No : 116)

## *84 वॉर्ड क्र.21 भिमनगर अंतर्गत कॉंक्रीटचे रस्ते करणे या कामामधील अनियमितते बाबत.*

**नागरी दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : बांधकाम राज्य शासन निधी*

DRAFT

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 10344.00/-

| |
|---|
| ***या कामास जिल्हाधिकारी यांनी दि.05/02/2012 रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे व सदर काम महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐन, दि.20/03/2012 ने मजुर सहकारी सोसायटी कडून करुन घेण्यास मान्यता झाली आहे. मजुर सोसायटीस कामाचे वाटप दि.1 जून 2013 रोजी जिल्हा उपनिबंधक यांनी केलेनंतर सदर काम ठेकेदाराचे नाव घालुन पुन्हा मान्यतेसाठी महासभेकडे पाठविणेत आले आहे व महासभेने या कामासाठी दि.20/07/2013 रोजी मान्यता दिली आहे. महासभेने एकदा मजुर सोसायटीकडून काम करण्यास मंजुरी दिलेले काम ठेकेदाराचे नाव घालुन पुन्हा महासभेकडे मंजुरीसाठी पाठविल्याने काम सुरू होण्यास 4 महिन्याचा विलंब झाला आहे.*** |

DRAFT

या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता पृष्ठ क्र.T-5 वर अनुसूचित जाती जमाती उपाययोजना 2012-13 च्या प्रस्तावित कामांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शहर अभियंता यांनी दि.23/11/2012 रोजी आयुक्तसो यांना सादर केला आहे. त्यामध्ये मा.जिल्हाधिकारी कार्यालयात दि.03/11/2012 रोजी झालेल्या दलित वस्ती सुधार योजनेच्या मिटींगमध्ये महानगरपालिकेस रु.75 लाखाचे अनुदान मंजुर केलेचे सांगण्यात आले, त्यानुसार रु.7499964/- ची सुधारीत अंदाजपत्रके तयार केली आहेत. सदर शासकीय अनुदान मिळणेसाठी जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यास महासभा ठराव क्र.133 दि.09/11/2012 ने मान्यता झाली आहे.

प्रशासकीय मान्यता :- सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस नागरी दलित सुधार योजने अंतर्गत मंजुर अनुदान रक्कम रु.7014700/- चे एकुण 15 कामांना मा.जिल्हाधिकारी,सांगली यांनी क्र.नपा / नादव / आरआर /181/2013 दि. 05/02/2012 रोजी मान्यता दिली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.500700/-

अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष :- आर्थिक वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पातील 006) इतर योजना 41216, नागरी दलित वस्ती सुधार योजना.

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.903 दि.23/11/2012.

महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐन, दि.20/03/2012 ने सदर काम मजुर सहकारी सोसायटीकडून करुन घेण्यास मान्यता झाली आहे.

जिल्हा उपनिबंधक मजुर सहकारी सोसायटी यांना शहर अभियंत्यांनी पत्र क्र./ मनपा / मागास समिती/21/ दि.17/05/2013 ने सदर काम मजुर सोसायटीकडुन करणे आवश्यक असल्याने मजुर सोसायटीस वाटप करुन त्याचे नाव महानगरपालिकेस कळविण्याचे सुचित केले आहे. त्यानुसार उपनिबंधक सहकारी सोसायटी यांनी जाक्र.फेड/काम/दि.31/05/2013 ने हे काम जे.के.मजुर सहकारी सोसायटीस वाटप केलेचे पत्र महानगरपालिकेस पाठविले आहे. व सदर पत्र सार्व.बांधकाम विभागास

जाक्र. 543 ने दि.01 जुन 2013 रोजी मिळाल्याची नोंद पत्रावर घेण्यात आली आहे. उपायक्त यांचे सहीने भिमनगर अंतर्गत रस्ते कॉंक्रीटचे करणे हे काम जे.के.मजुर सोसायटीस मंजुर झाले असुन सदरची कामगिरी ठेकेदाराकडुन करुन एस्टिमेट दराने करुन घेणेस व त्याकामी येणारे अंदाजे खर्च रक्कम रु.5,00,700/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी विषयपत्र महासभेकडे सादर केले आहे व महासभा क्रमांक 03 ,ठराव क्र.163,विषय क्र.ऐन, दि.20/07/2013 विषयपत्रा प्रमाणे काम करणेस मान्यता दिली आहे.

ठेकेदाराचे नाव :- जे.के.मजुर सहकारी सोसायटी,मिरज.

निविदा मंजुरीची समज :- शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/147/2012-13 दि.06/08/2013 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली आहे. या कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.25050/ मात्रचे 20 टक्के रक्कम रु.5010 /-, स्थायी समिती ठराव क्रमांक 144, दि.14/11/2006 अन्वये ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र.39518 ने दि.30/01/2012 ने भरणा केली आहे.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.07/08/2013 रोजी केले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/मागास समिती/57 दि.19/08/2013 ने कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु :- दि.20/08/2013

कामाची मुदत :- 60 दिवस

काम पुर्ण :- दि.18/10/2013.

प्रमाणक क्र. 13 , दि. 31/10/2014, रक्कम रु. 500172/- ने या कामाच्या देयकाची रक्कम आदा केली आहे.

मोजमाप पुस्तक क्र.14 पृष्ठ क्र.15 ते 16

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका व प्रमाणकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.117, दि. 20/06/2016 रोजी निर्गमित केला असुन दलित वस्ती सुधार विभागाने त्याचे अनुपालन दि.26/07/2016 रोजी सादर केले आहे. सदरचे अनुपालन तपासुन खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) या कामाच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये पृष्ठ क्र. 16 वर बाब क्र. 3 Providing & laying in situ cement concrete M-10 ही बाब 89.39 घ.मी. केलेची नोंद घेण्यात आली आहे. या कामासाठी वाळु 43.17 घ.मी. व खडी 86.34 घ.मी. लागली आहे. तसेच बाब क्र. 04 ने Providing & Casting in situ cement concrete M-15 ही बाब 44.18 घ.मी केली आहे. या कामासाठी वाळु 19 घ.मी. व खडी 38 घ.मी. लागली आहे. या कामासाठी एकुण गौण खनिज 186.51 घ.मी.लागले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/ 2010 नुसार DSR तयार करताना बांधकामाच्या ज्या बाबीमध्ये गौण

खनिजाचा समावेश आहे त्या बाबींचे दर ठरविताना त्यामध्ये रॉयल्टी रक्कमेचा समावेश केला असल्याने कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रॉयल्टी रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला गौण खनिजाच्या रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद शासन निर्णयामध्ये करण्यात आली आहे. या देयकामधुन 57.86 घ.मी.ची रु.70 प्रती घ.मी. प्रमाणे रक्कम रु.4060/- रॉयल्टी वसुल केली आहे. त्यामुळे उर्वरित 128.65 घ.मी.ची रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रॉयल्टी रक्कम रु.9092/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात आलेली नाही.

2) या कामास जिल्हाधिकारी यांनी दि.05/02/2012 रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे व सदर काम महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐन, दि.20/03/2012 ने मजुर सहकारी सोसायटी कडून करुन घेण्यास मान्यता झाली आहे. मजुर सोसायटीस कामाचे वाटप दि.1 जून 2013 रोजी जिल्हा उपनिबंधक यांनी केलेनंतर सदर काम ठेकेदाराचे नाव घालुन पुन्हा मान्यतेसाठी महासभेकडे पाठविणेत आले आहे व महासभेने या कामासाठी दि.20/07/2013 रोजी मान्यता दिली आहे. महासभेने एकदा मजुर सोसायटीकडून काम करण्यास मंजुरी दिलेले काम ठेकेदाराचे नाव घालुन पुन्हा महासभेकडे मंजुरीसाठी पाठविल्याने काम सुरू होण्यास 4 महिन्याचा विलंब झाला आहे.

3)सांगली महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये 22 मे 2013 पासुन स्थानिक संस्था कर लागु झाल्याने स्थानिक संस्था कर नियम 2010 च्या नियम 27 (5) नुसार महानगरपालिका क्षेत्रात कोणतेही काम हाती घेणा-या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तिला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा किंवा त्याच्या कंत्राट मूल्यांच्या एकुण रक्कमेच्या 0.25 टक्के इतक्या ठोक दराने उक्त कर प्रदान करण्याचा पर्याय असेल. या नियमाप्रमाणे या कामाच्या ठेकेदाराकडून निविदा रक्कम रु.500700/- च्या 0.25 टक्केप्रमाणे रु.1252/- ठेकेदाराच्या देयकामधुन वसुल केले नाहीत.

**वसुलपात्र रक्कम :-** रॉयल्टी रक्कम रु.9092/ + स्थानिक संस्था कर रक्कम रु. 1252/- = रु.10344/-.

DATSBKM7201 (Ref No : 117)

## *85 दलित वस्ती सुधार योजनेमधुन करण्यात आलेल्या विकास कामामधील अनियमिततेबाबत.*

**दलित वस्ती नागरी सुधार योजना.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 18**

*लेखा शीर्ष : बांधकाम राज्य निधी*

*अनियमितता कलम : 9ब*



DRAFT

आक्षेपाधीन रक्कम रु. 707006.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 82046.00/-

***सार्वजनिक बांधकाम विभाग ,शासन निर्णय क्रमांक सीएटी01/05/ प्रक्र.26/ इमारती -2 दि.31/03/ 2005 अन्वये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना काम वाटप करण्यासाठी जिल्हास्तरावर अधिक्षक अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन या समितीमार्फत कामाचे वाटप करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सुबेआंना द्यावयाच्या कामांची यादी काम वाटप सभेच्या सात दिवस अगोदर वेबसाईटवर ठेवुन, वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या कामांचे लॉटरी पध्दतीनेच वाटप करणे आवश्यक आहे. सदरचे काम सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे कडून करुन घेण्याचे आदेश महासभेने दिले असल्याने काम देताना शासन निर्णयातील तरतुदीनुसार कामाचे वाटप करणे आवश्यक आहे. परंतु या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता नागरी दलित वस्ती विभागाने सदरची कामे थेट पध्दतीने ठेकेदारास दिली आहेत. अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा केलेल्या कामांना कार्यकारी अभियंता यांची लेखी पुर्वमान्यता घेण्यात आलेली नाही. कामामध्ये वापरण्यात आलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच कामाची देयके आदा केली आहेत.***

1**) <u>वॉर्ड क्र.12,म्हसोबा मंदीर ते अहिल्यादेवी होळकर विद्यालयापर्यंत पुर्व पश्चिम रस्तेस गटर करणे या कामामधील अनियमिततेबाबत.</u>**

या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता पृष्ठ क्र.T-5 वर अनुसूचित जाती जमाती उपाययोजना 2012-13 च्या प्रस्तावित कामांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शहर अभियंता यांनी दि.23/11/2012 रोजी आयुक्तसो यांना सादर केला आहे. त्यामध्ये मा.जिल्हाधिकारी कार्यालयात दि.03/11/2012 रोजी झालेल्या दलित वस्ती सुधार योजनेच्या मिटींगमध्ये महानगरपालिकेस रु.75 लाखाचे अनुदान मंजुर केलेचे सांगण्यात आले, त्यानुसार रु.7499964/- ची सुधारीत अंदाजपत्रके तयार केली आहेत. सदर शासकीय अनुदान मिळणेसाठी जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यास महासभा ठराव क्र.133 दि.09/11/2012 ने मान्यता झाली आहे.

**प्रशासकीय मान्यता :-** सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस नागरी दलित सुधार योजने अंतर्गत मंजुर अनुदान रक्कम रु.7014700/- चे एकुण 15 कामांना मा.जिल्हाधिकारी,सांगली यांनी क्र.नपा / नादव / आरआर /181/2013 दि. 05/02/2013 रोजी मान्यता दिली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.436500 /-

**अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष :-** आर्थिक वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पातील 006) इतर योजना 41216, नागरी दलित वस्ती सुधार योजना.

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.901 दि.23/11/2012.

महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐन, दि.20/03/2013 ने सदर काम सुशिक्षित बेरोगार अभियंता यांचेकडून करुन घेण्यास मान्यता झाली आहे.

**ठेकेदाराचे नाव :-** श्री.भाऊसाहेब प्रभाकर भोसले

निविदा मंजुरीची समज :- शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/28/2012-13 दि.22/05/2013 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली आहे. या कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.15355/ पैकी सुशिक्षित बेरोजगार अभियंता असल्याने स्थायी समिती ठराव क्रमांक 144, दि.14/11/2006 अन्वये तसेच शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता सवलतीनुसार यांना निम्मि रक्कम माफ आहे. त्यास अनुसरुन 1 टक्के रक्कम रु.3090 /-, ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र.39510 ने दि.23/05/2013 ने मनपाकडे भरणा केली आहे.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.23/05/2013 रोजी केले आहे.

**कामाचा कार्यादेश :-** शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/मागास समिती/33 दि.30/05/2013 ने कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु :- दि.13/05/2013

कामाची मुदत :- 60 दिवस

काम पुर्ण :- दि.21/06/2013.

प्रमाणक क्र. 03 दि.07/08/2013 रक्कम रु.305611/- ने या कामाच्या देयकाची रक्कम आदा केली आहे.

मोजमाप पुस्तक क्र.12 पृष्ठ क्र.06 ते 07

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका व प्रमाणकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.123, दि.13/07/2016 रोजी निर्गमित करण्यात आला असुन नागरी दलित वस्ती विभागानेत्याचे अनुपालन दि.27/07/2016 रोजी सादर केले आहे. दिलेले अनुपालन तपासुन या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) या कामाचे ठेकेदार श्री. श्री.भाऊसाहेब प्रभाकर भोसले हे सुशिक्षित बेरोजगार अभियंता असलेबाबतचे प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडण्यात आलेले नाही.

3) या कामाच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये पृष्ठ क्र. 07 वर बाब क्र. 05 ने Providing & Casting in situ cement concrete M-15 ही बाब 30 घ.मी केली आहे. या कामासाठी वाळु 12 घ.मी. व खडी 24 घ.मी. लागली आहे. या कामासाठी एकुण गौण खनिज 36 घ.मी.लागले आहे. परंतु देयकामधुन रॉयल्टी वसुल केली नसल्याने रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रॉयल्टी रक्कम रु.2544 /- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

4) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. या शासन निर्णयाप्रमाणे या कामाच्या प्राकलना मध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण

DRAFT

उपकर वसुल केला नसल्याने रक्कम रु. 305611/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.3056/- ठेकादाराकडुन वसुल करण्यात यावेत.

**वसुलपात्र रक्कम :-** रॉयल्टी रक्कम रु.2544 + कामगार कल्याण उपकर रु.3056/-= रु.5600/-

2) **<u>वॉर्ड क्र.74 मिरज येथील राजीव गांधी नगर मधील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामामधील अनियमिततेबाबत :-</u>**

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.899 दि.23/11/2012.

महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐन, दि.20/03/2013 ने सदर काम सुशिक्षित बेरोगार अभियंता यांचेकडून करुन घेण्यास मान्यता झाली आहे.

ठेकेदाराचे नाव :- श्री.अमय अशोक पाटील

निविदा मंजुरीची समज :- शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/27/2012-13 दि.22/05/2013 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली आहे. या कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.21825/ पैकी सुशिक्षित बेरोजगार अभियंता असल्याने स्थायी समिती ठराव क्रमांक 144, दि.14/11/2006 अन्वये तसेच शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता सवलतीनुसार यांना निम्मी रक्कम माफ आहे. त्यास अनुसरुन 1 टक्के रक्कम रु.4370 /-, ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र.39509 ने दि.23/05/2013 ने मनपाकडे भरणा केली आहे व उर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करावयाची आहे.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.23/05/2013 रोजी केले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/मागास समिती/32 दि.30/05/2013 ने कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु :- दि.13/05/2013

कामाची मुदत :- 60 दिवस

काम पुर्ण :- दि.25/11/2013.

उपअभियंता यांनी दि.25/06/2013 च्या पत्राने सदरचे काम डांबरीकरणाचे असल्याने व सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने काम बंद करण्याचे आदेश दिले आहेत व पुन्हा दि.26/10/2010 च्या पत्राने काम पुन्हा चालु करण्याचे आदेश दिले आहेत.

प्रमाणक क्र. 09 दि.05/10/2013 ने रक्कम रु.133046 /- व प्रमाणक क्र.17 दि.06/02/2014 ने रु.302193/- या कामाच्या देयकापोटी ठेकेदारास आदा केले आहेत.

मोजमाप पुस्तक क्र.12 पृष्ठ क्र.09 ते 10

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका व प्रमाणकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.123, दि.13/07/2016 रोजी निर्गमित करण्यात आला असुन नागरी दलित वस्ती विभागानेत्याचे अनुपालन दि.27/07/2016 रोजी सादर केले आहे. दिलेले अनुपालन तपासुन या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

DRAFT

1) या कामाच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये पृष्ठ क्र. 09 वर बाब क्र. 04 ने suplying & spreading 40 mm size trap stone metal या कामासाठी एकुण 84 घ.मी.खडी वापरण्यात आली असुन देयकामधुन खडीची रॉयल्टी वसुल केली नसल्याने रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रॉयल्टी रक्कम रु.5936 /- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

2) या कामाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.2 supplying & spreading hard murum at roadside या बाबीचे परिमाण 256.500 घ.मी. अंदाजित केले होते. परंतु मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता एकुण 276.48 घ.मी.चे काम करण्यात आले आहे त्यामुळे प्रत्यक्षात 19.98 घ.मी जादा काम करण्यात आले आहे. कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु नस्तीची तपासणी केली असता विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच काम केलेले आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली  परिच्छेद 265 नुसार जेव्हा महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे आदेश घेणे आवश्यक असतानाही कार्यकारी अभियंता यांचे लेखी आदेश न घेताच जादाचे काम करण्यात आले आहे.  अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये यापुढे अंदाजपत्रकामधील परिमाणापेक्षा जादा होणा-या परिमाणास कार्यकारी अभियंता यांची काम करण्यापुर्वी लेखी मान्यता घेण्याची दक्षता घेणेत येत असलेचे नमुद आहे. त्यामुळे जादा केलेल्या 19.98 घ.मी. परिमाणाची रु.382.55 प्रती घ.मी. प्रमाणे आदा केलेली रक्कम रु.7643.34/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार बांधकाम पूर्ण करण्यात आल्यानंतर नगरपरिषद अभियंता यांनी नमुना क्र.132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त /अहवाल (completion report ) सादर केले आहे तसेच ज्या बाबीवर अंदाजापेक्षा  अधिक खर्च झाला आहे त्याचे दिलेल्या नमुन्यामध्ये अंदाजानुसार परीमाण, दर व केलेल्या बांधकामावरचा खर्च व प्रत्यक्ष काम केल्यानुसार परिमाण, दर व रक्कम लिहीण्यात आले आहे. परंतु जादा झालेल्या कामाच्या फरकाचे स्पष्टीकरण अहवालामध्ये देण्यात आलेले नाही.

4) बाब क्र. 7, Providing & Laying 75 MM BBM Surface हे काम 837.44 चौ.मी. करण्यात आले आहे. परंतु  सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.8.1.2007 नुसार दिलेले काम विहीत केलेल्या विनिर्दिष्टानुसार होण्यासाठी बांधकाम साहित्य म्हणजे डांबर, खडी इ.ची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करण्यात आली नसल्याने याबाबीची 837.48 चौ.मी.X रु.200.65 प्रतीचौ.मी प्रमाणे  ठेकेदारास आदा केलेली रक्कम रु.51143/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये साहित्याची चाचणी केलेबाबतचा प्रयोगशाळा चाचणी तपासणी अहवाल सोबत जोडल्याचे नमुद आहे. परंतु अहवाल सोबत जोडला नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

DRAFT

5) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. या शासन निर्णयाप्रमाणे या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने ठेकेदारास प्रदान केलेली देयकाची रक्कम रु. 435239/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.4352 /- ठेकादाराकडुन वसुल करण्यात यावेत.

**वसुलपात्र रक्कम :-** रॉयल्टी रक्कम रु.5936 + कामगार कल्याण उपकर रु.4352 /- = रु.10288/-

**आक्षेपाधिन रक्कम :-** अंदाजपत्रापेक्षा जादा वापरलेल्या मुरूमाची रक्कम रु.7643.34/- + कामामध्ये वापरलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच आदा केलेली रक्कम रु. 51143/- = रु.58786/-

**3) <u>वॉर्ड क्र.6 कुपवाड येथील बजरंगनगर मधील दुकाने घर ते माने घर व सुपर टेलर ते पांढरे घर येथील रस्त्यांना आर.सी.सी.गटर करणे या कामामधील अनियमिततेबाबत :-</u>**

अंदाजपत्रकीय रक्कम :-803600/-

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.831 दि.09/10/2012.

महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐन, दि.20/03/2013 ने सदर काम सुशिक्षित बेरोगार अभियंता यांचेकडून करुन घेण्यास मान्यता झाली आहे.

ठेकेदाराचे नाव :- श्री.हर्षद विलास पडुळकर.

निविदा मंजुरीची समज :- शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/25/2012-13 दि.22/05/2013 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली आहे. या कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.40180/- पैकी सुशिक्षित बेरोजगार अभियंता असल्याने स्थायी समिती ठराव क्रमांक 144, दि.14/11/2006 अन्वये तसेच शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता सवलतीनुसार यांना निम्मी रक्कम माफ आहे. त्यास अनुसरुन 1 टक्के रक्कम रु.4040 /-, ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र.39511 ने दि.23/05/2013 ने मनपाकडे भरणा केली आहे व उर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करावयाची आहे.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.23/05/2013 रोजी केले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/मागास समिती/35 दि.04/06/2013 ने कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु :- दि.04/06/2013

कामाची मुदत :- 60 दिवस

काम पुर्ण :- दि.20/07/2013.

प्रमाणक क्र. 05 दि.12/09/2013 ने रक्कम रु.802717 /- या कामाच्या देयकापोटी ठेकेदारास

DRAFT

आदा केले आहेत.

मोजमाप पुस्तक क्र.13 पृष्ठ क्र.05 ते 06

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका व प्रमाणकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.123, दि.13/07/2016 रोजी निर्गमित करण्यात आला असुन नागरी दलित वस्ती विभागाने त्याचे अनुपालन दि.27/07/2016 रोजी सादर केले आहे. दिलेले अनुपालन तपासुन या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) दलित वस्ती सुधार योजनेमधुन सन 2012-13 साठी शासनाने रु.7014700/- अनुदान मंजुर केले असुन जिल्हाधिकारी, सांगली यांनी दि.05/02/2013 चे इतिवृत्त मनपा/नादव/आरआर/ 181/ 2013 ने एकुण 15 कामांना प्रशासकीय मंजुरी दिली आहे व महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐन, दि.20/03/ 2013 ने या 15 कामांचे वाटप सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना 33 टक्के, मजुर सोसायटी यांना 33 टक्के प्रमाणे करुन उर्वरित 34 टक्के कामे निविदा मागवुन करणेचा ठराव पारित केला आहे. त्यानुसार 5 कामे सुशिक्षित बेरोगार अभियंता यांचे कडुन करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग ,शासन निर्णय क्रमांक सीएटी01/05/ प्रक्र.26/ इमारती -2 दि.31/03/2005 अन्वये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना काम वाटप करण्यासाठी जिल्हास्तरावर अधिक्षक अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन या समितीमार्फत कामाचे वाटप करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सुबेआंना द्यावयाच्या कामांची यादी काम वाटप सभेच्या सात दिवस अगोदर वेबसाईटवर ठेवुन वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या कामांचे लॉटरी पध्दतीनेच वाटप करणे आवश्यक आहे. सदरचे काम सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे कडून करुन घेण्याचे आदेश महासभेने दिले असल्याने काम देताना शासन निर्णयातील तरतुदीनुसार कामाचे वाटप करणे आवश्यक आहे. परंतु या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता शासननिर्णयामधील तरतुदीनुसार कामांची यादी वेबसाईटवर प्रसिध्द करुन लॉटरी पध्दतीने सोडत काढुन या कामाचे वाटप नागरी दलित वस्ती विभागाने न करता काम थेट पध्दतीने ठेकेदारास दिले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये थेट पध्दतीने ठेकेदारास काम दिल्याचे मान्य केले आहे.

2) या कामाच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये पृष्ठ क्र. 09 वर बाब क्र. 04 ने suplying & spreading 40 mm size trap stone metal या कामासाठी एकुण 84 घ.मी.खडी वापरण्यात आली असुन देयकामधुन खडीची रॉयल्टी वसुल केली नसल्याने रु.70.67 प्रती घ.मी. प्रमाणे रॉयल्टी रक्कम रु.5936 /- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

3) या कामाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.4 Providing & Casting Insitu Cement Concrete M 20 of trap Metal for 75MM thick Pardi या बाबीचे परिमाण 58.810 घ.मी. अंदाजित केले होते. परंतु मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता एकुण 67.55 घ.मी.चे काम करण्यात आले आहे त्यामुळे प्रत्यक्षात 8.74 घ.मी जादा काम करण्यात आले आहे. कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ

DRAFT

करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु नस्तीची तपासणी केली असता विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच काम केलेले आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद 265 नुसार जेव्हा महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे आदेश घेणे आवश्यक असतानाही कार्यकारी अभियंता यांचे लेखी आदेश न घेताच जादाचे काम करण्यात आले आहे. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये यापुढे अंदाजपत्रकामधील परिमाणापेक्षा जादा होणा-या परिमाणाबाबत कार्यकारी अभियंता यांची काम करण्यापुर्वी लेखी मान्यता घेण्याची दक्षता घेणेत येत असलेचे नमुद आहे. त्यामुळे जादा केलेल्या 19.98 घ.मी. परिमाणाची रु.382.55 प्रती घ.मी. प्रमाणे आदा केलेली रक्कम रु.76435.34/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. त्यामुळे जादा केलेल्या 8.74 घ.मी. परिमाणाची रु.6846.70 प्रती घ.मी. प्रमाणे आदा केलेली रक्कम रु.59840 /- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.8.1.2007 नुसार दिलेले काम विहीत केलेल्या विनिर्दिष्टानुसार होण्यासाठी बांधकाम साहित्याची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणे आवश्यक आहे. या कामामध्ये M10 Cement Concrete ही बाब 19.65 घ.मी (दर रु.3414.80 प्रती घमी ) व M20 Cement Concrete ही बाब 67.55 घमी (दर रु.6846.70 प्रती घमी) करण्यात आले आहे. परंतु सिमेंट कॉंक्रीटचे काम योग्य गुणवत्तेचे करण्यात आलेबाबतचा सिमेंट कॉंक्रीटचा क्युब टेस्ट अहवाल देयका सोबत जोडण्यात आलेला नाही. अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये साहित्याची चाचणी केलेबाबतचा प्रयोगशाळा चाचणी तपासणी अहवाल सोबत जोडल्याचे नमुद आहे. परंतु अहवाल सोबत जोडला नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे. कामात वापरलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल नसल्याने सिंमेंट कॉंक्रीटचे काम योग्य गुणवत्तेचे झाले बाबतची खात्री होत नसल्याने या कामावर करण्यात आलेला खर्च रक्कम रु.529594/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. या निर्णयानुसार या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने ठेकेदारास प्रदान केलेली देयकाची रक्कम रु. 802717/- च्या 1 टक्के प्रमाणे रु.8027 /- ठेकादाराकडुन वसुल करण्यात यावेत.

**वसुलपात्र रक्कम -** रॉयल्टी रक्कम रु.5936/ + कामगार कल्याण उपकर रु.8027/- = रु.13963/-

**आक्षेपाधिन रक्कम -** अंदाजपत्रापेक्षा जादा केलेल्या M 20 कॉंक्रीटची रक्कम रु. 59840 /- + कामामध्ये वापरलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच आदा केलेली रक्कम रु.

DRAFT

रु.529594/- = रु.589434/-

4) **<u>मिरज वॉर्ड क्र.63 जवाहर हायस्कूल ते बुध्दविहार पर्यंत रस्त्यास आरसीसी गटर करणे या कामामधील अनियमिततेबाबत :-</u>**

दलित वस्ती सुधार योजनेमधुन सन 2012-13 साठी शासनाने रु.7014700/- अनुदान मंजुर केले असुन जिल्हाधिकारी, सांगली यांनी दि.05/02/2013 चे इतिवृत्त क्रमनपा/नादव/आरआर/181/2013 ने एकुण 15 कामांना प्रशासकीय मंजुरी दिली आहे व महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐन, दि.20/03/ 2013 ने या 15 कामांचे वाटप सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना 33 टक्के, मजुर सोसायटी यांना 33 टक्के प्रमाणे करुन उर्वरित 34 टक्के कामे निविदा मागवुन करणेचा ठराव पारित केला आहे. त्यानुसार 5 कामे मजुर सहकारी सोसायटीकडुन करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम :-468200/-

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.836 दि.09/10/2012.

ठेकेदाराचे नाव :- सिध्देश्वर मजुर सहकारी सोसायटी लि. कसबा डिग्रज

निविदा मंजुरीची समज :- शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/46/2013-14 दि.06/08/2013 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली आहे. या कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.23410/- पैकी रक्कम रु.4700 /-, ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र.39515 ने दि.06/08/2013 ने मनपाकडे भरणा केली आहे व उर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करावयाची आहे.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.07/08/2013 रोजी केले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा / मागास समिती / 52 दि.12/08/2013 ने कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु :- दि.13/08/2013

कामाची मुदत :- 60 दिवस

काम पुर्ण :- दि.15/11/2013.

ठेकेदाराने दि.17/09/2013 रोजी शासनाकडून मुरूम मिळत नसल्याची तक्रार बांधकाम विभागाकडे केल्याने नागरी दलित वस्ती विभागाने दि.17/09/2013 रोजीचे पत्राने काम बंद ठेवण्याचे आदेश ठेकेदारास दिले आहेत व दि.13/10/2013 पासून पुन्हा काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

प्रमाणक क्र. 19, दि.13/02/2014 ने रक्कम रु.466633 /- या कामाच्या देयकापोटी ठेकेदारास आदा केले आहेत.

मोजमाप पुस्तक क्र.16 पृष्ठ क्र.71 ते 76

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका व प्रमाणकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.123,

DRAFT

दि.13/07/2016 रोजी निर्गमित करण्यात आला असुन नागरी दलित वस्ती विभागाने त्याचे अनुपालन दि.27/07/2016 रोजी सादर केले आहे. दिलेले अनुपालन तपासुन या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐैन, दि.20/03/2013 ने सदरचे काम मजुर सोसायटी यांचेकडून करुन घेण्यास मान्यता झाली आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी सोसायटी यांना काम वाटप करण्याबाबतचे पत्र महानगरपालिकेने दि.17/05/2013 रोजी दिले आहे व उपनिबंधक सहकारी सोसायटी यांनी त्यांचे जाक्र.126/2013 दि.31/05/2013 चे पत्रान्वये सदरचे काम सिध्देश्वर मजुर सह. सोसा. लि. कसबा डिग्रज यांना वाटप केलेचे महानगरपालिकेस कळविले आहे. त्यानंतर सदरचे काम सिध्देश्वर मजुर सहकारी सोसायटीकडून करुन घेणेस महासभेची मान्यता घेण्यासाठी उपायुक्त यांच्या दि.16/07/2013 विषयपत्राने पुन्हा महासभेपुढे सादर करण्यात आले आहे व महासभा क्रमांक 03, ठराव क्र.164 विषय क्र.ऐैन दि.24/07/2013 ने महासभेने काम सिध्देश्वर मजुर सह. सोसायटीकडून करुन घेण्यास मान्यता दिली आहे. काम मजुर सोसायटीकडून करुन घेण्यास महासभेने दि.20/03/2013 ने मान्यता दिल्यानंतर पुन्हा महासभेकडे पाठविण्याचे प्रयोजन स्पष्ट करण्यात यावे. तसेच काम मजुर सहकारी सोसायटीकडून करुन घेणे दि.20/03/2013 ते काम सुरु करणे दि.13/08/2013 या सर्व प्रक्रीयमध्ये 5 महिन्याचा दिनावधी लागल्याने नागरीकांना मिळणा-या सोयी सुविधापासुन 5 महिने वंचित रहावे लागले आहे.

2) या कामासाठी बाब क्र.2 ने 88 घ.मी. मुरूम वापरण्यात आला आहे. परंतु या मुरुमाची रॉयल्टी भरणा केलेच्या पावत्या देयकासोबत नसल्याने 88 घमीची रु.70.67 प्रती घमी प्रमाणे रॉयल्टीची रक्कम रु.6219/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

**वसुलपात्र रक्कम :-** रॉयल्टी रक्कम रु.6219 = रु.6219 /-

**आक्षेपाधिन रक्कम :-** अंदाजपत्रकीय तरतुदी पेक्षा जादा वापरलेल्या मुरूमाची रक्कम रु.7643.34/- + कामामध्ये वापरलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच आदा केलेली रक्कम रु. 51143/- = रु.58786/-

**05) <u>सांगलवाडी वॉर्ड क्र.18 येथील धरण रस्ता मुरुम व खडीकरण करणे या कामामधील अनियमिततेबाबत :-</u>**

अंदाजपत्रकीय रक्कम :-501400/-

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.900 दि.23/11/2012.

ठेकेदाराचे नाव :- लोकमान्य मजुर सहकारी सोसायटी लि. कसबा डिग्रज

निविदा मंजुरीची समज :- शहर अभियंता यांनी क्र.म.न.पा./मागास समिती/50/2013-14 दि.06/08/2013 रोजीच्या पत्राने ठेकेदारास निविदा मंजुरीची समज देण्यात आली आहे. या कामाची

सुरक्षा अनामत रक्कम रु.25100/- पैकी रक्कम रु.5020 /-, ठेकेदाराने सर्वसाधारण पावती क्र.39514 ने दि.06/08/2013 ने मनपाकडे भरणा केली आहे व उर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करावयाची आहे.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.07/08/2013 रोजी केले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा / मागास समिती / 59 दि.19/08/2013 ने कार्यादेश देण्यात आला आहे.

काम सुरु :- दि.20/08/2013

कामाची मुदत :- 60 दिवस

काम पुर्ण :- दि.15/01/2013.

प्रमाणक क्र. 14 दि.16/12/2013 ने रक्कम रु.500801 /- या कामाच्या देयकापोटी ठेकेदारास आदा केले आहेत.

मोजमाप पुस्तक क्र.09 पृष्ठ क्र.77 ते 78

या कामाची नस्ती,मोजमाप पुस्तिका व प्रमाणकाची तपासणी करुन **अर्धसमास ज्ञापन क्र.123, दि. 13/07/2016 रोजी** निर्गमित करण्यात आला असुन नागरी दलित वस्ती विभागाने त्याचे अनुपालन दि. 27/07/2016 रोजी सादर केले आहे. दिलेले अनुपालन तपासुन या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महासभा क्रमांक 12, ठराव क्र.453, विषय क्रमांक ऐन, दि.20/03/2013 ने सदरचे काम मजुर सोसायटी यांचेकडून करुन घेण्यास मान्यता झाली आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी सोसायटी यांना काम वाटप करण्याबाबतचे पत्र महानगरपालिकेने दि.17/05/2013 रोजी दिले आहे व उपनिबंधक सहकारी सोसायटी यांनी त्यांचे जाक्र.127/2013 दि.31/05/2013 चे पत्रान्वये सदरचे काम लोकमान्य मजुर सह. सोसा. लि. सांगली यांना वाटप केलेचे महानगरपालिकेस कळविले आहे. त्यानंतर सदरचे काम या मजुर सहकारी सोसायटीकडून करुन घेणेस महासभेची मान्यता घेण्यासाठी उपायुक्त यांच्या दि.16/07/2013 विषयपत्राने पुन्हा महासभेपुढे सादर करण्यात आले आहे व महासभा क्रमांक 03, ठराव क्र.164 विषय क्र.ऐन दि.24/07/2013 ने महासभेने काम लोकमान्य मजुर सह. सोसायटीकडून करुन घेण्यास मान्यता दिली आहे. सदरचे काम मजुर सोसायटीकडून करुन घेण्यास महासभेने दि.20/03/2013 ने मान्यता दिल्यानंतर मंजुर ठेकेदाराचे नाव घालुन पुन्हा प्रकरण महासभेकडे पाठविण्याचे प्रयोजन स्पष्ट करण्यात यावे. तसेच काम मजुर सहकारी सोसायटीकडून करुन घेणेस दि.20/03/2013 रोजी मान्यता मिळाल्यानंतर काम दि. 20/08/2013 रोजी सुरु करणेत आले आहे. या सर्व प्रक्रीयमध्ये 5 महिन्याचा दिनावधी लागल्याने नागरीकांना मिळणा-या सोयी सुविधापासुन वंचित रहावे लागले आहे.

2) या कामाच्या मोजमाप पुस्तकाची तपासणी केली असता ,बाब क्र.2, हार्ड मुरुमाचा पुरवठा करणे व पसरणे या कामासाठी 647 घमी मुरुम लागला आहे. बाब क्र.3, 40 मिमि खडीचा पुरवठा करणे व

पसरणे या कामासाठी 217.41 घ.मी. खडी लागली आहे तसेच बाब क्र.05, सॉफ्ट मुरूमाचा पुरवठा करणे व पसरणे या कामासाठी 193.04 घमी सॉफ्ट मुरुम लागला आहे. या कामासाठी एकुण 1057.45 घमी गौण खनिज वापरण्यात आले असुन देयकाची तपासणी केली असता 407 घमी गौण खनिजाची रॉयल्टीचा भरणा केल्याचा पुरावा सोबत जोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे उर्वरित 650 घमी गौण खनिजाची रॉयल्टी भरणा केल्याचा पुरावा सोबत जोडला नसल्याने 650 घमी X रु.70.67 प्रती घमी प्रमाणे रु.45967/- वसुलपात्र करण्यात येत आहेत.

**वसुलपात्र रक्कम रु. 45967/-**

**एकुण वसुलपात्र रक्कम :- रु.5600/ +रु.10288/ +रु.13963/+रु.6219/+रु.45967/ = रु.82046/-**

**एकुण आक्षेपाधिन रक्कम :- रु.58786/ +रु.589434/ +रु.58786 /= रु.707006 /-**

DATSBKM7201 (Ref No : 123)

## *96 प्रभाग समिती क्र. 4 मध्ये करण्यात आलेल्या विविध विकास कामामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 11**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 142835.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 21605.00/-

***पेव्हिंग ब्लॉक्स बसविणेची कामे अंदाजपत्रकामध्ये तरतुद केलेल्या परिमाणापेक्षा जादा करण्यात आलेली आहेत. निविदा अटी/ शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता असतानाही जादाचे परिमाणास लेखी मंजुरी घेण्यात आलेली नाही. देयकाची रक्कम लेखा विभागाने दोन ते तीन प्रमाणकात विभागुन वर्षभरामध्ये दिली आहे. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार कार्यकारी अभियंता यांनी नमुना क्र.132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त / अहवाल सादर केलेला नाही. देयकामधुन कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.21605/- कपात केलेली नाही.***

1) **<u>वॉर्ड क्र.42 मधील रेवणी गल्ली रोड वरील सार्वजनिक रस्ते पेव्हिंग ब्लॉकने करणे या कामामधील अनियमिततेबाबत.</u>**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील वॉर्ड क्र.42 मधील रेवणी गल्ली रोड वरील सार्व.रस्ते पेव्हिंग ब्लॉक करणे या कामासाठी आर्थिक वर्ष 2012-13 च्या

अर्थसंकल्पामध्ये द्विनोंद कोड 41792 वर या कामासाठी नावानिशी रु.10 लाखाची तरतुद करण्यात आली असुन सदरचे रस्ते करण्याची सन्मानिय सदस्य यांनी मागणी केली असुन या कामाच्या ठिकाणची पाहणी कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी करुन 2012-13 च्या दरसूचीनुसार रक्कम रु.988288/- चे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शहर अभियंता यांची जावक क्र.554 दि.13/07/2012 ने तांत्रिक मान्यता घेतली आहे. सदरचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन करण्याबाबतची टिपणी बांधकाम विभागाने तयार करुन प्रशासनाकडे दि.13/07/2012 रोजी  सादर केली असुन आयुक्त यांनी सदर काम निविदा मागवुन करण्यास दि.16/07/2012 रोजी मान्यता दिली आहे.

जाहिर प्रकटन क्र.9/12-13 मधील अ.क्र.173 ची निविदा दै.पुढारी या वर्तमानपत्रामध्ये दि.11/08/ 2012 रोजी प्रसिध्द केली असुन दि.05/09/2012 पर्यंत ई निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदरच्या निविदा दि.20/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आली असुन त्यामध्ये ए.एस लष्करी (अंदाजपत्रकीय दराने), मे.पी.पी.कुंडले (3.55 टक्के जादाने) व मे. व्ही.ए.पाटील (5.12 टक्के जादाने ) अशा एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

मा.आयुक्त निर्णय क्र.641/2012-13 दि.09/11/2012 ने मक्तेदार असिफ लष्करी यांची अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस मंजुरी देण्यात आलेली आहे.

या कामाच्या निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांचे पत्र क्रमनपा/सा/बांधावि/60/2012-13 दि.20/11/2012 ने  ठेकेदारास दिली आहे.

या कामाचा करारनामा ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर केलेला असुन ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.10000/- पावती क्र.38610 ने दि.28/12/2012 रोजी भरल्याची नोंद करारपत्रामध्ये घेण्यात आली असुन उर्वरित रक्कम देयकामधुन घेण्याची आहे. कामाची वर्क ऑर्डर बांधकाम विभागाने ठेकेदारास पत्र क्रमनपा/सा/बांधावि/877/2012-13 दि.03/01/ 2013 ने दिली असुन काम पुर्ण करण्याची मुदत 60 दिवस देण्यात आली आहे.

काम सुरु दि. 03/01/2013 काम पुर्ण दि.28/01/2013

मोजमाप पुस्तक क्र.21 ,पृष्ठ क्र.35 ते 37

या कामाचे रक्कम रु.983319 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि. 25/02/2012 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आदा केली नसल्याने सदर प्रलंबित देयकाची पुन्हा आवक क्र.1512 दि.18/05/2013 ने नोंद केली आहे. या देयकाची  रक्कम रु. 983319 /- पैकी रक्कम रु.53123 /- चे प्रदान दि.27/10/2013 रोजी, रक्कम रु.699999 /- चे प्रदान  दि.25/07/2013 रोजी, रु.70830 चे प्रदान प्रमाणक क्र.4191 ने दि.19/03/2013 रोजी व उर्वरित रक्कम रु.159367 /- चे प्रदान दि.26/03/2014 रोजी केले आहे. लेखा विभागाने एकाच देयकाचे प्रदान देयकाच्या XEROX प्रतीवर विभागुन केले आहे. एकाच देयकाचे प्रदान विभागनी करुन देण्यात आले आहे.

**या कामाची नस्ती,अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.125 दि. 15/07/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.**

1) या कामाच्या प्राकलनामध्ये बाब क्र. 02 नुसार 60 मिमि जाडीचे पेव्हींग ब्लॉक्स बसविणे या कामाचे परिमाण 1460 चौ.मी. दाखविण्यात आले आहे. परंतु मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता सदरचे काम 1596.24 चौ.मी. करण्यात आले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 265 नुसार जेव्हा कामामध्ये महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे आदेश घेणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. तसेच निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु या जादा केलेल्या कामास विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी घेण्यात आलेली नसल्याने पेव्हिंग ब्लॉकचे जादा केलेले परिमाण 136 चौ.मी.X रु.566 प्रती चौ.मी प्रमाणे येणारी जादाची रक्कम रु.76996/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

2) नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार जेव्हा बांधकाम पूर्ण करण्यात येईल तेंव्हा नगरपरिषद अभियंता यांनी नमुना क्र.132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त/अहवाल (completion report ) सादर केला पाहिजे व जेव्हा कोणत्याही बाबीवर अंदाजापेक्षा अधिक रक्कम खर्च झाली असेल तेव्हा परिमाण दर व केलेल्या बांधकामावरचा खर्च व तसेच त्या संबंधातील अंदाज,यांची तुलना करुन, सर्व तफावतीबाबत कार्यकारी अभियंता यांनी स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. बाब क्र. 02 नुसार 60 मिमि जाडीचे पेव्हींग ब्लॉक्स बसविणे या बाबीवर अंदाजापेक्षा रु.76966/- जादा खर्च करण्यात आला आहे. परंतु जादा झालेल्या खर्चाबाबत नमुना क्र.132 मध्ये कार्यकारी अभियंता यांनी परिपूर्ती अहवाल सादर केलेला नाही. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार परिपुर्ती अहवाल सादर केल्याशिवाय कोणत्याही कंत्राटदारास अंतिम रक्कम प्रदान करता येणार नसल्याचे नमुद असतानाही ठेकेदारास या कामाचे अंतिम प्रदान करण्यात आले आहे.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यानुसार बांधकाम विभागाने प्राकलन तयार करताना त्यामध्ये 1 टक्का कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. परंतु देयकाची व प्रमाणकाची तपासणी केली असता त्यामधुन 1 टक्का उपकराची रक्कम रु. रु.9833/- कपात केली नाही. त्यामुळे सदर रक्कम रु.9833/- ठेकेदाराकडून वसुल करुन शासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

**2) <u>वॉर्ड क्र.74 रेल्वे कोल्हापुर चाळ बाबालाल झोपडपट्टीमधील अंतर्गत रस्त्यास पेव्हिंग ब्लॉक्स</u>**

**<u>बसविणे या कामामधील अनियमिततेबाबत</u>.**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील रेल्वे कोल्हापुर चाळ बाबालाल झोपडपट्टीमधील अंतर्गत रस्त्यास पेव्हिंग ब्लॉक्स बसविणे या कामासाठी आर्थिक वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पामध्ये द्विनोंद कोड 41954 वर या कामासाठी नावानिशी रु.5 लाखाची तरतुद करण्यात आली असुन सदरचे रस्ते करण्याची सन्मानिय सदस्य यांनी मागणी केली असुन या कामाच्या ठिकाणची पाहणी कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी करुन 2012-13 च्या दरसूचीनुसार रक्कम रु.489829/- चे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शहर अभियंता यांची जावक क्र.391 दि.13/07/2012 ने तांत्रिक मान्यता घेतली आहे. सदरचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन करण्याबाबतची टिपणी बांधकाम विभागाने तयार करुन प्रशासनाकडे दि.13/07/2012 रोजी सादर केली असुन आयुक्त यांनी सदर काम निविदा मागवुन करण्यास दि.13/07/2012 रोजी मान्यता दिली आहे.

जाहिर प्रकटन क्र.9/12-13 मधील अ.क्र.317 ची निविदा दै.पुढारी या वर्तमानपत्रामध्ये दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द केली असुन दि.05/09/2012 पर्यंत ई निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदरच्या निविदा दि.09/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आल्या असुन त्यामध्ये श्री. आर.आर. कांबळे (0.2 टक्के कमीने ) , श्री.पी.पी.पाटील (16 टक्के जादाने) व मे. जी.व्ही.पाटील (17 टक्के जादाने ) अशा एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

मा.आयुक्त निर्णय क्र.625 /2012-13 दि.09/11/2012 ने मक्तेदार श्री.आर.आर. कांबळे यांच्या निविदादरापेक्षा 0.2 टक्के कमी दराच्या निविदेस मंजुरी देण्यात आलेली आहे.

या कामाच्या निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांचे पत्र क्रमनपा/सा/बांधावि/539/2012-13 दि.20/11/2012 ने ठेकेदारास दिले आहेत.

या कामाचा करारनामा ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर केलेला असुन ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.5000/- पावती क्र.36539 ने दि.26/12/2012 रोजी भरल्याची नोंद करारपत्रामध्ये घेण्यात आली असुन उर्वरित रक्कम देयकामधुन घेण्याची आहे. कामाची वर्क ऑर्डर बांधकाम विभागाने ठेकेदारास पत्र क्रमनपा/सा/बांधावि/877/2012-13 दि.03/01/ 2013 ने दिली असुन काम पुर्ण करण्याची मुदत 45 दिवस देण्यात आली आहे.

काम सुरु दि. 03/01/2013 काम पुर्ण दि. 15/02/2013

मोजमाप पुस्तक क्र.21 ,पृष्ठ क्र.86 ते 88.

या कामाचे रक्कम रु.485248 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि. 28/03/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आदा केली नसल्याने सदर देयकाची प्रलंबित देयक म्हणुन पुन्हा आवक क्र.1512 दि.18/05/2013 ने नोंद केली आहे. या देयकाची रक्कम रु. 485248/- पैकी रक्कम रु.121312/- चे

DRAFT

प्रदान दि. 10/01/2014 रोजी, उर्वरित रक्कम रु.363936 /- चे प्रदान प्रमाणक क्र.6963 ने दि.26/03/2014 रोजी केले आहे. लेखा विभागाने एकाच देयकाचे प्रदान देयकाच्या XEROX प्रतीवर विभागुन केले आहे. एकाच देयकाचे प्रदान विभागनी करुन देण्यात आले आहे.

**या कामाची नस्ती,अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.125 दि. 15/07/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.**

1) या कामाचे रक्कम रु.485248 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि. 28/03/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आदा केली नसल्याने सदर देयकाची नोंद प्रलंबित देयक म्हणुन पुन्हा आवक क्र.1512 ने दि.18/05/2013 रोजी देयकावर केली आहे. या देयकाची रक्कम रु. 485248/- पैकी रक्कम रु.121312/- चे प्रदान दि. 10/01/2014 रोजी, उर्वरित रक्कम रु.363936 /- चे प्रदान प्रमाणक क्र.6963 ने दि.26/03/2014 रोजी केले आहे. सदर काम आर्थिक वर्ष 2012-13 च्या अंदाज पत्रकीय तरतुदीप्रमाणे केले असल्याने या कामाची रक्कम सदर तरतुदीतून त्याच आर्थिक वर्षामध्ये खर्च करणे आवश्यक असता लेखा विभागाने या कामाची रक्कम 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये ठेकेदारास आदा केली आहे. सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता नियम 10.7.4 नुसार काम पुर्ण झालेनंतर देयकाचे प्रदान करुन कामाचे लेखे तात्काळ पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी या कामाचे देयक प्रदान करुन लेखे पुर्ण करण्यास सुमारे एक वर्षाचा दिनावधी लागला आहे. सदर देयक विलंबाने का खर्ची टाकण्यात आले आहे तसेच एकाच देयकाचे प्रदान तीन टप्प्यामध्ये देयकाच्या XEROX प्रतीवर 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये विभागुन का देण्यात आले याचा खुलासा लेखा विभागाने अर्धसमास ज्ञापन क्र.125 ने मागणी करुनही केलेला नाही.

2) या कामाच्या प्राकलनामध्ये बाब क्र. 01 नुसार 60 मिमि जाडीचे पेव्हींग ब्लॉक्स बसविणे या कामाचे परिमाण 725 चौ.मी. दाखविण्यात आले आहे. परंतु मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता सदरचे काम 771.64 चौ.मी. करण्यात आले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 265 नुसार जेव्हा कामामध्ये महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे काम करण्यासाठी आदेश घेणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. तसेच निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु या जादा केलेल्या कामास विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी घेण्यात आलेली नसल्याने पेव्हिंग ब्लॉकचे जादा केलेले परिमाण 46.64 चौ.मी. X रु.566 प्रती चौ.मी प्रमाणे येणारी जादाची रक्कम रु.26398/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभा

गिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यानुसार बांधकाम विभागाने प्राकलन तयार करताना त्यामध्ये 1 टक्का कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. परंतु देयकाची व प्रमाणकाची तपासणी केली असता त्यामधुन 1 टक्का उपकराची रक्कम कपात केली नसल्याने रक्कम रु. 485248 च्या 1 टक्केप्रमाणे रु.4852 /- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहे.

**3) <u>वॉर्ड क्र.74 मधील राजीव गांधी नगर मधील झोपडपट्टी अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे या कामामधील अनियमिततेबाबत</u>**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील वॉर्ड क्र.74 मधील राजीव गांधी नगर मधील झोपडपट्टी अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे या कामासाठी आर्थिक वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पामध्ये द्विनोंद कोड 41954 वर या कामासाठी नावानिशी रु.346463 ची तरतुद करण्यात आली असुन सदरचे रस्ते करण्याची सन्मानिय सदस्य यांनी मागणी केली असुन या कामाच्या ठिकाणची पाहणी कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी करुन 2012-13 च्या दरसूचीनुसार रक्कम रु.339671/- चे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शहर अभियंता यांची जावक क्र.392 दि.13/07/2012 ने तांत्रिक मान्यता घेतली आहे. सदरचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा, खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन करण्याबाबतची टिपणी बांधकाम विभागाने तयार करुन प्रशासनाकडे दि.13/07/2012 रोजी सादर केली असुन आयुक्त यांनी सदर काम निविदा मागवुन करण्यास दि.13/07/2012 रोजी मान्यता दिली आहे.

जाहिर प्रकटन क्र.9/12-13 मधील अ.क्र.318 ची निविदा दै.पुढारी या वर्तमानपत्रामध्ये दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द केली असुन दि.05/09/2012 पर्यंत ई निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदरच्या निविदा दि.10/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आल्या असुन त्यामध्ये श्री.आर.आर. कांबळे (0.12 टक्के कमीने ) , श्री.पी.पी.पाटील (16 टक्के जादाने) व श्री.जी.व्ही. पाटील (16 टक्के जादाने ) अशा एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

मा.आयुक्त निर्णय क्र.601/2012-13 दि. 09/11/2012 ने मक्तेदार श्री. आर. आर.कांबळे यांची अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस मंजुरी देण्यात आलेली आहे.

या कामाच्या निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांचे पत्र क्रमनपा/सा/बांधावि/885/2012-13 दि.03/01/2013 ने ठेकेदारास दिली आहे. या कामाचा करारनामा ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर केलेला असुन ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.10000/- पावती क्र.38610 ने दि.28/12/2012 रोजी भरल्याची नोंद करारपत्रामध्ये घेण्यात आली असुन उर्वरित रक्कम देयकामधुन घेण्याची आहे. कामाची वर्क ऑर्डर बांधकाम विभागाने ठेकेदारास पत्र क्रमनपा/सा/बांधावि/877/2012-13 दि.03/01/ 2013 ने दिली असुन काम पुर्ण करण्याची मुदत 60 दिवस देण्यात आली आहे.

काम सुरु दि. 03/01/2013 काम पुर्ण दि.28/01/2013

DRAFT

मोजमाप पुस्तक क्र.21 ,पृष्ठ क्र.35 ते 37

या कामाचे रक्कम रु.983319 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि. 25/02/2012 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आदा केली नसल्याने सदर प्रलंबित देयकाची पुन्हा आवक क्र.1512 दि.18/05/2013 ने नोंद केली आहे. या देयकाची रक्कम रु. 983319 /- पैकी रक्कम रु.53123 /- चे प्रदान दि.27/10/2013 रोजी, रक्कम रु.699999 /- चे प्रदान दि.25/07/2013 रोजी, रु.70830 चे प्रदान प्रमाणक क्र.4191 ने दि.19/03/2013 रोजी व उर्वरित रक्कम रु.159367/- चे प्रदान दि.26/03/ 2014 रोजी केले आहे. लेखा विभागाने एकाच देयकाचे प्रदान देयकाच्या XEROX प्रतीवर विभागुन केले आहे. एकाच देयकाचे प्रदान विभागनी करुन देण्यात आले आहे.

**या कामाची नस्ती,अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.125 दि. 15/07/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.**

1) या कामाच्या प्राकलनामध्ये बाब क्र. 01 नुसार M10 सिमेंट कॉक्रीट करणे या कामाचे परिमाण 14 घ.मी. करण्याचे प्रस्तावित केले आहे. परंतु मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता सदरचे काम 25.55 घ.मी. करण्यात आले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 265 नुसार जेव्हा कामामध्ये महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे आदेश घेणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. तसेच निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु या जादा केलेल्या कामास विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी घेण्यात आलेली नसल्याने M10 सिमेंट कॉक्रीट करणे या बाबीचे जादा केलेले परिमाण 11.55 घ.मी.X रु.3414.80 प्रती घ.मी प्रमाणे येणारी जादाची रक्कम रु.39441/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

2) नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार जेव्हा बांधकाम पूर्ण करण्यात येईल तेंव्हा नगरपरिषद अभियंता यांनी नमुना क्र.132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त/अहवाल (completion report ) सादर केला पाहिजे व जेव्हा कोणत्याही बाबीवर अंदाजापेक्षा अधिक रक्कम खर्च झाली असेल तेव्हा परिमाण दर व केलेल्या बांधकामावरचा खर्च व तसेच त्या संबंधातील अंदाज,यांची तुलना करुन, सर्व तफावतीबाबत कार्यकारी अभियंता यांनी स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. या कामामध्ये बाब क्र.2 ने M10 सिमेंट कॉक्रीट या बाबीवर अंदाजापेक्षा रु.39441/- खर्च झाला आहे. परंतु जादा झालेल्या खर्चाबाबत नमुना क्र.132 मध्ये कार्यकारी अभियंता यांनी परिपूर्ती अहवाल सादर केलेला नाही. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार परिपुर्ती अहवाल सादर केल्याशिवाय कोणत्याही कंत्राटदारास अंतिम रक्कम प्रदान करता येणार नसल्याचे नमुद असतानाही ठेकेदारास अंतिम प्रदान करण्यात आले आहे.

DRAFT

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यानुसार बांधकाम विभागाने प्राकलन तयार करताना त्यामध्ये 1 टक्का कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. परंतु देयकाची व प्रमाणकाची तपासणी केली असता त्यामधुन 1 टक्का उपकराची रक्कम कपात केली नसल्याने देयकाची रक्कम रु. 336308 च्या 1 टक्केप्रमाणे रु.3363/- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहेत.

**3) <u>वॉर्ड क्र.72 हायस्कुल रोड कोळी गल्ली रस्ते दुरुस्त करणे या कामामधील अनियमिततेबाबत :-</u>**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील वॉर्ड क्र.72 हायस्कुल रोड कोळी गल्ली रस्ते दुरुस्त करणे या कामासाठी आर्थिक वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पामध्ये द्विनोंद कोड 41933 वर या कामासाठी नावानिशी रु.398671/- ची तरतुद करण्यात आली असुन सदरचे रस्ते करण्याची सन्मानिय सदस्य यांनी मागणी केली असुन या कामाच्या ठिकाणची पाहणी कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी करुन 2012-13 च्या दरसूचीनुसार रक्कम रु.398671/- चे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शहर अभियंता यांची जावक क्र.384 दि.13/07/2012 ने तांत्रिक मान्यता घेतली आहे. सदरचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा, खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन करण्याबाबतची टिपणी बांधकाम विभागाने तयार करुन प्रशासनाकडे दि.13/07/2012 रोजी सादर केली असुन आयुक्त यांनी सदर काम निविदा मागवुन करण्यास दि.13/07/2012 रोजी मान्यता दिली आहे.

जाहिर प्रकटन क्र.9/12-13 मधील अ.क्र.305 ची निविदा दै.पुढारी या वर्तमानपत्रामध्ये दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द केली असुन दि.05/09/2012 पर्यंत ई निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदरच्या निविदा दि.09/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आल्या असुन त्यामध्ये श्री.बी.जी. कुंभार (1.1 टक्के कमीने ) , श्री. एस.एन.म्हेत्री (11 टक्के जादाने) व श्री.जी.व्ही. पाटील (18 टक्के जादाने ) अशा एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

मा.आयुक्त निर्णय क्र.651/2012-13 दि. 09/11/2012 ने मक्तेदार श्री.बी.जी. कुंभार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.1 टक्के कमीच्या निविदेस मंजुरी देण्यात आलेली आहे.

या कामाच्या निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांचे पत्र क्रमनपा/सा/बांधावि/956/2012-13 दि.20/11/2012 ने ठेकेदारास दिली आहे.

या कामाचा करारनामा ठेकेदाराने रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर केलेला असुन ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.4000/- पावती क्र.36518 ने दि.20/11/2012 रोजी भरल्याची नोंद करारपत्रामध्ये घेण्यात आली असुन उर्वरित रक्कम देयकामधुन घेण्याची आहे.

कामाची वर्क ऑर्डर बांधकाम विभागाने ठेकेदारास पत्र क्रमनपा/सा/बांधावि/902/2012-13 दि.03/01/2013 ने दिली असुन काम पुर्ण करण्याची मुदत 45 दिवस देण्यात आली आहे.

काम सुरु दि. 03/01/2013 काम पुर्ण दि.28/01/2013

मोजमाप पुस्तक क्र.26 , पृष्ठ क्र.15 ते 16.

या कामाचे रक्कम रु.382762 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि. 15/03/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आदा केली नसल्याने सदर प्रलंबित देयकाची पुन्हा आवक क्र.875, दि.09/05/2013 ने नोंद केली आहे. या देयकाची रक्कम रु. 382762 /- पैकी रक्कम रु.73189 /- चे प्रदान दि.13/05/2013 रोजी, रक्कम रु.90000 /- चे प्रदान दि.27/10/2013 रोजी व उर्वरित रक्कम रु.219572/- चे प्रदान प्रमाणक क्र.7036 ने दि.26/03/ 2014 रोजी केले आहे. सदर काम आर्थिक वर्ष 2012-13 च्या अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे केले असल्याने या कामाची रक्कम त्याच आर्थिक वर्षामध्ये खर्च करणे आवश्यक असता लेखा विभागाने या कामाची रक्कम 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये ठेकेदारास आदा केली आहे. सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता नियम 10.7.4 नुसार काम पुर्ण झालेनंतर कामाचे लेखे तात्काळ पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी या कामाचे देयक प्रदान करुन लेखे पुर्ण करण्यास सुमारे एक वर्षाचा दिनावधी लागला आहे. सदर देयक विलंबाने का खर्ची टाकण्यात आले याबाबतचा खुलासा केला नाही. तसेच एकाच देयकाचे प्रदान तीन टप्प्यामध्ये देयकाच्या XEROX प्रतीवर 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये विभागुन केले आहे.

**या कामाची नस्ती,अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.125 दि. 15/07/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.**

1) या कामाचे रक्कम रु.382762 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि. 15/03/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये आदा केली नसल्याने सदर प्रलंबित देयकाची पुन्हा आवक क्र.875, दि.09/05/2013 ने नोंद केली आहे. या देयकाची रक्कम रु. 382762 /- पैकी रक्कम रु.73189 /- चे प्रदान दि.13/05/2013 रोजी, रक्कम रु.90000 /- चे प्रदान दि.27/10/2013 रोजी व उर्वरित रक्कम रु.219572/- चे प्रदान प्रमाणक क्र.7036 ने दि.26/03/ 2014 रोजी केले आहे. सदर काम आर्थिक वर्ष 2012-13 च्या अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे त्याच वर्षामध्ये केले आहे. परंतु लेखा विभागाने या कामाची रक्कम ठेकेदारास 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये तीन टप्प्यामध्ये विभागुन दिली आहे. सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता नियम 10.7.4 नुसार काम पुर्ण झालेनंतर कामाचे लेखे तात्काळ पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी या कामाचे देयक प्रदान करुन लेखे पुर्ण करण्यास सुमारे एक वर्षाचा दिनावधी लागला आहे. सदर देयक विलंबाने का खर्ची टाकण्यात आले याबाबतचा खुलासा केला नाही. तसेच एकाच देयकाचे प्रदान तीन टप्प्यामध्ये देयकाच्या XEROX प्रतीवर 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये विभागुन केले आहे.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/

कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ्थकरण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यानुसार बांधकाम विभागाने प्राकलन तयार करताना त्यामध्ये 1 टक्का कामगार कल्याण उपकराचा समावेश केला आहे. परंतु देयकाची व प्रमाण काची तपासणी केली असता त्यामधुन 1 टक्का उपकराची रक्कम कपात केली नसल्याने देयकाची रक्कम रु. 382762 च्या 1 टक्केप्रमाणे रु.3827 /- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहेत.

**वसुलपात्र रक्कम :-** कामगार कल्याण उपकर रु.9833+ रु.4852 + रु.3363 + रु.3827 = रु.21605/-

**आक्षेपाधिन रक्कम :-** आयुक्त व कार्यकारी अभियंता यांची मान्यता न घेता करण्यात आलेल्या जादा कामाची रक्कम - विकास काम क्र.1 मधील बाब क्र.1 ची रक्कम रु.76996 + विकास काम क्र.2 मधील बाब क्र.2 ची रक्कम रु.26398 व विकास काम क्र.03 मधील बाब क्र.1 ची रक्कम रु.39441 = रु.142835/-

DRAFT

DATSBKM7201 (Ref No : 125)

## *97 कुपवाड प्रभाग समिती क्र.03 मध्ये करण्यात आलेल्या विविध विकास कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 173208.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 35862.00/-

***प्रभाग समिती क्र.03 मध्ये स्वनिधीमधुन करण्यात आलेल्या विविध विकास कामांच्या देयकामधुन रॉयल्टीची रक्कम रु.12377/- व कामगार कल्याण उपकर रु.23485 वसुल केलेला नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार बांधकाम विभागाने कंत्राटदारास आदा करावयाची देयके नमुना क्र.131 मध्ये तयार न करता नमुना क्र.122 ,वस्तुमालाचा पुरवठा करणे या नमुन्यामध्ये तयार केली आहेत. विकासकाम क्र.3 चे काम तातडीचे असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम1949 चे 5(2)(2) अन्वये विना निविदा करण्याचे आदेश महापौरांनी प्रशासनास दि.12/06/2012 च्या महासभेमध्ये दिले आहेत. परंतु बांधकाम विभागाने ठेकेदारास कामाचा कार्यादेश दि.06/11/2012 रोजी म्हणजेच सुमारे 5 महिने विलंबाने दिला आहे. या कामाची रितसर जाहिर निविदा न मागविल्याने ठेकेदारामध्ये स्पर्धा होवुन महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.***

**1) <u>कुपवाड वॉर्ड क्र.11, साईनगर स्वामी समर्थ मंदीर समोरील रस्ते मुरमीकरण करणे या कामामधील अनियमिततेबाबत :-</u>**

कुपवाड वॉर्ड क्र.11, साईनगर स्वामी समर्थ मंदीर समोरील रस्ते मुरमीकरण करणे या कामाची निविदा जाहिर प्रकटन क्र.09/12-13 मधील अं.क्र.40 ने दै.पुढारी दि.11/8/2012 चे वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली असुन दि.05/09/2012 अखेर ई निविदा मागविण्यात आल्या. सदरची निविदा दि.09/10/2012 रोजी निविदा समितीसमोर उघडण्यात आली. त्यामध्ये एकुण खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. 1)श्री.बी.जी.कुंभार अंदाजपत्रकीय दराने 2) श्री.एस.एन.म्हेत्री :- 4 टक्के जादा दराने, 3) श्री.आर.एस.कुंभार :- 15 टक्के जादा दराने.

सर्वात कमीचे निविदाधारक श्री.बी.जी.कुंभार यांची अंदाजपत्रकीय दराने कमीची निविदा मंजुर करण्यात आली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम 4253000 /-

DSR :- 2011-12

**प्रशासकीय मान्यता :-** मा.आयुक्त निर्णय क्र.161/2012-13 , दि.07/08/2012 ने जाहिर निविदा मागवुन काम करण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

**तांत्रिक मान्यता :-** शहर अभियंता यांचे कडील क्र.र.न.420 दि.13/07/2012.

आयुक्त निर्णय क्र.562/2012-13 दि.09/11/2012 ने ठेकेदाराकडुन अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या कामाची समज शहर अभियंता यांनी क्रमनपा /सा /बांधावि/522/2012-13 दि.20/11/2012

या कामाचे करारपत्र रु.100 च्या मुद्रांकशुल्क पेपरवर दि.30/11/2012 रोजी करण्यात आले आहे.

कामाचा कार्यादेश :- मनपा / सा/बांधवि/ 820 /12-13 दि.21/12/2012.

कामाची मुदत:- 60 दिवस.

काम सुरु. दि.21/12/2012. काम पुर्ण दि.17/02/2013.

मोजमाप पुस्तक क्र.15 पृष्ठ क्र.84 ते 85.

**प्रमाणक क्र.7037 दि.26/03/2014 रक्कम रु.243571/-**

**या कामाची नस्ती,अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.127 दि. 18/07/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.05/08/2016 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन तपासुन या कामामधील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.**

1) या कामाच्या प्रमाणक क्र.7037 ची तपासणी केली असता, या कामाचे देयक XEROX प्रतीमध्ये असुन या देयकामध्ये यापुर्वी ठेकेदारास दि.19/11/2013 ने रु.100000/-, दि.10/01/2014 ने रु.81192/- व प्र.क्र.7037 ने दि.26/03/2014 ने रु.243571/- आदा केलेच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. या कामाचे देयक बांधकाम विभागाने दि.25/03/2013 रोजी तयार करुन लेखा शाखेकडे पाठविले आहे. लेखा शाखेकडे या बिलाची नोंद, बिल नोंद क्र.10257 दि.30/03/2013 वर घेण्यात

आली आहे. परंतु लेखाशाखेने सदर देयकाची रक्कम नोव्हेंबर 2013 ते मार्च 2014 अखेर काम झालेनंतर एक वर्षाने ठेकेदारास विभागुन आदा केली आहे. सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता नियम 10.7.4 नुसार काम पुर्ण झालेनंतर कामाचे लेखे तात्काळ पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी या कामाचे देयक प्रदान करुन लेखे पुर्ण करण्यास सुमारे एक वर्षाचा दिनावधी लागला आहे. ठेकेदारास त्याने केलेल्या कामाची रक्कम एक वर्ष विलंबाने विभागुन देण्याचे प्रायोजन लेखा शाखेने अर्धसमास ज्ञापन क्र.127 ने मागणी करुनही स्पष्ट केलेले नाही.

**2)**या कामाचे प्राकलन व गोषवा-याची तपासणी केली असता बाब क्र.01, रस्ता खुदाई करणे या कामासाठी दरपृथ्थकरण करुन दर ठरविण्यात आला आहे. दरपृथ्थकरणाची तपासणी केली असता खुदाई केलेला माल 0.500 कि.मी अंतरावर टाकण्यासाठीचा दर (Lead Charges) रु. 39.51 प्रती घ.मी. (DSR 2011-12) प्रमाणे देण्यात आला आहे. या कामाचे मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता बाब क्र.1 ने एकुण 319.60 घ.मी. माल खुदाईमधुन काढुन 0.500 कि.मी वर टाकण्यात आल्याचे नमुद आहे. परंतु सदर मालाची वाहतुक केलेल्या गाडीचा क्रमांक, वहानाने मालाची ने आण करणेसाठी मारलेल्या फे-या, माल महानगरपालिकेच्या ताब्यात दिल्याची पोहोच या बाबींच्या नोंदी लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाही. 319.60 घ.मी.खुदाई केलेला माल वाहतुक करणेच्या कामासाठी रु. 39.51 प्रती घ.मी. प्रमाणे रु.15331/- ठेकेदारास आदा करण्यात आले आहेत. परंतु वाहतुकीबाबतच्या नोंदी लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नसल्याने सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**2) <u>वॉर्ड क्र.5 मधील उपाध्ये गल्ली ते बरगाले गल्ली,निकम हॉस्पिटल पर्यंतच्या रस्तेस 12 इंची हाफराऊंड गटर करणे या कामामधील अनियमिततेबाबत :-</u>**

महानगरपालिका हद्दीमधील कुपवाड प्रभागामधील वॉर्ड क्र.5 मधील उपाध्ये गल्ली व बरगाले गल्ली मधील महावीर व्यायामशाळा ते मुजावर घर व शिरोटे घर ते निकम हॉस्पिटल पर्यंतच्या रस्त्यावर तसेच परिसरातील कांही भागामध्ये पावसाचे व सांडपाणी साचून राहत असल्याने या ठिकाणी गटर करणेबाबत सन्मानिय सदस्य व नागरीकांनी मागणी केल्याने सदर ठिकाणची शाखा अभियंता व नगर अभियंता यांनी जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन या कामाचे रक्कम रु.671100/- चे अंदाजपत्रक तयार केले असुन त्यास शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 संविदा खंड (2)(1) नुसार रितसर जाहिर निविदा मागवुन करुन घेण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी मिळण्याची टिपणी शहर अभियंता यांनी आयुक्त यांचेकडे दि.13/07/2012 रोजी सादर केली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम 671100/-

DSR :- 2011-12

अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष :- 005) इतर योजना 0051)(3) इतर योजना (41943) वॉर्ड क्र.5 मधील विविध विकास कामे करणे.

प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त निर्णय क्र.142/2012-13 , दि.07/08/2012 ने जाहिर निविदामागवुन काम करण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.र.न.402, दि.13/07/2012.

या कामाची निविदा जाहिर प्रकटन क्र.9/12-13 मधील अ.क्र.20 ने दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन दि.05/09/2012 अखेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरची निविदा दि.18/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आली असुन त्यामध्ये 1)जयंत इंजिनिअरींग वर्क्स (अंदाजपत्रकीय दराने),2) श्री.ए.ए.भोकरे (8.88 टक्के जादा दराने), 3) श्री.एस.ए.रुपनर (9 टक्के जादा दराने) अशा एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. सर्वात कमीचे ठेकेदार जयंत इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्य करण्यात आली आहे.

आयुक्त निर्णय क्र.553/2012-13 दि.09/11/2012 ने ठेकेदार जयंत इंजिनिअरींग वर्क्स यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी पत्र क्रमनपा /सा /बांधावि/597/2012-13 दि.20/11/2012 रोजी ठेकेदारास दिली आहे.
या कामाचे ठेकेदाराबरोबर करारपत्र रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.20/12/2012 रोजी करण्यात आले आहे.
कामाचा कार्यादेश :-शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/ सा/बांधवि/ 204/2012-13 दि.03/01/2013.
कामाची मुदत:- 60 दिवस.
काम सुरु दि.03/01/2013. काम पुर्ण दि.28/02/2013.
मोजमाप पुस्तक क्र.02 पृष्ठ क्र.38 ते 40.
या कामाचे धावते देयक क्र.1 , रक्कम रु.493183/- पैकी रक्कम रु.279887/- चे प्रदान ठेकेदारास प्रमाणक क्र.7034 ,दि.26/03/2014 ने केले आहे.
**या कामाची नस्ती,अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.127 दि. 18/07/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.05/08/2016 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन तपासुन या कामामधील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.**

1) या कामाचे रक्कम रु.493183/- चे धावते देयक क्र.1 बांधकाम विभागाने दि. 29/03/2013 रोजी तयार करुन लेखा विभागाकडे दि.30/03/2013 रोजी सादर केले आहे. बांधकाम विभागाने या कामाचे धावते देयक महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 42(1), नमुना क्र.22 मध्ये तयार केले आहे. नमुना क्र.22 हा माल / वस्तु पुरवठयाच्या देयकासाठी वापरण्यासाठी दिलेला आहे. नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार बांधकाम विभागाने कंत्राटदाराने केलेल्या केलेल्या कामाची देयके नमुना क्र.131 प्रमाणे तयार करुन त्यात केलेल्या कामाचा संपूर्ण तपशील देणे आवश्यक आहे,जेणे करुन त्यातील बाबी ओळखुन ,अंदाजाबरोबर तुलना करुन , पडताळणी करणे सोयीचे होईल. परंतु बांधकाम विभागाने नमुना क्र.31 मध्ये देयक तयार केले नसल्याने या कामामध्ये शेवटच्या प्रमाणपत्रापासुन पुरे केलेले परिमाण (Quantity executed since last Certificate ), आजच्या दिनांकापर्यंत केलेले परिमाण (Quantity executed upto date), कामाच्या पुरवठ्याच्या बाबी, दर, आजच्या दिनांकापर्यंत दिलेली रक्कम, मागील देयकापासुन दिलेली रक्कम याबाबतचा तपशिल समजुन येत नाही.

2) या कामाचे रक्कम रु.493183/- चे धावते देयक क्र.1 बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि.30/03/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम रु. 493183/- पैकी रक्कम रु.120000/- चे प्रदान दि.27/10/2013 रोजी, रक्कम रु.93296/- चे प्रदान दि.17/01/2014 रोजी व उर्वरित रक्कम रु.279887/- चे प्रदान प्रमाणक क्र.7034 ने दि.26/03/2014 रोजी केले आहे. सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता नियम 10.7.4 नुसार काम पुर्ण झालेनंतर कामाचे लेखे तात्काळ पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी या कामाचे देयक प्रदान करुन लेखे पुर्ण करण्यास सुमारे एक वर्षाचा दिनावधी लागला आहे. एका देयकाची रक्कम टप्प्याटप्प्याने प्रदान करण्याचे प्रायोजन लेखाशाखेने स्पष्ट केलेले नाही.

3)या कामाचे देयक व मोजमाप पुस्तिका यांची तपासणी केली असता बाब क्र. 03 ने M10 Cement Concrete चे काम 21.38 घ.मी. केले आहे. तसेच बाब क्र.05 ने M15 Cement Concrete चे काम 63.91 घ.मी. केले आहे. या कामासाठी वाळु व खडी हे गौण खनिज 115.14 घ.मी.लागले आहे. तसेच बाब क्र.02 ने 60 घ.मी. मुरुम वापरण्यात आला आहे. या कामासाठी एकुण 175.14 घ.मी. गौण खनिज वापरण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार DSR तयार करताना बांधकामाच्या ज्या बाबीमध्ये गौण खनिजाचा समावेश आहे त्याबाबींचे दर ठरविताना त्यामध्ये रॉयल्टी रक्कमेचा समावेश केला असल्याने कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रॉयल्टी रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला गौण खनिजाच्या रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. त्या मुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 175.14 घ.मी. X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.12377 /- रॉयल्टी रक्कम वसुलपात्र आहे. बांधकाम विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये रॉयल्टीची रक्कम ठेकेदाराच्या सुरक्षा अनामत रक्कमेमधुन कपात करण्याचे नमुद केले आहे. परंतु रॉयल्टी रक्कम कपात केली नसल्याने रु.12377 /- वसुलपात्र आहेत.

4) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. या शासननिर्णयाप्रमाणे या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने रक्कम रु. 493183/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.4931/- ठेकादाराकडुन वसुलपात्र आहेत.

**3) <u>कुपवाड प्रभागातील विविध वॉर्डामध्ये मुरुम,खडी व डांबरी रस्ते करणे या कामामधील अनियमिततेबाबत.</u>**

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका प्रभाग समिती क्र.3 कुपवाड भागामधील विविध वॉर्डा मध्ये मुरुम,खडी व डांबरी रस्ते करणेबाबत सन्मानिय सदस्य व नागरीकांनी मागणी केल्याने सदर ठिकाणची शाखा अभियंता व नगर अभियंता यांनी जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन या कामाचे रक्कम



DRAFT

रु.998136 /- चे अंदाजपत्रक तयार केले असुन त्यास शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी दिली आहे. तसेच दि.12/06/2012 रोजी झालेल्या महासभेमध्ये महापौरसो यांनी पावसाळा सुरु असल्याने निविदा प्रक्रीया राबवुन कामगिरी करण्यास विलंब होणार असल्याने सदरची कामगिरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे 5(2)(2) अन्वये विना निविदा करण्याच्या सुचना प्रशासनास दिल्या आहेत. परंतु सदर कामगिरी विना निविदा करणे ऐवजी मजुर सहकारी सोसायटी कडुन करुन घेणेसाठी जिल्हा उपनिबंधक , मजुर सहकारी सोसायटी यांना काम वाटपाचे पत्र पाठविणेस आयुक्त यांनी दि.30/06/2012 रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक,मजुर सहकारी सोसायटी यांना मजुर सोसायटीस काम यवाटप करण्याचे पत्र शहर अभियंता यांनी दि.03/07/2012 रोजी दिले असुन जिल्हा उपनिबंधक यांनी त्यांचे पत्र जाक्र.फेड/ काम /सन/2012/327 दि.24/07/2012 अन्वये महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी 07-06 प्र.क्र.94/इमा-2/ मंत्रालय,मुंबई दि.16/11/2006 नुसार सदर कामाचे वाटप आदर्श मजुर सहकारी सोसायटी, वड्डी ता.मिरज यांना केले आहे.

सदरचे काम आदर्श मजुर सहकारी सोसायटीकडून करुन घेणेस स्थायी समिती सभा क्र.10, ठराव क्र.193 विषय क्र.07 दि.17/08/2012 ने मान्यता दिली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम 999600/-

DSR :- 2011-12

अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष :- B 2617) रस्ते दुरुस्ती खडी,मुरुम डांबरीकरण करणे.

तांत्रिक मान्यता :- दाखविण्यात आलेली नाही.

या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी पत्र क्रमनपा /सा /बांधावि/2151/2012-13 दि.28/08/2012 ने ठेकेदारास दिली आहे.

या कामाचे ठेकेदाराबरोबर करारपत्र रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.03/09/2012 रोजी करण्यात आले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/ सा/बांधवि/ 204/2012-13 दि.06/11/12 ने देण्यात आला आहे.

कामाची मुदत:- 130 दिवस.

काम सुरु दि.06/11/2012. काम पुर्ण दि.28/02/2013.

मोजमाप पुस्तक क्र.35 पृष्ठ क्र.03 ते 04.

प्रमाणक क्र.7011, दि.26/03/2014 ने या कामापोटी ठेकेदारास रक्कम रु.373601/-, दि.26/10/ 2013 रोजी प्रमाणक क्र.4014 ने रु.300000/-, दि.15/06/2013 रोजी प्रमाणक क्र.5027 ने रु.200000/- व दि.10/01/2014 रोजी प्रमाणक क्र. निरंक ने रु.124535/- ठेकेदारास आदा केले आहेत.

**या कामाची नस्ती,अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.127 दि. 18/07/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.05/08/2016 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन तपासुन या कामामधील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.**

1)या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता, पावसाळा असल्याने नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी सदरचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका

DRAFT

अधिनियम 1949 चे 5(2)(2) अन्वये विना निविदा करण्याच्या सुचना महापौरांनी दि.12/06/2012 रोजीच्या महासभेमध्ये दिल्याचे नमुद आहे. परंतु प्रत्यक्षात या कामाची वर्क ऑर्डर बांधकाम विभागाने ठेकेदारास दि.06/11/2012 रोजी म्हणजेच पावसाळा संपल्यानंतर सुमारे 05 महिने विलंबाने दिली असुन वर्क ऑर्डरमध्ये कामाची मुदत 130 दिवस देण्यात आली आहे. या वरुन हे काम तातडीचे करणे आवश्यक नसल्याचे स्पष्ट होते. या कामाची रितसर जाहिर निविदा काढुन दोन पेक्षा अधिक निविदा प्राप्त झाल्या नसल्याने ठेकेदारामध्ये स्पर्धा होवुन महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

2) या कामाचे देयक व मोजमाप पुस्तकाची अंदाजपत्रकाबरोबर तपासणी केली असता खालील बाबीवर अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | बाब क्र. व तपशील | अंदाजपत्रकीय परिमाण घ.मी. | मोज.नोंदवही नुसार परिमाण घ.मी. | तफावत परिमाण घमी | दर रक्कम रुपये | आदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1) हार्ड मुरुम पुरवठा करणे | 477 | 94.80 | 67.8 | 378.80 | 25682 |
| 2 | 3)60 मिमि खडी पुरविणे | 98 | 24.21 | 14.26 | 4238.50 | 62560 |
| 3 | 4)60 मिमि खडी पुरविणे | 81 | -------- | 81 | 2685.25 | -217505 |
| 4 | 5) सॉफ्ट मुरुम पुरविणे | 100 | 998.75 चौमी | 598.75 चौमी | 224.95 | 134688 |

सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद 265 नुसार जेव्हा चालू असलेल्या कामामध्ये महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे या कामामध्ये फेरफार करणे बाबतचे आदेश घेणे आवश्यक आहे. तसेच या कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु या कामामध्ये करण्यात आलेल्या अ.क्र.1,2 व 3 मधील बदलास तसेच अ.क्र.4 मधील वाढीव बाब करण्यास आयुक्त व कार्यकारी अभियंता यांची मंजुरी न घेताच काम करण्यात आलेले आहे.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश करणे आवश्यक आहे. या शासननिर्णयाप्रमाणे या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने रक्कम रु. 998136/- च्या 1 टक्केप्रमाणे रु.9981 /- ठेकादाराकडुन वसुलपात्र आहेत.

4) या कामाचे रक्कम रु.998136 /- चे देयक बांधकाम विभागाने दि. 30/03/2013 रोजी तयार करुन लेखा विभागाकडे दि.30/03/2013 रोजी सादर केले आहे. बांधकाम विभागाने या कामाचे धावते देयक

DRAFT

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 42(1), नमुना क्र.22 मध्ये तयार केले आहे. नमुना क्र.22 हा माल / वस्तु पुरवठयाच्या देयकासाठी वापरण्यासाठी दिलेला आहे.
नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार बांधकाम विभागाने कंत्राटदाराने केलेल्या केलेल्या कामाची देयके नमुना क्र.131 प्रमाणे तयार करुन त्यात केलेल्या कामाचा संपूर्ण तपशील देणे आवश्यक आहे, जेणे करुन त्यातील बाबी ओळखुन ,अंदाजाबरोबर तुलना करुन, पडताळणी करणे सोयीचे होईल. परंतु बांधकाम विभागाने नमुना क्र.131 मध्ये देयक तयार केले नसल्याने या कामामध्ये शेवटच्या प्रमाणपत्रापासुन पुरे केलेले परिमाण (Quantity executed since last Certificate ), आजच्या दिनांकापर्यंत केलेले परिमाण (Quantity executed upto date), कामाच्या पुरवठ्याच्या बाबी, दर, आजच्या दिनांकापर्यंत दिलेली रक्कम, मागील देयकापासुन दिलेली रक्कम याबाबतचा तपशिल समजुन येत नाही.
5) या कामाचे रक्कम रु.998136 /- चे बांधकाम विभागाने दि. 30/03/2013 रोजी तयार करुन लेखा विभागाकडे दि.30/03/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम रु. 998136/- पैकी प्रमाणक क्र.7011, दि.26/03/2014 ने ठेकेदारास रक्कम रु.373601/-, दि.26/10/ 2013 रोजी प्रमाणक क्र.4014 ने रु.300000/-, दि.15/06/2013 रोजी प्रमाणक क्र.5027 ने रु.200000/- व दि.10/01/2014 रोजी प्रमाणक क्र. निरंक ने रु.124535/- आदा केले आहेत. सदर सर्व रक्कमेचे प्रदान देयकाच्या XEROX प्रतीमध्ये 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने आदा केले आहे. सदरचे काम 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये कले आहे. परंतु देयकाचे प्रदान आर्थिक वर्ष 2013 -14 या पुढील वर्षामध्ये केले आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 296 (दोन)(जी) नुसार डिसेंबर किंवा जानेवारी या महिन्यामध्ये प्रदानासाठी देय होणा-या देयकांचे प्रदान 1 मार्चपुर्वी केले पाहिजे. मार्चमध्ये करण्यात आलेल्या कामांच्या बाबतीत विशेष कारणे आसल्याखेरीज मार्चमध्ये प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी या कामाचे देयक प्रदान करुन लेखे पुर्ण करण्यास सुमारे एक वर्षाचा दिनावधी लागला आहे. एकाच देयकाचे प्रदान विभागनी करुन वर्षभराच्या कालावधीमध्ये टप्प्या टप्प्याने आदा करण्याचे प्रायोजन लेखा विभागाने अर्धसमास ज्ञापन क्र.127 अन्वये विचारणा करुन ही दिलेले नाही.

**4) <u>वार्ड क्र.6 मधील बजरंगनगर मधील भाग्यश्री फॅब्रीकेशन समोरील तसेच श्रीनगर पाटील घरासमोरील रस्ते मुरुम खडी व बीबीएम करणे या कामामधील अनियमिततेबाबत</u>.**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीमधील कुपवाड प्रभागामधील वॉर्ड क्र.6 बजरंगनगरमधील पुट्टे घर व भाग्यश्री फॅब्रीकेशन समोरील तसेच श्रीनगर पाटील घरासमोरील रस्ते मुरुम खडी बी.बी.एम डांबरी करणे बाबत सन्मानीय सदस्य व नागरीकांची मागणी आहे. सदर ठिकाणचे रस्ते मुरुमाचे असुन पावसामुळे व रहदारीमुळे खराब झाले आहेत. सदर ठिकाणची शाखा अभियंता व नगरअभियंता यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन विषयांकीत कामाचे रु.1999000/- मात्रचे अंदाजपत्रक तयार केले असुन त्यास तांत्रिक मान्यता दिली आहे. सदरचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 संविंदा खंड (2)(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन करणेस व त्यास अनुसरुन येणा-या खर्चास मंजुरी मिळणेची मागणी शहर अभियंता यांनी टिपणीने आयुक्त यांचेकडे दि.13/07/2012 रोजी केली आहे व आयुक्त यांनी त्यास दि.08/07/2012 रोजी मान्यता दिला आहे.
अंदाजपत्रकीय रक्कम 1999000/-

DSR :- 2011-12
अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष :- 005) इतर योजना 0051)(3) इतर योजना (41641) बजरंगनगरमधील अंतर्गत रस्ते डांबरी करणे.
प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त निर्णय क्र.153/2012-13 , दि.07/08/2012 ने जाहिर निविदा मागवुन काम करण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.
तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.र.न.577, दि.13/07/2012.

या कामाची निविदा जाहिर निविदा सूचना क्र.9/12-13 मधील अ.क्र.20 ने दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन दि.05/09/2012 अखेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरची निविदा दि.09/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आली असुन एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये 1) श्री.एस.पी अंबी यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने प्राप्त झाली असुन अन्य निविदादार श्री. एस.एन.म्हेत्री व श्री. बी.जी.कुंभार यांच्या निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11 टक्के जादाने प्राप्त झाल्या आहेत. सर्वात कमी दराचे निविदाकार श्री.एस.पी अंबी यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्य करण्यात आली आहे.
आयुक्त निर्णय क्र.594/2012-13 दि.09/11/2012 ने सर्वात कमीचे निविदाधारक श्री.एस.पी अंबी यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी पत्र क्रमनपा /सा /बांधावि/206/2012-13 दि.20/11/2012 रोजी ठेकेदारास दिली आहे. ठेकेदाराने 1 टक्केप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम रु.91950 पैकी 20000/- सर्वसाधारण पावती क्र.29788 ने दि.03/12/2012 रोजी भरणा केली असुन उर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करणेची आहे.
या कामाचे ठेकेदाराबरोबर करारपत्र रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.03/12/2012 रोजी करण्यात आले आहे.
कामाचा कार्यादेश :-शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/ सा/बांधवि/ 817/2012-13 दि.21/12/2012.
कामाची मुदत:- 90 दिवस.
काम सुरु दि.21/12/2012. काम अपूर्ण आहे .
मोजमाप पुस्तक क्र.19 पृष्ठ क्र.24 ते 25.
या कामाचे धावते देयक क्र.1, रक्कम रु.861636 /- चे देयक बांधकाम विभागाने लेखा शाखेकडे दि.10/06/2013 रोजी दाखल केले आहे. लेखा विभागाने या पैकी रक्कम रु.150000 /- दि.27/10/2013 रोजी ,रक्कम रु.177909/- चे प्रदान दि.10/01/2014 रोजी व उर्वरित रक्कम रु.533727 /- चे प्रदान ठेकेदारास प्रमाणक क्र.7045 ने दि.26/03/2014 रोजी केले आहे.
**या कामाची नस्ती, अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.127 दि. 18/07/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.05/08/2016 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन तपासुन या कामामधील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.**
1) या कामाच्या प्रमाणक क्र.7037 ची तपासणी केली असता, या कामाचे देयक XEROX प्रतीमध्ये असुन या देयकामध्ये यापुर्वी ठेकेदारास दि.27/10/2013 ने रु.150000/-, दि.10/01/2014 ने रु.177909/- व प्र.क्र.7045 ने दि.26/03/2014 ने रु.533727 /- आदा केलेच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. या कामाचे धावते क्र.1, बांधकाम विभागाने दि.10/06/2013 रोजी तयार करुन लेखा शाखेकडे

पाठविले आहे. लेखा शाखेकडे या बिलाची नोंद, बिल नोंद क्र.1037 दि.10/06/2013 ने बील नोंद रजिस्टरवर घेण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 296 (दोन)(जी) नुसार डिसेंबर किंवा जानेवारी या महिन्यामध्ये प्रदानासाठी देय होणा-या देयकांचे प्रदान 1 मार्चपुर्वी करणे आवश्यक आहे. परंतु लेखाशाखेने सदर देयकाच्या रक्कमेचे प्रदान ठेकेदारास डिसेंबर 2013 ते मार्च 2014 अखेर विभागुन केले आहे. सदर देयकाची रक्कम विभागून देण्याचे प्रायोजन लेखाशाखेने अर्धसमास ज्ञापन क्र.127 ने मागणी करुनही स्पष्ट केलेले नाही.

2)या कामाचे प्राकलन व गोषवा-याची तपासणी केली असता बाब क्र. 01, रस्ता खुदाई करणे या कामासाठी दरपृथ्थकरण करुन दर ठरविण्यात आला आहे. दरपृथ्थकरणाची तपासणी केली असता खुदाई केलेला माल 0.500 कि.मी अंतरावर टाकण्यासाठीचा दर (Lead Charges) रु. 39.51 प्रती घ.मी. (DSR 2011-12) प्रमाणे देण्यात आला आहे. या कामाचे मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता बाब क्र.1 ने एकुण 586.93 घ.मी. माल खुदाईमधुन काढुन 0.500 कि.मी वर टाकण्यात आल्याचे नमुद आहे. परंतु सदर मालाची वाहतुक केलेल्या गाडीचा क्रमांक, वहानाने मालाची ने आण करणेसाठी मारलेल्या फे-या, माल महानगरपालिकेच्या ताब्यात दिल्याची पोहोच या बाबींच्या नोंदी लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाही.586.93 घ.मी.खुदाई केलेला माल वहातुक करणेच्या कामासाठी रु. 39.51 प्रती घ.मी. प्रमाणे रु.73571.67 /- ठेकेदारास आदा करण्यात आले आहेत. परंतु माल वाहतुकीबाबत वाहनाच्या तसेच माल महानगरपालिकेच्या ताब्यात दिले बाबतच्या नोंदी लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नसल्याने रक्कम रु.23189.6/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक आहे. या शासननिर्णयाप्रमाणे या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने या देयकाची रक्कम रु.857349 /- च्या 1 टक्केप्रमाणे रु.8573 /- ठेकादाराकडुन वसुलपात्र आहेत.

**वसुलपात्र रक्कम :-** रॉयल्टी रु.12377/- + कामगार कल्याण उपकर रु.4931+ रु.9981+ रु.8573 = रु.35862/-

**आक्षेपाधिन रक्कम :-** विकास काम क्र.1,बाब क्र.2 व विकास काम क्र.4, बाब क्र.2 खुदाई केलेल्या माल अन्य ठिकाणी वहातुक करुन टाकलेच्या नोंदी लेखापरीक्षणास दाखविल्या नसल्याने आक्षेपाधिन रक्कम रु.15331 + रु.23189.60 + विकास काम क्र.03, बाब क्र.1 आयुक्त व कार्यकारी अभियंता यांची मान्यता न घेता करण्यात आलेल्या जादा कामाची रक्कम रु.134688/- = रु.173208/-

DATSBKM7201 (Ref No : 127)

## *98 प्रभाग समिती क्रमांक 2 मध्ये करण्यात आलेल्या विकास कामामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 24**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 626324.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 217776.00/-

***प्रभाग समिती क्र.02 मध्ये स्वनिधीमधुन करण्यात आलेल्या विविध विकास कामांच्या देयकामधुन रॉयल्टीची रक्कम रु.142142/- व कामगार कल्याण उपकर रु.29871/- वसुल केलेला नाही. वॉर्ड क्र.58 मधील भालदार गल्ली येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे देयक पेव्हींग ब्लॉक्सचा गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच आदा केले आहे. वॉर्ड क्र.40 मधील स्फुर्ती चौक ते हसनी आश्रम पुर्व पश्चिम रस्त्याच्या साईडपट्ट्या दुरुस्त करणे या कामाचे धावते देयक महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार नमुना क्र.131 मध्ये तयार करणे ऐवजी नियम क्र. 42(1), नमुना क्र.22 माल / वस्तु पुरवठयाच्या देयकासाठी वापरणेत येणा-या नमुन्यामध्ये तयार केले आहे. वॉर्ड क्र. 68, रामकृष्ण परमहंस सोसायटीमधील अंतर्गत रस्ते बीबीएम, सिलकोट करणे या कामाची निविदा मंजुरीची समज दि.20/11/2012 रोजी दिली असुन ठेकेदाराने कामाचे करारपत्र सुरक्षा अनामत रक्कम भरुन सात दिवसाचे आत करण्याचे व सात दिवसाचे आत करारपत्र न केल्यास निविदा रद्द करण्यात येईल असे नमुद केले आहे. परंतु ठेकेदाराने सुरक्षा अनामत दि.29/11/2012 व दि.16/03/2013 रोजी भरणा केली असुन काम रद्द न करता करारपत्र दि. 22/03/2013 रोजी केल्याने काम पुर्ण होण्यास 4 महिन्याचा विलंब झाला आहे. सांगली वॉर्ड क्र.50 अजिंक्य मंडळ परिसरातील रस्ते डांबरी करणे या कामाच्या निविदेची जाहिरात दि.20/03/2012 च्या वर्तमानपत्रामध्ये देण्यात आली असुन निविदा दि.16/04/2012 पर्यंत मागविण्यात आल्या आहेत व सदरचे काम करण्यात आले आहे. नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे प्रकरण 13 परिशिष्ठ एक भाग अ सर्वसाधारण वित्तिय तत्वे (1) नुसार अर्थसंकल्पात वेगवेगळी उपशीर्षे आणि बाबी यामध्ये अनुदानाचे केलेले वाटप 31 मार्चपर्यंत परिणामकरित्या अंमलात राहत असुन त्यानंतर खर्च न केलेली अनुदानातील शिल्लक व्यपगत होत असल्याने व्यपगत झालेल्या अनुदानामधुन कामांची निविदा काढुन सदरचे काम करण्यात आले आहे.***

DRAFT

**1) वॉर्ड क्र.58 मधील भालदार गल्ली येथे पेव्हींग ब्लॉक बसवणे या कामामधील अनियमिततेबाबत.**

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.58 मधील भालदार गल्ली मिरजकर घरा शेजारील बोळात पेव्हींग ब्लॉक बसवुन सुधारणा करणे या कामाची अर्थसंकल्पामध्ये नावानिशी तरतुद करण्यात आली असुन सदर कामगिरी करणे बाबत सन्मानिय सदस्यांनी मागणी केली आहे. त्यानुसार बांधकाम विभागाकडून या ठिकाणाची पाहणी केली असता सदर बोळ रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याचे दिसुन आल्याने या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे कामाचे सन 2011-12 च्या दरसूचीप्रमाणे अंदाजपत्रक तयार करून त्यास तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. सदरची कामगिरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन

करण्याची टिपणी कार्यकारी अभियंता यांनी आयुक्तांकडे दि.13/07/2012 रोजी सादर केली आहे.
अंदाजपत्रकीय रक्कम रु.347893 /-
DSR :- 2011-12
अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष :- 2012-13 अर्थसंकल्पामधील 005) इतर योजना ,(41875) वॉर्ड क्र.58 भालदार गल्ली येथे पेव्हींग ब्लॉक बसवणे
प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त निर्णय क्र.298/2012-13 , दि.08/08/2012 ने जाहिर निविदा मागवुन काम करण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.
तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.र.न.605, दि.13/07/2012.

या कामाची निविदा जाहिर निविदा सूचना क्र.9/12-13 ही दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन दि.05/09/2012 अखेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरची निविदा दि.10/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आली असुन एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये 1) श्री. आनंदा ई म्हारगुडे यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.05 टक्के कमीने प्राप्त झाली असुन अन्य निविदादार श्री. एच.व्ही.पडुळकर व श्री. एस.ए.रूपनर यांच्या निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा अनुक्रमे 10 व 11 टक्के जादाने प्राप्त झाल्या आहेत.
आयुक्त निर्णय क्र.530/2012-13 दि.09/11/2012 ने सर्वात कमीचे निविदाधारक श्री. आनंदा ई म्हारगुडे यांचे कडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.05 टक्के कमीने काम करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी पत्र क्रमनपा /सा /बांधावि/603/2012-13 दि.22/11/2012 रोजी ठेकेदारास दिली आहे. ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.17400 पैकी 1 टक्केप्रमाणे रक्कम रु. 1740/- सर्वसाधारण पावती क्र.29719 ने दि.06/12/2012 रोजी भरणा केली असुन उर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करणेची आहे.
या कामाचे ठेकेदाराबरोबर करारपत्र रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.21/12/2012 रोजी करण्यात आले आहे.
कामाचा कार्यादेश :-शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/ सा/बांधवि/ 827/2012-13 दि.21/12/2012.
कामाची मुदत:- 45 दिवस.
काम सुरु दि.21/12/2012. काम पूर्ण दि.08/02/2013 .
मोजमाप पुस्तक क्र.06 पृष्ठ क्र. 17.
या कामाचे रक्कम रु.345572 /- चे देयक बांधकाम विभागाने लेखा शाखेकडे दि.30/03/2013 रोजी दाखल केले आहे. लेखा विभागाने या पैकी रक्कम रु.140000 /- दि.27/10/2013 रोजी ,रक्कम रु.51393 /- चे प्रदान दि.17/01/2014 रोजी व उर्वरित रक्कम रु.154179 /- चे प्रदान ठेकेदारास प्रमाणक क्र.6986 ने दि.26/03/2014 रोजी केले आहे.

**या कामाची नस्ती, अंदाजपत्रक, देयक, प्रमाणक व मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.131 दि. 08/08/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.**

1) या कामाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.2 पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे क्षेत्र 548 चौ.मी. अंदाजित केले होते. परंतु मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी केली असता 473.33 चौ.मी.क्षेत्रावर (दर 614.30 प्रती चौ.मी.) पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले आहेत. सदर काम प्राकलनामध्ये नमुद केलेल्या परिमाणापेक्षा 74.67 चौ.मी.ने कमी केले आहे. तसेच बाब क्र.03) M-20 सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाचे अंदाजपत्रकामध्ये नमुद परिमाण 0.950 घ.मी. असुन त्याचा दर रु.4579.25 प्रती घ.मी.इतका आहे. परंतु प्रत्यक्षात 10.86 घ.मी परिमाणाचे काम करण्यात आले आहे. कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. परंतु नस्तीची तपासणी केली असता विभागप्रमुख व आयुक्तांची लेखी पुर्वमंजुरी न घेताच काम केलेले आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद 265 नुसार जेव्हा महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची



DRAFT

आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मूळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे आदेश घेणे आवश्यक असतानाही कार्यकारी अभियंता व आयुक्त यांचे लेखी आदेश न घेताच जादाचे काम करण्यात आले असल्याने जादा परिमाणाची 9.91 घ.मी.X रु.4579.25 प्रती घ.मी. प्रमाणे येणारी रक्कम रु.45380/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 176 नुसार जेव्हा बांधकाम पूर्ण करण्यात येईल तेंव्हा नगरपरिषद अभियंता यांनी नमुना क्र.132 प्रमाणे बांधकाम पूर्ण झालेचे प्रतिवृत्त /अहवाल (completion report ) सादर केला पाहिजे व जेव्हा कोणत्याही बाबीवर अंदाजापेक्षा अधिक खर्च झाल्यास दिलेल्या नमुन्यामध्ये अंदाजानुसार परीमाण, दर व केलेल्या बांधकामावरचा खर्च व प्रत्यक्ष काम केल्यानुसार परिमाण, दर व रक्कम लिहून फरकाचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. परंतु कार्यकारी अभियंता यांनी देयकासोबत या कामाचा प्रतिवृत्त अहवाल देयकासोबत सादर केलेला नसल्याने जादा करण्यात आलेल्या कामाची कारणे लेखापरीक्षणास समजुन आलेली नाहीत.

3)बाब क्र.2 पेव्हिंग ब्लॉक बसविणे या कामामध्ये Providing & Fixing Heavy Duty Interlocking concrete gray paving blocks of 80mm thickness 0f having a strength of 300 kg per sq.cm of approved quality & shape on a bed of crushed sand of 25 mm to 30 including striking joints & cleaning या विनिर्देशाचे पेव्हिंग ब्लॉकचा समावेश आहे. या विनिर्देशानुसार पेव्हिंग ब्लॉक योग्य दर्जाचे असलेबाबतचा प्रयोगशाळेचा गुणवत्ता नियंत्रण अहवाल देयकासोबत जोडला नसल्याने पेव्हिंग ब्लॉक योग्य दर्जाचे असलेबाबत लेखापरीक्षणाची खात्री झालेली नाही. प्रयोगशाळेचा गुणवत्ता नियंत्रण चाचणी अहवाल न घेताच देयक आदा केलेने 473.33 चौ.मी.X रु.614.03 प्रती चौ.मी.प्रमाणे या कामाची रक्कम रु.290638/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

**2) <u>वॉर्ड क्र.40 मधील स्फुर्ती चौक ते हसनी आश्रम पुर्व पश्चिम रस्त्याच्या साईडपट्टया दुरुस्त करणे या कामामधील अनियमिततेबाबत.</u>**

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.40 मधील स्फुर्ती चौक ते हसनी आश्रम पुर्व पश्चिम रस्त्याच्या साईडपट्टया दुरुस्त करणे या कामाची अर्थसंकल्पामध्ये नावानिशी तरतुद करण्यात आली असुन सदर कामगिरी करणे बाबत सन्मानिय सदस्यांनी मागणी केली आहे. त्यानुसार बांधकाम विभागाकडून या ठिकाणाची पाहणी केली असता सदर बोळ रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याचे दिसुन आल्याने या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे कामाचे सन 2011-12 च्या दरसूचीप्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. सदरची कामगिरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन करण्याची टिपणी कार्यकारी अभियंता यांनी आयुक्तांकडे दि.13/07/2012 रोजी सादर केली आहे.

**अंदाजपत्रकीय रक्कम रु.1991530 /-**

DSR :- 2011-12

अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष :- 2012-13 अर्थसंकल्पामधील 005) इतर योजना ,(41815) वॉर्ड क्र.40 मधील स्फुर्ती चौक ते हसनी आश्रम पुर्व पश्चिम रस्याहच्या साईडपट्टया दुरुस्त करणे

**प्रशासकीय मान्यता :-** मा.आयुक्त निर्णय क्र.261/2012-13 , दि.08/08/2012 ने जाहिर निविदा मागवुन काम करण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

**तांत्रिक मान्यता :-** शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.र.न.606, दि.13/07/2012.

या कामाची निविदा जाहिर निविदा सूचना क्र.9/12-13 ही दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन दि.05/09/2012 अखेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरची निविदा दि.10/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आली असुन एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये 1) श्री.सागर रमेश मोहनानी यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9 टक्के कमीने प्राप्त झाली आहे.

आयुक्त निर्णय क्र.623/2012-13 दि.09/11/2012 ने सर्वात कमीचे निविदाधारक श्री.सागर रमेश मोहनानी यांचे कडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9 टक्के कमीने काम करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी पत्र क्रमनपा /सा /बांधावि/613/2012-13 दि.19/11/2012 रोजी ठेकेदारास दिली आहे. ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.199150 पैकी 1 टक्केप्रमाणे 19915/- रोखीने भरणा केली असुन उर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करणेची आहे.
या कामाचे ठेकेदाराबरोबर करारपत्र रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.17/12/2012 रोजी करण्यात आले आहे.
कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/ सा/बांधवि/ 817/2012-13 दि.17/12/2012.
कामाची मुदत:- 60दिवस.
काम सुरु दि.17/12/2012. काम पूर्ण दि.02/03/2013 .
मोजमाप पुस्तक क्र.22 पृष्ठ क्र.7 ते 9.

**या कामाची नस्ती, अंदाजपत्रक, देयक, प्रमाणक व मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.131 दि. 08/08/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.**

1) या कामाचे रक्कम रु.1356124 चे धावते देयक क्र.1 बांधकाम विभागाने दि. 24/03/2013 रोजी तयार करुन लेखा विभागाकडे दि.26/03/2013 रोजी सादर केले आहे. बांधकाम विभागाने या कामाचे धावते देयक महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 42(1), नमुना क्र.22 मध्ये तयार केले आहे. नमुना क्र.22 हा माल / वस्तु पुरवठयाच्या देयकासाठी वापरणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 174 नुसार बांधकाम विभागाने कंत्राटदाराने केलेल्या कामाची देयके नमुना क्र.131 प्रमाणे तयार करुन त्यात केलेल्या कामाचा संपूर्ण तपशील देणे आवश्यक आहे, जेणे करुन त्यातील बाबी ओळखुन ,अंदाजाबरोबर तुलना करुन, पडताळणी करणे सोयीचे होईल. परंतु बांधकाम विभागाने नमुना क्र.131 मध्ये देयक तयार केले नसल्याने या कामाचे अंदाजित परिमाण, कामामध्ये शेवटच्या प्रमाणपत्रापासुन पुरे केलेले परिमाण (Quantity executed since last Certificate ), आजच्या दिनांकापर्यंत केलेले परिमाण (Quantity executed upto date), कामाच्या पुरवठ्याच्या बाबी, दर, आजच्या दिनांकापर्यंत दिलेली रक्कम, मागील देयकापासुन दिलेली रक्कम याबाबतचा तपशिल समजुन येत नाही.

2) या कामाचे रक्कम रु.1356124 /- चे धावते देयक क्र.1 बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि.26/03/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम रु. 1356124/- पैकी रक्कम रु.360000/- चे प्रदान दि.27/10/2013 रोजी, रक्कम रु.249032 /- चे प्रदान दि.10/01/2014 रोजी व उर्वरित रक्कम रु.747092 /- चे प्रदान दि.26/03/2014 रोजी केले आहे. तसेच सदर रक्कमांचे प्रदान देयकाच्या XEROX प्रतीवर केले आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिच्छेद 296 (दोन)(जी) नुसार डिसेंबर किंवा जानेवारी या महिन्यामध्ये प्रदानासाठी देय होणा-या देयकांचे प्रदान 1 मार्चपुर्वी केले पाहिजे. मार्चमध्ये करण्यात आलेल्या कामांच्या बाबतीत विशेष कारणे आसल्याखेरीज मार्चमध्ये प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी या कामाचे देयक प्रदान करुन लेखे पुर्ण करण्यास सुमारे एक वर्षाचा दिनावधी लागला आहे. एकाच देयकाचे प्रदान विभागनी करुन का देण्यात आले आहे याचा खुलासा लेखा विभागाने अर्धसमास ज्ञापन क्र.131 अन्वये मागणी करुनही केलेला नाही.

3)या कामामध्ये बाब क्र.1 ने 1477.50 घ.मी. खुदाई करणेचे काम रु.117.10 प्रती घ.मी.या दराने केले आहे. रस्ता खुदाई करणे या कामासाठी दरपृथ्थकरण करुन दर ठरविण्यात आला आहे. दरपृथ्थकरणाची तपासणी केली असता खुदाई केलेला माल 0.500 कि.मी अंतरावर टाकण्यासाठीचा दर (Lead Charges) रु. 39.51 प्रती घ.मी. (DSR 2011-12) प्रमाणे देण्यात आला आहे. या कामाचे मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता बाब क्र.1 ने एकुण 1477 घ.मी. माल खुदाईमधुन काढुन 0.500 कि.मी वर टाकण्यात आल्याचे नमुद आहे. परंतु सदर मालाची वाहतुक केलेल्या गाडीचा क्रमांक, वहानाने मालाची ने आण करणेसाठी मारलेल्या फे-या, माल मनपाच्या मालकीच्या कोणत्या ठिकाणी उतरविण्यात आला ते ठिकाण, माल महानगरपालिकेच्या ताब्यात

DRAFT

दिल्याची पोहोच या बाबींच्या नोंदी लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेल्या नाहीत. 586.93 घ.मी.खुदाई केलेला माल वाहतुक करणेच्या कामासाठी रु. 39.51 प्रती घ.मी. प्रमाणे रु.1477.50 /- ठेकेदारास आदा करण्यात आले आहेत. परंतु माल वाहतुकीबाबत वाहनाच्या तसेच माल महानगरपालिकेच्या ताब्यात दिले बाबतच्या नोंदी लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नसल्याने रक्कम रु.58376/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) या कामाच्या मोजमाप पुस्तक क्र.22, पृष्ठ क्र.07 वर बाब क्र. 2 ने 542.31 घ.मी हार्ड मुरुम , बाब क्र.03 ने 40 मि.मि. खडी 392.91 घ.मी. व बाब क्र. 04 ने 126 घ.मी. सॉफ्ट मुरुम पुरवठा केल्याच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. तसेच बाब क्र.07 ने 75 मि.मी BBM Surface करणे हे काम 2990.42 चौ.मी. केले आहे. या कामासाठी 10.8 घ.मी खडीचा वापर प्रती 100 चौ.मी.क्षेत्रासाठी(Specification No.Rd-41 नुसार) करणे आवश्यक आहे. त्यामुळे 75 मि.मी BBM च्या कामासाठी 323 घ.मी. गौण खनिज वापरण्यात आले आहे. या कामासाठी एकुण 1384 घ.मी.गौण खनिज वापरण्यात आलेले आहे .महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार DSR तयार करताना बांधकामाच्या ज्या बाबीमध्ये गौण खनिजाचा समावेश आहे त्याबाबींचे दर ठरविताना त्यामध्ये रॉयल्टी रक्कमेचा समावेश केला असल्याने कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रॉयल्टी रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला गौण खनिजाच्या रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 1384 घ.मी. X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.97822 /- रॉयल्टी रक्कम ठेकेदाराकडून वसूलपात्र आहे.

4) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक आहे. या शासननिर्णयाप्रमाणे या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने या देयकाची रक्कम रु.1356125 /- च्या 1 टक्केप्रमाणे रु.13561/- ठेकादाराकडुन वसुलपात्र आहेत.

**3) <u>सांगली वॉर्ड क्र.50 अजिंक्य मंडळ परिसरातील रस्ते डांबरी करणे या कामामधील अनियमितते बाबत :-</u>**

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.50 अजिंक्य मंडळ परिसरातील रस्ते वाहतुकीचे असुन सदर रस्ते खराब झालेने तात्काळ करुन घेणे बाबत सन्मानिय सदस्य व नागरीकांनी मागणी केली आहे. त्यानुसार बांधकाम विभागाचे शाखा अभियंता व नगर अभियंता यांनी या ठिकाणाची पाहणी केली असुन या कामाचे 2010-11 च्या दरसूचीप्रमाणे रक्कम रु.399453/- चे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. सदरची कामगिरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन करण्याची टिपणी कार्यकारी अभियंता यांनी आयुक्तांकडे दि.15/06/2011 रोजी सादर केली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु. रु.399453/-

DSR :- 2010-11

अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष :- 2011-12 अर्थसंकल्पामधील 005) इतर योजना ,द्विनोंद पध्दत क (41330)

प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त निर्णय क्र.430 /2011-12 , दि.19/03/2012 ने जाहिर निविदा मागवुन काम करण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.र.न.102, दि.15/06/2011.

या कामासहित एकुण 21 कामाची जाहिर निविदा सूचना क्र.11/2011-12 ही दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.20/03/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन दि.14/04/2012 अखेर ई निविदा मागविण्यात आल्या

DRAFT

होत्या. सदरची निविदा दि.15/05/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आली असुन एकुण चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. 1) श्री.शिवपार्वती कन्सट्रक्शन (7.25 टक्के जादा), 2) श्री.आर.एन.पाटील(25 टक्के जादा),3)श्री.हारुगडे कन्सट्रक्शन (25 टक्के जादा),4) वीर कन्सट्रक्शन (25.77 टक्के जादा ).

श्री.शिवपार्वती कन्सट्रक्शन (7.25 टक्के जादा) यांची सर्वात कमीची निविदा मान्य करण्यात आली आहे.

या कामाच्या नस्तीमधील दि.24/08/2012 च्या कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयीन टिपणीचे आवलोकन केले असता, या जाहिरात प्रकटनामधील कामांच्या निविदा उघडण्यात आल्यानंतर ब-याच कामांच्या निविदेचे दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 24 ते 26 टक्के जादाने प्राप्त झाल्याने या बाबत मक्तेदार यांचे बरोबर वाटाघाटीने दर कमी करण्यासाठी दि.22/08/2012 रोजी बैठक बोलाविण्यात आली. त्यावेळेस दि.20/04/2012 रोजी जाहिर निविदेमधील अन्य कामांच्या उघडण्यात आलेल्या निविदा दराबाबत चर्चा करण्यात आली. त्यावेळीस संबंधित मक्तेदार यांनी अंदाजपत्रकामधील पातळ डांबराच्या दरामध्ये वाढ झाल्याने निविदा जादा दराने भरण्यात आल्याचे सांगण्यात आले. सदर चर्चेअंती दि.16/04/2012 रोजीच्या मे.भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांनी वेबसाईटवर जाहिर केलेल्या दराप्रमाणे कामगिरी करण्यास मक्तेदार यांनी सहमती दर्शविली. त्यानुसार पातळ डांबराचे किमतीशी मुळ अंदाजपत्रकाची तुलना करुन आलेल्या दरांना स्थायी समितीची मान्यता घेणेबाबतची टिपणी सादर करण्यात आली.त्यास आयुक्त यांनी दि.09/07/2012 रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार याबाबतचे विषयपत्र उपायुक्त यांनी नगरसचिव विभागाकडे दि.08/11/2012 रोजी पाठविले असून महासभा क्र.08 ,ठराव क्र.142,विषय क्र.ऐन, दि.09/11/2012 ने मान्यता देण्यात आली आहे.

या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी पत्र क्रमनपा /सा /बांधावि/690/2012-13 दि.19/12/2012 रोजी ठेकेदारास दिली आहे. ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.19972 पैकी रु.4000/- पावती क्र.38660 ने दि.08/01/2013 रोजी भरणा केले असुनउर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करणेची आहे.

या कामाचे ठेकेदाराबरोबर करारपत्र रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.15/01/2013 रोजी करण्यात आले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/ सा/बांधवि/ 1029/2012-13 दि.18/01/2013.

कामाची मुदत:- 45 दिवस.

काम सुरु दि.18/01/2013. काम पूर्ण दि.11/02/2013 .

मोजमाप पुस्तक क्र.10 पृष्ठ क्र.28.

**या कामाची नस्ती, अंदाजपत्रक, देयक, प्रमाणक व मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.131 दि. 08/08/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.**

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 171 (6) नुसार निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत त्या निकाली काढण्यात आल्या पाहिजेत आणि कोणत्याही बाबतीत हा कालावधी एक महीन्यापेक्षा जास्त होता कामा नये असे नमुद असतानाही सदरचे कामाची निविदा दि.15/05/2012 रोजी उघडण्यात आल्यानंतर प्रत्यक्ष कामाचा कार्यादेश दि.18/01/2013 रोजी जवळपास 7 महिने विलंबाने दिला आहे.

2) या कामाच्या निविदेची जाहिरात दि.20/03/2012 च्या वर्तमानपत्रामध्ये देण्यात आली असुन निविदा दि.16/04/2012 पर्यंत मागविण्यात आल्या आहेत. निविदा आर्थिक वर्ष 2011-12 च्या शेवटी मागविण्यात आल्या असुन निविदेमधील काम 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये करण्यात आले आहे. नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे प्रकरण 13 परिशिष्ठ एक भाग अ सर्वसाधारण वित्तिय तत्वे (1) नुसार अर्थसंकल्पात वेगवेगळी उपशीर्षे आणि बाबी यामध्ये अनुदानाचे केलेले वाटप हे संबंधित अनुदान कोणत्या उद्दिष्टाकरीता दिले आहे ह्याचे निदर्शक आहे. मागील दायित्वासह सर्व खर्चाचा अनुदानामध्ये अंतर्भाव असल्याने ते 31 मार्चपर्यंत परिणामकरित्या अंमलात राहतील व त्यानंतर खर्च न केलेली अनुदानातील शिल्लक व्यपगत होईल असे नमुद केले आहे. तसेच प्रत्येक विभागप्रमुखाची, आपल्या विभागासाठी मंजुर केलेले अनुदान अथवा अनुदाने यांच्या मर्यादेपर्यंतच खर्च केला जाईल हे पहाण्याची मुख्यत: जबाबदारी राहील असेही नमुद केले आहे. परंतु बांधकाम विभागाने विविध विकास कामाची निविदा दि.20/03/2012 रोजी आर्थिक वर्ष संपण्यास वीस दिवसाचा कालावधी

DRAFT

राहिला असताना काढली असुन निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख दि.16/04/2012 म्हणजेच पुढील आर्थिक वर्ष 2012-13 मधील देण्यात आली आहे. उपरोक्त नियमानुसार दि. 31 मार्च 2012 रोजी अनुदानामधील खर्च न केलेली शिल्लक व्यपगत होत असल्याने व्यपगत होणा-या अनुदानामधुन कोणत्या नियमाने टेंडर काढण्यात आले आहे याबाबतचा खुलासा बांधकाम विभागाने केलेला नाही.

3) या कामासाठी एकुण 4 निविदाधारकांनी निविदा भरल्या आहेत. सदर निविदाधारकांच्या निविदा कागदपत्रांची छाननी केली असता, 20 कि.मी.अंतरामध्ये हॉटमिक्स डांबरीकरणाचा प्लांट असल्याबाबतचा दाखला नगर अभियंता यांनी एकुण तीन निविदाधारकांना दिल्याचे दिसून येते. परंतु कामाचे मंजुर ठेकेदार मे.शिवपार्वती कन्सट्रक्शन यांचे कागदपत्रामध्ये 20 कि.मी.अंतरामध्ये हॉटमिक्स डांबरीकरणाचा प्लांट असलेचा दाखला दिसून आलेला नाही. ठेकेदार तांत्रिकदृष्टया काम करण्यास अपात्र असताना त्याची निविदा मंजुर करुन त्यास काम देण्यात आले आहे.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.8.1.2007 नुसार दिलेले काम विहीत केलेल्या विनिर्दिष्टानुसार होण्यासाठी बांधकाम साहित्य म्हणजे डांबर, खडी इ.ची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी होणे आवश्यक आहे. परंतु या कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून गुणवत्ता चाचणी तपासणी केलेचा चाचणी अहवाल देयकासोबत जोडण्यात आलेला नसल्याने या कामामध्ये वापरण्यात आलेले साहित्य योग्य असलेची लेखापरीक्षणास खात्री करता आलेली नाही.

5) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक आहे. या शासननिर्णयाप्रमाणे या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने या देयकाची रक्कम रु.1356125 /- च्या 1 टक्केप्रमाणे रु.13561/- ठेकादाराकडुन वसुलपात्र आहेत.

6) या कामाचे देयक बांधकाम विभागाने लेखाशाखेस सन 2011-12 मध्ये लेखाशिर्ष व तरतुद असलेल्या परंतु सन 2012-13 वर्षात लेखाशिर्ष नसलेली तसेच तरतुद शुन्य असलेली आदा करावयाची देयके या लेखाशिर्षांतर्गत दि.16/02/2013 रोजी सादर केले आहे. परंतु सदर देयक 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खर्च टाकण्यात आलेले नाही. या देयकाची रक्कम रु.427805/- पैकी रक्कम रु.106950/- चे प्रदान दि.10/01/2014 रोजी व उर्वरित रक्कम रु.320855/- चे प्रदान प्रमाणक क्र.6984 ने दि.26/03/2014 रोजी करण्यात आले आहे. सदर काम दि.11/02/2013 रोजी पुर्ण झाले असुन कामाचे देयक 16/02/2013 रोजी लेखा शाखेकडे पाठविले आहे. परंतु या देयकाची रक्कम 2012-13 च्या अर्थसंकल्पामधून का आदा करण्यात आलेली नाही तसेच आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये सदर रक्कम कोणत्या लेखाशिर्षामधून खर्च करण्यात आली आहे याचा खुलासा लेखा शाखेने अर्धसमास ज्ञापन क्र.131 अन्वये मागणी करुनही केलेला नाही.

**4) <u>वॉर्ड क्र. 68, रामकृष्ण परमहंस सोसायटीमधील अंतर्गत रस्ते बीबीएम, सिलकोट करणे या कामामधील अनियमिततेबाबत.</u>**

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.02 चे वॉर्ड क्र.68, रामकृष्ण परमहंस सोसायटीमधील अंतर्गत रस्ते बीबीएम, सिलकोट करणेसाठी आर्थिक वर्ष 2012-13 च्या अंदाजपत्रकामध्ये नावानिशी तरतुद करण्यात आली असुन सदर कामगिरी करणेबाबत सन्मानिय सदस्य व नागरीकांनी मागणी केली आहे. त्यानुसार बांधकाम विभागाचे शाखा अभियंता व नगर अभियंता यांनी या ठिकाणाची पाहणी करुन 2010-11 च्या दरसूचीप्रमाणे रक्कम रु.1199000/- चे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. सदरची कामगिरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन करण्याची टिपणी कार्यकारी अभियंता यांनी आयुक्तांकडे दि.13/07/2012 रोजी सादर केली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1199000/-

DRAFT

DSR :- 2011-12
अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष :- 2012-13 चे मंजुर अर्थसंकल्पामधील 005) इतर योजना ,द्विनोंद पध्दत क्र. (41916) वॉर्ड क्र.68, रामकृष्ण परमहंस सोसायटीमधील अंतर्गत रस्ते बी.बी.एम करणे या लेखाशिर्षामधुन करणेचा आहे.

**प्रशासकीय मान्यता :-** मा.आयुक्त निर्णय क्र.343 /2012-13 , दि.08/08/2012 ने जाहिर निविदा मागवुन काम करण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

**तांत्रिक मान्यता :-** शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.र.न.317, दि.13/07/2012.

या कामाची जाहिर निविदा सूचना क्र.09/2012-13 ही दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन दि.05/09/2012 अखेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरची निविदा दि.09/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आली असुन खालील प्रमाणे एकुण चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. 1) मे. व्ही.ए.पाटील (5 टक्के कमी), 2) गायत्री कन्सट्रक्शन (0.3 टक्के कमी),3)मे.पॅटसन फॅब्रिकेटर्स (2 टक्के जादा),4) मे.पी.आर. कन्सट्रक्शन (3 टक्के जादा ).
मे. व्ही.ए.पाटील (5 टक्के कमी) यांची निविदा दरापेक्षा सर्वात कमीची निविदा मान्य करण्यात आली आहे.
निविदेस मंजुरी :- आयुक्त निर्णय क्र.623/2012-13 दि. 09/11/2012 ने मक्तेदार श्री.व्ही.ए.पाटील यांची 5 टक्के कमी दराच्या निविदेस आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.
या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी पत्र क्रमनपा /सा /बांधावि/541/2012-13 दि.20/11/2012 रोजी ठेकेदारास दिली आहे. ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.59950 पैकी रु.12990/- पावती क्र.29792 ने दि.29/11/2012 रोजी व रु.18000/- पावती क्र.45190 ने दि.16/03/2013 रोजी भरणा केले असुन उर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करणेची आहे.
या कामाचे करारपत्र ठेकेदाराबरोबर रु.300 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.22/03/2013 रोजी करण्यात आले आहे.
कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/ सा/बांधवि/1351/2012-13 दि.22/03/2013 ने कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे.
कामाची मुदत:- 60 दिवस.
काम सुरु दि.22/03/2013. काम पूर्ण दि.28/03/2013 .
मोजमाप पुस्तक क्र.06 पृष्ठ क्र.01.
या कामाचे देयक प्रमाणक क्र.7074 ,दि.01/06/2013 ने रु.264131/- व प्रमाणक क्र.5344, दि.10/01/2014 ने रु.853236/- आदा केले आहेत.

**या कामाची नस्ती, अंदाजपत्रक, देयक, प्रमाणक व मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.131 दि. 08/08/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.**

1)या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी ठेकेदारास दि.20/11/2012 रोजी दिली आहे. निविदा मंजुरी समजेमध्ये ठेकेदाराने कामाचे करारपत्र सुरक्षा अनामत रक्कम भरुन सात दिवसाचे आत करण्याचे व सात दिवसाचे आत करारपत्र न केल्यास निविदा रद्द करण्यात येईल असे नमुद केले आहे. परंतु ठेकेदाराने सुरक्षा अनामत दि.29/11/2012 व दि.16/03/2013 रोजी भरणा केली असुन करारपत्र दि. 22/03/2013 रोजी केल्याने काम चालु होण्यास सुमारे 4 महिन्याचा विलंब झाला आहे. ठेकेदाराने वेळेत सुरक्षा अनामत रक्कम भरुन करारपत्र केले नसल्याने ठेकेदाराचा ठेका रद्द न करता त्याच ठेकेदाराकडून काम करुन घेतल्याने काम पुर्ण होण्यास विलंब झाला असल्याचे दिसून येते.

2) या कामाचे अंदाजपत्रक सन 2011-12 च्या दरसूचीप्रमाणे तयार केले आहे. या कामामधील बाब क्र.4 Providing Bituminous liquid seal coat to black top surface including supplying all materials,including all leads,preaparing existing road surface,heating & applying bitumen(98 kg per 100 square meter).Spreading cheaps & rolling complete. By using Bulk bitumen

grade 60/70 या बाबीचा दर रु.64.65/ चौ.मी. दरपृथ्थकरणाने ठरविल्याचे कामाच्या गोषवा-यामध्ये नमुद केले आहे. परंतु या बाबीचा दरपृथ्थकरणाने दर ठरविलेला तक्ता नस्तीसोबत जोडण्यात आलेला नाही. परंतु स्वनिधीमधील अन्य एक काम वॉर्ड क्र.6 मधील बजरंगनगर मधील पुट्टे घर ते भाग्यश्री फॅब्रिकेशन समोरील रस्ते डांबरीकरण करणे या कामाचे प्राकलन सन 2011-12 च्या दरसूचीप्रमाणे तयार केले असुन उपरोक्त बाबीचा दर रु.54.35/ चौमी दरपृथ्थकरणाने ठरविलेबतचा दर तक्ता नस्तीसोबत जोडण्यात आला आहे. त्यामुळे या कामामध्ये घेण्यात आलेला दर हा रु.10.30 प्रती चौ.मी. जादाचा असल्याने बाब क्र.4 सिलकोट करणे या कामावर 4446 चौ.मी X रु.10.30 प्रती चौ.मी.= रु.45793/- जादा झालेला खर्च ठेकेदाराकडुन वसुलपात्र आहे.
3) या कामामध्ये बाब क्र.3 Providing & laying 75mm BBM surface करणे हे काम 4438.73 चौ.मी. करण्यात आले असुन कामासाठी Specification No.Rd-41 नुसार 40mm खडी 9.0 घ.मी व 12mm खडी 1.8 घ.मी. असे एकुण 10.8 घ.मी. प्रती 100 चौ.मी. रस्त्याच्या क्षेत्रासाठी गौण खनिज वापरले आहे. सदरचे काम 4438.73 चौ.मी. केले असुन त्यासाठी 479.34 घ.मी. गौण खनिज लागले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार DSR तयार करताना बांधकामाच्या ज्या बाबीमध्ये गौण खनिजाचा समावेश आहे त्याबाबींचे दर ठरविताना त्यामध्ये रॉयल्टी रक्कमेचा समावेश केला असल्याने कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रॉयल्टी रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला गौण खनिजाच्या रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 479.34 घ.मी X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.33875/- रॉयल्टी रक्कम तसेच बाब क्र.04 ने सिलकोटचे परिमाण 4438.73 चौ.मी. करण्यात आला आहे. या कामासाठी Specification No.Rd-57/231-232 नुसार 6mm ची खडी 0.9 घ.मी प्रती 100 चौ.मी साठी वापरण्याची आहे. सदरचे सिलकोटचे कामासाठी 39.94 घ.मी. खडी लागली असल्याने या गौण खनिजाची रु.70.67 प्रती घ.मी प्रमाणे रक्कम रु.2823/- रॉयल्टी अशी एकुण रॉयल्टीची रक्कम रु.36698/- वसुलपात्र आहे.

4) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक आहे. या शासन निर्णयाप्रमाणे या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने या देयकाची रक्कम रु.1137648 /- च्या 1 टक्केप्रमाणे रु.11376/- ठेकादाराकडुन वसुलपात्र आहेत.

5) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.8.1.2007 नुसार दिलेले काम विहीत केलेल्या विनिर्दिष्टानुसार होण्यासाठी बांधकाम साहित्य म्हणजे डांबर, खडी इ.ची तसेच कामामध्ये वापरण्यात आलेल्या डांबर व खडीचे विनिर्देशन योग्य प्रमाणात असल्याची गुणवत्ता चाचणी मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून होणे आवश्यक आहे. परंतु या कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून गुणवत्ता चाचणी तपासणी केलेचा अहवाल देयकासोबत जोडण्यात आलेला नसल्याने या कामामध्ये वापरण्यात आलेले साहित्य योग्य दर्जाचे असलेबाबतची लेखापरीक्षणास खात्री करता आलेली नाही.

6) या कामाचे रक्कम रु.1137648 /- चे देयक बांधकाम विभागाने तयार करुन लेखा विभागाकडे दि.09/05/2013 रोजी सादर केले आहे. लेखा विभागाने या देयकाची रक्कम रु. 1137648 /- पैकी रक्कम रु.284412 /- चे प्रदान दि.01/06/2013 रोजी, उर्वरित रक्कम रु.853236 /- चे प्रदान दि.10/01/2014 रोजी प्रमाणक क्र.5344 ने केले आहे. सदर रक्कमेचे प्रदान देयकाच्या XEROX प्रतीमध्ये केले आहे. एकाच देयकाचे प्रदान विभागनी करुन करण्यात आले आहे. तसेच सदरचे काम 2012-13 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन

DRAFT

करण्यात आले आहे. परंतु या कामाचे देयक आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये आदा केले आहे. देयक आदा करताना 2013-14 च्या अर्थसंकल्पामध्ये या कामासाठी तरतुद करुन ते आदा करणे आवश्यक आहे. परंतु या देयकावर लेखाशिर्ष नमुद नसल्याने ते कोणत्या लेखाशिर्षामधुन आदा केले आहे याचा खुलासा बांधकाम विभागाने केलेला नाही.

**<u>5)वॉर्ड क्र.53 मध्ये रस्ते व गटारी दुरुस्त करणे या कामामधील अनियमिततेबाबत.</u>**

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.2 च्या वॉर्ड क्र.53 मध्ये रस्ते व गटारी दुरुस्त करणे आर्थिक वर्ष 2012-13 च्या अंदाजपत्रकामध्ये नावानिशी तरतुद करण्यात आली असुन सदर कामगिरी करणेबाबत सन्मानिय सदस्य व नागरीकांनी मागणी केली आहे. त्यानुसार बांधकाम विभागाचे शाखा अभियंता व नगर अभियंता यांनी या ठिकाणाची पाहणी केली असता सदर ठिकाणी गटारी जुन्या व जीर्ण झाल्या असुन पडलेल्या असल्यामुळे सांडपाण्याचा निचरा होणेसाठी नविन गटार करणे तसेच या ठिकाणच्या रस्त्यांना खड्डे पडल्याने या ठिकाणी काम करण्यासाठी सन 2011-12 च्या दरसूचीप्रमाणे रक्कम रु.500000/- चे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. सदरची कामगिरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 संविदा खंड 2(1) अन्वये रितसर जाहिर निविदा मागवुन करण्याची टिपणी कार्यकारी अभियंता यांनी आयुक्तांकडे दि.13/07/2012 रोजी सादर केली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रु.500000 /-

DSR :- 2011-12

अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष :- 2012-13 चे मंजुर अर्थसंकल्पामधील 005) इतर योजना ,द्विनोंद पध्दत क्र. (41850) वॉर्ड क्र.53, मध्ये रस्ते व गटारी करणे या लेखाशिर्षामधुन करणेचा आहे.

प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त निर्णय क्र.138 /2012-13 , दि.07/08/2012 ने जाहिर निविदा मागवुन काम करण्यास व त्यास अनुसरुन येणा-या इतर अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.र.न.517, दि.13/07/2012.

या कामाची जाहिर निविदा सूचना क्र.09/2012-13 ही दै.पुढारी या वर्तमानपत्रात दि.11/08/2012 रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन दि.05/09/2012 अखेर ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरची निविदा दि.09/10/2012 रोजी निविदा कमिटी समोर उघडण्यात आली असुन खालील प्रमाणे एकुण सहा 1) मे. आर.जे.कन्स्ट्रक्शन(1 टक्के कमी), 2) श्री.एच.एन.माने (9.25 टक्के जादा ),3)श्री.जे.एस.शेख (10.1टक्के जादा),4) श्री.एस.व्ही.औटे (12.25 टक्के जादा ) ,5)श्री.एस.आर. मोहनानी (15 टक्के जादा ),6) श्री.पी.पी.पाटील (16 टक्के जादा) निविदा प्राप्त झाल्या आहेत.

या पैकी मे. आर.जे.कन्स्ट्रक्शन यांची निविदा दरापेक्षा 1 टक्के कमीची निविदा मान्य करण्यात आली आहे.

निविदेस मंजुरी :-आयुक्त निर्णय क्र.549/2012-13 दि.09/11/2012 ने मक्तेदार मे.आर.जे.कन्स्ट्रक्शन यांची 1 टक्के कमी दराच्या निविदेस आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी पत्र क्रमनपा /सा /बांधावि/616/2012-13 दि.22/11/2012 रोजी ठेकेदारास दिली आहे. ठेकेदाराने सुरक्षा अनामत रक्कम रु.25000 पैकी रक्कम रु.5000 /- पावती क्र.40720 ने दि.22/11/2012 रोजी भरणा केली असुन उर्वरित रक्कम देयकामधुन कपात करावयाची आहे.

या कामाचे करारपत्र ठेकेदाराबरोबर रु.100 च्या मुद्रांक शुल्क पेपरवर दि.21/01/2013 रोजी करण्यात आले आहे.

कामाचा कार्यादेश :- शहर अभियंता यांचे पत्र क्र.मनपा/ सा/बांधवि/1120/2012-13 दि.30/01/2013.

कामाची मुदत:- 60 दिवस.

काम सुरु दि.30/01/2013. काम पूर्ण दि.15/03/2013 .

मोजमाप पुस्तक क्र.14 पृष्ठ क्र.3 व 4.

**या कामाचे प्रमाणक लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही.**

DRAFT

**या कामाची नस्ती, अंदाजपत्रक, देयक, प्रमाणक व मोजमाप पुस्तक यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.131 दि. 08/08/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या कामामधील अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.**

1) या कामाच्या नस्तीची व देयकाची तपासणी केली असता देयकाच्या छापील नमुन्यामधील अ.क्रं.11 वर सदरचे काम दि.15/03/2013 रोजी पुर्ण झालेचे नमुद आहे व अनु.क्र.13 वर एमबीवर बील रेकॉर्ड केल्याचा दिनांक 05/08/2013 आहे. काम पुर्ण झाल्यानंतर मोजमाप पुस्तकामध्ये बील 5 महिने विलंबाने लिहिण्यात आले आहे. तसेच देयकाची तपासणी केली असता देयक आवक क्र.415 दि.27/08/2014 रोजी लेखाशाखेस प्राप्त झाल्याची नोंद आहे. या कामाचे देयक बांधकाम विभागाने दि.05/08/2013 रोजी तयार केले आहे परंतु ते लेखाशाखेकडे एक वर्ष विलंबाने दि.27/08/2014 रोजी पाठविले आहे. सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता परिच्छेद 10.7.4 नुसार काम पुर्ण झालेनंतर कामाचे लेखे तात्काळ पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतु बांधकाम विभागाने काम पुर्ण झाल्यानंतर मोजमाप पुस्तकामध्ये कामाच्या नोंदी घेणे, गोषवारा व देयक तयार करणे या मध्ये दिडवर्षाचा विलंब केल्याचे दिसुन आले आहे.

2) या कामाच्या देयकाची तपासणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता नियम क्र.176 नुसार अंदाजपत्रकामधील बाबीवर प्रमाणापेक्षा अधिक खर्च झाला असल्याने या बाबत नमुना क्र.132 मध्ये काम पुर्ण झाल्याचे प्रतिवृत्त सोबत जोडले आहे त्यानुसार खालील बाबीवर अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | बाब क्र. व तपशील | अंदाजपत्रकीय परिमाण घ.मी. | मोजमाप नोंद वहीनुसार परिमाण घ.मी. | तफावत परिमाण घमी | दर रक्कम रुपये | जादा आदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| 1 | 2) हार्ड मुरुम पुरवठा करणे | 27 | 94.80 | 67.8 | 378.80 | 25682 |
| 2 | 5)M-15 Cement concrete | 9.45 | 24.21 | 14.26 | 4238.50 | 62560 |
| 3 | 7) UCR बांधकाम करणे | 81 | -------- | 81 | 2685.25 | -217505 |
| 4 | 8) 75MM BBM करणे | 400 चौ.मी. | 998.75 चौमी | 598.75 चौमी | 224.95 | 134688 |

उपरोक्त तक्त्याची तपासणी केली असता बाब क्र.02,05 व 07 चे परिमाण जादा करण्यात आले आहे. या कामाच्या निविदा अटी/शर्ती मधील अट क्र.15 नुसार मंजुर कामामध्ये बदल किंवा वाढ करण्यास विभागप्रमुख यांच्या अगावु लेखी मंजुरीची आवश्यकता आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद 265 नुसार जेव्हा कामामध्ये महत्वाची संरचनात्मक फेरफार करण्याची आवश्यकता असते व त्याकरीता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेव्हा मुळ मंजूरी देणा-या प्राधिका-याचे आदेश घेणे आवश्यक आहे. या नियमानुसार विभागप्रमुख व आयुक्तांची जादा कामासाठी लेखी पुर्वमंजुरी न घेताच काम केलेने बाब क्र.1, 02 व 04 ने केलेल्या जादा परिमाणाची रक्कम रु.222930/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) या कामामध्ये बाब क्र.3 Providing & laying 75mm BBM surface करणे हे काम 998.75 चौ.मी. करण्यात आले असुन कामासाठी Specification No.Rd-41 नुसार 40mm खडी 9.0 घ.मी व 12mm खडी 1.8 घ.मी. असे एकुण 10.8 घ.मी. प्रती 100 चौ.मी. रस्त्याच्या क्षेत्रासाठी गौण खनिज वापरले आहे. सदरचे

DRAFT

कामासाझी 107.86 घ.मी. गौण खनिज लागले आहे. महाराष्ट्र शासन, महसूल आणि वने विभाग अधिसूचना क्रं.गौण खनिज-10/1009/पी.के.-309/ख(3) दि.11/02/2010 नुसार DSR तयार करताना बांधकामाच्या ज्या बाबीमध्ये गौण खनिजाचा समावेश आहे त्याबाबींचे दर ठरविताना त्यामध्ये रॉयल्टी रक्कमेचा समावेश केला असल्याने कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची रॉयल्टी रक्कम रु. 200/- प्रती ब्रास किंवा रु.70.67/ घनमिटर प्रमाणे ठेकेदाराने महसुल विभागाकडे भरुन त्याचा पुरावा कार्यकारी अभियंता यांना देणे आवश्यक आहे व रॉयल्टी भरल्याचा पुरावा ठेकेदाराने दिला नसल्यास त्याला गौण खनिजाच्या रॉयल्टीची रक्कम देण्यात येवु नये अशी तरतुद आहे. देयकासोबत ठेकेदाराने रॉयल्टी रक्कम भरलेचा कोणताही पुरावा सोबत जोडला नसतानाही बांधकाम विभागाने देयकामधुन रॉयल्टीची रक्कम कपात न करता ठेकेदारास आदा केली आहे. त्यामुळे ठेकेदारास देयकामधुन आदा केलेली 107.86 घ.मी X रु.70.67 प्रती घ.मी.प्रमाणे रु.7622/- रॉयल्टी रक्कम ठेकेदाराकडुन वसुलपात्र आहे.

4) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य ,शासन निर्णय क्र. बीसीए-2009 प्रक्र108/ कामगार 7 अ दिनांक 17 जून, 2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश विभागिय दरसुचीमध्ये केला जात नसल्याने प्राकलन तयार करताना दरपृथ:करण करुन कामगार कल्याण उपकराचा समावेश अंदाजपत्रकामध्ये करणे आवश्यक आहे. या शासन निर्णयाप्रमाणे या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के कामगार कल्याण उपकराचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन कामगार कल्याण उपकर वसुल केला नसल्याने या देयकाची रक्कम रु.493435 /- च्या 1 टक्केप्रमाणे रु.4934/- ठेकादाराकडुन वसुलपात्र आहे.

5) या कामाचे प्रमाणक लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेले नाही.

**वसुलपात्र रक्कम :-** विकास काम क्र.2 मधील बाब क्र.4 रॉयल्टी रु.97822/- + कामगार कल्याण उपकर रु.13561/- + विकास काम क्र.4 मधील बाब क्र.2 सिलकोट करणे या बाबीचा दरपृथ्थकरणाने ठरविलेला दर चुकीचा असल्याने वसुलपात्र रक्कम रु.45763/- + बाब क्र.3 रॉयल्टी रक्कम रु.36698/- + बाब क्र.4 कामगार कल्याण उपकर रु.11376/- + विकास काम क्र.05 मधील बाब क्र.03 रॉयल्टी रक्कम रु.7622/- + कामगार कल्याण उपकर रु.4934 = **एकुण वसुलपात्र रक्कम रु.217776/-**

**आक्षेपाधिन रक्कम :-** विकास काम क्र.01, बाब क्र.1 आयुक्त व कार्यकारी अभियंता यांची मान्यता न घेता करण्यात आलेल्या जादा कामाची रक्कम रु.54380/- + बाब क्र.4 पेव्हिंग ब्लॉक्स गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच आदा केलेली रक्कम रु.290638/- + विकास काम क्र.2 बाब क्र.3 खुदाई केलेला माल अन्य ठिकाणी टाकणेसाठी वापरण्यात आलेल्या वाहनांच्या नोंदी दाखविल्या नसल्याने खर्च झालेली रक्कम रु.58376/- + विकास काम क्र.05, बाब क्र.2 मधील आयुक्त व कार्यकारी अभियंता यांची मान्यता न घेता करण्यात आलेल्या जादा कामाची रक्कम रु.222930/- = **एकुण आक्षेपाधिन रक्कम रु.626324/-**

DATSBKM7201 (Ref No : 131)

## *100 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67(3)(क) खाली करण्यात आलेल्या वॉनलेसवाडी नाल्यामध्ये आर.सी.सी.पाईप टाकणे या कामामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 04**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 409705.00/-

| |
|---|
| ***वॉनलेसवाडी नाल्यामध्ये आर.सी.सी.पाईप टाकणे हे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(3) क अन्वये विनानिविदा करणेचा प्रस्ताव बांधकाम विभागाने दि.21/07/2013 रोजी आयुक्त यांचेकडे पाठविला आहे व आयुक्तांनी यथाप्रस्तावित काम करण्यास दि.31/07/2013 रोजी मान्यता दिली आहे. या कामाची वर्क ऑर्डर ठेकेदारास दि.10/09/2013 रोजी देण्यात आली आहे. या सर्व प्रक्रीयेमध्ये 1 महिना 20 दिवसाचा विलंब झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-10/2016/ प्र.क्र.14 /इमारती-2, दि.02/11/ 2006 नुसार 05 ते 50 लाख किंमतीच्या कामाचा प्रथम निविदा सूचना कालावधी 15 दिवसाचा असल्याने या शासन निर्णयानुसार सदरचे काम निविदा मागवुन न केल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसल्याचे स्पष्ट होते. तसेच या कामाचे धावते देयक क्र.1 चे प्रमाणक लेखापरीक्षणास लेखा विभागाने दाखविलेले नाही.*** |

वॉनलेसवाडी नाल्याच्या ठिकाणी आर.सी.सी.क्रॉस पाईप टाकणे या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता शहर अभियंता यांच्या दि.21/07/2013 च्या कार्यालयीन टिपणीमध्ये प्रभाग क्र.3 मधील वॉनलेसवाडी नाल्यामधील सांडपाणी व पावसाचे पाणी विषयांकीत नालापात्रामध्ये तसेच रस्त्यावर व नागरीकांच्या प्लॉटमध्ये व परिसरातील कांही भागात साचून राहिले आहे. त्यामुळे सदर भागात डासांची उत्पत्ती होवून उक्त भागामध्ये रोगराई पसरुन नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. या भागातील सन्मानिय नगरसेवक श्री.विष्णु माने व श्रीमती.राणी मोरे यांनी सदरचा नाला प्रवाहित करुन नालापात्रामध्ये आर.सी.सी.पाईप टाकणे बाबत मागणी केलेचे नमुद आहे. सार्वजनिक आरोग्याचा विचार करता सदरचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने रक्कम रु.662800/- मात्रची कामगिरी करुन घेण्यास व येणा-या खर्चास मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(3) क अन्वये महानगरपालिकेचे नोंदणीकृत मक्तेदार श्री.मोहन शंकर कुंभार यांचेकडून सदरची कामगिरी करुन घेण्यास कार्यकारी अभियंता यांनी आयुक्त यांचे कडे प्रस्तावित केले आहे व आयुक्तांनी सदर कामगिरी कलम 67(3)(क) खाली करण्यास दि.31/07/2013 रोजी मान्यता दिली आहे.

तांत्रिक मान्यता :- कार्यकारी अभियंता यांचे तांत्रिक मान्यता आदेश क्र.(7) अ दि.31/05/2013.

प्रशासकीय मान्यता :- आयुक्त निर्णय क्रमांक 100/2013-14,दि.01/07/2013 ने सदर काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(3) क अन्वये मक्तेदार श्री. मोहन शंकर कुंभार यांचेकडून अर्थसंकल्पीय लेखाशीर्ष (2013-14) 41231 मधुन करण्यास मान्यता दिली आहे.

या कामाची निविदा मंजुरीची समज शहर अभियंता यांनी ठेकेदारास दि.07/08/2013 रोजी दिली आहे. या कामाचे करारपत्र ठेकेदाराने रु.100 चे मुद्रांक शुल्क पेपरवर दि.30/08/2013 रोजी केले असुन कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.33500/- पैकी 2.50 टक्केप्रमाणे रक्कम रु.16800, पावती क्र.71214 ने दि.28/08/2013 रोजी भरणा केली असुन उर्वरित रक्कम देयकामधुन वसुल करावयाची

DRAFT

आहे.

या कामाची वर्क ऑर्डर शहर अभियंता यांनी ठेकेदारास पत्र क्र.जा.क्र.328, दि.10/09/2013 रोजी दिली असुन काम दि.10/09/2013 रोजी सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. कामाची मुदत वर्क ऑर्डर दिल्यापासुन 45 दिवस देण्यात आली आहे.

मोजमाप पुस्तक क्र.36, पृष्ठ क्र.16

या कामाची नस्ती,प्राकलन, मोजमाप पुस्तक व देयकाची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र. 129 दि.01/08/2016 रोजी निर्गमित केला असुन बांधकाम विभागाने त्याचे अनुपालन दि.  रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन तपासुन लेखापरिक्षणाचे खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता पृष्ठ क्र.11 वर वॉनलेसवाडी आहिल्यानगर भागामधील नागरीकांनी त्यांचे भागामधील नाल्यावर अतिक्रमणे झाल्याने नाल्याचे पाणी तुंबुन या दुषित पाण्याचा शिरकाव नागरी वस्तीमध्ये होत असुन सदर प्रश्न निकाली न काढल्यास उपोषणास बसणार असलेबाबतचा तक्रार अर्ज महानगरपालिकेच्या आवक विभागाकडे दि.15/05/2013 रोजी दिला आहे. सदरचा अर्ज दि.23/05/2013 रोजी आवक क्र.133 ने सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त झाला आहे. सदर काम तातडीचे असल्याने या कामाचे रक्कम रु.662800/- चे अंदाजपत्रक तयार करुन शहर अभियंता यांनी जा.क्र.7अ, दि.31/05/2013 ने तांत्रिक मान्यता दिली आहे. तांत्रिक मान्यता घेतल्यानंतर आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता घेवून पावसाळयापुर्वी निविदा मागवुन काम करणे आवश्यक असता त्याप्रमाणे बांधकाम विभागाने कार्यवाही केलेली नसल्याने सदरचे काम तातडीने अधिनियमाचे कलम 67(3)(क) अन्वये करावे लागलेचे स्पष्ट होते.

2) पावसाळा सुरू झाल्यानंतर या भागामध्ये नाला तुंबुन नाल्याचे सांडपाणी रस्त्यावर व नागरीकांच्या प्लॉटमध्ये साचुन राहिल्यानंतर बांधकाम विभागाने दि.21/07/2013 चे कार्यालयीन टिपणीने सदरचे काम नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीने करणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(3) क अन्वये महानगरपालिकेचे नोंदणीकृत मक्तेदार श्री.मोहन शंकर कुंभार यांचेकडून रक्कम रु.662800/- मात्रची कामगिरी विनानिविदा करणेचा प्रस्ताव आयुक्त यांचेकडे पाठविला आहे व आयुक्तांनी सदर कामगिरी कलम 67(3)(क) खाली करण्यास दि.31/07/2013 रोजी मान्यता दिली आहे. त्यानंतर या कामाची ठेकेदारास निविदा समज देवुन करारपत्र करून दि.10/09/2013 रोजी वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. सदरचे काम तातडीचे असल्याचे कार्यालयीन टिपणी दि.21/07/2013 ने प्रस्तावित केल्यानंतर कामाचा कार्यादेश दि.10/09/2013 रोजी दिला आहे. या सर्व प्रक्रीयेमध्ये 1 महिना 20 दिवसाचा विलंब झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी -10/2016/ प्र.क्र.14 /इमारती -2, दि.02/11/ 2006 नुसार 05 ते 50 लाख किंमतीच्या कामाचा प्रथम निविदा सूचना कालावधी 15 दिवसाचा असल्याने या शासन निर्णयानुसार सदरचे काम निविदा मागवुन न केल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नसल्याचे स्पष्ट होते.

3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3) क अन्वये आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुस-या एखाद्या नगरपालिका प्राधिका-याच्या किंवा राज्य शासनाच्या मंजुरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही आयुक्त यांना करता येते. परंतु आयुक्ताने त्याने केलेली कार्यवाही, त्याबाबतची कारणे व या कामासाठी होणारा संभाव्य खर्च या विषयीचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांच्याकडे ताबडतोब पाठविणे आवश्यक आहे. परंतु नस्ती व देयकाची तपासणी केली असता सदरचे प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिकेकडे पाठविलेचे दिसुन येत नाही. या बाबत अर्धसमास ज्ञापनास दिलेल्या अनुपालनामध्ये प्रतिवृत्त स्थायी व महानगरपालिकेकडे पाठविले नसल्याची बाब मान्य केली आहे.

4) या कामाचे रक्कम रु.409705/- चे धावते देयक क्र.1 बांधकाम विभागाने दि.04/10/2013 रोजी तयार करुन लेखा विभागाकडे पाठविले आहे. लेखा विभागाने या देयकाची नोंद आवक क्र.5680 ने दि.15/10/2013 रोजी घेतली असल्याचे देयकावर नमुद आहे. सदरचे काम द्विनोंद कोड क्र.41211 शासनाचे विशेष अनुदान या लेखाशिर्षामधुन करणेच्या शहर अभियंता यांचे प्रस्तावास आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. बांधकाम विभागाने ठेकेदारास आदा करणेसाठी तयार केलेल्या देयकावरही या लेखाशिर्षाची नोंद केली आहे. परंतु देयकावर पुन्हा दुरुस्ती करुन सदरची रक्कम शासनाचे विशेष अनुदान या लेखाशिर्षामधुन न देता महानगरपालिकेच्या स्वनिधीमधुन(जनरल फंड) देण्याची शिफारस शहर अभियंता यांनी केली आहे. महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमाचे अनुसूची ड, प्रकरण 7, अर्थसंकल्प मधील नियम 2 नुसार महानगरपालिकेस, स्थायी समितीने सरकारी वर्षात वेळोवेळी केलेल्या शिफारशीवरुन, कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानातुन दुस-या अर्थसंकल्पीय अनुदानात बदली करण्यास मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार या लेखाशिर्ष बदलास महासभेची मान्यता घेणे आवश्यक असता ती घेतलेली नाही. या कामाच्या धावत्या देयकाची रक्कम दिलेले प्रमाणक लेखापरीक्षणास दाखविले नसल्याने सदरचे प्रमाणक कोणत्या लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यात आले आहे व प्रमाणकामधुन कोणत्या वजाती करण्यात आलेल्या आहेत याची तपासणी करता आलेली नाही. सदरचे देयक ठेकेदारास आदा केल्याचा प्रमाणक क्र. व लेखाशिर्ष याबाबतची माहिती लेखाशाखेने अर्धसमास ज्ञापन क्र.129 ने मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर केली नसल्याने या देयकाची रक्कम रु.409705/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATSBKM7201 (Ref No : 129)

## *101 नगरसेवकांना देण्यात आलेल्या मोबाईल सेवेचे अर्थिक लाभ वसुल करण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

DRAFT

*लेखा शीर्ष : भांडार मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 172368.00/-

| |
|---|
| ***महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण 2009 / प्र.क्र.148 / नवि-26 दि.22 जानेवारी 2010 ने नगरसेवकांचे मानधन रुपये 7500/- दर महा केले आहे. सदर मानधनामध्ये दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्चाचा समावेश असल्याने महानगरपालिकेने नगरसेवकांचे मोबाईल सेवेवर केलेला खर्च अनुज्ञेय ठरत नसल्याने एकुण 38 नगरसेवकांचे मोबाईल बीलावर झालेला खर्च रक्कम रु.172368/- वसुलपात्र आहे.*** |

भांडार विभागाच्या 2013 -14 आर्थिक वर्षाच्या मोबाईल मासिक बील रजिस्टर क्र.05 ची तपासणी केली असता पृष्ठ क्र.1 वर देण्यात आलेल्या अनुक्रमणिकेमध्ये मोबाईल धारकाचे नाव, मोबाईल क्रमांक, पद व मर्यादा नमुद केली आहे. सदर अनुक्रमणिकेमध्ये अधिकारी व पदाधिकारी वगळता एकुण 38 नगरसेवकांना आयडीया कंपनीचे मोबाईल सिमकार्ड दिले असल्याचे व रु.168 प्रती सिमकार्ड प्रती महिना या प्रमाणे भाडे मोबाईल कंपनीकडे भरणा केलेचे नमुद आहे. सदरचा खर्च मोबाईल फोन व वायरलेस सेवा (द्विनोंद कोड बी -117) या लेखाशिर्षामधून खर्ची टाकण्यात आला आहे. सदरची सुविधा नगरसेवक यांना देण्याबाबत महासभा क्रमांक 06,ठराव क्र.74, विषय क्रमांक 09, दि.19/11/2008 अन्वये ठराव झाला असुन सदरची सिमकार्डे पुरविण्याबाबत सभागृहनेते श्री.सुरेश आवटी यांनी दि.24/10/2008 च्या पत्राने कळविले असुन त्यानुसार एकुण 68 सिमकार्ड खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या रक्कम रु.15300/- मात्रचे खर्चास तसेच,सदरच्या सुविधेसाठी आऊटगोइंग चार्जेस संबंधित सदस्यांनी भरण्याच्या आटीस आधिन राहून प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली असुन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य यांनी सिमकार्ड स्विकारण्यास नकार दिला आहे. त्यानुसार सदर सदस्य वगळून इतर सदस्यांना सिमकार्ड पुरविणेस व त्याकामी येणा-या खर्चास महासभेने मान्यता दिली आहे.

प्रमाणक क्र.6409 दि.07/03/2014 ने आयडीया सेल्युलर कंपनीस रु.54742/- मोबाईल सेवा वापराबाबत आदा केले आहेत.

याबाबतची नस्ती, महासभा ठराव, मोबाईल बील रजिस्टरची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.130 भांडार विभागास दि.06/08/2016 रोजी देण्यात आला असुन भांडार विभागाने त्याचे अनुपालन दि.10/08/2016 रोजी लेखापरीक्षणास सादर केले आहे. सदरचे अनुपालन तपासुन लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2004/468/प्र.क्र.84/04/नवि-20 दि.24 जानेवारी 2005 नुसार नुसार नगरसेवकांना मानधन म्हणून दर महा रुपये 4000/- (दुरध्वनी,

लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्च लक्षात घेऊन) देणेत येत होते त्यामध्ये सुधारणा करुन शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण 2009 / प्र.क्र.148 / नवि-26 दि.22 जानेवारी 2010 ने नगरसेवकांचे मानधन दर महा रुपये 7500/- केले आहे. सदर मानधनामध्ये दुरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्चाचा समावेश असल्याने महानगरपालिकेने नगरसेवकांचे मोबाईल सेवेवर केलेला खर्च अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे या सोबत जोडण्यात आलेल्या (परिशिष्ठ क्र.17) मध्ये नमुद केलेनुसार एकुण 38 नगरसेवकांचे मोबाईल बीलावर केलेला खर्च रक्कम रु.172368/- वसुलपात्र आहे.

**वसुलपात्र रक्कम रु.172368/-**

DATSBKM7201 (Ref No : 130)

DRAFT

# कलम ९ क खालील आक्षेप

DRAFT

-------------------- **निरंक** -------------------

DRAFT

# सर्वसाधारण अनियमितता

DRAFT

# कलम ९ ड खालील आक्षेप

DRAFT

## *3 नविन कर्मचा-यांचे सेवापुस्तकामधील नोंदी अपुर्ण ठेवलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 प्रकरण 3 मधील नियम क्र. 11 नुसार उमेदवाराची कायम नियुक्ती करीता किंवा नियुक्ती चालू ठेवण्यासाठी शरिरीक पात्रता प्रमाणपत्राची आवश्यकता असताना कर्मचा- यांची वैद्‌यकीय तपासणी करुन ते वैद्‌यकीय दृष्टया समक्ष असल्याबाबतचे प्रमाणपत्र घेवुन त्याच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेण्यात आलेल्या नाहीत.***

DRAFT

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेने शासन परिपत्रक महारा ष्ट्रशासन सामाजिक न्याय व विशेष सहा. विभाग शासन परिपत्रक क्र.- सफाई- 2011/प्र.क्र. 327 / विधयो-2 मंत्रालय दि. 21/10/2011 नुसार लाड/पागे समितीच्या शिफारशी नुसार वारसा हक्काने 32 कर्मचा-यांची नेमणूक आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये केली आहे. सदर कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता खालील त्रुटी सेवापुस्तकामध्ये आढळल्या आहेत.

1)महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981, प्रकरण- 3 मधील नियम क्र. 11 नुसार उमेदवाराची कायम नियुक्ती करीता किंवा नियुक्ती चालू ठेवण्यासाठी शारिरीक पात्रता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच नियम क्र. 16 नुसार वैद्‌यकीय तपासणी केलेबाबतची नोंद सेवा पुस्तकात घेणेत आलेली नसल्याने सदर कर्मचारी वैद्‌यकीयदृष्टया काम करणेस सक्षम असलेबाबतची माहिती लेखापरीक्षणास समजुन आली नाही.

2)2013-14 या आर्थिक वर्षामध्ये लाड समितीच्या निर्णयानुसार वारसा हक्काने झाडू व सफाई कामगार म्हणुन नियुक्ती केलेल्या कर्मचा-यांच्या नियुक्तीचे वेगवेगळे आदेश आयुक्तांनी काढले आहेत. नियुक्ती आदेशातील अ. क्र. 12 व 15 नुसार दिलेल्या अटींची पुर्तता कर्मचा-यांनी केल्याचे दिसून येत नाही.

**अट क्र. 12) नुसार** संबधीत पात्र वारसांने नियुक्तीच्या पदावर रुजु होतांना शैक्षणिक पात्रता, जन्म तारीख, जात विषयक वैधता प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती व साक्षांकीत प्रतीसह, प्रशासन अधिकारी (आस्थापना) यांचेकडे रुजू प्रतिवेदन सादर करावे. खोटी/बनावट कागदपत्रे, शपथपत्र इत्यादी सादर केल्यास ज्यावेळी सदर बाब निदर्शनास येईल त्यावेळी विना नोटीस सेवा कायमस्वरुपी संपुष्टात आणणेचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील व संबंधीत कर्मचारी फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील. तदनंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, शिवाय याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**अट क्र. 15)** नियुक्तीच्या आदेशानुसार महापालिका सेवेत हजर झाल्यानंतर 30 दिवसाच्या आत महापालिका वैद्‌यकीय अधिकारी यांचेसमोर नियुक्ती केलेल्या उमेदवारास हजर होऊन शारिरीक सदृढता प्रमाणपत्र सादर करावे लागेल. वैद्‌यकीय तपासणीमध्ये महानगरपालिका सेवेसाठी नियुक्त उमेदवार अपात्र ठरल्यास विना नोटीस ताबडतोब महापालिका सेवेतून कमी केले जाईल. कर्मचारी वैद्‌यकीय तपासणी न केले बाबतच्या आक्षेपाचे

अनुपालन आस्थापना विभागाने सादर केले असुन नवनियुक्त कर्मचा-यांना वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्यासाठी कळविण्यात आलेचे नमुद केले आहे. यावरुन कर्मचा-याची नियुक्ती होवून तीन वर्षाचा कालावधी होवुनही अद्याप वैद्यकीय चाचणी घेतली नसल्याचे स्पष्ट होते.

3)शासन परिपत्रक महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहा. विभाग, शासन परिपत्रक क्र.- सफाई- 2011/ प्र.क्र. 327/ विधयो-2 मंत्रालय दि. 21/10/2011 नुसार लाड/पागे समितीच्या शिफारशी नुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीसाठी वारसांचा नोकरीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो 30 दिवसाच्या आत निकाली काढणे आवश्यक असता खालील कर्मचा-यांच्या बाबतीत उशिरा कार्यवाही केलेली आहे.

| अ.क्र | निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/मयत/वैद्यकिय दृष्टया अपात्र नांवे | सेवेतून निवृत्त दिनांक | नोकरी दिलेले वारसाचे नांव | वारसानेनोकरीसाठी अर्ज केलेला दिनांक | वारस कर्मचारी रुजू दिनांक | विलंब कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बेबी बाबालाल झारी, नियत वयोमान | 30/06/13 | समीर बा झारी | 1/10/13 | 25/01/14 | 2 महिने 25 दिवस |
| 2 | इंदुबाई रामचंद्र लोंढे, स्वेच्छा निवृत्ती | 30/11/12 | भरत बाबासो आवळे | 6/11/12 | 01/10/13 | 10 महिने 6 दिवस |
| 3 | गजानन अंकुश व्हनकटे, मयत | 14/12/12 | सुरेखा गजानन व्हनकटे | 14/1/13 | 01/02/14 | 1 वर्षे |
| 4 | जिरामजिनया रंगाप्पा मद्रासी, स्वेच्छा | 31/01/13 | शेखर जिरामजीनच्चा मद्रासी | 30/11/12 | 01/10/13 | 11 महिने 20 दिवस |
| 5 | चंदाबाई बापू ठोकळे, स्वेच्छा | 31/12/12 | सिध्दांत जगन्नाथ ठोकळे | 14/1/13 | 01/10/13 | 9 महिने 14 दिवस |
| 6 | विजयकुमार तायाप्पा साबळे, मयत | 26/03/13 | संध्या विजयकुमार साबळे | 26/3/13 | 13/02/14 | 11 महिने 9 दिवस |
| 7 | बच्चू आमरा वाघेला, मयत | 28/06/12 | हेमंत बच्चु वाघेला | 13/7/12 | 13/02/14 | 1 वर्षे 6 महिने 20 दिवस |
| 8 | सुभाष गुंडा भोरे, स्वच्छा | 31/10/12 | मनोज सुभाष भोरे | 1/11/12 | 29/01/14 | 1 वर्षे 1 महिना 29 दिवस |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | नल्लमा आनंद आदेंडा, स्वेच्छा | 30/09/12 | गंगादेवी आनंद आदेंडा | 21/9/12 | 01/10/13 | 1 वर्ष 21 दिवस |
| 10 | रुक्मीनी हणमंत सोनार, मयत | 17/08/06 | कृष्णा हणमंत सोनार | 18/4/12 | 06/02/14 | 1 वर्ष 9 महिने 18 दिवस |
| 11 | मनसुख गोविंद गोयल, स्वेच्छा | 30/04/12 | संगिता मनसुख गोयल | 10/4/12 | 06/03/14 | 1वर्ष 10 महिने 6 दिवस |
| 12 | गोरख मारुती कांबळे, स्वेच्छा | 31/10/11 | संतोष गोरख कांबळे | 9/4/12 | 25/01/14 | 1 वर्ष 8 महिने 25 दिवस |
| 13 | पुष्पा याकुब मद्रासी, स्वेच्छा | 26/07/13 | दाविद याकुब मद्रासी | 9/10/13 | 08/02/14 | 4 महिने 8 दिवस |
| 14 | सुमन फकिरचंद गोंडाले, स्वेच्छा | 29/08/12 | हेमंत किरण वारसकर | 26/3/13 | 06/03/14 | 11 महिने 6 दिवस |
| 15 | मंगल बापू कांबळे, स्वेच्छा | 30/09/12 | निलेश बापू कांबळे | 16/11/12 | 29/01/14 | 12 महिने 29 दिवस |
| 16 | मोहन वसंत गोंधळे, स्वेच्छा | 31/05/13 | अनिकेत मोहन गोंधळे | 1/7/13 | 25/01/14 | 4 महिने 25 दिवस |
| 17 | छबू मधुकर काळे, स्वेच्छा | 31/08/13 | किरण मधुकर काळे | 7/10/13 | 27/01/14 | 1 महिने 27 दिवस |
| 18 | विनोद सुनकाप्पा मुळके, स्वेच्छा | 31/01/13 | अर्जुन सुनकाप्पा मुळके | 4/12/12 | 26/01/14 | 1 वर्ष 26 दिवस |
| 19 | मंगल दगडू शींदे, स्वेच्छा | 26/03/13 | हेमलता दगडु शींदे | 28/3/13 | 08/02/14 | 9 महिने 8 दिवस |
| 20 | सत्वशीला तानाजी सनदे, स्वेच्छा | 28/03/13 | राहुल तानाजी सनदे | 20/7/13 | 25/01/14 | 4 महिने 25 दिवस |
| 21 | उषा शंकर कांबळे, स्वेच्छा | 27/03/13 | जितेंद्र शंकर कांबळे | 5/4/13 | 10/02/14 | 8 महिने 10 |

DRAFT

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | दिवस |
| 22 | नरसव्वा यल्लाप्पा माकडवाले, स्वेच्छा | 31/12/12 | अनिल यल्लपा मुळके | 14/3/13 | 24/01/14 | 8 महिने 24 दिवस |
| 23 | मनोज प्रल्हाद हटवाल स्वेच्छा | 01/05/13 | तुषार मोहन हटवाल | 22/8/13 | 08/02/14 | 9 महिने 8 दिवस |
| 24 | रणजीत बाबू माकडवाले, मयत | 30/10/12 | चंदा रणजित माकडवाले | 24/1/13 | 05/06/14 | 1 वर्षे 5 दिवस |
| 25 | राजू फुलैया मद्रासी, स्वेच्छा | 29/03/13 | संजय राजू मद्रासी | 2/4/13 | 27/01/14 | 3 महिने 5 दिवस |
| 26 | कांतम्मा सुब्राव मद्रासी, स्वेच्छा | 31/03/13 | जानकी सुब्राव मद्रासी | 20/3/13 | 27/01/14 | 8 महिने 27 दिवस |
| 27 | आशा कोंडीबा झाळके, मयत | 21/04/11 | बायडा प्रमोद झाळके | 14/6/11 | 28/01/14 | 1 वर्षे 5 महिने 28 दिवस |
| 28 | हिराबाई रामचंद्र कांबळे, स्वेच्छा | 31/08/12 | जॅन धर्मेंद्र कांबळे | 6/9/12 | 06/03/14 | 1 वर्षे 4 महिने 6 दिवस |
| 29 | वैजयंता खीमाजी भीसे, स्वेच्छा | 31/08/12 | भाऊसो वसंत भीसे | 4/9/12 | 03/01/14 | 1 वर्षे 4 महिने 3 दिवस |
| 30 | सखुबाई गंगाराम बनसोडे, स्वेच्छा | 07/12/12 | अनिल गंगाराम बनसोडे | 24/4/13 | 08/02/14 | 8 महिने 8 दिवस |
| 31 | शांता आनंदा कांबळे, स्वेच्छा | 31/12/12 | भरत आनंदा कांबळे | 3/1/13 | 28/01/14 | 10 महिने 28 दिवस |
| 32 | लता युवराज वाघमारे, स्वेच्छा | 26/03/13 | विनायक युवराज वाघमारे | 31/1/13 | 01/10/13 | 8 महिने |

DRAFT

अर्धसमास ज्ञापन क्र.28 चे अनुपालन अस्थापना विभागाने दि.31/12/2015 रोजी सादर केले असुन अनुपालनामध्ये वारसाहक्काने नियुक्त होणा-या कर्मचा-यांच्या नियुक्तीची कागदपत्रे पुर्ण करुन घेणा-या कर्मचा-यांना निवडणुकीची कामे लागल्याने नवनियुक्त कर्मचा-यांना वेळेमध्ये नियुक्त देण्यात आली नसल्याची बाब मान्य केली आहे. परंतु सदर कर्मचा-यांना निवडणुकीचे काम किती कालावधीसाठी देण्यात आले होते. याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास दाखविली नसल्याने दिलेले अनुपालन संयुक्तिक वाटत नाही. शासन निर्णयाप्रमाणे नियुक्तीचा अर्ज 30 दिवसांचे आत निकाली काढणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने लाड

समितीनुसार वारसाहक्काने नोकरी मिळणा-या कर्मचा-यांना विलंबाने नियुक्ती दिल्याचे स्पष्ट होते.

DATRYJM7501 (Ref No : 28)

## *4 कर्मचा-यांना जादा वेतनवाढ दिल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 2520.00/-

***महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम 2009 वेतन निश्चिती संबंधी सुचना शासन निर्णय महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. वेपुर 1209/सेवा 9 दिनांक 05/05/2010 अन्वये कर्मचा- यांना सुधारीत वेतननिश्चिती रु. 10 ने प्रतिमहा जास्त केली आहे.***

सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाचे लेखापरीक्षणामध्ये, कार्यरत कर्मचा-यांची निवडक मुळ सेवापुस्तके तपासली असता खालील कर्मचा-यांना वेतनवाढ देताना वेतन निश्चिती रुपये 10 ने जास्त केलेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम 2009 वेतन निश्चिती संबंधी सुचना शासन निर्णय महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक वेपुर 1209/प्र.क्र. 69/सेवा 9 दिनांक. 05/05/2010 अन्वये कर्मचा-यांची सुधारीत वेतननिश्चिती खालील प्रमाणे करणेत आली आहे.

| अ.क्र | कर्मचा-याचे नांव व पदनाम | 6 व्या वेतन आयोगातील वेतन वाढ दिनांक | देय वेतन रुपये | दिलेले वेतन रुपये | वसुल करावयाची वार्षिक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एस डी मेथे, क. लिपिक | 01/07/2012 | 12480+500=12980 | 12480+510=12990 | 120 |
| 2 | राजेंद्र महादेव शेडबाळे, सफाई कामगार | 01/07/2009 | 6740+250=6990 | 6740+260=7000 | 120 |
| 3 | मरियाम्मा देवया मद्रासी, खास | 01/07/2009 | 6040+220=6260 | 6040+230=6270 | 120 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | साफसफाई | | | | |
| 4 | राजु सरदार चव्हाण, सफाई कामगार | 01/07/2006 | 5720+210=5930 | 5720+220=5940 | 120 |
| 5 | नंदा दिलीप कांबळे, सफाई कामगार | 01/07/2006 | 5060+190=5250 | 5060+200=5260 | 120 |
| 6 | शोभा तुळशीराम साबळे, सफाई कामगार | 01/07/2009 | 6740+250=6990 | 6740+260=7000 | 120 |
| 7 | अरविंद ग साखळकर, शिपाई | 01/07/2009 | 6740+250=6990 | 6740+260=7000 | 120 |
| 8 | आनंदा बळवंत कांबळे, मजूर | 01/07/2008 | 6890+250=7140 | 6890+260=7150 | 120 |
| 9 | महेंद्र शंकर सरोदे, मजुर | 01/07/2007 | 5720+210=5930 | 5720+220=5940 | 120 |
| 10 | प्रशांत गजानन गुरव, लिपिक | 01/07/2009 | 7460+280=7740 | 7460+290=7750 | 120 |
| 11 | नितिन बाबुराव महापुरे, लिपिक | 01/07/2007 | 6770+260=7030 | 6770+270=7040 | 120 |
| 12 | अशोक हुवाप्पा शेळके, पंप ऑपरेटर | 01/07/2006 | 6790+260=7050 | 6790+270=7060 | 120 |
| 13 | अशोक भुपाल सुतार, लिपिक | 01/07/2012 | 10940+400=11340 | 10940+410=11350 | 120 |
| 14 | अशोक | 01/07/2006 | 8190+310=8400 | 8190+320=8410 | 120 |

DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रामचंद्र कदम, वाहनचालक | | | | |
| 15 | पंकजा अरविंद रुईकर, कनिष्ठ अभीयंता | 01/07/2009 | 13630+540=14170 | 13630+550=14180 | 120 |
| 16 | नितिन वसंतराव नाईक, व्हालमन | 01/07/2007 | 5040+190=5230 | 5040+200=5240 | 120 |
| 17 | प्रदिप शांतीनाथ पाटील, वॉचमन | 01/07/2007 | 5040+190=5230 | 5040+200=5240 | 120 |
| 18 | प्रकाश हणमंत सानप, ऑईलमन | 01/07/2007 | 5040+190=5230 | 5040+200=5240 | 120 |
| 19 | कुमार गणपती सागावकर, लिडींग फायरमन | 01/07/2011 | 11630+420=12050 | 11630+430=12060 | 120 |
| 20 | इरया शीवया स्वामी, कनिष्ठ लिपिक | 01/07/2007 | 9270+350=9620 | 9270+360=9630 | 120 |
| 21 | बाबासो पंडितराव सुर्यवंशी, वॉचमन | 01/07/2012 | 5380+200=5580 | 5380+210=5590 | 120 |

वरील कर्मचारी यांची वेतन निश्चिती सुधारीत करुन **जादा दिलेले वेतन व अनुशंगिक भत्ते** कर्मचा-यांचे वेतनामधून वसुल करण्यात यावेत.

अर्धसमास ज्ञापन क्र.29, दि.26/10/2015 रोजी निर्गमित केला असुन अस्थापना विभागाने त्याचे अनुपालन दि.28/12/2015 रोजी सादर केले आहे. अनुपालनामध्ये डिसेंबर 2015 च्या वेतन देयकामधुन जादा वेतनाची रक्कम वसुल करणेत येणार असलेचे नमुद केले आहे. परंतु जादा वेतनाची वसुली केली नसल्याने अनुपालन



DRAFT

अमान्य करण्यात येत आहे.

**वसुलपात्र रक्कम रु.2550/-**

DATRYJM7501 (Ref No : 29)

## *5 नविन नियुक्त केलेले कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील नोंदी महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 नुसार घेतल्या नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील प्रकरण 3 नियम क्र. 11 नुसार खाली नमुद केलेल्या 13 कर्मचा- यांच्या सेवापुस्तकात वैद्यकीय तपासणीची नोंद घेतली नाही. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील प्रकरण 4 नियम क्र. 36 नुसार मुळ सेवा पुस्तकामध्ये भविष्य निर्वाह निधी, मृत्यू नि सेवा निवृत्ती उपदान व कुटुंब निवृत्ती वेतनासाठी नामनिर्देशन नमुना फॉर्म कर्मचा- यांने भरलेले नाही.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेतील आस्थापना विभागाचे वित्तीय वर्ष 2013-2014 चे लेखापरीक्षण केले असता 2004-05 या वर्षात खालील कर्मचा-यांची नेमणूक केलेली आहे. सदर कर्मचा-याच्या सेवापुस्तकाची तपासणी केली असता खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील प्रकरण-3 नियम क्र. 11 नुसार प्रत्येक कर्मचा-याने त्याची स्थायी पदावर कायमस्वरुपी नियुक्ती होण्यापूर्वी वा नेमणुक झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत (यापैकी जे आधी असेल) शारिरीक पात्रतेसंबंधी वैद्यकीय प्रमाणपत्र सोबत हजर करणे आवश्यक आहे. तसेच या नियमाचे टिप 3 नुसार साधारणत: नेमणुकीपूर्वी उमेदवाराची शारिरीक तपासणी झाली पाहिजे. नियम क्र.16 नुसार कर्मचा-याची शारिरीक तपासणी झाली व तो पात्र ठरवला गेला ही बाब वैद्यकीय प्रमाणपत्र हजर करताच सेवा पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. परंतु खालील 13 कर्मचा-याची मुळ सेवापुस्तके तपासली असता एकाही कर्मचा-याची वैद्यकिय तपासणी केलेबाबतची तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र घेतलेची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही. तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र मुळ सेवापुस्तकात चिकटवलेले नाही.

अ) वैद्यकिय तपासणीची सेवापुस्तकात नोंद न घेतलेल्या कर्मचा-यांची यादी

| अ.क्र | कर्मचा-यांचे नांव, पदनाम | विभाग | नेमणूक दि. |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | महंमद रफिक शेख | वाहनचालक, बांधकाम | 01/06/2004 |
| 2 | मनोज बाबुराव विभुते | कुली, बांधकाम | 01/06/2004 |
| 3 | रामचंद्र सदाशीव साळुंखे | क्लिनर, बांधकाम | 01/06/2004 |
| 4 | विलास पंढरीनाथ कुंभार | शिपाई, बांधकाम | 01/06/2004 |
| 5 | वर्षाराणी दिपक पाटील | कुली, बांधकाम | 09/02/2009 |
| 6 | सचिन चंद्रकांत पोळ | क. लिपिक, बांधकाम | 23/05/2001 |
| 7 | प्रकाश सखाराम चव्हाण | सफाई कामगार, आरोग्य | 01/06/2004 |
| 8 | अतुल बबन पवार | कुली, बांधकाम | 01/04/2005 |
| 9 | धनंजय विष्णू हर्षद | सफाई कामगार, आरोग्य | 19/06/2003 |
| 10 | लक्ष्मीनारायण कोतवाल | सफाई कामगार, आरोग्य | 21/08/2004 |
| 11 | प्रविणकुमार मधूकर धेंडे | कनिष्ठ लिपिक, घरपट्टी | 23/08/2004 |
| 12 | रविंद्र वसंत सुर्वे | शिपाई, घरपट्टी विभाग | 01/06/2004 |
| 13 | विनायक भि. जामदार | शिपाई, आरोग्य विभाग | 01/06/2004 |

2) श्री.महंमद रफिक शेख यांच्या सेवापुस्तकाची तपासणी केली असता दि. 01/06/2004 पासून रजा लेख्यामध्ये रजेची नोंद केलेली नाही. तसेच सचिन चंद्रकांत पोळ दि. 23/05/2001 पासूनचा रजा लेखा लेखापरीक्षण कालावधीपर्यत (ऑक्टो 2015 अखेर) पूर्ण केला नसलेने सदर कर्मचा-यांनी एकूण किती रजा घेतल्या आहेत व त्यांच्या किती रजा शिल्लक आहेत याची पडताळणी केलेली नाही. महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधील प्रकरण 4 मधील नियम 25 मधील (2) नुसार अराजपत्रित शासकीय कर्मचारी आणि ज्यांचे वेतन व भत्ते आस्थापनेच्या वेतन देयकांवर काढण्यात येतात असे राजपत्रित शासकीय कर्मचारी, यांच्या रजेचा हिशेब कार्यालय प्रमुखाने नमुना 2 मध्ये ठेवणे आवश्यक असता सदर कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात रजेच्या नोंदी घेतलेल्या नाहीत तसेच रजेचा हिशेबही ठेवलेला नाही.

3)महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियम 1981) मधील प्रकरण चार , नियम क्र.36 नुसार कायम कर्मचा-यांची सेवापुस्तके ठेवली आहेत. सदर सेवापुस्तकामध्ये भविष्य निर्वाह निधी, मृत्यू नि सेवानिवृत्ती उपदान व कुटूंब निवृत्तीवेतनासाठी कर्मचा-याने द्यावयाचे नामनिर्देशन पत्राचे नमुने जोडणेत आलेले आहेत. परंतु नामनिर्देशन नमुना फॉर्म कर्मचा-यांनी भरलेले नाहीत.
ब) सेवापुस्तकात नामनिर्देशन न केलेले कर्मचारी

| अ.क्र | नांव | विभाग | नेमणूक दि. |
|---|---|---|---|
| 1 | रविंद्र वसंत सुर्वे | शिपाई घरपट्टी | 01/06/2004 |
| 2 | विनायक भि जामदार | शिपाई, आरोग्य | 01/06/2004 |
| 3 | सचिन चंद्रकांत पोळ | क. लिपिक, बांधकाम | 23/05/2001 |

अर्धसमास ज्ञापन क्र. 30 दि. 26/10/2015 चे अनुपालन अस्थापना विभागाने दि. 05/11/2015 रोजी दिले असुन कर्मचा-यांचे सेवापुस्तकामध्ये वैद्यकीय प्रमाणपत्राच्या नोंदी घेण्यात



DRAFT

आल्या असुन नामनिर्देशन प्रमाणपत्रे कर्मचा-याकडून भरुन घेण्यात आली असल्याचे अनुपालनामध्ये नमुद आहे. परंतु अद्यावत सेवापुस्तके लेखापरीक्षणास दाखविली नसल्याने अस्थापना विभागाने दिलेला खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

DATRYJM7501 (Ref No : 30)

## *6 रजा कालावधीचे वेतन वेतनवाढीच्या दिनांकापासून दिल्याने वेतन व भत्त्याचे अतिप्रदान झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 3048.00/-

***महानगरपालिका कर्मचा-यांना माहे जुलै 2013 मध्ये देण्यात आलेली नियमित वेतनवाढ चुकीची देण्यात आल्याने रक्कम रु.3048/- चे अतिप्रदान झाले आहे.***

सांगली,मिरज व कुपवाड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वेगवेगळया विभागातील कार्यरत कर्मचा-यांची सेवापुस्तके तपासली असता कर्मचा-यांना दि. 01/07/2013 रोजी रजेवर असताना रजेच्या कालावधीचा विचार न करता नियमित दि. 01/07/2013 पासूनची नियमित वेतनवाढ देण्यात आली असून त्याप्रमाणे त्यांना वेतनही अदा केलेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 (रजा) नियम 70 अन्वये कर्मचारी रजेवर असल्यास द्यावयाचे रजा वेतन हे रजेवर जाण्याच्या लगतपर्वी त्याला मिळालेल्या वेतनाइतके मिळण्याचा हक्क आहे.

खालील कर्मचारी हे दि. 01/07/2013 रोजी रजेवर होते. तथापी सदर कर्मचा-यांना दि. 01/07/2013 रोजी नियमित वेतनवाढ देण्यात आली असून वेतनवाढीनुसार वेतन अदा करण्यातही आलेली आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रमाणे ज्यादा प्रदान करण्यात आलेली वेतनाची रक्कम वसूलपात्र आहे. सदर कर्मचा-यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | नांव व पदनाम | रजेचा कालावधी | 1/7/2012 चे वेतन रुपये | 1/7/2013 चे वेतन रुपये | जादा अदा केलेले वेतन रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | रा आ मुंढे, क. लिपिक | 24/06/13 ते 12/07/13 (अर्जित रजा) | 7630+1900 | 7920+1900 | 224 |
| 2 | सु.प्र. चव्हाण, | 01/07/13 ते 07/07/13 | 6180+1300 | 6410+1300 | 104 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | स्कॅव्हेंजर | (अर्जित रजा) | | | |
| 3 | स. चं. आवळे, सफाई कामगार | 01/07/13 ते 15/07/13 (परावर्तीत वैद्यकिय कारण) | 4990+1300 | 5180+1300 | 183 |
| 4 | प. आ. भोरे, स.का. | 17/06/13 ते 01/07/13 | 4800+1300 | 4990+1300 | 12 |
| 5 | रा.स. चव्हाण, सफाई कामगार | 01/07/13 ते 10/07/13 (अर्जित रजा) | 7110+1300 | 7370+1300 | 168 |
| 6 | स.म. मद्रासी, स्कॅव्हेंजर | 01/07/13 ते 10/07/13 (अर्जित रजा) | 6420+1300 | 6660+1300 | 155 |
| 7 | शं.मा. शींदे, क्लीनर | 11/06/13 ते 10/07/13 (वैद्यकिय रजा) | 5590+1300 | 5790+1300 | 129 |
| 8 | अ.तु. बावधनकर, क्लीनर | 21/06/13 ते 11/07/13 (अर्जित रजा) | 6310+1300 | 6540+1300 | 163 |
| 9 | न.कृ. शींदे, लिपिक | 20/06/13 ते 10/07/13 (अर्जित रजा) | 10450+2400 | 108040+2400 | 252 |
| 10 | र.गं. मद्रासी, स्कॅव्हेंजर | 26/06/13 ते 08/07/13 | 6830+1300 | 7100+1300 | 139 |
| 11 | ग. इ. हर्षद, सफाई कामगार | 27/06/13 ते 11/07/13 (अर्जीत परावर्तीत) | 6560+1300 | 6800+1300 | 170 |
| 12 | उ. वि. कांबळे, सफाई कामगार | 24/06/13 ते 03/07/13 (परावर्तीत वै) | 4620+1300 | 4800+1300 | 35 |

DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 13 | छ.धो. कांबळे, सफाई कामगार | 24/06/13 ते 08/07/13 (वै, अर्जित) | 6730+1300 | 6970+1300 | 124 |
| 14 | सा.म. मद्रासी, स्कॅव्हेंजर | 24/06/13 ते 10/07/13 (अर्जित रजा) | 6420+1300 | 4800+1300 | 116 |
| 15 | अ.रि. अब्दुलगणी, कुली | 01/07/13 ते 04/07/13 (अर्जित रजा) | 6310+1300 | 6540+1300 | 59 |
| 16 | प्र. को. सर्वदे, सफाई कामगार | 14/06/13 ते 13/07/13 (अर्जित रजा) | 7110+1300 | 7650+1600 | 453 |
| 17 | डॉ. चा. ने. शहा, डॉक्टर | 01/07/13 ते 03/07/13 (वैद्यकिय) | 20040+4400 | 21610+5400 | 304 |
| 18 | क. रा. पाटील, हरकामी | 24/06/13 ते 12/07/13 (अर्जित रजा) | 4800+1300 | 4990+1300 | 147 |
| 19 | जा. म. सयद, हरकामी | 29/06/13 ते 03/07/13 (अर्जितरजा) | 6420+1300 | 6660+1300 | 46 |
| 20 | बा.ग. भोसले, सफाई कामगार | 01/07/13 ते 05/07/13 (वैद्यकिय रजा) | 5180+1300 | 5380+1300 | 65 |
| | | | | एकुण | 3048 |

सदर बाबत आस्थापना विभागास अर्धसमास ज्ञापन क्र. 31 दिनांक 26/10/2015 रोजी निर्गमित केला असुन आस्थापना विभागाने त्याचे अनुपालन दि. 05/11/2015 रोजी सादर केले आहे. अनुपालनमध्ये सदरील अतिप्रदान झालेली रक्कमांची वसुली डिसेंबर 2015 च्या वेतन देयकामधुन करणेत येत असल्याचे नमुद आहे. परंतु या अतिप्रदानाची वसुली प्रत्यक्षात केली नसल्याने अनुपालन अमान्य करण्यात येत आहे.

**वसुलपात्र रक्कम रु. 3048/-**

DATRYJM7501 (Ref No : 31)

DRAFT

## *12 अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तकामध्ये वारस नामनिर्देशनाच्या नोंदी घेतल्या नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***शासन परिपत्रक महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहा. विभाग शासन परिपत्रक क्र. सफाई-2011/प्र.क्र. 327/विधयो-2 मंत्रालय दि. 21/10/2011 नुसार लाड/ पागे समितीच्या शिफारशी नुसार वारसा हक्कानुसार 32 कर्मचा-यांची नेमणुक 2013-2014 मध्ये केली आहे. सदरील कर्मचा- यांच्या सेवापुस्तकात महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 प्रकरण-3 मधील नियम क्र.11 नुसार उमेदवाराची कायम नियुक्ती करीता किंवा नियुक्ती चालू ठेवण्यासाठी शारीरिक पात्रता प्रमाणपत्राची आवश्यकता असताना तसेच नियम क्र. 16 नुसार वैद्यकिय तपासणी संबंधी सेवा पुस्तकात नोंदी घेतलेल्या नाहीत व आयुक्त यांचे आदेशातील अ.क्र. 12 व 15 च्या अटी पूर्ण केलेल्या नाहीत.***

सांमिकु मनपाच्या आस्थापना विभागाच्या लेखा परीक्षणामध्ये निवडक अधिकारी /कर्मचारी यांची सेवापुस्तक तपासणेत आली आहेत. मनपाच्या आस्थापनावरील सध्या कार्यरत असलेले कायम अधिकारी /कर्मचारी यांची सेवापुस्तके महाराष्ट्र नागरी सेवा व (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियम 1981) मधील प्रकरण 4 नियम क्र. 36 नुसार ठेवली आहेत.

**या बाबत खालील सर्वसाधारण आक्षेप घेण्यात येत आहेत.**

1) अधिकारी/कर्मचारी मनपाच्या सेवेत नियुक्त होताना कुटुंब निवृत्ती वेतनासाठी महाराष्ट्र नागरी सेवा कुटुंब निवृत्ती वेतन नियम 1982 मधील (कुटुंब निवृत्तीवेतन 1950) या प्रकरणामधील नियम क्र.117(7)(अ) नुसार कर्मचा-याने सेवेत कायम झाल्यानंतर कुटुंब निवृत्ती वेतन त्याच्या कुटुंबातील कोणत्या व्यक्तिस देण्यात यावे या साठी नामनिर्देशन पत्र भरुन देणे आवश्यक आहे. तसेच सेवानिवृत्ती उपदान व मृत्यु उपदानासाठी महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील प्रकरण 9, नियम क्र.115 (1) ,(एक)(दोन) नुसार नमुना (1)किंवा (2) मध्ये नामनिर्देशन करुन त्याद्वारे, नियम क्र.111 नुसार प्रदेय होणारे मृत्यू उपदान/ सेवा निवृत्ती त्याच्या कुटुंबातील कोणत्या व्यक्तिस देण्यात यावे या साठी नामनिर्देशन पत्र भरुन देणे आवश्यक आहे. भविष्य निर्वाह निधीसाठी कर्मचा-याने महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियमामधील नियम 7(1) नुसार कुटुंबातील सदस्याचे नामनिर्देशन देणे आवश्यक आहे. परंतु कायम कर्मचा-यांचे सेवापुस्तकामध्ये नामनिर्देशनाचे नमुन्यामध्ये कर्मचा-यांनी त्यांचे वा वारसांची नांवे नोंद करुन त्यावर खातेप्रमुखांची स्वाक्षरी घेतलेली नाही. त्यामुळे सेवेमध्ये असताना कर्मचा-याचा मृत्यु झाल्यास त्याचे वारसांना सदरील लाभ मिळणेमध्ये अडचणी निर्माण होणार आहेत. महानगरपालिकेच्या अस्थापनेवर कार्यरत

DRAFT

कर्मचारी/ अधिकारी यांचे सेवापुस्तकात नामनिर्देशित व्यक्तींच्या नावांच्या नोंदी घेतलेबाबतची नामनिर्देशन पत्रे लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

अर्धसमास ज्ञापन क्र.48 दि.12/01/2016 रोजी निर्गमित केला असुन अस्थापना विभागाने त्याचे अनुपालन दि.22/01/2016 रोजी दिले आहे. अनुपालनामध्ये महापालिका अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांची सेवापुस्तके नोंदी अद्यावत करण्याचे काम चालु असुन नोंदी पुर्ण होताच सेवापुस्तके लेखापरीक्षणास सादर करण्याची दक्षता घेत असलेचे नमुद आहे. परंतु सेवापुस्ताकामध्ये कर्मचारी नामनिर्देशनाच्या नोंदी घेवुन अद्यावत सेवापुस्तके लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाहीत.

DATRYJM7501 (Ref No : 48)

## *19 प्लंबर लायसन्स परवाना,नुतनीकरण व लायसन्सधारक यांचे कामकाजामधील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनिस्स मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 22 मधील कलम 372 नुसार नविन नळ कनेक्शनच्या प्रयोजनासाठी नळ कारागिर म्हणून काम करण्यासाठी एक वर्षाच्या मुदतीसाठी नवीनीकरण करता येईल असे लायसन्स देणेचा अधिकार आयुक्त यांना आहे. त्याप्रमाणे मिरज विभागाने 16 प्लंबरना लायसन्स दिले आहे व त्यांचे कडुन प्रती प्लंबर वार्षिक रु.1600/- रक्कम घेवुन त्यांचे लायसन्सचे नुतनीकरण केले आहे. परंतु नुतनीकरण रक्कम रु.1600/- कोणत्या स्थायी समिती ठरावाने घेण्यात आली आहे. तो ठराव लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेला नसल्याने घेण्यात आलेली नुतनीकरण फी योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 ,प्रकरण 22 लायसन्स आणि परवाने या प्रकरणामध्ये सर्वेक्षक,वास्तुशास्त्रज्ञ किंवा अभियंते,संरचना संकल्प चित्रकार,बांधकाम लिपिक आणि नळकारागीर यांना लायसन्स देणे बाबत काय कार्यवाही करणेचे आहे ते नमुद आहे. या प्रकरणामधील कलम 372 नुसार आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी नळ कारागिर म्हणून काम करण्यासाठी एक वर्षाच्या मुदतीसाठी नवीकरण करता येईल असे लायसन्स देणेचा अधिकार आहे**.** त्यानुसार मिरज विभागात आजमितीस 18 प्लंबर असुन त्यापैकी 17 प्लंबर यांनी रुपये 1600/- प्रमाणे परवान शुल्क महानगरपालिकेकडे भरणा केल्याचे



DRAFT

पाणीपुरवठा विभागाचे जमा पावत्यांचे लेखापरीक्षण केले असता दिसुन आले आहे. त्यांचेकडून शहरातील अधिकृत नळ जोडणी, ड्रेनेज जोडणी, किळकोळ दुरुस्त्या इत्यादी कामे करुन घेण्यात येतात. याबाबत खालील अभिप्राय आहे.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरणामधील कलम 372 नुसार नळ कारागीर यांना नविन नळ कनेक्शनच्या प्रयोजनासाठी नळ कारागिर म्हणून काम करण्यासाठी एक वर्षाच्या मुदतीसाठी नवीनीकरण करता येईल असे लायसन्स देणेचा अधिकार आहे. तसेच अधिनियमाचे कलम 374 नुसार स्थायी समितीस लायसन्सदार नळकारागिरांची फी आणि आकार विहित करणेचा अधिकार आहे. तसेच कोणत्याही लायसन्सदार नळकारागिरास अशा कोणत्याही कामासाठी अशा रितीने विहित केलेल्या फी किंवा आकारापेक्षा अधिक फी किंवा आकार मागता येणार नाही किंवा स्विकारता येणार नसल्याचे नमुद आहे. या बाबत स्थायी समितीने काय दराने नळ कारागिरांची फी व आकार निश्चित केला आहे त्याचा ठराव लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेला नाही. तसेच लायसन्सची रक्कम प्रतीवर्षी रु.1600/- प्रमाणे कोणत्या स्थायी समिती ठरावाप्रमाणे घेतली जाते तो ठराव लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेला नाही.

2) मिरज पाणीपुरवठा विभागाने आर्थिक वर्ष 2013-14 मध्ये एकुण 444 नविन नळ कनेक्शन ग्राहकांचे मागणीनुसार त्यांचेकडून महानगरपालिकेने विहित केलेली रक्कम भरून घेवून कनेक्शन दिली आहेत. मिरज पाणीपुरवठा विभागाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडील मान्यताप्राप्त 16 प्लंबरना नविन कनेक्शन देणेसाठी लायसन्स दिली आहेत. तसेच कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा विभाग कार्यालय,सांगली यांनी दि.05/05/2006 रोजी उपायुक्त यांचेकडे मान्यता प्राप्त प्लंबर्सना ओळखपत्र देणे,त्यांची कार्यालयामध्ये बैठक व्यवस्था करणे,नविन लायसन्सचे अर्ज फक्त लायसन्सधारक प्लंबरमार्फतच कार्यालयास सादर करणे याबाबत टिपणी सादर केली आहे व त्याप्रमाणे काम करणेस उपायुक्त यांनी दि.15/5/2006 ने मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे नविन कनेक्शन मागणी अर्ज प्लंबर मार्फत घेण्यात आले असून त्यासंबंधीत नविन नळ कनेक्शन धारकांचे अर्ज व कागदपत्रे तपासताना महानगरपालिकेच्या प्लंबरने सदरची कामे केल्याबद्दल अर्जावर स्वाक्ष-या केल्या आहेत. परंतु त्यांनी आपल्या नावाचा शिक्का मारुन परवानाधारक क्रमांक त्यात नमुद केलेला नाही. त्यामुळे नविन कनेक्शन कोणत्या प्लंबरने दिले ते समजून येत नाही.

3) पाणीपुरवठा विभागाने अधिकृत प्लंबर लायसन्सधारकांची नोंदवही ठेवणे आवश्यक असता ती ठेवलेली नाही.

याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.63, दि.30/01/2016 रोजी निर्गमित केला असुन पाणीपुरवठा विभागाने अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

DATPPTM5902 (Ref No : 63)

## *21 सांगली पाणीपुरवठा विभागाने ग्राहकांना नविन मिटर कनेक्शन देणेसाठी नळ कारागीर यांना लायसन्स दिले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व मलनिस्स मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड मधील प्रकरण 10 , नियम 18 नुसार नविन नळ कनेक्शनचे काम लायसन्सदार नळ कारागिराव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने करता कामा नये आणि कोणत्याही व्यक्तीने लायसन्सदार नळ कारागिरा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस असे कोणतेही काम करण्याची परवानगी देता कामा नये असे नमुद असतानाही सांगली विभागाने नळ कारागीरांना लायसन्स न देता नविन कनेक्शनचे काम अन्य व्यक्तिकडून करुन घेतले जात आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली पाणीपुरवठा विभागाकडील नविन नळकनेक्शनसाठी नागरीकांना त्यांचे मागणीवरुन रु.200 भरुन घेवून छापील अर्ज दिला जातो. सदर छापील अर्जामध्ये दिलेली नाव,पत्ता व सर्व्हे नंबर इत्यादी माहिती भरुन नागरीक अर्ज पुन्हा पाणीपुरवठा विभागाकडे दाखल करतात. त्यानंतर सदर अर्जावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी होऊन तो परत नोंदणीसाठी कनेक्शन क्लार्ककडे येतो. पाणीपुरवठा खात्याकडील पाईप इन्सपेक्टर विभागाकडून नविन कनेक्शनची जोडणी केली जाते व त्याची नोंद त्यांचेकडील नविन नळ कनेक्शन जोडणी नोंदवहीप्रमाणे 2013 -14 या आर्थिक वर्षामध्ये पाईप इन्सपेक्टर यांचेकडील नोंदवहीमध्ये नमुन असलेनुसार एकूण 2861 ग्राहकांना नविन कनेक्शन दिल्याची नोंद आहे. पाणीपुरवठा विभागाचे नविन नळकनेक्शनसाठी देण्यात येत असलेल्या छापील अर्जामध्ये ग्राहकाचे नाव व पत्ता या मजकुरानंतर नळ कारागिराचे नाव व स्वाक्षरी असा मजकूर अर्जामध्ये आहे. मार्च 2014 मध्ये नविन नळकनेक्शन दिलेल्या 200 अर्जांची तपासणी केली असता नळ कारागिराचे नाव व स्वाक्षरी या मजकुरावर कोणत्याही नळ कारागीराची स्वाक्षरी व नाव नमुद नाही.

याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण 22 नुसार सर्वेक्षक, वास्तु शास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्प चित्रकार, बांधकाम लिपिक आणि नळकारागीर यांना लायसन्स दिली जातात. या प्रकरणामधील कलम 372 नुसार आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी नळ कारागिर म्हणून काम करण्यासाठी एक वर्षाच्या मुदतीसाठी नवीकरण करता येईल असे लायसन्स देणेचा अधिकार आहे. परंतु सांगली पाणीपुरवठा विभागाने एका ही नळ कारागिरास लायसन्स दिलेले नाही. तसेच नविन कनेक्शन बाबतची कार्यवाही कोणामार्फत करण्यात येते याचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.65 नुसार मागणी करुनही केलेला नाही.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम 372 (2) नुसार नळ कारागीरास उपविधी अन्वये विहित करण्यात येईल अशी अर्हता किंवा अनुभव, किंवा दोन्ही असल्याखेरीज, पोटकलम एक अन्वये कोणतेही लायसन्स दिले जाणार नाही असे नमूद आहे. सदरची उपविधी लेखापरीक्षणास दाखविण्यात आलेली नाही. मिरज पाणीपुरवठा विभागाकडे एकूण 16 नळ कारागिर लायसन्सधारक असून त्यांचेकडून नियमाप्रमाणे नविन नळ कनेक्शनच्या जोडण्या देण्यात आल्या आहेत. सांगली व मिरज पाणीपुरवठा विभाग एकाच कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रणाखाली असताना सांगली विभागासाठी लायसन्सधारक नळ कारागीर नेमण्यात आलेले नाहीत. मुंबई प्रांतिक

DRAFT

महानगरपालिका महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 10 मधील नियम 18 नुसार नविन नळ कनेक्शनचे काम लायसन्सदार नळ कारागिराव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने करता कामा नये आणि कोणत्याही व्यक्तीने लायसन्सदार नळ कारागिरा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस असे कोणतेही काम करण्याची परवानगी देता कामा नये असे नमुद असतानाही सांगली विभागाने नळ कारागीरांना लायसन्स दिलेली नाहीत.

3)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम 374 नुसार स्थायी समितीस लायसन्सदार नळकारागिरांची फी आणि आकार विहित करणेचा अधिकार आहे. तसेच कोणत्याही लायसन्सदार नळकारागिरास अशा कोणत्याही कामासाठी अशा रितीने विहित केलेल्या फी किंवा आकारापेक्षा अधिक फी किंवा आकार मागता येणार नाही किंवा स्विकारता येणार नाही असे नमुद आहे. कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा विभाग कार्यालय, सांगली यांनी दि.05/05/2006 रोजी उपायुक्त यांचेकडे मान्यता प्राप्त प्लंबर्सना ओळखपत्र देणे, त्यांची कार्यालयामध्ये बैठक व्यवस्था करणे, नविन लायसन्सचे अर्ज फक्त लायसन्सधारक प्लंबरमार्फतच कार्यालयास सादर करणे, नविन कनेक्शन मागणी अर्ज फक्त लायसन्सधारक प्लंबर यांचे मार्फतच **सांगली पाणीपुरवठा कार्यालय** येथे दाखल करुन घेणे याबाबत टिपणी सादर केली आहे व त्याप्रमाणे काम करणेस उपायुक्त यांनी दि.15/5/2006 ने मान्यता दिली आहे. परंतु या प्रमाणे सांगली पाणीपुरवठा कार्यालयाने प्लंबर्सना लायसन्स न देता अन्य व्यक्तिकडून नविन नळकनेक्शनची कामे करुन घेतली जात आहेत.

सांगली पाणीपुरवठा विभागाने नविन नळ कनेक्शनच्या प्रायोजनासाठी लायसन्सधारक नळ कारागिरांची नेमणुक केली नसल्याने प्रती लायसन्सधारक वार्षिक फी रु.1600/- रक्कम मिळत नसल्याचे स्पष्ट होते. सांगली पाणीपुरवठा विभाग नविन नळ कनेक्शन मंजूरी देणे व नविन नळ कनेक्शन जोडणेसाठी कोणती विहित पध्दत अवलंबिली आहे तसेच नविन नळ कनेक्शनधारकाकडून काय दराने रक्कम घेतली जाते या बाबतचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.65 दि.01/02/2016 अन्वये मागणी करुनही पाणीपुरवठा विभागाने केलेला नाही.

DATPPTM5902 (Ref No : 65)

## *24 ग्रंथालय विभागाने सभासद थकबाकीची रक्कम वसुल केली नसलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

वसूलपात्र रक्कम रु. 11520.00/-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 145(1) नमुना क्रमांक 116 प्रमाणे पावती पुस्तकांचे संग्रह पुस्तक ठेवण्यात आले नाही. 2013-2014 या वित्तीय वर्षात ग्रंथालयातील 64 सभासदांची 180 प्रमाणे थकबाकीची रक्कम रुपये 11520/- वसूल केलेली नाही.***

DRAFT

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या ग्रंथालय विभागाचे 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता ग्रंथालय विभागात 2013-14 या वित्तीय वर्षापर्यंत सभासद नोंदवहीनुसार 1362 सभासद आहेत. दाखला नोंदवही नुसार मार्च 2014 अखेर 66413 पुस्तके आहेत.ग्रंथालय विभागाने रेकॉर्ड विभागाकडून घेतलेले सभासद वर्गणी पावती पुस्तके व सभासद नोंदवहीचे लेखापरीक्षण करुन याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.78 दि.11/03/2016 रोजी निर्गमित केला असुन विभागाने त्याचे अनुपालन दि.18/03/2016 रोजी सादर केले आहे . अनुपालनामध्ये थकीत सभासद वर्गणी वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याबद्दल कळविले आहे. परंतु थकीत सभासद वर्गणी वसुल केली नसल्याने खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) ग्रंथालय विभागाने महानगरपालिकेच्या रेकॉर्ड विभागाकडून 2013-14 या वित्तीय वर्षात एकुण 15 पावती पुस्तके घेतली आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 145(1) नमुना क्रमांक 116 प्रमाणे नोंदणी विभागाकडून घेतलेल्या पावतीपुस्तकाची नोंद संग्रह पुस्तकात घेणे आवश्यक आहे. तसेच नियम 145(2) नुसार संग्रह पुस्तक महिना संपल्यानंतर बंद करुन उर्वरीत पुस्तके संबंधित सक्षम अधिका-याने पडताळून पाहिले पाहिजेत. परंतु ग्रंथालय विभागाने संग्रह पुस्तक ठेवलेले नसल्याने रेकॉर्ड विभागाकडून घेतलेली पावतीपुस्तके व ग्रंथालय विभागाकडे असलेली पावतीपुस्तके यांचा ताळमेळ घेता आलेला नाही.

2) ग्रंथालय विभागात मार्च 2014 पर्यंत सभासद नोंदवहीनुसार 1362 सभासद आहेत. वार्षिक वर्गणी शुल्क नोंदवहीची तपासणी केली असता 64 सभासदांची रु.180/- प्रमाणे थकबाकीची रक्कम रुपये 11520/- ग्रंथालय विभागाने वसूल केलेली नाही.

वसुलपात्र रक्कम रु. 11520/-

DATPKCM7101 (Ref No : 78)

## *32 प्रलंबित दाव्याची माहिती विधी विभाग व वकीलांना दिली नसल्याने प्रलंबित राहिलेल्या दाव्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 1**

*लेखा शीर्ष : विधी मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेतील नगररचना व मालमत्ता विभागांनी दाव्याची कागदपत्रे व माहिती वकीलांना व विधी विभागास सादर केली नाहीत. त्यामुळे वकीलांना माहिती अभावी दावे कोर्टामध्ये चालविता येत नाहीत. दावे विना कैफियत (No WS - No Written statement) अथवा एकतर्फी निकालाच्या आदेशावर चौकशी करीता ठेवली जातात. किंवा सदर दाव्यामध्ये उशिरा माफीचा अर्ज दाखल केल्यानंतर कोर्ट दंड भरण्याच्या अटीवरती उशिरा माफीचा अर्ज मंजूर करुन कैफियत दाखल करुन घेतात. यानंतर सुध्दा कैफियत दाखल न झाल्यास***

***दाव्यांचा निकाल कोर्टामध्ये एकतर्फी दिला जातो. मनपा पॅनेलवरील वकील अॅड ए.आर.देशमुख यांनी नगररचना विभागाने 11 दाव्यांची व मालमत्ता विभागाने 03 दाव्यांची न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असणारी माहिती दिली नसल्याने महानगरपालिकेतर्फे न्यायालयामध्ये म्हणने मांडता आले नसल्याबाबतचे पत्र दि.09/11/2013 रोजी दिले आहे व विधी विभागाने दि.01/08/2013 व दि.14/11/2013 च्या पत्राने संबंधित विभागांना माहिती देणेबाबत सुचित केले आहे. परंतु संबंधित विभागांनी वकीलांना या दाव्यांची माहिती दिली नसल्याने सदरच्या दाव्याबाबत मनपाचे म्हणने मांडता आले नसल्याचे स्पष्ट होते.***

महानगरपालिके विरुध्द एखाद्या व्यक्तीने न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर न्यायालयाकडून समन्स व दाव्याची प्रत आयुक्त यांचे कार्यालयास प्राप्त होते. त्यानंतर आयुक्त यांचे स्वाक्षरीने दाव्याची प्रत विधी विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविली जाते. विधी विभागाकडून वकीलपत्र, पत्ता मेमो व अनुषंगिक खर्चाचे मान्यतेकरीता मुख्य कायदे सल्लागार यांचेकडे कार्यालयीन टिपणी सादर केली जाते. कायदे सल्लागार मनपा पॅनेलवरील वकीलांची सदर दावे करीता शिफारस करुन टिपणी मान्यतेसाठी उपायुक्त यांचेकडे सादर करतात. उपायुक्त सदर टिपणी नुसार कायदे सल्लागार यांनी सुचविलेल्या वकील पॅनेलवरील वकीलास वकीलपत्र देणेस मान्यता देतात. त्यानंतर विधी विभाग दाव्याची झेरॉक्स प्रत, वकील पत्र, पत्ता मेमो ज्या विभागाशी दावा संबंधित आहे त्या विभागास पॅरावाईज माहिती व अनुषंगीक कागदपत्रे याची माहिती वकीलांना सादर करणेसाठी पाठविली जाते. याबाबत खालील अनियमितता आहे.

1) खालील विभागांनी दाव्याची कागदपत्रे व माहिती वकीलांना व विधी विभागास सादर केली नाही. त्यामुळे वकीलांना माहिती अभावी दावे कोर्टामध्ये चालविता येत नाहीत. त्यामुळे दावे विना कैफियत (No WS - No Written statement)अथवा एकतर्फी निकालाच्या आदेशावर चौकशी करीता ठेवली जातात. किंवा सदर दाव्यामध्ये उशिरा माफीचा अर्ज दाखल केल्यानंतर कोर्ट दंड भरण्याच्या अटीवरती उशिरा माफीचा अर्ज मंजूर करुन कैफियत दाखल करुन घेतात. यानंतर सुध्दा कैफियत दाखल न झाल्यास दाव्यांचा निकाल कोर्टामध्ये एकतर्फी दिला जातो.

विधी विभागाचे पत्र दि. 01/08/2013 व दि. 14/11/2013 रोजी सहाय्यक संचालक नगररचनाकारनगररचना विभाग सांगली व मालमत्ता व्यवस्थापक मालमत्ता सांगली यांना विविध दाव्यामध्ये वकिलांना पॅरावाइज माहिती व कागदपत्रे देण्यासंबंधी कळविले होते. पॅरावाईज माहिती व कागदपत्रे मिळाली नसल्यामुळे वकिलांना कोर्टातील दाव्या संबंधी 2 ते 3 तारखा होऊनही महानगरपालिकेतर्फे म्हणने दाखल करता आलेले नाही. सदर दाव्यासंबंधी माहिती वेळेत न मिळाल्यामुळे महानगरपालिकेच्या वकील पॅनलवरील वकील अॅड. अरविंद रामराव देशमुख यांनी दि. 09/11/2013 रोजी महानगरपालिकेस कळविले आहे. माहिती न मिळालेल्या प्रलंबित दाव्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**नगररचना विभागातील प्रलंबित दावे.**

| अ.क्र | दावा क्रमांक | वादी | प्रतिवादी | वकीलांचे नांव | पूर्ततेबाबतचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 390/10 | श्री.बाळगोंडा पाटील | महानगरपालिका | अॅड.ए.आर देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट देणे |

DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 749/12 | श्री. कृष्णा गोरे | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट देणे |
| 3 | 713/12 | श्री. गंगाधर पाटील | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट देणे |
| 4 | 193/11 | श्री. सतिश जाधव | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | कैफीयत/म्हणने देणे |
| 5 | 214/12 | श्रीमती. सुशीला पाटील | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट देणे |
| 6 | 197/12 | महा.स्मॉल.स्के.इंड | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट देणे |
| 7 | रे.दर 57/11 | श्री. सतिश जाधव | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट देणे |
| 8 | अ. 24/13 | श्री. सुमन मगनगीरी | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | त्वरीत चर्चा करणे |
| 9 | कि.अ. 36/12 | श्री. गोपाळराव गवळी | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | पुरावा सादर करणे |
| 10 | 291/08 | श्री. गणपतराव पवार | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट देणे |
| 11 | रे.दर 99/10 | श्री. बाळगोंडा पाटील | महानगरपालिका | ॲड.ए.आर देशमुख | कागदपत्रे व म्हणने देणे |

**मालमत्ता विभागातील प्रलंबित दावे**

| अ.क्र | दावा क्रमांक | वादी | प्रतिवादी | वकीलांचे नांव | पूर्ततेबाबतचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 60/2013 | श्री.अशोक कारंडे | महानगरपालिका | ॲड ए.आर. देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट/कागदपत्रे न दिलेबाबत |

DRAFT

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 55/2011 | श्री.राजीव करुणादित्य | महानगरपालिका | ॲड ए.आर. देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट/कागदपत्रे न दिलेबाबत |
| 3 | 390/12 | न्यु.महा.एज्यु. सोसा. | महानगरपालिका | ॲड ए.आर. देशमुख | पॅरावाईज रिपोर्ट/कागदपत्रे न दिलेबाबत |

महानगरपालिकेच्या नगररचना विभाग व मालमत्ता विभागाने प्रलंबित दाव्याची माहिती विधी विभागास व संबंधित विभागांना का दिली नाही तसेच कागदपत्रे न दिल्याने कोर्टाचा निकाल महानगरपालिकेच्या विरोधी लागणार असल्याने सदर कर्मचा-याविरुध्द महानगरपालिकेने कारवाई करणे आवश्यक असता त्यांचे विरुध्द कोणतीही कारवाई केलेली दिसून येत नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 50 दि. 12/01/2016 रोजी निर्गमित केले असता विधी विभागाकडून अनुपालन प्राप्त झाले नाही.

DATPKCM7101 (Ref No : 50)

## *61 सफाई कर्मचा-यांची चुकीची वेतननिश्चिती केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम 2009 मधील नियम 10 नुसार जे कर्मचारी विद्यमान वेतन श्रेणीतील कमाल वेतन 1 जानेवारी 2006 रोजी एक वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधी पर्यंत घेत होते त्यांच्या बाबतीत सुधारीत वेतन संरचनेत दिनांक 1 जानेवारी 2006 रोजी पुढील वेतनवाढ देय असताना दिलेली नाही.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या 2013-14 चे लेखा परीक्षणामध्ये निवृत्ती वेतन उपदान, अंशराशीकरण इ. च्या आदा प्रमाणकाची तपासणी करताना खालील कर्मचारी दि.11/01/2006 रोजी 5 व्या वेतन आयोगातील विद्यमान वेतनश्रेणीमध्ये कमाल वेतन एक वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधी पर्यंत घेत होते. त्यानुसार त्यांना 6 व्या वेतन आयोगानुसार दि. 01/01/2006 रोजी सुधारीत वेतन संरचनेत आणखी एक वेतनवाढ दिली नसल्याचे आढळून आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.24 दि.31/09/2015 रोजी निर्गमित केला असुन आस्थापना विभागाने त्याचे अनुपालन दि.31/12/2015 रोजी दिले आहे. अनुपालनामध्ये सदर कर्मचा-यांची फेरवेतननिश्चिती करुन त्यांना झालेल्या कमी प्रदानाची रक्कम आदा करण्याची कार्यवाही चालु असल्याचे नमुद केले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम 2009 मधील नियम 10 नुसार जे कर्मचारी विद्यमान वेतन श्रेणीतील कमाल वेतन 1 जानेवारी 2006 रोजी एक वर्ष किंवा त्याहून अधिक



DRAFT

कालावधी पर्यंत घेत होते त्यांच्या बाबतीत सुधारीत वेतन संरचनेत दिनांक 1 जानेवारी 2006 रोजी पुढील वेतनवाढ देय आहे.

| अक्र | कर्मचा-याचे नांव व पदनाम | 5 वे वतन आयोगातील कमाल वेतन दिनांक | दिनांक 1/1/2006 रोजी केलेले वेतन रुपये | दिनांक 1/1/2006 रोजी निश्चित करावयाचे वेतन रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | लता युवराज वाघमारे, सफाई कामगार | 1/1/2005 | 5960+1300=7260 | 5960+280=6180+1300=7480 |
| 2 | चिंगु बबन आवळे. सफाई कामगार | 1/3/2004 | 5960+1300=7260 | 5960+280=6180+1300=7480 |
| 3 | छबुताई मधुकर काळे सफाई कामगार | 1/10/2004 | 5960+1300=7260 | 5960+280=6180+1300=7480 |
| 4 | चंदाबाई बापू ठोकळे सफाई कामगार | 1/10/2004 | 5960+1300=7260 | 5960+280=6180+1300=7480 |

DRAFT

वरील कर्मचारी हे सेवानिवृत्त झाले असुन त्यांचे 6 व्या वेतन आयोगातील वेतन निश्चीती चुकीची झाल्याने संबंधीतांना वेतन, निवृत्ती वेतन, उपदान, अंशराशीकरण यांचे प्रदान कमी झाले आहे.

DATRNDM7201 (Ref No : 24)

## ***63 सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्तीवेतन व सेवा उपदानाच्या रक्कमेचे कमी प्रदान झालेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***आस्थापना विभागाने श्रीम.इंदुबाई रामचंद्र लोंढे या सेवानिवृत्त कर्मचा-यास रु. 10500/- उपदान रक्कमेचे कमी प्रदान झाले आहे व श्रीम. चंद्राबाई बापू ढोकळे या सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांना 6 व्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीमध्ये 1 वेतनवाढ कमी देण्यात आली आहे. तसेच निवृत्तीवेतन, सेवा उपदान व अंशराशीकरणाची रक्कमेचे कमी प्रदान करण्यात आले आहे.*** |

DRAFT

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या दि. 20/03/2014 या वित्तीय वर्षाच्या लेखा परीक्षणामध्ये खालील सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्ती वेतन, सेवा उपदान यांची परिगणना चुकीची झाल्याने कमी प्रदान झाल्याचे आढळुन आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 26 निर्गमित केला असुन आस्थापना विभागाने त्याचे अनुपालन दि. 31/12/2013 रोजी सादर केले आहे. चुकीचे निश्चीतीमुळे कमी प्रदान झालेली रक्कम फेर निश्चीती करुन फरक रक्कम देणेची कार्यवाही ठेवत असल्याचे व पुर्तता लेखा परीक्षणास सादर करण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. यावर लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) श्रीम.इंदुबाई रामचंद्र लोंढे सेवानिवृत्त सफाई कामगार या दि. 01/09/1991 रोजी सेवेत नियमीत झाल्या असून त्यांनी दि. 30/11/2012 रोजी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. त्यांचे सेवानिवृत्ती वेळी शेवटचे वेतन बँड 4440-7440 मधील वेतन रु. 7670/- व ग्रेड वेतन 1300 एकुण 8970 असताना नस्तीमधील निवृत्ती वेतन परिगणनापत्रकामध्ये उपदान परिगणनेसाठी 7970/- गृहीत धरुन 42 सहामाही अर्हताकारी सेवेसाठी 2012-13 मध्ये रु. 83685/- आदा केले आहेत. प्रत्यक्षात त्यांना शेवटचे वेतन 8970/- नुसार 94185/- देय असल्याने रु. 10500/- उपदान कमी प्रदान झाले आहे.

2) श्रीम.चंद्राबाई बापू ढोकळे सेवानिवृत्त सफाई कामगार यांची अर्हताकारी सेवा 28 वर्ष 7 महिने 15 दिवस म्हणजे 57 सहामाही कालावधी होत असताना नस्तीमधील निवृत्ती वेतन परिगणनापत्रकामध्ये 56 सहामाही कालावधी नुसार सेवा उपदान गणना केल्याने त्यांना प्रमाणक क्र. 048 दि. 12/06/2013 अन्वये रु. 161144/- प्रदान करण्यात आले. त्यामुळे रु. 2310/- सेवा उपदान कमी मंजूर व आदा झाले आहे. तसेच त्यांना 6 वे वेतन आयोगानुसार वेतन निश्चीतीमध्ये दिनांक 01/01/2006 रोजी एक वेतनवाढ कमी दिली आहे. त्यामुळे त्यांना वेतन व भत्ते,निवृत्तीवेतन व सेवा उपदानाचे कमी प्रदान झाले आहे.

3) मोहन वसंत गोंधळे, सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे सेवा पुस्तकामध्ये दि. 01/07/2012 रोजीचे वेतन 7390/- व ग्रेड वेतन 1600 नमुद होते. परंतु 01/07/2012 रोजी वेतन 7660 व ग्रेड वेतन 1300 नमुद केले आहे. व त्यानुसार नस्तीमधील निवृत्ती वेतन परिगणनापत्रकामध्ये 7660+1300=8960 या वेतनावर निवृत्ती वेतन, सेवा उपदान व अंशराशीकरण रक्कम यांचे गणना करुन मंजूर व आदा केल्याने त्यांना खालील प्रमाणे निवृत्ती वेतन, उपदान व अंशराशीकरण यांचे

कमी प्रदान झाले आहे.

| अ.क्र. | तपशील | देय रक्कम रुपये | आदा रक्कम रुपये | प्र.क्र. दिनांक | कमी आदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | निवृत्ती वेतन दि. 1/6/2013 पासून | 4630/- | 4480/- | | 150/- |
| 2 | सेवा उपदान | 101860/- | 94080/- | 112 17/10/2013 | 7740/- |
| 3 | अंशराशीकरण रक्कम | 193526/- | 187257/- | 181 12/12/2013 | 6269/- |

DATRNDM7201 (Ref No : 26)

## *64 वैद्यकिय प्रमाणपत्रा शिवाय मंजूर करण्यात आलेला असाधारण रजा अर्हताकारी सेवेतुन कमी न केल्याने निवृत्ती वेतन व उपदान यांचे अतिप्रदान झाले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सेवानिवृत्त चार सफाई कर्मचा-यांच्या सेवापुस्तकाची तपासणी केली असता त्यांचे सेवापुस्तकामध्ये नमुद असलेल्या विनापरवाना गैरहजर, वैद्यकिय कारणाशिवाय इतर कारणावरुन घेतलेल्या बिनपगारी रजा, असाधारण रजा इत्यादी कालावधी, अर्हताकारी सेवा कालावधीमधुन कमी न केल्याने त्यांना निवृत्ती वेतन/ कुटुंब निवृत्ती वेतन, सेवा उपदान/ मृत्यु/ नि/ सेवा उपदान अंशराशीकरण रक्कम इ. चे अतिप्रदान होत असल्याचे आढळुन आले आहे.***

सांगली मिरज कुपवाड मनपाचे 2013-14 च्या लेखा परीक्षणामध्ये सेवानिवृत्ती वेतन प्रकरणांची तपासणी केली असता खालील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामध्ये नमुद असलेल्या विनापरवाना गैरहजर,



DRAFT

वैद्यकिय कारणाशिवाय इतर कारणावरुन घेतलेल्या बिनपगारी रजा, असाधारण रजा इत्यादी कालावधी, अर्हताकारी सेवा कालावधीमधुन कमी न केल्याने त्यांना निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन, सेवा उपदान/मृत्यु/नि/सेवा उपदान अंशराशीकरण रक्कम इ. चे अतिप्रदान होत असल्याचे आढळुन आले.

1) वैजयंता खीमाजी भीसे सफाई कामगार
2) सुनंदा केशव कांबळे सफाई कामगार
3) सत्वशीला तानाजी सनदे सफाई कामगार
4) मोहन वसंत गोंधळे सफाई कामगार

याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 27 दि.29/09/2015 अन्वये आस्थापना विभागास कळविण्यात आले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 31/12/2015 रोजी सादर केले असुन त्यामध्ये त्यानी आक्षेपा प्रमाणे कार्यवाही करुन निवृत्ती वेतन उपदान पत्रक तयार करुन पुढील कार्यवाही ठेवण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) 1982 चे नियम 35 प्रमाणे सतत सेवेच्या कालावधीतल्या सर्व रजा आणि वैद्यकिय प्रमाणपत्रानुसार मंजूर करण्यात आलेल्या सर्व असाधारण रजा निवृत्ती वेतनासाठी अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे वरील कर्मचारी यांचे सेवापुस्तकात नोंदविलेल्या असाधारण रजा वैद्यकिय कारणास्तव असल्याचे स्पष्टपणे उल्लेख नसल्याने सदरच्या अर्हताकारी सेवेत हिशोबात घेता येणार नाहीत.

सेवापुस्तकामध्ये असाधारण रजेची नोंद रकाना क्र. 36 मध्ये लाल शाईने नोंदविणे आवश्यक असताना तशा नोंदी वरील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात घेण्यात आल्या नाहीत.

शासन निर्णय दि. 09/11/1990 नुसार असाधारण रजा कालावधीच्या 1/10 प्रमाणे अर्जित रजा (मर्यादित 15 दिवस) व 1/18 प्रमाणे अर्धवेतनी रजा पुढील सहामाही कालावधीची रजा जमा करतेवेळी कमी करणे आवश्यक आहे. परंतु अशी रजा वरील कर्मचा-यांच्या रजा लेख्यातून कमी केली नसल्याचे आढळुन आले. त्यामुळे त्यांचे रजा लेख्यातील शिल्लक रजा चुकीची असल्याने त्यांचे शिल्लक अर्जित रजा रोखीकरण मध्ये ही अतिप्रदान झाले आहे.

DATRNDM7201 (Ref No : 27)

## *66 कुपवाड विभागामधील मालमत्तांना मालमत्ता कर आकारणी विलंबाने केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 02**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 3839.00/-

| |
|---|
| ***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील अनुसूची ड, प्रकरण 8 चे नियम 5 (1) व (2) नुसार मालमत्ता*** |

DRAFT

***कर देण्यास प्रथमतः पात्र असलेल्या व्यक्तीनी नव्याने उभारण्यात आलेली किंवा पुन्हा बांधण्यात आलेली इमारत यथास्थीती, पुरी होणे किंवा तिचा भोगवटा करणे यापैकी जी गोष्ट प्रथम घडेल ती गोष्ट घडल्याच्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत आयुक्तास त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे. व त्यानंतर अशा इमारतीची पाहणी करुन उक्त अधिनियमाच्या नियम 7 प्रमाणे सदर इमारतीचे कर योग्य मुल्य ठरवुन करनिर्धारण करणे आवश्यक आहे. परंतु मालमत्ता धारकाकडुन विलंबाने कर निर्धारण केल्याने महानगरपालिकेचे रक्कम रु. 3839/- चे नुकसान झाले आहे.***

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या कुपवाड विभागाकडील कर संकलन व कर निर्धारण विभागा कडील दि. 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये नव्याने आकारणी केलेल्या 243 प्रकरणापैकी निवडक प्रकरणांची तपासणी केली असता खालील मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी विलंबाने केल्याचे आढळुन आले आहे.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची ड, प्रकरण 8 चे नियम 5 (1) व (2) नुसार मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीनी नव्याने उभारण्यात आलेली किंवा पुन्हा बांधण्यात आलेली इमारत यथास्थीती, पुरी होणे किंवा तीचा भोगवटा करणे यापैकी जी गोष्ट प्रथम घडेल ती गोष्ट घडल्याच्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत आयुक्तास त्यासंबंधी लेखी नोटीस दिली पाहिजे. व त्यानंतर अशा इमारतीची पाहणी करून उक्त अधिनियमाच्या नियम 7 प्रमाणे सदर इमारतीचे कर योग्य मुल्य ठरवुन करनिर्धारण करणे आवश्यक आहे. परंतु खालील मालमत्ता धारकाकडुन विलंबाने कर निर्धारण केल्याने महानगरपालिकेचे रक्कम रु. 3839/- चे नुकसान झाल्याचे आढळुन आले आहे.

श्री.संजिवन शंकर कोष्टी ,राजबाग विद्यानगर, कुपवाड यांनी बांधकाम परवाना दि.30/09/2011 रोजी घेतला असुन मालमत्ताधारकाने करनिर्धारणासाठी केलेल्या दि. 13/02/2013 चे अर्जामध्ये त्याने सदर इमारतीचा भोगवटा दि. 10/02/2013 पासून केल्याचे नमुद आहे व घरपट्टी विभागाने या इमारतीचे करनिर्धारण रक्कम रु. 2679/-, दि.01/04/2013 रोजी केले आहे. परंतु महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने दिलेल्या बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रामधील अट क्र. 2 नुसार प्रारंभ प्रमाणपत्राची मुदत एक वर्ष असल्याने एक वर्ष मुदतीत इमारत बांधणे आवश्यक आहे. तसेच इमारत पुर्ण नसल्यास प्रारंभप्रमाणपत्राचे नुतनीकरण करून घेणे आवश्यक आहे. या इमारतीचे प्रारंभ प्रमाणपत्र दि.30/09/2011 रोजी घेतल्याने घरपट्टीचे निर्धारण दि.01/10/2012 रोजी करणे ऐवजी दि.01/04/ 2013 रोजी 6 महिने विलंबाने केल्याने या 6 महिन्याची कमी घेतलेली रक्कम रु.1340/- मालमत्ताधारकाकडुन वसुल करावी.

2) विजय श्रीनिवास कागलकर रा.कुपवाड यांनी दि. 20/07/2011 रोजी बांधकाम परवानगी घेतली असुन भोगवटा प्रमाणपत्र दि. 12/12/2012 रोजी घेतले आहे. परंतु घरपट्टी विभागाने या इमारतीचे करनिर्धारण दि.01/04/2013 पासुन रक्कम रु. 7496/- केले आहे. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेच्या तारखेपासुन करनिर्धारण न करता 4 महिने विलंबाने केल्याने या 4 महिन्याची कमी घेतलेली रक्कम रु.2499/- भोगवटाधारकाकडुन वसुल करण्यात यावी.

वसुलपात्र रक्कम रु. 1340 + रु. 2499 = रु.3839/-



DRAFT

## *81 UIDSSMT योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या उपांगाचे काम अपुर्ण असल्याने, पुर्ण झालेल्या उंच टाक्या व वितरण व्यवस्था या उपांगावर झालेला खर्च रु.4866.89 लक्ष गुंतुन पडल्याबाबत.*

**UIDSSMT**
**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 01**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनि: सा केंद्र,राज्य व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 4866.89 /-

***UIDSSMT योजनेमधुन महानगरपालिकेने प्रथम जलशुध्दीकरण केंद्राचे काम पुर्ण करुन तो पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करणे आवश्यक होते. परंतु त्याऐवजी उंच टाक्यांची व वितरण व्यवस्थेची कामे करुन त्या कामावर शासन व मनपा हिश्श्यामधुन खर्च न करता रक्कम रु. 4866.89/- शासननिधी मधुन खर्च केल्याने पैशाअभावी तसेच योग्य नियोजना अभावी या योजनेचा मुख्य स्त्रोत असलेली 70MLD जलशुध्दीकरण केंद्र बांधणे व अस्तित्वातील 36 MLD जलशुध्दीकरण केंद्राची दुरूस्ती करणे ही कामे रखडल्याने कुपवाड शहरासाठी बांधण्यात आलेल्या उंच टाक्या व वितरण व्यवस्थेवर करण्यात आलेला खर्च रु.4866.89 लक्ष गुंतुन पडल्याचे स्पष्ट होते.***

DRAFT

केंद्रशासन पुरस्कृत UIDSSMT अंतर्गत सांगली कुपवाड सुधारीत पाणी पुरवठा योजना.

1) मंजुर दिनांक :- सप्टेंबर 2006
2) मंजुर किंमत :- रु. 79.02 कोटी
3) प्राप्त निधी :- केंद्र 80% व राज्य शासन 10% - रु.63.22/- कोटी + रु.7.75/- कोटी, मनपा हिस्सा 10%:- रु. 11.09 कोटी
4) काम सुरु दिनांक :- मे 2009
5) लोकसंख्या
 अ) सन 2001 :- 436781
 ब) सन 2011 :- 502697
6) मे 2015 अखेर खर्च :- रु. 82.06 कोटी

केंद्रशासन पुरस्कृत UIDSSMT कार्यक्रमांतर्गत वाढीव व सुधार सांगली कुपवाड नळपाणीपुरवठा योजनेस माहे सप्टे.2006 रोजी मान्यता मिळाली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनाकडून कामाच्या पहिल्या टप्प्यासाठी दिड वर्ष विलंबाने दि.11/03/2008 मध्ये रक्कम रु.14.78 कोटी अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे. सदर निधी येण्यास विलंब झाल्यामुळे

योजनेच्या किंमतीमध्ये वाढ होवुन योजनेची किंमत रु. 12825.46 लक्ष झाली आहे. केंद्र शासनाने योजना मंजूर करताना या योजनेच्या वाढीव खर्चाची पुर्ण जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील या साठी कोणतेही जादाचे अनुदान शासनाकडुन मिळणार नसल्याची अट घातली आहे. त्यामुळे योजनेच्या कामास निधी अपुरा पडुन योजना रखडण्याची शक्यता होती. वरील परिस्थितीतीत योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी दि.8 मे 2009 रोजी मा.मंत्री गृह यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे बैठक झाली. या बैठकीस मा. प्रधान सचिव पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे समवेत अधिकारी व पदाधिकारी उपस्थितीत होते. या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

1)UIDSSMT प्राप्त अनुदान रक्कम रु.14.78 कोटी या मधुन कुपवाड झोनसाठी मंजुर योजनेमधील कामांची निविदा अंतिम करुन पुर्ण ठेव तत्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन काम पुर्ण करुन घ्यावयाचे आहे. त्यानुसार हे काम पुर्ण झाले आहे.

2)मंजुर योजनेपैकी अशुध्द पाण्याच्या दाबनलिकेचे काम सध्या अस्तित्वात असलेल्या कृष्णा नदीवरील जॅकवेल पासुन माळबंगला पर्यंत 1219 मिमि व्यासाची एमएस पाईप लाईन 3500 मिटरची टाकणे हे काम महानगरपालिकेने मंजुर योजनेमधील अकृतीबंधानुसार महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी रक्कमेमधुन त्वरीत हाती घेण्यात यावे.

3) सध्या सुजल निर्मल योजना महाराष्ट्र शासनाकडून चालु करण्यात आली असुन या अंतर्गत प्रस्तावित करावी लागणारी कामे व UIDSSMT योजनेमध्ये मंजुर असलेल्या उपांगांचे तांत्रिक सल्लागारामार्फत एकात्मिक अभ्यास करावा व तद्नंतर प्राधान्य ठरवुन कामे हाती घेण्यात यावीत.

सुचना क्र.3 नुसार या मंजूर योजनेत सांगली शहरासाठी वितरण व्यवस्था व जलकुंभांची तरतूद नसल्याने महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान अंतर्गत भाग घेवुन कांही उपांगे घेण्यात आली आहेत. UIDSSMT व सुजल निर्मल अभियान अंतर्गत प्राप्त निधीचा मर्यादेत आवश्यक कामांचा विचार व एकत्रित अभ्यास करून शहरासाठी ठोस पाणी पुरवठा योजना करावी या हेतूने महापालिकेने मे.डी.आर.ए.कन्सलटंट, नागपुर यांचे तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक केली. त्याचे अहवालनुसार UIDSSMT अंतर्गत पहिल्या टप्यात अस्तित्वातील कृष्णा नदी उद्भव ठेवुन चांगली शुध्दीकरण प्रक्रिया राबवुन नागरीकांना स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा करणेच्या दृष्टीने आवश्यक त्या वितरण व्यवस्था, उंच जलकुंभ, उध्दरण नलिका, जलशुध्दीकरण केंद्रांची दुरूस्ती, अस्तित्वातील उंच जलकुंभाची दुरूस्ती, 70 एम.एल.डी. क्षमतेचा आधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे इत्यादी कामांचा मूळ मंजूर योजनेत अंर्तभाव करून कामे करणेचे ठरले. तसेच दुस-या टप्यात वारणा उद्भव पर्यतची उर्वरीत कामे निधीच्या उपलब्धतेप्रमाणे करणेचे ठरले होते.

मे.डी.आर कन्सल्टंट नागपूर यांनी दोन्ही योजनांचा एकत्रित अभ्यास करुन त्याचा अहवाल सादर केला आहे. त्यांच्या अहवालानुसार सुजल निर्मल योजने अंतर्गत त्यांनी सुचविलेल्या कामांचे अंदाज पत्रक व आराखडे तयार करुन शासनास सादर करुन मंजुर करुन घेण्यात आले आहेत. UIDSSMT योजनेबाबत त्यांनी दिलेल्या अहवालानुसार मंजुर योजनेत तांत्रिक बदल करुन मा.मुख्य अभियंता,

DRAFT

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभाग यांच्या तांत्रिक मंजुरी नंतर पुढील कार्यवाहीसाठी सदर अंदाजपत्रके मा.संचालक, नगरपरिषद संचालनालय वरळी मुंबई यांचेकडे दि.22/10/2010 रोजी पाठविण्यात आली होती. त्या बैठकीत मिळालेल्या सुचनेप्रमाणे प्रस्तावात किरकोळ बदल करुन पुन्हा मा.मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे दि. 01/01/2011 रोजी सादर करण्यात आले होते. त्यास त्यांचे पत्र क्र.No.CE(Pune)/TB-3/SangliWSS/Tech.Deviation/C320/68 Dated 06/01/2011 ने योजनेच्या बदलांना तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेच्या बदलांना व त्याप्रमाणे काम करण्यास महासभा क्रमांक 03 (विस) ठराव क्र.193, विषय क्र.03 दि.10/05/2011 रोजी मान्यता मिळाली आहे. सदर सुधारित प्रस्ताव नगरपरिषद संचालनालयाकडून केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता . Govt. of India ,Ministry of Urban Development, Encloser to Note No. Q12045 / 15/ 2/ UIDSSMT / 08- CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे. त्यानुसार योजनेची सुधारित appraisal cost रु.14597.05 लाख या रक्कमेला मान्यता दिली आहे व योजनेची मुळ किंमत रु.7902/- लाख व सुधारित किंमत रु.14597.05 लाख या मधील फरक रक्कम रु.6695/- लाख रक्कमेची तरतुद राज्यशासन व महानगरपालिका यांनी स्वनिधीमधुन करण्याबाबत नमुद आहे.

मे 2010 मध्ये पहिल्या हप्त्यातील उर्वरीत रू.20.60 कोटी इतका निधी शासनाकडून महापालिकेस प्राप्त झाला असुन प्राप्त निधीतुन मंजूर योजनेमधील कुपवाड, वानलेसवाडी या भागासाठी पाच उंच जलकुंभ व त्यासाठी लागणा-या उध्दरण नलिका आणि 95 कि.मी. लांबीची वितरण व्यवस्थेची कामे प्राधान्याने घेवुन काम पुर्ण झाल्याचे तसेच याबरोबरच शामनगर, गव्ह.कॉलनी व कापसे वसाहतीसाठी लागणारे वितरण व्यवस्थेसाठी 100 मी.मी. ते 600 मी.मी. व्यासाचे एकूण 95 की.मी. लांबीच्या पाईप लाईनचे काम पुर्ण झाल्याचे पाणीपुरवठा विभागाने जानेवारी 2016 रोजीचे संक्षिप्त टिपणीमध्ये नमुद केले आहे .

वरील काम पूर्ण झालेनंतर कुपवाड शहरातील सर्व वसाहतीमध्ये सध्या भेडसावणारा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असुन शहरात उच्च दाबाने नियमितपणे दररोज किमान दोन वेळा पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे. तसेच एम.आय.डी.सी.कडून पाणी विकत घेणे पोटी येणारे वार्षिक रक्कम रू.1 कोटीच्या खर्चाची बचत होणार आहे. ग्राहक संख्या वाढुन महापालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे. असे या योजनेच्या नस्तीमधील पाणीपुरवठा विभागाने दि.19/03/2012 रोजी लिहिलेल्या टिपणीमध्ये नमुद केले आहे. जानेवारी 2016 च्या पाणीपुरवठा विभागाच्या संक्षिप्त टिपणीचे अवलोकन केले असता खालील कोष्टकामध्ये दिलेल्या कामापैकी अ.क्र. 1 ते 14 वर कुपवाड झोनमध्ये करण्यात आलेली कामे जानेवारी 2012 मध्ये पुर्ण झाली असुन या योजनेमधुन त्या भागासाठी पाणीपुरवठा सुरु झाला असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे या भागामध्ये MIDC कडून पाणी विकत घेणे बंद होणे आवश्यक होते. परंतु महानगरपालिकेच्या 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता पृष्ठ क्र. 42 वर द्विनोंद कोड B2833, MIDC पाण्याचा आकार

DRAFT

या लेखाशिर्षांतर्गत 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये रु.14423395/- व 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये रु.8988376/- MIDC ला त्यांचेकडून घेतलेल्या पिण्याच्या पाण्याचे भाडेपोटी दिले आहेत. तसेच 2014-15 या आर्थिक वर्षाचे नोव्हेंबर अखेर पाण्याच्या भाडेपोटी रु.4892368/- MIDC ला आदा केले आहेत. तसेच मार्च 2015 पर्यंत रु.3607632/- आदा करणे अपेक्षित असल्याचे अंदाजपत्रकामध्ये नमुद केले आहे. आर्थिक वर्ष 2015-16 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये MIDC ला पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी दयावयाच्या भाडेपोटी रु.1 कोटी तरतुद केली आहे. यावरुन या भागामध्ये पाण्याच्या टाक्यांचे व वितरण नलिकांचे काम पुर्ण होवुनही महानगरपालिकेकडुन पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याचे त्यांना MIDC कडुन पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे स्पष्ट होते. याबाबत पाणीपुरवठा विभागाकडील शाखा अभियंता व कर्मचा-याशी चर्चा केली असता असे निदर्शनास येते की या योजनेच्या सर्व उपांगांना माळबंगला येथील 70 दललि क्षमतेच्या नविन जलशुध्दीकरण केंद्रामधून तसेच माळबंगला येथील अस्तित्वातील 39 दललि क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती केलेनंतर व क्षमता वाढविण्याचे काम पुर्ण झालेनंतर पाणी मिळणार आहे . या जलशुध्दीकरण केंद्रामधुन शुध्द पाणी पंपिंग करुन माळबंगला ते कापसे वसाहतपर्यंत टाकण्यात आलेल्या 600 मिमि व्यासाच्या दाबनलिकेतून कापसे वसाहत येथील 13.80 लक्ष लिटर क्षमतेची संतुलन टाकी भरण्यात येणार आहे व सदर टाकीमधुन शालीनीनगर, शरदनगर, वानलेसवाडी , वाघमोडेनगर, कुपवाड गावठाण या ठिकाणी बांधण्यात आलेल्या टाक्यांना पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. सदर टाक्यामधुन या भागामध्ये टाकण्यात आलेल्या वितरण नलिकेद्वारे पाणी नागरीकांना नळाद्वारे पुरविण्यात येणार आहे. या योजनेची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

UIDSSMT योजने अंतर्गत पुर्ण झालेली कामे :-

| अ.क्र. | कामाचे नांव | मंजूर किंमत लक्ष रु. | अपेक्षित खर्च लक्ष रु. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| 1 | अस्तित्वातील जॅकवेल ते माळबंगला जलशुध्दीकरण केंद्रपर्यंतचे 1219 एमएम व्यासाची दाबनलिका लांबी 3500 मी. ( Rising Main) | 734.89 | 810.00 | सदर कामे माहे डिसेंबर 2011 मध्ये पूर्ण झाले असून कार्यन्वित करणेत आले आहे. यामुळे माळबंगला येथील जलशुध्दीकरण केंद्रास पूर्वी 36 दलली पाणी उपलब्ध होत होते या नवीन कामामुळे 108 दलली पाणी उपलब्ध होवू शकते. (सन 2040 सालच्या मागणीनुसार) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | माळबंगला ते कापसे वसाहत पर्यंत 600 एमएम व्यासाची दाबनलिका लांबी 4708 मी. | 318.09 | 593.25 | काम पूर्ण, जानेवारी 2012 पासुन पाणी पुरवठा सुरू |
| 3 | कापसे वसाहत येथील 13.80 लक्ष लि. क्षमतेचा संतूलन टाकी (एमबीआर) | 87.07 | 142.43 | काम पूर्ण, जानेवारी 2012 पासुन पाणी पुरवठा सुरु |
| 4 | कुपवाड झोनमधील कापसे वसाहत ते गव्ह. कॉलनीपर्यंत उंच टाक्यांना गुरुत्व नलिका टाकणे लांबी सुमारे 9 कि.मी. (ग्रॅव्हीटी मेन) | 259.40 | 503.23 | काम पूर्ण, जानेवारी 2012 पासुन पाणी पुरवठा सुरु |
| 5 | शामनगर उंच टाकी 12.89 लक्ष लि. (ईएसआर) | 52.32 | 102.05 | काम पूर्ण, जानेवारी 2012 पासुन पाणी पुरवठा सुरु |
| 6 | गव्ह. कॉलनी उंच टाकी क्षमता 7.75 लक्ष (ईएसआर) | 39.07 | 71.56 | काम पूर्ण, जानेवारी 2012 पासुन पाणी पुरवठा सुरु |
| 7 | वितरण व्यवस्था (कुपवाड झोन) ( Distributarion System) | 1488.07 | 2116.00 | 98 कि.मी पाईप लाईन टाकून कार्यान्वित केली आहे. (खर्च अंदाजे रु. 21 कोटी) |
| 8 | कुपवाड झोनसाठी माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथे पंपिंग मशिनरी (200 एचपी पंप) बसवणे | 82.02 | 95.00 | काम पूर्ण पाणी पुरवठा सुरु (खर्च रु. 0.35 कोटी) |
| 9 | शालीनीनगर,शरदनगर, वान लेसवाडी, वाघमोडे नगर येथील उंच टाक्यासाठी गुरुत्व नलिका टाकणे (Gravity Main) | 77.45 | 164.83 | काम पूर्ण पाणी पुरवठा सुरु (खर्च रु. 1.64 कोटी) |
| 10 | कुपवाड गावठाण येथे 6.47 लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे (ESR) | 33.69 | 64.20 | काम पूर्ण चाचणी स्वरुपात पाणी पुरवठा सुरु (खर्च रु. 0.61 कोटी) |
| 11 | शरदनगर येथे 0.50 लक्ष | 8.49 | 11.85 | काम पूर्ण पाणी पुरवठा |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे | | | सुरु (खर्च रु. 0.12 कोटी) |
| 12 | वाघमोडेनगर येथे 0.50 लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे | 8.49 | 11.85 | काम पूर्ण पाणी पुरवठा सुरु (खर्च रु. 0.12 कोटी) |
| 13 | वानलेसवाडी येथे 4.78 लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे | 24.81 | 51.37 | काम पूर्ण पाणीपुरवठा सुरु |
| 14 | शालिनीनगर येथे 16.66 लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे | 68.70 | 129.27 | काम पूर्ण पाणीपुरवठा सुरु |
| | एकुण | 3283.19 | 4866.89 | |

UIDSSMT योजने अंतर्गत प्रगतीपथावर असलेली कामे

| अ.क्र | कामाचे नांव | मंजूर किंमत | अपेक्षित खर्च | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| 1 | माळबंगला ते हिराबाग 800 मी.मी. व्यासाची गुरुत्व नलिका टाकणे | 504.37 | 655.42 | सांगली आष्टा बायपास रस्त्याजवळ डी.पी. रस्त्यावरुन पाईप लाईन टाकणेचे काम वगळता इतर काम पूर्ण. डी.पी. रस्त्यावरील कामाचा लाइन आऊट दिला आहे |
| 2 | माळबंगला येथे 70 दलली क्षमतेचे अत्याधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे | 2066.26 | 3075 | 75% काम पूर्ण झाले असून काम प्रगतीपथावर आहे. रु. 12 कोटी इतका खर्च झाला आहे. माहे मार्च 2016 पर्यंत पूर्ण होईल |
| 3 | सांगली मिरज कुपवाड शहरातील 22 इंच टाक्या व तीन संप व पंप हाऊस दुरुस्त करणे | 295.73 | 365.15 | काम पूर्ण |
| 4 | माळबंगला येथील 36 दलली क्षमतेचे | 209.45 | 250.00 | सध्या 55 % काम पूर्ण काम उर्वरीत काम प्रगतीपथावर |

DRAFT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे व क्षमता वाढविणे | | | आहे. मार्च 2016 पर्यंत काम पूर्ण होईल |
| 5 | संजयनगर येथे 15 लक्ष लि. क्षमतेचे उंच टाकी व वितरण व्यवस्था | 444.64 | 909.00 | उंच टाकीचे काम रुफ स्लॅब पर्यंत पूर्ण वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर आहे. मार्च 2016 पर्यंत काम पूर्ण होईल |
| 6 | माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथे 25 लक्ष लि. क्षमतेची उंच टाकी व वितरण व्यवस्था | 335.48 | 679.00 | उंच टाकीचे काम पूर्ण. वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर आहे. मार्च 2016 पर्यंत काम पूर्ण होईल |
| 7 | महानगरपालिका हद्दीत 15 लक्ष लि. क्षमतेची उंच टाकी बांधणे व वितरण व्यवस्था (समतानगर) | 406.57 | 829.00 | ठेकेदारानी उंच टाकीचे रुफ स्लॅब काम पूर्ण केले आहे. वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर आहे. मार्च 2016 पर्यंत काम पूर्ण होईल |
| 8 | सांगलीवाडी येथे 15 लक्ष लि. टाकी बांधणेव वितरण व्यवस्था | 269.02 | 574.00 | उंच टाकीचे काम रुफ स्लॅब पर्यंत पूर्ण झाले आहे. वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर आहे. मार्च 2016 पर्यंत काम पूर्ण होईल |
| 9 | कोल्हापूर रोड येथे 15 लक्ष लि. व वितरण व्यवस्था | 288.19 | 622.00 | उंच टाकीचे काम पूर्ण झाले आहे. वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर आहे. मार्च 2016 पर्यंत काम पूर्ण होईल |
| | एकूण रु. | 7902 | 12825.46 | |

उपरोक्त विवरणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, जानेवारी 2012 पर्यंत या योजनेमधील उंच टाक्यांची व वितरण व्यवस्थेची कामे पुर्ण करण्यात आली आहेत. परंतु ज्या स्त्रोतामधुन पाणी उपलब्ध होणार आहे त्या माळबंगला येथील 70 दललि क्षमतेच्या अत्याधुनिक जलशुध्दीकरण केंद्राचे स्थापत्य काम 90 टक्के व यांत्रिकी काम 40 टक्के काम पुर्ण झालेचे व उर्वरित काम ऑगष्ट 2016 पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित असल्याचे स्पष्ट होते. तसेच 36 दललि जलशुध्दीकरण केंद्राच्या दुरूस्तीचे काम जलशुध्दीकरण केंद्र चालु स्थितीत ठेवुनच करावे लागणार असल्याने सदर

DRAFT

काम 55 टक्के ते 60 टक्केच काम पुर्ण झाले असुन ऑगष्ट 2016 पर्यंत उर्वरित काम पुर्ण होणे अपक्षित असल्याचे दिसून येते. या योजनेमधील 70MLD जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामाची नस्ती तपासली असता, निविदा मार्च 2010 रोजी प्रसिध्द केली असून कामाची वर्क ऑर्डर दि.13/09/2012 रोजी म्हणजे अडीच वर्ष विलंबाने दिली आहे. या कामाची मुदत 18 महिने असुन काम मार्च 2014 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक होते. परंतु या कामाची जागा जमीन मालकाकडून ताब्यात घेणेस झालेला विलंब व योजना पुर्ण होण्यासाठी लागणारी स्वहिश्श्याची रक्कम महानगरपालिका उपलब्ध करीत नसल्याने ठेकेदाराने कामाची प्रगती मंदगतीने ठेवली आहे. त्यामुळे जलशुध्दीकरण केंद्राचे काम पुर्ण होण्यास विलंब लागत आहे. या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रांची कामे योग्य नियोजना अभावी अपुर्ण असल्याने कुपवाड भागाकरीता नव्याने सुरु केलेल्या पाणीपुरवठा वितरणासाठी जुन्या सांगली शहरासाठीच्या अस्तित्वातील 36 MLD जलशुध्दीकरण केंद्रामधुन पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे कुपवाड भागासाठी पुर्ण क्षमतेने पाण्याचा पुरवठा होत नसल्याचे दिसुन येते. महानगरपालिकेने प्रथम जलशुध्दीकरण केंद्राचे काम पुर्ण करुन तो कार्यान्वित करणे आवश्यक होते. परंतु त्याऐवजी उंच टाक्यांची व वितरण व्यवस्थेची कामे करुन त्या कामावर शासन व मनपा हिश्श्यामधुन खर्च न करता सर्व खर्च शासननिधी मधुन केल्याने पैशाअभावी तसेच योग्य नियोजना अभावी या योजनेचा मुख्य स्त्रोत असलेली 70MLD जलशुध्दीकरण केंद्र बांधणे व अस्तित्वातील 36 MLD जलशुध्दीकरण केंद्राची दुरूस्ती करणे ही कामे रखडल्याने कुपवाड शहरासाठी बांधण्यात आलेल्या उंच टाक्या व वितरण व्यवस्थेवर करण्यात आलेला खर्च रु.4866.89 लक्ष गुंतुन पडल्याचे स्पष्ट होते. तसेच माळबंगला जलशुध्दीकरण केंद्रावर जानेवारी 2016 अखेर एकुण खर्च रु.1544.37/- लाख झाला असुन अस्तित्वातील माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र दुरुस्तीवर रु.150 लक्ष इतका खर्च झाला आहे. परंतु कामे अपुर्ण असल्याने सदर योजना मार्च 2016 अखेर कार्यान्वित झालेली नाही. योजना लवकर पुर्ण करुन नागरीकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

DATSBKM7201 (Ref No : 90)

DRAFT

## *82 UIDSSMT योजने अंतर्गत चालु असलेल्या कामावर मनपा हिश्श्याच्या रक्कमेची अंदाजपत्रकामध्ये तरतुद करुन खर्च केला नसल्याने निधी अभावी कामे प्रलंबित राहिल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 03**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व जलनि:सा केंद्र,राज्य व मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***UIDSSMT योजनेअंतर्गत चालू असणा-या कामांची ऑक्टो 2015 पर्यंत महानगरपालिकेकडील प्रलंबित देयकांची एकुण रक्कम रु.1819.45 लक्ष असुन उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी रु.2387.53 लक्ष अशी एकुण रक्कम रु.4504.48 लक्ष रक्कमेची आवश्यकता आहे. महानगरपालिकेच्या हिश्श्याची रक्कम रु.31.67 कोटीची तरतुद अंदाजपत्रकामध्ये करुन खर्च करणे आवश्यक असता तरतुद केलेली नाही. या योजनेसाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या रक्कमेचा विनियोग फेब्रुवारी 2014 अखेर झालेला असुन त्याची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनाकडे पाठविल्यानंतर राज्यशासन रु.12.75 कोटी पुरक अनुदान देणार आहे. परंतु महानगरपालिकेने ऑक्टोबर 2015 पर्यंत झालेल्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे पाठवुन अनुदान मागणी केली नसल्याने या योजनेसाठी मिळणारे पुरक अनुदान रक्कम रु.12.75 कोटी महानगरपालिकेस फेब्रुवारी 2016 अखेर प्राप्त झालेली नाही. तसेच महानगरपालिकेने सॉफ्ट लोन मिळविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले नसल्याने निधी अभावी ठेकेदाराची देयके प्रलंबित राहीलेने योजना पुर्ण होण्यामध्ये अडथळा निर्माण झाला आहे.***

केंद्रशासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अंतगत सांगली कुपवाड सुधारीत पाणी पुरवठा योजना.

1) मंजुर दिनांक :- सप्टेंबर 2006

2) मंजुर किंमत :- रु. 79.02 कोटी

3) प्राप्त निधी :- केंद्र 80% व राज्य शासन 10% - रु. 63.22 कोटी + रु.7.75 कोटी, मनपा हिस्सा :- रु. 11.09 कोटी

4) काम सुरु दिनांक :- मे 2009

5) लोकसंख्या

अ) सन 2001 :- 436781

ब) सन 2011 :- 502697

6) मे 2015 अखेर खर्च :- रु. 82.06 कोटी

केंद्रशासन पुरस्कृत UIDSSMT कार्यक्रमांतर्गत वाढीव व सुधारीत सांगली कुपवाड नळपाणीपुरवठा योजनेस माहे सप्टे.2006 रोजी मान्यता मिळाली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनाकडून कामाच्या पहिल्या टप्प्यासाठी दिड वर्ष विलंबाने दि.11/03/2008 मध्ये रक्कम रु.14.78 कोटी अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे. सदर निधी येण्यास विलंब झाल्यामुळे योजनेच्या किंमतीमध्ये वाढ होवुन योजनेची किंमत रु. 12825.46 लक्ष झाली आहे. केंद्र शासनाने योजना मंजूर करताना या योजनेच्या वाढीव खर्चाची पुर्ण जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील यासाठी कोणतेही जादाचे अनुदान शासनाकडुन मिळणार नसल्याची अट घातली आहे. त्यामुळे योजनेच्या कामास निधी अपुरा पडुन योजना रखडण्याची शक्यता होती. वरील परिस्थितीत योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी दि.8 मे 2009 रोजी मा.मंत्री गृह यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे बैठक झाली. या बैठकीस मा. प्रधान सचिव पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे समवेत अधिकारी व पदाधिकारी उपस्थितीत होते. या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

DRAFT

1)UIDSSMT प्राप्त अनुदान रक्कम रु.14.78 कोटी या मधुन कुपवाड झोनसाठी मंजुर योजने मधील कामांची निविदा अंतिम करुन पुर्ण ठेव तत्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन काम पुर्ण करुन घ्यावयाचे आहे. त्यानुसार हे काम पुर्ण झाले आहे.

2)मंजुर योजनेपैकी अशुध्द पाण्याच्या दाबनलिकेचे काम सध्या अस्तित्वात असलेल्या कृष्णा नदीवरील जॅकवेल पासुन माळबंगला पर्यंत 1219 मिमि व्यासाची एमएस पाईप लाईन 3500 मिटरची टाकणे हे काम महानगरपालिकेने मंजुर योजनेमधील आकृतीबंधानुसार महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी रक्कमेमधुन त्वरीत हाती घेण्यात यावे.

3) सध्या सुजल निर्मल योजना महाराष्ट्र शासनाकडून चालु करण्यात आली असुन या अंतर्गत प्रस्तावित करावी लागणारी कामे व UIDSSMT योजनेमध्ये मंजुर असलेल्या उपांगांचे तांत्रिक सल्लागारामार्फत एकात्मिक अभ्यास करावा व तद्नंतर प्राधान्य ठरवुन कामे हाती घेण्यात यावीत. सुचना क्र.3 नुसार या मंजूर योजनेत सांगली शहरासाठी वितरण व्यवस्था व जलकुंभांची तरतूद नसल्याने महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान अंतर्गत भाग घेवुन कांही उपांगे घेण्यात आली आहेत. UIDSSMT व सुजल निर्मल अभियान अंतर्गत प्राप्त निधीचा मर्यादेत आवश्यक कामांचा विचार व एकत्रित अभ्यास करून शहरासाठी ठोस पाणी पुरवठा योजना करावी या हेतूने महापालिकेने मे.डी.आर.ए.कन्सलटंट, नागपुर यांचे तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक केली. त्याचे अहवालनुसार UIDSSMT अंतर्गत पहिल्या टप्यात अस्तित्वा तील कृष्णा नदी उद्भव ठेवुन चांगली शुध्दीकरण प्रक्रिया राबवुन नागरीकांना स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा करणेच्या दृष्टीने आवश्यक त्या वितरण व्यवस्था, उंच जलकुंभ, उध्दरण नलिका, जलशुध्दीकरण केंद्रांची दुरूस्ती, अस्तित्वातील उंच जलकुंभाची दुरूस्ती, 70 एम.एल.डी. क्षमतेचा आधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे इत्यादी कामांचा मूळ मंजूर योजनेत अंतर्भाव करून कामे करणेचे ठरले. तसेच दुस-या टप्यात वारणा उद्भव पर्यतची उर्वरीत कामे निधीच्या उपलब्धतेप्रमाणे करणेचे ठरले होते.

मे.डी.आर कन्सल्टंट नागपूर यांनी दोन्ही योजनांचा एकत्रित अभ्यास करुन त्याचा अहवाल सादर केला आहे. त्यांच्या अहवालानुसार सुजल निर्मल योजने अंतर्गत त्यांनी सुचविलेल्या कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन शासनास सादर करुन मंजुर करुन घेण्यात आले आहेत.

UIDSSMT योजनेबाबत त्यांनी दिलेल्या अहवालानुसार मंजुर योजनेत तांत्रिक बदल करुन मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभाग यांच्या तांत्रिक मंजुरी नंतर पुढील कार्यवाहीसाठी सदर अंदाजपत्रके मा.संचालक, नगरपरिषद संचालनालय वरळी मुंबई यांचेकडे दि.22/10/2010 रोजी पाठविण्यात आली होती. त्या बैठकीत मिळालेल्या सुचनेप्रमाणे प्रस्तावात किरकोळ बदल करुन पुन्हा मा.मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे दि. 01/01/2011 रोजी सादर करण्यात आले होते. त्यास त्यांचे पत्र क्र.No.CE(Pune)/TB-3/SangliWSS/Tech.Deviation/C320/68 Dated 06/01/2011 ने योजनेच्या बदलांना तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेच्या बदलांना व त्याप्रमाणे काम करण्यास महासभा क्रमांक 03 (विस) ठराव क्र.193, विषय क्र.03 दि.10/05/2011

रोजी मान्यता मिळाली आहे. सदर सुधारित प्रस्ताव नगरपरिषद संचालनालयाकडून केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता . Govt. of India ,Ministry of Urban Development, Encloser to Note No. Q12045 / 15/ 2/ UIDSSMT / 08- CPHEEO यांचे दि.8/12/2011 चे पत्रान्वये योजनेच्या सुधारीत डि.पी.आर.ला मान्यता दिली आहे. त्यानुसार योजनेची सुधारित appraisal cost रु.14597.05 लाख या रक्कमेला मान्यता दिली आहे व योजनेची मुळ किंमत रु.7902/- लाख व सुधारित किंमत रु.14597.05 लाख या मधील फरक रक्कम रु.6695/- लाख रक्कमेची तरतुद राज्यशासन व महानगरपालिका यांनी स्वनिधीमधुन करण्याबाबत नमुद आहे.

या योजनेच्या सुधारित प्रकल्प आराखड्यास मान्यता मिळाल्यानंतर पाणीपुरवठा विभागाने तांत्रिक बदलानंतर शिल्लक कामाची निविदा काढणे बाबत दि.24/12/2012 रोजी टिपणी सादर केली आहे व आयुक्त यांचे दि.15/01/2013 चे मंजुरी नंतर निविदा दै.सकाळ व दै. पुढारी या वर्तमानपत्रामध्ये दि.28/01/2013 रोजी प्रसिध्द करुन मागविण्यात आल्या आहेत. निविदा 2011-12 या आर्थिक वर्षाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसूचीप्रमाणे काढण्यात आल्या आहेत. सदर कामाच्या निविदा जादा दराने आल्याने निविदेमधील दरांची तुलना आर्थिक वर्ष 2012-13 च्या दरसूचीबरोबर करुन जादा दराने कामे मंजुर केली आहेत. त्यामुळे या योजनेचे सुधारित मुल्यांकन रु.128.25 कोटी इतके झालेले आहे.

| | | |
|---|---|---|
| | मुल्यांकनानुसार योजनेची किंमत | रु. 128.25 कोटी |
| | केंद्रशासन अनुदान (80%) मुळ मंजुर योजनेप्रमाणे | रु. 63.22 कोटी |
| | राज्यशासन अनुदान 10% मुळ मंजुर प्रमाणे | रु. 7.75 कोटी |
| | राज्यशासनाकडून दरसुची फरकाची रक्कम 50% प्रमाणे | रु. 12.75 कोटी |
| | मनपा एकुण हिस्सा (128.25-63.22-7.75-16.80) | रु. 45.53 कोटी |
| | यापैकी मनपाने भरलेला निधी | रु. 13.86 कोटी |
| | मनपाने भरावयाचा निधी | रु. 31.67 कोटी |

या अर्धसमास ज्ञापनाबरोबर UIDSSMT योजनेअंतर्गत सुधारित व विस्तारित सांगली कुपवाड पाणीपुरवठा योजनेमधील प्रगतीपथावर व पुर्ण कामांचे माहे ऑक्टो 2015 अखेरच्या थकीत देयकाचा व उर्वरित कामास लागणारी रक्कम याचा तपशिल दर्शविणारे (**परिशिष्ठ क्र.15**) जोडण्यात आले आहे. सदर तक्त्यानुसार महानगरपालिकेकडे ऑक्टोबर 2015 अखेर प्रलंबित असणा-या देयकांची एकुण रक्कम रु.1819.45 लक्ष असुन उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी रु.2387.53 लक्ष आवश्यकता आहे. सदर योजना पुर्ण करण्यासाठी एकुण रु.4504.48 लक्ष रक्कमेची आवश्यकता आहे.

केंद्रशासनाने UIDSSMT योजने अंतर्गत रक्कम रु.79.02 कोटीच्या प्रकल्प खर्चास मंजुरी दिली असुन केंद्रशासनाकडुन 80 टक्के प्रमाणे रु.63.22 कोटी, राज्य शासनाकडुन 10 टक्केप्रमाणे रु.7.75 कोटी व मनपा हिस्सा रु.13.85 कोटी प्राप्त झाले आहेत व ऑक्टोबर 2015 अखेर रु.84.82 कोटी खर्च करण्यात आला आहे. योजना मंजुर करताना केंद्रशासनाने या योजनेच्या जादा खर्चास केंद्रशासनाकडुन अनुदान मिळणार नसुन जादाचा खर्च महानगरपालिका व राज्यशासनाने त्यांचे

DRAFT

निधीमधुन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. तसेच शासन निर्णय महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एनयुआर-2009/ प्र.क्र.127/09/नवि 33 मंत्रालय मुंबई दि.31/08/2009 नुसार या योजनेच्या पहिल्या निविदा ज्या वर्षात काढण्यात आल्या आहेत त्या वर्षाच्या DSR नुसार म्हणजेच 2008-09 व 2005-06 यातील फरकाचे 50 टक्के रक्कम राज्य शासनाकडुन पुरक अनुदान म्हणुन मिळणार आहेत. तसेच त्यातील 50 टक्के रक्कम सॉफ्ट लोन म्हणुन शासनाकडून मिळणार आहेत. या मंजुर कामाकरीता राज्यशासनाकडुन देण्यात येणा-या पुरक अनुदान रक्कमेचे वितरण केंद्र शासनाकडुन दुस-या अनुदान रक्कमेचे वितरण झाल्यानंतर तसेच दुस-या हप्त्याच्या अनुदानाचा संपुर्ण खर्च झाल्यानंतर करण्यात येणार आहे.

याबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) या योजनेच्या सुधारित प्रकल्प आराखडयास (Revised D.P.R.) ला केंद्र शासनाकडुन दि.08/12/2011 चे पत्रान्वये मान्यता मिळाल्यानंतर शिल्लक कामाची निविदा काढणे बाबत पाणीपुरवठा विभागाने दि.24/12/2012 रोजी टिपणी सादर केली आहे व आयुक्त यांचे दि.15/01/2013 चे मंजुरीनंतर दि.28/01/2013 रोजी निविदा प्रसिध्द केल्या आहेत व त्यानंतर निविदा मान्य करुन उंच पाण्याच्या टाक्यांचे कार्यादेश मे 2013 मध्ये तसेच 70 MLD जलशुध्दीकरण केंद्राचे कामाचा कार्यादेश नोव्हें. 2012 मध्ये देण्यात आला आहे. निविदा काढणे , स्विकृत करणे व कार्यादेश देणे यामध्ये दिड वर्ष विलंब लागल्याने निविदा 2011-12 च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुचीप्रमाणे मागविण्यात आल्या आहेत व निविदा जादा दराने प्राप्त झाल्याने त्यांचे दरपृथ्थकरण सन 2012-13 च्या दरसूचीबरोबर करुन जादा दराच्या निविदा मान्य केल्याने या योजनेचा खर्च रु.7902/- लक्ष ऐवजी 12825 इतका वाढला असल्याचे दिसुन येते.

2) महानगरपालिकेने ठेकेदारास त्याने केलेल्या कामाचे देयक आदा करताना प्रत्येक देयकाची रक्कम केंद्र व राज्य शासनाचे प्राप्त अनुदानामधुन व महानगरपालिका स्वनिधी मधुन त्यांचे हिश्श्याप्रमाणे तरतुद करुन खर्च करणे आवश्यक असता महानगरपालिकेच्या स्वनिधीमधुन फक्त 13.85 कोटी खर्च केला असुन उर्वरित रक्कम रु.70.96 कोटी शासन निधीमधुन खर्च केली आहे. UIDSSMT योजनेअंतर्गत चालू असणा-या कामांची सोबत जोडलेल्या परिशिष्ठा मध्ये दिलेल्या माहितीनुसार ऑक्टो 2015 पर्यंत महानगरपालिकेकडे प्रलंबित असणा-या देयकांची एकुण रक्कम रु.1819.45 लक्ष असुन उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी रु.2387.53 लक्ष अशी एकुण रक्कम रु.4504.48 लक्ष रक्कमेची आवश्यकता आहे. महानगरपालिकेस त्यांचे हिश्श्याची रक्कम रु.31.67 कोटीची तरतुद महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये करुन खर्च करणे आवश्यक असता तरतुद केली नसल्याने निधी अभावी ठेकेदाराची देयके प्रलंबित राहिली आहेत. ठेकेदाराने केलेल्या कामाची देयके मिळाली नसल्याने पुढील काम करणे शक्य नसल्याचे ठेकेदारांनी पत्राद्वारे महानगरपालिकेस वेळोवेळी कळविले आहे. परंतु महानगरपालिकेने ठेकेदारास केलेल्या कामाची देयके आदा केली नसल्याने या योजनेची कामे अपुर्ण राहिल्याने योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे स्पष्ट होते.

3) शासन निर्णय महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एनयुआर-2009/ प्र.क्र. 127 / 09 / नवि 33 मंत्रालय मुंबई दि.31/08/2009 नुसार या योजनेच्या पहिल्या निविदा ज्या वर्षात काढण्यात आल्या आहेत त्या वर्षाच्या DSR नुसार म्हणजेच 2008-09 व 2005-06 यातील फरकाचे 50 टक्के रक्कम राज्य शासनाकडुन पुरक अनुदान म्हणुन मिळणार आहेत. तसेच त्यातील 50 टक्के रक्कम सॉफ्ट लोन म्हणुन शासनाकडून मिळणार आहेत. या मंजुर कामाकरीता राज्यशासनाकडुन या शासन निर्णयानुसार देण्यात येणा-या पुरक अनुदान रक्कमेचे वितरण केंद्र शासनाकडुन दुस-या अनुदानाचे वितरण झाल्यानंतर तसेच दुस-या हप्त्याच्या अनुदानाचा संपुर्ण खर्च झाल्यानंतर करण्यात येणार आहे. महानगर पालिकेस या योजनेच्या दुस-या हप्त्याची रक्कम रु.35.56 कोटी केंद्र शासनाकडुन दि.21/07/2012 रोजी मिळाली आहे व हा सर्व निधी महानगरपालिकेने फेब्रुवारी 2014 अखेर खर्च केला आहे. दुस-या हप्त्याची रक्कम खर्च केल्यानंतर महानगरपालिकेने या कामाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनाकडे पाठवुन पुरक अनुदानाची मागणी करणे आवश्यक असता महानगरपालिकेने ऑक्टोबर 2015 पर्यंत पुरक अनुदान मागणी केली नसल्याने या योजनेसाठी मिळणारे पुरक अनुदान रक्कम रु.12.75 कोटी महानगरपालिकेस फेब्रुवारी 2016 अखेर प्राप्त झालेले नाही. तसेच महानगर पालिकेने सॉफ्ट लोन मिळविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. या योजनेसाठी लागणा-या जादा रक्कमेची तरतुद महानगरपालिका स्वनिधीमध्ये करुन त्या प्रमाणे रक्कम खर्ची टाकणे आवश्यक असता त्या दिशेनेही महानगरपालिकेने कोणतेही प्रयत्न केले नसल्याने निधी अभावी या योजनेमधील कामांची देयके प्रलंबित राहिल्याने व केलेल्या कामाची देयके आदा केली नसल्याने ठेकेदारांनी अपुर्ण कामे पुर्ण करण्यास असमर्थता दाखविल्याने योजना पुर्ण होण्यास विलंब लागत आहे. या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता सदर योजना ही मार्च 2014 अखेर पुर्ण करणे आवश्यक असल्याच्या मार्गदर्शक सुचना शासनाकडुन प्राप्त झाल्या असल्याचे नस्तीमध्ये नमुद आहे. त्यामुळे कामाचे कार्यादेश देताना सर्व कामे पुर्ण करण्याची मुदत मार्च 2014 पर्यंत दिलेली आहे. परंतु महानगरपालिकेने स्वनिधीमधुन या कामांच्या खर्चासाठी निधीची तरतुद केली नसल्याने तसेच शासनाकडुन पुरक अनुदानाची मागणीही केली नसल्याने निधी अभावी मार्च 2016 अखेर कामे पुर्ण झालेली नसल्याचे दिसुन येते. शासनाकडून एवढ्या मोठया प्रमाणात निधी मिळुनही महानगरपालिकेने आर्थिक नियोजन करुन योजना राबविली नसल्याने योजना अपुर्ण राहिल्याचे स्पष्ट होते.

DATSBKM7201 (Ref No : 91)

## *94 भांडार विभागातील साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 09**

*लेखा शीर्ष :भांडार मनपा निधी*

DRAFT

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 679389.00/-

***उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/उद्योग/6 दि. 2 जाने. 1992 मधील परिच्छेद 7 नुसार खरेदी करावयाच्या साहित्याचे दर ठरविताना बाजारभाव तसेच उत्पादन खर्च याचा सारासार विचार करुन दर ठरविणे आवश्यक आहे. तसेच वस्तुबाबतचे दर मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत दरवर्षी 1 मे पूर्वी निश्चित करणे आवश्यक आहे व परिच्छेद 10.8 नुसार दर कराराचा कालावधी 1 जुलै ते 30 जुन पर्यंत ठरविणे आवश्यक आहे. परंतु भांडार विभागाने खरेदी प्रक्रिया दि. 11/11/2013 रोजी सुरु करुन साहित्य खरेदी दि. 20/03/2014 रोजी केली आहे. सदर साहित्याची खरेदी आर्थिक वर्ष संपण्याच्या अगोदर केल्याने त्या साहित्याचा वापर 2013-2014 या वित्तीय वर्षामध्ये झालेला नाही. तसेच परिच्छेद 8.3 (ई) नुसार वर्षभराच्या आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करणेसाठी दरवर्षी संख्याकरारापेक्षा दर करार करुन वर्षभरामध्ये आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी न करता एकाचवेळी खरेदी करणेत आली आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या कामकाजासाठी लागणारे लेखन व अनुषंगिक साहित्य खरेदी भांडार विभागाकडून केली जाते. यासाठी आर्थिक वर्ष 2013-14 च्या अंदाजपत्रकामध्ये (001) सामान्य प्रशासन B 109 लेखन साहित्य या लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु. 15,00,000/- ची तरतुद केलेली आहे. भांडार विभागाने निविदा मागवून रक्कम रुपये 1200215/- च्या साहित्य खरेदीची टिपणी दि. 11/11/2013 रोजी प्रशासनाकडे सादर केली आहे व सदर साहित्य खरेदीस आयुक्त यांनी दि. 31/12/2013 अन्वये मान्यता दिली आहे. या कामाच्या निविदेची जाहिर प्रसिध्दी दै. तरुण भारत या वर्तमान पत्रात दि. 04/02/2014 रोजी केली असुन निविदा दि. 14/02/2014 रोजी उघडण्यात आल्या असता एकुण 4 निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकांची नांवे | रक्कम रुपये | निविदा धारकांचे तुलनात्मक दर |
|---|---|---|---|
| 1 | लकी एजन्सी, सांगली | 1040221/- | 13.33% कमी |
| 2 | यश डिस्ट्रीब्युटर्स | 1161272/- | 3.24% कमी |
| 3 | नोबल पेपर मार्ट | 1123937/- | 6.35% कमी |
| 4 | नॅशनल ट्रेडिंग कार्पोरेशन | 1088405/- | 9.31% कमी |

सर्वात कमी दराची लकी एजन्सी, सांगली यांची निविदा स्विकारण्यात आली आहे. सदर पुरवठादारांचे अ.क्र. 1 ते 81 पैकी 56 वस्तुंचे दर Estimate पेक्षा कमी आले असुन 25 वस्तुंचे दर Estimate पेक्षा जास्त आहेत. ठेकेदाराबरोबर करारपत्र दि. 10/03/2014 रोजी करण्यात आले असुन साहित्य मागणीचा पुरवठा आदेश दि. 11/03/2014 रोजी देण्यात आला आहे व ठेकेदाराने साहित्य पुरवठा दि. 20/03/2014 पर्यंत केला आहे व श्री. लकी एजन्सी यांना खलील प्रमाणे रक्कम अदा केली आहे. या साहित्य खरेदीचे लेखापरीक्षण करून अर्धसमास ज्ञापन क्र. 93 दि.30/03/2016 रोजी निर्गमित केला आहे. परंतु भांडार विभागाने अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर



DRAFT

केलेले नाही.

| अ.क्र. | निविदा धारकांची नांवे | रक्कम रुपये | प्रमाणक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | लकी एजन्सी, सांगली | 448171 | 7137 | 29/03/2014 |
| 2 | लकी एजन्सी, सांगली | 226825 | 1707 | 12/08/2014 |
| 3 | लकी एजन्सी, सांगली | 365225 | 3271 | 20/10/2014 |
| | एकुण | 1040221 | | |

या कामाची नस्ती, निविदा व प्रमाणकाचे लेखापरीक्षण करुन खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) श्री. लकी एजन्सी, सांगली यांचे तांत्रिक कागदपत्राची तपासणी केली असता त्यांनी व्यवसाय कराचा भरणा केलेली अद्यावत पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडलेली नाही. या कामाच्या निविदा अटी शर्ती मधील अ) लिफाफा क्र.1 अट क्र.4 नुसार ठेकेदाराने व्यवसाय कर भरणा केल्याची अद्यावत पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार आजीविका व नोक-या यावरील कर अधिनियम 1975 व त्याखालील नियत 20 अन्वये नमुना -8 च्या चलनाद्वारे सन 2012-13 या वर्षातील व्यवसाय कर भरल्याचे प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

2)लेखन साहित्य खरेदीची निविदा दै. तरुण भारत या एकाच वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. नगरविकास विभाग पत्र क्र. जीईएन-1093/2365 प्र.क्र. 126/93 नवी-14 दि. 20/10/ 1993 अन्वये स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी 5 लाख ते 1 कोटी अंदाजपत्रकीय रकमेच्या खर्चाच्या निविदा या अ) राज्यस्तरीय दैनिक ब) 20,000 प्रती खप असलेले जिल्हास्तरीय दैनिक यामध्ये निविदा प्रसिध्दीस देणे आवश्यक आहे. परंतु जिल्हास्तरीय दै.तरुण भारत या एकाच दैनिकात निविदा जाहिरात प्रसिध्द केलेने जास्तीजास्त पुरवठादारांनी निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेतला नसल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

3)शासन व इतर संस्थाकडून उत्पादीत वस्तुंचे दर ठरविण्यासंबंधीची कार्यवाही उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/उद्योग/6 दि. 2 जाने. 1992 मध्ये देण्यात आली आहे. या शासन निर्णयामधील परिच्छेद 7 नुसार साहित्याचे दर ठरवितांना बाजारभाव तसेच उत्पादन खर्च याचा सारासार विचार करुन दर ठरविणे आवश्यक आहे. तसेच या सर्व संस्थानी वस्तुबाबतचे दर मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत दरवर्षी 1 मे पूर्वी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच परिच्छेद 10.8 नुसार दर कराराचा कालावधी 1 जुलै ते 30 जुन पर्यंत ठरविणे आवश्यक आहे. परंतु भांडार विभागाने साहित्य खरीदीची प्रक्रिया दि. 11/11/2013 रोजी सुरु करुन साहित्य खरेदी दि. 20/03/2014 मध्ये केली आहे. सदर साहित्याची खरेदी आर्थिक वर्ष संपण्याच्या अगोदर केल्याने त्या साहित्याचा वापर 2013-2014 या वित्तीय वर्षामध्ये झालेला नाही.

4)उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं-1088/2512/उद्योग/6 दि. 2 जाने. 1992 मधील परिच्छेद 8.3 (ई) नुसार वर्षभराच्या आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करणेसाठी दरवर्षी संख्याकरारापेक्षा दर करार करुन वर्षभरामध्ये आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी न करता एकाचवेळी खरेदी करणेत आली आहे. साठा नोंदवहीची तपासणी केली असता खालील साहित्याचा वापर 2013-2014 या आर्थिक वर्षात झाला नसल्याने अनावश्यक खरेदीमुळे महानगरपालिकेची रक्कम रु.

DRAFT

6,79,389/- गुंतुन पडली आहे.

| अ.क्र | तपशिल | शिल्लक 1/4/13 | खरेदी 20/3/14 | वापर 31/3/14 | शिल्लक 31/3/14 | दर रु. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | झेरॉक्स कागद रिम | 1154 | 500 | 1124 | 530 | 260 | 137800/- |
| 2 | झेरॉक्स कागद रिम (A-4) | 53 | 800 | 274 | 579 | 224 | 129696/- |
| 3 | कोरे कागद रिम | 82.5 रिम | 60 | 49.4 | 93.1 | 528 | 49157/- |
| 4 | आखिव कागद रिम | 53.3 | 60 | 38.3 | 75 | 540 | 40500/- |
| 5 | सिंगल साईज कार्बन | 84 | 25 | 64 | 45 | 175 | 7875/- |
| 6 | डबल साईज कार्बन | 367.5 | 50 | 137 | 280.5 | 170 | 47685/- |
| 7 | स्टेपलर (मोठे) | 45 | 100 | 58 | 87 | 200 | 17400/- |
| 8 | पंचिंग मशिन (मोठे) | 72 | 75 | 76 | 71 | 126 | 8946/- |
| 9 | क्वायरबुक 200 पानी | 329 | 100 | 270 | 159 | 110 | 17490/- |
| 10 | कॅलक्युलेटर | 43 | 60 | 39 | 64 | 630 | 40320/- |
| 11 | कुलुप (गोदरेज) मोठे | 151 | 272 | 170 | 253 | 525 | 132825/- |
| 12 | चहाचे कप (डझन प्रामाणे) | 20 | 45 | 26 | 39 | 690 | 26910/- |
| 13 | शाल | 50 | 25 | 26 | 49 | 465 | 22785/- |

5)भांडार विभागाने पुरवठादारास पुरवठा आदेश दि. 11/03/2014 रोजी दिला असुन पुरवठादाराने डिलीव्हरी चलन क्र. 25 ते 27 दि. 14/03/2014, चलन क्र. 31,32 दि. 18/03/2014 चलन क्र. 41 दि. 20/03/2014 या दिनांकास साहित्याचा पुरवठा केला आहे. डिलीव्हरी चलनावर साहित्य पुरवठा आदेशामधील नमुना संख्येप्रमाणे सुस्थितीत मिळाल्या बाबतची स्वाक्षरी भांडार अधिक्षकाने केलेली नाही.

6)साठा नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवही नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र. 145 नुसार नमुना क्र. 116 प्रमाणे ठेवण्यात आली आहे. नोंदवहीमधील स्तंभ क्रमांक 09 मध्ये पुरवठा केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या साहित्याचे परिमाण लिहीणे आवश्यक असता तो स्तंभ निरंक ठेवल्याने शिल्लक साहित्य किती प्रमाणात राहिले याबाबतची खात्री होत नाही.

7)नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्र. 156 प्रमाणे संग्रह पुस्तकात जंगम मालमत्तेचे पुस्तक व स्थावर मालमत्तेचे पुस्तक यात नोंदलेली सर्व स्थावर व जंगम मालमत्ता याची वार्षिक पडताळणी करुन तसे प्रमाणपत्र पडताळणी करणा-या अधिका-याने देणे आवश्यक असता तसे प्रमाणपत्र 2013-2014 या आर्थिक वर्षात या विभागाचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेले नाही. विवरणपत्रामध्ये नमुद केलेले वापरलेले व शिल्लक साहित्याची परिगणना लेखापरीक्षणाच्या वेळी केले

DRAFT

नंतर शिल्लक राहिलेले साहित्य अनावश्यक खरेदी केल्याचे दिसून येते.

8) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र. भाखंसं-1088/2512 उद्योग-6 दि. 02/01/1992 मधील 8.3 च्या (ई) नुसार निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राहय असलेले आयकर भरल्यासंबंधीचे प्रमाणपत्र निविदाधारकांकडून घ्यावयाचे आहे. परंतु साहित्य खरेदीच्या अटी व शर्ती मध्ये आयकर भरल्यासंबंधीचे प्रमाणपत्राचा उल्लेख केलेला नसल्याने निविदाधारक साहित्य पुरविण्यास सक्षम असल्याची खात्री होत नाही.

9)मुख्य लेखापरीक्षक यांनी खरेदी टिपणीचे पूर्व लेखापरीक्षण केले असून कुलुपांची केलेली मागणी अवास्तव असल्याचे नमुद करुन टिपणी फेरसादर करणेची शिफारस दि. 20/11/2013 रोजी केली आहे. त्याप्रमाणे भांडार विभागाने कुलुपांची आवश्यकता असल्याने मागणी प्रमाणे कुलुपे खरेदी करणे जरुरीचे असल्याचे त्यांचे उत्तरामध्ये नमुद केले आहे. परंतु विवरणपत्रातील दि. 01/04/2013 ची शिल्लक कुलुप 151, दि. 20/03/2014 ची कुलुप खरेदी 272, 2013-2014 मधील कुलुप वापर 170 व 31/03/2014 ची शिल्लक कुलुपे 253 इतकी आहेत. यावरुन आवश्यकतेपेक्षा जास्त कुलुप खरेदी केलेने 253 कुलुपाची प्रती नग रु.525/- प्रमाणे रक्कम रु.132825/- गुंतुन पडली आहे.

DATPKCM7101 (Ref No : 93)

## *102 मिरज व कुपवाड गुंठेवारी विभागाकडे धनाकर्षाने जमा केलेल्या प्रशमन शुल्क व विकास आकार रक्कमेच्या जमा पावत्या गुंठेवारीधारकास दिल्या नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities : 05**

*लेखा शीर्ष :नगररचना मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6986930.69/-

***मिरज आणि कुपवाड शहर विभागाकडील गुंठेवारी नियमितीकरणासाठी प्राप्त झालेल्या प्रशमन फी व विकास आकार यापोटी देय असलेला धनाकर्ष नोंदवहीची तपासणी केली असता, गुंठेवारी धारकाने धनाकर्ष कार्यालयास दिल्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.12 अन्वये जमा पावती पुस्तकामध्ये दुहेरी कार्बन कागद घातलेली पावती दोन प्रतीमध्ये तयार करुन त्याची एक प्रत जमेच्या दिनांकास नागरीकांना देणे आवश्यक असता, या विभागाने जमापावती पुस्तका मधील पावतीची एक प्रत गुंठेवारीधारकास दिलेली नाही. त्यामुळे गुंठेवारीधारकास त्याने भरणा केलेल्या रक्कमेचा पुरावा मिळत नसल्याचे दिसून येते. लेखा विभागाचे प्रशमन शुल्क रोजकीर्दीची तपासणी केली असता रोजकीर्दी प्रमाणे शिल्लक रक्कम रु.8272880.41 असुन पासबुकप्रमाणे (बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र.20050040863) शिल्लक रक्कम रु.15259811.72/- इतकी असल्याने रक्कम रु.6986930.69/- ची तफावत आढळून आली आहे.***

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या गुंठेवारी विभागाचे 2013-14 या



DRAFT

वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण केले असता, सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 27 विवक्षित गुंठेवारी विकासांचे नियमितीकरण व श्रेणीवाढ करणे आणि गुंठेवारी विकासाचे नियंत्रण करणे आणि त्याच्याशी संबंधित व तदनुषंगिक बाबींकरीता अधिनियम दि.13/08/2001 रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील कलम 3 मधील पोट कलम 3 नुसार गुंठेवारी विकास नियमाधीन करणेसाठी राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेले प्रशमन फी व विकास आकार यांचा पूर्ण भरणा करण्याच्या आधीन असेल असे नमुद आहे. तसेच कलम 4 मध्ये गुंठेवारी विकास नियमाधीन करण्याची कार्यवाही दिली आहे. त्यामधील अट क्र.(फ) नुसार प्रशमन फी व विकास आकार यापोटी देय असलेल्या रकमेचा अंतर्भाव असलेला कोणत्याही अनुसूचित बँकेवर काढण्यात आलेला दर्शनी धनाकर्ष गुंठेवारी नियमाधिन अर्जासोबत सादर करावयाचा आहे.

गुंठेवारी विभागाकडील गुंठेवारी प्रकरणांच्या फाईल, जमेची नोंदवही, धनाकर्ष नोंदवही,चलने यांची तपासणी करुन अर्धसमास ज्ञापन क्र.98 दि.21/04/2016 रोजी निर्गमित केला असुन गुंठेवारी विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या बाबत लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सांगली विभागाकडील गुंठेवारी विभागाने धनाकर्षाची नोंद, संकीर्ण जमा रक्कमांची दुय्यम नोंदवहीमध्ये घेतली असुन सदर नोंदवही महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 च्या नियम 16(1) व 70(1) प्रमाणे नमुना क्र.15 मध्ये ठेवली आहे. या नोंदवहीची तपासणी केली असता नोंदवहीमध्ये जमा पावतीची तारीख व पावतीचा क्रमांक, रक्कम कोणाकडून मिळाली त्या व्यक्तीचे नाव व जमा पावतीची रक्कम नोंदविली आहे. त्यानुसार 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये प्रशमन शुल्कापोटी रक्कम रु.918947/- व विकास आकार पोटी रु.1519857/- जमा झालेली आहेत. सदर धनाकर्ष बँकेमध्ये भरणा केल्यानंतर बँकेकडून जमा रक्कमेचे बँक स्टेटमेंट घेण्यात येते. बँक स्टेटमेंटमधील जमेच्या नोंदीप्रमाणे चलन तयार करुन ते लेखा शाखेकडील मुख्य किर्दीमध्ये जमेची नोंद घेण्यासाठी लेखा विभागाकडे पाठविले जाते. परंतु मिरज आणि कुपवाड शहर विभागाकडील बांधकामाची नस्ती व प्रशमन फी व विकास आकार यापोटी देय असलेला धनाकर्ष नोंदवहीची तपासणी केली असता, गुंठेवारी धारकाने धनाकर्ष कार्यालयास दिल्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.12 अन्वये जमा पावती पुस्तकामध्ये दुहेरी कार्बन कागद घातलेली पावती दोन प्रतीमध्ये तयार करुन त्याची एक प्रत जमेच्या दिनांकास नागरीकांना देणे आवश्यक असता, मिरज आणि कुपवाड विभागाने जमापावती पुस्तकामधील पावतीची एक प्रत गुंठेवारीधारकास दिलेली नाही. त्यामुळे गुंठेवारीधारकास त्याने भरणा केलेल्या रक्कमेचा पुरावा मिळत नसल्याचे दिसून येते. तसेच सांगली विभागाने जमेसाठी ठेवलेल्या नमुन्याप्रमाणे मिरज विभागाने जमेची नोंदवही ठेवलेली नाही.

2) मिरज आणि कुपवाड गुंठेवारी विभागाने दररोज जमेचे चलन तयार करुन लेखाशाखेकडे पाठविले नसल्याने या विभागाच्या गुंठेवारी जमेची नोंद लेखा शाखेकडील मुख्य किर्दीस झालेली नाही. त्यामुळे बँकेमधील गुंठेवारी जमा रक्कम व विभागाकडील जमा नोंदवही व चलनानुसारची जमा रक्कम यांचा

DRAFT

ताळमेळ घेतलेला नाही. मिरज आणि कुपवाड विभागाकडे गुंठेवारीची धनाकर्षाने जमा झालेली रक्कम चलनाने लेखाशाखेकडे भरणा न करण्याबाबतचा खुलासा अर्धसमास ज्ञापन क्र.98 ने मागणी करुनही गुंठेवारी विभागाने दिलेला नाही. लेखा विभागाचे प्रशमन शुल्क रोजकीर्दीची तपासणी केली असता रोजकीर्दी प्रमाणे शिल्लक रक्कम रु.8272880.41 असुन पासबुकप्रमाणे (बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र.20050040863) शिल्लक रक्कम रु.15259811.72/- इतकी आहे. फरक रक्कम रु.6986930.69/- इतकी आहे. सदर फरक मिरज आणि कुपवाड विभागाने जमेची चलने लेखा शाखेकडे पाठविली नसल्याने व त्या चलनाची जमा मुख्य किर्दीस न घेतल्याने पडला असलेचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे फरक रक्कम रु. 6986930.69/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम क्रमांक 9(3) नुसार जमा पावती पुस्तके रेकॉर्ड विभागाकडून एखाद्या विभागास दिल्यानंतर खातेप्रमुखाने त्याचा हिशोब नमुना क्र.1 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. सदर नियमाप्रमाणे गुंठेवारी विभागास पावतीपुस्तके दिल्यानंतर सदर पावती पुस्तकाची नोंद अनुक्रमांक नुसार नमुना क्र.1 च्या नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक असता ती घेण्यात आली नसल्याने मिरज आणि कुपवाड गुंठेवारी विभागाने रेकॉर्ड विभागाकडून घेतलेली पुस्तके व वापरलेली पुस्तके व शिल्लक पुस्तके यांचा मेळ घेता आलेला नाही.

4) विकास आकाराच्या जमा धनाकर्षासाठी पावती पुस्तक क्र.69 वापरण्यात आले असुन सदर पावती पुस्तकामध्ये 56901 ते 57000 अनुक्रमांकाच्या एकूण 100 पावत्या दुबार प्रतीमध्ये आहेत. सदर पावतीपुस्तकामध्ये 56901 ते 56913 पावत्या जमेपोटी केल्या असुन उर्वरित पावत्या रिकाम्या आहेत. तसेच प्रशमन शुल्कच्या जमा धनकर्षासाठी पावती पुस्तक क्र.69 वापरण्यात आले असुन त्यामध्ये 55401 ते 55500 अनुक्रमांकाच्या पावत्या दुबार प्रतीमध्ये आहेत. या पावतीपुस्तकामध्ये 55401 ते 55408 अनुक्रमांकाच्या पावत्या जमेपाटी केल्या असुन उर्वरित पावत्या निरंक आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 9(7) नुसार चालु वर्षी अंशत: वापरलेली पुस्तके पुढील वर्षात वापरण्यात घेतली नसल्यास त्यातील न वापरलेल्या पावत्या त्या वर्षाअखेरीस रद्द करुन तसा शेरा प्राधिकृत अधिका-याने पावती पुस्तकात लिहिने आवश्यक आहे. परंतु गुंठेवारी विभागाने सदर पुस्तक पुढील वर्षी वापरात ही घेतलेले नाही व रद्दही केलेले नाही. त्यामुळे या पावती पुस्तकाचा दुबार वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आर्थिक वर्ष 2015-16 च्या अंदाजपत्रकामध्ये 2013-14 या आर्थिक वर्षात प्रत्यक्ष जमा व खर्च झालेल्या रक्कमांचे नक्की आकडे देण्यात आले आहेत. अंदाजपत्रकामधील पृष्ठ क्र.75 वर द्विनोंद कोड क्र. 41305, लेखाशिर्ष - प्रशमन शुल्क पोटी रक्कम रु.744545/- व द्विनोंद कोड क्र. 41306, लेखाशिर्ष विकास आकार पोटी रक्कम रु.1895985/- जमा झालेचे नमुद आहे. लेखाविभागाकडील प्रशमन शुल्क रोजकीर्दीची तपासणी केली असता 2013-14 या आर्थिक वर्षातील प्रशमन शुल्कपोटीची जमा रक्कम रु.8272880.41/- जमा झालेले आहेत. तसेच विकास आकार किर्दीप्रमाणे जमा रक्कम रु.120230762.50/- इतकी आहे.

DRAFT

त्यामुळे लेखा विभागाने अंदाजपत्रकामध्ये जमा बाजूस घेतलेले नक्की जमेचे आकडे चुकीचे असल्याचे दिसुन येते.

DATRYJM7501 (Ref No : 98)

## *105 HCL कंपनीस कामाची देयके कराराप्रमाणे मिळाली नसल्याने त्यांनी महानगर पालिकेस कायदेशीर नोटीस देवून कामकाज बंद केल्याने ई गव्हर्नन्स अंतर्गत मिळणा-या नागरी सेवांचे कामकाज विस्कळीत झाल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities : 06**

*लेखा शीर्ष : संगणक स्वनिधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिका व HCL कंपनी यांचेमध्ये झालेल्या करारपत्रामधील Clause 21, Default मधील 21.1. a. SMKMC fails to perform on time any of their obligations ,except obligation to make payment on due date, under this Agreement for a consecutive period of three months, c. SMKMC fails to in its obligation to make payment up to three days beyond due date for a consecutive period of three months. या कलमा नुसार केलेल्या कामाची रक्कम रु.31012366/- महानगरपालिकेने आदा केली नसल्याने HCL कंपनीने कामकाज बंद केले आहे व याबाबत महानगरपालिकेने कोणतीही पर्यायी व्यवस्था न केल्याने महानगरपालिकेच्या ई गव्हर्नन्स अंतर्गत पुरविण्यात येणा-या नागरी सेवांचे कामकाज विस्कळीत झाले आहे.***

E-Governance अंतर्गत संगणकीकरण योजना राबविणे व नागरी सुविधा केंद्र स्थापन करुन त्या मार्फत संगणकीकृत सेवा देणेचे कामास महासभा क्रं. 09, ठराव क्रं.149, विषय क्र.12, दि.21/2/2009 ने HCL कंपनीस 10 वर्ष कालावधीसाठी मान्यता दिली आहे. सदरचा ठराव कायम होण्यापूर्वी या कामाचा कार्यादेश दि.02/03/2009 रोजी दिला आहे व कामाचे करारपत्र दि.25/05/2009 रोजी करण्यात आले आहे. या कामा मध्ये काही सेवा या सशुल्क (Chargable) व काही सेवा विनाशुल्क (NonChargable) स्वरुपाच्या आहेत. महापालिका ई गव्हर्नन्स अंतर्गत कंपनीने 300 सेवा या मोफत पुरविण्याच्या असुन, 33 सेवासाठी प्रती Transaction रु.63/- दर मंजुर झालेला आहे. कालांतराने 300 मोफत सेवामध्ये वाढ करण्यात आली असुन सध्या 352 सेवा मोफत उपलब्ध केल्या आहेत. नागरीकांना त्यांच्याशी संबंधित सेवासाठी मोजावे लागणारे शुल्क रु.63 नसुन नागरीकाकडून घेण्यात येणारी दाखला फी (उदा.मृत्यु दाखला फी रु.15) व HCL कंपनीस देण्यात येणारे Transaction शुल्क रु.63/- यामधील फरक हा महानगरपालिका स्वत:च्या निधीमधुन E-Governance योजनेवर खर्च करत आहे. या कामाच्या निविदा प्रक्रियेबाबत स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाने केलेल्या विशेष

लेखा परीक्षण अहवाल सन 2006-07 ते 2009-10 मध्ये परिच्छेद क्रमांक 27 वर सविस्तर आक्षेप घेण्यात आलेला आहे. तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाने (मनपा) 2011-12 या आर्थिक वर्षात केलेल्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र.120 व 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र.113 वर या योजनेमधील आक्षेप नोंदविले आहेत.

ई गव्हर्नन्स अंतर्गत सेवा पुरविण्याबाबतचे करारपत्र महानगरपालिका व HCL कंपनी यांच्यामध्ये दि.2/04/2009 रोजी झाले असुन सदर करारामधील कांही महत्वाच्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

अट क्र.17 (a) HCL will deposit all collection of a day to SMKCMC Bank Account A/c.No. 07192, Union Bank,Branch Sangli. Where SMKMC has given instruction to Bank to transfer HCL's share to HCL's Bank Account in every second day of week. Before this, HCL should certify the transaction & payable amount from System Manager and Chief Auditor of SMKMC. In case of HCL fails to deposit such collection to SMKMC's Bank Account it will be treated as breach of contract from HCL's side. In case SMKMC takes step to hinder transfer of HCL's share automatically then it will be treated as breach of contract from SMKMC side.

अट क्र.21 Default ,21.1 (a) SMKMC fails to perform on time any of their obligations (except obligation to make payment on due date) under this Agreement for a consecutive period of three months; (c) SMKMC fails to in its obligation to make payment up to three days beyond due date for a consecutive period of three months.

HCL बरोबर केलेल्या करारपत्रातील अट क्रं.17 (a) नुसार नागरी सुविधा केंद्रामध्ये जमा झालेले पैसे दररोज मनपाच्या बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. HCL कंपनीने दररोज बँक खात्यामध्ये पैसे जमा केले नाहीतर तो कराराचा भंग मानण्यात येईल. तसेच मनपाने HCL कंपनीच्या हिश्यापोटीची रक्कम प्रत्येक आठवड्याचे दुसऱ्या दिवशी कंपनीचे बँक खातेमध्ये भरणे आवश्यक आहे. मनपाने रक्कम भरली नाही तर मनपाचे वतीने कराराचा भंग होत आहे असे समजण्यात येईल असे नमुद केले आहे. या करारपत्रामधील अटीप्रमाणे कंपनीने नागरी सुविधा केंद्रामध्ये जमा झालेल्या रक्कमेचा भरणा महानगरपालिकेच्या खात्यामध्ये केला आहे.

तसेच करार अटी / शर्ती 21 मधील 21.1 (c) प्रमाणे मनपाने सलग तीन महिने देय तारखेच्या तीन दिवस विलंबाने पैसे आदा केले तर तो कराराचा भंग ठरेल असे नमुद आहे. त्याप्रमाणे मनपाने कंपनीचे हिश्याची रक्कम आदा करणे आवश्यक आहे. परंतु नस्तीची तपासणी केली असता मनपाचे वतीने करारानुसार कंपनीस रक्कम आदा केली नसल्याने कंपनीने काम बंद करणे बाबत दि. 25/10/2012 व दि.19/01/2013 रोजी लिगल नोटीस दिलेल्या आहेत. तसेच कंपनीची थकीत रक्कम आदा करणेबाबत दि.29/01/2013, दि.11/06/ 2013, दि.04/10/2013, दि.21/11/2013 रोजी आयुक्त,

DRAFT

महानगरपालिका यांना नोटीसा दिल्या आहेत. तसेच दि.12 नोव्हेंबर 2013 रोजी कंपनीने महानगरपालिकेस दिलेल्या ई मेल नुसार कंपनीचे दि.31/10/2013 अखेर रक्कम रु.31012366/- आदा केले नसल्याबाबत व दि.27/11/2013 च्या ई मेलने थकीत रक्कम आदा केली नाहीतर दि.15/12/2013 पासुन काम बंद करणेत येणार असल्याबाबतची अंतिम नोटीस देण्यात आली आहे.

2013-14 या आर्थिक वर्षामध्ये संगणक विभागाने द्विनोंद कोड क्र.41234, ई गव्हर्नन्स प्रकल्प लेखाशिर्षांतर्गत रु.6102125/- इतका खर्च केला आहे. 2013 - 14 या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेने **प्रमाणक क्र.1565 ने HCL कंपनीस दि.20/06/2013 रोजी रु.50,00,000/-** आदा केले आहेत.

या कामाचे करारपत्र, नस्ती व HCL कंपनीस 2013 -14 या आर्थिक वर्षात त्यांनी केलेल्या कामापोटी आदा केलेली देयके, महनगरपालिकेस HCL कंपनीने दिलेल्या लीगल नोटीस यांचे लेखापरीक्षण करुन अर्धसमास ज्ञापन क्र.132 दि.08/09/2016 रोजी निर्गमित केला असुन संगणक विभागाने त्याचे अनुपालन सादर केलेले नाही. या काममध्ये आढळलेल्या अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) या कामाच्या नस्तीमधील पृष्ठ क्र. टी 23/1 दि.15/06/2013 च्या कार्यालयीन टिपणीचे अवलोकन केले असता, सिस्टिम मॅनेजर यांनी HCL कंपनीने दि.11 जून 2013 चे पत्रान्वये मार्च 2013 अखेर त्यांची थकीत रक्कम रु.26261289/- ची मागणी केली असुन सदर देयक आदा करणेबाबतची टिपणी प्रशासनाकडे सादर केली आहे. या थकीत रक्कमेपैकी रु.50 लाख कंपनीस आदा करुन निवडणुक आचारसंहिता संपल्यानंतर स्टीअरींग कमीटीच्या बैठकीमध्ये या विषयास कार्योत्तर मंजुरी घेण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. तसेच थर्ड पार्टी तांत्रिक लेखापरीक्षण अहवाल अवलोकनी घेणे, स्थानिक संस्था कर सॉफ्टवेअर HCL मार्फत विकसित करणे तसेच HCL कंपनीची प्रलंबित देयके आदा करणेबाबत निर्णय घेणेसाठी स्टिअरींग कमिटीची बैठक बोलविणेची टिपणी दि.21/09/2013 रोजी सिस्टिम मॅनेजर यांनी सादर केली आहे व त्यानुसार बैठक बोलविण्याचे आदेश आयुक्त यांनी दिले आहेत. कामाच्या नस्तीमधील पृष्ठ क्र. टी 24 वरील दि. 13/12/2013 रोजीच्या संगणक विभागाच्या कार्यालयीन टिपणीमध्ये HCL कंपनीने SMKC/131210/1 दि.10/12/ 2013 रोजी दिलेल्या पत्रासोबत सादर केलेल्या देयकानुसार ऑक्टो. 2013 अखेर रु.31012366/- देणे प्रलंबित असुन सदरची रक्कम 15 डिसेंबर 2013 अखेर न दिल्यास ई-गव्हर्नन्स अंतर्गत देण्यात येणा-या सर्व सेवा बंद करण्यात येईल असे HCL कंपनीने महानगरपालिकेस कळविलेचे टिपणीमध्ये नमुद आहे. तसेच सदर टिपणीमध्ये दि.10 डिसेंबर 2013 रोजी झालेल्या स्टिअरींग कमिटीच्या बैठकीमधील निर्णयानुसार मनपा ई गव्हर्नन्स प्रकल्पाचे व कंपनीच्या कामाकाजाचे थर्ड पार्टी तांत्रिक लेखापरीक्षण करण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे. सदरचा अहवाल अगामी महासभेकडे सादर करण्यात येत आहे. HCL कंपनीच्या प्रलंबित देयकाबाबत महासभेच्या निर्णयानंतर पुन्हा स्टिअरींग कमिटीची बैठक घेवून याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आयुक्त तथा अध्यक्ष स्टिअरींग कमिटी यांनी सर्व समिती

DRAFT

सदस्यांच्या मान्यतेने बैठकीमध्ये स्पष्ट केल्याचे नमुद आहे. परंतु प्रलंबित देयके आदा न केल्याने कंपनीने पत्र क्र. SMKC/131216/1 ,दि.16 डिसेंबर 2013 ने कंपनीमार्फत देण्यात येणा-या सर्व सेवा स्थगित करण्यात येत आल्याचे महानगरपालिकेस कळविले आहे व त्यानुसार ई गव्हर्नन्सचे काम दि.16 डिसेंबर 2013 पासुन बंद करण्यात आले आहे. करारपत्रामधील अट क्र. 17(a) अन्वये HCL कंपनी त्यांचे नागरी सुविधा केंद्रामध्ये जमा झालेली दैनंदिन रक्कम महानगरपालिकेकडे वेळेत भरणा करीत असुन महानगरपालिकेने HCL कंपनीस देय असणारी रक्कम त्यांना वेळेत आदा केली नसल्याचे नस्तीमधील टिपणीवरुन तसेच कंपनीने महानगरपालिकेस दिलेल्या नोटीशीवरुन दिसुन येते. त्यामुळे महानगरपालिकेकडुन कराराचा भंग झाल्याने कंपनीने ई गव्हर्नन्सचे काम बंद केल्याचे स्पष्ट होते.

2)करारपत्रातील अट क्र.22 (b) नुसार change in law मुळे जर एखाद्या पार्टीचे नुकसान होणार असेल तर संबंधित पार्टीने दुसऱ्या पार्टीस लेखी नोटीस देवुन अटीमध्ये बदल केलेस होणाऱ्या कायदेशीर, व्यापारी व आर्थिक परीणामांची माहिती नोटीशीमध्ये देणे आवश्यक आहे व त्यानंतर दोन्ही पार्टीनी अटी व करारपत्रामधील बदलाबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. HCL कंपनीने महानगरपालिकेस थकीत रक्कमेबाबत नोटीस दिले नंतर थकीत रक्कम का देण्यात येत नाही या बाबतची कोणतीही माहिती महानगरपालिकेने कंपनीस दिलेली नाही व अटी व शर्तीमध्ये बदल करणेबाबतचा कोणताही प्रस्ताव कंपनीपुढे ठेवलेला नसल्याचे दिसुन येते.

3)कंपनीने थकीत देयके न दिल्याबाबत कायदेशीर नोटीस दिली असल्याने व त्यांनी काम बंद केल्याने त्यांना द्याव्या लागणाऱ्या नुकसान भरपाई रक्कमेची तसेच महानगरपालिकेस होणाऱ्या संभाव्य नुकसानीची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असता महानगरपालिकेने ती निश्चित केलेली नाही.

4) कंपनीने काम बंद केल्यानंतर महानगरपालिकेच्या सिस्टिम मॅनेजर यांनी पत्र No/cd/01/08/ 2014, दि.05/02/2014 च्या पत्रान्वये आपल्या कंपनीची प्रलंबित देयके आदा करण्याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय झाला नसल्याने आपण दि.16 डिसेंबर 2013 पासुन बंद करण्यात आलेली नागरी सुविधा केंद्र व डाटा सेंटर सुरू करण्याबाबत कळविले आहे. तसेच अशाच प्रकारची नोटीस कंपनीस दि.12/06/2014 रोजी दिली असुन त्यामध्ये आपण नागरी सुविधा केंद्र व डाटा सेंटर बंद केल्याने महानगरपालिकेच्या मालकीचा व आर्थिक व्यवहाराशी संबंधित गोपनिय असा डाटा स्वत:च्या ताब्यात ठेवल्याने महानगरपालिकेचे 31 मार्च 2014 अखेर अंदाजे रु.70 कोटीचे नुकसान केलेचे तसेच याबाबत आपल्याला दि.18/02/2014, दि.15/03/2014 व दि.24/04/2014 रोजी कायदेशीर नोटीस देखील दिल्याचे नमुद आहे. या वरुन ई गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत चालु असलेल्या सुविधांचा डाटा बॅक अप महानगरपालिकेकडे नसल्याने महानगरपालिकेचे सर्व आर्थिक व्यवहार बंद झाल्याचे तसेच कंपनीने कामकाज बंद केल्यानंतर महानगरपालिकेने प्रशासकीय कामकाज विस्कळीत होवू नये म्हणुन कोणतीही पर्यायी व्यवस्था केली नसल्याचे या नोटीशीवरुन स्पष्ट होते.

5) महानगरपालिकेने HCL कंपनीस डाटा सेंटर एकतर्फी बंद केल्याबाबत झालेल्या नुकसानीबाबत

DRAFT

तसेच डाटा सेंटर पुन्हा सुरु करण्याबाबत दि.18/02/2014 , 15/03/2014 व दि. 08/05/2014 रोजी ॲड आरविंद रा.देशमुख यांच्या मार्फत लिगल नोटीस पाठविली आहे. या सर्व नोटीशीस HCL कंपनीने कायदेशिर उत्तरे दिली असुन महानगरपालिकेने करारपत्रामधील Clause 21 Default नुसार 21.1 (a) SMKMC fails to perform on time any of their obligations (except obligation to make payment on due date) under this Agreement for a consecutive period of three months; (c) SMKMC fails to in its obligation to make payment up to three days beyond due date for a consecutive period of three months. या कलमा नुसार केलेल्या कामाची रक्कम महानगरपालिकेने कंपनीस आदा केली नसल्याने दि.31/10/2013 अखेरची थकीत रक्कम रु.31012366/- व त्यावर प्रती वर्ष 18 टक्केप्रमाणे व्याजाची मागणी केली आहे. ई गव्हर्नन्स प्रकल्पाची सध्याची न्यायालयीन प्रक्रीयेची स्थिती काय आहे याबाबतची माहिती संगणक विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेली नसल्याने सदरची थकीत रक्कम महानगरपालिका कशाप्रकारे आदा करणार आहे ते समजुन आले नाही.

DATSBKM7201 (Ref No : 132)

DRAFT

## ***लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र***

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|
| सुशीलकुमार बाळकृष्ण केंबळे, सहाय्यक संचालक | 100, 101, 103, 104, 105, 106, 67, 69, 70, 71, 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83, 84, 85, 86, 87, 88, 89, 90, 91, 92, 93, 95, 96, 97, 98, 99 |
| पंडित काशीनाथ चंद्रमोरे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 94 |
| प्रदिप पंढरीनाथ तेलवणे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 16, 17, 18, 19, 20, 21, 22 |
| रामकृष्ण नारायण डंके, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 66 |
| राजु यमू जाधव, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 1, 10, 102, 11, 12, 13, 14, 15, 2, 3, 4, 5, 6, 68, 7, 8, 9 |

DRAFT

## *परिच्छेदनिहाय अनुक्रमणिका*


| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | अनामत नोंदवही व बँक पासबुकमधील ताळमेळ जुळत नसलेने पडलेल्या रु. 2836744/- च्या फरकाबाबत. | (9ब) | 141 |
| 2 | कर्मचा-यांना दिलेल्या अग्रीम रक्कमांचे समायोजन केले नसलेबाबत. | (9अ) | 4 |
| 3 | नविन कर्मचा-यांचे सेवापुस्तकामधील नोंदी अपुर्ण ठेवलेबाबत. | (9ड) | 398 |
| 4 | कर्मचा-यांना जादा वेतनवाढ दिल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत. | (9ड) | 402 |
| 5 | नविन नियुक्त केलेले कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील नोंदी महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 नुसार घेतल्या नसलेबाबत. | (9ड) | 405 |
| 6 | रजा कालावधीचे वेतन वेतनवाढीच्या दिनांकापासून दिल्याने वेतन व भत्त्याचे अतिप्रदान झालेबाबत. | (9ड) | 407 |
| 7 | सांगली विभागाकडील मालमत्ता विभागाची थकबाकी रक्कम वसुल केली नसलेबाबत. | (9अ) | 7 |
| 8 | मिरज विभागाकडील मालमत्ता भाडेची थकीत रक्कम वसुल केली नसलेबाबत. | (9ब) | 142 |
| 9 | महानगरपालिका निवासस्थानामध्ये राहणा-या कर्मचा-यांचे कपात केलेले मासिक घरभाडे स्वनिधीमध्ये जमा केले जात नसल्याबाबत. | (9ब) | 147 |
| 10 | मालमत्ता विभागाने मनपा अस्थापनेवर नसलेल्या व्यक्तींना निवास्थान वाटप केले असुन त्यांचे कडून घरभाडेची रक्कम वसूल केली नसल्याबाबत. | (9अ) | 12 |
| 11 | महानगरपालिका क्षेत्रातील मनपा मालकीची जागा, गाळे, खोके, इमारती यांची भाडेवाढ विहित मुदतीत न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. | (9ब) | 149 |
| 12 | अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तकामध्ये वारस नामनिर्देशनाच्या नोंदी घेतल्या नसलेबाबत. | (9ड) | 410 |
| 13 | नोंदणीकृत व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कर रक्कमेचा कमी भरणा केलेबाबत. | (9अ) | 16 |
| 14 | मिरज घरपट्टी विभागातील जमा पावती पुस्तक क्र 456 उपलब्ध करुन दिले नसल्याबाबत. | (9अ) | 18 |
| 15 | सांगली विभागाने घरपट्टीची आकारणी विलंबाने केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. | (9ब) | 150 |
| 16 | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पिण्याच्या पाण्याचा कोटा वाढवून न घेतल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. | (9ब) | 151 |
| 17 | नविन पाणीपुरवठा कनेक्शनधारकांना मागणी देयके विलंबाने दिलेने महानगरपालिकेस पाणीपुरवठा देयकापोटी मिळणारी रक्कम वेळेत मिळत | (9अ) | 20 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | नसलेबाबत. | | |
| 18 | पाणी मिटर बंद असल्यामुळे पाण्याच्या प्रत्यक्ष वापरा प्रमाणे महसुली उत्पन्न मिळत नसल्याबाबत. | (9अ) | 23 |
| 19 | प्लंबर लायसन्स परवाना,नुतनीकरण व लायसन्सधारक यांचे कामकाजामधील त्रुटीबाबत. | (9ड) | 411 |
| 20 | पाणीपट्टी थकबाकी वसूल करण्यासाठी नियमाप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेबाबत. | (9अ) | 25 |
| 21 | सांगली पाणीपुरवठा विभागाने ग्राहकांना नविन मिटर कनेक्शन देणेसाठी नळ कारागीर यांना लायसन्स दिले नसलेबाबत. | (9ड) | 412 |
| 22 | मासिक विद्युत देयकाच्या रकमा अदा करताना सवलत कालावधीचा फायदा न घेतल्याने झालेल्या नुकसानीबाबत. | (9ब) | 152 |
| 23 | सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेतील घरपट्टी विभागाकडे जमा झालेला महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी उपकर विलंबाने शासनाकडे जमा केलेबाबत | (9ब) | 153 |
| 24 | ग्रंथालय विभागाने सभासद थकबाकीची रक्कम वसुल केली नसलेबाबत | (9ड) | 414 |
| 25 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील अनियमिततेबाबत. | (9ब) | 155 |
| 26 | उद्यान विभागामधील अनियमिततेबाबत | (9अ) | 26 |
| 27 | कॉम्पेक्टर नंबर MH-10-P1007 च्या दुरुस्तीमधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 160 |
| 28 | पेट्रोल-डिझेल वाहनांच्या दुरुस्तीवर वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च केलेबाबत. | (9अ) | 29 |
| 29 | कार्यशाळा विभागाला स्टॉकसाठी लागणारे लुब्रिकेटिंग ऑईल खरेदी मधील अनियमिततेबाबत | (9अ) | 30 |
| 30 | वाहन विभागातील अनियमिततेबाबत | (9ब) | 162 |
| 31 | डंपर प्लेसर MH-10-P-22 च्या दुरुस्ती खर्चामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 163 |
| 32 | प्रलंबित दाव्याची माहिती विधी विभाग व वकीलांना दिली नसल्याने प्रलंबित राहिलेल्या दाव्याबाबत | (9ड) | 415 |
| 33 | विवाह नोंदणी शुल्क व शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरणा न केलेबाबत. | (9अ) | 32 |
| 34 | विधी विभागाच्या कामकाजामधील अनियमिततेबाबत. | (9अ) | 34 |
| 35 | सुधारित वेतन बँड मध्ये कमाल टप्प्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांना एक वेतनवाढ जादा दिल्याने व जादा ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कमेच्या झालेल्या अतिप्रदानाबाबत. | (9ब) | 165 |
| 36 | अर्हताकारी सेवा 20 वर्ष पेक्षा कमी असताना स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजुर करुन निवृत्ती वेतन अंशराशीकरण रक्कम आदा केलेबाबत. | (9ब) | 167 |
| 37 | पदोन्नती साखळीतील पदोन्नतीचे पद नसताना एकाकी पदानुसार ग्रेडवेतन | (9ब) | 169 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | मंजूर करणे ऐवजी चुकीचे ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत. | | |
| 38 | चुकीच्या वेतननिश्चीतीमुळे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान व अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत. | (9ब) | 171 |
| 39 | वाढीव कुटुंब निवृत्ती वेतन विहीत मुदतीनंतर कमी केले नसल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत. | (9ब) | 173 |
| 40 | मनपा हद्दीतील रिकाम्या भुखंडावर (मोकळ्या जमीनीवर) कर निर्धारण केले नसल्याबाबत | (9ब) | 175 |
| 41 | कुपवाड विभागाकडील मालमत्ता कर आकारणी मधील अनियमितताबाबत. | (9ब) | 177 |
| 42 | मिरज विभागाने मालमत्ता कर आकारणी विलंबाने केल्याबाबत. | (9ब) | 179 |
| 43 | मिरज विभागाकडील मालमत्ता कर आकारणी मधील अनियमितताबाबत | (9ब) | 181 |
| 44 | सुजल निर्मल अभियान योजने अंतर्गत पॅकेज क्र. 1.1 व 1.3 मधील हिराबाग केंद्र येथे टाकी बांधणे, वितरण व्यवस्था बळकट करणे, बल्क मीटर बसविणे या कामातील अनियमिततेबाबत. | (9ब) | 183 |
| 45 | सुजल निर्मल अभियानांतर्गत अस्तित्वातील वितरण व्यवस्था बळकटीकरण करणे, बल्क मीटर बसविणे व योजना 24/7 प्रणाली अंतर्गत चालविणे (पॅकेज क्र. 2.1 व 2.3) या कामातील अनियमिततेबाबत. | (9ब) | 190 |
| 46 | सुजल निर्मल अभियान योजने अंतर्गत मिरज जलशुध्दीकरण येथे 10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपारिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. | (9ब) | 197 |
| 47 | सुजल निर्मल अभियान योजनेअंतर्गत पॅकेज क्र. 1.1 व 1.3 मधील शामराव नगर येथे ऑक्सीडेशनल पॉन्ड टाकी बांधणे, इंटेकवेल नुतनीकरण, फिडर मेन टाकणे, वितरण व्यवस्था नुतनीकरण करणे या कामातील अनियमितताबाबत. | (9ब) | 202 |
| 48 | सुजल निर्मल अभियान योजनेअंतर्गत मिरज पाणीपुरवठा विभागातील अस्तीत्वातील 19.20 द.ल.लि. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता 28.80 द.ल.लि. पर्यंत वाढवणे व अस्तीत्वातील जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे. या कामातील अनियमितता. | (9ब) | 209 |
| 49 | बांधकाम परवानगी देताना वसुल केलेल्या उपकर रक्कमेचा भरणा कामगार कल्याण मंडळाकडे केला नसलेबाबत. | (9अ) | 37 |
| 50 | क्षेत्रफळ कमी धरुन आकारणी केल्याने उपकर, स्थानिक संस्था कर व दंडात्मक शुल्काची रक्कम कमी वसुल झालेबाबत. | (9ब) | 213 |
| 51 | जनरल फंड निधीच्या रोकडवही व बँकपासबुक रक्कमेमधील तफावतीचा ताळमेळ घेतला नसलेबाबत. | (9अ) | 39 |
| 52 | भविष्य निर्वाह निधी खाते मधील अनियमितताबाबत. | (9अ) | 41 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 53 | शालेय क्रिडा स्पर्धा 2013-14 च्या खर्च रक्कमेची उपप्रमाणके, विनियोग दाखले व खर्चा बाबतची अनुषंगिक अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नसलेबाबत. | (9ब) | 214 |
| 54 | घन कचरा व्यवस्थापनांतर्गत साहित्य खरेदी मधील अनियमिततेबाबत. | (9अ) | 43 |
| 55 | घन कचरा व्यवस्थापनांतर्गत कॉम्पॅक्टर खरेदी मधील अनियमिततेबाबत. | (9अ) | 46 |
| 56 | वॉर्ड क्र. 21 मधील भिमनगर येथील रस्ते सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 216 |
| 57 | चिंतामणी नगर येथील सांस्कृतीक हॉल बांधणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 219 |
| 58 | वॉर्ड क्र. 30 नवीन वसाहत अंतर्गत रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे करणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 222 |
| 59 | वॉर्ड क्र. 59 गणेश नगर, डी.ए. पाटील घर, बेडकर किराणा दुकान, शास्त्रीनगर समाज मंदिर रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 224 |
| 60 | वॉर्ड क्र.14 केशव कॉलनी अंतर्गत रस्ते करणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 227 |
| 61 | सफाई कर्मचा-यांची चुकीची वेतननिश्चिती केलेबाबत. | (9ड) | 418 |
| 62 | चुकीच्या वेतननिश्चीतीमुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत | (9ब) | 229 |
| 63 | सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्तीवेतन व सेवा उपदानाच्या रक्कमेचे कमी प्रदान झालेबाबत. | (9ड) | 419 |
| 64 | वैद्यकिय प्रमाणपत्रा शिवाय मंजूर करण्यात आलेला असाधारण रजा अर्हताकारी सेवेतुन कमी न केल्याने निवृत्ती वेतन व उपदान यांचे अतिप्रदान झाले बाबत. | (9ड) | 421 |
| 65 | सुधारित वेतन बँड मध्ये कमाल टप्पावर पोहचलेल्या कर्मचा-यांना एक वेतनवाढ जादा दिल्याने व जादा ग्रेडवेतन मंजूर केल्याने झालेल्या वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत. | (9ब) | 233 |
| 66 | कुपवाड विभागामधील मालमत्तांना मालमत्ता कर आकारणी विलंबाने केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत | (9ड) | 422 |
| 67 | इंदिरा घरकुल झोपडपट्टी स.न.138/ब येथे 155 + 651= 806 घरकुले बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. | (9अ) | 50 |
| 68 | बांधकाम परवाना दिलेल्या व्यक्तिकडुन एल.बी.टी.ची उर्वरित 50 टक्के रक्कम वसुल केली नसलेने झालेल्या नुकसानीबाबत. | (9ब) | 235 |
| 69 | संजय गांधीनगर मिरज स.नं.964/अ येथे 438 घरकूलांचे पायाभुत सुविधासह बांधकाम करणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9अ) | 61 |
| 70 | माळबंगला येथे 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे आधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. | (9अ) | 69 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 71 | सांगली, मिरज आणि कुपवाड हद्दीतील अस्तित्वातील 22 उंच टाक्या व 3 संप पंप हाऊस दुरुस्त करणे या कामातील अनियमिततेबाबत. | (9ब) | 236 |
| 72 | सांगलीवाडी येथे 15 लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे तसेच शामरावनगर येथे वितरण नलिका टाकणे व विविध ठिकाणी कंपाऊंड वॉल बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. | (9ब) | 241 |
| 73 | कोल्हापूर रोड येथे 15 लाख लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे, वितरण व्यवस्था व कंपाऊंड वॉल बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. | (9ब) | 248 |
| 74 | माळबंगला येथे 25 लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ,वसंत कॉलनी,काळी खण ESR झोन येथे वितरण व्यवस्था व कंपौंड वॉल बांधणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 259 |
| 75 | महानगरपालिका हद्दीत 15 लाख लिटर क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणे, संजय नगर,माळबंगला परिसरात वितरण व्यवस्था करणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 268 |
| 76 | माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथुन कुपवाड झोनकरीता नविन 200 HP क्षमतेचे पंप पुरविणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 279 |
| 77 | घरपट्टीची मागणी देयके मालमत्ताधारकास विलंबाने दिलेने घरपट्टीचा भरणा उशिरा झाल्याने मनपास सदरची रक्कम वेळेत प्राप्त झाली नसलेबाबत. | (9अ) | 84 |
| 78 | मिरज शहर भुयारी गटर योजनेमध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत. | (9ब) | 282 |
| 79 | सांगली शहर भुयारी गटार योजनेच्या कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत. | (9ब) | 309 |
| 80 | वाढीव व सुधारित सांगली व कुपवाड नळ पाणीपुरवठा योजना पॅकेज 3.1, 3.3 व 3.4 या कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत. | (9अ) | 89 |
| 81 | UIDSSMT योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या उपांगाचे काम अपुर्ण असल्याने, पुर्ण झालेल्या उंच टाक्या व वितरण व्यवस्था या उपांगावर झालेला खर्च रु.4866.89 लक्ष गुंतुन पडल्याबाबत. | (9ड) | 424 |
| 82 | UIDSSMT योजने अंतर्गत चालु असलेल्या कामावर मनपा हिश्श्याच्या रक्कमेची अंदाजपत्रकामध्ये तरतुद करुन खर्च केला नसल्याने निधी अभावी कामे प्रलंबित राहिल्याबाबत. | (9ड) | 431 |
| 83 | वॉर्ड क्र.69 मधील स्वामी समर्थ मंदिर परिसर येथील रस्ते डांबरी करणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 340 |
| 84 | वॉर्ड क्र.21 भिमनगर अंतर्गत कॉंक्रीटचे रस्ते करणे या कामामधील अनियमितते बाबत. | (9ब) | 344 |
| 85 | दलित वस्ती सुधार योजनेमधुन करण्यात आलेल्या विकास कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 347 |
| 86 | मुख्य लेखापरीक्षकांनी महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक चाचणी करुन | (9अ) | 96 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | 2013-14 या आर्थिक वर्षात केलेल्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाची प्रत लेखापरीक्षणास सादर केली नसलेबाबत. | | |
| 87 | वॉर्ड क्र.13 काँग्रेस भवन समोर स्वागत कमान बांधणे हे काम नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन करता येत नसताना केलेने झालेल्या अनियमिततेबाबत. | (9अ) | 99 |
| 88 | ठेकेदाराकडून नेमण्यात आलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांना किमान वेतनानुसार वेतन दिल्याबाबतची तसेच त्यांचे भविष्य निर्वाह निधीची रक्कम कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे भरणा केले बाबतची कागदपत्रे दाखविली नसलेबाबत. | (9अ) | 102 |
| 89 | महानगरपालिकेने कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांचे वेतनामधुन कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे भरणा केली नसल्याबाबत. | (9अ) | 108 |
| 90 | अर्थसंकल्पावरील भाष्य :- अंदाजपत्रकीय तरतुद व प्रत्यक्ष जमा व खर्च यामध्ये आढळून आलेल्या तफावतीबाबत. | (9अ) | 110 |
| 91 | आर्थिक वर्ष संपण्याचे अखेरीस बांधकाम विभागाने विकास कामाची टेंडर मागवुन त्याबाबतची कार्यवाही पुढील वर्षामध्ये केल्याने झालेल्या गंभीर वित्तिय अनियमिततेबाबत. | (9अ) | 120 |
| 92 | सुधारीत अंदाजपत्रपकाप्रमाणे खर्चामध्ये कपात करुन कामे न करता, मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीनूसार निविदा मागवुन कामे केल्याने प्रलंबित देयकाचे दायित्व महानगरपालिकेवर वाढून झालेल्या वित्तिय अनियमिततेबाबत. | (9अ) | 122 |
| 93 | प्रभाग समिती क्रं.1 व 2 च्या कार्यक्षेत्रातील गणेशोत्सव निमित्त रस्त्यातील खड्डे मुरुमाने भरणे या कामामधील अनियमिततेबाबत. | (9अ) | 125 |
| 94 | भांडार विभागातील साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत. | (9ड) | 436 |
| 95 | वॉर्ड क्र.25 मधील हरीओम नगर मंदीर जवळ आर.सी.सी.कमान बांधणे हे काम नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन केलेने झालेल्या अनियमितते बाबत. | (9अ) | 128 |
| 96 | प्रभाग समिती क्र. 4 मध्ये करण्यात आलेल्या विविध विकास कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 358 |
| 97 | कुपवाड प्रभाग समिती क्र.03 मध्ये करण्यात आलेल्या विविध विकास कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत. | (9ब) | 367 |
| 98 | प्रभाग समिती क्रमांक 2 मध्ये करण्यात आलेल्या विकास कामामधील अनियमिततेबाबत. | (9ब) | 376 |
| 99 | महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची नोटीस भरपुर खप असलेल्या स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिली नसलेबाबत तसेच महासभा क्र.01 ते क्र. 05 चे इतिवृत्त नोंदवहीमध्ये लिहिले नसलेबाबत. | (9अ) | 131 |
| 100 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67(3)(क) खाली करण्यात आलेल्या वॉनलेसवाडी नाल्यामध्ये आर.सी.सी.पाईप टाकणे या कामामधील | (9ब) | 388 |


DRAFT

| प. क्र. | परिच्छेद शीर्षक | कलम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | अनियमिततेबाबत. | | |
| 101 | नगरसेवकांना देण्यात आलेल्या मोबाईल सेवेचे अर्थिक लाभ वसुल करण्याबाबत. | (9ब) | 391 |
| 102 | मिरज व कुपवाड गुंठेवारी विभागाकडे धनाकर्षाने जमा केलेल्या प्रशमन शुल्क व विकास आकार रक्कमेच्या जमा पावत्या गुंठेवारीधारकास दिल्या नसलेबाबत. | (9ड) | 440 |
| 103 | वार्षिक प्रशासन अहवाल व वार्षिक लेखे लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत. | (9अ) | 135 |
| 104 | स्थायी समीतीने लेखे ठेवणेसाठीचे निर्देशित केलेले विहित नमुने लेखा विभागाने लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत तसेच उपर्जित द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवला नसलेबाबत. | (9अ) | 137 |
| 105 | HCL कंपनीस कामाची देयके कराराप्रमाणे मिळाली नसल्याने त्यांनी महानगर पालिकेस कायदेशीर नोटीस देवून कामकाज बंद केल्याने ई गव्हर्नन्स अंतर्गत मिळणा-या नागरी सेवांचे कामकाज विस्कळीत झाल्याबाबत. | (9ड) | 443 |
| 106 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3)(क) खाली करण्यात आलेल्या 17 कामांचे दप्तर लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने रक्कम रु.7916484/- आक्षेपाधिन ठेवण्यात आलेबाबत. | (9अ) | 138 |



DRAFT